श्री.

# दानचंद्रिका.

( मराठी भाषांतरा सहित )

श्रीमंत सरकार महाराज साहेब यांचे
आज्ञेवरून

बडोदें
सिटी प्रिंटिंग प्रेस छा. छापिलें

प्रति ३००

सन १९०८-०९

किंमत रु. १-०-०

*Poona City General Library.*

*Class*.................. *No*..................

श्री.

# प्रस्तावना.

' दानचंद्रिका ' हा ग्रंथ काशींत राहणारे काळे आडनांवाच्या रामेश्वरभट्टाचा नातू व महादेवभट्टाचा मुलगा दिवाकरभट्ट यांनीं हेमाद्रिदानखंड, दानोद्योत, दानरत्न, दानमयूख वगैरे ग्रंथांच्या आधारानें रचिलेला असून त्यांत दानाचें लक्षण, त्याचे सात्विकादि प्रकार, काळ, पात्रापात्र विचार, पुण्यकारक स्थळें त्यादि विषयांचा सशास्त्र निर्णय करून तुळा पुरूष व सोनें इत्यादि दहा महादानें वगैरे सर्व दानांचा त्यांच्या प्रयोगांसह थोडक्यांत चांगला संग्रह केला आहे. शिवाय ग्रंथकर्त्यानें ग्रंथाच्या शेवटीं दुष्ट दानांच्या प्रतिग्रहांचीं प्रायश्चित्तेंही सांगितलीं आहेत, त्यावरून हा एकच ग्रंथ संग्रहीं ठेवल्यानें त्यापासून विद्वानांस पुष्कळच फायदा होण्यासारखा आहे, हें हा ग्रंथ समग्र वाचल्यानें सुज्ञ व मार्मिक अशा वाचक वर्गाच्या सहजच ध्यानांत येईल.

सांप्रतकाळीं प्राचीन संस्कृत विद्येचा बराच ऱ्हास होत चालला म्हणून तिचा उत्कर्ष व्हावा व तिचें प्राकृत लोकांस चांगल्या रीतीनें ज्ञान व्हावें या सद्धेतूनें श्रीमंत सरकार गायकवाड सयाजीराव महाराज यांनीं बऱ्याच उपयुक्त प्राचीन संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें विद्वान् लोकांकडून करविलीं. त्याप्रमाणें मलाही तारीख १ माहे जानेवारी सन १९०१ पासून उपयुक्त संस्कृत

ग्रंथांचीं भाषांतरें करण्याविषयीं हुजुराज्ञा झाली. त्या हुकुमान्वयें मीं सदर ग्रंथाचें यथामति भाषांतर केलें. यांत जे गुण व दोष असतील त्यांतील ' गुणवद्वाक्यमादत्ते हंसःक्षीरमिवांभसः ' या सुभाषिताप्रमाणें विद्वान् वाचक वर्ग दोषांचा त्याग करून गुणांचा स्वीकार करतील अशी आशा आहे. शेवटीं मी श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांची संस्कृत विद्याभिरुचि दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो व त्यांस सुचिरायु प्राप्त होवो अशी जगन्नियंत्या परमेश्वरास प्रार्थना करून प्रस्तावना पुरी करितों.
बडोदें तारीख २० माहे फेब्रुवारी सन १९०६.

भिकाचार्य बाळाचार्य ऐनापुरे.
श्रीमंत गायकवाड सरकार
महाराजाश्रित.

श्री.

# दानचंद्रिकेंतील विषयांची अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| मंगलाचरण .... .... .... .... | १ |
| दानाचें लक्षण .... .... .... .... | २ |
| दानाचे सात्विकादि प्रकार .... .... ... | २ |
| दान देण्यास योग्य अशाचें लक्षण .... .... | ४ |
| अब्राम्हण व ब्राम्हणब्रुव यांचें लक्षण ... .... | ५ |
| घेण्यास अयोग्य दानें .... ... .... | ६ |
| दान करण्याचा काळ .... .... .... | ७ |
| दान करण्यास पवित्र स्थळें ... ... .... | ९ |
| तीर्थाचे ठिकाणीं दान घेण्याचा निषेध .... .... | ११ |
| मोठी विपत्ति असतां दान घेण्याविषयीं हरकत नाहीं.... | ११ |
| दान करण्याच्या वेळेचें कृत्य.... .... .... | १२ |
| दान घेणाराचें कृत्य .... .... .... | १४ |
| ब्राम्हणादि दाता असतां कृत्य .... .... | १५ |
| द्रव्याचें परिमाण ( कोष्टक ).... .... .... | १६ |
| धान्य मोजण्याचें परिमाण ( कोष्टक ) ... .... | १७ |
| दानावर दक्षिणा देण्याविषयीं .... .... | १८ |
| दानाच्या प्रमाणावर दक्षिणा .... .... | १९ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| दक्षिणेचे उत्तमादि भेद .... .... .... | १९ |
| मेंढी इत्यादि दानांची दक्षिणा .... .... | १९ |
| ऋत्विक् जप करणार इत्यादिकांची दक्षिणा .... | १९ |
| दानांत येणाऱ्या वस्तूंच्या देवता .... .... | २१ |
| दान घेणारानें दानांतील वस्तू कशा रीतीनें घ्याव्या त्याविषयीं .... .... | २४ |
| तुळा पुरुषाच्या दानाचें फळ.... .... .... | २७ |
| कुंड मंडपाबद्दल शास्त्रार्थ .... .... .... | २८ |
| तुळा व वेदीचें प्रमाण .... .... .... | ३० |
| वेदीवरखांब पुरण्याकरितां योग्य वृक्ष .... .... | ३० |
| खांबाचें प्रमाण.... .... .... .... | ३१ |
| तुळेचें ( तराजूचें ) प्रमाण .... .... .... | ३१ |
| अग्निपुराणांतील तुळेचें प्रमाण .... .... | ३२ |
| नारदाच्या मतानें तुळेचें प्रमाण .... .... | ३२ |
| तु[illegible] [illegible]ण व तिच्या वरील देवता .... .... | ३५ |
| देवतांचीं नांवें .... .... .... .... | |
| तुळेचे दुसरे अवयव .... .... .... | ३६ |
| वेदीवर सोळादळांचें चक्र लिहिण्याचा प्रकार .... | ३९ |
| ठक्कूर यांचे मतानें सोळादळांचें चक्र .... .... | ४१ |
| तूप, मध, तेल, वस्त्र, मीठ, गुळ, साखर, चंदन केशर, दूध यांच्या तुळांचीं फळें .... .... | ४४ |
| तुळादानाचा विधि .... .... .... | ४५ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| तोललेल्या द्रव्याची व्यवस्था.... .... .... | ४५ |
| सर्व रोग, क्षयरोग, मूळव्याध, अपस्मार, कुष्ट, रक्तपित्त, प्रदर, परमा, संग्रहणी, भस्मक, गंडमाळा, अग्निमांद्य, दराद, खोकला, दमा, जळोदर, ओकारी, पित्त, भगंदर, कंपवायु, व सर्व रोग यांचा नाश होण्याकरितां लोखंड, कांसें वगैरेंच्या तुळा .... .... | ४९ |
| दानोद्योतांतील सोनें, रुपें, रत्नें, तांबें, तूप, गूळ, मीठ, मध, तेल वगैरेंच्या तुळांचीं फळें .... .... | ४९ |
| तोळण्यांत येणाऱ्या लोखंड, कांसें, कथील, शिसें, रुपें, सोनें वगैरे द्रव्यांच्या देवता .... ... .... | ५१ |
| सूर्यग्रहण व चंद्रग्रहण यांवर सोनें व रुपें यांची तुळा करण्याविषयीं .... ... .... ... | ५२ |
| तुळा पुरुषाच्या दानाचा विधि ... .... | ५४ |
| तुळा पुरुषाच्या दानाचा संकल्प ... .... | ५६ |
| तुळा दानाचा प्रयोग .... .... .... | ६२ |
| तुळा द्रव्याचा उत्सर्ग .... ... ... | ६५ |
| तुळेच्या दानाचें प्रायश्चित्त .... .... ... | ६६ |
| तुळेच्या द्रव्याचा काळ .... ... .... | ६६ |
| हजार गाईंच्या दानाचा प्रयोग .... .... | ७० |
| आचार्यानें करावयाचें कृत्य .... .... .... | ७१ |
| यजमानानें करावयाचें कृत्य .... .... .... | ७२ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| दानाचा मंत्र .... .... .... .... | ७२ |
| देवतांचें विसर्जन .... .... .... .... | ७३ |
| बैलासह शंभर गाईंच्या दानाचा प्रयोग .... .... | ७६ |
| गाईंच्या प्रार्थनेचे मंत्र .... .... ... | ७६ |
| बैलाच्या प्रार्थनेचा मंत्र .... .... .... | ७७ |
| यजमानानें करावयाचें कृत्य .... .... .... | ७७ |
| बैलासह दहा गाईंच्या दानाचा प्रयोग .... .... | ८० |
| गाईंच्या प्रार्थनेचे मंत्र .... .... .... | ८० |
| बैलाच्या प्रार्थनेचा मंत्र .... .... .... | ८१ |
| यजमानानें करावयाचें कृत्य .... .... .... | ८१ |
| सोनें, घोडा, तीळ, हत्ती, दासी, रथ, जमीन, घर, कन्या व कपिलागाय हीं मोठीं दहा दानें.... .... | ८२ |
| सोन्याच्या दानाचा प्रयोग .... .... .... | ८३ |
| घोड्याचें दान .... .... .... .... | ८४ |
| पांढऱ्या घोड्याचें दान .... .... .... | ८७ |
| दानाचा संकल्प ... .... .... .... | ८७ |
| प्रार्थनेचा मंत्र व पुढील विधि .... .... | ८८ |
| शंकरास घोड्याचें दान देणें .... ... .... | ८९ |
| तिळांचें दान .... .... .... .... | ९१ |
| तिळांचें फळ ... .... .... .... | ९१ |
| दानाचा संकल्प ... .... .... .... | ९२ |
| तिळपात्राचें दान .... ... .... .... | ९२ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| मोठ्या तिळपात्राचें दान .... .... | .... ९४ |
| दानाचें फळ, व तिळपात्राचें प्रमाण .... | ... ९५ |
| आईच्या ऋणापासून मुक्त करणाऱ्या तिळांनीं भरलेल्या कांशाच्या पात्राचें दान. | ....९८ |
| त्याचें फळ व त्याचा विधि .... .... | .... ९९ |
| कांशाच्या पात्राच्या दानाचा प्रयोग .... | ....१०० |
| दानाचे मंत्र .... .... .... | ....१०० |
| तिळांनीं भरलेल्या गडव्याचें दान .... | ...१०२ |
| दानाचें फळ .... .... .... | ....१०२ |
| हत्तीचें दान .... .... .... | ....१०५ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....१०५ |
| प्रार्थनेचे मंत्र वगैरे .... .... | ....१०६ |
| दासीचें दान ... .... .... | ...१०७ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....१०८ |
| रथाचें दान .... .... .... | ....१०९ |
| दानाचा संकल्प .... .... ... | ...१०९ |
| गाडीचें दान, फळ व संकल्प .... ... | ....११० |
| पालखीचें दान व विधि ... .... | ....११२ |
| भूमीचें दान व त्याचें फळ .... .... | ....११५ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....११६ |
| दान दिलेली भूमि परत घेतली असतां त्याचें फळ | ....११९ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| घराचें दान, व त्याचें फळ .... .... | ....११८ |
| दिशापरत्वें दुसरे भाग व कुव्याचें फळ .... | ....११९ |
| वास्तुशांतीचा प्रयोग .... ... | ....१२८ |
| वास्तुमंडळ .... .... .... | ....१३० |
| मंडळांत देवतांचें स्थापन .... .... | ....१३० |
| नवग्रहानें युक्त वास्तुशांतीचा प्रयोग ... | ....१३५ |
| यजमानावर अभिषेक करणें .... .... | ....१३७ |
| घराला सूत्रवेष्टण करणें आणि जमिनींत वृषवास्तु पुरणें .... .... .... | ....१३८ |
| आचार्य वगैरेंची पूजा, त्यांस दाक्षिणा देणें, देवतांचें विसर्जन, ब्राह्मणभोजन भूयसी व कर्माची समाप्ति .... .... | ...१३९ |
| वास्तुशांतीचा शास्त्रार्थ .... .... | ....१४२ |
| आश्वलायनगृह्यसूत्रांतील वास्तुशांतीचा प्रयोग | ....१४३ |
| घराभोंवती पाणी फिरविणें .... .... | ....१४४ |
| होमाचा प्रकार .... .... .... | ....१४५ |
| घराच्या दानाचा प्रयोग .... .... | ....१४९ |
| यजमानानें करावयाचें कृत्य .... ... | ....१४९ |
| दान घेणारानें करावयाचें कृत्य .... | ... १५० |
| घराच्या दानाचें फळ व दान घेण्याचा प्रकार | ....१५१ |
| मठाचें दान .... ... .... | ...१५२ |
| धर्मशाळेचें दान, व त्याचें फळ .... | ...१५३ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| कन्यादान, त्याचें फळ व विधि .... | ...१५६ |
| कन्यादानाचा प्रयोग .... .... | ....१५९ |
| कन्यादानानंतर दात्यानें करावयाचें कृत्य.... | ....१६२ |
| मुलीच्या घरीं जेवण्याचा निषेध.... .... | ....१६२ |
| कपिला ( गाई ) चें दान व त्याचें फळ .... | ....१६५ |
| कपिलेच्या दानाचा प्रयोग .... .... | ....१६६ |
| मत्स्यपुराणांतील कपिलेच्या दानाचें फळ.... | ....१६६ |
| मोठ्या कपिलेच्या दानाचा प्रयोग .... | ....१६७ |
| दहा गाईंचीं दानें.... .... .... | ....१८२ |
| त्यांचीं नांवें व स्वरूप .... .... | ....१८२ |
| गुडधेनूच्या दानाचा विधि .... .... | ....१८३ |
| दानाचा संकल्प .... .... .. | ....१८४ |
| तिळांच्या धेनूचें दान .... .... | ....१८५ |
| प्रतिमा वगैरे विकण्याविषयीं .... .... | ....१८६ |
| तुपाच्या धेनूचें दान .... .... | ....१८७ |
| जलधेनूचें दान .... .... .... | ....१८८ |
| क्षीरधेनूचें दान .... .... .... | ....१८९ |
| मधुधेनूचें दान .... .... .... | ....१९० |
| शर्कराधेनूचें दान .... .... .... | ....१९१ |
| दह्याच्या धेनूचें दान .... .... | ....१९२ |
| रसधेनूचें दान .... ... .... | ....१९३ |
| प्रत्यक्ष धेनूचें दान.... .... .... | ....१९४ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| तिच्या दानाचा प्रयोग .... .... | ....१९४ |
| पांढऱ्या इत्यादि वर्णांच्या गाईच्या दानाचें फळ | ....१९६ |
| एकरंगी गाय व वासरूं यांच्या दानाचें फळ | ....१९७ |
| काळ्या गाईचें दान .... .... | ....१९८ |
| हेमश्रृंगीचें दान व फळ .... .... | ....१९८ |
| कापसाच्या धेनूचें दान .... .... | ....२०० |
| मिठाच्या धेनूचें दान .... .... | ....२०२ |
| सोन्याच्या धेनूचें दान .... .... | ....२०४ |
| वंध्यात्व नाहिंसें करणारें सुवर्ण धेनूचें दान | ....२०७ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....२०९ |
| उभयतोमुखीचें दान .... .... | ....२१६ |
| दानाचें फळ .... .... .... | ....२१६ |
| दानाचा प्रयोग .... .... .... | ....२१७ |
| वासरूं बाहेर निघाल्यानंतरचें कृत्य .... | ....२१८ |
| गोमतीचा जप .... .... .... | ....२२० |
| उभयतोमुखीच्या दानाचें प्रायश्चित्त .... | ....२२२ |
| दहा दानें आणि त्यांचा हेतु .... .... | ....२२३ |
| उत्क्रांति धेनूचें दान .... .... | ....२२३ |
| भूमीचें दान .... .... .... | ....२२४ |
| तिळांचें दान .... .... .... | ....२२६ |
| सोन्याचें दान .... .... .... | ....२२६ |
| तुपाचें दान .... .... .... | ....२२७ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| वस्त्राचें दान .... .... .... | ....२२८ |
| धान्याचें दान .... .... .... | ....२२९ |
| गुळाचें दान .... .... .... | ....२३० |
| रुप्याचें दान .... .... .... | ....२३१ |
| मिठाचें दान .... .... .... | ....२३२ |
| पांच धेनूचीं दानें .... ... .... | ....२३३ |
| पापाचा नाश करणाऱ्या धेनूचें दान .... | ....२३३ |
| ऋणांतून मुक्त करणाऱ्या धेनूचें दान .... | ....२३४ |
| प्रायश्चित्तधेनूचें दान .... .... | ....२३५ |
| वैतरणीधेनूचें दान .... .... | ....२३८ |
| दानाचा प्रयोग .... .... ... | ....२३९ |
| उत्क्रांतिधेनूचें दान .... .... | ....२४१ |
| मोक्षधेनूचें दान .... .... .... | ....२४३ |
| म्हशीचें दान, त्याचें फळ .... .... | .... |
| दानाचा काळ ... .... .... | ...२४५ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....२४६ |
| मेंढीचें दान व त्याचा विधि ... .... | ....२४८ |
| शेळीचें दान व त्याचा विधि ... .... | ....२५० |
| बैलाचें दान .... .... .... | ....२५२ |
| अग्निमांद्य नाहींसें करणारें मेंढ्याचें दान .... | ....२५४ |
| दानाचा प्रयोग .... .... .... | ....२५५ |
| धान्यादिकांच्या दहा पर्वतांचीं दानें .... | ....२६२ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| धान्य पर्वताच्या दानाचा काळ .... .... | ,, |
| त्याचा विधि ... .... .... | ....२६३ |
| दानाचा प्रयोग .... .... .... | ...२६५ |
| ऋत्विजांनीं करावयाचें कृत्य .... .... | ....,, |
| यजमानाचें कृत्य .... .... .... | ....२६७ |
| लवणाचलाचें दान व त्याचा विधि .... | ....२७० |
| गुळाच्या पर्वताचें दान .... ... | ....२७२ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....२७३ |
| सोन्याच्या पर्वताचें दान .... ... | ....२७४ |
| दानाचा संकल्प .... ... | ....२७५ |
| तिळांच्या पर्वताचें दान .... .... | २७६ |
| अर्धोदय व्रताचें दिवशीं तिळांच्या पर्वताचें दान | ....२८१ |
| त्याच्या दानाचा प्रयोग ... ... | ....२८२ |
| अर्धोदयावर पायसानें भरलेल्या कांशाच्या पात्राचें दान | २८५ |
| कापसाच्या पर्वताचें दान .... .... | ....२८७ |
| तुपाच्या पर्वताचें दान .... .... | ....२८९ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....२८९ |
| रत्नांच्या पर्वताचें दान .... .... | ....२९१ |
| दानाचा संकल्प .... ... .... | .... ,, |
| रुप्याच्या पर्वताचें दान .... .... | ....२९२ |
| साखरेच्या पर्वताचें दान .... ... | ....२९४ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....२९५ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| शिखरांचीं दानें .... .... .... | ....२९८ |
| दानाचा प्रयोग .... .... ... | .... „ |
| सर्व पापांचा नाश करणारें त्रिशूलाचें दान | ....३०२ |
| दारिद्र्याचा नाश करणारें कुबेराच्या मूर्तीचें दान | ....३०५ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....३०६ |
| उमामहेश्वराच्या मूर्तीचें दान .... | ....३०७ |
| लक्ष्मीनारायणाच्या मूर्तीचें दान .... | ....३०८ |
| हरिहराच्या मूर्तीचें दान .... .... | ....३०९ |
| सूर्याच्या मूर्तीचें दान .... .... | ....३१० |
| गणपतीच्या मूर्तीचें दान .... .... | ... „ |
| जगदंबिकेच्या मूर्तीचें दान .... .... | ....३११ |
| सरस्वतीच्या मूर्तीचें दान .... .... | ....३१२ |
| शालिग्रामाचें दान .... .... | ....३१३ |
| शिवनाभीचें दान .... .... .... | ....३१५ |
| लिंगाचें दान .... .... .... | ....३१६ |
| मरकताच्या लिंगाचें दान .... .... | ....३१७ |
| घंटेचें दान .... .... .... | ....३१८ |
| शंखाचें दान .... .... .... | ....३१९ |
| काळाच्या चक्राचें दान .... .... | ....३२० |
| अपमृत्यु नाहींसें करणारें यमाच्या मूर्तीचें दान | ....३२१ |
| काळपुरुषाचें दान .... .... | ....३२४ |
| सर्व संपत्ति देणारें दान .... .... | ....३२७ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| कृष्णाजिनाचें दान .... .... | ....३३१ |
| कृष्णाजिनाचे दानाचा दोष .... .... | ....३३४ |
| शय्यादान, त्याचें फळ .... .... | ....३३६ |
| शय्या दानाचा विधि .... .... | ....३३६ |
| शय्यादान .... .... .... | ....३३८ |
| कशिपूचें दान .... .... .... | ....३३९ |
| वस्त्रांचीं दानें, व त्यांचीं फळें .... .... | ....३४४ |
| पांढऱ्या वस्त्राचें दान .... .... | ....३४० |
| पिंवळ्या वस्त्राचें दान .... .... | .... ,, |
| तांबड्या वस्त्राचें दान .... .... | .... ,, |
| जांभळ्या वस्त्राचें दान .... .... | ....३४१ |
| छिटाचें दान .... .... .... | .... ,, |
| काळ्या वस्त्राचें दान .... .... | .... ,, |
| पाडग्याचें दान .... .... | .... ,, |
| मृतकर्पटाचें दान .... .... .... | .... ,, |
| लोंकरीच्या वस्त्राचें दान .... .... | .... ,, |
| कांबळीचें दान .... .... .... | .... ,, |
| चित्रकंबळाचें दान .... .... | .... ,, |
| तांब्याच्या पात्राचें दान .... .... | ....३४९ |
| तांब्याचें दान .... .... .... | ....३५० |
| कांशाच्या पात्राचें दान .... .... | ....३५१ |
| कांशाचें दान .... .... .... | .... ,, |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| लोखंडाच्या पात्राचें दान .... .... | ....३५२ |
| रुप्याच्या पात्राचें दान .... ... | ... ३५३ |
| सोन्याच्या पात्राचें दान .... ... | ....३५४ |
| स्थाळीचें दान .... .... .... | ....३५५ |
| वेद इत्यादिकांच्या पुस्तकांचीं दानें .... | ....३५९ |
| दानाचा काळ, विधि व फळ ... ... | .... ,, |
| दानाचा प्रयोग ... .... .... | ...३६० |
| नाना प्रकारच्या द्रव्यांच्या दानांचे मंत्र .... | ....३६३ |
| रत्नाचें दान .... .... .... | .... ,, |
| दानाचा मंत्र .... .... .... | .... ,, |
| मोत्याच्या दानाचा मंत्र .... .... | ....३६४ |
| पोंवळ्याच्या दानाचा मंत्र .... .... | .... ,, |
| कर्णफुलाच्या दानाचा मंत्र .... .... | ....३६४ |
| मांगल्यमण्याच्या दानाचा मंत्र .... | .... ,, |
| हळदीच्या दानाचा मंत्र ... .... | ....३६५ |
| कुंकवाच्या दानाचा मंत्र .... .... | .... ,, |
| शेंदुराच्या दानाचा मंत्र .... .... | .... ,, |
| कस्तूरीच्या दानाचा मंत्र .... ... | .... ,, |
| कापुराच्या दानाचा मंत्र .... .... | ... ,, |
| देवावर गळती बांधणें, त्याचा प्रयोग व फळ | ...३६७ |
| पाणपोई घालणें .... ... .... | ...३६९ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| हेमंतऋतूंत अग्नि ठेवणें .... ... | ...३७१ |
| दिवा लावणें .... .... ... | ....३७२ |
| प्रवाशाची परिचर्या ( सेवा ) करणें .... | ....३७३ |
| गाईची सेवा करणें .... .... | ....३७४ |
| धर्मघटाचें दान, त्याचा विधि व फळ .... | ....३७७ |
| कलशाच्या दानाचा मंत्र .... .... | ....३७८ |
| यज्ञोपवीताचें दान.... .... .... | ....३७९ |
| महिने आणि पक्ष यांतील दानें ... | ....३८० |
| तिळादिकांच्या दानांचीं फळें ... .... | .... ,, |
| अधिकमहिन्यांत दान करणें .... .... | ....३८३ |
| दानाचा संकल्प .... .... .... | ....३८४ |
| दानाचें फळ .... .... .... | ....३८५ |
| नित्य सकाळीं तुपाच्या पात्रांत छाया पाहून त्याचें दान करणें .... .... .... | ....३८६ |
| संक्रांतीचीं दानें .... .... ... | ....३८८ |
| त्यांचीं फळें .... .... .... | ....३८९ |
| नाना प्रकारच्या धान्यांच्या दानांचे मंत्र.... | ....३९२ |
| तांदुळाच्या दानाचा मंत्र .... .... | ....३९३ |
| माताच्या दानाचा मंत्र .... .... | .... ,, |
| जवांच्या दानाचा मंत्र ... .... | .... ,, |
| गव्हांच्या दानाचा मंत्र ... ... | .... ,, |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| मुगांच्या दानाचा मंत्र .... .... .... | ,, |
| उडदांच्या दानाचा मंत्र .... .... .... | १९४ |
| चण्यांच्या दानाचा मंत्र .... ... .... | ,, |
| कुळीथांच्या दानाचा मंत्र .... .... .... | ,, |
| तिळांच्या दानाचा मंत्र .... .... .... | ,, |
| सोन्यानें युक्त अशा तिळांच्या दानाचा मंत्र. ... | ,, |
| सोन्यानें युक्त अशा तिळ पात्राच्या दानाचा मंत्र ... | ,, |
| पावट्यांच्या दानाचा मंत्र .... ... .... | ,, |
| राळ्यांच्या दानाचा मंत्र ... .... .... | १९५ |
| साळ्याच्या दानाचा मंत्र .... ... .... | ,, |
| कोद्र्यांच्या दानाचा मंत्र .... .... ... | ,, |
| लांकांच्या दानाचा मंत्र .... ... .... | ,, |
| जोंधळ्यांच्या दानाचा मंत्र .... .... ... | ,, |
| मसूरांच्या दानाचा मंत्र | ,, |
| साधारणपणें सगळ्या धान्यांच्या दानाचा मंत्र | ,, |
| अन्नाच्या दानाचे मंत्र .... ... .... | १९७ |
| भाज्यांच्या दानाचा मंत्र ... .... .... | ,, |
| भाताच्या दानाचा मंत्र .... .... .... | ,, |
| दहींभाताच्या दानाचा मंत्र ... ... .... | ,, |
| खिचडीच्या दानाचा मंत्र .... .... | १९८ |
| नाना प्रकारच्या भक्ष्यांच्या दानाचा मंत्र.... .... | ,, |
| सर्व अन्नांच्या दानाचा मंत्र .... .... .... | ,, |

| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| दुसरेही कित्येक दानाचे मंत्र .... | .... | .... | ....४०२ |
| साखरेच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| गुळाच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| उंसाच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| मधाच्या दानाचा मंत्र | .... | .... | ....४०३ |
| तुपाच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| तेलाच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| लोण्याच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| दुधाच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| दह्याच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| ताकाच्या दानाचा मंत्र | .... | .... | ....४०४ |
| फुलांच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| फळांच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| तांबुलाच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| पादुकांच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| चर्मीजोड्याच्या दानाचा मंत्र.... | .... | .... | .... ,, |
| छत्रीच्या दानाचा मंत्र | .... | .... | ....४०५ |
| चवरीच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| पत्रिकेच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| पंख्याच्या दानाचा मंत्र | .... | .... | .... ,, |
| आरशाच्या दानाचा मंत्र | | .... | .... ,, |
| कोहळ्याचें दान .... | .... | .... | ....४०६ |

विषय पृष्ठ

दानाचा संकल्प ... .... .... .... ,,
देशविशेषानें मकरसंक्रांतीचे दिवशीं सुवासिनींनीं करावयांचीं विशेष दानें .... .... ....४१०
वर्धित फळाच्या दानाचा मंत्र.... .... .... ,,
तिळगुळाच्या लाडवांच्या दानाचा मंत्र .... .... ,,
भांड्यांच्या दानाचा मंत्र .... .... .... ,,
गव्हांच्या पिठाच्या दानाचा मंत्र .... .... ,,
सुपांतून ओले तांदूळ देण्याचा मंत्र .... ....४११
खिरानें भरलेल्या कांशाच्या भांड्याच्या दानाचा मंत्र ,,
फळें व फुलें यांसकट केळीच्या खांबाच्या दानाचा मंत्र ,,
सौभाग्यकारक द्रव्यांनीं भरलेल्या सुपाच्या दानाचा मंत्र ,,
सीतेची प्रीति होण्याकरितां पांच सुपांच्या दानाचा मंत्र ,,
सोळा ब्राम्हणांस सोळा सोळा फळांचीं दानें ... ,,
व्यतीपातावर सोन्याचें दान ... .... ....४१३
पिंपळास पाणी घालणें .... .... ....४१५
अथर्वण वेदांतील मंत्र व पौराणिक मंत्र .... ....४१६
सूर्यादि ग्रह अनिष्ट असतां त्यांचीं दानें.... ....४१९
ग्रहांचीं दानें ( ग्रह प्रतिकूळ असतां त्यांच्या प्रतिमा करून त्यांचें पूजन करून अयन इत्यादि पुण्यकाळीं दान करणें ) .... .... .... .... ४२१
वारांचा दोष घालविणारीं दानें .... ...४२४

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| सहस्रभोजनाचा विधी .... .... | ....४३० |
| पीठ यंत्रावर देवता स्थापन करणें ... | ...४३२ |
| त्यांचें पूजन करणें व होम करणें .... | ....४३३ |
| सहस्रभोजनाचें फळ .... .... | ....४३४ |
| सहस्रभोजनाचा संकल्प . . .... | ...४३५ |
| सर्वस्वाच्या दानाचा संकल्प .... .... | ....४३७ |
| युगांच्या प्राधान्यावरून व्यासांनीं सांगितलेले धर्म | ...४४१ |
| दानाचें महत्व, व कोणास दान द्यावें तें इत्यादि | ... ,, |
| विद्वानांची प्रार्थना.... ... .... | ....४४४ |
| दानांचीं प्रायश्चित्तें ... .... | ....४५० |
| ब्राम्हणानें प्रतिग्रह घेतला असतां दोष .... | .... ,, |
| वर्ज्य ब्राम्हण .... .... ... | .... ,, |
| प्रतिग्रहांचे चार प्रकार ... .... | ....४५१ |
| अशुभ प्रतिग्रहांचें प्रायश्चित्त.... ..., | ....४५२ |
| प्रतिग्रहांचें प्रायाश्चित्त व भयंकर प्रतिग्रहांचे प्रायश्चित्त | ४५३ |
| घर, घोडे, गाई इत्यादि घेतले असतां प्रायाश्चित्त | ....४५४ |
| सोळा महादानें ( तुळा पुरूष इ. ) घेतली असतां प्रायश्चित .... ... .... | ....४५७ |
| राजाच्या प्रतिग्रहाचें प्रायाश्चित्त... .... | ....४६१ |
| स्मुत्यर्थसारांत सांगितलेलीं रहस्य पातकें... | ....४६६ |
| प्रतिपदोक्त प्रायाश्चित्तें .... .... | ...४७० |
| स्मत्यर्थसारांत सांगितलेलीं रहस्य प्रायश्चित्तें | ....४७१ |

श्री.

# दानचंद्रिका

( मराठी भाषांतरा सहित. )

॥ श्रीगणेशायनमः ॥

प्रणम्य मातरं गंगां भैरवं वनशंकरीं ।
महादेवाख्यपितरं श्रौतस्मार्तविशारदं ॥ १ ॥

दिवाकरेण सुधिया सारमुद्धृत्य शास्त्रतः ।
शिष्टानां तन्यते तुष्ट्यै दानसंक्षेपचंद्रिका ॥ २ ॥

ग्रंथाचें प्रयोजन.

गंगा नांवाची आई, भैरव, वन शंकरी आणि श्रौत व स्मार्त ह्या कर्मांत निपुण असा महादेव नांवाचा पिता ह्यांस नमस्कार करून बुद्धिवान् असा दिवाकर सर्व शास्त्रांतून सार काढून शिष्टांस आनंद व्हावा या साठीं ' दान संक्षेप चंद्रिका ' नांवाचा ग्रंथ करतो.

तत्र परस्वत्वोत्पत्यंतो द्रव्यत्यागो दानं ।

' देवलः '

अर्थाना मुदिते पात्रे श्रद्धया प्रतिपादनं ।

दान मित्यभिनिर्दिष्टं व्याख्यानं तस्य कथ्यते ।
तच्च दानं त्रिधोक्तं ' गीतायां ' दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे । देशे काले च पात्रेच तद्दानं सात्विकं स्मृतं ॥ १ ॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्यवा पुनः ।
दीयतेच परिक्लिष्टं तद्राजसमुदाहृतं ॥ २ ॥

अदेश काले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।
असत्कृत मवज्ञातं तत्ताम समुदाहृतं ॥ ३ ॥

' गारुडे '

कायिकं वाचिकं दानं मानसं च त्रिधा स्मृतं ।
अर्हते यत्सुवर्णादि दानं तत्कायिकं स्मृतं ॥
आर्तांना मभयं द द्यात्येतद्धि वाचिकं स्मृत ।
विद्याप्रदानं शिष्यस्य तद्दानं मानसं द्विजा इति ।

दानाचें लक्षण, त्याचे सात्विकादि प्रकार.

ज्यावर पुढें दुसऱ्याची मालकी उत्पन्न होते अशा रीतीनें जें द्रव्य देण्यांत येतें त्यांस ' दान ' म्हणतात. देवल–' सत्पात्रीं श्रद्धेनें दान देणें त्यास दान असें म्हटलें आहे. ' त्याची व्याख्या सागण्यांत येते ' तें दान ' भगवद्गीतेंत ' तीन प्रकारचें सांगितलें तें असें–देण्यास योग्य असें अनुपकारी अशास जे देण्यांत येतें तें दान होय. जें तीर्थादि योग्य स्थळीं व योग्य काळीं व योग्य पात्रास देण्यांत येतें त्यांस ' सात्विक ' असें म्हटलें आहे जें उपकाराचा मोबदला मिळावा ह्या साठीं अथवा फळाच्या उद्देशानें व असंतोषानें जें देण्यांत येतें त्यास ' राजस ' असें म्हटलें आहे. अयोग्य स्थळीं व अयोग्यकाळीं अयोग्यांस प्रतिष्ठेवांचून अपमान कारक असें जें दान देण्यांत येतें, त्यास ' तामस ' असें म्हटलें आहे ' गरुड पुराणांत '

हे द्विज हो ! कायिक, वाचिक व मानसिक असे दानाचे तीन प्रकार आहेत. योग्य अशा ब्राम्हणास सोनें इत्यादिकाचें जें दान देण्यांत येतें त्यास ' कायिक ' म्हटलें आहे. शत्रु वगैरे पासून भीति पावलेल्यांस ' अभयंदद्मि '—मी अभय देतों असें जें वाणीनें म्हणणें तें ' वाचिक ' होय. शिष्यास विद्या पढविणें तें ' मानसिक ' दान होय.

अथ पात्रं.

' याज्ञवल्क्यः '

न विद्यया केवलया तपसावापि पात्रता ।
यत्र दानमिमे चोभे तद्धि पात्रं प्रचक्षत । इति

' भविष्ये "

किंचिद्वेदमयं पात्रं किंचित्पात्रं तपोमयं ।
पात्राणा मुत्तमं पात्रं शूद्रान्नं यस्यनोदर । इति

' व्यासः '

प्रथमं तु गुरोर्दानं दत्वा श्रेष्ठ मनुक्रमात् ।
ततोऽन्येषां च विप्राणां दद्यात्पात्रानुसारत । इति

' भविष्यपुराणे '

सन्निधानास्थिता न्विप्रान् दौहित्रं विड्पतिं तथा ।
भागिनेयं विशेषेण तथा बधून्गृहागतान् ।
नातिक्रमेन्नर स्त्वेतान्समूर्खा नपि गोपते ।
अतिक्रम्य महारौद्रं रौरवं नरक व्रजेत् ।

' दक्षः '

सप्तम ब्राम्हणे दानं द्विगुणं ब्राम्हणब्रुवे ।
सहस्रगुणमाचार्ये त्वनंतं वेदपारगे ।

## दान देण्यास योग्य कोण त्याचें लक्षण.

### पात्राचें लक्षण.

दान देण्यास योग्य अशाचें लक्षण.

' याज्ञवल्क्य ' केवळ विद्येनें किंवा केवळ तपश्चर्येनें दानाविषयीं पात्रता येत नसते, म्हणून ज्या ठिकाणीं हीं दोन्हीं असतात त्यासच पात्र म्हणतात ' भविष्य पुराणांत ' वेद युक्त हें किंचित् पात्र होय, तसेंच तपश्चर्येनें युक्त हेंही किंचित् पात्र होय. ज्यानें कधींही शूद्राचें अन्न खाल्लें नसेल तो सर्व पात्रांत श्रेष्ठ पात्र होय. ' व्यास '–प्रथम गुरूस दान देऊन नंतर श्रेष्ठत्वाच्या अनुक्रमानें योग्यतेनुरूप दुसऱ्या ब्राम्हणांस दान द्यावें. ' भविष्य पुराणांत ' हे राजा ! आपल्या घराजवळ रहाणारे ब्राम्हण, नातु ( मुलीचा मुलगा ), जावई, भाचा तसेच घरीं आलेले इष्ट मित्र हे अति मूर्ख जरी असले तरी ह्यांस दानांत वगळूं नये. म्हणून जो ह्यांस वगळील तो रौरव नांवाच्या नरकाला जाईल. 'दक्ष–' अब्राम्हणास दिलेलें दान सारखें होतें. ब्राम्हण ब्रुवास दिलेलें दान दुप्पट होतें आचार्यास दिलेलें सहस्रपट होतें आणि वेद पढलेल्या ब्राम्हणास दिलेलें अगणित होतें.

' व्यासः '

अब्राम्हण लक्षणमाह.

ब्रम्हबीजसमुत्पन्नो मंत्र संस्कार वर्जितः ।
जातिमात्रोपजीवीच भवेद ब्राम्हणः सतु ।

' तत्रैव. '

ब्राम्हणब्रुवलक्षण माह.

गर्भाधानादिभिर्युक्त स्तथोपनयनेन च ।
न कर्मविन्नचाधीतः स भवेद् ब्राम्हणब्रुवः ।

अब्राम्हणाचें आणि ब्राम्हण ब्रुवाचे लक्षण.

अब्राम्हणाचें लक्षण " व्यास " सांगतात तें असें—ब्राम्हणाचे रेतापासून उत्पन्न झालेला, मंत्र आणि संस्कार ( गर्भाधानादि ) ह्यांनीं रहित असून जो जाति मात्रावर आपली उपजीविका करतो तो " अब्राम्हण " होय. " ब्राम्हण ब्रुवाचें लक्षण तेथेंच सांगतों " जो गर्भाधानादि संस्कार आणि उपनयन संस्कार ह्यांनीं युक्त असून कर्म जाणणारा आणि शिकलेला ( वेद वगैरे ) असा नसेल तो " ब्राम्हण ब्रुव " होय.

अथ द्रव्य विभागः

" शिवधर्मे "

तस्मात्त्रिभागं वित्तस्य जीवनाय प्रकल्पयेत ।
भागद्वयंतु धर्मार्थ मनित्यं जीवितं यतः ।
वित्तस्य भाग पंचकं कृत्वा भागद्वयं जीवनार्थं
भागत्रयं दानार्थ मितिः ' हेमाद्रिः

"द्रव्याचा विभाग" "शिवधर्मांत" म्हणून द्रव्याचे तीन भाग करून ते कुटुंब पोषणाकडे योजावे. आयुष्य हें नित्य (कायम) नसल्यामुळें धर्मकृत्याकडे दोन भाग योजावे. द्रव्याचे पांच भाग करून त्या पैकीं दोन भाग उपजिविके कडे, तीन भाग दानाकडे योजावे असें "हेमाद्रि" म्हणतो.

द्रव्याचा विभाग.

अथ अग्राह्यदानानि तु

"स्कांदे"

अजिनं मृतशय्यां च मेषीं चोभयतोमुखीं ।
कुरूक्षेत्रेच गृण्हानो न भूयः पुरुषो भवेत् ।

"मनुः"

हिरण्यं भूमिमश्वं गामन्नं वासस्तिलान् घृतं ।
अविद्वान् प्रतिगृण्हानो भस्मीभवति काष्टवत् ।
अविद्वान्नाम विद्या तपोभ्यां हीनः तेन न
ग्राह्य मित्यर्थः

"घेण्यास अयोग्य दानें, स्कंदपुराणांत" हरणाचें चामडें, मेलेल्याच उद्देशानें दिलेली शय्या, मेंढी आणि उभयतोमुखी गाय ह्यांचें कुरुक्षेत्रांत दान घेणारा पुनः पुरुष होत नाहीं (मे-

घेण्यास अयोग्य दानें

१ जिचा अर्धवट प्रसव झाला आहे (वीत असतां वासराचा अर्धा-भाग बाहेर असतो आणि अर्धा भाग आंत (योनींत) असतो) तिला उभयतो मुखी म्हणतात.

त्या प्रमाणें होतो ) " मनु " सोनें, भूमि, घोडा, गाय, अन्न, वस्त्र, तीळ आणि तूप हीं विद्या व तप ह्यांनीं रहित असलेल्या पुरुषानें दान घेतलीं असतां तो लाकडाप्रमाणें भस्म होतो म्हणून त्यानें हीं घेऊं नयेत.

अथ दानकालः

" वाराहे "

दर्शे शतगुणं दानं तद्दशघ्नं दिनक्षये ।
शतघ्नं तच्च संक्रांतौ शतघ्नं विषुवे ततः ।
युगादौ तच्छतगुणमयने तच्छताहतं ।
सोमग्रहे तच्छतघ्नं तच्छतघ्नं रवे ग्रहे ।
तच्छतघ्नं व्यतीपाते दानं वेदविदोविदुः ।

" विष्णुधर्मोत्तरे "

वैशाखी कार्तिकी माघी पौर्णिमा तु महाफला ।
पौर्णमासीषु सर्वासु मासर्क्षसहितासुच ।
दत्ताना मिह दानानां फलं शतगुणं भवेदिति ।

दानाचा काळ.

दान देण्याचा काळ.

" वराह पुराणांत " दर्शाचे दिवशीं दिलेलें दान शतपट होतें. क्षय तिथींत त्या पेक्षां (दर्शांपेक्षां ) दसपट होतें, संक्रांतीचे दिवशीं त्या पेक्षां शंभर पट होतें. मेष व तुळा ह्या संक्रांतिचे

दिवशीं त्या पेक्षां शंभर पट होतें. युगादिवर त्याहून शंभरपट, कर्क व मकर ह्या दोन संक्रांतीचे दिवशीं पूर्वीहून शतपट, चंद्र ग्रहणांत त्या पेक्षां शंभरपट. सूर्य ग्रहणांत त्या पेक्षां शंभरपट आणि व्यतीपातावर, त्या पेक्षां शंभरपट होतें असें वेद जाण-णारे म्हणतात " विष्णुधर्मोत्तरांत " वैशाख, कार्तिक, आणि माघ ह्या मासांतील पौर्णिमांचें फळ मोठें आहे. तसेंच त्या त्या मासांतील त्या त्या नक्षत्रांनीं युक्त अशा सर्व महिन्यांतील पौ-र्णिमा या दिवशीं दानें दिलीं असतां त्यांपासून शंभरपट फळ होतें.

पुण्यदेशः

" यत्तु मनुः "

दृषद्वतीसरस्वत्यो र्देवनद्योर्यदंतरं ।
तं देव निर्मितं देशं ब्रम्हावर्तं प्रचक्षते ।

" नारदः "

पुण्यदेशेषु सर्वेषु गृहे देवालयादिषु ।
यत्र साधनसंपत्ति स्तत्र दानं समाचरेत् ।

" भविष्य पुराणे "

वाराणसी कुरुक्षेत्रं प्रयागं पुष्करं तथा ।
गोकर्णं नैमिषारण्यं सेतुं श्रीपर्वतं तथा ।
महाकालं तथा गंगामेतान्पुण्यतमान्विदुः ।

" पाद्मे "

लिंगंवा प्रतिमा वापि दृश्यते यत्र कुत्रचित् ।
तत्सर्वं पुण्यतां याति दानेषुच महाफल मिति ।
एषु दान मति प्रशस्त मिति " हेमाद्रिः "

पुण्य देश.

पुण्यकारक देश.

" मनु " भागीरथी व सरस्वती ह्या दोन देव नद्यांच्या मधील देवानें निर्माण केलेल्या प्रदेशाला " ब्रम्हावर्त " म्हणतात. " नारद "—सर्व पुण्यकारक प्रदेशांत, घरांत देवालय इत्यादिकांत तसेंच ज्या ठिकाणीं साधनाची सवड असेल त्या ठिकाणीं दान द्यावें. " भविष्य पुराणांत " काशी, कुरु क्षेत्र, प्रयाग, पुष्कर, गोकर्ण, नैमिषारण्य, सेतुबंध. श्री पर्वत, महांकाळ आणि गंगा हे अतिशय पुण्यकारक आहेत असें सांगतात " पद्मपुराणांत " ज्या कोणत्याही ठिकाणीं महादेवाचें लिंग अथवा देवाची प्रतिमा असेल तें सर्व स्थळ पुण्यकारक असतें आणि दानाविषयीं तर तें मोठेंच फळ देणारें असतें. ह्या सर्व स्थळांचे ठिकाणीं दान देणें अत्यंत प्रशस्त होय असें "हेमाद्रि" म्हणतो.

अथ तीर्थे प्रतिग्रह निषेधः

" पाद्मे "

न तीर्थे प्रतिगृण्हीयात्प्राणैः कंठगतैर पीति ।
तीर्थे तीरे क्षेत्रेच " गंगा कृष्णा गोदावर्यास्तीर ।

" माह विष्णु "

गंगा गोदावरीकृष्णातीर माहुर्महर्षयः ।
उत्तरे नवगव्यूति दक्षिण योजन त्रय मिति ।

" भविष्यै "

तीरा द्वव्युतिमात्रंतु पुरितः क्षेत्र मुच्यत ।
इति गंगायांतु तीरेऽपि न ग्राह्य मित्यर्थः ।

" ब्राम्हे "

प्रवाह मवधिं कृत्वा यावद्धस्त चतुष्टयं ।
तत्र न प्रतिगृण्हीयात्प्राणैः कंठगतै रपीति

प्रवाहो गर्भः

" दान धर्मे "

भाद्र शुक्ल चतुर्दश्यां यावदाक्रमते जलं ।
तावद्गर्भं विजानीया तदूर्ध्वंतीरमुच्यत । इति गर्भे
प्रतिग्रह निषेधः

प्रसिद्ध नदीषु गंडक्यादिषु तु तीरे निषेधः तदुक्तं

" दान धर्मे "

गंडक्यादिषु तीरेऽपि न ग्राह्यं भूतिमिच्छतेतिवचनात्
अत्यंतापादि तीर्थेपि ग्राह्यं अथचेत्प्रति गृण्हीया-
त्राम्हणो वृत्ति कर्षितः ।
दशांश मर्जितंदद्या देवं धर्मो न हीयत इति पाद्मात्

## तिर्थाचे ठिकाणीं प्रतिग्रह घेण्याचा निषेध.

तीर्थाचे ठिकाणीं प्रतिग्रह घेऊं नये. मोठी विपत्ति असतां प्रतिग्रह घेण्यास हरकत नाहीं.

" पद्मपुराणांत " तीर्थ, तीर व क्षेत्र ह्या तीन ठिकाणीं प्राण कंठगत जरी आले तथापि दान घेऊं नये, " विष्णु " गंगा कृष्णा व गोदावरी ह्यांचे तीराचें प्रमाण सांगतो—मोठे ऋषि, गंगा, गोदावरी व कृष्णा ह्यांचे उत्तरेकडील तीराचें प्रमाण अठरा कोसपावेतों सांगतात आणि दक्षिणेकडे बारा कोसपावेतों आहे असें सांगतात. " भविष्य पुराणांत " काठापासून आसपास दोन कोसपावेतों प्रदेशास क्षेत्र असें म्हटलें आहे ह्यावरून गंगेच्या काठींही प्रतिग्रह घेऊं नये. " ब्रम्हपुराणांत " नदीचे प्रवाहा पासून चार हात पावेतों प्रदेशांत प्राण कंठगत जरी आले तरी देखील दान घेऊं नये. " दान धर्मांत " भाद्रपद शुक्ल चतुर्दशीस पाणी जितक्या प्रदेशाला व्याप्त करील तेवढ्या प्रदेशाला " गर्भ " म्हणतात, त्याच्या पुढील प्रदेशास तीर म्हटलें आहे. म्हणून गर्भांत दान घेण्याचा निषेध आहे. गंडकी वगैरे प्रसिद्ध नद्याच्या तर काठावर दान घेण्याचा निषेध आहे. तो " दान धर्मांत " कल्याणाची इच्छा करणारानें गंडकी वगैरे नद्यांच्या कांठींही प्रतिग्रह घेऊं नये असें वचन आहे त्या वरून सांगितला आहे. " वृत्तिच्या संबंधानें जर ब्राम्हण तीर्थाचे ठिकाणीं प्रतिग्रह करील तर त्यानें मिळालेल्या द्रव्यांतून दशांश दान करावा ह्या योगानें धर्मांत कमीपणा येत नाहीं, असें " पद्म पुराणाचें " वचन आहे त्यावरून फारच अडचणीचे प्रसंगीं तीर्थाचे ठिकाणींही प्रतिग्रह घ्यावा.

## अथ दानकल्पं.

" वाराहे "

सुरस्नातः सम्यगाचांतः कृतसंध्यादिक क्रियः ।
कामक्रोधविहीनश्च पाखंड स्पर्श वर्जितः
दद्या दिति शेषः

" कात्यायनः "

कुशापरि निविष्टेन तथा यज्ञोपवीतिना ।
देयं प्रतिगृहीतव्य मन्यथा विफलं भवे दिति ।

" गौतमः "

अंतर्जान करं कृत्वा सकुशं सतिलोदकं ।
फलान्यपि च संधाय प्रदद्याच्छ्रद्धयान्वितः ।
नाम गोत्रे समुच्चार्य प्राङ्मुखो देय कीर्तनात् ।
उदङ्मुखाय विप्राय दत्वांते स्वस्तिकीर्तयेन् ।
सदेवताकदेय कीर्तनानंतरं दत्वेत्यर्थः ।

## दानाचें कृत्य.

दान देण्याचे वेळचें कृत्य.

" वराह पुराणांत " स्नान करून संध्या वगैरे कर्मं ज्यानें केलेलीं आहेत, काम व क्रोध ह्यांनीं रहीत, पाखंडाचा स्पर्श ज्यास झालेला नाहीं अशा पुरुषानें यथा विधि आचमन करून दान द्यावें. " कात्यायन " यज्ञोपवीत धारण केलें आहे अशा पुरुषानें दर्भावर बसून दान द्यावें व घ्यावें ह्याहून भलत्याच रीतीनें दान

दिलें किंवा घेतलें असतां तें विफळ होतें. " गौतम " दान देणारानें पूर्वेकडे तोंड करून बसून हात गुडघ्याच्या आंत घेऊन कुश, तिलोदक ह्या सह फळांचा संबंध लाऊन मोठ्या श्रद्धेनें आपलें नांव व गोत्र ह्यांचा उच्चार करून दानाची देवता व दान ह्यांचा उच्चार करून उत्तरे कडे तोंड करून बसलेल्या ब्राम्हणास दान द्यावें आणि त्याकडून " स्वति " असें म्हणवावें.

अथ प्रतिगृहीत्कृत्यं,

" आदित्य पुराणे "

ओंकार मुच्चरन्प्राज्ञो द्रविणं सकुशोदकं ।
गृण्हीया दाक्षिणे हस्ते तदंते स्वति कीर्तयेत् ।

" विष्णु धर्मोत्तरे "

प्रतिग्रहीतासावित्रं सर्वत्रैवानु कीर्तयेत् ।
सावित्रं देवस्येति !
ततस्तु कीर्तये त्साद्धं द्रव्येणद्रव्यदेवतां ।
समापये ततः पश्चात्कामस्तुत्या प्रतिग्रहं ।
यथा शाखं कइदं कस्मा अदा ादिति ।
" मंत्रं पठित्वेत्यर्थः "

" आदित्य पुराणे "

प्रतिग्रहं पठेदुच्चैः प्रतिग्रह्यद्विजोत्तमात् ।
मंद्रं पठेत्तु राजन्यादुपांशुच तथाविशि ।

१. " हेमाद्रौ " कामस्तुत्या कोदात् कस्मा अदादिति मंत्रेण शाखांतरे तु " कामः कामयेत्यादि प्रसिद्धा "

मनसा च तथा शूद्रे स्वस्तिवाचन मेवच ।
सोंकारं ब्राम्हणे कुर्या त्रिरोंकारं महीपतौ ।
उपांशु च तथा वैश्ये मनसाशुद्रजे तथेति ।

" पुनस्तत्रैव "

प्रति ग्रहस्य धर्मंच न जानाति द्विजोविधिं ।
द्रव्यस्तैन्य समायुक्तो नरकं प्रतिपद्यत । इति

" तथा "

विधिंतु धर्मं विज्ञाय ब्राम्हणस्तु प्रतिग्रहे ।
दात्रा सहतरत्येव महादुर्गाण्य सौधुन मिति ।

### दान घेणाराचें कर्म

दान घेणाराचें कृत्य.

" आदित्यपुराणांत " ज्ञानी अशा प्रतिग्रह घेणारानें ओंकाराचा उच्चार करून आपल्या उजव्या हातांत कुशोदकानें सहवर्तमान असें द्रव्य ( सुवर्णादि ) घ्यावें. त्याचे शेवटीं " स्वस्ति " असें म्हणावें. " विष्णु धर्मोत्तरांत " प्रतिग्रह घेणारानें सर्व ठिकाणीं " देवस्यत्वा " हा मंत्र म्हणावा. नंतर द्रव्य व द्रव्याची देवता ह्यांचा बरोबर उच्चार करून आपले शाखे प्रमाणे " कइदंकस्मा अदात् " हा मंत्र म्हणून दानाची समाप्ति करावी. " आदित्य पुराणांत " दान देणारा ब्राम्हण असल्यास दान घेणारानें दानाच्या मंत्राचा मोठ्यानें उच्चार करावा. दान देणारा क्षत्रिय असतां दानाचे मंत्राचा मध्यम स्वरानें उच्चार करावा.

दान देणारा वैश्य असल्यास स्पष्ट उच्चार होणार नाहीं अशा रीतीनें दानाचे मंत्राचा उच्चार करावा. शूद्र दान देणारा असल्यास दानाचे मंत्राचा उच्चार मनांत करावा. ब्राम्हण दाता असल्यास ओंकारासह स्वति वाचनाचा मोठ्यानें उच्चार करावा. क्षत्रिय दाता असल्यास ओंकारावांचून स्वस्ति वाचनाचा उच्चार करावा. वैश्य दाता असल्यास अस्पष्ठ रीतीनें स्वस्ति वाचनाचा उच्चार करावा. तसेंच शूद्र दाता असल्यास मनांत स्वास्ति वाचनाचा उच्चार करावा. आणखी " त्यांत " च जो दान घेणारा ब्राम्हण दानाचा धर्म त्याचें कर्म जाणत नाहीं तो द्रव्याची चोरी करणारा असा होऊन ( द्रव्याचे चौर्यानें युक्त होत्साता ) नरकाला जातो. " तसेंच " दान घेणाऱ्या ब्राम्हणानें दानाचा विधि आणि धर्म जाणला असतां तो दात्यासह मोठ्या दुर्गतींतून तरून जातो.

अथ द्रव्यमानं.

" याज्ञवल्क्यः "

जालसूर्यमरीचिस्थं त्रसरेणु रजःस्मृतं ।
तेऽष्टौलिक्षातु वा स्तिस्रो राजसर्षप उच्यते ।
गौरस्तु ते त्रयःषट् ते यवो मध्यश्चते त्रयः ।
कृष्णलः पंच ते माषस्ते सुवर्णस्तु षोडश ।
पलं सुवर्णाश्चत्वारः पंचवा परिकीर्तितं ।
द्वे कृष्णले रूप्यमाषो धरणं षोडशैवते ।
शतमानं तु दशभि र्धरणैः पलमेवतत् ।
निष्कः सुवर्णाश्चत्वारः कार्षिक स्ताम्रिकः पणः ।

## द्रव्याचें मान.

द्रव्याचें परिमाण.

" याज्ञवल्क्य " झरोक्यांत सूर्याचे किरणांतून दिसणाऱ्या रजास " त्रसरेणु " म्हणतात. आठ त्रसरेणुंची एक लिक्षा होते. तीन लिक्षांचा एक राज सर्षप. तीन राजसर्षपांचा एक गौर. सहा गौरांचा एक आडवायव. तीन यवांचा एक कृष्णल§ पांच कृष्णलांचा एक माष ( मासा ). सोळा माषांचा एक " सुवर्ण " चार किंवा पांच सुवर्णाचें एक पल. दोन § कृष्णलांचा एक रौप्य माष होतो. सोळा रौप्यमाषांचें एक धरण. दहा धरणांचें एक शतमान होय आणि तेंच पल होतें. चार सुवर्णांचा एक निष्क होतो. एका कर्षानें तांब्याचा एक पण होतो.

## अथ धान्य मानं.

" भविष्यै. "

पलद्वयं तु प्रसृतिः कुडवो द्विगुणं मतं ।
चतुर्भिः कुडवैः प्रस्थः प्रस्थाश्चत्वार आढकः ।
आढकैस्तै चतुर्भिश्च द्राणस्तु कथितो बुधैः ।
द्रोणैः षोडशभिः खारी विंशत्या कुंभ उच्यते ।
कुंभैस्तैर्दशभि र्वाहो धान्यमानं प्रकीर्तित मिति ।

---

§ एक गुंज

१ सुवर्ण=कर्ष.

४ कर्ष=पल

पल=निष्क

पलाच्या चतुर्थांशानें एक कर्ष होतो

## धान्याचें मान.

" भविष्य पुराणांत " दोन पलांची एक प्रसृति होते. दोन प्रसृतींचा एक कुडव होतो चार कुडवांचा एक प्रस्थ होतो. चार प्रस्थांचा एक आढक होतो. चार आढकांचा एक द्रोण होतो सोळा द्रोणांची एक खारी होते. वीस खारींचा एक कुंभ होतो. दहा कुंभाचा एक वाह होतो. ह्या प्रमाणें ज्ञात्यांनीं धान्याचें मान सांगितलें आहे.

धान्य मोजण्याचे माप धान्याचे परिमाण

### अथ दाने दक्षिणापरिमाणं.

" षट् त्रिंशन्माते "

श्रद्धायुक्तः शुचिर्दांतो दानं दद्यात्सदक्षिणं ।
अदक्षिणं तु यद्दानं तत्सर्वं निष्फलं भवे दिति ।

" व्यासः "

सुवर्णं परमं दानं सुवर्णं दक्षिणा परा ।
सर्वेषामेव दानानां सुवर्णं दक्षिणेष्यते ।
परेत्युक्तेः पुरुषाहारौपयिक तंदुलादिकमपि दक्षिणेति

हेमाद्रिः—

" तथा "

देय द्रव्यतृतीयांशं दक्षिणां परि कल्पयेत् ।
अनुक्त दक्षिणे दाने दशांशं वापि शक्तितः ।

" भविष्ये "

ज्ञेयं निष्कशतं पार्थ दानेषु विधि रुत्तमः ।
मध्यमस्तु तदर्थेन तदर्धेनाधमः स्मृतः ।
मेष्यां च कालपुरुषे तथान्येषु महत्सुच ।
एवं वृक्षे रथेऽजे च धेनोः कृष्णाजिनस्य च ।
अशक्तस्यापि क्रमोऽयं पंचसौवार्णिको विधि रिति ।

" जपाभिषेक मुदाहृत्य लिंग पुराणे "

अष्टषष्ठिपलोंन्मानां दद्याद्दैदाक्षिणां गुरोः ।
होतॄणांचैव सर्वेषां त्रिंशत्पल मुदाहृतं ।
तदर्धं जापकानां च द्वारपानां तदर्धतः
एतेन सर्वत्र गुरोरर्ध मृत्विजानां तदर्धं
जापकानां तदर्थं द्वारपालानां मिति हेमाद्रौ

दक्षिणा विभागोऽ वगंतव्यः

दानाविषयीं दक्षिणेचें मान,

दानाविषयीं दक्षिणेचें मान

षट्त्रिंशन्मतांत " श्रद्धायुक्त व इंद्रियाचें दमन करणारा अशा दात्यानें शुचिर्भूत होऊन दक्षिणेनें युक्त असें दान द्यावें. दक्षिणेवाचून जें दान दिलें जातें तें सर्व निष्फळ होतें " व्यास " सर्व दानांत सोनें हें श्रेष्ठ दान आहे. तसेंच सोनें ही दक्षिणा श्रेष्ठ आहे, ह्मणून सर्व दानांस सोनें हीच दक्षिणा इष्ट आहे. ह्या व्यासाचे वाक्यांत " पर " असें म्हटलें आहे त्या

वरून पुरुषाचे भोजनास पुरे इतके तांदूळ इत्यादिही दक्षिणा द्यावी असें " हेमाद्रि " म्हणतो. " तसेंच " ज्या द्रव्याचें दान द्यावयाचें त्याचें तृतीयांशा एवढी दक्षिणा असावी. ज्यांत दक्षिणेचें मान सांगितलें नाहीं अशा दानांत दानाचा दशांश अथवा आपले शक्तिप्रमाणें दक्षिणा योजावी. "भविष्यपुराणांत" हे अर्जुना ! दानांचे ठिकाणीं १०० निष्क दक्षिणा देणें हा उत्तम विधि समजावा. त्या पेक्षां अर्धी ( ५० निष्क ) हा मध्यम पक्ष होय आणि त्याहून ही अर्धी ( २५ निष्क ) हा कनिष्ठ पक्ष होय. मेंढी, काळ पुरुष, तसेंच दुसरीं मोठीं दानें ह्यांविषयीं ही दक्षिणा योजावी. ह्या प्रमाणें झाड, रथ, गाय आणि कृष्णाजिन ह्यांचे दानाविषयीं ही दक्षिणा योजावी. अशक्तास पांच सुवर्ण दक्षिणा प्रशस्त होय. जप व अभिषेक ह्यांस उद्देशून " लिंग पुराणांत " ६८ पळां एवढी दक्षिणा गुरूस द्यावी. होम करणारांस ३० पळें, जप करणारांस त्यांचे निमें ( १५ पळें ) आणि द्वारपाळांस त्यांहून निम्मे (७॥ पळें) दक्षिणा द्यावी. ह्या वचनावरून सर्व ठिकाणीं गुरूच्या निम्में ऋत्विजांस, त्यांच्या निम्में. जप करणारांस, त्यांहून निम्मे द्वारपाळांस, ह्याप्रमाणें " हेमाद्रींत " दक्षिणेचा विभाग केला आहे तो जाणावा.

## अथ द्रव्यदेवता.

" विष्णु धर्मोत्तरे "

अभयं सर्वदैवत्यं भूमे र्वै विष्णुदेवता ।<br>
कन्या दास स्तथा दासी प्राजापत्याः प्रकीर्तिताः ।

प्राजापत्यो गजः प्रोक्त स्तुरगो यमदैवतः।
तथाचैकशफं सर्वं कथितं यमदैवतं।
महिषश्च तथा याम्य उष्ट्रोवै नैऋतो भवेत्।
रौद्री धेनु र्विनिर्दिष्टा छाग माग्नेयमादिशेत्।
मेषं तु वारुणं विद्या द्वाराहं वैष्णवं तथा।
आरण्याः पशवः सर्व कथिता वायुदेवताः।
जलाशयानिसर्वाणि वारिधीनां कमंडलुं।
कुंभं च करंकचैव वारुणानि निबोधत।
समुद्रजानि रत्नानि वारुणानि द्विजोत्तमाः।
आग्नेयं कनकं प्रोक्तं सर्व लोहानि चाप्यथ।
प्राजापत्यानि सस्यानि पक्वान्नमपि च द्विजाः।
संज्ञेयाः सर्वगंधाश्चं गांधर्वा वै विचक्षणैः।
विद्या ब्राम्ही विनिर्दिष्टा विद्योपकरणानि च।
सारस्वतानि ज्ञेयानि पुस्तकादीनि पंडितैः।
सर्वेषां शिल्पभांडानां विश्वकर्मातु देवता।
द्रुमाणा मथ पुष्पाणां शाकै र्हारितकै स्तथा।
फलाना मथ सर्वेषां तथा ज्ञेयो वनस्पतिः।
मत्स्यमांसे विनिर्दिष्टे प्राजापत्ये तथैवच।
छत्रं कृष्णाजिनं शय्यां रथ मासनमेव च।
उपानहौ तथा पात्रं यच्चान्य त्प्राणवर्जितं।
सर्वं चांगिरसत्वेन प्रतिगृण्हीत मानवाः।
शूरोपयोगि यत्सर्वं शस्त्रचर्मध्वजादिकं।
नृपोपकरणं सर्वं विज्ञेयं सर्वदैवतं।

गृहं तु शक्रदैवत्यं यदनुक्तं द्विजोत्तमाः ।
विज्ञेयं विष्णुदैवत्यं सर्वदा द्विजसत्तमा इति ।

## द्रव्याची देवता.

द्रव्याची देवता

" विष्णु धर्मोत्तर पुराणांत " हे द्विजश्रेष्ठहो अभय हें सर्व दैवत्य आहे. भूमीची देवता विष्णु होय. कन्या, दास व दासी ह्यांची प्रजापति देवता आहे. हत्तीची प्रजाप्रति, घोड्याची यम देवता आहे. तसेंच एक खुर असणाऱ्या सर्व जनावरांची यम ही देवता सांगितली आहे. रेडा यम दैवत आहे. उंटाचें दैवत निर्ऋति आहे. गाईची रुद्र देवता आहे. बकरें अग्नि दैवत आहे. मेंढराची देवता वरुण, डुकराची देवता विष्णु होय. आरण्यांतील सर्व पशु वायु दैवत आहेत. सर्व जलाशयांची समुद्र देवता आहे. कमंडलु, कुंभ ( कळशी ) व करक ( बोळकें ) ह्यांची वरुण देवता जाणावी. सोनें ( सुवर्ण ) तसेंच सर्व प्रकारचीं लोह हीं अग्नि दैवत होत. हे द्विजहो ! सर्व प्रकारचीं धान्यें आणि पक्वान्न ह्यांची प्रजापति देवता आहे, सर्व प्रकारचीं सुगंधी द्रव्यें गांधर्व समजावीं. विद्या ब्रम्ह दैवत आहे. पंडितांनीं विद्येचीं पुस्तकें वगैरे साहित्यें सरस्वती दैवत जाणावीं. सर्व कारागिरीच्या अवजारांचीं विश्वकर्मा देवता जाणावी. झाडें, फुलें, ओल्या भाज्या, व सर्व प्रकारचीं फळें हीं वनस्पति दैवत होत. मासे व मांस ह्यांची प्रजापति देवता आहे. छत्री, हरणाचें चामडें, पथारी, रथ, आसन ( पाट इत्यादि ) जोडे, मांडें आणि दुसरे प्राण-

शिवायचे सर्व हीं आंगिरस दैवत होत. शूरास उपयोगी पड-
णारें शस्त्र, ढाल, ध्वज वगैरे सर्व तसेंच राजास उपयुक्त छत्र
चामर इत्यादि हें सर्व सर्व दैवत जाणावें. हे द्विज श्रेष्ठ हो!
घर हें इंद्र दैवत समजावें. ज्याचें दैवत सांगितलें नाहीं तें नेहमीं
विष्णु दैवत जाणावें.

प्रतिग्रहस्थानानि तु.

" गृह्यपरिशिष्टे "

प्रतिगृण्हीतगां पुच्छ कर्णे वाहस्तिनं करे।
मूर्ध्नि दासीमजंचैव पृष्ठे, श्वतरगर्दभौ।
अश्वं कर्णे सटायां वा अन्न मुद्दिश्य धारयेत्।
शय्यासनगृहक्षेत्रं संस्पृश्यादाय कांचनं।
उष्ट्रंच ककुदि स्पृष्ट्वा मृगांश्च महिषादिकान्।
गोधा मश्वविधानेन पक्षे संस्पृश्य पाक्षिणः।
छत्रं दंडे तरून्मूले फलं संगृह्य गौरवात्।
प्रगृह्योपानहोऽमत्रं वासयेत्प्रतिमुच्यते।

" अमत्रं पात्रं "

वास स्तथा समादाय कन्यांशीर्षेऽथवा करे।
कन्याया दक्षिणांसमभिस्पृशे दित्यर्थः। रति
भार्यांपरपूर्वां प्रतिगृण्हीत चाक्षतां।
पुत्र मुत्संग मारोप्य प्रतिगृण्हीत दत्तकं।
रथं रथमुखे स्पृष्ट्वाप्रतिगृण्हीत कबरे।
कूबरो युगाधारकाष्टं।

" तथा हेमाद्रौ दानखंडे "

भूमेः प्रतिगृहे कुर्यात् भूमिं कृत्वा प्रदक्षिणां ।
करे गृहीत्वा कन्यां तु दासदास्यौ द्विजोत्तमाः ।
आरुह्यच गजस्योक्तः कर्णेचाश्वस्य कीर्तितः ।
तथा चैक शफानांतु सर्वेषांच विशेषतः ।
प्रतिगृण्हीत तान् शृंगे पुच्छे कृष्णाजिनं तथा ।
ये चैक शफाः श्रृंगिणस्तान्विशेषतः शृंगे प्रतिगृण्हीयादित्यर्थः ।
कर्णजाः पशवः सर्वे ग्राह्याः पुच्छे विचक्षणैः ।
गृण्हीयान्महीषं शृंगे खरं वै पृष्ठदेशतः ।
प्रतिग्रहमथोष्ट्रस्य यानानां चाधिरोहणात् ।
बीजानां मुष्टिमादाय रत्नान्यादाय सर्वतः ।
वस्त्रं दशांतादादद्या त्परिधायापिवा पुनः ।
आरुह्योपानहौ मंचमारुह्यैव च पादुके ।
धर्मध्वजौ तु संस्पृश्य प्रविश्यच तथा गृहं ।
अवतीर्य च सर्वाणि जलस्थानानि वै द्विजाः ।
आयुधानि समादाय तथामुच्य विभूषणं
आमुच्यबध्वेत्यर्थः ।

इति प्रतिग्रहस्थानानि.

---

## प्रतिग्रहाचीं स्थानें.

प्रतिग्रहाचीं स्थानें.

"गृह्यपरिशिष्टांत" दान घेणारानें गाईचें शेंपूट किंवा कान हातांत धरून तिचें दान घ्यावें. हत्तीची सोंड हातांत धरून दान घ्यावें दासीचे मस्तकावर, बोकड, खेचर व गाढव ह्यांचे पाठीवर हात ठेऊन दान घ्यावें. घोड्याचा कान किंवा आयाळ[1] धरून दान घ्यावें. अन्न स्पर्श करून त्याचें दान घ्यावें. बिछाना, पलंग, आसन, घर व जमिन ह्यांस स्पर्श करून त्यांचें दान घ्यावें. सोनें घेऊन ( हातांत ) दान घ्यावें. उंट, हरिण व म्हैस इत्यादिकांच्या ककुदेस[2] स्पर्श करून दान घ्यावें. घोरपडीचें घोड्याप्रमाणें दान घ्यावें. पक्ष्याचे पंखास स्पर्श करून दान घ्यावें. छत्रीचा दांडा धरून दान घ्यावें. झाडाचे मूळांत धरून दान घ्यावें. फळ हातांत घेऊन दान घ्यावें. जोडा घालून दान घ्यावा. भांड्यास स्पर्श करून दान घ्यावें. वस्त्र धरून त्याचें दान घ्यावें. कन्येचें मस्तक किंवा हात धरून दान घ्यावें. संभोगासाठीं अक्षत[3] अशा स्त्रीचें दान तिचा हात धरून घ्यावें. दत्तक घ्यावयाच्या मुलास मांडीवर बसवून दत्तक घ्यावा. त्याच्या मुखास स्पर्श करून (युगास आधारभूत असलेल्या लाकडास धरून) प्रतिग्रह घ्यावा. "तसेंच हेमाद्रींत दानखंडांत हे द्विज श्रेष्टहो ! जमिनीस प्रदक्षिणा क-

---

१ मानेवरील केस.

२ मानेवरील मासाचा पिंड.

३ पूर्वी कोणीही जिचा संभोग केलेला नाहीं ती.

रून तिचा प्रतिग्रह घ्यावा. कन्या, दास व दासी ह्यांचा हात धरून दान घ्यावें. हत्तीवर बसून त्याचा प्रतिग्रह घ्यावा. घोड्याचा कान धरून दान घ्यावें. तसेंच एकखुर असणाऱ्या सर्व जनावरांचा विशेषें करून शिंगास धरून प्रतिग्रह सांगितला आहे. कृष्णाजिनाचें शेंपूट धरून प्रतिग्रह घ्यावा. ज्ञ त्यांनीं कान असलेल्या सर्व जनावरांचें शेंपूट धरून दान घ्यावें. रेड्याचें शिंग धरून प्रतिग्रह घ्यावा. गधड्याचे पाठीस स्पर्श करून प्रतिग्रह घ्यावा. उंट व वाहनें ( गाडी वगैरे ) ह्यांवर बसून दान घ्यावें. धान्याचा मुठींत घेऊन प्रतिग्रह घ्यावा. रत्नें सर्व ठिकाणीं धरून त्यांचा प्रतिग्रह घ्यावा. वस्त्रांच्या दशा धराव्या अथवा तें नेसून दान घ्यावें. जोडे, पादुका व पलंग ह्यांवर चढून त्यांचें दान घ्यावें. धर्म ध्वजांचा स्पर्श करून प्रतिग्रह घ्यावा. घरांत प्रवेश करून प्रतिग्रह घ्यावा. सर्व उदकांच्या स्थानांचा[४] आंत उतरून प्रतिग्रह घ्यावा. शस्त्रें हातांत घेऊन प्रतिग्रह घ्यावा. भूषणें धारण करून त्यांचा प्रतिग्रह घ्यावा.

ह्या प्रमाणें प्रतिग्रहांचीं स्थानें सांगितलीं.

---

## अथादौ तुलापुरुष दानं.

" हैमाद्रौ मात्स्ये "

अनेन विधिनायस्तु तुलापुरुष माचरेत् ।
प्रतिलोकाधिपस्थाने प्रतिमन्वंतरं वसेत् ।

---

४ कुवे विहिरी वगैरे.

विमानेनार्कवर्णेन किंकिणीजालमालिना ।
पूज्यमानोऽप्सरोभिश्च ततोविष्णुपुरं व्रजेत् ।
कल्पकोटिशतं यावत्तस्मिन्लोके महीयते ।
कर्मक्षयादिह पुनर्भुवि राजराजो ।
भूपालमौलिमणिरंजितपादपीठः ।
श्रद्धान्वितोथवति यज्ञसहस्रयाजी ।
दीप्तप्रतापजित सर्व महीपलोकः ।
यो दीयमान मपि पश्यति भूतियुक्तः ।
कालांतरे स्मराति वाचयतीह लोके ।
यो वा शृणोति पठतींद्रसमानरूपः ।
प्राप्नोति धाम स पुरंदरदेवजुष्टं मिति ।

" तत्रैव वन्हिपुराणे "

एवं दत्वा सुवर्णं तु ब्रम्हहत्यादिकं च यत् ।
पापं निहत्य पुरुषः स्वर्गलोकं सगच्छति ।
तत्र स्थित्वा चिरं राजन्यदायाति महीतले ।
राजराजेश्वरःश्रीमान्वीतशोको निरामयः ।
रूपसौभाग्यसंपन्नो नित्यं विष्णुपरायणः ।
पुन र्विष्णुपदं याति तत्र गत्वा न शोचति ।

इति सुवर्णादि तुलापुरुष दानफलम.

## पूर्वी तुलापुरुषाचें दान.

" हेमाद्रींत " " मत्स्य पुराणांतील " ह्या विधीनें जो तुळा पुरुषाचें दान करील तो प्रत्येक लोकांतील अधिकाऱ्याच्या जागेवर प्रत्येक मन्वंतरा पावेतों किंकिणींच्या समुदायानें शोभणाऱ्या सूर्याचे वर्णा सारख्या विमानाचे योगानें अप्सरांनीं ज्याची सेवा केली आहे असा होऊन वास करील. नंतर तो वैकुंठ लोकीं गमन करील त्या लोकांत शंभर कोटि कल्प पावेतों कर्माचा क्षय झाल्यानंतर पुन्हा तो पृथ्वीवर राजांच्या मुकुटावर असणाऱ्या मण्यांच्या योगानें ज्याचें पादपीठ सुशोभित केलें आहे, हजार यज्ञ करणारा, प्रखर प्रतापानें ज्यानें सर्व राजांचा समुदाय जिंकला आहे, असा श्रद्धावान् श्रेष्ठ राजा होईल. जो उत्साहानें तुळा पुरुषाचें दान देतांना पाहील अथवा दुसऱ्या वेळीं त्याचें स्मरण करील, किंवा लोकांत सांगेल तसेंच जो ऐकेल किंवा सांगेल तो इंद्राप्रमाणें ज्याचें स्वरुप आहे असा होऊन इंद्र व देव ह्यांनीं सेवन केलेल्या स्थानाला पावेल.

तुळा पुरुषाचें दानाचे फळ.

" त्यांतच " " अग्निपुराणांतील " हे राजा ! ह्या प्रमाणें जो पुरुष सोन्याचें दान करील तो ब्रम्हहत्या इत्यादि पातकांचा नाश करून स्वर्गाला जाईल; तेथें पुष्कळ काळपावेतों वास करून पुन्हा परत मृत्युलोकीं येईल तेव्हां तो ज्याचा शोक गेला आहे, ज्याला व्याधि नाहीं, रूप सौभाग्य ह्यांनीं युक्त, निरंतर विष्णुची भक्ति करणारा श्रीमान् श्रेष्ठ राजांचा ईश्वर असा होऊन पुन्हा विष्णुलोकीं जाईल; तेथें गेल्यानंतर त्यास दुःख होणार नाहीं.

ह्या प्रमाणें सुवर्णादि तुळा पुरुषाच्या दानाचें फळ होय.

---

अथ कुंडमंडपादि.

तच्च सुवर्णतुलाया मेवावश्यक मिति

" हेमाद्र्यादयः "

रत्नरजततुलायां तु कृताकृत मित्युक्तं तत्रैव
होमाद्यशक्तौ तु मंडपादिरहित मेव कुर्यात् ।
न तत्र मंत्रो होमोवा एवमेव प्रदीयत इति

" मात्स्योक्तेः " ग्रहमंत्राद्वारजापमंत्राश्च नेत्यर्थः

कुंडमंडप वगैरे.

कुंडमंडपादिकांची सोन्याचे तुळेंतच आवश्यकता आहे असें " हेमाद्रि वगैरे " म्हणतात. रत्नें, व रुपें ह्यांच्या तुळेंत तर कुंड मंडपादि करावें अथवा करूं नये असें त्यांतच सांगितलें आहे. " तेथें ग्रहांचे मंत्र, द्वारजपमंत्र आणि होम न करतां असेंच दान करावें " असें " मत्स्यपुराणांत " आहे त्यावरून होम वगैरे करण्याविषयीं अशक्त असतां कुंड मंडपादिकांवाचूनच तुळादान करावें.

कुंड मंडपाबद्दल शास्त्रार्थ.

अथ तुलावेदी परिमाणं चाह तत्रैव तत्रादौ शुभेऽन्हि
शोभार्थं कुंडमंडपमात्रं कृत्वा सप्तहस्तां वा पंचहस्तां
वा तृतीयांशेन वोच्चांवेदीं कृत्वा तदुपरि पूर्वपश्चि-
मयोः स्तंभद्वयं निखेयं.

" हैमाद्रौ मात्स्ये "

शाकेंगुदीचंदनदेवदारु ।
श्रीपार्णीबिल्वाप्रियकांजनोत्थं ।

स्तंभद्वयं हस्तयुगावखातं ।

कृत्वा दृढं पंचकरोच्छ्रितं तत् ।

तदंतरं हस्तचतुष्टयं स्यादथोत्तरांगं

चतुरस्रमेवेति शाको वृक्षविशेषो

महोसार इति प्रसिद्धः

श्रीपर्णी भद्रतरुः प्रियकोजीवकः ' सारमते ' कदंबः अंजनः कांचनतुल्यपर्णो वृक्षविशेषः स्तंभद्वयं च चतुरस्रीकृत्य वेदीमध्ये पूर्वपश्चिमभागयोर्निखेयं उत्तरांग स्तंभयोरुपरितिर्यक्काष्ठ तच्च पंचकरयोःस्तंभयो र्हस्तचतुष्टयोपरि निधेयं चतुरस्र । अथोत्तरांगं च तदीयमेवेति पाठ तदीयमिति स्तंभसजातीयकाष्टमित्यर्थः समानजातिश्च तुलावलंब्या हैमेन मध्ये पुरुषेणयुक्ता । दैर्घ्येण साहस्तचतुष्टयं स्यात्पृथुत्वमस्याश्च दशांगुलानि ।

सुवर्णपट्टाभरणाच कार्या सलोहपाश द्वय शृंखलाभिः। युता सुवर्णेन च रत्नमालाविभूषिता माल्यविभूषणाढ्या । समानजातिस्तोरणसमानजातः तुलोत्तरांगमध्ये द्वादशभिरंगुलैरधस्तादुदगग्रा अवलंब्या

पुरुषेण विष्णुना शृंखलाविलंबितया सुवर्णनिर्मितया

तत्प्रतिमालक्षण मुक्तं॥

" पंचरात्रे "

अथ श्चक्रं गदा मूर्ध्वे वामयोः करयोः क्रमात् ।
उर्ध्वे शंख मधः पद्मं गोविंदः कपिलांगकः ।
हस्तचतुष्टयदीर्घंतु प्रांतद्वयन्यस्तयोर्लोहपाशयो
र्बहिःस्थितमंगुल षट्कं विहाय विज्ञेयं समस्त-
तुलायाः अष्टोत्तरशतांगुलमितत्वात् ।

पृथुत्वंचास्यादशांगुलपरिमितेन वलयाकृतिना
सूत्रेण संमितं विधेय मित्यर्थः सलोहपाशद्वय-
शृंखलाभिर्युतेति सुवर्ण धारणार्थं फलक धारिणी-
भिर्लोहपाशद्वयावलंबित शृंखलाभिर्युक्ता कार्येत्यर्थः

## तुला व वेदीचें प्रमाण.

" तुला[१] व वेदीचें परिमाण सांगतो–" त्यांतच " त्यांत प्रथम शुभ दिवशीं शोभेसाठीं केवळ कुंड व मंडप करून सात हात किंवा पांच हात लांब रुंद आणि तिच्या तिसऱ्या अथवा चवथ्या भागा एवढी उंच अशी वेदी ( ओटा ) करून तिचेवर पूर्व पश्चिम असे दोन खांब रोवावे.

*वेदीचें प्रमाण.*

" हेमाद्रिंत " " मत्स्यपुराणांतील " साग, हिंगणबेट, चंदन, देवदार, भद्रवृक्ष, बेल, प्रि-[२]यंक ( जिवक ), व अर्जुन[३] ह्यां पैकीं कोणत्याही एखाद्या झाडाचे मजबूत

*वेदीवर खांब पुरण्याविषयीं योग्य वृक्ष, खांबाचें प्रमाण व तुळेचें प्रमाण.*

---

१ तराजु.

२ सारमतांत कदंब घ्यावा असें आहे.

३ हा एक जातीचा वृक्ष आहे त्याचीं पानें कांचना प्रमाणें असतात.

चौकोन असे दोन खांब असावेत. ते जमिनींत दोन हात पुरलेले असून वर पांच हात उंच असावेत. नंतर जमिनी पासून चार हातांच्या उंचीवर त्या दोन खांबावर एक चौकोनी आडवें लांकूड बसवावें. " अथोत्तरांगेच तदियमेव " असा पाठ असतां त्याचा अर्थ–वरील लांकूड खांबांच्याच जातीचें असावें. ज्या जातीचें आडवें लाकूड असेल त्या जातीची तुला ( दांडी ) असावी. आणि तिच्या वरील आडव्या लांकडाच्या मध्यभागीं बारा अंगुळें खालीं विष्णुची प्रतिमा जिला जडली आहे अशा सोन्याचे साखळीस उत्तरे कडे टोंक होईल अशा रीतीनें लटकावलेली असावी. विष्णुच्या प्रतिमेचें लक्षण " पंचरात्रांत " सांगितलें तें–डाव्या दोन हातां पैकीं खालच्या हातांत चक्र, वरच्या हातांत गदा आणि उजव्या दोन हातां पैकीं वरल्या हातांत शंख व खालचे हातांत पद्म ज्यानें धारण केलें आहे, पिंगट वर्णासारखें ज्याचें अंग आहे असा विष्णु जाणावा. त्या तुळेचा ( दांडीचा ) घेर वाटोळा दहा अंगुळें असून लांबी एकंदर एकशें आठ अंगुळें असावी. पैकीं दोन्हीं टोंकांकडे लोखंडाचे फास अडकविण्या करितां प्रत्येकीं सहा सहा अंगुळें मिळून बारा अंगुळें सोडावीं. तसेंच ती सोनें तोलण्याकरितां केलेल्या दोन फलकांस ( परड्यांस ) अडकविण्या करितां लोखंडाचे फासास लटकविलेल्या अशा साखळ्यांनीं युक्त असून सोनें, रत्नांच्या माळा, फुलांच्या माळा व भूषणें ह्यांनीं सुशोभित करावी.

" तत्रैव वन्हिपुराणे "

आश्वत्थीं खादिरीं चापि पालाशीं वा सुवृक्षजां ।
चतुर्हस्त प्रमाणेन सुश्लक्ष्णां सुदृढां नवां ।
सुवर्तुलां समां तद्वात्स्निग्धां छिद्रत्रयान्वितां ।
मौंज शिक्यद्वयोपेतां बद्धां स्तंभेतु यज्ञिये इति ।

अग्निपुराणांतील तुळेचें मान.

" त्यांतच अग्निपुराणांतील " पिंपळ, खैर, व पळस ह्यां पैकीं एका वृक्षाची अथवा दुसऱ्या चांगल्या वृक्षाची तुळा करावी. ती चार हात लांब सुरेख, मजबूत, नवी, सारखी वाटोळी, गुळगुळीत व तीन मों[१]ीनीं युक्त असून जिला मौंजांचीं[२] दोन शिंकीं लावलीं आहेत अशी यज्ञास उपयोगी पडणाऱ्या खांबास बांधलेली असावी.

आह " नारदः "

चतुरस्रा तुला कार्या पादौ चापि तथा विधौ ।
चतुर्ष्वपि च पार्श्वेषु मानं स्या च्चतुरंगुलं ।
मुक्त्वा तावत्तु करका वेतया विन्यसे द्बुधः ।
चतुर्हस्ताधरतुला मध्ये शृंखलयान्विता ।
शिक्यं हस्तत्रयं कुर्या त्कटकं चतुरंगुल मिति ।

नारदाचे मतें तुळेचें मान.

" नारद " सांगतात—तुळा चौकोनी करावी आणि तिचे दोन पाय ( दोन बाजूंचे २ खांब ) ही तसेच करावेत. चारही बाजूंचें

---

१ एक जातीचें गवत आहे.

२ परडीं.

मान चार अंगुळें असावें ( लांबी अंगुळें ४, रुंदी अंगुळे ४ व जाडी अंगुळें ४ असावी ) असें झाल्यानें दोन्हीं टोंकांकडे चार अंगुळें सोडून करक ( फासे ) ठेवावे. तुळेची लांबी चार हात असून तिच्या मध्यभागीं सांखळी असावी. शिंकें तीन हात लांब असावें आणि करकाचें प्रमाण चार अंगुळें असावें.

यदाह तत्रैव " विश्वकर्मा "

विशेष दानं कथितं तुलादि
तस्मात्तुला लक्षण मुच्यते प्राक्।
तुलाप्रमाणं स्मृतमंगुलानि
दैर्घ्येंऽगुलैःपण्णवति प्रमाणैः ।
प्रान्तद्वयेप्यंगुलषट्कमुक्तं
शतं तुलाष्टोत्तरमंगुलानां ।
स्यु र्विंशतिः पंच च धातुबंधा
बंधेष्वधिष्टातृ सुरानिवेशाः ।
ईशः शशी मारुतरुद्रसूर्याः ।
स्या द्विश्वकर्मा गुरुरंगिरोग्नी ।
प्रजापति र्विश्वजग द्विधाता ।
पर्जन्यशंभू पितृदेवताश्च
सौम्यश्च धर्मामरराजमश्विनौ ।
जलेशमित्रा वरुणौ मरुद्गणाः
धनेश गंधर्व जलेश विष्णु
रेताश्चतुर्विंशति रेव देवताः ।

अत्र सौम्यो बुधः ।

स्यात्पंचविंशः पुरुषः स एको ।
य स्तौल्यमान स्तुलया महात्मा ।
एता विधेया स्तपनीयमय्या ।
रत्नाचिता दैवतमूर्तय स्ताः ।
षडंगुलःस्या च्चतुरास्रपिंडः ।
प्रांतद्वये विष्णुरनंतनामा ।
§ तुलोर्ध्वभागे कलशद्वयं स्या ।
त्तथाकुट द्वंद मधस्तुलांते ।
§ षडंगुलोत्थं कटकश्च पिंडोऽ ।
प्येकांगुलो विष्णुरनंतनामा ।
पार्श्वद्वयं तच्चतुरंगुले स्या ।
देवं मया ते कथितं प्रमाणं ।
मध्यांकुटे संकलिकांगुलानि ।
पंचाधिकाविंशति रेव दैर्घ्ये ।
एकांगुलोऽस्या भवतीह पिंड ।
स्तत्राधिदेवः किल वासुकी स्यात् ।
एकैकरज्जु र्लभतें ऽगुलानि
त्रिःसप्ततिः पिंडगतांगुला च ।
तच्चलक द्वंद मथांगुलानि ।

---

§ § हा श्लोक मूळ पोथींत नाहीं. कलकत्यांत छापलेल्या हेमाद्रिचे दान
ग्रंथांत आहे                शुंखेलिका.

त्रिंश तथा पंचदशाधिका स्यात् ।
तद्धातुवद्धं शुभ काष्ठपीठं ।
पिंडे तथा द्वंद मथो विधेयं ।
अधोधटो भूम्याधिदैवता स्या
तुलांतरे भूमिपाति र्निवेश्य : ।

इति हेमाद्रौ मात्स्योक्तेः वेद्यादितुलाकृत्यलक्षणं च

" त्यांतच " ( हेमाद्रिंत ) जें " विश्वकर्मा " सांगतो तें—तुळा ज्यांत प्रथम आहे त्याला विशेष दान म्हटलें आहे म्हणून प्रथम तुळेचें लक्षण सांगतो. तुळेचें मान शहाण्णव अंगुळें लांब सांगितलें आहे आणि दोन्हीं टोंकांचें मान सहा सहा अंगुळें असावें. ह्या वरून तुळेची एकंदर लांबी एकशें आठ अंगुळें होते. तुळेवर पंचांविस धातुचीं बंधनें असावींत आणि त्यांच्यावर वास करणाऱ्या देवता स्थापन कराव्या त्या देवता येणें प्रमाणें—ईश, चंद्र, वायु, रुद्र, सूर्य, विश्वकर्मा, गुरु अंगिरस् व अग्नि, प्रजापति, विश्वदेव, विधाता, पर्जन्य व शंभु, पितर, बुध, धर्म, इंद्र, आश्विनौदेव, जलेश, मित्रा वरुण हे दोन मरुद्गण, घनेश, गंधर्व, जलेश आणि विष्णु ह्या प्रमाणें ह्या चोवीस देवता आणि तुळेनें ज्याची तुलना करण्यांत येते तो पुरुष पंचविसावी देवता होय. ह्या देवता त्यांचीं जशीं स्वरूपें सांगितलीं असतील तशा सोन्याच्या केलेल्या असून रत्नखचित असा-

तुळेचें प्रमाण तिच्या वरील देवता. त्यांचीं नांवें इत्यादि.

१ तदानुयद्धं शुभकाष्ठपाटं पिंडेगुलद्वंद्व मथो विधेयं असा हेमाद्रींत पाठ आहे.

ण्यात. तुळेच्या दोन्हीं टोंकाकडे सहा अंगुळें जाड चौकोन असा अनंत नांवाचा विष्णु असावा. तुळेच्या वरल्या भागीं दोन कळस असावे आणि तुळेच्या शेवटीं खालीं दोन कट ( कंडी ) असावीं. तें कडें सहा अंगुळें लांब असून एक अंगुळ जाड असावें. तुळेचे पाश लोखंडाचे असून त्याची लांबी चार अंगुळें असावी. ह्या प्रमाणें मी तुळेचें प्रमाण सांगितलें. मध्यभागीं एक साखळ असावी तिची लांबी पंचवीस अंगुळें असून जाडी एक अंगुळ असावी. तिची वासुकी अधिदेवता आहे. एकेका दोरीची लांबी बहात्तर अंगुळें असून जाडी एक अंगुळ असावी. त्या दोऱ्यांस लटकणारीं पस्तीस अंगुळें प्रमाणाचीं दोन चेलकें ( परडीं ) असावीं. तीं धातुनें मढवलेलीं चांगल्या लाकडाचीं केलेलीं असून दोन अंगुळें जाड असावीं. चेलकाचें व भूमीचें अंतर विती इतकें असावें. त्याची भूमि देवता होय. तुळेच्या मध्यभागीं भूमिपतीस स्थापन करावा. ह्याप्रमाणें हेमाद्रिंत, मत्स्यपुराणांत सांगितलें त्यावरून वेदी तुळा वगैरेचें लक्षण सांगितलें.

अथ वेद्यां षोडशार चक्र लिखन प्रकार उक्तो

" मदनरत्ने "

तत्राचार्यो वेद्यां मध्ये त्रिहस्तव्यासं चतुरस्रं प्रसाध्य प्रागपरदक्षिणोत्तरनवरेखाभि स्तच्चतुःषष्ठिकोष्टकं कुर्यात् तत्र कोष्टानि प्रत्येकं नवनवांगुलानि संपद्यंते

---

२ माशाचे गळाच्या अकृति प्रमाणें दोन कडी असावीं.

ततो बहिरंत्यपंक्तिषु चतुर्दिक्षु मध्यकोष्ठानि चत्वारि चत्वारि मार्जयित्वा तदुपर्युपांत्यपंक्तिषु पार्श्वयो स्तत्र त्रयं त्रयं त्यक्त्वा प्रतिदिशं प्रतिमध्यकोष्ठ द्वयं द्वयं मार्जयेत् तच्चतुर्दिक्षु षट् षट् कोष्ठानि चत्वारि द्वाराणि सिध्यंति ततोमध्यस्थितषोडशकोष्ठानि मार्जयेत्।

ततो बाह्ये एकैकं कोणकोष्ठं विहाय कोणकोष्ठद्वार-पीठांतरालवर्तिन्यवशिष्टानि पंचपंच कोष्ठानि मार्ज-येत् तथाच मध्यचतुरस्रपीठपादाः सिध्यंति ततो म-ध्याच्चत्वारि वृत्तानि कुर्यात् तत्राद्ये चत्वार्यंगुलानि व्यासः द्वितियेष्टौ तृतीये चतुर्विंशतिः चतुर्थे षड्विंशति रिति तच्चतुरंगुलं वृत्तं कर्णिकारूपं पीतेनरजसा पूर-यित्वा कर्णिकावधिरेखां सितेन रजसा निर्माय तद्ब-हिरष्टांगुलात्मके वृत्ते पीतरक्तासितरजोभिः संपादित-मूलमध्याग्राणि षोडशकेसराणि संपाद्य तत्केसराव-धिरेखां सितेनैवरजसांगुलोन्नतां संपाद्य चतुर्विंशांगु-लात्मके तद्बहिर्वृत्तेन रजसाष्टादिक्ष्वष्टौ पत्राणि र-क्ताग्राणि कुर्यात्।

ततो दलांतररेखां सितेन रजसा विधाय दलांतराणि कृष्णेन रजसा पूरयित्वा तद्बहिरेकांगुलांतरं बहि र्वृत्तरेखां सितेनैव रजसा संपाद्य वृत्तद्वयांतरं परि-तोष्टदलाग्रतन्मध्यचिन्हैः षोडशधाविभज्य प्रति-

भागं यवाकारान् षोडशारान् श्यामपीतवारुण-
श्वेतरजोभिः कल्पयित्वा तदंतरेण यथायोगं रजोभिः
पूरयित्वा तद्बहिःसितपीतारुणश्यामहरिताः पंच-
रेखा लिखेत् तद्बहिःपीठे क्षेत्रं चतुरस्रंयथाशोभं
रजोभिरलं कृत्य पीठावधिरेखां सितेन रजसा
चतुरस्रां रचयेत् द्वारक्षेत्राणि पूर्वादितः पीतश्याम-
सितरजोभिः पूरयेत् ।

आग्नेयादि ( पीठपादचतुष्टयं पंचकोष्ठात्मकं )कोण
कोष्ठचतुष्टयं लोहितहरितश्यामधवलैः पूरयेत् । आग्ने-
यादि पीठपादचतुष्टयं पंचकोष्ठात्मकं तु क्रमात्
सितरक्तपीतकृष्णरजोभिः पूरयेत् ततः सितेन
रजसांगुलोन्नतेन बहिश्चतुरस्रे रेखां कुर्यादिति ।

" मदनरत्नदयः " " ठक्कुरमते " तु

चतुरस्रं चतुर्हस्तं तत्र प्रत्येक द्वादशांगुलानि कोष्ठानि
वृत्तानि तु पंच तत्राद्य वृत्ते चत्वार्यंगुलानि व्यासः
द्वितिये ष्टौ तृतीये विंशतिः चतुर्थे चतुर्विंशतिः पंच-
मेऽष्टांत्रिंशदिति पंचकोष्ठात्मकं पीठपादचतुष्टयं
आग्नेयादिक्रमेण रक्तहरित श्यामसितैः पूरणीयं को-
णकोष्ठचतुष्टयं प्रत्येकं त्रिभि स्त्रिभि र्वर्णैरिति विशेषः ।
इदमेव वारुणं मंडलं जलोत्सर्गादौ ज्ञेयं पुन स्त-
त्रैव§ वज्रं प्रागुत्तमे भागे आग्रेय्यां शक्ति मुज्वलां ।

§ पितामहचरणाः असा मयूखांत पाठ आहे

आलिखे दक्षिणे दंडं नैर्ऋत्यां खड्ग मालिखेत् ।
पाशं तु वारुणे लेख्यं ध्वजं वै वायुगोचरे ।
कौबेर्यां तु गदां लेख्या ईशान्यां शूल मालिखेत् ।
शूलस्य वामदेशे तु चक्रं पद्म च दक्षिणे ।
ततो महावेद्यपरि पंचवर्ण फलपुष्पोपशोभितं वितानं कुंडमंडपे बध्नीया दिति

इति वेद्युपरि षोडशारचक्रं

वेदीवर सोळा दळांचें चक्र लिहिण्याचा प्रकार.

" वेदीवर सोळा दळें ज्यास आहेत असें चक्र लिहिण्याचा प्रकार " मदन रत्नांत" सांगितला आहे तो असा:—आचार्यानें प्रथम वेदीच्या मध्यभागीं तीन हात ज्याची लांबी आहे असें 'समभुज चौकोन' क्षेत्र काढून नंतर त्यांत पूर्व पश्चिम व दक्षिणोत्तर अशा नऊ नऊ रेषा काढल्या म्हणजे चौसष्ट कोष्टकें होतील. तीं प्रत्येक कोष्टकें नऊ नऊ अंगुळांचीं होतील. नंतर बाहेरील शेवटल्या पंक्तींत चार दिशेकडील मधलीं चार चार कोष्टकें पुसावीं. नंतर त्यांच्या जवळच्या पंक्तींतील कोष्टकांपैकीं प्रत्येक दिशेस दोन्ही बाजू कडील तीन तीन कोष्टकें सोडून " मधलीं दोन दोन कोष्टकें पुसावीं म्हणजे त्या समभुज चौकोनाच्या चाऱ्ही दिशेस सहा सहा कोष्ठकांचीं चार द्वारें सिद्ध होतात. नंतर मधलीं सोळा कोष्टकें पुसून टाकावीं. नंतर बाहेरील कोणा कडील

---

१. परिशिष्ट पहा

एक एक कोष्टक सोडून कोणाकडचें कोष्टक, द्वार व पीठ ह्यां-च्या मध्यें असलेलीं अवशेष राहिलेलीं पांच पांच कोष्टकें पुसावीं म्हणजे मधल्या समभुज चौकोनाचे ( पीठाचे ) पाद सिद्ध होतात. नंतर मध्या पासून ( पीठाच्या ) चार वर्तुळें करावीं. त्यांत पहिल्या वर्तुळाचा चार अंगुळें व्यास असावा, दुसऱ्याचा आठ अंगुळें, तिसऱ्याचा चोवीस अंगुळें व चवथ्याचा सव्वीस अंगुळें व्यास असावा. त्या चार अंगुळें व्यासाचे वर्तुलास कर्णिका रूप मानून तें पिंवळ्या रंगानें भरून कर्णिकेची मर्यादा दाखविणारी रेषा पांढऱ्या रंगानें भरून त्याचे बाहेरील आठ अंगुळांच्या वर्तुळांत पिंवळा, तांबडा व पांढरा ह्या वर्णांनीं क्रमानें सोळा केसरांचीं मूळ, मध्य व अग्रें हीं भरून केसराची मर्यादा दाखविणारी रेषा पांढऱ्या रंगानेंच एक अंगुळाएवढी उंच अशी काढावी; नंतर त्याच्या बाहेर चोवीस अगुळें व्यासाच्या वर्तुळांत रंगानें आठ दिशेस ज्यांचीं अग्रें तांबडीं आहेत अशीं आठ पत्रें करावीं. नंतर पत्रांतील रेखा पांढऱ्या रंगानें करून पत्रांचीं अंतरें ( मधले भाग ) काळ्या रंगानें भरून त्यांचे बाहेर एक अंगुळाच्या अंतरानें बाहेरील वर्तुळाची रेषा पांढऱ्या रंगानें करून दोन वर्तुळांच्याआंत चहूंकडे आठ पत्रांचीं अग्रें त्यांच्या मधल्या चिन्हानीं सोळावेळ विभागून प्रति भागांत यवाचे आकारांचे सोळा आर--काळा, पिंवळा, तांबडा व पांढरा ह्या रंगांनीं करून त्यांचीं अंतरें जसे रंग मिळतील तशांनीं भरून त्यांच्या बाहेर पांढरी, पिंवळी, तांबडी, काळी व हिरवी अशा पांच रेघा काढाव्या. त्याच्या बाहेर पीठावर समचतुर्भुज क्षेत्र जशी शोभा

येईल त्या प्रमाणें रंगांनीं सुशोभित करून पीठाची मर्यादा दाख-विणारी रेघ पांढऱ्या रंगानें सम चौरस करावी. द्वार क्षेत्रें पूर्वे-कडून क्रमानें पिंवळा, काळा, पांढरा व हिरव्या रंगांनी भरावीं. आग्नेयी दिशेपासून चारी कोणदिशांकडील कोष्टकें क्रमानें तांबडा, हिरवा, काळा व पांढरा ह्या रंगांनीं भरावीं. आग्नेयादि चार कोण दिशां कडील पीठाचे पांच कोष्टकांचे चार पाय क्र-मानें पांढरा, तांबडा, पिवळा व काळा ह्या रंगांनीं भरावे. नंतर पांढऱ्या रंगानें सम चौरसाच्या बाहेर एक अंगुळ उंच अशी रेघ काढावी. ह्या प्रमाणें " मदनरत्न वगैरे " म्हणतात.

" ठक्कुर " ह्यांच्या मतें तर तें चौरस चार हातांचें अ-सावें. त्यांत प्रत्येक कोष्टक बारा बारा अंगुळांचें अशीं चौसष्ट कोष्टकें करावीं. वर्तुळें पांच करावीं. त्यांत पहिल्यांत चार अंगुळें व्यास असावा, दुसऱ्यांत आठ अंगुळें, तिसऱ्यांत वीस अंगुळें, चवथ्यांत चोवीस अंगुळें, व पांचव्यांत अडतीस अंगुळें व्यास अ-सावा. पांच पांच कोष्टकांचे पीठाचे चार पाय आग्नेय दिशेपा-सून क्रमानें तांबडा, हिरवा, काळा व पांढरा ह्या रंगांनीं भरावे. कोणा कडील चार कोष्टकें प्रत्येके तीन तीन रंगांनीं भरावीं असें विशेष आहे.

हेंच वारुण मंडळ होय तें जलोत्सर्गादिका विषयीं जाणावें " पुन्हां त्यांतच " पूर्वेकडील उत्तम भागांत वज्र लिहावें आग्ने-यीस निर्मळ शक्ति, दक्षिणेस दंड, नैऋतीस खड्ग, पश्चिमेस पाश, वायव्येस ध्वज, उत्तरेस गदा व ईशानीस शूळ लिहावें. शूळा-

च्या डावीकडे चक्र आणि उजवीकडे पद्म कादावें. नंतर मोठ्या वेदीवर पांच ज्याचे वर्ण आहेत, व फळें व फुलें ह्यांनीं सुशोभित असें वितान ( छत ) कुंडमंडपाचे ठिकाणीं बांधावें.

ह्याप्रमाणें वेदीवरील षोडशार चक्र सांगितलें

---

अथ घृतादितुलाफल मुक्तं

" हेमाद्रौ विष्णुधर्मोत्तरे "

प्रथमा तु घृतस्योक्ता तेजोवृद्धिकरी शुभा ।
माक्षिकेण तु सौभाग्यं तैलेन बहुला प्रजाः ।
वस्त्रेण दिव्यवस्त्राणि प्राप्नोति तुलया ध्रुवं ।
लवणेन तु लावण्य मरोगित्वं गुडेन च ।
असपत्नः शर्करया सुरूपं चंदनेन तु ।
अवियोगो भवे द्भर्त्रा तुलया कुंकुमस्य च ।
न संतापो हृदि भवेत्क्षीरस्य तुलया तथा ।
सर्वकामप्रदाः सर्वाः सर्वपापक्षयंकराः ।
यः करोति तुलाः सर्वाः स गौर्यालय माप्नुयात् ।

मंत्रेण-दद्यादभिमंत्रिता तु सकृ तुला मेकतमां द्विजेभ्यः ।
स याति गौर्याः सदनं सुपुण्यं न शोकदौर्भाग्य
मुपाश्नुते पुमान् ।

त्वं तुले सर्वभूतानां प्रमाण मिह कीर्तिता ।
मां तोलयंती संसारा दुद्धरस्व नमोऽस्तुते ।
इत्यारुह्या[1] गोदोहकालं[2] तत्रैव[3] चिंतयित्वा हरिप्रियां ।
अवरुह्य ततो दद्या दर्धं पाद मथापिवा ।
गुरुं संपुज्य विधिवद्वस्त्रालंकारभूषणैः ।
विसर्जये न्नमस्कृत्य भोजये द्विजपुंगवान् ।
शेषं द्विजेभ्यो दातव्यं स्त्रीभ्योऽन्येभ्य स्तथैव च ।
इष्ट बंधु विशिष्टाना माश्रितानां कुटुंबिनां ।
कदलीदलसंस्था च पंचपिंडा हिमाद्रिजा ।
कर्पूरस्य संपूज्य कुंकुमेना लभेत्तु तां ।
विं धिनानेन यो दद्या-तुलादानं विमत्सरः ।
स लोकमेति पार्वत्याः सेव्यमानोऽप्सरोगणैः ।
तत्रोष्य कालं सुचिर मिह लोके नृपो भवेत् ।
आत्मतुल्यं सुवर्णं वा रजतं रत्नमेव वा ।
यो ददाति द्विजाग्रेभ्य स्तस्याप्ये तत्फलं भवेत् ।

एत द्भूमिदानजन्यं.

ब्रम्हहत्यादिपापाद्यै मुक्तःशिवपुरं व्रजेत् ।
स[6] च तत्पापानिर्मुक्तः प्रोक्तं विष्णुपुरं व्रजेत् ।
तुलापुरुषभूमीं च दीयमानां तु ये नराः ।
पश्यंति तेऽ पिवा यांति ये वा स्तु रनुमोदकाः ।

---

१-२-३ इत्यारुह्य क्षणं स्थित्वा चिंतयित्वा हरिप्रियां असा "हेमाद्रित" दानमयूखांत पाठ आहे.

४-७ ह्या दोन आंकड्यांचे आंतील श्लोक "दानमयूखांत" नाहींत.

५-६ ह्या दोन श्लोकार्धांच्या अर्थाचा संदर्भ जळत नाहीं.

गुडं वा यदिवा खंडं लवणं वापि तोलितं।
यो दद्या दात्मना तुल्यं नारी वा पुरुषोऽपिवा।
पुमा न्प्रद्युम्न वत्सा तु नारी स्या त्पार्वतीसमा।
सुभगौ रूपसंपन्नौ भूंजीतां ते त्रिविष्टपं।
हिरण्यदक्षिणायुक्तं सवस्त्रं भूषणान्वितं।
अलंकृत्वा द्विजाग्र्यं तं परिधाप्य च वाससी
खंडादि तोलितं पश्चा द्गुरवे प्रतिपादयेत्।
सर्वकामसमृद्धात्मा नंतं कालं वसे द्दिवीति।

इति घृतादि तुलादान फलं.

---

### तूपवगैरेच्या तुळेचें फळ.

"हेमाद्रित" विष्णुधर्मोत्तरांतून सांगितलें आहे तें असें–

तूप, मध, तेल, वस्त्र वगैरेच्या तुळेचीं फळें.

प्रथम तुपाची तुळा सांगितली आहे ती तेजाची वृद्धि करणारी असून शुभ कारक आहे. मधाच्या तुळेपासून सौभाग्य ( सौंदर्य ), व तेलाच्या तुळे पासून पुष्कळ संतति प्राप्त होतें. वस्त्रांच्या तुळेनें दिव्य ( स्वर्गांतील ) व वस्त्रें मिळतात. मिठाच्या तुळेनें लावण्य व गुळानें निरोगिपणा, साखरेनें शत्रु न होणें, चंदनानें चांगलें रूप, केशराच्या तुळेनें भर्त्याचा वियोग न होणें, दुधाच्या तुळेनें चित्तास संताप न होणें अशीं फळें मिळतात. सर्व तुळा सर्व मनोरथ पुरविणाऱ्या आहेत. जो सर्व

---

१ ह्या आंकड्या पुढले श्लोकांच्या अर्थाचा संबंध बरोबर जुळत नाहीं.

तुळा करील तो पार्वतीच्या स्थानाला पावेल. जो पुरुष मंत्रानें अभिमंत्रित केलेली अशी कोणतीही एखादी तुळा एकदा जरि ब्राम्हणास देईल, तरी तो अत्यंत पुण्यकारक अशा पार्वतीच्या सदनाला पावेल आणि त्यास शोक, दुःख हे केव्हांही होणार नाहींत. " त्वं तुले सर्वभूतानां प्रमाण मिह कीर्तिता। मां तोलयंती संसारा दुद्धरस्व नमोस्तुते " हा मंत्र म्हणून तुळेवर चढावें आणि तिच्यावर बसून गाईचें दुध काढण्यास जितका वेळ लागतो तितका वेळ लक्ष्मीचें चिंतन करून नंतर खालीं उतरावें आणि तोललेल्या द्रव्या पैकीं अर्धें, किंवा चतुर्थांश गुरूस द्यावें. गुरूची विधिप्रमाणें वस्त्रालंकार भूषणें ह्यांनीं पूजा करून गुरूस नमस्कार करून मग कृत्य ( तुळा कर्म ) समाप्त करावें. नंतर ब्राम्हणास जेऊं घालावें. राहिलेलें द्रव्य ब्राम्हणांस, स्त्रियांस व दुसऱ्यांस वाटावें. तसेंच इष्ट, बांधव, शिष्ट, आश्रित व कुटुंबवत्सल ह्यांसही वाटावें. कापुराची पंच पिंडात्मक अशी केळीच्या पानावर स्थापन केलेली पार्वती करावी. तिची पुजा करून तिला केशरानें विलेपन करावें. ह्या विधीनें मत्सररहित असा जो तुळा दान करील, तो, अप्सरांच्या समुदायानें ज्याची सेवा केली आहे असा होऊन पार्वतीच्या लोकास जाईल; तेथें तो पुष्कळ काळ पावेतों वास करून नंतर मृत्युलोकीं राजा होईल. जो आपल्या वजना एवढें सोनें किंवा चांदी, किंवा रत्नें श्रेष्ठ ब्राम्हणांस देईल त्यालाही भूमिदानाचें फळ मिळेल आणि तो ब्रम्हहत्यादि पातकांनीं मुक्त होऊन कैलासास जाईल. तो त्या पातकांपासून मुक्त होऊन वैकुंठ लोकीं जाईल. जे लोक तुळा

पुरुष व भूमि ह्यांचे दान देतांना पहातात किंवा दान देण्याविषयीं अनुमोदन देतात ते देखील वर सांगितलेल्या लोकीं जातील. जो पुरुष अथवा स्त्री आपल्या वजना एवढें गुळ, किंवा खडी साखर अथवा मीठ देईल तो पुरुष विष्णु प्रमाणें होईल व स्त्री पार्वतीप्रमाणें होईल ते भाग्यवान, रूपवान असे होऊन शेवटीं स्वर्गाला जातील. सुवर्ण दक्षिणा वस्त्र व भूषणें ह्यांनीं द्विजश्रेष्ठांस अलंकृत करून वस्त्रें अर्पण करून नंतर खडीसाखर वगैरे तोललेलें गुरूस अर्पण करावें. ह्याप्रमाणें तुळा दान केल्यानें सर्व प्रकारचे मनोरथ परिपूर्ण होऊन अनंत काल पावेतों स्वर्गात वास करील.

ह्या प्रमाणें तूप वगैरेंच्या तुळा दानाचें फळ सांगितलें.

---

अथ नानारोगनिरासार्थं द्रव्यविशेषतुलादानान्युक्तानि " गारुडे "

तुलापुरुषदानं तु शृणु मृत्युंजयोद्भवं ।
अथं[३] लोहं प्रदातव्यं सर्वरोगोपशांतये ।
कांस्यं च यक्ष्मणे देयं त्रपु चार्शोविकारके ।
अपस्मारे तु सीसं स्या त्ताम्रं कुष्ठे च दारुणे ।
पित्तलं रक्तपित्ते च रौप्यं प्रदरमेहयोः ।

---

१--२ ह्या दोन आकड्यांतील अर्थाचा संदर्भ बरावर जुळत नाहीं.

३ अष्ट लोहं असा हेमाद्रित पाठ आहे.

सुवर्णं सर्वरोगेषु प्रदद्या न्मृत्युनाशनं ।
फलोद्भवं तथा देयं ग्राहिण्यां दीर्घवाहिन्यां ।
गौडं भस्मकरोगे च पौगं स्या द्गंडमालके ।
पौगं पूगीफलं ।

काष्ठजं चाग्निमांद्ये स्या द्रोगोत्पत्तौ तु पैष्टकं ।
मधूद्भवं तथादेयं कासश्वासजलोदरे ।
घृतोद्भवं तथा देयं छर्दिरोगोपशांतये ।
क्षीरं पित्तविनाशाय दधि स्या द्भगदारणे ।
लवणं वेपनाशाय पैष्टं दद्रुविनाशने ।
धान्यं च सर्व रोगस्य नाशने मुनिभिः स्मृत मिति

' अत्रायं संक्षेपो दानोद्योतेऽपि '

रूप्यतुलायां सुवर्णतुलाफल मेव-पितृतृप्तिः
प्रदरमेहनाश श्च रत्नतुलायां स्वर्णतुलाफल मेव
ताम्रेण - कुष्ठनाशः
घृतेन - तेजोवृद्धिः छर्दिनाश श्च
गुडेना - रोगित्वं सौभाग्यवृद्धि श्च
लवणेन - लावण्यं सौभाग्यं च
मधुना - सौभाग्यं कासश्वासजलोदरनाश श्च
तैलेन - प्रजावान् भवति
क्षीरेण - पित्तनाशः संतापनिवृत्ति श्च
दध्ना - भगंदरनाशः

शर्करया – सपत्नबाधानिवृत्तिः ।
अन्नेन – रोगित्वं
पिष्टेन – दद्रुनाशः
फलैः – संग्रहणीनाशः
क्रमुकै – गंडमालानाशः
मुखदुर्गंधिनाशनं दद्रुनाश श्च – क्रमुकं पूगीफलं
चंदनेन – सौंदर्यवान्
गंधेन – सौभाग्यं
वस्त्रेण – दिव्यवस्त्रावाप्तिः
काष्ठै – राज्ञमांद्यनाशः
विष्णुप्रीति र्वा सर्वद्रव्यै रपीति ।

इति नानारोगनिरासद्रव्यविशेषतुला:

---

## नाना प्रकारच्या रोगांचा नाश होण्याकरितां द्रव्यविशेषांचीं तुलादानें.

सर्व रोग, क्षय, अर्श, अपस्मार, कुष्ट वगैरे रोगांच्या नाशाकरितां लोह, कांस्य वगैरेंची तुळा करावी,

" गरुडपुराणांत " सांगितलीं तीं अशीं—मृत्युंजयापासून उत्पन्न होणारें तुला पुरुषाचे दानाचें फळ सांगतों ऐक—सर्व रोगांची शांति होण्याकरितां लोखंड द्यावें. क्षयरोगाच्या शांतिकरितां कांसें द्यावें. अर्शाचे विकारा (मूळव्याधी) वर कथील द्यावें. अपस्मारावर शिसें द्यावें. दारुण अशा कुष्टावर तांबें द्यावें. रक्तपित्तावर

पितळ, प्रदर व परम्यावर रुपें, व सर्व रोगांवर मृत्यूचा नाश करणारें सोनें द्यावें. दीर्घकाळ वाहणाऱ्या ग्रहणीवर फळांची तुळा करावी. भस्मक रोगावर गुळ, गंडमाळावर सुपाऱ्या, अग्निमांद्यावर लांकडें, दरादीवर पीठ द्यावें. खोकला, दमा व जळादर ह्यांवर मध द्यावा. ओकारीच्या रोगाची शांति होण्याकरितां घृत ( तूप ) द्यावें. पित्ताचा नाश होण्या करितां दूध, भगंदरावर दहिं, कंप वायूचा नाश होण्या करितां मीठ व दरादीचा नाश होण्या करितां पीठ द्यावें. ऋषींनीं सर्व रोगांचा नाश होण्याविषयीं धान्य द्यावें असें सांगितलें आहे.

" दानोद्योतांत "हा ह्या विषयीं संक्षेप आहे तो असा—

दानोद्योतांतील सुवर्णादिकांचीं संक्षेपानें फळें.

रुप्याच्या तुळेनें सोन्याच्या तुळेचेंच फळ मिळतें, पितरांची तृप्ति होते आणि प्रदर व प्रमेह यांचा नाश होतो. रत्नांच्या तुळेनें सोन्याच्या तुळेचें फळ मिळतें. तांब्यानें कुष्ठाचा ( कोडाचा ) नाश होतो. तुपानें तेजाची वृद्धि होते आणि उलटीचा नाश होतो. गुळानें निरोगीपणा व सौभाग्याची वृद्धि होते. मिठाचे योगानें लावण्य व सौभाग्य हीं मिळतात. मधानें सौभाग्य मिळतें आणि खोकला, दमा व जलोदर ह्यांचा नाश होतो. तेलानें संतति होते. दुधानें पित्ताचा नाश व संताप दूर होतो. दह्यानें भगंदराचा नाश होतो. साखरेनें शत्रु पीडा दूर होते. अन्नानें निरोगी होतो. पीठानें दरादीचा नाश होतो. फळांच्या योगानें संग्रहणीचा नाश होतो. सुपाऱ्यांनीं गंडमाळांचा नाश आणि

तोंडाचें दुर्गंधीचा नाश व दरादीचा नाश होतो. चंदनानें सौंदर्य प्राप्त होतें. गंधानें ( सुगंधि द्रव्यानें ) सौभाग्य प्राप्त होतें. वस्त्रानें दिव्य वस्त्रांची प्राप्ति होते. लांकडांनीं अग्निमांद्याचा नाश होतो. सर्व द्रव्यांच्या योगानें विष्णुची प्रीति होते.

ह्याप्रमाणें नानाप्रकारच्या रोगांची शांति होण्याकरितां
द्रव्य विशेषांच्या तुळा सांगितल्या.

---

अथ पूजार्थं तत्तद्रव्याधिदेवता माह

" गारुडे "

अधिदैवं तु लोहे वै महाभैरव उच्यते ।
कांस्ये त्रपुण्यश्विनौ च वायु श्च सीसके स्मृतः ।
ताम्रे सूर्य स्तथा प्रोक्तः पैत्तले च कुहू स्तथा ।
रौप्ये च पितरो ज्ञेयाः सौवर्णे सर्व देवताः ।
फले सोमो गुडे चाप स्तांबूले च विनायकः ।
गंधर्वाः कुसुमे चैव जांगले ग्नि स्तथा स्मृतः ।
जांगले काष्ठो मधौ यक्षः प्रयत्नेन घृते मृत्युंजय स्तथा।
क्षीरे तारागणाः सर्वे दाध्नि सर्पाः प्रकीर्तिताः ।
लवणे पार्वती देवी समुद्दिष्टाधिदेवता ।
पिष्टे प्रजापति र्देवो अन्ने सर्वा श्च देवताः ।
आर्तोयदास्या त्पात्रं वा प्राप्नुया त्पुण्यदेशतः ।
नित्यं मत्यंजयप्राप्तविधिना यत्प्रदीयते ।

तदेव सर्वशांत्यर्थं भवतीति न संशयः ।
तुलापुरुषदानेन मृत्युंजयति मानवः ।
आगमोक्तमृत्युंजयमंत्रेण पूजयित्वे त्यर्थः
नाममंत्रेण वा यथाधिकारं योज्यं

इति द्रव्याधिदेवताः

पूजे करितां त्या त्या द्रव्यांच्या अधिदेवता सांगतो.

द्रव्यांच्या मुख्य देवता

" गरुड पुराणांत " लोखंडाची भैरव अधिदेवता आहे. कांसे व कथील ह्यांची आश्विनी कुमार देवता आहे. शिशाची देवता वायु आहे. तांब्याची सूर्य, पितळेची कुहू, रुप्याची पितर, सोन्याच्या सर्व देवता, फळाची सोम, गुळाची आप ( उदक ), तांबुलाची विनायक, फुलाची गंधर्व, लांकडाची अग्नि, मद्याची यक्ष, तुपाची मृत्युंजय, दुधाची सर्व तारागण ( नक्षत्रांचा समुदाय ) दह्याची सर्प, मिठाची पार्वती देवता, पीठाची प्रजापति आणि अन्नाची सर्व देवता अधिदेवता होय. पुण्यकारक स्थळापासून आर्त किंवा पात्र ( योग्य ) प्राप्त होईल त्याला आगमांत सांगितल्याप्रमाणें मृत्युंजयाचे मंत्रानें अथवा नाम मंत्रानें जसा अधिकार असेल त्या प्रमाणें पूजन करून जें देण्यांत येतें तेंच सर्व उपद्रवांच्या शांति साठीं होतें ह्यांत संशय नाहीं. तुला पुरुषाचें दान दिल्यानें मनुष्य मृत्यूलाही जिंकतो.

ह्या प्रमाणें द्रव्यांच्या अधिदेवता सांगितल्या.

अथ कालविशेषः

" दानोद्योते " " विश्वामित्रः "

आदित्ये राहुणा ग्रस्ते सुवर्णै स्तोलये त्तनुं ।
सोमग्रहे तु रौप्येण यथा दानं तथा श्रृणु ।
प्रवर्ग्यस्य मुखे जात उत्पन्नः पितृदेहतः ।
सर्वपापहरं वै त द्दामि प्रीयतां विधुः ।
इत्युच्चार्य जलं त्वप्सु निक्षिप द्विजसत्तमेति ।

विशेष काळ

सूर्य ग्रहण व चंद्रग्रहण ह्यांवर सोनें व रुपें ह्यांची तुला करावी

" दानोद्योतांत " "विश्वामित्र"–हे द्विज श्रेष्ठा ! सूर्यास राहुनें ग्रासिलें असतां म्हणजे सूर्य ग्रहणाचे दिवशीं आपलें सोन्यानें शरीर तोळावें. चंद्रग्रहणाचे दिवशीं रुप्यानें शरीर तोळावें. आतां दान कसें करावें तें ऐका–"प्रवर्ग्यस्य मुखेजात उत्पन्नःपितृ देहतः । सर्वपापहरं वैतद्ददामि प्रीयतां विधुः " ह्या मंत्राचा उच्चार करून पाणी ( दानाचें उदक ) पाण्यांत टाकावें.

अथ तुलापुरुषदानविधिः

" हेमाद्रौ विष्णुधर्मोत्तरे "

तुलादानं प्रवक्ष्यामि सर्वपापप्रणाशनं ।
य द्दौर्या चारतं पूर्वं लक्ष्मीनारायणे न तु ।
पुण्यं दिन मथा साद्य तृतीयायां विशेषतः ।

गोमयेना नुलिप्तायां भूमौ कृत्वा धटं शुभं ।
दारवं शुभवृक्षस्य चतुर्हस्तप्रमाणतः ।
सुवर्णं तत्र बध्नीया त्स्वशक्त्या घटितं धटे ।
सौवर्णं स्थापयेतत्र वासुदेवं चतुर्भुजं ।
शिक्यद्वयं च बध्नीया त्स्थापये त्पीठके ततः ।
तत्रा रोहे त्सवस्त्रास्त्रः सर्वालंकारभूषितः ।
अभीष्टदेवतां गृह्य स्नापयित्वा घृतादिभिः ।
तुलापुरुषदानस्य विधि रेषः प्रकीर्तितः ।
अत्र विधिरेषःप्रकीर्तित इति

" दामोदरः " नान्य दिति ।

एतावत्सेव कर्तव्यतेत्युक्तं भवतीति ।

" तुलादान मधिकृत्य लिंगपुराणे "

दक्षिणां च शतं सार्धं तदर्धं वापि दापयेत् ।

' गुरो रिति विशेषः '

ऋत्विजां चैव सर्वेषां दश निष्कान् प्रदापये दिति ।
तथा यजमानः अयनग्रहणसंक्रमादिपूण्यकाल मासाद्य पूर्वेद्यु रेकभुक्ताचारित प्रायश्चित कृत नित्य क्रियो दर्भेष्वा सीनो दर्भा न्धारयमाणः शुचि राचम्य देशकालौ संकीर्त्य ममा मुककामनासिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं अमुकद्रव्यतुलापुरुषदानं करिष्ये इति संकल्प्य

---

१ पिटके असा हेमाद्रिंत पाठ आहे

तथा रोगनिरासार्थं तु

ममा मुकरोगानिरासेन ममास्य शिशो र्वा मुकरोगानि-
रासेन क्षिप्रारोग्यसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थ मिति
तथा यदा तु शिष्टाचारवशा

ताम्रादितुलासु अष्टमांशं चतुर्थांशं वा सूवर्णरजतादि प्रक्षिप्यते चे त्तदा सुवर्णादि तुलयाचतुर्थांशाष्टमाशादि तुलाविशेषफलप्राप्तिद्वारा इत्युल्लेखः कार्यः तदंगतया गणपतिपूजनं पुण्याहवाचन माचार्यवरण मंगदेवतापू-
जन महं करिष्ये इति संकल्प्य

गणपतिं संपूज्य पुण्याहं स्वति ऋद्धिः श्रीः कल्याण मिति शब्दपंचात्मकं बौधायनोक्तं ब्राम्हणां स्त्रिस्त्रि र्वाचयित्वा चार्यं वृत्वा चार्यं तुलायां गौरीविष्णादि-
तुलांगदेवता श्च पूजयित्वा रोगनिरासार्थे तु महामृत्युं-
जयमंत्रेण प्रतिमायां मृत्युंजयं ताम्रादितोलनीयद्रव्याधि
देवता श्च पूजये दिति

इति तुलापुरुषदान विधि र्विशेषतः

---

## तुलापुरुषाचे दानाचा विधि.

तुला पुरुषाचे दानाचा विधि

" हेमाद्रींत " " विष्णुधर्मोत्तरांत " सर्व पापांचा नाश करणारें असें तुला दान सांगतों जें पूर्वीं गौरीनें व लक्ष्मीनारायणानें केलेलें होतें. शुभ दिवशीं अथवा विशेषें करून तृतीयेचे दिवशीं

शेणानें लिंपलेल्या भूपवर चांगली तुळा ( दांडी ) करावी. ती चांगल्या वृक्षाची केलेली असून चार हात लांब असावी. तिच्यावर आपल्या शक्तिप्रमाणें सुवर्ण जडावें. त्या तुळेवर चार ज्याला भुज आहेत असा सोन्याचा वासुदेव ( विष्णु ) स्थापन करावा. त्या तुळेला दोन शिंकीं बांधावीं. नंतर त्या शिंक्यास दोन पिटकें ( परडीं ) लटकवावीं. नंतर ती तुळा पीठावर स्थापन करावी. नंतर अभीष्ट देवतेस गृह्य सूत्रोक्तविधीनें तुप वगैरेंनीं स्नान घालून सर्व प्रकारच्या अलंकारांनीं भूषित करून वस्त्रें व शस्त्रें धारण करून तुळेवर आरोहण करावें. तुला पुरुषाच्या दानाचा हा विधि सांगितला. तेथें "विधिरेषःप्रकीर्तितः" असें जें सांगितलें त्यावरून एवढीच कर्तव्यता असावी असें सांगितलें आहे असें " दामोदर " म्हणतो.

तुला दानास उद्देशून " लिंगपुराणांत " शंभर अथवा दीडशें अथवा पन्नास निष्क दक्षिणा गुरूस द्यावी. सर्व ऋत्विजांस दहा निष्क दक्षिणा द्यावी.

तसेंच यजमानानें अयन ( उत्तरायन व दक्षिणायन ) ग्रहण ( सूर्य व चंद्र ह्यांचें ग्रहण ) संक्रांति वगैरे पुण्यकारक दिवस पाहून त्याच्या पूर्वदिवशीं ( आदले दिवशीं ) एक वेळ भोजनाचा नियम करून देहाचे शुद्धि करितां प्रायश्चित्त करून नित्य स्नान संध्यादि कर्में करून दर्भावर बसून ( पवित्रकें ) धारण करून पवित्र होऊन आचमन करून देश व काल ह्यांचा उच्चार करून " मम अमुक कामना सिद्धि द्वारा श्रीपरमेश्वर

प्रीत्यर्थं अमुक द्रव्य तुला पुरुष दान महं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करावा. तसेंच रोगाचें निरसन होण्याकरितां तर " ममामुक रोग निरासेन " असें स्वतः विषयीं म्हणावें. मुलाविषयीं " ममास्य शिशोः अमुक रोग निरासेन क्षिप्रा रोग्यसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वर प्रित्यर्थं " असा संकल्प करावा. तसेंच जर शिष्टाचाराचे संबंधानें तांबें इत्यादिकांच्या तुळांत अष्टमांश किंवा चतुर्थांश सोनें रुपें इत्यादि टाकण्यांत आलें तर " सुवर्णादि तुलयाचतुर्थांशाष्टमांशादि तुलाविशेप फल प्राप्तिद्वारा " असा उल्लेख करावा " तदंगतया गणपति पूजनं पुण्याहवाचनमाचार्य वर्णनमंगदेवतापूजन महं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून गणपतीचें पूजन करून " पुण्याहं " " स्वस्ति " " ऋद्धिः " " श्रीः " व " कल्याणं " ह्या प्रमाणें बौधायनानें सांगितलेलें पंचवाक्यात्मक पुण्यहवाचन ब्राम्हणांकडून तीन तीनदां म्हणवून आचार्याचें वर्णन करून आचार्य व गौरी विष्णु इत्यादि तुळेच्या अंगदेवता ह्यांची पूजा करावी. रोगाचें निरसन होण्याकरितां तुळेचें दान द्यावयाचें असेल तर " महामृत्युंजयाचे " मंत्रानें प्रतिमेचे ठिकाणीं मृत्युंजय आणि तांबें इत्यादि तोलावयाच्या द्रव्याच्या अधि देवता ह्यांची पूजा करावी.

ह्याप्रमाणें विशेषेंकरून तुला पुरुषाच्या दानाचा
विधि सांगितला.

## अथ तुलादानप्रयोग:

यजमान: शुचि राचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य एकैकमन्वंतरकालावच्छिन्नप्रतिलोकपालस्थाननिवासपूर्वकार्कवर्णकिंकिणीजालमालिविमानकरणकाप्सर: पूजासहितशिवपुरगमनपूर्वककल्पकोटिशतावाच्छिन्नविष्णुपुराधिकरणकनिवासकाम:
सुवर्णरत्नरौप्यतुलापुरुषमहादानमहं करिष्ये

यद्वा

ब्रम्हहत्यादि सकलपापक्षयद्वारा श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थं सुवर्णरत्नरौप्यतुलापुरुषमहादानमहं करिष्ये
तत्रादौ गणपतिपूजनं पुण्याहवाचनं मातृकापूजनं नांदीश्राद्धाचार्यवरणादि कुर्यात्

ताम्रादितुलायां तु संकल्पोत्तरं गणपतिपूजनं पूर्वोक्तं पुण्याहवाचनमात्रं कृत्वाचार्यं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारकादिभि: पूजयेत्

तत आचार्यो गोमयोपलिप्तवेद्यादौ सर्षपविकिरणपंचगव्यप्रोक्षणे कृत्वा वेद्यां वारुणमंडलं विलिख्य उपरि कुंडमंडपे पंचवर्णवितानं फलपुष्पोपशोभितध्वजं बध्वा वेद्यादौ धट माबध्य तत्र दक्षिणोदक्शिक्यां तुलां बध्नीयात् गौरीप्रीत्यर्थं तुलायां कर्पूरकृतपंचपिंडिकारूपां गौरीं कुंकुमे नानुपूजयेत्

ततो धर्मराजसूर्यविष्णुप्रतिमा स्तिस्रो माषमात्रसुवर्ण-निर्मिता अग्न्युत्तारणादिपूर्वकं संपूज्य

इष्टदेवतां च पंचामृतेनाभिषिच्याभ्यर्च्य विष्णुप्र-तिमां तुलामध्ये बध्वा ततः पूर्वोक्ततोलनीयद्रव्याधि-देवतां संपूज्य तुलायै नम इति

तुलां च तुलाप्रांतकूटयो र्विष्णु मनंतं मध्यकूटे वा-सुकिं फलकद्वये भूमिं च संपूज्य

रक्तवस्त्रेण तुलां संवेष्ट्य ततः शक्तौ सत्यां तुलादंडे सुवर्णनिर्मितासु चतुर्विंशतिप्रतिमासु उदक्संस्था देवता आवाहयेत्पूजयेच्च तदित्थं ॐ ईशानाय नमः ईशानं आवाहयामि। एवं सर्वत्र

२ ॐ शशिने नमः शशिनं आवाहयामि
३ ॐ मारुताय नमः
४ ॐ रुद्राय नमः
५ ॐ सूर्याय नमः
६ ॐ विश्वकर्मणे नमः
७ ॐ गुरवे नमः
८ ॐ अंगिरोभ्यां नमः
९ ॐ प्रजापतये नमः
१० ॐ विश्वेभ्यो देवेभ्यो नमः
११ ॐ धात्रे नमः
१२ ॐ पर्जन्यशंभुभ्यां नमः
१३ ॐ पितृभ्यां नमः
१४ ॐ सौम्याय नमः
१५ ॐ धर्माय नमः
१६ ॐ अमरराजाय नमः
१७ ॐ अश्विभ्यां नमः
१८ ॐ जलेशयाय नमः
१९ ॐ मित्रावरुणाभ्यां नमः

२० ॐ मरुद्गणेभ्यो नमः २१ ॐ धनेशाय नमः
२२ ॐ गंधर्वाय नमः २३ ॐ जलेशाय नमः
२४ ॐ विष्णवे नमः विष्णुं. इत्यावाह्य संपूज्य

ततो यजमानो वस्त्राभरणगंधमाल्याद्यलंकृतः प्राङ्मुख उपविश्य प्रार्थयेत्

ॐ नमस्ते सर्वदेवानां शक्ति स्त्वं सत्य माश्रिता ।
साक्षिभूता जगद्धात्री निर्मिता विष्णुयोनिना ।
एकतः सर्वसत्यानि तथा नृतशतानि च ।
धर्माधर्मकृतां मध्ये स्थापितासि जगद्धिते ।
त्वं तुले सर्वभूतानां प्रमाण मिह कीर्तिता ।
मां तोलयंती संसारा दुद्धरस्व नमोऽस्तुते ।
यो ऽसौ तत्वाधिपो देवः पुरुषः पंचविंशकः ।
स एषो ऽधिष्ठितो देवि त्वयि तस्मा न्नमो नमः ।
नमो नमस्ते गोविंद तुलापुरुषसंज्ञक ।
त्वं हरे तारयस्वा स्मान स्मा त्संसारसागरा दिति ।

इति पठित्वा तुलोपरि पुष्पांजलिं क्षिपेत् पुन स्तुलां त्रिःप्रदक्षिणीकृत्य वामहस्ते धर्मराजं दक्षिणे सूर्य मंके स्वाभीष्ट देवतां पंचामृताभिषिक्तार्चितां चादाय प्राङ्मुख स्तुलाया मुत्तरफलक मारुहेत दक्षिणेन सुवर्णः स्या दुत्तरेण नराधिप इति

मात्स्यवचनात् नराधिप इत्यु पलक्षणं तत आचार्यो दक्षिणफलके तोलनीयद्रव्य मारोपयेत् समाद्याव

त्समधिकं स्यात् पुष्टिकामेन भूयिष्ठ मधिकं कार्यं ततो यजमान स्तुलामध्यदंडस्थितदृष्टि र्हरे र्मुखं पश्य न्मंत्रौ पठेत्

ॐ नमस्ते सर्वभूतानां साक्षिभूते सनातनी ।
पितामहेश देवि त्वं निर्मिता परमेष्टिना ।
त्वया धृतं जगत्सर्वं सहस्थावर जंगमं ।
सर्वभूतात्मभूतस्थे नमस्ते विश्वधारिणी इति ।

गोदोहकालं तत्र स्थित्वा तत स्तुलामवतीर्य तोलितद्रव्ये तुलसीपत्रं निधाय देशकालौ संकीर्त्या मुककाम इदं ममुकद्रव्य मात्मसमतोलित माचार्याद्यन्येभ्यो ब्राम्हणेभ्यः समस्ताश्रितबंधुवर्गेभ्यो दीनानाथेभ्य श्च दातु मह मुत्सृजे नममे त्युत्सृज्य ततः कृतस्या मुकतुलादानकर्मणः इत्यादि सांगतासिध्यर्थ माचार्याय इदं सुवर्णं अग्निदैवतं दक्षिणात्वेन तुभ्य महं संप्रददे न ममेति दद्यात् पुनः कृतस्या मुकतुलापुरुषदानकर्मणः इत्यादि सांगतासिध्यर्थं नानानामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो यथाशक्ति भूयसीं दक्षिणां दातु मह मुत्सृजे तथा कृतस्या मुकतुलापुरुषदानकर्मणः सांगतासिध्यर्थं यथाशक्ति ब्राम्हणान् यथाकालं यथोत्पन्नेना न्नेन भोजयिष्ये इति संकल्प्य तत आचार्य स्त्वावाहितदेवताः सर्वाः अर्चनपूर्वकं विसृज्या चार्याय तुलार्धं पादं वा प्रतिमावस्त्राभरणादि सर्वं तुभ्य महं संप्रददे न मम इति दत्वा सदस्याया

दावेतदर्धं दत्वा तुलाशेषं च सद्य एव यथोद्देशं दत्वा प्रमादा त्कुर्वतां कर्म यस्य स्मृत्येति जपित्वा कर्मेश्वरार्पणं कृत्वा सुहृद्युतो भुंजीते ति केचित्तु अत्र तुलापूजोत्तर मग्निं संस्थाप्य ईशान्यादितुलास्थदेवताभ्योऽ ष्टाष्टाज्याहुतय श्चेच्छंतीति

तुलाप्रतिग्रहप्रायश्चित्तं तु

आचार्य श्चांद्रायण मेकं कुर्यात् प्रतिग्रहानुसारेणे त्युक्तं "दानोद्योते रहस्येषु"

"हेमाद्रौ मात्स्ये"

न चिरं धारये द्गेहे सुवर्णं तोलितं बुधः।
तिष्ठे द्भयावहं यस्मा च्छोकव्याधिकरं नृणां।

शीघ्रं परस्वीकरणा च्छ्रेयः प्राप्नोति पुष्कल मिति सुवर्णादिसर्वद्रव्यतुला स्वेवं कैमुतिकन्यायात् अत्रत्यः सुवर्णशब्दो रजतादिसर्वद्रव्यतुलोपलक्षको बोध्यः।

मीमांसैकधुरंधरः श्रुतिधरो न्यायेपि वागीश्वरः
साहित्येऽमृतसागरः सुजनतावल्ली रसालद्रुमः।
यद्विद्वन्मणिशेखरो दिनकरः प्रासूत विश्वेश्वरं तेना
कारि घृतादितोलनविधौ सत्प्रीतये पद्धतिः

इति दानोद्योतदानरत्नमयूखाद्यनुसारेण
च कालोपनामकभट्टदिवाकरकृतदान
संक्षेपचंद्रिकायां ताम्रघृतादितुला-
पुरुषदानप्रयोगः

## तुळेच्या दानाचा प्रयोग.

तुळादानाचा प्रयोग.

स्नान वगैरे करून पवित्र होऊन यजमानानें आचमन करून प्राणायाम करून देश व काल ह्यांचा उच्चार करून "एकैक मन्वंतर कालावच्छिन्नप्रति लोकपालस्थाननिवास पूर्वकार्कवर्ण किंकिणीजालमालिविमानकरण काप्सरःपूजासहित शिवपुरगमन पूर्वककल्पकोटिशतावच्छिन्नविष्णुपुराधिकरणकनिवासकामःसुवर्णरत्नरौप्यतुलापुरुषमहादानमहंकरिष्ये" असा संकल्प करावा. किंवा "ब्रम्हहत्यादि सकल पापक्षयद्वारा श्रीपरमेश्वर प्रित्यर्थं सुवर्ण रत्न रौप्य तुळा पुरुष महादान महं करिष्ये" असा संकल्प करावा. त्याचे पूर्वीं गणपतीचें पूजन, पुण्याहवाचन, मातृकांचें पूजन आणि नांदीश्राद्ध आचार्याचें वरण वगैरे करावें. तांबें इत्यादिकांच्या तुळे विषयीं तर संकल्पानंतर गणपतीचें पूजन व पूर्वी सांगितलेलें ( पंचवाक्यात्मक ) पुण्याहवाचन मात्र करून आचार्यवर्णन करून त्याचें आपल्या सामर्थ्या प्रमाणें वस्त्रें अलंकार वगैरेंनीं पूजन करावें.

नंतर आचार्यानें शेणानें लिंपलेल्या स्थंडिलादिकावर सर्षपविकरण व पंचगव्याचें प्रोक्षण हीं करून वेदीवर ( कुंडाचे

---

१ शिरस टाकणें

२ "विष्णुधर्मोत्तरे" गायत्र्या दाय गोमूत्रं गंधद्वारेति गोमयं आप्या यस्वेति च क्षीरं दधिक्रा व्णोति वै दधि । तेजोसि शुक्र मित्साज्यं देवस्य त्वा कुशोदकं । एभि स्तु पंचभि र्युक्तं पंचगव्यमिति स्मृतं ॥

पुढें असलेली ) वर वारुण[3] मंडळ लिहून वर कुंडमंडपावर पांच वर्णांचें वितान ( छत ) फळें व फुलें ह्यांनीं शोभणारे ज्याचे ध्वज आहेत असे बांधून नंतर वेदी वगैरेवर आडवें लाकूड बांधून त्याला दक्षिणेकडे व उत्तरेकडे जिला दोन शिंकीं आहेत अशी तुळा बांधावी. पार्वतीच्या उद्देशानें तुळा करावयाची असतां कापुराचे पांच पिंडांची पार्वती करून केशरानें तिची पूजा करावी, नंतर धर्मराज, सूर्य व विष्णु ह्यांच्या तीन प्रतिमा एक माशा एवढ्या वजनाच्या सोन्याच्या करून त्यांचें पूर्वी अग्न्युत्तारण वगैरे करून पूजा करावी. आणि आपले इष्ट देवतेस पंचामृताचा अभिषेक करून पूजा करावी नंतर तुळेच्या ( दांडीच्या ) मध्यभागीं विष्णु प्रतिमा बांधून नंतर पूर्वी सांगितलेल्या तोलावयाच्या द्रव्याच्या अधिदेवतेची पूजा करून तुलायैनमः " ह्यामंत्रानें तुळेची आणि तुळेच्या शेवटल्या कूटांचे (कड्याचे) ठिकाणीं विष्णु व अनंत ह्यांची आणि मधल्या कूटावर वासुकिची, दोन्ही फलकांची ( परड्यांची ) व भूमीची पूजा करून तांबड्यावस्त्रानें तुळेस वेष्टन करावें. नंतर शक्ति असल्यास तुळेच्या दांड्यावर सोन्याच्या तयार केलेल्या चोवीस

" विष्णुधर्मोत्तरांत[2] " गायत्री मंत्रानें गाईचें मूत, " गंधद्वारा " ह्या मंत्रानें गाईचें शेण, " आप्यायस्व " ह्या मंत्रानें गाईचें दूध, " दधिकाव्णो " ह्या मंत्रानें गाईचें दहि, " शुक्रमसि " ह्या मंत्रानें तूप ह्या पांच द्रव्यानें जें युक्त तें पंचगव्य होय, त्यांत " देवस्यत्वा " ह्या मंत्रानें कुशोदक घालावें म्हणजे पंचगव्य झालें

३ परिशिष्ट पहा

प्रतिमांचे ठिकाणीं उत्तर क्रमानें देवतांचें आवाहन व पूजन करावें तें असें "ॐईशानायनमः ईशानं अवाहयामि" ह्या प्रमाणें आवाहन सर्व ठिकाणीं करावें. नंतर ॐशशिनेनमः शशिनं आवाहयामि २ ॐमारुताय नमः ३ ॐरुद्रायनः ४ ॐसूर्यायनमः ५ ॐ विश्वकर्मणेनमः ६ ॐ गुरवेनमः ७ ॐ अंगरोग्निभ्यांनमः ८ ॐ प्रजापतयेनमः ९ ॐ विश्वेभ्यो देवेभ्योनमः १० ॐ धात्रेनमः ११ ॐ पर्जन्यशंभुभ्यांनमः १२ ॐ पितृभ्यांनमः १३ ॐ सौम्यायनमः १४ ॐ धर्मायनमः १५ ॐ अमरराजायनमः १६ ॐ आश्विभ्यांनमः २७ ॐ जलेशयायनमः १८ ॐ मित्रावरुणाभ्यांनमः १९ ॐ मरुद्गणेभ्योनमः २० ॐ धनेशायनमः २१ ॐ गंधर्वायनमः २२ ॐ जलेशायनमः २३ ॐ विष्णवेनमः विष्णुं आवाहयामि २४" ह्याप्रमाणें सर्वांचें आवाहन करून त्यांची पूजा करावी. नंतर यजमानानें वस्त्रें, अलंकार, गंध, फुलांच्या माळा वगैरे धारण करून हातांत फुलें घेऊन तुळेला तीन प्रदक्षिणा करून पूर्वे कडे तोंड करून बसून प्रार्थना करावी—ॐ नमस्ते सर्व देवानां शक्ति स्त्वं सत्य माश्रिता । साक्षिभूता जगद्धात्री निर्मिता विष्णुयोनिना । एकतःसर्वसत्यानि तथानृतशतानि च । धर्माधर्मकृतां मध्ये स्थापितासि जगद्धिते । त्वं तुले सर्वभूतानां प्रमाण मिह कीर्तिता । मां तोलयंती संसारा दुद्धरस्व नमोस्तुते । योऽ सौतत्वाधिपोदेवः पुरुषः पंचविंशकः । स एवोऽधिष्ठितो देवि त्वयि तस्मान्नमोनमः । नमोनमस्तेगोविंद तुलापुरुषसंज्ञक । त्वं हरेतारयस्वास्मानस्मा त्संसारसागरात्" ह्या प्रमाणें प्रार्थना करून तुळेवर हातांतली फुले टाकावीं आणि

तुळेस पुन्हा तीन प्रदक्षिणा करून डाव्या हातांत धर्मराज उजव्या हातांत सूर्य आणि अंकावर पंचामृतानें अभिषेक केलेली व पूजा केलेली अशी आपली इष्ट देवता घेऊन पूर्वें कडे तोंड करून तुळेच्या उत्तरे कडील फलकावर ( परड्यावर ) आरोहण करावें. कारण, दक्षिणेन सुवर्णंस्यादुत्तरेण नराधिप " असे " मत्स्यपुराणांत " वचन आहे, ह्या वाक्यांत ' नराधिप ' हें उपलक्षण समजावें. नंतर आचार्यानें दक्षिणेकडल्या फलकांत ( परड्यांत ) तोलावयाचें द्रव्य टाकावें तें इतकें टाकावें कीं शरीराची पुष्टि होण्याकरितां जमिनीवर असलेलें यजमानाचें फलक द्रव्य असलेल्या फलकापेक्षां किंचित् वर जाईल.

नंतर यजमानानें तुळेच्या मधल्या दांड्या कडे दृष्टि लावून विष्णूचें मुख अवलोकन करीत असतां हे पुढील दोन मंत्र म्हणावे—" ॐ नमस्ते सर्वभूतानां साक्षिभूते सनातनि । पितामहेन देवित्वं निर्मिता परमेष्ठिना । त्वया धृतं जगत्सर्वं सहस्थावरजंगमं । सर्वभूतात्मभूतस्थे नमस्ते विश्वधारिणि " ह्या प्रमाणें हे मंत्र म्हणून गाईचें दूध काढण्यास जितका काळ लागेल तितका काळ पावेतों त्यांत बसून नंतर तुळेपासून खालीं उतरून तोललेल्या द्रव्यावर तुळसीपत्र ठेऊन देश काळ ह्यांचा उच्चार करून " अमुककाम इदममुकद्रव्यमात्म समतोलितमाचार्याद्यन्येभ्यो ब्राम्हणेभ्यःसमस्ताश्रितबधुवर्गेभ्यो दीनानाथेभ्य श्च दातुमहमुत्सृजे न मम " ह्या प्रमाणें द्रव्याचा उत्सर्ग करून नंतर " कृतस्यामुक तुलापुरुषदानकर्मेत्यादि सांगतासिध्यर्थं आचार्याय इदं सुवर्ण अग्निदैवतं दक्षिणात्वेन तुभ्यमहं संप्रददेनमम " असा सं-

कल्प करून आचार्यास सुवर्ण दक्षिणा द्यावी. नंतर आणखी पुन्हा " कृतस्यामुकतुलापुरुषदानकर्मेत्यादि सांगतासिध्यर्थं नाना नामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो यथाशक्ति भूयसीं दक्षिणांदातु महमुत्सृजे--तथा ( तसेंच ) कृतस्यामुकतुलापुरुषदानकर्मणः सांगतासिध्यर्थं यथाशक्ति ब्राम्हणान् यथाकालं यथोत्पन्नेनान्नेन भोजयिष्ये" ह्या प्रमाणें संकल्प करून नंतर आचार्यानें आवाहन केलेल्या सर्व देवतांचें पूर्वी पूजन करून त्यांचें विसर्जन करावें. नंतर यजमानानें आचार्यास " तुलार्धपादं वा प्रतिमावस्त्राभरणादि सर्वंतुभ्यमहं संप्रददे नमम " ह्या प्रमाणें देऊन सदस्यास अगोदर ह्याचें निम्में देऊन बाकी राहिलेलें तुळेचें द्रव्य तत्कालींच जसा हेतु असेल त्याप्रमाणें वाटून " प्रमादात्कुर्वतां कर्म० यस्यस्मृत्या. " हे दोन श्लोक म्हणून कर्म ईश्वरास अर्पण करून इष्टमंडळीसह भोजन करावें. कित्येक तर येथें तुळेची पूजा केल्या नंतर अग्नीची स्थापना करून ईशान इत्यादि तुळेवर असलेल्या देवतांस आठ आठ तुपाच्या आहुति द्याव्या असें म्हणतात.

तुळेचे प्रतिग्रहाचें प्रायश्चित व तुळेच्या द्रव्याचा काळ

तुळेच्या प्रतिग्रहाचें प्रायश्चित्त–आचार्यानें एक चांद्रायण करावें, परंतु तें जसा प्रतिग्रह असेल त्या मानानें करावें असें " दानोद्योतांत " रहस्यांत सांगितलें आहे. " हेमाद्रिंत " " मत्स्यपुराणांतील " ज्ञात्यानें तोलछेलें सोनें फार दिवस पावेतों घरांत ठेवूं नये, कारण तें ठेवलें असतां मनुष्यांस भयकारक आणि शोक व व्याधि करणारें होतें, म्हणून तें लवकरच दुसऱ्यांस वाटलें असतां त्या पासून पुष्कळ कल्याण

होतें. कैमुतिकन्यायानें ह्या प्रमाणें सोनें इत्यादि सर्व द्रव्यांच्या तुळा विषयीं समजावें. ह्या मत्स्यपुराणाचे वचनांतील सुवर्ण शब्द हा रूपें इत्यादि सर्व द्रव्यांच्या तुळांचा उपलक्षक समजावा.

तुळा दानाचा उपसंहार.

मीमांसकांत एक धुरंधर, वेद शिकलेला, न्यायांत बृहस्पति सारखा, साहित्य शास्त्रांत अमृताचे सागरा प्रमाणें, सुजनतेची वल्ली ( वेल, ) रसाळतेचा वृक्ष, विद्वानांमध्यें मुगुटमणी असा दिनकर नांवाचा विश्वेश्वरापासून उत्पन्न झाला. त्यानें सत्पुरूषांच्या ( विद्वानांच्या ) प्रीती करितां तूप इत्यादिकांच्या तुळांच्या विधिविषयीं पद्धति केली.

ह्या प्रमाणें दानोद्योत, दान रत्न, मयूख वगैरे ग्रंथांच्या
आधारावरून काळे ह्या नांवाचा भट्ट दिनकर ह्यानें
केलेल्या " दान संक्षेप चंद्रिकेंत " तांबे तूप
वगैरेंच्या तुळा पुरुषाच्या दानाचा
प्रयोग सांगितला.

---

## अथ गोसहस्रमहानप्रयोगः

" हेमाद्रौ मात्स्ये "

गोसहस्रदानं चिकीर्षु रधिवासनदिना त्प्राक् त्रिरात्र मेकरात्रं वा शक्तितः पयोव्रतोऽ धिवासनदिने शुचि र्यजमानो देशकालौ संकीर्त्य

मम समस्त पापक्षयोत्तर सिद्धचारणसेवितार्क वर्ण-
किंकिणीजालमालि विमानारोहणोत्तरानेक मन्वंतराव-
च्छिन्नेंद्रादि सकललोकपाल लोकाधिकरणक पुत्रपौत्र-
समन्वित शिवालयगमनैकोत्तरसंख्यासंख्येय पितृमाता-
महकुलतारणाकल्पशतावच्छिन्न शिवपुरनिवासानंतर
राजराजीभवनाश्वमेध शतकर्तृत्वाशिवध्यानपरत्व वि-
ष्णुसादृश्यापन्न योगस्थानकसंसारमोचनकामः श्वो
गोसहस्रमहादानं प्रतिपादयिष्ये इति संकल्पयेत् तत
उपवासगुर्वादिनियोगांतं तुलापुरुषमहादानव त्कुर्यात्

अथाचार्य एकं लक्षण्यं नंदिकेश्वरं वृषं सवत्सदशो-
त्तरगोसहस्रा त्सवत्सं धेनुदशकं च स्वर्णघंटास्वर्णपट्ट-
कौशेयवस्त्रमाल्यहेमरत्नयुतश्रृंगरौप्यखुरचामरोपशोभि-
तं सताम्रदोहनं पादुकोपानच्छत्राद्यनेकोपस्करयुतं
वेदीपरितः स्थापयेत् मंडपा ब्दहि स्तु यथावकाशं
गोसहस्रं वस्त्रमाल्यस्वर्णश्रृंगरौप्यखुराद्ये रलंकृत्या
धिवासयेत् अथा सादित दशकमध्ये चक्रोपरि स्थापि-
तलवणद्रोणोपरि पूर्वोक्तलक्षणं कौशेयसंवीतं नाना-
भरणभूपितं माल्येक्षुफलसंयुतं नंदिकेश्वरं स्थापयेत्
वेद्युपरि फलपुष्पादिशोभितं कूटे बध्नीयात् ततः आचा-
र्यादयः स्वस्वकुंडससंन्निधौ सर्वौपध्यादियुतकलशचतुष्ट-
यस्थापनादि यजमानाभिषेकांतं तुलामहापुरुषदानव
त्कुर्युः

ततः शुक्लमाल्यांबरधरः सकुसुमांजलिनासवृषगोदशक मामंत्रयेत्

तत्र मंत्राः

नमो वो विश्वमूर्तिभ्यो विश्वमातृभ्य एव च ।
लोकाधिवासिनीभ्य श्च रोहिणीभ्यो नमो नमः ।
गवा मंगेषु तिष्ठंति भुवनान्येकविंशतिः ।
ब्रम्हादय स्तथा देवा रोहिण्यः पांतु मातरः ।
गावो मे अग्रतः संतु गावो मे संतु पृष्ठतः ।
गावो मे हृदये संतु गवां मध्ये वसाम्यहं ।
यस्मा त्त्वं वृषरूपेण धर्म एव सनातनः ।
अष्टमूर्ते रधिष्ठान मतः पाहि सदा ममेति ।

पुष्पांजलिना संपूज्य वेदीपश्चिमे प्राङ्मुख उपविश्य पूर्वव द्देशकालौ स्मृत्वा मम समस्तपापक्षयादिसंसारमोचनकाम इत्यंतं इमं वृषं इमाः सवत्सधेनुदशकसहिताः सहस्रं गाः सांगोपागाः अमुकामुकगोत्रामुकामुकवेदाध्यापकामुकामुकशर्मभ्यो गुरूऋत्विभ्य श्च संप्रददे न ममेति गुर्वादिहस्तेषु जलं दद्यात् ते च देवस्य त्वेति यजुषा रुद्राय गामित्युक्त्वा पुच्छेषु प्रतिगृह्य स्वस्ती त्युक्त्वा यथाशास्त्रकामस्तुतिं कइदं कस्मा अदादिति पठेयुः ततो यजमानः कृतस्य गोसहस्रमहादानकर्मणः सांगतासिध्यर्थं ग्रामं भूमिं वा दत्वा सूवर्णं दक्षिणात्वेन तुभ्य महं संप्रददे न ममेति प्रत्येकं तेभ्यो

दक्षिणां दद्यात् ततः कृतस्य गोसहस्रमहादान इत्यादि सांगतासिध्यर्थं नानानामगोत्रेभ्यो ब्राह्मणेभ्यो यथाशक्तिभूयसीं दक्षिणां दातु मह मुत्सृजे न मेमति तथा पुनः कृतस्य इ० सांगतासिध्यर्थं यथाशक्ति ब्राह्मणान्यथाकालं यथोपपन्नेनान्नेन भोजयिष्ये इति संकल्पयेत् ततः आचार्यः पुण्याहवाचनाद्यावाहित देवताः संपूज्य उत्तिष्ठब्रह्मणस्पत इति देवा न्विसृज्य तद्दिने पयोव्रत मशक्तौ यजमानो नक्ताशी ब्रह्मचारी भवेत् ततः प्रमादा त्कुर्वतां कर्म० यस्य स्मृत्या कर्मे श्वरार्पणं कुर्या दिति

इति दानसंक्षेपचंद्रिकायां गोसहस्र
महादानप्रयोगः

## हजार गाईंच्या महादानाचा प्रयोग.

हजार गाईच्या दानाचा प्रयोग.

"हेमाद्रिंत मत्स्यपुराणांतील"–हजार गाईंचें दान करण्याची इच्छा करणारानें अधिवासन दिवसाच्या पूर्वी तीनरात्रीं अथवा एकरात्रीं आपलें शक्तिप्रमाणें पयोव्रत करून अधिवासनाचे दिवशीं पवित्र होऊन यजमानानें देश व काल ह्यांचें कीर्तन करून " मम समस्त पापक्षयोत्तर सिद्धचारण सेवितार्कवर्ण किंकिणीजाल मालिविमानारोहणोत्तरानेक मन्वंतरावच्छिन्नेंद्रादि सकललोकपाल लोकाधिकरणक पुत्रपौत्र समन्वित शिवालयगमनैकोत्तरसंख्यासंख्येयपितृमातामह कुलतारणा-

कल्पशतावच्छिन्नशिवपुरनिवासानंतरराजराजीभवनाश्वमेधशतकर्तृत्वशिवध्यानपरत्व विष्णु सादृश्यापन्नयोगस्थानकसंसारमोचनकामः श्वोगोसहस्रमहादानं प्रतिपादयिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करावा. नंतर उपवास आणि आचार्य वगैरे नियोगा पावेतोंचें तुळापुरुषाच्या महादाना प्रमाणें करावें.

नंतर आचार्यानें एक लक्षणानें युक्त नंदिकेश्वर वृषभ ( आंडीलबैल ) आणि वासरां सहवर्तमान एक हजार दहा गाईंतून सोन्याच्या घंटा, सोन्याचा पट्टा, रेशमाचें वस्त्र, फुलांची माळा, ह्यांनीं शोभणाऱ्या आणि सोनें रत्नें ह्यांनीं युक्त अशीं शिंगें, रुप्यांचे खुर आणि चामर ( कळगी ) ह्यांनीं शोभणाऱ्या अशा दहा गायीं ह्यांस तांब्याचें दोहन, पादुका उपानत् ( जोडे ) छत्र इत्यादि अनेक साहित्यांनीं युक्त अशांस वेदीच्या चारी बाजूला स्थापन करावें. मंडपाच्या बाहेर तर जशी जागा असेल त्याप्रमाणें हजार गाई वस्त्रें, माळा, सोन्याचीं शिंगें, रुप्याचे खुर इत्यादिकांनीं भूषित करून बांधून ठेवाव्या. नंतर पूर्वी सांगितलेल्या दहा गाईंमध्यें चक्रावर ठेवलेल्या द्रोणपरिमित मीठावर पूर्वीं ज्याचीं लक्षणें सांगितलीं आहेत, रेशमी वस्त्रानें वेढलेला, नानाप्रकारच्या अलंकारांनीं शोभणारा, माळा, ऊंसवफळें ह्यांनीं युक्त अशा नंदिकेश्वराची स्थापना करावी. वेदीच्यावर फळें फुलें वगैरेंनीं शोभणारें छत बांधावें. नंतर आचार्य

१-२ " मयूखे " वृषश्चपुष्टः सुरूपोनिरुक् ग्राह्यः " बैल लठ्ठ देखणा आणि अत्यंत तेजस्वी असा घ्यावा. असें मयूखांत आहे.

वगैरेंनीं आपआपल्या कुंडाजवळ सर्व औषधी वगैरेंनीं युक्त अशा चार कलशांचे स्थापना पासून यजमानास अभिषेक करीपावेतोंचें कर्म तुळामहापुरुषाच्या दाना प्रमाणें करावें.

नंतर पांढऱ्या फुलांची माळा व पांढरें वस्त्र हीं धारण केलेल्या यजमानानें हातांत फुलें घेऊन वृषभासह दहा गाईंस आमंत्रण करावें त्याविषयीं मंत्र—

" नमोवो विश्वमूर्तिभ्यो विश्वमातृभ्य एव च ।
। लोकाधिवासिनीभ्यश्च रोहिणीभ्योनमोनमः ।
। गवामंगेषुतिष्ठंति भुवनान्येकविंशतिः ।
। ब्रम्हादयस्तथादेवा रोहिण्यःपांतुमातरः ।
। गावोमेअग्रतःसंतु गावोमेसंतुपृष्ठतः ।
। गावोमेहृदयेसंतु गवांमध्येवसाम्यहं ।
। यस्मात्त्वंवृषरूपेण धर्मएवसनातनः ।
। अष्टमूर्तेरधिष्ठानमतः पाहिसदामम "

ह्या प्रमाणें मंत्र म्हणून हातांत घेतलेल्या फुलांनीं पूजा करून वेदीच्या पश्चिमेकडे पूर्वेकडे तोंड करून बसून पूर्वीप्रमाणें देशकालांचें उच्चारण करून " मम समस्त पापक्षयादि संसारमोचनकामे " ह्याच्या पुढें " इमंवृषं इमा सवत्सधेनुदशकसहिताः सहस्त्रंगाः सांगोपांगाः अमुकामुक गोत्रामुकामुक वेदाध्यापकामुकामुक शर्मभ्यो गुर्वृत्विगादिभ्यश्च संप्रददेन मम " असें म्हणून आचार्य वगैरेंच्या हातांवर उदक घालावें. आणि त्यांनींही " देवस्यत्वा " यजुषा " रुद्रायगा " हे मंत्र म्हणून गाईंच्या

शेंपट्या धरून " स्वस्ति " म्हणून जशी शाखा असेल त्या प्र-
माणें काम स्तुति " कइदंकस्मा अदात् ह्या प्रमाणें कामानिक
स्तुति म्हणावी.

नंतर यजमानानें " कृतस्य गोसहस्रमहादानकर्मणःसांगता
सिध्यर्थं ग्रामं भूर्मिवादत्वा सुवर्णं दक्षिणात्वेन तुभ्य महंसंप्रददे न
मम " ह्या प्रमाणें प्रत्येकीं संकल्प करून त्यांस दक्षिणा द्यावी.
नंतर " कृतस्य गोसहस्र महादान कर्मणः सांगता सिध्यर्थं न
नानाम गोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो यथाशक्ति भूयसीं दक्षिणां दातु-
महमुत्सृजे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून नंतर पुन्हा
" कृतस्य गोसहस्र महादान कर्मणःसांगता सिध्यर्थं यथाशक्ति
ब्राम्हणान् यथा काळं यथोपपन्नेनान्नेन भोजयिष्ये " ह्याप्रमाणें
संकल्प करावा. नंतर आचार्यानें पुण्याहवाचन वगैरेंत
आवाहन केलेल्या देवतांचें पूजन करून "उत्तिष्ट ब्रम्हणस्पते"
ह्या मंत्रानें देवतांचें विसर्जन करावें. त्या दिवशीं यजमान पयो-
व्रत करण्याविषयीं अशक्त असतां त्यानें रात्रीं भोजन करून
ब्रम्हचर्यानें रहावें. नंतर प्रमादात्कुर्वतांकर्म, यस्यस्मृत्या, हे दोन
मंत्र म्हणून कर्म ईश्वरास अर्पण करावें.

ह्या प्रमाणें दानसंक्षेप चंद्रिकेंत हजार गाईंच्या
महादानाचा प्रयोग सांगितला.

## सवृषगोशतदान प्रयोगः

" भविष्य पुराणे "

शतं गावः सवृषभा धेनूपस्करसंयुताः ।
दत्वा तु ब्राह्मणेभ्य स्तु विशुद्धेनां तरात्मना ।
शिवादिसर्वलोकेषु यथेष्टं मोदते तु सः ।

पुण्यकाले शुचि राचम्य देशकालौ संकीर्त्य मम समस्त पापक्षयपूर्वक सिद्धचारण सेवितार्कवर्ण किंकिणी जाल-मालि विमानारोहणोत्तरानेक मन्वंतरावछिन्नेंद्रादि सकललोकपालाधिकरणक पुत्रपौत्र समन्वित शिवपुरादि-सर्वलोकनिवासानंतर मंते विष्णुसायुज्यावाप्तिकामो वृषाधिकसालंकृतगोशतदानं करिष्ये इति संकल्प्य गणपतिपूजनं संक्षिप्तपुण्याहवाचनमात्रं कृत्वा गोभ्यो नम इति सवृषभा गाः संपूज्य ब्राम्हणेभ्यो नम इति ब्राम्हणां श्च यथाशक्ति वस्त्रालंकारादिभिः संपूज्य प्रार्थयेत् तत्र मन्त्राः

" गावः सुरभयो नित्यं गावो गुग्गुलुगंधिकाः ।
गावः प्रतिष्ठा भूतानां गावः स्वस्त्ययनं महत् ।
अन्न मेव परं गावो देवानां हवि रुत्तमं ।
पावनं सर्वभूतानां रक्षंति च वहंति च ।
हविषा मंत्रपूतेन तर्पयंत्य मरानपि ।
महर्षीणां च होतृणां गावो होमे प्रतिष्ठिताः ।
सर्वेषा मेव भूतानां गावः शरण मुत्तमं ।
गावः पवित्रं परमं गावो मंगल मुत्तमं ।

गावः सर्वस्य लोकस्य गावो धन्याः सवाहनाः ।
नमो गोभ्यः श्रीमतीभ्यः सौरभेयभ्यि एव च ।
नमो ब्रम्हसुताभ्य श्च पवित्राभ्यो नमोनमः ।
घृतक्षीरप्रदा गावो घृतयोन्यो घृतोद्भवाः ।
घृतनद्यो घृतावर्ता स्ता मे संतु सदा गृहे ।
इति गाः संप्रार्थ्य वृषभं प्रार्थयेत्
" धर्म स्त्वं वृषरूपेण जगदानंदकारक ।
अष्टमूर्ते रधिष्टान मतः पाहि सनातने ति वृषभं प्रार्थयेत्

ततः सलिलतिलकुशानादाय अद्येत्यादि मम समस्तपापक्षयेत्यादिविष्णुसायुज्यावाप्तिकामो वृषाधिकशतं गाः धेनूपस्कराः सहिरण्यदक्षिणायुताः रुद्रदेवता स्तन्मूल्योपकल्पितनिष्क्रयरजतमुद्रा वा नानानामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो दातु मह मुत्सृजे न ममेति तेन भगवान् परमात्मा श्रीपरमेश्वरः प्रीयतां त त्सद्ब्रम्हार्पण मस्तु कृतस्य सवृषगोशतदानकर्मणः सांगतासिध्यर्थं ब्राम्हणभोजनं भूयसीं दक्षिणां च दद्यात् अथवा अद्येत्यादि. सवृषरुद्रदैवतसहिरण्यदक्षिणां यथाशक्त्यलंकृतगोशतमूल्योपकल्पितनिष्क्रयरजतमुद्राः नानानामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो दातु मह मुत्सृजे न ममेति ततो ब्राम्हणभोजनं संकल्प्य भूयसीं च दद्यात्

इति सवृषगोशतदानप्रयोगः

## वृषभा सह शंभर गाईंच्या दानाचा प्रयोग.

वृषभासह शंभर गाईंच्या दानाचा प्रयोग.

" भविष्यपुराणांत " जो गाईच्या उपस्करांनीं युक्त अशा वृषभासह शंभर गाई शुद्ध अंत:करणानें ब्राम्हणास देईल तो शंकर इत्यादिकांच्या सर्व लोकांत यथास्थित आनंदाचा उपभोग करील.

दानाचा प्रयोग:—पुण्यकारक अशा दिवशीं शुद्ध होऊन आचमन करून देश व काल ह्यांचा उच्चार करून " मम समस्त पापक्षयपूर्वक सिद्धचारण सेवितार्कवर्णकिंकिणीजालमालि विमानारोहणोत्तरानेक मन्वंतरावच्छिन्नेंद्रादिसकल लोकपालाधिकरणक पुत्रपौत्र समन्वित शिवपुरादिसर्व लोकनिवासानंतरमंते विष्णुसायुज्यावाप्तिकामो वृषाधिक सालंकृत गोशतदानं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून गणपतीचें पूजन व केवळ संक्षिप्त पुण्याहवाचन ( पंचवाक्यात्मक पृ. पहा ) करून " गोभ्यो नमः " ह्या मंत्रानें वृषभासह गायींचें पूजन करून आणि " ब्राम्हणेभ्योनमः " ह्या मंत्रानें ब्राम्हणांची, शक्ती प्रमाणें वस्त्रें, अलंकार वगैरे ह्यांनीं पूजा करून गाईंची प्रार्थना करावी. ते मंत्र असे—

" गावः सुरभयो नित्यं गावो गुग्गुलगंधिकाः ।
। गावः प्रतिष्ठा भूतानां गावः स्वस्त्ययनं महत् ।
। अन्नमेव परंगावो देवानां हविरुत्तमं ।
। पावनं सर्वभूतानां रक्षंति च वहंतिच ।
। हविषा मंत्रपूतेन तर्पयंत्यमरानपि ।

। महर्षीणांच होतृणां गावो होमे प्रतिष्ठिता:
। सर्वेषामेव भूतानां गाव: शरण मुत्तमं ।
। गाव: पवित्रं परमं गावो मंगलमुत्तमं ।
। गाव: सर्वस्य लोकस्य गावो धन्या: सवाहना: ।
। नमो गोभ्य: श्रीमतीभ्य: सौरभेयीभ्य एवच ।
। नमो ब्रम्हसुताभ्यश्च पवित्राभ्यो नमो नम: ।
। घृतक्षीरप्रदागावो घृतयोन्यो घृतोद्भवा: ।
। घृतनद्यो घृतावर्ता स्तामे संतु सद गृहे "

ह्याप्रमाणें गाईंची प्रार्थना करून नंतर वृषमाची प्रार्थना करावी त्या विषयीं मंत्र--धर्म स्त्वं वृषरूपेण जगदानंद कारक । अष्टमूर्ते रधिष्ठानमत: पाहि सनातन " ह्या प्रमाणें वृषमाची प्रार्थना करावी.

नंतर यजमानानें पाणी, तीळ व दर्भ घेऊन " अद्येत्यादि मम समस्त पापक्षय पूर्वक सिद्धचारण सेवितार्क वर्ण किंकिणी जालमालि विमानारोहणोत्तरानेक मन्वंतरावच्छिनेंद्रादि सकळ लोकपालाधिकरणक पुत्रपौत्र समन्वित शिवपुरादिसर्वलोकानिवासानंतरमंते विष्णुसायुज्यावाप्तिकामो वृषाधिकशतं गा:धेनूपस्करा:सहिरण्यदक्षिणायुता: रुद्रदेवता " असें प्रत्यक्ष गाईंचे दानाचे वेळीं म्हणावें. जर प्रत्यक्ष गाई न देतां निष्क्रयद्वारा ( द्रव्यद्वारा ) दान देणें झाल्यास त्याचे पुढें " तन्मूल्योपकल्पित निष्कयरजतमुद्रा: " असें लाऊन पुढें " नानानाम गोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो दातु महमुत्सृजे नममेति तेन भगवान् परमात्मा श्रीपरमेश्वर: प्रीयतां तत्सद्ब्रम्हार्पणमस्तु " हें योजावें ह्या प्रमाणें संकल्प करून

नंतर " कृतस्य सवृषगोशतदान कर्मण: सांगतासिध्यर्थं ब्राम्हण भोजनं भूयसीं दक्षिणांच दद्यात् " असा संकल्प करावा. अथवा जर द्रव्यद्वारा दान देणें झाल्यास " अद्येत्यादि० " असा " विष्णु-सायुज्यकामः " पावेतों उच्चार करून त्याचे पुढें रुद्र दैवतसाहि-रण्य दक्षिणायथा शक्त्यलंकृत सवृषगोशत मूल्योपकल्पित निष्क्रय रजतमुद्राः नानानाम गोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो दातु महमुत्सृजे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून नंतर ब्राम्हण भोजनाचा संकल्प करून ब्राम्हणास भूयसी द्यावी.

ह्या प्रमाणें वृषमासहित शंभरगाईंच्या दानाचा प्रयोग सांगितला.

---

अथ सवृषदशगोदानप्रयोगः

" भाविष्ये "

दश गावः सवृषभा वृषभैकादश स्मृताः।
दत्वा तु ब्राम्हणेभ्य श्च स याति परमां गतिं ।
शिवादिसर्वलोकेषु यथेष्टं रमते नर इति

' प्रयोगः '

पुण्यकाले शुचि राचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य मम समस्तपापक्षयपूर्वकशिवादिसर्वलोकनिवा-सांते विष्णुसांनिध्यकामो वृषाधिकदशगोदानं करिष्ये इति संकल्प्य गणपतिपूजनं पुण्याहवाचनमात्रं कृत्वा गोभ्यो नम इति सवृषा गाः संपूज्य ब्राम्हणेभ्यो नम

इति ब्राम्हणां श्च यथाशक्ति वस्त्रालंकारादिभिः संपूज्य गाः प्रार्थये देतै मंत्रैः गावो मा मुपतिष्ठंतु हेमशृंग्यः पयोमुचः ।

सुरभ्यः सौरभेय्य श्च सरितः सागरा स्तथा ।
गावः पश्याम्यहं नित्यं गावः पश्यंतु मां सदा ।
गावो ऽस्माकं वयं तासां यतो गाव स्ततो वयं ।

गावो ममा ग्रतो नित्यं ।
गावः पृष्ठत एव च ।
गावो मे सर्वत श्चैव ।
गवां मध्ये वसा म्यहं ।

इति गाः संप्रार्थ्य वृषभं प्रार्थयेत् धर्म स्त्वं वृषरूपेण जगदानंदकारक अष्टमूर्तें रधिष्ठान मतः पाहि सनातनेति वृषभं च प्रार्थयेत्

ततः सकुशतिलजल मादाय अद्येत्यादि मम समस्तपापक्षयपूर्वकशिवविष्णुसांनिध्यावाप्तिकामो वृषाधिकदश गा धेनूपस्कराः सहिरण्यदाक्षिणायुता रुद्रदैवता स्तन्मूल्यौपकल्पितनिष्क्रयरजतमुद्रा वा नानानामगोत्रेभ्यो ब्राह्मणेभ्यो दातु मह मुत्सृजे न ममेति संकल्पं कुर्यात् ततो ब्राम्हणभोजनसंकल्पः भूयसीं च दद्यात अथवा वृषाधिकधेनूपस्करसहिरण्यदाक्षिणायुतदशगा रुद्रदैवता स्तन्मूल्योपकल्पितरजतमुद्राः नानानामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो दातु मह मुत्सृजे न ममे त्युक्त्वा दद्यात् ब्राम्हणभोजनसंकल्पं कृत्वा भूयसीं च दद्या दिति संक्षेपः

इति सवृषदशगोदानप्रयोगः

## वृषभासह दहा गाईंचे दानाचा प्रयोग.

वृषभासहित दहा गाईंच्या दानाचा प्रयोग.

" भविष्य पुराणांत " वृषभासह दहा गाई ह्यांचें दान जो मनुष्य ब्राम्हणास देईल, तो परम गतीला पावेल आणि शंकर वगैरेंच्या सर्व लोकांत यथेच्छ रममाण होतो ( आनंदानें रहातो ). संक्राति वगैरे पुण्यकारक दिवशीं यजमानानें शुद्ध होऊन आचमन करून प्राणायाम करून देश व काल ह्यांचा उच्चार करून " मम समस्तपापक्षय पूर्वक शिवादि सर्व लोक निवासांते विष्णुसांनिध्य कामो वृषाधिक दशगोदानं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून गणपतीचें पूजन करून केवळ पुण्याहवाचन करून " गोभ्योनमः " ह्या मंत्रानें वृषभासहित गाईंची पूजा करून आणि " ब्राम्हणेभ्यो नमः " ह्या मंत्रानें ब्राम्हणांची आपले शक्तीप्रमाणें वस्त्रें, अलंकार वगैरेंनीं पूजा करून पुढील मंत्रानीं गाईंची प्रार्थना करावी. ते मंत्र असेः–

गावो मा मुपतिष्टंतु हेमसृंग्यः पयोमुचः ।
सुरभ्यः सौरभेयश्च सरितः सागरास्तथा ।
गावः पश्याम्यहं नित्यं गावः पश्यंतु मांसदा ।
गावोऽस्माकं वयं तासां यतो गाव स्ततो वयं ।
गावो ममाग्रतो नित्यं गावः पृष्ठत एवच ।
गावो मे सर्वतश्चैव गवांमध्ये वसाम्यहं ॥

ह्याप्रमाणें गाईंची प्रार्थना करून वृषभाची प्रार्थना करावी तो मंत्र—

धर्मस्त्वं वृषरूपेण जगदानंदकारक ।
अष्टमूर्ते रधिष्ठानमतः पाहिसनातन ॥

ह्या प्रमाणें वृषभाची प्रार्थना करावी.

नंतर यजमानानें दर्भ, तीळ व उदक घेऊन "अद्येत्यादि." पुढें मम समस्त पापक्षयपूर्वक शिव विष्णुसंनिध्यावाप्ति कामो वृषाधिकदशगाधेनूपस्करसहिताः सहिरण्य दक्षिणायुताः रुद्र दैवता ॥ नाना नामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो दातुमहमुत्सृजे न मम ॥ ह्याप्रमाणें संकल्प करावा. नंतर ब्राम्हण भोजनाचा संकल्प करावा आणि ब्राम्हणास भूयसी द्यावी. किंवा प्रत्यक्ष गाई देण्यास सामर्थ्य नसल्यास " वृषाधिक धेनूपस्कर सहिरण्य दक्षिणायुत दशगारुद्रदैवत स्तन्मूल्योपकल्पित रजतमुद्राःनानानामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यो दातु महमुत्सृजेन मम । असा संकल्प करून दान करावें आणि ब्राम्हण भोजनाचा संकल्प करून ब्राम्हणास भूयसी द्यावी. असा संक्षेप करावा.

ह्या प्रमाणें वृषभासहित दहा गाईंच्या दानाचा प्रयोग सांगितला.

---

## अथ दश महादानानि.

" कौर्मे "

कनकाश्व तिला नागा दासी रथ मही गृहाः ।
कन्या च कपिला धेनु र्महादानानि वै दश ।

तत्र प्रथमं तावत्सुवर्णदानं ' मूले ' दत्वा सुवर्णस्य शतं विप्रेभ्यः श्रद्धयान्वितः ब्रम्हलोक मनुप्राप्य

ब्रम्हणा सह मोदतो गव्येन भूमिं शकृता जलेन आलिप्य मध्ये सिततंदुलै श्चा सरोरुहं केसरभूषणाढ्यं सकर्णिकं चाष्टदलं विलिख्या ' मध्ये ' तस्मिन्हिरण्यं शतमानमात्रं निधाय तस्योपरि तं विचिंत्येति तत्र ब्राम्हणं कमलासनस्थं संपूज्य विप्रं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य दद्यात्

" हेमाद्रौ दानखंडे "

देयं तद्योजये त्पूर्वं ततो विप्रं च पूजयेत् ।

तत्तन्मंत्रैः प्रदद्या द्वै सर्वदाने ष्वयं विधि रिति

अद्येत्यादि मम समस्तपापक्षयपूर्वक मेरुदानसम फलावाप्तये देयद्रव्यतृतीयांश दक्षिणासहितं इदं सूवर्णं अग्निदैवतं अमुक गोत्राया मुकशर्मणे ब्राम्हणाय तुभ्य महं संप्रददे न ममेति दद्यात् हिरण्यगर्भ गर्भस्थं हेमबीजं विभावसोः ।

मद्यपूर्वोचारित वर्तमान एवंगुण " इत्यादि.

अनंतपुण्यफलद मतः शांतिं प्रयच्छ मे

इति कनकदानं.

---

दहा मोठीं दानें.

दहा मोठ्या दानांचीं नांवें.
सोन्याच्या दानाचा प्रयोग.

" कूर्म पुराणांत " सोनें, घोडा, तीळ, हत्ती, दासी, रथ, जमीन, घर, कन्या आणि कपिला गाय हीं मोठीं दाने होत. त्यांत प्रथमतः सोन्याचें दान— मूळांत– जो मनुष्य श्रद्धेनें ब्राम्हणांस शंभर कृष्णलभार सोनें देईल तो ब्रम्ह

लोकास प्राप्त होऊन ब्रम्हदेवासह आनंदानें राहतो. गोमूत्रानें व शेणानें जमीन सारवून तिचेवर पांढऱ्या तांदुळानीं केसर व कर्णिका ह्यांनीं युक्त असें आठ पत्रांचें कमळ काढावें. त्यावर शंभर मार सोनें ठेऊन त्यावर कमलासनावर बसलेल्या ब्रम्हदेवाचें ध्यान करून त्या ठिकाणीं गंधादिकांनीं त्याची पूजा करून ब्राम्हणाचें वर्णन करून त्याची आपले शक्ती प्रमाणें वस्त्रें अलंकार वगैरेनीं पूजा करून त्यास सोनें द्यावें. " हेमाद्रींत दान खंडांत " दान द्यावयाच्या वस्तुची प्रथम योजना करावी, नंतर ब्राम्हणाची पूजा करून दाना विषयीं सांगितलेल्या त्या त्या मंत्रांनीं दान द्यावें. सर्वदानां विषयीं हा विधि जाणावा.

अद्येत्यादि० मम समस्त पापक्षय पूर्वक मेरुदान सम फलवाप्तये देय द्रव्य तृतीयांश दक्षिणासहितं इदं सुवर्ण अग्निदैवतं अमुकगोत्राया अमुकशर्मणे ब्राम्हणाय तुभ्य महं संप्रददो न मम ॥ ह्या प्रमाणें यजमानानें संकल्प करून दान द्यावें. दानाचा मंत्र—

" हिरण्यगर्भ गर्भस्थं हेम बीजं विभावसोः ।
अनंत पुण्यफलद मतःशांतिं प्रयच्छमे " ॥

हा मंत्र म्हणून सोनें द्यावें.

---

ह्या प्रमाणें सोन्याचें दान सांगितलें.

अथाश्वदानं

" महाभारते "

सर्वोपकरणोपेतं युवानं दोषवर्जितं ।
योऽ श्वं ददाति विप्राय स्वर्गलोके महीयते ' तथा '

यावंति रोमाणि हये भवंति हि नरेश्वर तावंतो वा जिदा ल्लोका न्प्राप्नुवंती ह पुष्कला निति वाजिदान् सूर्यलोकान्
" कौर्मे "

शकैः पंचपलै रौप्यैः सुवर्णालंकृतं क्रमात् ।

सदक्षिणं सवस्त्रं च ब्राम्हणाय निवेदयेत् ब्राम्हणं वृत्वा वस्त्रालंकरणगंधपुष्पादिभि रभ्यर्च्यदद्यात्

अद्येत्यादि० मम समस्तपापक्षयपूर्वकाश्वरोमसंख्याकाद्बसूर्यलोकनिवासाप्तिकाम इम मश्वं सर्वोपस्करहिरण्यदक्षिणायुतं यमदैवतममुकगोत्राय अमुकशर्मणे ब्राम्हणाय तुभ्यमहं संप्रददे न ममेति अश्वकर्णं धृत्वा दद्यात् दानमंत्र स्तु उच्चैश्रवा स्त्व मश्वानां राज्ञां विजयकारक ।

सूर्यवाह नम स्तुभ्य मतः शांतिं प्रयच्छमे

इत्यश्वदानं

---

## घोड्याचें दान.

" महाभारतांत " जो दोषांनीं रहित असून सर्व सामानानें युक्त अशा तरुण घोड्याचें दान ब्राम्हणास करील तो स्वर्गलोकीं पूज्य होतो. तसेंच हे राजा ! घोड्याचें दानदेणारे घोड्याच्या अंगावर जितके केस असतील तितक्या लोकांस प्राप्त होतात. " कूर्म पुराणांत " पांच पळें वजनाचे रुप्याचे खूर, सोन्याचे अलंकार, वस्त्र व दाक्षिणा ह्यानीं युक्त अशा अश्वाचें

घोड्याचें दान त्याचें फळ आणि दानाचा प्रयोग.

दान ब्राम्हणास करावें. ब्राम्हणास बोलावून त्याची वस्त्रें अलं-
कार वगैरेंनीं पूजा करून दान द्यावें.

अद्येत्यादि० मम समस्त पापक्षय पुर्वकाश्वरोमसंख्याद्ब सूर्यलोक निवासाप्ति काम इम मश्वं सर्वोपस्कर हिरण्यदक्षिणायुतं यमदैवतं अमुकगोत्राय अमुकशर्मणे ब्राम्हणाय तुभ्यमहं संप्रददे न ममेति । असा संकल्प करून घोड्याचा कान धरून दान करावें. दानाचा मंत्र—

उश्चैःश्रवा स्त्वमश्वानां राज्ञां विजयकारक ।
सूर्यवाहन मस्तुभ्य मतःशांतिं प्रयच्छमे ॥

ह्या प्रमाणें मंत्र म्हणून दान द्यावें.

ह्या प्रमाणें घोड्याचें दान सांगितलें.

---

अथ श्वेताश्वदानं

" गारुडे "

अश्वमेधमखं य स्तु कलौ कर्तु मनीश्वरः ।
अश्वदानं तु तेनेह कर्तव्यं विधिपूर्वकं ।
विधिं तस्य प्रवक्ष्यामि ब्रम्हणा निर्मितं पुरा ।
श्वेत मश्वं शुभं स्नातं हेमपर्याणभूषितं ।
रौप्यै स्तु कटकैः शुद्धैः करिदंतोपशोभितं ।
वज्रनेत्रं खुरै स्ताम्रैः क्षौमपुच्छं सुवाससं ।
शुभ्रेण पटकेनैव संयुतं स्वायुधान्वितं ।
धान्यरत्नोपरिस्थं तु बद्धकक्षं सुपट्टकं ।

एवं सुतेजसं चाश्वं ब्राम्हणाय निवेदयेत् ।

मन्वादियुगाद्ययनविषुवोपरागादिपुण्यकाले दानं कार्यं ब्राम्हणं वृत्वा वस्त्रालंकारादिभिः संपूज्याश्वं च संपूज्य वदेत् "मार्तंडाय सुवेगाय काश्यपाय त्रिमूर्तये ।

जगद्बीजाय सूर्याय त्रिवेदाय नमोस्तु ते ।

एवं समुच्चरे न्मंत्रं कर्णे दद्या त्तिलोदकं ।

दानवाक्यं तु अद्येत्यादि गोत्राय शर्मणे ब्राम्हणाये मं श्वेताश्वं सुवर्णतिलकालंकारयुतं ललाटग्रैवेयकपूर्वोक्तालंकारै र्युक्तं गंधपुष्पाद्यर्चितं सूर्ययमदैवतं सकलब्रम्हहत्यादिपापनाशकामो हयरोमसमसंख्याकाब्दसूर्यलोकनिवासकामश्च सालंकृताय तुभ्य महं संप्रददे न ममेति ततोऽ श्वप्रार्थना महार्णवसमुत्पन्न उच्चैःश्रवसपुत्रक ।

मयात्वं विप्रमुख्याय दत्तो हय सुखी भवेति ततो विप्रप्रार्थना इमं विप्र नमस्तुभ्यमश्वं ते प्रतिपादितं ।

प्रतिगृहीष्व विप्रेंद्र मया दत्तं सुशोभन मिति इति दानमंत्र मुच्चार्य कर्णे समर्पणं कृत्वा विप्रहस्ते जलं क्षिपेत् ततः सुवर्ण दक्षिणां दद्यात् विप्रो देवस्य त्वेति

गृहीत्वा यथाशास्त्रं कामस्तुतिं पठित्वा स्वस्ती त्युक्त्वाश्वमारुह्य गच्छेत् दाता चाश्वंपुरो गच्छेत् पदानां सप्तसप्ततिं ।

भास्करं मनसि ध्यात्वा आलोक्य स्वगृहं व्रजेत् ।

श्वेत मश्वं तु यो दद्या त्फलं दशगुणं भवेत् ।

एवं कृते नरव्याघ्र सूर्यलोकं व्रजे न्नर इति ।

इति श्वेताश्वदानं

## पांढऱ्या घोड्याचें दान.

पांढऱ्या घोड्याचे दानाचा संकल्प व फळ.

" गरुड पुराणांत " कलियुगांत अश्वमेध नांवाचा यज्ञ करण्यास ज्यास सामर्थ्य नसेल त्यानें विधिपूर्वक पांढऱ्या घोड्याचें दान करावें. त्याचा प्रकार पूर्वी ब्रम्हदेवानें निर्माण केला तो मी सांगेन—चांगल्या लक्षणांनीं युक्त पांढऱ्या अशा घोड्यास स्नान घालून त्यास सोन्याचा तिलक, सोन्याचें पर्याण, स्वच्छ रुप्याच्या कड्याची लगाम, हिऱ्याचे नेत्र, तांब्याचे खूर, भरजरीचे पुच्छ, चांगलें वस्त्र, शुभ्र असा पट्टा आणि आयुधें ह्यांनीं युक्त करून त्यास तंग व पट्टा चढवून धान्य व रत्नें यांच्या राशीवर उभें करावें. ह्या प्रमाणें अत्यंत तेजस्वी असा घोडा ब्राम्हणास अर्पण करावा.

मन्वादि, युगादि, अयन ( मकर व कर्क संक्रांत ), विषुव, ( मेष व तुला संक्रांति ) ग्रहण इत्यादि पुण्यकारक दिवशीं घोड्याचें दान करावें. ब्राम्हणास बोलावून वस्त्रें अलंकार वगैरेंनीं त्याची पूजा करून आणि घोड्याची पूजा करून पुढील मंत्र म्हणावा.

मार्तंडाय सुवेगाय काश्यपाय त्रिमूर्तये ।
जगद्बीजाय सूर्याय त्रिवेदाय नमोऽस्तु ते ।
एवं समुच्चरे न्मंत्रं कर्णे दद्या त्तिलोदकं ।

दानाविषयीं संकल्पतर–अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे ब्राम्हणायेमं श्वेताश्वं सुवर्णतिलकालंकारयुतं ललाटग्रैवेयक पूर्वोक्तालंकारैर्युक्तं गंधपुष्पाद्यर्चितं सूर्यमदैवतं सकलब्रम्हहत्यादिपापनाश-

कामो हयरोमसमसंख्याकाद्बसूर्यलोक निवास कामश्च सालंकृताय तुभ्य महं संप्रददे न ममेति । ह्या प्रमाणें संकल्प करून नंतर घोड्याची प्रार्थना करावी ती अशी—

महार्णव समुत्पन्न उच्चैः श्रवसपुत्रक ।
मयात्वं विप्रमुख्याय दत्तो हय सुखीभव ।

अशी प्रार्थना करून नंतर ब्राम्हणाची प्रार्थना करावी ती अशी—

इमं विप्र नमस्तुभ्यमश्वं ते प्रतिपादितं ।
प्रतिगृहीष्व विप्रेंद्र मयादत्तं सुशोभनं ।

ह्या प्रमाणें दानाचा मंत्र उच्चारून तिलोदक घोड्याच्या कानावर सोडून मग ब्राम्हणाचे हातावर उदक सोडावें. नंतर त्यावर सोनें दक्षिणा द्यावी. ब्राम्हणानें " देवस्यत्वा " हा मंत्र म्हणून दक्षिणा घेऊन आपले शाखेप्रमाणें " कामस्तुति " वाचक मंत्र म्हणून " स्वस्ति " असें म्हणून घोड्यावर बसून जावें. दात्यानें घोड्याचे मागें सत्याहत्तर पावलें जाऊन मनांत सूर्याचें ध्यान करून आणि सूर्याचें अवलोकन करून आपल्या घरीं जावें. हे नरव्याघ्रा ! ह्या प्रमाणें जो मनुष्य पांढऱ्या घोड्याचें दान करील त्याला दसपट फळ मिळेल आणि तो शेवटीं सूर्य लोकाला जाईल.

ह्या प्रमाणें पांढऱ्या घोड्याचें दान सांगितलें.

## अथ शिवायाश्वदानं.

" गारुडे "

शिवाया श्वमलंकृत्य यः पर्वाणि निवेदयेत् ।
सोऽश्वमेधस्य यज्ञस्य फल मष्टगुणं लभेदिति
शिवधर्मेऽपि शिवायाश्वदानं.

## शंकरास अश्वाचें दान देणें.

"गरुड पुराणांत" जो संक्रांत वगैरे पर्वणीचे दिवशीं घोडा अलंकारांनीं भूषित करून शंकरास अर्पण करील त्याला अश्वमेध यज्ञाच्या आठपट फळ मिळेल. ह्या प्रमाणें शिवधर्मांतही शिवास अश्व देण्याचें सांगितलें आहे.

शंकरास घोड्याचें दान देणें.

**ह्याप्रमाणें शंकरास अश्व देण्याचें सांगितलें.**

---

## अथ तिलदानं.

" आदित्य पुराणे "

वैशाख्यां पौर्णमास्यां वा तिलान् क्षौद्रेण संयुतान् ।
यः प्रयच्छे द्द्विजातिभ्यः सर्व पापैः प्रमुच्यते । तथा ।
ज्येष्ठेमासि तिला न्दद्या त्पौर्णिमास्यां विशेषतः ।
अश्वमेधस्य यज्ञस्य फलमाप्नोति मानवः । तथा ।

माघे मासि तिलान्यस्तु ब्राम्हणेभ्यः प्रयच्छति ।
सर्वसत्वसमाकीर्णं नरकं स न पश्यति

" विष्णुधर्मोत्तरे '

तिला गावो हिरण्यं च अन्नं कन्या वसुंधरा ।
दत्ता न्येतानि विधिव त्तारयंति महाभयात् ।

तथा ।

तिलस्नायी तिलोद्वर्ती तिलहोमी तिलोदकी । तिल-भुक् तिलदाता च षट् तिलाः पापनाशनाः इदं तु माघ मासपरं अन्यत्र तिलदानमेव

" कौर्मे "

कृष्णाजिने तिला न्कृत्वा सुवर्णं मधुसर्पिषी ।
द्रोणैकं वाससाछन्नं त्रिधा तद्व त्सदक्षिणं ।
ब्राम्हणाय च तं दत्वा सर्वं तरति दुष्कृत मिति ।

अद्येत्यादि अमुकगोत्रायामुकशर्मणे ब्राम्हणाय सुपूजिताय कृष्णाजिनस्थं सुवर्णमधुसर्पिर्युतं वस्त्राछन्नं तिलद्रोणं सोमदैवतं सर्वपापक्षयकाम स्तुभ्यमहं सं-प्रददे न ममेति दद्यात् कृतैतत्तिलद्रोणस्य सांगता-सिध्यर्थं इदं सुवर्णमग्निदैवतं दक्षिणात्वेन तुभ्य महं सं-प्रददे न ममेति दद्यात् प्रतिगृहीता तु ' देवस्य त्वेति ' तां परिगृह्य यथाशास्त्रं कामस्तुतिं पठित्वा समापयेत्

इति तिलदानविधिः

## तिळांचें दान.

तिळांचें दान करणें, त्याचें फळ व संकल्प.

" आदित्य पुराणांत " वैशाख महिन्याच्या पौर्णिमेस जो मधानें युक्त असे तीळ ब्राम्हणांस देईल तो सर्व पापांपासून मुक्त होईल. तसेंच जो मनुष्य जेष्ठ महिन्यांत त्यांत विशेषकरून पौर्णिमेस तीळ देईल त्याला अश्वमेघ नांवाच्या यज्ञाचें फळ मिळेल. ' तसेंच ' जो माघ महिन्यांत ब्राम्हणांस तीळ देईल तो सर्व प्राण्यांनीं व्यापलेल्या अशा नरकाला पहाणार नाहीं. " विष्णुधर्मोत्तरांत " तीळ, गाई, सोनें, अन्न, कन्या व पृथ्वी ह्यांचेंही विधिप्रमाणें दान केलें असतां तीं मोठ्या भयापासून रक्षण करतील. ' तसेंच ' तिळांच्या योगानें स्नान करणारा, तीळ अंगास लावणारा, तिळांचा होम करणारा, तिळांनीं मिश्र उदक करणारा, तिळांचें भक्षण करणारा आणि तिळांचें दान करणारा ह्याप्रमाणें हे सहा प्रकारचे तीळ पापांचा नाश करणारे होत; हें वाक्य माघ महिन्याविषयीं आहे, दुसऱ्या महिन्यांत तिळांचें दानच करावें. " कूर्म पुराणांत " काळ्या मृगाच्या चामड्यावर ×द्रोण परिमित तीळ, सोनें, मध व तूप ह्यांसह वस्त्रानें आच्छादन करून सोन्याचे दक्षिणेसह कनिष्ट मध्यम व उत्तम अशा तीन भेदांनीं जो ब्राम्हणास दान करील तो सर्व पातकांपासून तरेल.

---

* " आहिताग्नौ द्विजे दत्वा सर्वं तरति दुष्कृतं " असा हेमाद्रींत पाठ आहे.

× १०२४ कर्ष. ह्याचे हल्लींचे व्यवहाराप्रमाणें ८५३$\frac{1}{3}$ तोळे होतात.

" अद्येत्यादि० अमुक गोत्रायामुकशर्मणे ब्राम्हणाय सुपूजिताय कृष्णाजिनस्थं सूवर्ण मधुसर्पिर्युतं वस्त्राच्छन्नं तिलद्रोणं सोमदैवतं सर्वपापक्षयकामस्तुभ्यमहं संप्रददे नमम " ह्या प्रमाणें संकल्प करून दान द्यावें. " कृतैतात्तिलद्रोणस्य सांगतासिध्यर्थं इदं सुवर्णं मग्निदैवतं दक्षिणात्वेन तुभ्यमहं संप्रददे नमम " असा संकल्प करून दानावर दक्षिणा सोनें द्यावी. नंतर प्रतिग्रह घेणारानें " देवस्यत्वा ". हा मंत्र म्हणून दक्षिणा घेऊन आपले शाखेप्रमाणें " कामस्तुति " वाचक मंत्र म्हणून कर्माची समाप्ति करावी.

दानाचा संकल्प.

ह्या प्रमाणें तिळाच्या दानाचा विधि सांगितला.

---

## अथ तिलपात्रदानं.

" ब्राम्हे "

तांम्रपात्रं तिलैः पूर्णं प्रस्थमात्रं द्विजाय च ।
सहिरण्यं च यो दद्या त्प्रत्यहं श्रद्धया न्वितः ।
सर्वपापविशुद्धात्मा लभते परमां गति मिति ।

अद्येत्यादि० इदं तिलपूरिततांम्रपात्रं सोमदैवतं ससुवर्ण ममुकगोत्रायामुकशर्मणे ब्राम्हणाया शेषपापक्षयकाम स्तुभ्य महं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तुं "

तिलाः स्वर्णयुता स्तुभ्यं प्रदत्ता ह्यघनाशनाः ।
विष्णुप्रीतिकरा नित्य मतः शांतिं प्रायच्छ मे प्रतिग्रहः प्राग्वत्

इति माघे नित्यं तिलपात्रदानं

---

## तिळ पात्राचें दान.

तिळपात्राचें दान व त्याचा संकल्प.

" ब्रह्मपुराणांत " जो नित्य एक प्रस्थभार तिळांनीं भरलेलें आणि सोन्यानेंयुक्त असें तांब्याचें पात्र ब्राह्मणास श्रद्धेनें देईल तो सर्व पातकां पासून मुक्त होऊन परम गतीला पावेल. दानाचा संकल्प. अद्येत्यादि इदं तिलपूरित ताम्रपात्रं सोमदैवतं ससुवर्ण अमुक गोत्राय अमुक शर्मणे ब्राह्मणाया शेषपापक्षयकामस्तुभ्यमहं संप्रददेन मम। ह्याप्रमाणें संकल्प करावा. दानाचा मंत्र. ॥ तिलाःस्वर्णयुतास्तुभ्यं प्रदत्ताह्यघनाशनाः । विष्णुप्रीतिकरानित्य मतःशांतिं प्रयच्छमे ॥ प्रतिग्रह पूर्वीप्रमाणें समजावा.

ह्याप्रमाणें माघ महिन्यांत नित्य तिळपात्राचे दानाचा विधि सांगितला.

---

६४ कर्षभार कर्षांचे मासे हल्लींचें व्यवहाराप्रमाणे दहा होतात.

## अथ महातिलपात्रदानं.

" कौर्मे "

ताम्रपात्रे तिला न् कृत्वा पलषोडश कल्पिते ।
ससुवर्णेन शक्त्या वा विप्राय प्रतिपादयेत् ।
ना शये त्रिविधं पापं वाङ्मनःकाय संभवं ।
तिलपूर्णं ताम्रपात्रं सहिरण्यं द्विजाय वै ।
प्रातर्दत्वा तु विधिवद्दुःस्वप्नं विनिहंति सः ।
तिलपात्र त्रिधाप्रोक्तं कनिष्टोत्तममध्यमं ।
ताम्रपात्रं दशपलं जघन्यं परिकीर्तितं ।
द्विगुणं मध्यमं प्रोक्तं त्रिगुणं चोत्तमं स्मृतं ।
स्वर्णमेकं जघन्यं तु द्विगुणं मध्यमं मतं ।
त्रिगुणं चोत्तमं तद्वत्सुवर्णं परिकीर्तितं पल-
संख्यानिष्कद्वयमिता सपादनिष्कद्वय
मित्यन्ये अत्र देशाचारतो व्यवस्था ।
दानवाक्यं तु नित्य तिलपात्रदानवत् ।
मंत्रस्तु

यानि कानि च पापानि ब्रम्हहत्यासमानि च ।
तिलपात्रप्रदानेन तानि नश्यंतु मे सदेति ॥

इति महातिलपात्रदानं कौर्मे.

---

## मोठ्या तिळपात्राचें दान,

मोठ्या तिळपात्राचें दान.

" कूर्म पुराणांत " सोळापळें वजनाच्या तांब्याच्या पात्रांत ( मांड्यांत ) तीळ व सोनें ठेऊन ब्राम्हणास दान करावें, किंवा जशी

शक्ति असेल त्या प्रमाणें दान करावें. ह्या प्रमाणें दान केलें असतां तें वाणी, मन, व शरीर ह्या तिवां पासून होणारें तीन प्रकारचें पाप नाहींसे करील. जो प्रातःकाळीं सोनें व तीळ ह्यांनीं युक्त असें तांब्याचें पात्र ब्राह्मणास विधीप्रमाणें देईल त्याच्या दुष्ट स्वप्नाचा नाश होईल. तांब्याचें पात्र कनिष्ठ, मध्यम व उत्तम ह्या भेदांनीं तीन प्रकारचें सांगितलें आहे. त्यांत दहा पळें वजनाचें कनिष्ठ सांगितलें आहे. त्याहून दुप्पट मध्यम आणि तिप्पट उत्तम सांगितलें आहे. तसेंच एकपट सोनें कनिष्ठ, दुप्पट मध्यम आणि तिप्पट उत्तम होय. येथें दोन निष्कांबरोबर एक पळ ध्यावें. सव्वादोन निष्कांचें एक पळ असें "दुसरे" म्हणतात. ह्याविषयीं देशाचारावरून व्यवस्था करावी. दानाचा संकल्प तर नित्याचे तिळपात्राच्या दानाप्रमाणें करावा. "दानाचा मंत्र"

यानिकानिच पापानि ब्रम्हहत्त्यासमानिच ।
तिलपात्रप्रदानेन तानि नश्यंतु मे सदा ॥

हा मंत्र म्हणून दान करावें.

ह्याप्रमाणें मोठ्या तिळ पात्राचें दान सांगितलें.

---

### अथ मातुराण्यकृतिलपूर्णकांस्यपात्रदानं.

"आदित्यपुराणे"

यज्ञं सौत्रामाणिं कर्तुं यदि शक्ति र्न विद्यते ।
महासर स्तथा वापींकूपं कर्तुं च दीर्घिकां ।

एवं कृते मातृऋणा न्मुक्तो भवति मानवः ।
सदक्षिणं कांस्यपात्रं दत्वा चैव प्रमुच्यते ।
शुद्ध कांस्यस्य पात्रस्य प्रमाणं पंचविंशतिः ।
पलाना मत्र निर्दिष्टं तिलानां प्रस्थसप्तकं ।
सुवर्णमाषाश्चत्वारः पात्रस्योपरि धारयेत् ।
वस्त्रेण वेष्टयेत्पात्रं विधाय च सुभक्तितः ।
स्नानं कृत्वा निम्नगादौ पितृदेवांश्च तर्पयेत् ।
ततोऽभिपूजये द्देवं शंकरं हरिमेव वा ।
गोमयेनाथ संलिप्य गृहमध्यं तु सर्वतः :
लिखेत्पद्मं द्वादशारं कुंकुमेनाथ शोभनं ।
ततो वन्हिं सुसंस्थाप्य होमं कुर्याद्यवैस्तिलैः ।
पद्मे पात्रं प्रतिष्ठाप्य पूजयेद्भक्तिसंयुतः ।
ततो ब्राम्हण माहूय बहुपुत्रं सुसंयतं[२] ।
पादौप्रक्षाल्य विधिव न्मातु; श्राद्धं समाचरेत्[३] ।

---

१ गंध चंदन पुष्पाद्यैर्धुपदीपैश्च शोभितं ।

२ परस्त्री वर्जकं शांतमलंकृत्य यथाविधि ।
दांभिकं वर्जयेन्नित्यं परस्त्रीरतिलालसं ।
क्षुद्रं मत्सर शीलंच ब्रम्हभ्रष्टमशौचकं ।

हे श्लोक हेमाद्रांत अधिक आहेत.

३ तत्र संपूजये द्विप्रं पुष्प धूप विलेपनैः ।
वस्त्राणि परिधाप्योसौ सुभव्यानि मृदूनिच ।

हे श्लोक हेमाद्रींत आहेत.

अलंकृत्य यथाशक्ति माघ्यां वाऽमृतवासरे ।
ग्रहणे रविसोमाभ्यां संक्रांतिषु युगादिषु ।
तथान्यदपि यद्दत्तं माघ्या मुद्दिश्य मातरं ।
तदक्षय्यं फलं सर्वं पुरा प्राह महेश्वरः ।
जीवंतीं भूषयेद्वस्त्रै र्माल्यैरपि विभूषणैः ।
दत्वा विप्रस्य तत्पात्रं होमं कुर्या त्प्रयत्नतः ।
सोपस्करं सतांबूलं क्षमाप्य च विसर्जयेत् ।
अन्येषामापी विप्राणां भोजनानि प्रदापयेत् ।

" अथास्य प्रयोगः "

माघ्यां पूर्वोक्तपुण्यकाले वा यजमानः कृतनित्यक्रियः पूर्वोक्तद्वादशारपद्मे कांस्यपात्रं प्रस्थसप्ततिलैः पूरितं स्थापयित्वा हरं हरिं वा संपूज्य तत्पुरतोग्नौ विष्णुं विष्णुमंत्रेण शिवं शिवमंत्रेण वा ष्टोत्तरशतं घृताक्त तिलैर्यवैश्चहुत्वा ब्राह्मणमादयोदङ्मुखऊपवेश्यादौ पादप्रक्षालनादि मातृश्राद्धं समाप्याचम्य प्राणानायम्य अद्येत्यादि० अमुकगोत्रायामुकशर्मणे ब्राम्हणाय उक्तोपस्कर संयुतं मम मातुः गर्मधारणपोषण मलमुत्रादि नानादुःखोद्भवाद्यनृण्यत्व कामःइदं पंचविंशतिपलात्मकं कांस्यपात्रं प्रस्थसम्मितिलैः परिपूरितं माषचतुष्ठय सुवर्ण युतं वस्त्रसंवेष्टितं सर्वोपस्करयुतं तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात् मंत्रास्तु

कांस्यपात्रं मयादत्तं मातुरानृण्य काम्यया ।
भगवन्वचना त्तुभ्यं यथा मुक्तिस्तथावद ।
दशमासाश्च उदरे जनन्याः संस्थितस्यमे ।
क्लेशिता बालभावेन स्तनपाना द्विजोत्तम ।
मलमुत्रादि सल्लेप लिप्ताया च कृता मया ।
भवतो वचनादद्य ममयुक्तिर्भवे दृणात् ।
तिलसंख्या कृतं दुःखं जनन्या ममसेवितं ।
कांस्यपात्र प्रदानेन कृतकृत्यो भवाम्यहं ।

ततः शक्त्या हिरण्यं दक्षिणी दद्यात् पात्रदानेन जननी संभवादृणात्त्वं मुक्तो भव इति त्राम्हणो वदेत् पुन र्व्याहृतिभिराज्य होमं कृत्वा विसृज्य यथा शक्ति त्राम्हणान्भोजयित्वा सुहृद्युतो भुंजीते ति

इति मातुरानृण्य कृत्तिल पूर्ण कांस्यपात्र
दान प्रयोगः

---

## आईच्या ऋणापासून मुक्त करणाऱ्या तिळांनीं पूर्ण अशा कांशाच्या पात्राचें दान.

आईच्या ऋणापासून मुक्त करणाऱ्या तिळांनीं भरलेल्या कांशाच्या पात्राचें दान, त्याचें फळ व विधि.

" आदित्य पुराणांत " सौत्रामणि नांवाचा यज्ञ करण्यास जर शक्ति नसेल, तसेंच मोठें तळें, विहिर, कुवा आणि बावडी करण्यास शक्ति नसेल तर त्यानें दक्षिणायुक्त कांशाच्या पात्राचें दान केलें असतां

तो आईच्या ऋणापासून मुक्त होईल. पंचवीस पळें वजनाच्या शुद्ध कांश्याचें पात्र असावें; त्यांत तीळ सात प्रस्थ असावे. पात्रांत चार मासे सोनें ठेवावें, मग तें पात्र वस्त्रानें गुंडाळून मोठ्या भक्तीनें नदी वगैरेंत स्नान करून पितर आणि देवतांचें तर्पण करावें. नंतर शंकर किंवा विष्णु ह्याचें पूजन करावें, मग शेणानें घर आंतून चहूंकडे लिंपून काढून त्यांत केशरानें बारा पत्रांचें असें सुरेख कमळ काढून अग्नीची स्थापना करून त्यावर जव आणि तीळ ह्यांचा होम करावा, नंतर पूर्वीं सांगितलेल्या कमळावर कांशाचें पात्र ठेऊन त्याची भक्तीनें पूजा करावी; नंतर पुत्रवान् नियमवान् अशा ब्राह्मणास बोलावून त्याचे पाय धुवून विधिप्रमाणें आपले मातेचें श्राद्ध करावें. त्यांत फुलें, धूप, दीप आणि गंध ह्यांनीं ब्राह्मणाची पूजा करावी आणि त्यास उत्तम मृदु अशीं वस्त्रें परिधान करवून जशी शक्ति असेल तिचे प्रमाणें अलंकार द्यावे. माघी पौर्णिमेस अथवा मातेच्या मरण दिवशीं, रविवार, सोमवार ह्यांनींयुक्त अशा क्रमानें सूर्य व चंद्र ह्यांच्या ग्रहणांत, संक्रांति आणि युगादि ह्या दिवशीं तसेंच माघी पौर्णिमेस मातेच्या उद्देशानें जें कांहीं दुसरें देण्यांत येतें त्यापासून निरंतर फळ मिळतें असें पूर्वीं शंकरानें सांगितलें आहे. मातेच्या उद्देशानें सुवासिनीस वस्त्रें, पुष्पें आणि भूषणें ह्यांच्या योगानें भूषित करावें; ब्राह्मणास तें कांस्य पात्र सामुग्रीसह आणि तांबुलासह देऊन प्रयत्नानें होम करावा आणि ब्राह्मणांची क्षमा मागून कर्माची समाप्ति करावी. इतर ब्राम्हणांसही भोजनें द्यावीं.

## ह्याचा प्रयोग.

माघी पौर्णिमेस किंवा पूर्वी सांगितलेल्या पुण्यकाळीं यजमानानें नित्याचें स्नानसंध्यादि कर्म करून पूर्वी सांगितल्याप्रमाणें बारा पत्रांच्या कमळावर ×सातप्रस्थ तिळांनीं भरलेलें कांशाचें पात्र ठेवून शंकर किंवा विष्णु ह्याची पूजा करून त्याचे पुढें अग्निवर विष्णुस विष्णुचे मंत्रानें अथवा शंकरास शंकराचे मंत्रानें तुपानें युक्त अशा तिळांनीं आणि जवांनीं एकशें आठवेळ हवन करून ब्राम्हणास बोलावून त्यास उत्तरेकडे तोंड करून बसवून पूर्वी पाय धुणें इत्यादि मातेचें श्राद्ध करून आचमन करून प्राणायाम करून "अद्येत्यादि०" अमुक गोत्रायामुक शर्मणे ब्राम्हणाय उक्तोपस्कर संयुतं मम मातुः गर्भ धारणपोषण मलमूत्रादि नानादुःखोद्भवाद्यनृण्यत्वकामः इदं पंचविंशति पलात्मकं कांस्यपात्रं प्रस्थसमिततिलैः परिपूरितं माष चतुष्टच सुवर्णयुतं वस्त्रसंवेष्ठितं सर्वोपस्करयुतं तुभ्यमहं संप्रददे न मम असा संकल्प करून पुढील दानाचे मंत्र म्हणून तें पात्र त्या ब्राम्हणास द्यावें. "दानाचे मंत्र" "कांस्यपात्रं मयादत्तं मातुरानृण्यकाम्यया। भगवन्वचनातुभ्यं यथा मुक्तिस्तथावद। दशमासांश्च उदरे जनन्याः संस्थितेनमे। क्लेशिता बालभावे च स्तनपाना द्विजोत्तम। मलमूत्रादि संलेपलिप्ताया च कृतामया। भवतो वचनादद्य मम मुक्तिर्भवेद्दणात्। तिलसंख्याकृतं दुःखं जनन्या

कांस्य पात्राचे दानाचा प्रयोग.

---

× ४४८ कर्ष. आणि हल्लींच्या लोक व्यवहाराप्रमाणें ३७३⅓ इतके तोळे होतात.

द ७५
प ६८६८



मम सेवितं । कांस्यपात्रप्रदानेन कृतकृत्यो भवाम्यहं " ह्या प्रमाणें मंत्र म्हणून दान द्यावें. नंतर शक्ति प्रमाणें सोनें ही दक्षिणा द्यावी. ब्राम्हणानें " पात्रदानेन जननी संभवादृणात्त्वं मुक्तोभव " असें म्हणावें. नंतर पुन्हा व्याहृतींनीं तुपाचा होम करून कर्माची समाप्ति करून आपले शक्ति प्रमाणें ब्राम्हण भोजन करून इष्ट मंडळीसह भोजन करावें.

ह्या प्रमाणें आईच्या ऋणापासून मुक्त करणाऱ्या तिळांनीं भरलेल्या कांशाच्या पात्राच्या दानाचा प्रयोग सांगितला.

---

## अथ तिलपूर्णकरकदानं

" वायवीये "

करकं तिलसंपूर्णं मंडले वान्हिदैवते ।

शिवं वन्हिवदाधाय पूजये त्करवीरकैः ।

पूजा तु रक्तचंदनेन निर्यासमर्जरसधूपेन धूपयेत् वन्हिमंडलं त्रिकोणमंडलं शिवं वान्हिव दिति वान्हिस्वरूपं शिव तत्स्वरूपमुक्तं

" ब्रम्हांडदाने "

आदर्शं च ततो दद्या द्दीपानां च चतुष्टयं ।
वान्हिरूपी यतःशंभु र्वन्हिरूपा स्तिला श्च ये ।
तेजोरूपं कृतं पापं चाक्षुषं च व्यपोहतु ।

Poona City General Library.

Class सं-नी No. ५

इतिदत्तेऽस्य नश्यंति पापा न्यग्रे कृतानि च ।
परदारपरद्रव्यपुत्रदर्शनजानि च ।
शवादिदर्शनोत्थानि नेत्रदोपकृतानि च ।
य एवं कुरुते दानं शिवभक्त्या यतव्रतः ।
शिवलोके वसेद्भूप कल्पत्रयमशंकिताः ।

इति तिलपूर्णकरकदानं

---

## तिळांनीं भरलेल्या गडव्याचें दान.

तिळांनीं भरलेल्या गडव्याचें दान.

" वायुपुराणांत " तिळांनीं भरलेला गडवा, अग्नी ज्याची देवता आहे अशा त्रिकोणाकृति मंडळावर ठेवून त्याचे ठिकाणीं अग्नी रूपी शंकराची स्थापना करून त्याची रक्तचंदनानें आणि कण्हेरीच्या फुलांनीं पूजा करावी. आणि त्यास निर्यासाचा धूप दाखवावा. त्याचें स्वरूप ब्रम्हांडदानांत सांगितलें आहे. नंतर आरसा आणि चार दिवे द्यावे. ज्या अर्थी शंकर अग्निरूप आणि तीळही अग्निस्वरूप आहेत त्याअर्थी तेजोरूपी नेत्रसंबंधी केलेलें पातक दूर होवो असें म्हणून त्या गडव्याचें दान केलें असतां पुढें केलेलीं पातकें आणि दुसऱ्याची स्त्री, दुसऱ्याचें द्रव्य, व दुसऱ्याचा पुत्र ह्यांस अवलोकन केल्या पासून होणारीं, प्रेत वगैरेंच्या दर्शाना पासून होणारीं आणि डोळ्याच्या दोषानें झालेलीं पातकें नाहिशीं होतील.

हे राजा ? जो कोणी व्रताचें ठिकाणीं नियुक्त होऊन शंकराचें ठिकाणीं भक्ति ठेवून ह्या प्रमाणें दान करील तो निःशंक होऊन कैलासांत तीन कल्प पावेतों वास करील.

ह्या प्रमाणें तिळांनीं भरलेल्या गडव्याचें
दान सांगितलें.

---

अथ गजदानं

" कौर्मे "

दद्या द्गजं पुराणोक्तं मुल्यं पंचशतानि वा ।
वित्तानुसारा त्तत्रापि कनिष्ठोत्तममध्यमं ।

तत्रापि स्वरूपतो गजदान मुत्तमं तन्मूल्य-हेममाषशतपंचकदानं मध्यमं शतद्वयहेममाषदानं कनिष्ठमिति रूप्यस्थूणालंकरणं स्वर्णताराविभूषणं ।

सदक्षिणं वित्तशक्त्या दत्वा शिवपुरं व्रजेत् स्थूणा रज्जुः तारा मौक्तिकजाली गजालंकारः ॥

" कौर्मे "

यथालाभोपपन्नं वा यः प्रयच्छति दंतिनं ।
ब्राम्हणाय दरिद्राय स्वर्गलोके महीयत इति ततो
गजदानांगं शिवं द्विजं च संपूज्य दद्यात्

दानवाक्यं तु अद्येत्यादि० मम सर्वपापक्षयोत्तर-

सिद्धचारणसेवितार्क किंकिणीजालमालि विमाना-
रोहणोत्तरानेक मन्वंतरावाच्छिन्नाक्षय्य देवराजत्वांते
विष्णुपुरावाप्तिकाम स्तत्प्रीतिकाम श्च सालंकृतायामुक-
गोत्राया मुकशर्मणे ब्राम्हणायेमं गजं कक्षारज्जुस्थि-
रासनसहितं कांचनमालादिकीर्णं चामरगंधपुष्पाद्यलंकृतं
प्रजापतिदैवतं तुभ्यमहं संप्रददे न ममेति करं धृत्वा
दद्यात् करः शुंडादंडः कृतैतद्गजदानकर्मणः सांगतासि-
ध्यर्थं इदं सुवर्णं अग्नीदैवतं दक्षिणात्वेन तुभ्यमयं संप्र-
ददे न ममेती दद्यात् ततो द्विजं गजमारुह्य देवस्यत्वेति
यथा शाखं कामस्तुतिं पठित्वा प्रतिगृण्हामीति स्वस्तीति
वदेत् यजमानो गजं प्रार्थयेदेतै
मंत्रैः

" ऐरावत श्चतुर्दंतो गजानां नायकस्तु यः ।
दिग्दंतिनां पूज्यनमः पापंक्षयतु नः प्रभूः ।
सुप्रतीक गजेंद्र त्वं सरस्वत्याभिषेचक ।
इंद्रस्य वाहनश्रेष्ठ सर्वदेवैस्तु पूजित ।
गजेंद्र मत्तमातंग दैत्यसैन्याविनाशक ।

तव दानेन मे शांतिः सर्वदास्तु महत्सुखमिति ब्रा-
म्हण स्तथास्तु इत्युक्तो भूयसीं दद्यादिति

इति गजदानप्रयोगः

## हत्तीचें दान.

हत्तीचें दान व त्याचें फळ.

" कूर्म पुराणांत " हत्ती द्यावा अथवा पुराणांत सांगितल्याप्रमाणें दोनशें मासे सोनें ही किंमत द्यावी, अथवा पांचशें मासे सोनें किंमत द्यावी. तींतही द्रव्याचे प्रमाणानें कनिष्ठ, मध्यम व उत्तम असे तीन प्रकार सांगितले आहेत; तथापि प्रत्यक्ष हत्तीचें दान देणें हें उत्तम होय. त्याच किंमतीचें पांचशें मासे वजना इतक्या सोन्याचें दान देणें मध्यम, आणि दोनशें मासे इतक्या वजनाच्या सोन्याचें दान कनिष्ठ होय. तसेंच त्यावर ( हत्तीचें दानावर ) द्रव्याच्या शक्तिप्रमाणें रुप्याची दोरी, सोनें, मोत्याची जाळी आणि दक्षिणा दिल्यानें कैलासास जाईल. "कूर्म पुराणांत" जो द्ररिद्री ब्राम्हणास जसें मिळेल त्या प्रमाणें द्रव्य अथवा हत्ती देईल तो स्वर्गांत प्रतिष्ठेला पावतो. गजदानाच्या अंगभूत शंकर आणि ब्राम्हण ह्यांची पूजा करून नंतर दान करावें.

दानाचा संकल्प.

" दानाचा प्रयोग " अद्येत्यादि॰ मम सर्व पाप क्षयोत्तर सिद्धचारण सेवितार्क किंकिणीजाल मालिविमाना रोहणोत्तरानेकमन्वंतरावच्छिन्नाक्षय्यदेव राजत्वांते विष्णुपुरावाप्तिकाम स्तत्प्रीतिंकामश्च सालंकृतायामुक गोत्रायामुक शर्मणे ब्राम्हणायेमं गजं रक्षारज्जुस्थिरासनसहितं कांचनमालादिकीर्णं चामरगंधपुष्पाद्यलंकृतं प्रजापति दैवतं तुभ्यमहं संप्रददे न मम । असा संकल्प करून दात्यानें हत्तीची सोंड धरून दान करावें; नंतर " कृतैतद्गजदानकर्मणः

सांगतासिध्यर्थं इदं सुवर्णं अग्नि दैवतं दक्षिणात्वेन तुभ्यमहं संप्रददे न मम। असा संकल्प करून दक्षिणा द्यावी. नंतर दान घेणाऱ्या ब्राम्हणानें हत्तीवर बसून " देवस्येति " ह्या प्रमाणें जशी शाखा असेल ती प्रमाणें कामस्तुतिपर मंत्र म्हणून काम स्तुतिचा उच्चार करून " प्रतिगृण्हामि " असें आणि " स्वस्ति" असें म्हणावें. यजमानानें पुढील मंत्रांनीं हत्तीची प्रार्थना करावी ते मंत्र—

ऐरावतश्चतुर्दंतो गजानांनामक स्तुयः।
दिग्दंतिनां पूज्यतमः पापं क्षयतुनः प्रभुः।
सुप्रतीक गजेंद्रत्वं सरस्वत्याभिषेचक।
इंद्रस्य वाहन श्रेष्ठ सर्वदैवैस्तु पूजित।
गजेंद्र मत्तमातंग दैत्यसैन्य विनाशक।
तवदानेन मे शांतिः सर्वदास्तु महत्सुखं।"

ह्या प्रमाणें यजमानानें स्तुति करावी नंतर ब्राम्हणांनीं " तथास्तु " असें म्हणावें नंतर यजमानानें भूयसी द्यावी.

ह्याप्रमाणें हत्तीच्या दानाचा प्रयोग सांगितला.

---

### अथ दासिदानं.

" वान्हिपुराणे "

स्थिरनक्षत्रसंयुक्ते सौम्ये सौम्यग्रहान्विते।
दानकालं प्रशंसांति संतः पर्वणि वा पुनः।
अलंकृत्य यथाशक्त्या वासोभि र्भूषणै स्तथा।

ब्राम्हणाय प्रदातव्या मंत्रेण भाक्तित स्थता ।

पंचवर्षाधिका सा तु चत्वरिंशत्समावधिः दासी द्वि-
जाय दातव्या दासदानेऽप्ययं विधिरिति दानवाक्यं
तु अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय इमां दासीं
सुवर्णालंकारवतीं गंधपुष्पाद्यर्चितां प्रजापतिदैवतां
अक्षय्यसुखावाप्तिकाम स्तुभ्यमहं संप्रददे न ममेति
सिरसी धुत्वा दद्यात् द्विजप्रार्थनामंत्रस्तु

" वन्हिपुराणे "

इयं दासी मया तुभ्यं श्रीमती प्रतिपादिता ।
सत्छकर्मकरी भोग्या यथेष्ठं भद्रमस्तुमे ।
ततः सुवर्णं दक्षिणां दत्वा नमस्कुर्यात् ।
अनुगत्वा तु सीमायां द्विजं चैव विसर्जयेदिति

इति दासीदानं

---

## दासीचें दान.

दासीचें दान.

" अग्नि पुराणांत " ज्ञाते स्थिर नक्षत्रांनींयुक्त आणि शुभ ग्रहांनींयुक्त अशा बुधवारीं किंवा संक्रांति इत्यादि पर्वणीचे दिवशीं दासीदानाच्या कालाची प्रसंशा करतात. यजमानानें शक्तिप्रमाणें वस्त्रें, भूषणें ह्यांच्या योगानें दासीस भूषित करून ब्राम्हणास द्यावी. ती पांच वर्षांपासून चाळीस वर्षांपावेतों वयाची अशी दासी ब्राम्हणास द्यावी. दासी दानाविषयीं हा विधि सांगितला.

"दानाचा प्रयोग" अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय सुवर्णालंकारवती गंधपुष्पाद्यर्चितां प्रजापति दैवतां अक्षय्यसुखावाप्ति कामस्तुभ्यमहं संप्रददेनमम ॥ असा संकल्प करून तिचे डोक्यावर हात ठेवून दान करावें. ब्राम्हणाचे प्रार्थनेचा मंत्र "अग्नि पुराणांत" इयं दासी मयातुभ्यं श्रीमती प्रतिपादिता । सर्व काम करी भोग्या यथेष्ठं भद्रमस्तुमे ॥ ह्या मंत्रानें ब्राम्हणाची प्रार्थना करून सोनें दक्षिणा देऊन नमस्कार करावा; नंतर त्या ब्राम्हणास सीमेपावेतों पोंचविण्यास जावें.

दासीच्या दानाचा संकल्प.

ह्याप्रमाणें दासीचें दान सांगितलें.

---

अय रथदानं

"कौर्मे"

रथं चतुर्बलीवर्दै रूढं धान्यावृतं तथा ।
वित्तानुसारात्सर्वै श्च रथोपकरणै र्युतं ।

सदक्षिणं च विप्राय दत्वा शिवपुरं व्रजेत् धान्यावृतं अष्टादशधान्यावृतं रथोपकरणानि युगयोक्तृतोत्रवरत्रादीनी दक्षिणा च त्रिशतमापमितसुवर्णमुत्तमा द्वेशते मध्यमा अधमा शतैकमिति त्रैविध्यमाह "हेमाद्रिः"

दानवाक्यं तु अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय इमं रथं चतुर्बलीवर्दै र्युक्तं सोपस्करं धान्याष्टादशभिर्युतं

विश्वकर्मदैवतं अक्षय्यस्वर्गादिसुखावाप्तिकाम स्तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु रथाय रथनाथाय नमस्ते विश्वकर्मणे विश्वरूपाय देवाय अरुणाय नमोऽस्तुते सुवर्णदक्षिणां दद्यात्

इति रथदानं

---

## रथाचें दान

रथाचें दान आणि त्याचें फळ.

" कूर्म पुराणांत " चार बैल ज्यास जोडले आहेत, +अठरा धान्यांनीं युक्त आणि त्याचीं दुसरीं सर्व साहित्यें, उपकरणें जूं, हांकणारा, चाबूक आणि दोरी वगैरे ह्यांसह अशा रथाचें दान दक्षिणेसह आपल्या ऐपतीप्रमाणें जो ब्राम्हणास देईल तो कैलासास गमन करील. तीनशें मासे सोन्या येवढी दक्षिणा उत्तम होय, दोनशें मासे मध्यम आणि शंभर मासे कनिष्ठ होय असें " हेमाद्रि " दक्षिणेचे तीन प्रकार सांगतो.

दानाचा संकल्प.

दानाचा संकल्प—अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय इदं रथं चतुर्बलीवर्दैर्युक्तं सोपस्करं धान्याष्टादशभिर्युतं विश्वकर्म दैवतं अक्षय्यस्वर्गादि सुखावाप्तिकाम स्तुभ्यमहं संप्रददे न मम । ह्या

---

+ जव, गहु, डांगर, तीळ, कांग, कुळीथ, उडीद, मूग, मसूर, पावटे, साया, शिरस, कसक, नीवार [नयार], आटकी, सतीनक, चणे, आणि चीनक ह्या प्रमाणें अठरा धान्यें होत.

प्रमाणें संकल्प करून पुढील मंत्रानें दान करावें–तो मंत्र–रथाय रथनाथाय नमस्ते विश्वकर्मणे। विश्वरूपाय देवाय अरुणाय नमोऽस्तुते ॥ ह्या प्रमाणें दान करून वर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें रथाचें दान सांगितलें

---

अथ गंत्री रथदानम्

" गारुडे "

गंत्री तुरंगसंयुक्तं यो ददाति द्विजाय वै।

सर्वकामसमृद्धात्मा स राजा जायते भुवीति गंत्री रथविशेषः सा चतुर्भि *र्गजैरश्वैर्वृषैर्वोपेता द्वाभ्यं वोपेता दानवाक्यं तु पूर्ववत्

" मंत्रस्तु "

गंत्री मिमां प्रयच्छामि विश्वकर्माधिदैवतां।

दानेनानेन भगवान्प्रीयतां मे परः पुमानिति ततः सुवर्णं दाक्षिणां दद्यात्

इति गंत्रीरथदानं

---

गाडीचें दान.

गाडीचें दान, याचें फळ आणि संकल्प.

" गरुड पुराणांत " जो घोड्यांनीं जोडलेली अशी गाडी ब्राम्हणास देतो तो सर्व मनोरथांच्या योगानें तृप्त ज्याचा आत्मा झाला आहे असा होऊन पृथ्वीवर राजा

---

* हेमाद्रित " गज " असें पद मूळांत कोठेंच दृष्टीस पडत नाहीं या वरून हें अधिक असावें असें वाटतें.

होईल. गंत्री म्हणजे एक प्रकारचा रथ ती गंत्री चार हत्तींनीं, चार घोड्यांनीं अथवा चार बैलांनीं जोडलेली असावी अथवा दोन्ही जोडलेली असावी. दानाचा संकल्प तर पूर्वीं प्रमाणेंच करावा. दानाचा मंत्र—गंत्रीमिमां प्रयच्छामि विश्वकर्माधिदैवतां । दानेनानेन भगवन्प्रीयतां मे परःपुमान् ॥ दान दिल्यानंतर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें गाडीचें दान सांगितलें

---

अथ प्रसंगाच्छिबिकादानं

" हेमाद्रौ मात्स्ये "

मार्गशुक्लैकादश्यां माघफाल्गुनयो वैशाखे वा हिरण्मयं हरिमभ्यर्च्य रात्रौ जागरणं कृत्वा प्रातः कृतनित्यक्रियः अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां शिबिकामुक्तोपस्करयुतां आंगिरोदैवतां इष्टलोकावाप्तये तुभ्यमहं संप्रददे न ममेति ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात्
" तत्रैव वन्हिपुराणे "

देवलोके विपुलभोगानंतरमंते विष्णुसायुज्यावाप्तिकामो विप्रस्य वर्षाशनं शिबिकावाहकानां च वर्षपर्याप्त मन्नं दद्यादिति

" हेमाद्रिः "

द्विजप्रार्थनामंत्रस्तु शिबिका ते मया दत्ता यथा शक्त्या विभूषिता । द्विज त्वं प्रतिगृण्हीष्व वांछितं ते नमे भवेदिति

इति शिबिकादानं

## प्रसंग विशेषीं पालखीचें दान.

पालखीचें दान व त्याचा विधि.

" हेमाद्रित " मत्स्यपुराणांतील मार्गशीर्ष महिन्याच्या शुक्ल पक्षांतील किंवा माघ, फाल्गुन, वैशाख आणि शरदृतु ( आश्विन, कार्तिक ) ह्या महिन्यांतलि एखाद्या एकादशीचे दिवशीं उपवास करून विष्णुची सोन्याची प्रतिमा करून तिची पुजा करून रात्रीं जागरण करावें. नंतर यजमानानें प्रातःकाळीं नित्याचें स्नान संध्या वगैरे कर्म करून यजमानानें " अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सुपूजितायं इमां शिबिकां उक्तोपस्करयुतां अंगिरोदैवतां इष्टलोकावाप्तये तुभ्यमहं संप्रददे न मम । ह्या प्रमाणें संकल्प करून पालखी तिच्या इतर सामानासह ब्राम्हणास द्यावी आणि तीवर सोनें दक्षिणा द्यावी. नंतर " ×त्यांतच वन्हि पुराणांतील " देवलोके विपुल भोगानंतर मंते विष्णुसायुज्या वाप्तिकामो विप्रस्य वर्षाशनं शिबिकावाहकानांच वर्ष पर्याप्तं अन्नं दद्यात् ॥ ब्राम्ह-

× देवलोकीं पुष्कळ भोग भोगल्यानंतर शेवटीं विष्णुच्या सायुज्यतेची प्राप्ति होण्याची ज्यास इच्छा आहे अशा यजमानानें ब्राम्हणास वर्ष पावेतोंचें अन्न आणि पाळखी वहाणारास ( भोयांस ) वर्ष पावेतों पुरेल इतकें अन्न यजमानानें द्यावें. असें हेमाद्रित आहे.

णाच्या प्रार्थनेचा मंत्र—शिबिकाते मयादत्ता यथाशक्त्याविभू-
षिता । द्विजत्वं प्रतिगृण्हीष्व वांछितं तेन मेभवेत् ॥

ह्या प्रमाणें शिबिकेचें दान सांगितलें.

---

अथ महीदानम्

" कौर्मे "

गोचर्ममात्रभूखंड माधिकं वा स्वशक्तितः ।
त्रिधा सदक्षिणं कृत्वा दत्वा शिवपुरं व्रजेत् त्रिधा
सदक्षिणामिति त्रिद्व्येकदक्षिणेत्यर्थः

" बृहस्पतिः "

अपि गोचर्ममात्रेण सम्यक् दत्तेन मानवः ।
धौतपापो विशुद्धात्मा स्वर्गलोके महीयते ।
दशहस्तेन दंडेन त्रिंशद्दंडा निवर्तनं ।
त्रिभागहीनं गोचर्ममानमाह प्रजापतिः ।

तथा ।

गवां शतं वृषश्चैको यत्र तिष्ठेदयंत्रितः ।
तद्धि गोचर्ममात्रं तु प्राहुर्वेदविदो जनाः ।
तथा षष्ठिवर्षसहस्राणि स्वर्गे वसति भूमिदः ।
आच्छेता वानुमंताच तावंति नरके वसेत् ।
भूमिं यः प्रतिगृण्हाति भूमिं यश्च प्रयच्छाति ।
तावुभौ पुरुषौ लोके सूर्यमंडलभेदिनौ ।

तथा भूमिप्रदानपुण्यस्य कलां नार्हंति षोडशीं ।
दानान्यन्यानि मे शांति भूमिदाना द्भवत्विहेति ।

दानवाक्यं तु अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय षष्टिसहस्रमितस्वर्गे शिवपुरनिवासकामः सर्वपापक्षय-कामो वा इमां भूमिं सस्योद्भवां सवृक्षफलपुष्पाद्युपेतां विष्णुदैवतां तुभ्यमहं संप्रददे न ममेति साक्षतकुशाति-लोदकं द्विजहस्ते दद्यात् ब्राम्हणस्तु भूमिं प्रदक्षिणां कुर्वन्प्रतिगृण्हीयात्

" देवस्य त्वेति "

यथाशाखं कामस्तुतिं पठित्वा स्वस्तीति वदेत् मांडव्यमतेनात्र सुवर्णं दक्षिणा मता

" मंत्रस्तु "

सर्वेषा माश्रयो भूमि र्वराहेण समुद्धृता ।
अनंतसस्यफलदा अतः शांतिं प्रयच्छमे ।
यस्मिन्रोहंति बीजानि वर्षाकाले महीतले ।
भूमेः प्रदानात्सकला मम संतु मनोरथा इति ।

" शिवधर्मे विश्वामित्रः "

ग्रामं वा नगरं वापि विप्रेभ्यो यः प्रयच्छति ।
क्षेत्रं वा सस्यसंपन्नं सर्वपापैः प्रमुच्यत इति ।

" भूमिहरणे तु विश्वामित्रः "

स्वदत्तां परदत्तां वा योहरेच्च वसुंधरां ।

षष्ठिवर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिरिति स
विष्ठायां कृमिर्भूत्वा पितृभिः सह मज्जतीति वा

इति शिवधर्मोक्तं भूदानम्

---

## भूमिचें दान.

भूमीचें दान व त्याचें फळ.

" कूर्म पुराणांत " गाईच्या चर्मायेवढा भूमिचा तुकडा अथवा आपले शक्तिप्रमाणें याहून अधिक अशा भूमिचें दान एकपट, दुप्पट व तिप्पट अशा तीन प्रकारच्या दक्षिणेनेंयुक्त असें जो देईल तो शिवलोकाला पावेल. " ब्रहस्पति " गाईच्या चर्मायेवढें ही पृथ्वीचें दान दिल्यानें मनुष्य पापरहित व शुद्ध अंतःकरणाचा असा होऊन स्वर्गलोकीं पूज्य होतो. दहा हाताचा एक दंड, तीस दंडांचें एक निवर्तन, आणि निवर्तनाच्या दोनतृतीयांशायेवढें गोचर्माचें मान होतें असें "प्रजापति" म्हणतो. तसेंच शंभर गाई व एक सांड हें ज्या जागेंत गर्दी न होतां मोकळेपणानें राहूं शकतात तेवढ्या जमिनीला वेद जाणणारे लोक " गोचर्म " असें म्हणतात. तसेंच भूमिदान करणारा स्वर्गांत साठ हजार वर्षें पावेतों वास करील. दान दिलेली भूमि परत घेणारा आणि त्यास संमत्ति देणारा हे दोघेही साठ हजार वर्षेंपावेतों नरकांत वास करतील. जो भूमिदान घेतो आणि भूमिदान करतो ते दोघेही पुरुष सूर्यमंडळाचा भेद करतात. तसेंच दुसरीं दानें भूमिदानाच्या सोळाव्या भागालाही पोहोंचूं शकत नाहींत. म्हणून भूमिदानापासून मला शांति प्राप्त होवो.

" दानाचा संकल्प "—अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय षष्ठिसहस्त्र वर्षमित स्वर्गे शिवपुरनिवासकामः सर्वपापक्षयकामोवा इमां भूमिंसस्योद्भवां सवृक्षफलपुष्पाद्युपेतां विष्णुदैवतां तुभ्यमहं संप्रददेन मम ॥ असा संकल्प करून अक्षता, दर्भ आणि तीळ ह्यांनीं मिश्र असें उदक ब्राम्हणाच्या हातावर द्यावें. ब्राम्हणानें भूमिस प्रदक्षिणा करून दान घ्यावें. नंतर " देवस्यत्वा० " इत्यादि जशी आपली शाखा असेल त्याप्रमाणें कामस्तुतिवाचक मंत्र म्हणून " स्वस्ति " असें म्हणावें. मांडव्य ऋषींचें असें मत आहे कीं भूमिदानावर सोनें दक्षिणा असावी. " दानाचा मंत्र " सर्वेषामाश्रयो भूमिर्वराहेण समुद्धृता । अनंतसस्यफलदा अतःशांतिं प्रयच्छमे ॥ यस्मिन्रोहंति बीजानि वर्षाकाले महीतले । भूमेःप्रदानात्सकला ममसंतु मनोरथाः ॥ " शिवधर्मांत विश्वामित्र "—गांव, नगर अथवा धान्यानें परिपूर्ण असें शेत जो ब्राम्हणांस देईल तो सर्व पापांपासून मुक्त होईल. भूमि परत घेतली असतां त्याविषयीं " विश्वामित्र "—स्वतः दिलेली अथवा दुसऱ्यानें दिलेली भूमि जो हिसकून घेईल तो साठ हजार वर्षेंपावेतों, नरकांत किडा होऊन राहील. अथवा तो किडा होऊन पितरांसह नरकांत पडेल.

भूमिदानाचा संकल्प.

ह्याप्रमाणें भूमिचें दान सांगितलें.

## अथ गृहदानं

" कौर्मे "

शक्तितः सर्ववित्तेन पूर्णं गृहमपि त्रिधा ।
सदाक्षिणं द्विजे दत्वा ब्रम्हलोकं ब्रजेन्नर इति ।

" गारुडे "

ऐष्टिकं दारुकं वापि मृन्मयं वापि शक्तितः।
सर्वोपकरणोपेतं यो दद्या द्विपुलं गृहं ।
ब्राम्हणाय दरिद्राय विदुषे च कुटुंबिने ।
सर्वकामसमायुक्तो ब्रम्हसायुज्य प्राप्नुयादिति ॥

" ब्रम्हवैवर्तें "

नगार्हस्थात्परो धर्मो न वै दानं परं गृहात् ।
नानृतादधिकं पापं न पूज्यो ब्राम्हणात्पर इति ।
गृहनिर्माणप्रकारमाह

" नारदः "

स्नानागारं दिशि प्राच्यां माग्नेय्यां पचनालयं ।
याम्यां शयनगेहं च नैऋत्यां शस्त्रमंदिरं ।
प्रतीच्यां भोजनागारं वायव्यां पशुमंदिरं ।
भांडागारं तूत्तरस्या मैशान्यां देवमंदिर मिति
कूर्यादिति शेषः। तत्र कूपे दिग्विशेषफलं

" देवी पुराणे "

पूर्वामाश्रित्य कर्तव्यः कूपः स्यादनिलेपि वा ।
न पूर्वव्यत्ययं कुर्या न्मध्ये देवालया द्गृहादिति कृतं
भयप्रदं लोके तथाचास्याग्निजं भयं । वायव्यां चापि
देवस्य भयदं जायते कृत मिति

" वराहमिहिरः "

पुष्टिं भूर्तिं पुत्रहानिं पुरंध्रीनाशं मृत्युं संपदं शस्त्रबाधां।
किंचित्सौख्यं दिक्षु पुर्वादि कुर्या त्कुपो मध्ये गेह मर्थक्षयं चेत्यादि

" मत्स्यपुराणे "

देवतापंचकं तत्र चत्वारिंश त्समाकृतं ।
पूजयित्वा यथान्यायं तयो दद्याद्गृहं गृही पूजयित्वा स्वयं वास्तु शांन्ति कृत्वा दद्यादित्यर्थः

## घराचें दान.

घर दान देणें व त्याचें फळ.

" कूर्म पुराणांत " जो मनुष्य आपलें शक्तिप्रमाणें उत्तम, मध्यम, कनिष्ठ अशा तीन प्रकारच्या दक्षिणेनेंयुक्त, द्रव्यानें परिपूर्ण असें घर ब्राम्हणास देईल तो ब्रम्हलोकास जाईल. " गरुड पुराणांत " जो आपले शक्तीप्रमाणें पलंग, गिरद्या, गाद्या, जाजम, भांडीं वगैरे सर्व साहित्यांनींयुक्त असें विटांचें, लाकडांचें अथवा मातीचें असें घर दरिद्री, वेद जाणणाऱ्या कुटुंबी अशा ब्राम्हणास दान करील तो सर्व मनोरथांनींयुक्त होऊन ब्रम्हसायुज्यतेला पावेल. " ब्रम्हैवर्तांत " गृहस्थाश्रमावांचून दुसरा श्रेष्ठ धर्म नाहीं, घराच्या दानावांचून दुसरें श्रेष्ठ दान नाहीं, असत्यावांचून दुसरें पातक नाहीं, आणि ब्राम्हणावांचून दुसरा पूज्य नाहीं.

घर तयार करण्याचा प्रकार " नारद " सांगतो तो असा.

घराचा दिशापरत्वें दुसरीं अंगें, दिशापरत्वें कुव्याचें फळ.

घराच्या पूर्वेस स्नानाचें घर, अग्नेयेस स्वयंपाक घर, दक्षिणेस निजण्याची जागा, नैऋत्येस शस्त्रांचें स्थान, पश्चिमेस जेवणाचें घर, वायव्येस पशुंची जागा, उत्तरेस भांडारखाना आणि ईशान्येस देवघर करावें. त्यांत कुव्याविषयीं विशेष दिशापरत्वें फळ " देवी पुराणांत "

कूप केला असतां लोकांत भयकारक होतो आणि अग्निपासून भय होतें. देवाच्या वायव्य दिशेस केलें असतां भयकारक होतें. " वराहमिहिर "—ईशान्य दिशेपासून क्रमानें आठ दिशांकडे कुवा केला असतां अनुक्रमें पुष्टि, ऐश्वर्य, पुत्राचा नाश, स्त्रीचा नाश, मृत्यु, संपत्ति, शस्त्रापासून पीडा व किंचित् सौख्य हीं फळें प्राप्त होतात. घराच्या मध्यभागीं कुवा केला असतां द्रव्याचा नाश होईल. " मत्स्य पुराणांत " गृहस्थानें त्या घरांत पंचेचाळीस देवतांचें यथान्याय पूजन करून त्याचें दान करावें.

## अथ प्रसंगा त्संक्षेपेण वास्तुशांतिप्रयोगः

कर्ता शुभादिने आचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य अस्य वास्तोः शुभतासिध्यर्थं वास्तुशांतिं करिष्ये इति संकल्प्य तदंगतया गणेशपूजास्वास्तिवाचनमातृकापूजाभ्युदायिकश्राद्धाचार्यब्रम्हार्त्विग्वरणानि कृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः पूजयेत् ततः आचार्यो यदत्र संस्थितं भू० अपक्रामंतु भूतप्रेतपिशाचाद्या

अपक्रामंतु राक्षसाः । स्थानादस्मा जद्भूत्वन्य त्स्वीकरोमि भुवं त्विमामिति अनेन सर्षपान्विकीर्य पंचगव्येन शुचीवो हव्या इत्यृचेन पुनंतु मां देवजना इत्यृचेन गृहमा बिभीत एतोन्विंद्र मित्यृचेन गृहं संप्रोक्ष्य गृहमध्ये प्राच्या मैशान्यां वा चतुरस्रं चतुरंगुलोच्चं हस्तमितं स्थंडिलं कृत्वा तस्य ईशानादिकोणचतुष्टये चतुरो लोहकीलानारोपयेत् विशंतु भूतले नागा लोकपालाश्च सर्वशः अस्मिन्गृहे वतिष्ठंतु आयुर्बलकराः सदेति मंत्रेण निरवनेत् प्रतिकीलं मंत्रानुवृत्तिः ततः ईशानकोणादिचतुर्षु कोणेषु अग्निभ्योप्यथ सर्पेभ्यो ये चान्ये तत्समाश्रिताः तेभ्यो बलिं प्रयच्छामि पुण्यमोदन मुत्तम मिति मंत्रेण मंत्रावृत्या माषभक्तबलीन्दत्वा स्थंडिलोपरि कुंकुमादिना हेमरूप्यशलाकया वा प्राक्पश्चायताः प्रागंता उदक्संस्था द्व्यागुलांतराःप्रणवादिनमोऽतै र्दशभि र्नामभिर्दशरेखाः कुर्यात् ॐ ईशानायै नमः ॐ यशोवत्यै नमः ॐ कांतायै नमः ॐ विशालायै नमः ॐ प्राणवाहिन्यै नमः ॐ सायै नमः ॐ सुमत्यै नमः ॐ नंदायै नमः ॐ सुभद्रायै नमः ॐ सुरथायै नमः इति दशरेखाः कृत्वा तथा ॐहिरण्यायै० ॐसुव्रतायै० ॐलक्ष्म्यै० ॐविभूत्यै० ॐविमलायै० ॐप्रियायै० ॐ विजयायै० ॐबालायै० ॐविशोकायै० ॐइडायै० इति दक्षिणोत्तरायताः उदगंताः प्राक्संस्था दशरेखाः कुर्यात् एवमेकाशीति पदं मंडलं संपद्यते तत्र मध्यस्थनवको-

ष्ठानि रेखामार्जनेनैकी कुर्यात् एवं नवपदं ब्रम्हस्थानं तस्य चतुर्दिक्षु चत्वारि त्रिपदानी विदिक्षु शृंखलाकाराणि द्वादश कोणचतुष्टयोभयत श्चाष्टाविति विंशत्येकपदानि अवशिष्टानि प्रतिदिशं पंचपंचेति विंशतिपदानि तेषु प्रणवाद्यै श्चतुर्थ्यंतै र्नमोंतै र्वक्ष्यप्राणनामाभिर्देवता आवाह्यं स्थापयेत् तत्रेशानकोणपदे वास्तोः शिरसि ॐ शिखिने नमः शिखिनं आवा० १ तद्दक्षिणैकपदे दक्षिणनेत्रे ॐपर्जन्याय नमः पर्जन्यं० २ आवाहयामिति सर्वत्र तद्दक्षिणे ततोपि पश्चिमत इति पदद्वये दक्षिणश्रोत्रे ॐजयंताय० ३ तद्दक्षिणपदद्वये दक्षिणांसे ॐकुलिशायुधाय० ४ तद्दक्षिणपदद्वये दक्षिणवाहौ ॐसूर्याय० ५ तद्दक्षिणपदद्वये दक्षिणवाहौ ॐसत्याय० ६ तद्दक्षिणपदद्वये दक्षिणकूर्परे ॐभृशाय० ७ तद्दक्षिणे अंसपंक्तिगतैकपदे दक्षिणप्रबाहौ ॐ आकाशाय० ८ आग्नेयकोणपदे दक्षिणबाहौ ॐवायवे न० ९ तत्पश्चिमैकपदे दक्षिणमणिबंधे ॐपुष्णे न० १० तत्पश्चिमे ततोऽप्युत्तर इति पदद्वये दक्षिणपार्श्वे ॐवितथाय० ११ तत्पश्चिमपदद्वये दक्षिणपार्श्वे एव गृहक्षताय० १२ तत्पश्चिमपदद्वये दक्षिणोरौ ॐयमाय० १३ तत्पश्चिमपदद्वये दक्षिणजानौ ॐगंधर्वाय० १४ तत्पश्चिमपदद्वये दक्षिणजंघायां ॐभृंगराजाय० १५ तत्पश्चिमे बाह्यपंक्तिगतैकपदे दक्षिणस्फिचि ॐमृगाय० १६ नैर्ऋत्यकोणपदैकपदे पादयोः ॐपितृभ्यो० १७ तदुत्तरैकपदे

वामस्फिचि ॐदौवारिकाय० १८ तदुत्तरे ततोपि प्रागिति पदद्वये वामजंघायां ॐ सुब्रीवाय० १९ तदुत्तरे पदद्वये वामजानौ ॐपुष्पदंताय० २० तदुत्तरे पदद्वये वामोरौ ॐजलाधिपाय० २१ तदुत्तरे पदद्वये वामपार्श्वे ॐअसुराय० २२ तदुत्तरे पदद्वये वामपार्श्वे एव ॐशेषाय० २३ तदुत्तरे बाह्यपंक्तिगतैकपदे वाममणिबंधे ॐपापाय० २४ वायव्यकोणपदे वामबाहौ ॐरोगाय० २५ तत्प्रागेकपदे वामप्रबाहौ ॐअहिर्बुध्न्याय० २६ तत्प्राकूततोपि दक्षिणेचेति पदद्वये वामकूर्परे ॐमुख्याय० २७ तत्प्राकूपदद्वये वामबाहौ ॐभल्लाटाय० २८ तत्प्राकूपदद्वये वामबाहौ ॐसोमाय० २९ तत्प्राक्पदद्वये वामांसे ॐसर्पेभ्यो० ३० तत्प्राकू पदद्वये वामश्रोत्रे ॐदितयेन० ३१ तत्प्राक् बाह्यपंक्तिगतैकपदे वामनेत्रे ॐअदितयेन० ३२ तत आग्नेयकोपणदाद्दधःकोणपदे वामहस्ते ॐ आपाय० ३३ नैर्ऋत्य पदादधः कोणपदे कपदे ॐ सावित्राय० ३४ वायव्यकोणाधः कोणपदे वामहस्ते ॐ जयाय० ३५ ईशानकोणपदाधः कोणपदे मेंढ्रे ॐ रुद्राय० ३६ मध्यगतनवकोष्टकब्रम्हपदसलग्नप्रागादि पदत्रये दक्षिणस्तने ॐअर्यम्णे० ३७ तद्दक्षिणैकपदे दक्षिणहस्ते ॐ सवित्रन० ३८ तत्पश्चिमे ब्रम्हसल्लग्नपदत्रये जठरदक्षिणभागे ॐविवस्वतेन० ३९ तत्पश्चिमैकपदे वृषणयोः ॐ विबुधाधिपाय० ४० तदुत्तर ब्रम्हसल्लग्नपदत्रये वामजठरभागे ॐ मित्राय० ४१

तदुत्तरैकपदे वामहस्ते ॐ राजयक्ष्मणे० ४२ तस्मात्
पदत्रये वामस्तने ॐ पृथ्वीधराय० ४३ तत्प्रागेकपदे
उरसि ॐ आपवत्साय० ४४ ततो मध्यनवपदे हृन्ना-
भ्योः ॐ ब्रम्हणे ४५ तदुत्तरे वास्तोष्पते वसिष्टो वा-
स्तोष्पति स्त्रिष्टुप् वृषवास्तुप्रतिष्ठापने विनियोगः ॐ वा-
स्तोष्पते प्रति० इति सुवर्णादिप्रतिमाअग्न्युत्तारणपूर्वकं
संस्थाप्य मंडला द्वहि रीशानादिकोणचतुष्टयेषॐ चरक्यै०
४६ ॐ विदार्यै० ४७ ॐ पूतनायैन० ४८ ॐ पाप-
राक्षस्यै० ४९ ततः पूर्वादिचतुर्दिक्षु ॐ स्कंदायन०
५०ॐ अर्यम्णे०५१ॐ जृंभकाय०५२ पिलिपिच्छायन०
५३ ततः पूर्वाद्यष्टदिक्षु ॐ इंद्राय न०५४ ॐ अग्नये न०
५५ ॐ यमाय न० ५६ ॐ निर्ऋतये न० ५७ ॐ व-
रुणाय न० ५८ ॐ वायवे न० ५९ ॐ कुबेराय न०
६० ॐ ईशानाय नमः ६१ इति आवाह्य वास्तुपी-
ठदेवताभ्यो नम इति संपूज्य मंडलादीशान्यां कलशं
संस्थाप्य तत्र वरुणाय० इति वरुणं संपूज्य प्रार्थयेत्
यथामेरुगिरेः शृंगं देवानामालयः सदा। तथा ब्रह्मा-
दिदेवानां गृहे मम स्थिरो भव इति संप्रार्थ्य ततः
स्वतंत्रस्थंडिलेऽग्निस्थापनादि चक्षुष्यंते उदुंबरादि-
समित्तिलाज्यै र्वास्तुमंडलदेवताभ्यो नाममंत्रै र्वास्तुमंत्रेण
च हुत्वा स्विष्टकृदादि पूर्णाहुत्यंतंकुर्यात् ततो मंडल-
देवताभ्यः शिखिने एष पायसबलि र्नमम इत्यादिबलि
न्दत्वा कृणुष्वपाज इति सूक्तादिना मंडलं त्रिसूत्र्या

वेष्टयित्वा कलशोदकेन यजमानमभिषिच्य पुनः संपूज्य यथाशक्ति दक्षिणां दत्वा ब्राम्हणान्भोजये दिति केचित् शारदातिलके तु होमोनोक्तः तिलादिद्रव्याणां विकल्प इति मयूखकारः

इदानीं तु नवग्रहसंकलितमेव प्रयोगं कुर्वंति सांप्रदायिकाः तद्यथा यथा मेरुगिरेः शृंगमितिप्रार्थनोत्तरं वास्तुमंडलानैर्ऋत्यां पश्चिमायांवाकुंडे स्थंडिले वा वरदनामान मग्निं प्रतिष्ठाप्याग्ने रीशान्यां ग्रहान् ग्रहकलशं च संस्थाप्य तत्र वरुणं संपूज्य देवदानवसंवादइत्याद्यैः संप्रार्थ्यान्वादध्यात् अस्मि न्वास्तुशांतिकर्मण्यन्वाधानं करिष्ये अस्मिन्नन्वाहितेत्यादि चक्षुष्यंत मुक्त्वात्र प्रधानं आदित्यं सोमं भौमं बुधं बृहस्पतिं शुक्रं शनिं राहुं केतुं एताः प्रधानदेवताः प्रत्येकं अष्टोत्तरशताष्टाविंशत्यष्टसंख्याकाभि र्वा अर्कादिसमिच्चर्वाज्याहुतिभिः तथा ईश्वरं उमां स्कंदं विष्णुं ब्रह्माणं इंद्रं यमं कालं चित्रगुप्तं अग्निं अपः भूमिं विष्णुं इंद्रं इंद्राणीं प्रजापतिं सर्पान् ब्रह्माणं विनायकं दुर्गां वायुं आकाशं अश्विनौ वास्तोष्पतिं क्षेत्रपालं इंद्रं अग्निं यमं निर्ऋतिं वरुणं वायुं कुबेरं ईशानं एताः त्समिच्च प्रधानदेवता दशांशेन तत्तर्वाज्याहुतिभिः तथा शिखिनं पर्जन्यं जयंतं कुलिशायुधं सूर्यं सत्यं भृशं आकाशं वायुं पूषणं वितथं ग्रहक्षतं यमं गंधर्वं भृंगराजं मृगं पितृन् दौवारिकं सुग्रीवं पुष्प-

दंतं जलाधिपं असुरं शेषं पापं रोगं अहिर्बुध्न्यं मुख्यं भल्लाटं सोमं सर्पं दितिं अदितिं आपं सावित्रं जयं रुद्रं अर्यमणं सवितारं विवस्वतं विबुधाधिपं मित्रं राजयक्ष्माणं पृथ्वीधरं आपवत्सं ब्रम्हाणं चरकीं विदारीं पूतनां पापराक्षसीं स्कंदं अर्यमणं जृंभकं पिलिपिच्छं एताः प्रधानदेवताः प्रतिद्रव्यं अष्टोत्तरशतसंख्या समित्तिलपायसाज्याहुतिभिश्चतसृभि र्ऋग्भिः अष्टोत्तर० समित्तिलचतुर्वारं वृषवास्तोष्पतिं पंचवारं पंचाभि र्बिल्वफलै स्तद्बीजै र्वा यक्ष्ये शेषेण स्विष्टकृत मित्याद्याज्यभागांते यजमान इदं उपकल्पितं हवनीयद्रव्यं अन्वाधानोक्तदेवताभ्यः मया त्यक्तं न ममेत्युक्त्वोत्सृजेत् तत आचार्यादयः ग्रहेभ्यो होमं कृत्वा तिलसमिदाज्यपायसैःशिख्यादिपिलिपिच्छांताभ्यःत्रिपंचाशद्देवताभ्यो नाममंत्रैः प्रत्येक मष्टाविंशत्यष्टाष्टसंख्याकाभि राहुतिभि र्वा हुत्वा वास्तोष्पतिमेतै रेव द्रव्यै र्विवक्षितसंख्यया हुत्वाश्वलायनो वास्तोष्पतेति चतसृभिः प्रत्यृचमृगंते स्वाहाकारं पठन् जुहुयात् नात्र स्वाहाकारांते होमः यवादिहोमे तु वास्तोष्पते इति चत्वारो मंत्राः एकैकेन च मंत्रेण सप्तविंशतिराहुतयः इत्यष्टोत्तरशतं तत एतै श्चतुभि र्वास्तोष्पते ध्रुवास्थूणामित्येकया च एवं पंचभिः पंचबिल्वफलानि तद्बीजानि वा जुहुयात् तत आचार्यः स्विष्टकृतादिप्रायश्चित्तहोमांते यजमानो लोकपालेभ्यो ग्रहपीठदेवताभ्य श्च बली न्दत्वा पूर्णाहुतिं हुत्वा शि-

ख्यादिपंचचत्वारिंशद्देवताभ्यः शिखिने एव पायसबलि र्नममेति इत्याद्युक्तिपूर्वकं सर्वेभ्योऽपि बलिं दत्वा शिख्यादिप्रीतये कांचनं द्विजेभ्यो ब्रम्हप्रीतये धेनुं च दद्यात्

ततो ग्रहकलशवास्तुकलशोदकेन ऋत्विग्भि रभिषिक्तो यजमानः ऋत्विग्भ्यो दक्षिणां दत्वा वाद्यादितूर्यघोषपूर्वकं आचार्यऋत्विग्भिः सकुटुंबो यजमानः राक्षोघ्नपावमानमंत्रै गृहं त्रिसूत्र्या वेष्टयित्वा समंता द्व्रीहियवमतीभि रद्भि र्हिरण्यमवधाय शंतातीयेन शंन इंद्राग्नीति पंचदशऋग्भिरिति नारायणवृत्तिः शंतातीयेन ईळे द्यावापृथिवी इति पंचविंशतिऋग्भिः समुच्चयइति वेत्यन्ये तेन नवाशंका न चोत्तरं त्रिःप्रदक्षिणं परिव्रजन् प्रोक्षत्यविच्छिन्नया चोदकधारया पोहिष्ठामयोभुव इति त्र्यृचेन ततो विच्छिन्नक्षीरधारां च परितो दत्वा वास्तुपीठमध्यनवपदे सुरूपां पृथ्वीं ध्यात्वा पृथिव्यै नम इति संपूज्य सर्वदेवमयं वास्तु सर्वदेवमयं परं इति पठित्वा ततो गृहस्याग्नेयकोणे आकाशपदे यजमानपदेन जानुमात्रं गर्तं खात्वा मध्ये गोमयेनोलिप्य शुभ्रचंदनपुष्पाक्षतै रलंकृत्य सर्वधान्यबीजानि दध्योदनं च क्षिप्त्वा नवजलपूर्णकलशं शतैकपुष्पयुतं गंधाद्यर्चितमादाय जानुभ्या मवनीं गत्वा तज्जलं गर्ते ॐ नमो वरुणायेति मंत्रेण क्षिपेत् जले प्रदक्षिणावर्ते पुष्पे चोर्ध्वमुखे शुभं ततोऽपक्वमृत्पेटिकायां शाल्यादिसप्तधान्यबीजानि दध्योदनं

शैवालं फलपुष्पाणि च क्षिप्त्वा तूर्यघोषेण पूर्वस्थापि-
तवृषवास्तुप्रतिमामानीय पेटिकायां संस्थाप्य पेटिकां
पिधाय पठेत् पूजितोऽसि मया वास्तो होमाद्यै रर्चनैः
शुभैः प्रसीद पाहि विश्वेश देहि मे गृहजं सुखं
वास्तुमूर्ते नमस्ते स्तु भूशय्याभिरत प्रभो। मद्गृहं
धनधान्यादिसमृद्धं कुरु सर्वदेति ततो मृत्पेटिकां गर्ते
स्थापयित्वा सशैलसागरां पृथ्वीं यथावहसि मूर्धनि।
तथा मां वह कल्याणसंपत्संततिभिः सहेति संप्राध्य
तयैव मृदा गर्तं पूरयेत् मृदआधिक्येऽधिकं फलं साम्ये
समं न्यूनत्वे न्यूनं गर्तोपरि गोमयेनोपलिप्य गंधपुष्पा-
क्षतादि निक्षिपेत् तत आचार्यब्रम्हर्त्विजश्च संपूज्य
तेभ्यो दक्षिणां दत्वा ग्रहपीठदेवता वास्तुपीठदेवताश्च
संपूज्य उत्तिष्ठ ब्रम्हणस्पते देव० अभ्यारमिदद्रयो० यांतु
देवगणा इति विसृज्य ग्रहपीठवास्तुपीठाद्याचार्याय
दद्यात् ततः आचार्यः प्रणीताविमोकादिशेषं कर्म समा-
प्यार्दिं विसर्जयेत् ततो यजमानो ब्रम्हशिरव्याद्युद्देशेन
शतं शक्त्या वा ब्राम्हणात् भोजयिष्ये इति संकल्प्य
विप्रान् संपूज्य भूयसीं दत्वा प्रमादा त्कुर्वतां कर्म०
यस्य स्मृत्येत्युक्त्वा कर्मेश्वरार्पणं कृत्वा ब्राम्हणान्
भोजयित्वा तेभ्यः शिवं वास्त्विति त्रिरुक्त्वा शिवं
वास्तु इति विप्रा स्त्रिर्ब्रूयुः ततो यथासुखं सुहृद्युतो

भुंजीतेति एवं विधिना प्रतिसंवत्सरं वास्तूपूजनं कार्यं तेन गृहसंबंधिदुःखं नाप्नुयादित्युक्तं दानविवेके

महादेवतनूजेन श्रीदिवाकरसूरिणा ।
रचिता वास्तुशांते स्तु पद्धति बुधतोषदा ॥

इति पौराणवास्तुशांतिप्रयोगः

---

प्रसंगविशेषीं संक्षेपानें वास्तुशांतीचा प्रयोग.

वास्तुशांतीचा प्रयोग.

कर्त्यानें चांगल्या दिवशीं आचमन करून प्राणायाम करून देश व काल ह्यांचा उच्चार करून " अस्य वास्तोः शुभता साद्दस्यादिक सिध्यर्थं वास्तुशांतिं करिष्ये " ह्याप्रमाणें संकल्प करून त्याच्या अंगभूत गणपतीचें पूजन, पुण्याहवाचन, मातृकांची पूजा, अभ्युदयिक श्राद्ध (नांदी श्राद्ध), आचार्य, ब्रम्हा व ऋत्विक् ह्यांचें वर्णन हीं करून त्यांचें आपले वैभवाप्रमाणें वस्त्रें अलंकार वगैरेनीं पूजन करावें. नंतर आचार्यानें यदत्रसंस्थितंभू हा, अपक्रामंतु० हा, आणि भूतप्रेत पिशाचाद्या अपक्रामंतु राक्षसाः । स्थानादस्माद्व्रजंत्वन्यत्स्वीकरोमि भुवं त्विमां ॥ हा असे तीन मंत्र म्हणून चहूंकडे शिरस फेंकून पंचगव्यानें दिक " शुची वाहव्या० ही, पुनंतुमां देव जना० ही, गृहमाबिभीत० ह्या, आणि एतोन्विन्द्र० " ह्या अशा चार ऋचांनीं घराचें प्रोक्षण करावें, नंतर घराच्या मध्यमार्गीं पूर्वेकडे किंवा

ईशान्येकडे चौकोन चार अंगुळें उंच आणि एक हात लांब व रुंद, असें चौकोन स्थंडिल करून त्याच्या ईशान्य इत्यादि चार कोपऱ्यावर चार लोखंडाचे खिळे जमिनींत पुरावे. ते खिळे 'विशंतु भूतले नागा लोकपालाश्च सर्वशः। अस्मिन्गृहेवतिष्ठंतु आयुर्बलकराः सदा ॥ ह्या मंत्रानें पुरावे. प्रत्येक खिळा पुरतांना मंत्र म्हणावा. नंतर ईशान्यादि चार कोणांवर " अग्निभ्योऽप्यथसर्पेभ्यो येचान्ये तत्समाश्रिताः । तेभ्यो बलिं प्रयच्छामि पुण्यमोदन मुत्तमं ॥ ह्या मंत्रानें प्रत्येक मंत्र म्हणून माषमाक्ति बलि ( उडदानें मिश्र भाताचा बलि ) देऊन पूर्वी केलेल्या स्थंडिलावर कुंकुम इत्यादिकानें किंवा सोन्याच्या अथवा रुप्याच्या शलाकेनें ( तारेनें ) पूर्व पश्चिम, उदकसंस्थ× आणि पूर्वेस समाप्त होणाऱ्या अशा दोन अंगुळाच्या अंतरानें पूर्वी प्रणव आणि शेवटीं नमः हीं पदें लावून दहा नांवांनीं दहा रेषा काढाव्या. तीं दहा नांवें—ॐ ईशानायैनमः, ॐ यशोवत्यैनमः, ॐ कांतायैनमः, ॐ विशालायैनमः, ॐ प्राणवाहिन्यैनमः, ॐ सत्यैनमः, ॐ सुमत्यैनमः, ॐ नंदायैनमः, ॐ सुभद्रायैनमः, ॐ सुव्रतायैनमः ह्याप्रमाणें दहा नांवांनीं दहा रेषा काढाव्या तसेंच " ॐ हिरण्यायैनमः, ॐ सुव्रतायैनमः, ॐ लक्ष्मै०, ॐ विभूत्यै०, ॐ विमलायै०, ॐ प्रियायै०, ॐ विजयायै०, ॐ बालायै०, ॐ विशोकायै०, ॐ इडायैनमः " ह्या दहा नांवांनीं दक्षिणेकडून

× दक्षिणे पासून आरंभ करून उत्तरेकडे समाप्त करणें त्यास उदक संस्थ म्हणतात.

उत्तरेकडे जाणाऱ्या, उत्तरेस संपणाऱ्या आणि प्राकसंस्थ* अशा दहा रेघा काढाव्या म्हणजे एक्याएशी कोष्टकांचें मंडळ होईल. त्यांतील मधली नऊ कोष्टकें पुसून टाकावीं म्हणजे नऊ कोष्टकांचें ब्रम्हस्थान होईल. त्या ब्रम्हस्थानाच्या चार दिशांस तीन पदांचीं अशीं चार कोष्टकें करावीं. विदिशांस ( कोणाकडे ) साखळीच्या आकाराचीं अशीं बारा आणि चार कोणांच्या दोहों बाजूस आठ मिळून एक कोष्टकाची एक पदाची वीस कोष्टकें होतात. बाकी राहिलेलीं प्रत्येक दिशेस पांच पांच अशीं वीस कोष्टकें करावीं.

त्या कोष्टकांत पूर्वीं ॐकार व शेवटीं नमः हीं पदें लावून चतुर्थी विभक्त्यंत पुढें सांगण्यांत येणाऱ्या अशा नांवांनीं देवतांचें आवाहन करून स्थापन करावें. त्यांत ईशान्य कोणाकडल्या पदांत वास्तुच्या मस्तकावर " ॐ शिखिने नमः शिखिनं आवाहयामि " असें म्हणन आवाहन करावें. त्याच्या दक्षिणेकडल्या एक पदांत उजव्या नेत्रावर ( वास्तूच्या ) ॐ पर्जन्यायनमः पर्जन्यं आवाहयामि ह्याप्रमाणें आवाहन करावें. त्याच्या दक्षिणेस आणि त्याच्याही पश्चिमेस मिळून दोन पदांत उजव्या कोणावर ( वास्तूच्या ) ॐ जयंताय० ३ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या दक्षिणेकडे दोन कोष्टकांत उजव्या खांद्यावर " ॐ कुलिशायुधाय० ४ " म्हणून आवाहन करावें. त्याच्या दक्षिणे-

---

* पश्चिमे पासून आरंभ करून पूर्वेकडे समाप्त करणें त्यास प्राक्संस्थ म्हणतात.

कडील दोन पदांत उजव्या बाहूवर ॐ सूर्याय० ५ म्हणून आ-
वाहन करावें. त्याच्या दक्षिणेकडील दोन पदांत उजव्या भुजा-
वर ( दंडावर ) ॐ सत्याय नमः ६ ॥ म्हणून आवाहन करावें.
त्याच्या दक्षिणेकडील दोन पदांत उजव्या कोपरावर ॐ भृशाय
नमः ७ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या दक्षिणेस खांद्याच्या
पंक्तींतील एका पदांत उजव्या प्रबाहुवर ॐ आकाशाय० ८ ॥
म्हणून आवाहन करावें. आग्नेयीकडील कोणाच्या पदांत
उजव्या भुजावर वायवनमः ९ ॥ म्हणून आवाहन करावें.
त्याच्या पश्चिमेकडल्या एका पदांत उजव्या मणगटावर ॐ पु-
ष्णेनमः १० ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या पश्चिमेस आणि
त्याच्याही उत्तरेस मिळून दोन पदांत उजव्या पार्श्वावर ( कुशी-
वर ) ॐ वितथाय० ११ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या
पश्चिमेकडील दोन पादांत उजव्या पार्श्वावरच ॐ गृहक्षताय
नमः १२ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या पश्चिमेकडील
दोन पादांत उजव्या मांडीवर ॐ यमायन० १३ ॥ म्हणून आ-
वाहन करावें. त्याच्या पश्चिमेकडे दोन पादांत उजव्या गुडघ्या-
वर ॐ गंधर्वायन० १४ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या
पश्चिमेकडे दोन पादांत उजव्या पोटरीवर ॐ भृगराजाय० १५
म्हणून आवाहन करावें. त्याच्या पश्चिमेकडल्या बाहेरल्या पंक्तीं-
तील एका पदांत उजव्या घोट्यावर ॐ मृगाय० १६ ॥ म्हणून
आवाहन करावें. नैर्ऋत्य कोणाकडल्या एका पदांत दोन पायां-
वर ॐ पितृभ्यो नमः १७ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या
उत्तरेकडल्या एका पदांत डाव्या घोट्यावर ॐ दौवारिकाय०

म्हणून आवाहन करावें. त्याच्या उत्तरेस आणि त्याच्याही पूर्वेस मिळून दोन पदांत डाव्या पोटरीवर ॐ सुग्रीवायन० १९ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या उत्तरेकडे दोन पदांत डाव्या गुडघ्यावर ॐ पुष्पदंताय० २० ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या उत्तरेकडे दोन कोष्टकांत डाव्या मांडीवर ॐ जलाधि- पायन० २१ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या उत्तरेकडील दोन कोष्टकांत डाव्या कुशीवर ॐ असुरायन० २२ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या उत्तरेकडे दोन कोष्टकांत डाव्या कुशीवरच ॐ शेषाय० २३ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या उत्तरेस बाहेरच्या पंक्तींतील एका कोष्टकांत डाव्या मणगटावर ॐ पापायन० २४ ॥ म्हणून स्थापन करावें. वायव्येकडील कोणाच्या कोष्टकांत डाव्या भुजावर ॐ रोगाय० २५ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या पूर्वेस एका कोष्टकांत डाव्या प्रबाहु- वर ॐ अहिर्बुध्याय० २६ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या पूर्वेस आणि त्याच्याही दक्षिणेस मिळून दोन कोष्टकांत डाव्या कोपरावर ॐ मुख्याय० २७ ॥ आवाहन करावें. त्याच्या पूर्वेस दोन कोष्टकांत डाव्या भुजावर ॐ भल्लाटाय० २८ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या पूर्वेस दोन पदांत डाव्या भुजावर ॐ सोमाय० २९ ॥ म्हणून आवाहन करावें. त्याच्या पूर्वेस कोष्ट- कांत डाव्या स्कंधावर ॐ सर्पेभ्यो० ३० ॥ म्हणून आवाहन क- रावें. त्याच्या पूर्वेस दोन कोष्टकांत डाव्या कानावर ॐ दितये नमः ३१ ॥ आवाहन करावें. त्याच्या पूर्वेस बाहेरल्या पंक्तीं- तील एका कोष्टकांत डाव्या नेत्रावर ॐ अदितयेन० ॥ ३२ म्हणून

आवाहन करावें. त्यापासून आग्नेयीकडील कोणाच्या कोष्टकाच्या खालीं कोण कोष्टकांत डाव्या हातावर ॐ आपाय० ३३ ॥ म्हणून आवाहन करावें. नैर्ऋत्य कोष्टकाच्या खालीं कोणांतील कोष्टकांतून एका कोष्टकांत ॐ सावित्राय ३४ ॥ म्ह. आ. करावें. वायव्य कोणाच्याखालीं कोण कोष्टकांत डाव्या हातावर ॐ जयाय० ३५ ॥ म्ह. आ. करावें. ईशान कोणाच्या कोष्टकाचें खालीं कोणाचे कोष्टकांत मेंढ्रावर ॐ रुद्राय० ३६ ॥ म्ह. आ. करावें. मध्यें असलेल्या नऊ कोष्टकांच्या ब्रम्ह पदाला लागून पूर्वादि तीन कोष्टकांत उजव्या स्तनावर ॐ अर्यम्णे० ३७ ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या दक्षिणेस एका कोष्टकांत उजव्या हातावर ॐ सवित्रेन० ३८ ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या पश्चिमेस ब्रम्ह पदाला लागून तीन कोष्टकांत जठराच्या उजव्या भागांत ॐ विवस्वतेन० ३९ ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या पश्चिमेकडे एका कोष्टकांत वृषणा ( दोन ) वर ॐ विबुधाधिपाय० ४० ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या उत्तरेस ब्रम्ह पदाला लागून तीन कोष्टकांत डाव्या जठराच्या भागांत ॐ मित्राय ४१ ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या उत्तरेस एका कोष्टकांत डाव्या हातावर ॐ राजयक्ष्मणे ४२ ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या पूर्वेस तीन कोष्टकांत डाव्या स्तनावर ॐ पृथ्वीधराय० ४३ ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या पूर्वेस एक कोष्टकांत उरावर ॐ आपवत्सायन० ४४ ॥ म्ह. आ. करावें. नंतर मधल्या नऊ कोष्टकांत हृदय आणि नाभि ह्यांवर ॐ ब्रम्हणे० ४५ ॥ म्ह. आ. करावें. त्याच्या उत्तरेस वास्तोष्पते वसिष्ठोवास्तोष्पति स्त्रिष्टुप् वृषवास्तु प्रतिष्ठायने

विनियोगः ॐ वास्तोष्पते प्रति० ॥ ह्या प्रमाणें मंत्र म्हणून सोनें इत्यादिकाचे प्रतिमेस अग्न्युत्तारण वगैरे करून स्थापन करून मंडळाच्या बाहेर ईशान्यादि चार कोणांत ॐ चरस्यै० ४६ ॐ विदार्यै ४७ ॐ पूतनायैन० ४८ ॐ पापराक्षस्यै० ४९ म्ह. आवाहन करावें. पूर्वादि चार दिशेस ॐ स्कंदायन० ५० ॐ अर्यम्णेन० ५१ ॐ जृंभकाय० ५२ ॐ पिलिपिच्छायन० ५३ म्ह. आ. करावें. नंतर पूर्वेपासून आठ दिशेस ॐ इंद्राय० ५४ ॐ अग्नयेन० ५५ ॐ यमायन० ५६ ॐ निर्ऋतयेन० ५७ ॐ वरुणायन० ५८ ॐ वायवेन० ५९ ॐ कुबेरायन० ६० ॐ ईशानायनमः० ६१ ह्या प्रमाणें आवाहन करून; " वास्तुपीठ देवताभ्योनमः " ह्या मंत्रानें त्यांची (पूर्वोक्त सर्व देवतांची) पूजा करून मंडळाच्या ईशान्येस कलशाची स्थापना करून त्यांत त्यावर " वरुणायनमः " ह्या मंत्रानें वरुणाची पूजा करून प्रार्थना करावी—यथा मेरुगिरेः शृंगं देवानामालयः सदा । तथा ब्रम्हादि देवानां गृहे मम स्थिरोभव ॥ ह्या प्रमाणें प्रार्थना करून नंतर दुसऱ्या स्वतंत्र स्थंडिलावर अग्निची स्थापना झाल्यापासून चक्षुषी भागाच्या शेवटीं उंबर इत्यादिकांच्या समिधा, तीळ, तप ह्यांच्या योगानें वास्तुमंडलांतील देवतांचे नाम मंत्रांनीं आणि वास्तु मंत्रानें हवन करून स्विष्ट कृतापासून पूर्णाहुति पावेतों कर्म करावें. नंतर मंडल देवतांस ' शिखिने एष पायसबलिर्नमम ' ह्या प्रमाणें बलि देऊन " कृणुष्वपाज " इत्यादि सूक्ताच्या योगानें मंडळास तीन सुतांनीं वेष्टन करून कलशांतील उदकानें यजमानास अभिषेक करून पुन्हां देवतांची पूजा करून शक्ति

प्रमाणें ब्राम्हणांस दक्षिणा देऊन त्यांस जेऊं घालावें असें कित्येक म्हणतात. शारदा तिलकांत तर होम सांगितला नाहीं. तिळादि द्रव्यांचा विकल्प आहे असें " मयूखकार " म्हणतो.

सांप्रत तर नवग्रहानें युक्त असाच सांप्रदायिक ( याज्ञिक ) प्रयोग करितात तो असा:—वर सांगितल्याप्रमाणें वरुणाची यथामेरु गिरेः शृंगं. ह्याप्रमाणें प्रार्थना केल्यानंतर वास्तुमंडळाच्या नैर्ऋत्येस किंवा पश्चिमेस कुंडांत किंवा स्थंडिलावर " वरद " नांवाच्या अग्निची स्थापना करून अग्निच्या ईशान्येस नवग्रह आणि कलश ह्यांची स्थापना करून त्या कलशावर वरुणांची पूजा करून " देवदानव संवाद " इत्यादि मंत्रांनीं प्रार्थना करून अन्वाधान करावें तें असें—अस्मिन्वास्तुशांतिकर्मणि अन्वाधानं करिष्ये अस्मिन्नन्वाहित पासून चक्षुषीपावेतों म्हणून पुढें " अत्र प्रधानं आदित्यं, सोमं, भौमं, बुधं, बृहस्पतिं, शुक्रं, शनिं राहुं केतुं एताः प्रधानदेवताः प्रत्येकं अष्टोत्तरशताष्टाविंशत्मेष्टाष्टसंख्याकाभिर्चौ अर्कादिसामिच्चर्वाज्याहुतिभिः तथा ईश्वरं, उमां, स्कंदं, विष्णुं, ब्रह्माणं, इंद्रं, यमं, कालं, चित्रगुप्तं, अग्निं, अपः, भूमिं, विष्णुं, इंद्रं, इंद्राणीं, प्रजापतिं, सर्पान्, ब्रह्माणं, विनायकं, दुर्गां, वायुं, आकाशं, अश्विनौ, वास्तोष्पतिं, क्षेत्रपालं, इंद्रं, अग्निं, यमं निर्ऋतिं, वरुणं, वायुं, कुबेरं, ईशानं, एताः प्रधानदेवता दशांशेन तत्तत्समिच्चर्वाज्याहुतिभिः तथा शिखिनं पर्ज्यन्यं जयंतं, कुलिशायुधं, सूर्यं, सत्यं, भृशं, आकाशं, वायुं, पूषणं, वितथं, ग्रहक्षतं, यमं, गंधर्वं, भृंगराजं, मृडां, पितॄन्, दौवारिकं,

नवग्रहानें युक्त वास्तुशांतिचा प्रयोग.

सुग्रीवं, पुष्पदंतं, जलाधिपं, असुरं, शेषं, पापं, रोगं, अहिर्बुध्न्यं, मुख्यं, भल्लाटं, सोमं, सर्पं, दितिं, अदितिं, आपं, सावित्रं, जयं, रुद्रं, अर्यमणं, सवितारं, विवस्वतं, विबुधाधिपं, मित्रं, राजयक्ष्माणं पृथ्वीधरं, आपवास, ब्रम्हाणं, चरकीं, विदारीं, पूतनां, पापराक्षसीं स्कंदं, अर्यमणं, जृंभकं, पिलिपिच्छं एता: प्रधानदेवता: प्रतिद्रव्यं अष्टोत्तरशतसंख्यया समित्तिलपायसाज्याहुतिभि श्चतसृभिर्ऋग्भिः अष्टोत्तर समितिलचतुर्वारं वृषवास्तोस्पतिं पंचवारं पंचभि र्बिल्वफलै स्तद्बीजैर्वायक्ष्ये शेषेण स्विष्टकृतं " इत्यादि आज्य भागाचे शेवटीं यजमानानें " इदं उपकल्पितं हवनीयद्रव्यं, अन्वाधानोक्त देवताभ्य: मयात्यक्तं नमम " असें म्हणून उत्सर्ग करावा. नंतर आचार्यादिकांनीं ग्रहांचा होम करून तीळ, समिधा, तूप व पायस ह्यांनीं शिखीपासून पिलिपिच्छ पावेतों त्रेपन देवतांचें नाम मंत्रांनीं प्रत्येकीं अठ्ठावीस किंवा आठ आहुतींनीं हवन करून वास्तोष्पतीचें ह्याच द्रव्यांनीं विवक्षित संख्येनें हवन करावें. आश्वलायन शाखीयानें वास्तोष्पते० ॥ ह्या ऋचांनीं प्रत्येक ऋचेस ऋचेच्या शेवटीं स्वाहाकार म्हणून हवन करावें. येथें स्वाहाकाराच्या शेवटीं होम करूं नये. यवादिकांच्या होमाविषयीं तर वास्तोष्पते० हे चार मंत्र एकेक मंत्रानें सत्तावीस आहुति मिळून एकशेंआठ ( आहुति ) होतात. नंतर ह्या चार मंत्रांनीं आणि " वास्तोष्पते ध्रुवास्थूणां " ह्या एकानें मिळून पांच मंत्रांनीं पांच बेलाचीं फळें अथवा त्यांच्या बिया ह्यांचें हवन करावें. नंतर आचार्यानें स्विष्टकृतादि प्रायश्चित्त होमाचे शेवटीं यजमानाकडून लोकपाल आणि ग्रहपीठावरील

देवता ह्यांस बलि देऊन पूर्णाहुति करून " शिखीइत्यादि पंचेचाळीस देवतांस शिखीने एष पायसबलिर्नमम " ह्या प्रमाणें म्हणून सर्वांस बलि देऊन शिख्यादिकांची प्रीती ( होण्या ) साठीं आणि ब्रम्ह्याच्या प्रीती साठीं ब्राह्मणास अनुक्रमें सोनें आणि गाय द्यावी.

यजमानास अभिषेक करणें, गृहास सूत्र वेष्टन करणें आणि भूमींत वृषवास्तु पुरणें, इत्यादि.

नंतर ग्रह आणि वास्तु ह्यांच्या कलशांतील उदकानें ऋत्विजांनीं अभिषेक केलेल्या यजमानानें ऋत्विजांस दक्षिणा देऊन नंतर कुटुंबासह यजमानानें आचार्य व ऋत्विज् ह्यांसह वाद्यांचा घोष होत असतां ( वाद्यें वाजत असतां ) राक्षोघ्न, पावमान ह्या मंत्रांनीं गृहास तीन सूतांनीं ( तिसूतीनें ) वेष्टन करून भोंवतीं (घराचे) डांगर (भात) व जव हीं ज्यांत टाकिलीं आहेत अशा उदकांशीं सोन्याचा संबंध करून " शंतातीयेन शन्न इंद्राग्नि " अशा पंधरा ऋचांनीं अभिषेक करावा असा नारायणवृत्तींत प्रयोग आहे. " शंतातीयेन ईळे द्यावा पृथ्वी० " अशा पंचवीस ऋचांनीं अभिषेक करावा असें दुसरे म्हणतात. त्यावरून शंका नाहीं आणि उत्तरही नाहीं. ह्या प्रमाणें तीन प्रदक्षिणा करून " आपोहिष्ठामयोभुव० " ह्या तीन ऋचांनीं अविछिन्न ( अखंड ) अशी पाण्याची धार फिरवून नंतर घराच्या भोंवतीं अविछिन्न ( अखंड ) अशी दुधाची धार फिरवून नंतर वास्तुपीठा मधल्या नऊ कोष्टकांत सुरूप अशा पृथ्वीचें ध्यान करून " पृथिव्यैनम " ह्या मंत्रानें पूजन करून " सर्व देवमयं वास्तु सर्व देवमयं परं " ह्या प्रमाणें म्हणून

नंतर घराच्या आग्नेय कोणास आकाश पदांत यजमानाच्या पायानें गुडघ्या एवढा खाडा खणून तो शेणानें लिंपून, पांढरें चंदन, फुलें व अक्षता ह्यांनीं सुशोभित करून सर्व धान्यांचीं बीजें आणि दही भात टाकून चांगल्या पाण्यानें भरलेल्या घड्याची, फुलांची माळा गंध वगैरे ह्यांनीं पूजा करून गुडघ्यांनीं ( ढोपरांनीं ) जमिनीवर चालत जाऊन तें पाणी ( घड्यांतील ) खाड्यांत " ॐ नमो वरुणाय " ह्या मंत्रानें ओतावें. पाण्यांत फुल वर तोंड झालेलें असें वाटोळें प्रदक्षिणाकार फिरेल तर शुभ जाणावें. नंतर मातीच्या कच्च्या पेटींत ( डांगर ) भात इत्यादी सात धान्यें, दही भात, शेवाळ आणि फळें व फुलें घालून वाद्यांच्या घोषानें पूर्वीं स्थापन केलेली ( पीठावर ) वृषवास्तुची प्रतिमा आणून तिला पेटींत घालून पेटी बंध करून

" पूजितोऽसि मयावास्तो होमाद्यैरर्चनैः शुभैः ।
प्रसीद पाहि विश्वेश देहिमे गृहजं सुखं ।
वास्तुमूर्त नमस्तेऽस्तु भूशय्याभिरत प्रभो ।
मद्गृहं धनधान्यादि समृद्धं कुरु सर्वदा " ॥

ह्या प्रमाणें मंत्र म्हणून ती पेटी खाड्यांत ठेवून " सशैलसागरां पृथ्वीं यथावहसि मूर्धनि । तथा मांवहकल्याण संपत्संततिभिः सह" ह्या प्रमाणें प्रार्थना करून लागलींच मातीनें खाडा पुरावा. जर माती अधिक झाली तर फळ अधिक, (बराबर) सारखी झाली तर सारखें ( मध्यम ) फळ आणि कमी झाली तर कमी फळ समजावें. नंतर खाड्यावर शेणानें सारवून गंध, फुलें अक्षता वगैरे टाकावें.

नंतर यजमानानें आचार्य, ब्रम्हा आणि ऋत्विज यांची

आचार्य वगैरेंची पूजा करणें, त्यांस दक्षिणा देणें, देवतांचें विसर्जन, ब्राम्हणभोजन, व भूयसी कर्मांची समाप्ति.

पूजा करून त्यांस दक्षिणा देऊन गृहपीठ देवता आणि वास्तुपीठ देवता यांचें पूजन करून "उत्तिष्ठ ब्राम्हणस्पते देव० अभ्यारमिदद्रयो० यांतुदेवगणा" यांनीं विसर्जन करून गृहपीठ आणि वास्तुपीठ वगैरे आचार्यास द्यावें. नंतर आचार्यानें प्रणीताविमोकादि शेष कर्म संपवून अग्नीचें विसर्जन करावें. नंतर यजमानानें "ब्रम्हशिखाद्युद्देशेन शतं वा शक्त्या ब्राम्हणान् भोजयिष्ये" याप्रमाणें संकल्प करून ब्राम्हणांची पूजा करून त्यांस भूयसी देऊन "प्रमादात्कुर्वतां कर्म० यस्यस्मृत्या" इत्यादि मंत्र म्हणून कर्म ईश्वरास अर्पण करून ब्राम्हणास भोजन घालून त्यांस "इतिमवंतो ब्रुवंतु। शिवं वास्तु" असें तिनदां म्हणून नंतर ब्राम्हणांनीं "शिवं वास्तु" असें तिनदां म्हणावें, नंतर इष्टमित्रांसह भोजन करावें ह्या विधिप्रमाणें प्रत्येक वर्षीं वास्तुपूजा करावी त्या योगानें घराचें संबंधानें दुःख प्राप्त होणार नाहीं असें "दानविवेकांत" सांगितलें आहे.

(ह्याप्रमाणें) महादेवाचा पुत्र पंडित श्री दिवाकर ह्यानें विद्वानांस आनंद देणारी वास्तुशांतीची पद्धति सुरू केली.

ह्याप्रमाणें पौराण वास्तुशांतीचा प्रयोग सांगितला.

\+ अथाश्वलायनगृह्योक्तवास्तुशांति प्रयोगः

। तद्यथा । काष्ठादिनिर्मितं संपन्नं धान्यादिसर्वोपस्करयुतं शोभने मुहूर्ते ब्राम्हणैः सह तूर्यघोषेण गृहं प्रविश्यागारमध्ये प्राङ्मुख उपविश्य दर्भेषु दर्भान्धारयमाणः पत्न्या सहाचम्य प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य ममास्य वास्तोः शुभतासिध्यर्थं वास्तुशांतिं करिष्ये इति संकल्प्य तदंगत्वेन गणपतिपूजनं पुण्याहवाचनं मातृकापूजनं नांदीश्राद्धं च कृत्वा पूर्वोक्तवास्तुपीठदेवतास्थापनार्चनहोमबलीदानत्रिसूत्रीगृहवेष्टनाभिषेचनब्राम्हणभोजनसंकल्पांतं कृत्वा आश्वलायनगृह्योक्तां वास्तुशांतिं कुर्यात् । शुचिदेशे चतस्रः शिलाः संस्थाप्य तासु दुर्वा निधाय तत्र मणिकसंज्ञं मृद्भांडं संस्थाप्य एतै मंत्रैः " पृथिव्यां अधिसंभवेति० " अरंगरोवावदीति त्रेधाबद्धो वरत्रया इरामुह प्रशंसति अनिरामपबाधता मितिवा । ततो मणिके जलमासिंचे दनेन मंत्रेणऐतु राजा वरुणो रेवतीभि रस्मिंस्थाने तिष्टतु मोदमानः । इरां वहंतो घृतमुक्षमाणा मित्रेण साकं सह संविशंत्विति तत स्तज्जलं पात्रांतरे आदाय तस्मि न्दूर्वा

---

\+ इदानीं सूत्रोक्त शांति रभिधीयते साच द्विजातीनां पूर्वोक्तया समुच्चीयते । पूर्वोक्तायांत्वशक्तौ स्वगृह्योक्तैवकर्तव्या तथापिसिद्धेः । बव्हल्पंवास्वगृह्योक्तं यस्य कर्म प्रकीर्तितं । तस्यतावती शास्त्रार्थे कृते सर्वःकृतो भवेदितिवचनात् । येषां गृह्यंनास्तितेषां शुद्राणांच पूर्वोक्तैव सर्वसाधारण्येन विधानात् । गृहाभ्यासतत्वनभूमावमात्रविषयत्वं तस्मात गृह्योक्ता पूर्वया समुच्चीयते सांप्रदायिकैः

शमीशाखाउदुंबरशाखाव्रीहियवान् फलं हिरण्यं च
क्षिप्त्वादुर्वाभिःशाखाभ्यां च सर्वं गृहं प्रागादितःप्रदक्षिणं
परिव्रज न्प्रोक्षेदनेन सूक्तेन शंन्नइंद्राग्नीति पंचदशचेस्य
सूक्तस्य वसिष्ठो विश्वेदेवा स्त्रिष्टुप् गृहप्रोक्षणे वि०
सकृत्सूक्तपाठः इति नारायणवृत्त्यनुरोधात् वस्तुत स्तुशं-
तातीयेनेति ईळे द्यावेति वर्गपंचकै रित्यन्ये एवं सति
समुच्चये न कोऽपि विरोधः तद्यथा ईळेद्यावेति पंचविं-
शर्चसूक्तस्याप्त्यमुतआश्विन माद्यौ पादौ लिंगोक्तदेवता
जगत्योंत्ये त्रिष्टुभौ गृहप्रोक्षणे विनि० ईळे द्यावा पृथिवी
वर्ग ५। अत्रापि सकृदेवसूक्तपाठः ततः प्रागादित
स्त्रिराविछिन्नामुदकधारां दद्यादनेनापोहिष्ठेति त्र्यृचस्यां-
बरीषः सिंधुद्वीपआपो गायत्री गृहस्य समंता द्धारायां
विनि० आपोहिष्ठामयोभु० ३ अत्रापि सकृदेव मंत्रपाठः
ततो वास्तुपीठा न्नैर्ऋत्यां पश्चिमायां वा कुंडे स्थंडिले
वागृह्याग्निं वरदनामकं संस्थाप्य चत्वारिशृंगेति ध्यात्वा
स्मिन्वास्तोष्पतिस्थालीपाके अन्वाधानं करिष्ये ।
अस्मिन्नन्वाहिते ग्नावित्यादि चक्षुषी आज्येनेत्यंत
मुक्त्वात्र प्रधानं वास्तोष्पतिं चतुर्वारं चरुणा शेषेण
स्विष्टकृतमित्यादि सद्यो यक्ष्ये इत्यंतमुक्त्वा न्वाधाय
इध्माबर्हिषी सन्नह्य परिसमूहनादि पूर्णपात्रनिधानांतं
कृत्वा वास्तोष्पतये चतुःकृत्वा तूष्णीं निरुप्य तत्सं-
स्कृत्या तथैव प्रोक्ष्यातधाताद्याज्यभागांतं कृत्वा वदान-
धर्मेण चरु मवदाय वास्तोष्पत इतिचतसृणां वसिष्ठो

वास्तोष्पति स्त्रिष्टुप्अंत्या गायत्री वास्तोष्पतिप्रधानचरु होमे विनियोगः । ॐ वास्तोष्पते० दे स्वाहा ॥ अत्र ऋगंते स्वाहाकारं पठन् जुहूयात् न स्वाहाकारांते होमः गृह्ये तु प्रत्यृचं हुत्वेत्युक्तेः एवं सर्वत्र वास्तोष्पतय इदं नमम । पुनः चरुमवदाय ॐ वास्तोष्पते प्रति० वास्तोष्पतय इदंन० ॥ २ ॥ वास्तोष्पते शग्म० वास्तोष्पतय इ० ॥ ॐ अमीवहा वास्तो० वास्तोष्पतय इ० सर्वत्र त्यागः । ततः स्विष्टकृदादिहोमशेषं समाप्य शिष्टेन चरुणान्येन स्वादुव्यंजनपायसादियुतेन शतं तदर्धंवा शक्त्या वा ब्राम्हणान् भोजयेत् होमात्पूर्व मन्यः पाको न कार्यः ततः शिवं वास्तु शिवंवास्तु शिवं वास्त्विति त्रिः प्रत्युक्तः सुहृद्युतो भुंजीतेति । विशीर्णगृहसञ्जीकरणे पीष्यते वास्तोष्पतिस्थालीपाकः साधारणशांतिवत्

इत्याश्वलायनगृह्योक्तवास्तुशांतिः

---

गृह्यसूत्रांत सांगितलेली वास्तुशांति शास्त्रार्थ करण्याविषयीं.

आतां सूत्रांत सांगितलेली शांति सांगण्यांत येते. आणि तिचा द्विजाति[१] ह्यांस पूर्वी सांगितलेल्या वास्तुशांतींत समावेश होतो. पूर्वी सांगितलेली शांति करण्यास शक्ति नसल्यास आपल्या गृह्यसूत्रांत सांगितलेलीच करावी.

---

१ ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे द्विजाति होत.

कारण, ×बव्हल्पं वास्वगृह्योतं यस्य कर्म प्रकीर्तितं । तस्य तावति शास्त्रार्थे कृते सर्वः कृतो भवेत् ॥ असें वचन आहे त्यावरून ती केली असतांही सिद्धि होते. ज्यांस गृह्यसूत्र नाहीं अशांस आणि शूद्रांस पूर्वी सांगितलेलीच योग्य आहे, कारण सर्वांस सारखा साधारण विधी आहे, म्हणून ही केवळ शूद्रत्वाविषयीं नाहीं, त्यावरून याज्ञिक सांप्रदायिका हिचा पूर्वी सांगितलेल्या शांतींत समावेश करतात.

### आश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितलेल्या वास्तुशांतीचा प्रयोग.

अश्वलायनगृह्य सूत्रांत सांगितलेल्या वांस्तुशांतीचा प्रयोग.

तो असा—लाकडें वगैरे ह्यांनीं तयार केलेलें संपत्ति, धान्य वगैरे सर्व साधनांनीं युक्त अशा घरांत चांगल्या मुहूर्तावर ब्राम्हणासह वर्तमान वाद्यें वाजत असतां प्रवेश करून मधल्या घरांत दर्भांवर ( दर्भांच्या आसनावर ) पत्नीसह बसून दर्भ धारण करून ( पवित्र घालून ) आचमन व प्राणायाम करून देश व काळ ह्यांचा उच्चार करून "ममास्यवास्तोः शुभतासिध्यर्थं वास्तुशांतिं करिष्ये" या प्रमाणें संकल्प करून त्याच्या अंगभूत गणपतीचें पुजन, पुण्याहवाचन, मातृकांचें पूजन आणि नांदीश्राद्ध हीं करून पूर्वी सांगितलेलें वास्तुपीठ, देवतांचें स्थापन, पुजन, होम, बलिदान, तीन सूतांनीं घराचें वेष्टन, अभिषेक, ब्राम्हण भोजनाच्या संकल्पा पावेतों कर्म करून अश्वलायन गृह्यसूत्रांत सांगितलेली वास्तुशांति करावी.

---

× ज्याचें पुष्कळ किंवा थोडें असें आपल्या गृह्यांत सांगितलेलें कर्म सांगितलें असतें त्याचा तेवढा शास्त्रार्थ केला म्हणजे तो केल्या प्रमाणें होतो.

स्वच्छ अशा जागेंत चार शिळा ( दगड ) मांडून त्यांवर दूर्वा ठेऊन त्यांवर माणिक नांवाचें मातीचें भांडें ( रांजण ) पृथिव्यां अधिसंभवेति अरंगरोवावदिति, त्रेधाबद्धोवरत्रया इरामुह प्रशंसंति अथवा अनिरामय बाधतां० या मंत्रांनीं ठेऊन त्यांत " एतु राजा वरुणो रेततीभि रस्मिस्थाने तिष्ठतु मोदमानः । इरां वहंतो घृत मृक्षमाणा मित्रेण साकंसह संविशंतु " ह्या मंत्रानें पाणि घालावें. नंतर तें पाणी दुसऱ्या भांड्यांत घेऊन त्यांत दूर्वा, शमीची फांदी, ऊंबराची फांदी, भात ( डांगर ) जव, फळ (सुपारी) आणि हिरण्य (सोनें) टांकून दूर्वांनीं आणि फांद्यांनीं सगळें घर पूर्वेपासून प्रदक्षिणा करतांनां पुढील सूक्तानें प्रोक्षण करावें. त्याचें सूक्त—" शन्न इंद्राग्नीति पंचदशर्चस्य सूक्तस्य वसिष्ठो विश्वेदेवा त्रिष्टुप् गृहप्रोक्षणे विनियोगः" याप्रमाणें एकच वेळ सूक्ताचा पाठ करावा असें नारायण वृत्तिच्या अनुरोधावरून दिसते. वास्तविक म्हटलें तर " शंतातीयेन " हेंच सूक्त घ्यावें. " ईळे द्यावा. " ह्या पांच वर्गांनीं असें दुसरे म्हणतात. असें असतां समुदायांत कोणताही विरोध नाहीं. तो असा " ईळे द्यावेति पंचविंशर्चं सूक्तस्यात्मसूत आश्विन माघौ पादौ लिंगोक्तदेवता जगत्योंत्येत्रिष्टुभौ गृहप्रोक्षणेविनि० ईळेद्यावा पृथिवी वर्ग ५॥ येथेंही एकच वेळ सूक्ताचा पाठ करावा. नंतर पूर्वेपासून " आपोहिष्ठेति त्र्यृचस्यांबरीषः सिंधुद्वीप आपो गायत्री गृहस्य समंता द्धारायां विनियोगः " आपोहिष्ठामयो० ह्या तीन मंत्रांनीं अखंड अशी पाण्याची धारा तीनदां घराभोंवती फिरवावी. मंत्र एकच वेळ म्हणावे.

नंतर वास्तुपीठाच्या नैर्ऋतीस किंवा पश्चिमेस कुंडांत किंवा स्थंडिलावर वरद नांवाच्या गृह्याग्नीची स्थापना करून " चत्वारि शृंगा० " ह्या मंत्रानें ध्यान करून " अस्मिन्वास्तोष्पतिं स्थालीपाके अन्वाधानं करिष्ये " अस्मिन्नन्वाहितेऽग्नौ पासून चक्षुषी आज्येन पावेतों म्हणून पुढें अत्रप्रधानं वास्तोष्पतिं चतुर्वारं चरुणा शेषेण स्विष्टकृतं पासून सद्यो यक्ष्ये पावेतों म्हणून अन्वाधान करून इध्मावबर्हिषी ह्यांचें सन्नहन करून परिसमूहनापासून पूर्णपात्र निधान पावेतों कर्म करून वास्तोष्पतये ह्यानें चारदा निरूपण करून त्या संख्येनें तसेंच प्रोक्षण करून अवघाता पासून आज्य भागापावेतों कर्म करून अवदानाचें धर्मानें चरु ( भात ) घेऊन " वास्तोष्पतइति चतसृणां वसिष्ठो वास्तोष्पति स्त्रिष्टुप् अंत्या गायत्री वास्तोष्पति प्रधानचरुहोमे विनि० ॐ वास्तोष्पते प्रतिजा० ष्पदेस्वाहा " ह्याप्रमाणें ऋचेच्या शेवटीं स्वाहाकार म्हणतांना हवन करावें. स्वाहाकाराच्या शेवटीं होम देऊं नये. कारण, गृह्यांत तर प्रत्येक ऋचेला होम करावा असें सांगितलें आहे. ह्याप्रमाणें सर्व ठिकाणीं जाणावें. नंतर पुढें " वास्तोष्पतय इदं नमम " असें म्हणावें. नंतर पुन्हा चरु घेऊन " ॐ वास्तोष्पते० वास्तोष्पतयइदं० ॐ वास्तोष्पते शग्मया० वास्तोष्पतय इ० ३ ॐ अमीवहावास्तोष्पते० वास्तोष्पतय इ० ४ " ह्याप्रमाणें सर्व ठिकाणीं त्याग करावा. नंतर स्विष्टकृदादि बाकी राहिलेला होम समाप्त करून नंतर रुचकर चटण्या पायस वगैरेनें युक्त अशा बाकी राहिलेल्या आणि दुसऱ्या भातानें शंभर किंवा पन्नास ब्राम्हणांस जेऊं घालावें. होमाच्या

पूर्वी दुसरा पाक करूं नये. नंतर यजमानानें शिवं वास्तु, शिवं वास्तु, शिवं वास्तु असें तीनदां ब्राम्हणांकडून म्हणवून इष्टमित्रांसह भोजन करावें. ह्याप्रमाणें मोडलेले घर नीट केलें असतांही वास्तोष्पतिस्थालीपाक साधारण शांतीप्रमाणें इष्ट आहे.

ह्याप्रमाणें आश्वलायनगृह्यसूत्रांत सांगितलेली वास्तुशांति सांगितली.

---

अथ गृहदानप्रयोगः

यजमानः कृतनित्यक्रियः पुण्यकाले गृहमध्ये दक्षिणभागे चंदनेनाष्टदलं पद्मं विलिख्य तदुपरि प्रस्थमात्रं तिला न्निक्षिप्य तदुपरि शय्यां सोपस्करां स्थापयित्वा शय्योपरि सौवर्णमयीं लक्ष्मीनारायणप्रतिमां अग्न्युत्तारणपूर्वकं पंचामृतादिना अभिषिच्य संपूज्य प्रतिगृहीतारं च सपत्नीकं वृत्वा तं करे गृहीत्वा मंगलतूर्यघोषेण मंत्रैर्गृहं प्रवेशयेत् ते च मंत्राः

एह्येहि नारायण दिव्यरूप सर्वामरैर्वंदितपादपद्म ।

शुभाशुभानंदशुचामधीश लक्ष्मीयुतस्त्वं च गृहं गृहाण ।
नमः कौस्तुभनाथाय हिरण्यकवचाय च ।
क्षीरोदार्णवसुप्ताय जगद्धात्रे नमोऽस्तुते ।
नमो हिरण्यगर्भाय विश्वगर्भाय वै नमः ।
चराचरस्य जगतो गृहभूताय वै नमः ।

भूर्लोकप्रमुखा लोकास्तव देहे व्यवस्थिताः ।
नंदंति यावत्कल्पांतं तथास्मिन्भवने गृही ।
त्वत्प्रसादेन देवेश पुत्रपौत्रावृतो गृहे ।
पंचयज्ञक्रियायुक्तो वसेदाचंद्रतारक मिति

ततस्तं पूर्वस्थापितशय्याया मुदङ्मुखमुपवेश्य सपत्नीकं यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य स्वयमासने प्राङ्मुखो दर्भेष्वासीनो दर्भान्धारयमाणः पत्न्या सह प्राणानायम्य देशकालौ संकीर्त्य मम समस्तपापक्षयपूर्वककल्पकोटिशतावधिब्रह्मलोकमहीयमानकामः शिलाकाष्ठपक्केष्टिकादिनिर्मितयथोपपत्तिसंपादितं ताम्रादिभाजनसर्वधान्यलवणघृततैलगुडशर्करागोमहिषीबलीवर्ददासदासीमंचकतूलिकाद्वयवितानादर्शतांबूलायतनैलालवंगादिवर्षपर्याप्तसर्वोपकरणान्वितं सदीपिकाप्रद्योतितं +विश्वकर्मदैवतं शक्रदैवतं वेदं गृहं गोत्राय शर्मणे अमुकशाखाध्यायिने सपत्नीकाय सालंकृताय सुपूजिताय लक्ष्मीनारायणप्रतिमासहितं तुभ्यमहं संप्रददे न ममेति दत्वा पठेत् मंत्रौ तु

इदं गृहं गृहाण त्वं सर्वोपस्करसंयुतं ।

तव विप्रप्रसादेन मम संतु मनोरथाः ।
गृहं मम विभूत्यर्थं गृहाण त्वं द्विजोत्तम ।
प्रीयतां मे जगद्योनि र्वास्तुरूपी जनार्दनः ।

---

+ सर्वदैवतं असें मयूख आणि हेमाद्रि ह्यांत आहे.

ततः प्रतिगृहीता गृहमध्यस्तंभं बहिर्द्वारदेहलीं वा सं-
स्पृश्य देवस्यत्वेति यजुषा प्रतिगृह्य स्वस्तीत्युक्त्वा यथा-
शाखं कामस्तुतिं पठेत् ततः सुवर्णसहस्रमारभ्य एक
सुवर्णपर्यंतं यथाशक्त्या वित्तशाठ्यविवर्जितां दक्षिणां
दद्यात् ततः पादकोपानच्छत्रचामरादिकं दत्वा संपन्नं
गृहोपस्करादित्युक्त्वा सर्वं सुसंपन्नं पूर्णमेवास्त्विति प्र-
तिवचनं दद्यात् ततो ब्राम्हणान् संपूज्य भूयसीं दक्षिणां
दत्वाशिषो गृण्हीयात् प्रमादात्कुर्वतां० यस्य स्मृत्येति
कर्मेश्वरार्पणं कुर्यात्

गृहदानफलमुक्तं मात्स्ये—

यएवं सर्वसंपन्नं पक्वेष्टं विनिवेदयेत् ।
कल्पकोटीशतं यावद्ब्रम्हलोके महीयते ।
शैलजं दारुजं वापि यो दद्या द्विधिपूर्वकं ।
वसे त्क्षीरार्णवे रम्ये नारायणसमीपतः ।
मृन्मयं वापि यो दद्या द्गृहं सोपस्करान्वितं ।
पुरेषु लोकपालानां प्रतिमन्वंतरं वसेदिति अत्र प्राविश्य ।

प्रतिगृण्हीयात् इत्युक्तेः प्रविश्य गृहद्वारदेहलीं संस्पृश्य
देहल्यां प्रतिग्रहः कर्तव्यः । तथैव संस्पृश्य स्थूणां द्वार-
देहलीं वा संस्पृश्य प्रतिगृण्हीयादिति सांप्रदायिकाः

इति गृहदानप्रयोगः

## घराच्या दानाचा प्रयोग.

घर दान देण्याचा प्रयोग.

यजमानानें पुण्यकारक दिवशीं नित्यकर्म करून घरामध्यें दक्षिणेच्या बाजूस चंदनाचें आठ पत्राचें कमळ काढून त्यावर एक§ प्रस्थमार तांळ पसरून त्यांच्यावर उपस्करानें+ युक्त अशी शय्या* स्थापन करून तिच्यावर सोन्याचे लक्ष्मीनारायणाचे प्रतिमेस स्थापन करून तिचें अग्न्युत्तारण पंचामृत वगैरेनीं अभिषेक व पूजन करून नंतर पत्नीसह प्रतिग्रह घेणाऱ्याचें वर्णन करून त्याला हातांत धरून मंगलकारक वाद्यें वाजत असतां पुढील सांगितलेल्या मंत्रांनीं घरांत आणावा. ते मंत्र—" एह्येहि नारायण दिव्यरूप सर्वामरै वंदितपादपद्म । शुभाशुभानंद शुचामधीश लक्ष्मीयुतस्त्वं च गृहं गृहाण । नमः कौस्तुभनाथाय ।हिरण्य कवचायच । क्षीरोदार्णव सुप्ताय जगद्धात्रे नमोस्तुते । नमो हिरण्यगर्भाय विश्वगर्भायवैनमः । चराचरस्य जगतो गृहभूतायवैनमः । भूर्लोक प्रमुखालोका स्तवदेहे व्यवस्थिताः । नंदंति यावत्कल्पांतं तथास्मिन्भवने गृही । त्वत्प्रसादेन देवेश पुत्रपौत्रावृतो गृहे । पंचयज्ञ क्रियायुक्तो वसेदाचंद्रतारकं "

नंतर त्याला ( प्रतिग्रह घेणाऱ्याला ) पूर्वीं ठेवलेल्या शय्येवर पत्नीसह बसवून आपले शक्तिप्रमाणें त्याची वस्त्र अलंकार

---

§ पृ. ४९ टीप पहा.

+ साहित्य--गादी, चादर वगैरे.

* पलंग.

वगैरेंनीं पूजा करून पत्नीसह स्वतः दर्भाचे आसनावर पूर्वेकडे तोंड करून बसून हातांत दर्भ धारण करून ( पवित्र घालून ) प्राणायाम करून देश व काल ह्यांचा उच्चार करून " मम समस्त पापक्षयपूर्वक कल्पकोटि शतावधि ब्रम्हलोक महीयमानकामःशिलाकाष्ठपक्वेष्टिकादिनिर्मितयथोपपत्तिसंपादितंताम्रादिभाजनसर्वधान्यलवणघृततैलशर्करागोमहिषीबलीवर्दंदासदासीमंचकतूलिकाद्वयवितानादर्शतांबूलायतनैलालवंगादिवर्षपर्याप्तसर्वोपकरणान्वितंसदीपिकाप्रद्योतितं विश्वकर्मदैवतं शक्रदैवतंवा इदं गृहं गोत्राय शर्मणे अमुकशाख्याध्यायिने सपत्नीकाय सालंकृताय सुपूजिताय लक्ष्मीनारायण प्रतिमासहितं तुभ्यमहं संप्रददे न मम ॥ ह्या प्रमाणें संकल्प करून हे दोन मंत्र म्हणावे—

इदं गृहं गृहाणत्वं सर्वोपस्करसंयुतं ।
तव विप्र प्रसादेन मम संतु मनोरथाः ।
गृहं मम विभूत्यर्थं गृहाणत्वं द्विजोत्तम ।
प्रीयतां मे जगद्योनिर्वास्तुरूपी जनार्दनः ॥

नंतर प्रतिग्रह घेणाऱ्यानें वराचा मधला खांब अथवा बाहेरल्या दाराचा उंबरा ह्यास स्पर्श करून " देवस्यत्वा " ह्या यजुष् मंत्रानें प्रतिग्रह करून " स्वस्ति " असें म्हणून आपले शाखे प्रमाणें कामस्तुतिकारक मंत्र म्हणावे. नंतर हजार ×सुवर्णांपासून तों एक सुवर्ण पावेतों जशी शक्ति असेल तशी दक्षिणा द्रव्याविषयीं कृपणपणा न करतां द्यावी. नंतर पुन्हा पादुका, जोडा, छत्री, चवरी वगैरे देऊन " संपन्नं गृहो-

× सोन्याचें नाणें.

पस्कारादि " असें प्रतिग्रह घेणाऱ्यानें म्हटल्यावर " सर्वं सुसंपन्नं संपूर्ण मेवास्तु " असें दात्यानें प्रतिवचन द्यावें. नंतर ब्राम्हणांची आर्घ्यपाद्यादिकांनीं पूजा करून त्यांस भूयसी दक्षिणा देऊन त्यापासून आशीर्वाद घ्यावे. नंतर प्रमादा त्कुर्वतां० यस्यस्मृत्या० हे मंत्र म्हणून कर्म ईश्वरास अर्पण करावें.

घराचें दान केलें असतां त्याचें फळ व घराचें दान घेण्याचा प्रकार.

घराचें दान केलें असतां त्याचें फळ मत्स्य पुराणांत सांगितलें आहे तें असें:—जो याप्रमाणें पक्क्या इटांचें सर्व साहित्यानें युक्त* असें घर दान करील तो शंभर कोटी कल्प पावेतों ब्रम्हलोकीं मान्यतेस पावेल. जो दगडांचें किंवा लांकडाचें घर विधिपूर्वक ब्राम्हणास देईल तो रम्य अशा क्षीर समुद्रांत नारायणाजवळ वास करील. अथवा जो मातीचेंही घर सर्व साहित्यानें युक्त असें देईल तो लोकपाळांच्या नगरांत प्रत्येक मनु बदलेल तोंपावेतों वास करील.+ येथें प्रवेश करून ( घरांत ) प्रतिग्रह करावा अशी उक्ति आहे त्यावरून घरांत प्रवेश करून घराच्या दाराच्या उंबऱ्यास स्पर्श करावा म्हणजे उंबऱ्याचे ठिकाणीं प्रतिग्रह करावा. तसेंच खांबास किंवा घराच्या उंबऱ्यास स्पर्श करून प्रतिग्रह घ्यावा असें सांप्रदायिक म्हणतात.

ह्याप्रमाणें घराच्या दानाचा प्रयोग सांगितला.

---

* ह्या दोघांच्या ऐवजीं सर्वं दैवतं असें मयूख व हेमाद्रि ह्यांत आहे.

+ तांबे वगैरेचीं भांडीं. सगळीं धान्यें, मीठ, तूप, तेल, गूळ, साखर, गाय, म्हैस वगैरे.

## अथ मठदानं

" स्कांदे "

कृत्वा मठं प्रयत्येन शयनासनसंयुतं ।
तृणैराच्छादितं चैव वेदिकाभिः सुशोभितं ।
पुण्यकाले द्विजेभ्योऽथ यतिभ्यो वा निवेदयेत् ।
सर्वा न्कामानवाप्नोति निष्कामो मोक्षमाप्नुयादिति ।

इति मठदानं

---

## ×मठाचें दान

मठाचें दान.

" स्कंदपुराणांत " शयनें ( बिछाने ) आसनें ह्यांनीं युक्त असून गवतांनीं आच्छादन केलेला व वेदिकांनीं ( ओटे ) शोभणारा असा मठ पुण्यकारक अशा दिवशीं जो ब्राम्हणांस किंवा संन्याशांस दान करील त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील कोणतीही कामना न ठेवतां दान करील तर तो मोक्षाला पावेल.

ह्या प्रमाणें मठाचें दान सांगितलें

---

## अथ धर्मशालादानं

" मार्कंडेयपुराणे "

कुर्या प्रतिश्रयगृहं । पथिकानां हितावहं ।

---

× विद्यार्थी वगैरेंची रहाण्याची जागा.

निजगेहैकदेशं वा साधुनांयो निवेदयेत् प्रतिश्रयो धर्मशाला ।

। तथा ।

अक्षय्यं पुण्यमुद्दिष्टं तस्य स्वर्गापवर्गदं ।
सर्वकामसमृद्धोऽसौ देववाद्दिवि मोदते ।

" भविष्ये "

प्रतिश्रये सुविस्तीर्णे कारिते सजलेंधने ।
दीनानाथजलार्थीय वद किं न कृतं भवेदिति ।

इति धर्मशालादानं

---

धर्मशाळेचें दान करणें.

धर्मशाळा दान करणें.

" मार्कंडेय पुराणांत " वाटसरू लोकांस हितकारक अशी धर्मशाळा करावी. अथवा जो आपल्या घरापैकीं एखादा भाग सज्जन अशा लोकांस दान करील, त्याला स्वर्गलोक आणि मोक्ष ह्यांची प्राप्ति करणारें, कधींहि नाहींसें न होणारें असें पुण्य घडतें. तसेंच त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होऊन तो स्वर्गांत देवाप्रमाणें आनंदानें वास करील. " भविष्य पुराणांत " दीन ( गरीब कंगाल ), अनाथ व पाण्याची इच्छा करणारासाठीं ह्यांस लांकडें व पाणी ह्यांनीं युक्त असून अत्यंत विस्तीर्ण अशी धर्मशाळा केली असतां काय केल्यासारखें होणार नाहीं ? सांग.

ह्या प्रमाणें धर्मशाळेचें दान सांगितलें.

## अथ कन्यादानम्

" हेमाद्रौ "

सहस्रमेन धेनुनां शतं वा नडुहासमं ।
दशानडुत्समं यानं दशयानसभो हयः ।
दशवाजीसमाकन्या भूमिदानं च तत्समं ।
तस्मात्सर्वेषु दानेषु कन्यादानं विशिष्यते इति

" अग्निपुराणे "

श्रुत्वा कन्याप्रदानं च पितरश्च पितामहाः ।
विमुक्ताः सर्वपापेभ्यो ब्रम्हलोकं व्रजंति ते इति

" देवलः "

तिस्र कन्या यथान्यायं पालयित्वा निवेद्य च ।
त पिता नरकं याति नारी वा स्त्रीप्रसूयिनीति

" वासिष्ठः "

हारकक्षितिगौरीणां सप्तजन्मानुगं फलं ।
धर्म्येण विधिना दातु मसगोत्रेण युज्यत इति

" ऋष्यश्रृंगः ।

वरगोत्रं समुच्चार्य प्रपितामहपूर्वकं ।
नाम संकीर्तयेद्विद्वान् कन्यायाश्चैव मेवहि ।
तिष्ठेदुदङ्मुखो दाता तिष्ठेत्पूर्वमुखो वरः ।
मधुपर्कार्चितायैनां तस्मै दद्या त्सदक्षिणां ।
उदपात्रं तदादाय मंत्रेणातेन दापयेदिति तिष्ठे दिति

अनुपविष्ठ इत्यर्थः गौरीं कन्यामिमा मित्यादि पुत्र-पौत्र प्रवर्धिनी मित्यंतं प्रयोगे वक्ष्यामः । भूमिं धेनुश्च दासीं च वासांसि च स्वशक्तितः । महिषी वाजिन श्चैव दद्या त्स्वर्णमणीनपीति ततः स्वगृह्यविधिना होमाद्यं कर्म कारयेत् । यथाचारं विधेयानि मांगल्यकुतुकानिचेति

---

## कन्यादान

कन्यादान, त्याचें फळ त्याचा विधि इ.

" हेमाद्रिंत " हजार गाई आणि शंभर बैल हे सारखे आहेत (हजार गाईंच्या दानाचें फळ आणि शंभर बैलांच्या दानाचें फळ सारखें आहे.) दहा बैलांबरोबर एक वाहन, दहा वाहनां बरोबर एक घोडा आणि दहा घोड्यांबराबर एक कन्या (कन्येचें दान) आणि तिचे बराबर भुमीचें दान आहे. म्हणून सर्व दानांमध्यें कन्यादान श्रेष्ठ आहे. " अग्नि पुराणांत " कन्यादान दिल्याचें ऐकून पितर आणि पितामह हे सर्व पापांपासून मुक्त होऊन ब्रम्हलोकांस जातात. " देवल "—दीन कन्येचें यथायोग्य पालन करून त्यांचें दान केलें असतां पिता (मुलीचा बाब) नरकाला जात नाहीं. तसेंच मुलीस प्रसवणारी (जिला मुली होतात ती) स्त्री नरकाला जात नाहीं. " वसिष्ठ "—सोनें भूमि व गौरी+ ह्यांच्या दानाचें फळ सात जन्म पावेतों असतें.

---

+ आठ वर्षांची मुलगी.

म्हणून शास्त्रांत सांगितलेल्या विधीनें ह्यांचे अस*गोत्रांत दान देण्यास योग्य आहे. " ऋष्यशृंग "—विद्वानानें वराचे गोत्राचा उच्चार करून नंतर त्याच्या प्रपितामहपूर्वक नांवाचा उच्चार करावा. ह्याप्रमाणें कन्येचाही उच्चार करावा. दात्यानें उत्तरेकडे तोंड करून उभें रहावें, आणि वरानें पूर्वेकडे तोंड करून उभें रहावें. नंतर हातांत उदकाचें पात्र घेऊन " गौरी कन्यां " ह्या मंत्रानें मधुपर्कानें ज्याची पूजा केली आहे अशा वरास दक्षिणेसह कन्येचें दान करावें. नंतर त्यास भूमि, गाई, दासी, वस्त्रें, म्हशी, घोडे, सोनें आणि रत्नें हीं आपल्या शक्तीप्रमाणें द्यावीं. नंतर त्याकडून आपल्या गृह्यसूत्रांत सांगितल्या प्रमाणें होमादि कर्म करवावें, आणि जसा आचार असेल त्याप्रमाणें मंगलकारक सोहळे करावे.

---

## अथ कन्यादान प्रयोगः

तत्रादौ यथाशाखं मधुपर्केण संपूज्य वरं प्राङ्मुखं वधूं प्रत्यङ्मुखी मुपवेश्य पित्रादिको वधूवरदक्षिणतः स्वदक्षिणस्थपत्नीसहित उदङ्मुखो दर्भेष्वासीनो दर्भान्धारयमाणो देशकालौ संकीर्त्य मम समस्तपितॄणां निरतिशयसानंदब्रम्हलोकावाप्त्यादिकन्यादानकल्पोक्तफलावाप्तये अनेन वरेणास्यां कन्याया मुत्पादयिष्यमाणसंतत्या द्वादशावरान् द्वादशपरान् पुरुषान् पवित्री-

---

* ज्याचें सारखें गोत्र नाहीं तो.

कर्तुं आत्मन श्च लक्ष्मीनारायणप्रीतये ब्राम्हविवाहवि-
धिना कन्यादानमहं करिष्ये । इति सकुशाक्षतजलेन
संकल्प्य सपत्नीक उत्थायोदङ्मुख एव कन्यां संप्रगृह्य
पठेत्

" कन्यां कनकसंपन्नां कनकाभरणै र्युतां ।
दास्यामि विष्णवे तुभ्यं ब्रम्हलोकजिगीषया ।
विश्वंभरः सर्वभूताः साक्षिण्यः सर्वदेवताः ।
इमां कन्यां प्रदास्यामि पितॄणां तारणायच "

इति मंत्रौ पठित्वा स्वदक्षिणस्थभार्यादत्तपूर्वकल्पित-
जलधारामविच्छिन्नां नवकांस्यपात्रोपरिधृतकन्यांजल्यु-
परिस्थवरांजलिदक्षिणहस्ते क्षिपन् वदेत्-कन्या तारयतु
पुण्यं वर्धतां शिवा आपः संतु सौमनस्य मस्तु अक्षतं
चारिष्टं चास्तु दीर्घमायुः श्रेयः शांतिः पुष्टि स्तुष्टि श्चास्तु
य च्छ्रेयस्तदस्तु यत्पापं तत्प्रतिहत मस्तु पुण्याहं भवंतो
ब्रुवंतु स्वस्ति भवंतो ब्रुवंतु ऋद्धिं भवंतो ब्रु. श्रीरस्त्विति
भवंतो ब्रुवंतु अस्तु श्रीरिति प्रतिवचनं सर्वत्र ज्ञेयं अमुका-
मुकप्रवरोपेतामुकगोत्रोत्पन्नोऽमुकशर्माहं मम समस्तपि-
तॄणामित्यादिलक्ष्मीनारायणप्रीतये इत्यंतं पूर्वोक्तमुक्त्वा
अमुकप्रवरोपेताया मुकगोत्राया मुकप्रपौत्राया मुकपौ-
त्राया मुकपुत्राया मुकशर्मणे वराय श्रीधररूपिणे
कन्यार्थिने अमुकामुकप्रवरोपेता ममुकगोत्रा ममुकप्र-
पौत्री ममुकपौत्री ममुकस्य मम पुत्री ममुकदेवीं नाम्नीं
कन्यां श्रीरूपिणीं वरार्थिनीं यथाशक्त्यलंकृतां प्रजा-

पतिदैवत्यां धर्मप्रजासहत्वकर्मभ्य स्तुभ्यमहं संप्रददे कन्यां प्रतिगृण्हातु भवानिति वरहस्ते सकुशाक्षतजलं क्षिपेत् प्रजापतिः प्रीयतामिति मनसा स्मरेत् न ममेति न वदेदिति केचन ततो दाता गौरीं कन्या मिमां विप्र यथाशक्तिविभूषितां ।

गोत्राय शर्मणे तुभ्यं दत्तां विप्र समाश्रय ।
कन्ये ममाग्रतो भूयाः कन्ये मे देवि पार्श्वयोः ।
कन्ये मे पृष्ठतो भूया स्त्वद्दाना न्मोक्षमाप्नुयाम् ।
मम वंशकुले जाता पालिता वत्सराष्टकं ।
तुभ्यं विप्र मया दत्ता पुत्रपौत्रप्रवार्धिनी ।

धर्मे च अर्थे च कामे च नातिचरितव्या त्वयेयं नातिचरामीति वरः एवं समस्तेत्यादिनातिचरामीत्थंतं कन्यादानं त्रिवारं कार्यमिति

" शौनकः "

ततो वरः देवस्य त्वा० भ्यां प्रतिगृण्हामि ॐ स्व-स्तीत्युक्त्वा कन्याया दक्षिणांसमभिमृश्य क इदं कस्मा अदादिति यथाशास्त्रं कामस्तुतिं पठित्वा पृथ्वीप्रतिगृण्हा-त्विति जपित्वा गृहस्थाश्रमांतर्गतश्रौतस्मार्तकर्मानुष्ठान-सिद्धये धर्मप्रजासहत्वकर्मसिध्यर्थं च कन्यां प्रतिगृण्हा-मीति वदेत् ततो दाता देशकालौ संकीर्त्य कृतस्य कन्यादानकर्मणः सांगतासिध्यर्थं इदं सुवर्णं अग्निदैवतं दक्षिणात्वेन तुभ्यमहं संप्रददे न ममेति वरहस्ते दद्यात्

ॐ स्वस्तीति वरः ततो दाता एवमेव जलपात्रभोजन-भाजनानि गोमहिष्यश्वगजदासीदासभूवाहनालंकारादि यथाविभवं संकल्प्य दद्यात् ततो ब्राम्हणभोजनं संकल्प्य भूयसीं च दद्यात् कर्मेश्वरार्पणं कुर्या दन्यदपि यथाचारं कार्यं विस्तरस्तु प्रयोगरत्नादौ ज्ञेयः

कन्यागृहे भोजननिषेधो मदनरत्ने वह्निपुराणे–अप्रजायां तु कन्यायां न भुंजीत कदाचन ।
दौहित्रस्य मुखं दृष्ट्वा किमर्थ मनुशोचति

इति कन्यादान प्रयोगः

इति कन्यादानं

---

## कन्यादानाचा प्रयोग.

कन्यादानाचा प्रयोग.

कन्यादान करण्याचे पूर्वीं दात्याची जी शाखा असेल तिनें मधुपर्काच्या योगानें वराची पूजा करून त्याला पूर्वेकडे तोंड करून बसवून आणि वधूस पश्चिमेकडे तोंड करून बसवून नंतर कन्यादान करणारा बाप इत्यादिकानें वधू वरांच्या दक्षिणेस आपण व आपल्या उजवीकडे आपल्या स्त्रीसह उत्तरेकडे तोंड करून दर्भांवर (दर्भांच्या आसनावर) बसून हातांत दर्भ घेऊन देश आणि काळ ह्यांचा उच्चार करून “ मम समस्त पितृणां निरतिशयसानंद ब्रम्हलोकावाप्त्यादि कन्यादान कल्पोक्त फलावाप्तये अनेन वरेण

अस्यां कन्यायामुत्पादयिष्यमाण संतत्या द्वादशावरान् द्वादशापरान पुरुषान् पवित्रीकर्तुं आत्मनश्च लक्ष्मीनारायणप्रीतये ब्राम्हविवाह विधिना कन्यादान महं करिष्ये " ह्या प्रमाणें दर्भ, अक्षता ह्यांनीं युक्त अशा उदकानें संकल्प करून स्त्रीसह उत्तरेकडे तोंड करून उभा राहून कन्येस धरून म्हणावें—

कन्यां कनकसंपन्नां कनकाभरणै र्युतां ।
दास्यामि विष्णवे तुभ्यं ब्रम्हलोक जिगीषया ।
विश्वंभरः सर्वभूताः साक्षिण्यः सर्व देवताः ।
इमां कन्यां प्रदास्यामि पितृणां तारणायच ॥

ह्या प्रमाणें दोन मंत्र म्हणून आपल्या उजवीकडे असलेल्या पत्नीनें धरलेली अविछिन्न ( अखंड ) अशी पाण्याची धार नव्या कांशाच्या पात्रावर धरलेल्या कन्येच्या ओंजळीवर असलेल्या वराच्या ओंजळीच्या डाव्या हातावर धरून म्हणावें—कन्या तारयतु पुण्यं वर्धतां शिवा आपःसंतु सौमनस्यमस्तु अक्षतं चारिष्टंचास्तु मत्पापं तत्प्रतिहतमस्तु पुण्याहं भवंतोब्रुवंतु स्वस्ति भवंतोब्रुवंतु ऋद्धिं भवंतोब्रुवंतु श्रीरस्त्विति भवंतोब्रुवंतु" अस्तुश्री असें प्रत्येक वचनास सर्व ठिकाणीं जाणावें नंतर "अमुकामुकप्रवरोपेता मुकगोत्रोत्पन्नोऽमुकशर्माहं मम समस्त पितृणा पासून लक्ष्मीनारायण प्रीतये" पावेतों म्हणून पुढें—"अमुक प्रवरोपेताया मुकगोत्राया मुकप्रपौत्राया मुकपौत्राया मुकपुत्राया मुकशर्मणे वराय श्रीधररूपिणे कन्यार्थिने अमुकामुकप्रवरोपेता ममुकगोत्रा ममुकप्रपौत्री ममुकपौत्री अमुकस्य मम पुत्री ममुकदेवीं

नाम्नी कन्यां श्रीरूपिणीं वरार्थिनीं यथाशक्त्यलंकृतां प्रजापति दैवत्यां धर्मप्रजासहत्वकर्मभ्यस्तुभ्यमहं संप्रददे कन्यां प्रतिगृण्हातु भवान् " असें म्हणून वराच्या हातांत कुश, अक्षता यांनी युक्त असें उदक घालावें आणि "प्रजापतिः प्रीयतां" असें मनांत म्हणावें. येथें "न मम" असें म्हणूं नये असें कित्येक म्हणतात. नंतर दात्यानें–

गौरीं कन्यां मिमां विप्र यथाशक्ति विभूषितां ।
गोत्राय शर्मणेतुभ्यं दत्तां विप्र समाश्रय ।
कन्ये ममाग्रतो भूयाः कन्ये मे देविपार्श्वयोः ।
कन्ये मे पृष्ठतो भूया स्त्वद्दानान्मोक्षमाप्नुयाम् ।
मम वंश कुलेजाता पालिता वत्सराष्टकं ।
तुभ्यं विप्र मयादत्ता पुत्रपौत्र प्रवर्धिनी ।

असें म्हणून पुढें धर्मेच अर्थेच कामेच नातिचरितव्या त्वयेयं असें म्हणावें. मग वरानें "नाति चरामि" असें म्हणावें. ह्या· प्रमाणें "समस्त" पासून "नाति चरामि" पावेतों कन्यादान तिनदां करावें असें "शौनक" म्हणतो.

नंतर वरानें "देवस्यत्वा०" ह्या ऋचेनें "प्रतिगृण्हामि ॐ स्वस्ति" असें म्हणून कन्येच्या उजव्या खांद्यास स्पर्श करून "क इदं कस्माअदात्" ह्याप्रमाणें जशी शाखा असेल तिचे प्रमाणें कामस्तुतिवाचक मंत्र म्हणून पृथ्वी प्रतिगृण्हातु असा जप करून ( म्हणून ) "गृहस्थाश्रमांतर्गत श्रौतस्मार्तकर्मानुष्ठानसिद्ध्ये धर्मप्रजासहत्वसिध्यर्थंच कन्यां प्रतिगृण्हामि" असें म्हणावें.

नंतर दात्यानें देश आणि काल ह्यांचा उच्चार करून " कृतस्य कन्यादान कर्मण: सांगता सिध्यर्थं इदं सुवर्णं अग्नि-दैवतं दक्षिणात्वेन तुभ्यमहं संप्रददेन मम" असें म्हणून वराच्या हातांत दक्षिणा द्यावी, आणि वरानें "ॐ स्वस्ति" असें म्हणावें. नंतर दात्यानें ह्याचप्रमाणें—पाणी पिण्याचें भांडें ( तांब्या पंचपात्र ), स्वयंपाकाचीं भांडीं, गाय, म्हैस, घोडा, हत्ती, दासी, दास, भूमि, वाहनें, अलंकार ( दागिने ) वगैरे जशी शक्ति असेल त्याप्रमाणें संकल्प करून वरास द्यावें. नंतर ब्राम्हण भोजनाचा संकल्प करून त्यांस भूयसी दक्षिणा द्यावी, आणि कर्म ईश्वरास अर्पण करावें. ह्याशिवाय दुसरें कर्म जसा आचार ( कुलाचार देशाचार ) असेल त्याप्रमाणें करावें. ह्याविषयीं विस्तार प्रयोगरत्नादि ग्रंथांत पहावा.

मुलीच्या घरीं जेवणाचा निषेध.

कन्येच्या घरीं जेवणाचा निषेध—" वन्हि पुराणांतील मदनरत्नांत " कन्येस कांहीं संतति नसली तर केंव्हांही तिचें घरीं जेऊं नये. नातु झाला म्हणजे विचार करण्याचें कारण नाहीं. खुशाल जेवावें.

ह्याप्रमाणें कन्यादानाचा प्रयोग सांगितला.

ह्याप्रमाणें कन्यादान सांगितलें.

---

## अथ कपिलादानं

सा च दशधोक्ता " वाराहे "

सुवर्ण कपिला पूर्वा द्वितीया गौरापिंगला ।

तृतीया चैव रक्ताक्षी चतुर्थी गुडपिंगला ।
पंचमी बहुवर्णा स्यात्षष्ठी च श्वेतपिंगला ।
सप्तमी श्वेतपिंगाक्षी अष्टमी कृष्णपिंगला ।
नवमी पाटला प्रोक्ता दशमी पुच्छपिंगला ।
एता विधाः ख्याताः कपिला स्ते महामुने ।
सर्वा होता महाभागा स्तारयंति न संशय इति

" आदित्यपुराणे "

सहस्रं यो गवां दद्या त्कपिलां एकदेव हि ।
सममेव पुरा प्राह ब्रम्हा ब्रम्हविदांवर इति

तथा

स्वर्णशृंग्यो रौप्यखुराः सवत्सा या भवंति हि ।
सुरभी लोक मासाद्य रमते तावतीः समा इति

" महाभारते "

समानवत्सां कपिलां धेनुं दद्या त्पयास्विनीं ।
सुश्वेतवस्त्रसंवीतां ब्रम्हलोके महीयत इति

---

अथ कपिलादानप्रयोगः

पुण्यकाले कृतनित्यक्रियोऽद्येत्यादि० मम गोसहस्रदानफलावानंतरसवत्सकपिलारोमपरिमितवत्सरपर्यंतं कामधेनुलोकनिवासकाम इमां कपिलां सुवर्णश्रृंगी रौप्यखुरां ताम्रपृष्ठी कांस्योपदोहां घंटाभरणां श्वेतवस्त्रयुग-

छन्नां चंदनस्रग्विभूषितां सोपस्करां रुद्रदैवत्यां गोत्राय शर्मणे सुपूजिताय ब्राम्हणाय तुभ्य महं संप्रददे न ममेति दद्यात् मंत्रस्तु

" मात्स्ये "

कपिले सर्वदेवानां पुजनीयासि रोहिणी ।
तीर्थदेवमयी यस्मादतः शांतिं प्रयच्छमे ।

इति मंत्रांते प्रदाक्षिणां कुर्यात् ततः सुवर्णदक्षिणां दद्यात्

" उक्तोपस्करकपिदानफलं मात्स्ये "

+ वस्त्रं चतुर्गुणं दत्वा दक्षिणां च चतुर्गुणां ।
एतै रलंकृता धेनुं घंटाभरणभूषितां ।

कपिलां विप्रमुख्याय दत्वा मोक्ष मवाप्नुयादिति तथा द्विगुणोपस्करोपेता महति कपिला स्मृतां उपस्कराः सुवर्णश्रृंगवस्त्रदोहनपात्राद्याःसामान्यगोदाने वक्ष्यमाणा दत्ता सा विप्रमुख्याय स्वर्गमोक्षफलप्रदा । सप्तजन्मकृता त्पापा न्मुच्यते नात्र संशयः यान्यानर्थयते कामां स्तांस्तान् प्राप्नोति मानव इति

महाकापिलादानप्रयोगोऽस्तु अद्येत्यादि मम समस्त जन्मकृतपापनाशपूर्वकं पुत्रपौत्रादिसाहिताय शर्मणे सालंकृताय इमां महाकपिलां द्विगुणोपस्करोपे तां रुद्र-

---

+ " वस्त्रंतत्रिगुणं धेन्वा " असा मयूखांत पाठ आहे.

देवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात् ततः सुवर्ण दक्षिणां दत्वा समार्पयेत् मंत्रस्तु पूर्वमेवोक्तः

इति कपिलादानप्रयोगः

इति महादशदानानि

---

## कपिलेचें दान.

कपिलेचें दान, दानाचें फळ.

वराह पुराणांत दहा प्रकारच्या कपिला गाईचें वर्णन सांगितलें आहे तें असें—पहिली सुवर्ण कपिला दुसरी गोरी पिंगला, तिसरी रक्ताक्षी, चवथी गुड पिंगला, पांचवी बहुवर्णा, सहावी श्वेत पिंगला, सातवी श्वेतपिंगाक्षी, आठवी कृष्णपिंगला, नववी पाटला आणि दहावी पुच्छपिंगला, ह्या प्रमाणें हे महामुने ! तुला दहा प्रकारच्या कपिला सांगितल्या. महा भाग अशा सर्व ( पापा पासून ) रक्षण करतात ह्यांत संशय नाहीं. "आदित्यपुराणांत" जो हजार गाईचें दान करील आणि कपिलेचें एकदांच दान करील हीं दोन्हीं सारखींच आहेत असें पूर्वी ब्रम्ह जाणणाऱ्या मध्यें श्रेष्ठ असा ब्रम्हदेव म्हणतो. तसेंच ज्यांचीं शिंगें आणि खुर रुप्याचे आहेत अशा ज्या वासरासह गाई असतात, त्यांचें दान केल्या पासून तो कामधेनुच्या लोकांस प्राप्त होऊन तितक्या गायांसहवर्तमान आनंदानें काळ घालवितो. "महाभारतांत" जिचें वासरूं वर्णानें आपले सारखेंच आहे अशी दुध देणारी चांगल्या स्वच्छ वस्त्रानें आच्छादन केलेली अशा कपिला गाईचें जो दान करील, तो ब्रम्हलोकांत पूज्य होईल.

## कपिलेच्या दानाचा प्रयोग.

कपिलेच्या दानाचा प्रयोग.

पर्वणीचे शुभ दिवशीं नित्याचें स्नानसंध्यादि कर्म आटपून "अद्येत्यादि० मम गोसहस्रदान फलावाप्त्यनंतरं सवत्सकपिलारोमपरिमित वासरपर्यंतं कामधेनुलोकनिवासकाम इमां कपिलां सुवर्णशृंगीं रौप्यखुरां ताम्रपृष्ठीं कांस्योपदोहां घंटाभरणां श्वेतवस्त्रयुग्मच्छन्नां चंदनस्त्रग्विभूषितां सोपस्करां रुद्रदैवत्यां गोत्रायशर्मणे सुपूजिताय ब्राम्हणाय तुभ्यमहं संप्रददे न मम" असा संकल्प करून कपिलेचें दान करावें. दानाचा मंत्र तर "मत्स्य पुराणांत"

कपिला सर्व देवानां पूजनीयासि रोहिणी ।
तीर्थ देवमयी यस्मादतः शांतिं प्रयच्छमे ॥

ह्याप्रमाणें मंत्र म्हटल्यानंतर तिला प्रदक्षिणा करावी. नंतर सोनें दक्षिणा द्यावी. सांगितलेल्या उपस्करानेंयुक्त अशा कपिलेच्या दानाचें फळ मत्स्य पुराणांत सांगितलें आहे. तें असें--चौपट (गाईच्या) वस्त्र आणि चौपट दक्षिणा देऊन घंटा, आभरण (भूषणें) ह्यांनीं भूषित अशा कपिला गाईचें जो श्रेष्ठ ब्राम्हणास दान करील तो मोक्षाला पावेल. तसेंच सोन्याचीं शिंगें, वस्त्र, दूध काढण्याचें भांडें वगैरे जे दुप्पट उपस्कर यांनीं युक्त अशी जी कपिला तिला मोटी कपिला म्हणतात. ती श्रेष्ठ ब्राम्हणास दिली असतां स्वर्ग आणि मोक्ष ह्यांचीं फळें देणारी होते. तसेंच सात जन्मांत केलेल्या पापा पासून मुक्त होतो ह्यांत संशय नाहीं. मनुष्य ज्या ज्या कामनांची इच्छा करतो त्या त्या कामना त्यास प्राप्त होतात.

महा कपिलेच्या दानाचा प्रयोग--अद्येत्यादि मम समस्त जन्मकृत पापनाशपूर्वकं पुत्रपौत्रादिसहिताय शर्मणे सालंकृतांज्ञां महा कपिलां द्विगुणोपस्करोपेतां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददेन मम " असा संकल्प करून मोठ्या कपिलेचें दान करावें. नंतर सोनें दक्षिणा देऊन कर्म समाप्त करावें. मंत्र ( दानाचा ) तर पूर्वींच सांगितला.

मोठ्या कपिलेच्या दानाचा प्रयोग.

ह्याप्रमाणें कपिलेच्या दानाचा प्रयोग सांगितला.

ह्याप्रमाणें मोठीं दहा दानें सांगितलीं.

---

## अथ दशधेनुदानानी

यास्तु पापविनाशिन्यः कथिता दश धेनवः ।
तासां स्वरूपं वक्ष्यामि नामानि च नराधिप ।
प्रथमा गुडधेनुः स्यात् घृतधेनु स्तथा परा ।
तिलधेनु स्तृतीया तु चतुर्थी जलधेनुका ।
क्षीरधेनु स्तु विख्याता मधुधेनु स्तथा परा ।
सप्तमी शर्कराधेनु र्दधिधेनु स्तथाष्टमी ।
रसधेनु स्तु नवमी दशमी स्या त्स्वरूपतः ।
कुंभाघृतादिधेनूना मितरास्तं तु राशयः ।
सुवर्णधेनु मप्यत्र केचिदिच्छंति मानवाः ।

नवमी तिलतैलेन तथान्येपि महर्षयः रसधेनुस्थाने सुवर्णधेनुं जलधेनुव त्पूजयेत् एतद्विधान मपि

" मात्स्ये "

अजिनं तु चतुर्हस्तं प्राग्ग्रीवं विन्यसेद्भुवि ।

गोमयेनोपलिप्तायां दर्भानास्तीर्य सर्वतः ।

तत्रैणं वाजिनं तद्वत्सस्य परिकल्पयेत् लघुकृष्णाजिनं प्राङ्मुखीं कल्पयेद्धेनु मुदकपादां सवत्सकां ।

प्राङ्मुखीं प्राक्शिरसं सवत्सां उत्तरभागस्थितवत्ससहितां उत्तमा गुडधेनुः स्या त्सदाभारचतुष्टया ।

वत्सं भारेण कुर्वीत भाराभ्यां मध्यमा स्मृता ।

अर्धभारेण वत्सः स्या त्कनिष्ठा भारकेण तु ।

चतुर्थांशेन वत्सः स्याद्गृहवित्तानुसारतः ।

तुलां पलशतं प्राहु र्भारः स्याद्विंशति स्तुलेति भारः पलसहस्रात्मको भवतीत्युक्तं परिभाषायां धेनुवत्सौ घृतस्येतौ सितसूक्ष्मांबरावृतौ ।

शुक्तिकर्णौ विक्षुपादौ शुचिमुक्ताफलेक्षणौ ।

सितसूत्रशिरालौ तौ सितकंबलकंबलौ ।

ताम्रगडुकपृष्ठौ तौ सितचामररोमकौ ।

ककुत्प्रदेशो गडुकः ।

विद्रुमभ्रूयुगोपेतौ नवनीतस्तनान्वितौ ।

क्षौमपुच्छौ कांस्यदोहा विंद्रनीलकतारकौ ।

सुवर्णशृंगाभरणौ राजतक्षुरसंयुतौ ।

नानाफलमयै र्दंतौ घ्राणगंधकरंडकौ गंधकरंडकः कर्पुरादिपात्रविशेषः इत्येवं रचयित्वा तौ धूपदीपै रथार्चयत् ।

वस्त्रमुक्तादीनां सारतो मानतश्चाधिक्ये फलाधिक्यं

" अथ प्रयोगः "

यजमानः कृतनित्यक्रियः पुण्यकाले शुचि र्घेत्यादि मम समस्तपापक्षयद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं गुडधेन्वादिदानं करिष्ये इति संकल्प्य विप्रं वस्त्रादिभिः संपूज्य प्रदक्षिणीकृत्य सर्वपापक्षयकाम इमाममुकधेनुं गोत्राय शर्मणे ब्राम्हणाय सुपूजिताय तुभ्य महं संप्रददे न ममेति तद्धस्ते सकुशतिलजलं दद्यात् विप्रस्तु पुच्छं प्रतिगृह्य स्वस्तीत्युक्त्वा देवस्य त्वेति यथाशाखं कामस्तुतिं पठेत् ततः सुवर्णदक्षिणां दद्यात् प्रार्थनामंत्रास्तु

या लक्ष्मीः सर्वभूतानां या च देवेष्ववस्थिता ।
धेनुरूपेण सा देवी वांछितं मे प्रयच्छतु ।
देहस्थाया च रुद्राणी शंकरस्य सदा प्रिया ।
धेनुरूपेण सा देवी मम पापं व्यपोहतु ।
विष्णो र्वक्षसि या लक्ष्मीः स्वाहा या च विभावसोः ।
चंद्रार्कशक्रशक्ति र्या धेनुरूपास्तु सा श्रिये ।
चतुर्मुखस्य या लक्ष्मी र्या लक्ष्मी र्धनदस्य च ।
या लक्ष्मी र्लोकपालानां सा धेनु र्वरदास्तु मे ।
स्वधा त्वं पितृमुख्यानां स्वाहा यज्ञभुजां तथा ।

सर्वपापहरा धेनु स्तस्माच्छांतिं प्रयच्छ मे इति एवं मामंत्र्य ब्राम्हणाय तां धेनुं निवेदयेत् एतदेव विधानं सर्वधेनूनां प्रत्यक्षधेनुव्यतिरिक्ताना मित्यर्थः उक्तरचनाया स्तत्रानुपयोगात् ततो भूयसीं दक्षिणां दत्वा ब्राम्हणा न्भोजयेदिति एतदेव विधानं स्या सएवोपस्कराः स्मृताः ।

अयने विषुवे पुण्ये व्यतीपाते तथा पुनः ।
गुडधेन्वादयः सर्वा उपरागादिपर्वसु ।
यथाशक्ति प्रदातव्या भुक्तिमुक्तिफलप्रदा इति ।

---

अथ तिलधेनुदानं

अत्र द्रोणपरिमाणा तिलधेनुसक्ता कल्पत ो तत्र-
कार स्तु

" विष्णुधर्मोत्तरे "

अनुलिप्ते महीपृष्ठे वस्त्राजिनकुशावृते ।
धेनुं तिलमयीं कृत्वा सर्वरत्नैरलं कृतां ।
धेनुं द्रोणेन कुर्वीत आटकेन तु वत्सकं ।

स्वर्णशृंगीं रौप्यखुरां गंधघ्राणवतीं तथा कुर्याच्च
शर्कराजिन्हां गुडास्यामाविकंबलां ।

इक्षुपादां ताम्रपृष्ठीं शुचिमुक्ताफलेक्षणां ।
प्रशस्तपात्रश्रवणां फलदंतमयीं शुभां ।
स्रग्दामपुच्छं कुर्वीत नवनीतस्तनान्वितां ।
सितवस्त्रयुग्मच्छन्नां घंटाभरणभूषितां ।
ईदकृसंस्थानसंपन्नां कृत्वा श्रद्धासमन्वितः ।

कांस्योपदोहनां दद्या त्केशवः प्रीयतामिति इति
कर्तव्यता मंत्रा गुडधेनूक्ता एव प्रार्थनामंत्रा स्तु

" वह्निपुराणे "

तिलाश्च पितृदैवत्या निर्मिता स्नेहगोसवे ।
ब्रम्हणा तन्मयी धेनु र्दत्ता प्रीणातु केशवः ।

इति मंत्रांतरमुक्तं

प्रतिमातिलधेन्वादीनां विक्रयाद्युक्तं

" हेमाद्रौ ब्रम्हवैवर्ते "

दानकाले तु देवत्वं प्रतिमानां प्रकीर्तितं ।
धेनूनामपि धेनुत्वं श्रुत्युक्तं दानयोगतः ।
दातुर्वै दानकाले तु धेनवः परिकीर्तिताः ।
विप्रस्य व्ययकाले तु द्रव्यं तदिति निश्चयः ।
दानसंबंधि विप्रेण द्रव्यमागच्छता गृहं ।
तत्सर्वं विदुषा तेन विक्रेयं स्वेच्छया विभो ।
कुटुंबभरणं कार्यं धर्मकार्यं च सर्वशः ।
अन्यथा नरकं यातीत्येवमाह पितामह इति

इति तिलधेनुदानं

---

अथ घृतधेनुदानं

" विष्णुधर्मोत्तरे "

तिलाभावे तथा दद्यात् घृतधेनुं प्रयत्नतः ।
वासुदेवं जगन्नाथं घृतक्षीराभिषार्चितं ।
संपूज्य पूर्ववत् पुष्पै र्धूपदीपादिभि र्नरैः ।
तत्रैव विधान माह

गव्यस्य सर्पिषः कुंभं पुष्पमालादिभूषितं ।
कांस्यापिधानसंयुक्तं सितवस्त्रयुगेन च ।
हिरण्यसहितं तद्वन्मणिविद्रुममौक्तिकैः ।

अत्र पलसहस्रपरिमाणं कुंभः द्वादशपलाधिकपंच-
शतपलाधिको वा ।

इक्षुयष्टिमया न्पादा न्खुरान्रौप्यमयां स्तथा ।
सौवर्णेचाक्षिणी कुर्याच्छृंगे चागरुकाष्ठजे ।
सप्तधान्यमये पार्श्वे पत्रोर्णेनच कंबले ।

पत्रोर्णं धौतकौशेयं ।

कर्पूरघ्राणं फलमयान् स्तनान् शर्करया जिव्हा
गुडक्षीरमयं मुखं क्षौमं पुच्छं रोमाणि सितसर्षपैः ताम्र-
पृष्ठीं एतादृशीं कृत्वा विधिना संपूज्य तथा ब्राम्हणं
यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य दद्यात् विधिस्तु
प्राग्वत् मंत्रास्तु

" स्कांदे "

घृतं गावः प्रसूयंते घृतं भूम्यां प्रतिष्ठितं ।
घृतमग्निश्च देवाश्च घृतं मे संप्रदीयतामिति

दानफलमपि तत्रैव ॥

घृतक्षीरवहानद्यो यत्र पायसकर्दमाः ।
तेषु लोकेषु सर्वेषु सुपुण्येषु प्रजायते ।
सकामानामियं व्युष्टिः कथिता नृपसत्तम ।

व्युष्टिः फलं ।

विष्णुलोकं नरा यांति निष्कामा धेनुदानत इति दक्षिणा तु हिरण्यमेवेति " हेमाद्रिः "

सुवर्णप्रभृति शक्त्यावेत्युक्तं " मदनरत्ने "

इति घृतधेनुदानं

---

अथ जलधेनुदानं

" स्कांदे "

जलकुंभं नरव्याघ्र सुवर्णरजतान्वितं ।
सुवर्णशृंगरजतखुरान्वितमिति स्मृतं ।
रत्नगर्भमशेषै स्तु ग्राम्यैर्धान्यैः समन्वितं ।
सितवस्त्रयुगच्छत्रं दूर्वापल्लवशोभितं ।
कुष्टमांसीसुरोशीरवालुकामलकै र्युतां ।
प्रियंगुपत्रसाहितं सितवस्त्रोपवीतिनं ।
सछत्रं सदुपातत्कं दर्भविष्टरसंज्ञितं ।
चतुर्भिः संभृतं भूपस्तिलपात्रै श्चतुर्दिशं ।
स्थगितं दधिपात्रेण घृतक्षीरवता मुखे ।

तिलपात्राणि ताम्रमयानि दधिपात्रं कांस्यमयं उपोषितो वासुदेवं जलेशयं अभ्यर्च्य संकल्प्य जलधेनुं गुडधेनुव द्द्यात् ततो या लक्ष्मीरित्यादिपूर्वोक्तमंत्रैः प्रार्थयेत्

इति जलधेनुदानं

## अथ क्षीरधेनुदानं

" स्कांदे "

क्षीरधेनुं प्रवक्ष्यामि तां निबोध नराधिप ।
अनुलिप्ते महीपृष्ठे गोमयेन नराधिप ।
गोचर्ममानमात्रेण कुशानास्तीर्य सर्वतः ।
तस्योपरि महाराज न्यसेत्कृष्णाजिनं ततः ।

तत्र गोमयेन कुंडलिकां कृत्वा क्षीरकुंभं तत्र स्थापयित्वा चतुर्थांशेन वत्सकं शृंगाणि चंदनागरुकाणि प्रशस्तपत्रश्रवणां तिलपात्रोपरिन्यस्तां मुखं गुडमयं शर्करया फलैर्दंताः मुक्ताफलेक्षणा इक्षुपादा दर्भरोमा सितकंबलकंबला एतादृशीं सवत्सामभ्यर्च्य द्विजं च वस्त्रालंकारादिभिः संपूज्य अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय इमां क्षीरधेनुं पूर्वोक्तोपस्करयुतां समस्तपापक्षयकाम स्तुभ्यमहं संप्रददे न ममेति वदेत् देवस्य त्वा स्वस्तीत्युक्त्वा यथाशाखं कामस्तुतिं पठेत् ततो या लक्ष्मीरित्यादि मंत्रैः प्रार्थयेत्

इति क्षीरधेनुदानम्

---

## अथ मधुधेनुदानं.

" स्कांदे "

मधुधेनुं प्रवक्षामि सर्वपापप्रणाशिनीं ।
अनुलिप्ते महीपृष्ठे कृष्णाजिनकुशोत्तरे ।

कल्पयेत् धेनुं द्विजं च पूर्ववदभ्यर्च्य अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय सौवर्णमुखीं अगरुचंदन शृंगीं ताम्रपृष्ठीं सूत्रपुच्छां इक्षुपादां सितकंबलकंबलां गुडमुखीं शर्कराजिव्हां मौक्तिकनेत्रां फलदंतां दर्भरोमां प्रशस्तपत्रश्रवणां नवनीतस्तनीं सप्तधान्योपेतां ततश्च-त्वारि पात्राणि चतुर्दिक्षु विन्यसेत् वस्त्रयुग्मेनाच्छाद्य घंटाभरणभूषितां कांस्यदोहां सुपूजितां पुच्छदेशोपवि-ष्ठाय मधुवाताऋतायत इति मंत्र मुक्त्वा इमां मधुधेनुं सर्वपापक्षयकामस्तुभ्य महं संप्रददे न ममेति ततः सुवर्णदक्षिणां दत्वा या लक्ष्मीरित्यादि पूर्वोक्तमंत्रैः प्रार्थयेत्

इति मधुधेनुदानं.

---

अथ शर्कराधेनुदानं.

" स्कांदे "

तद्वच्च शर्कराधेनुं शृणु राज न्यथार्थतः ।

अनुलिप्ते महीपृष्ठे कृष्णाजिनकुशोत्तरे ।

भारचतुष्टयपरिमिता तश्चतुर्थांशो वत्सः

भारद्वये अष्टमांश इति स्वशक्त्या वा कार्या सर्व धान्यानि चतुर्दिक्षु संस्थाप्य अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय इमां शर्कराधेनुं सुवर्णशृंगीं मौक्तिक

नयनां गुडमुखीं पिष्टमयजिव्हां कंबलपट्टसूत्रेण वेष्टितां कंठाभरणभूषितां इक्षुपादां रौप्यखुरां नवनीतस्तनीं प्रशस्तपर्णश्रवणां सितचामरभूषितां पंचरत्नसमायुक्तां दर्भरोमां कांस्यदोहनां गंधपुष्पाद्यर्चितां समस्तपापक्षयकाम स्तुभ्यमहं संप्रददे न ममेति सुवर्णदक्षिणां दद्यात् ततो या लक्ष्मीरित्यादिमंत्रैः संप्रार्थ्य भूयसीं दद्यात् विप्रमुखं नेक्षेदिति

पंचरत्नानि " स्वपरार्के "

कनकं हिरकं नीलं पद्मरागं च मौक्तिकं पंचरत्नमिदं प्रोक्त मृषिभिः पूर्वदर्शिभिरिति

इति शर्कराधेनुदानं.

---

## अथ दधिधेनुदानं.

" स्कांदे "

तत्र भूलेपने कुशकृष्णाजिने आस्तीर्णे सप्तधान्योपरि दधिकुंभं संस्थाप्य चतुर्थांशेन् वत्सं कृत्वा गोत्राय शर्मणे सालंकृताय सुवर्णमुखीं प्रशस्तपत्रश्रवणां मुक्ताफलेक्षणां चंदनागरुशृंगीं मुखे विशेषगंधद्रव्यैर्युक्तां शर्करया कृतजिव्हां श्रीखंडेन कृतघ्राणां फलमयदंतां सितकंबलच्छन्नां दर्भरोमां सूत्रमयपुच्छां रौप्यमुखीं वा नवनीतस्तनी मिक्षुपादां सर्वाभरणभूषितां वस्त्रयुग्मेनाच्छादितां गंधपुष्पाद्यर्चितां इमां दधिधेनुं सर्वपापक्षयकामो

दधिक्राव्णइति मंत्रं पठित्वा तुभ्यमहं संप्रददे न ममेति गुडधनूक्तमंत्रेण वा दद्यात् ततः सुवर्णदक्षिणां दत्वा या लक्ष्मीरत्यादिमंत्रैः प्रार्थयेत्

इति दधिधेनुदानं

---

अथ रसधेनुदानं

" स्कांदे "

रसधेनुं महाराज कथयामि समासतः ।
अनुलिप्ते महीपृष्ठे कृष्णाजिनकुशोत्तरे ।

इक्षुरसस्य घटं पूरयित्वा तच्चतुर्थांशेन वत्सं संपाद्य अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय इमां रसधेनुं सुवर्णशृंगाभरणयुतां रौप्यखुरां वस्त्रपुच्छां इक्षुपादां पुष्पकंबलां ताम्रपृष्ठीं पुष्परोमां व्रीहियुतां चतुर्दिक्षु दीपसमायुक्तां सर्वगंधविभूषितां पूर्वादिदिक्षु तिलपात्रचतुष्टयावृतां सुपूजिताय सर्वपापक्षयपूर्वकैकविंशतिकुलोद्धरणकाम स्तुभ्यमहं संप्रददे न ममेति सुवर्णदक्षिणां दद्यात् मंत्रास्तु गुडधनूक्ता एव शेषोपस्कराश्च

एवमुच्चारयित्वा तु दीयते वै द्विजन्मने ।
दशपूर्वा न्परांश्चैव आत्मानं चैकविंशतिरिति

इति रसधेनुदानं

अथ स्वरूपतो गोदानं

" अंगिराः "

गौरेकस्यैव दातव्या श्रोत्रियस्य विशेषतः ।
सा हि तारयते पूर्वा न्सप्त सप्त कुलानि वै ।

" देवलः "

सुशीलां लक्षणवतीं युवतीं वत्ससंयुतां बहुदुग्धवतीं स्निग्धां धेनुं दद्याद्विचक्षणे

अथ गोदानप्रयोगः कर्ता कृतनित्यक्रियः पुण्यकाले अद्येत्यादि यथाशक्ति यथा ज्ञानं गोदानमहं करिष्ये इति संकल्प्य सवत्सां धेनुं द्विजं च यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य गोशृंगमूलादिस्तनांतस्थानादिपु देवताः पुजयेत् तद्यथा शृंगमूले ब्रम्हविष्णुभ्यां नमः ब्रम्हविष्णू पूजयामि शृंगाग्रे सर्वतीर्थेभ्यो नमः सर्वतीर्थानि पूजया० एवं सर्वत्र शिरोमध्ये शिवाय० ललाटेदेव्यै न० नासिकायां षण्मुखाय० नासापुटयोः कंबलाश्वतरनागाभ्यां० दंतेषु वायवे० जिव्हायां वरुणाय० हुंकारे सरस्वत्यै० गंडयोः पक्षमासाभ्यां० ओष्टयोः० संध्याद्वयाय० ग्रीवायां इंद्राय० कुक्षिदेशे रक्षोभ्यो० उरसि साध्येभ्यो० पादेषु धर्माय० जंघासु अधर्माय० खुरमध्ये गंधर्वेभ्यो० खुराग्रे पन्नगेभ्यो० खुरपाश्चिमाग्रे आसरोभ्य० पृष्ठे एकादशरुद्रेभ्यो० सर्वसंधिषु वसुभ्यो० श्रोणितटे पितृभ्यो० लांगूले सोमाय० गुह्ये आदित्यरश्मिभ्यो० गोमूत्रे गंगायै० गोमये यमुनायै० क्षीर सरस्वत्यै० दध्नि

नर्मदायै० घृते अग्नये० रोमस्वष्टाविंशति देवकोटिभ्यो० उदरे पृथिव्यै० पयोधरेषु चतुःसमुद्रेभ्यो० चतुरः समुद्रान्पूज० एता देवता अंगेषु संपूज्य अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सुपूजिताय पृथ्वीदानसमकामः सर्वपाप-क्षयकामो विष्णुप्रीतिकामो वा इमां प्रत्यक्षधेनुं सुवर्ण-शृंगीं रौप्यखुरां ताम्रपृष्ठीं घंटाग्रेवेयां मुक्तालांगुलां कांस्योपदोहनीं सितवस्त्रोद्वयोपेतां सर्वाभरणभूषितां सोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति तिलपात्रे घृताक्तं गोपुच्छं कृत्वा विप्रहस्ते सकुशति-लोदकं दद्यात्

" मंत्रस्तु "

यज्ञसाधनभूता या विश्वस्याघौघनाशीनी ।
विश्वरूपधरो देवः प्रीयता मनया गवा ।

ततो दाता दानप्रतिष्ठासिध्यर्थं सुवर्णं दक्षिणां दत्वा प्रार्थयेत्—

नमो गोभ्यः श्रीमतीभ्यः सौरभेयीभ्य एव च ।
नमो ब्रम्हसुताभ्यश्च पवित्राभ्यो नमोनमः ।
पूजितासि वसिष्ठेन विश्वामित्रेण धीमता ।
सुरभे हर मे पापं यन्मया दुष्कृतं कृतमिति ।
गावो मे अग्रतः संतु गावो मे संतु पृष्ठतः ।
गावो मे हृदये संतु गवां मध्ये वसाम्यह मिति ।

पठित्वा धेनुं द्विजं च प्रदक्षिणीकृत्य किंचिदनुव्रजेदिति

इति गोदानप्रयोगः

" अथ श्वेतवर्णादिगोदानफलमुक्तं पाद्मे "

श्वेता सुतप्रदा प्रोक्ता चंद्रलोकप्रदायिनी।
कृष्णा स्वर्गप्रदा ज्ञेया गौरी स्यात्कुलवर्धिनी।
कपिला सर्वपापघ्नी नानावर्णा च मोक्षदेति।

अथ समानवर्णगोवत्सदानफलं

" महाभारते "

रोहितांतुल्यवर्णां तु सवत्सां च पयस्विनीं।
प्रदत्वा वस्त्रसंवीतां सूर्यलोके महीयते।
समानवत्सां कृष्णां तु धेनुं सर्वाघनाशिनीं।
सुव्रतां वस्त्रसंवीता मस्मिन्लोके महीयते।
वातरेणुसवर्णां तु सवत्सां कांस्यदोहनीं।
प्रदाय वस्त्रसंवीतां वारुणं लोकमश्नुते।
हिरण्यवर्णां पिंगाक्षीं सवत्सां दक्षिणायुतां।
पदद्याद्वस्त्रसंवीतां कौबेरं लोकमाप्नुयात्।
पलालधूम्रवर्णा तु पितृलोके महीयते।
सवत्सां पीवरां दत्वा शितिकंठमलंकृतां।
विश्वेदेवमसंबाढं स्थानं श्रेष्ठं प्रपद्यते।
समानवत्सां गौरीं तु धेनुं सर्वाघनाशिनीं।
सवत्सां कांस्यदोहां तु वसूनां लोकमाप्नुयात्।
वत्सोपपन्नां नीलांगीं सर्वरत्नसमन्वितां।
गंधर्वाप्सरसां लोकान्दत्वा प्राप्नोति मानव इति संकल्पे तु तत्फलं संकीर्त्य दद्यात्।

इति समानवर्णगोवत्सदानफलं

## अथ कृष्णधेनुदानं

" मात्स्ये "

अद्येत्यादि संकल्पादि पूर्ववत्

" मंत्रास्तु "

कृष्णधेनो नमस्तुभ्यं ब्रम्हविष्णुशिवात्मके।
त्रिजन्मार्जितपापानि ध्रुवं दानात्प्रणाशयेति

---

## अथ हेमशृंगीदानं

" मात्स्ये "

दशसौवर्णिके शृंगे खुराः पंचपलान्विताः।
पंचाशत्पलितं कांस्यं ताम्रं चापि तथैवच।

वस्त्रं च त्रिगुणं धेन्वा दक्षिणा च चतुर्गुणेति एवं विधिवद्दातुः फलमुक्तं

" नंदिपुराणे "

विधिना तु यदा दत्ता पात्रे धेनुः सदक्षिणा।
दाता तारयते जंतून्कुलानामयुतं शतमिति।

" महाभारतेऽपि "

प्रासादा यत्र सौवर्णाः शय्यारत्नोज्वला स्तथा।
वराश्चाप्सरसो यत्र तत्र गच्छंति गोप्रदाः।

" तथा "

यावंति रोमाणि भवंति धेन्वा स्तावंति वर्षाणि महीयते सः ।

स्वर्गाच्च्युतश्चापि ततोत्र लोके कुले समुत्पत्स्यति गोमतां तथा ।

सालंकृतां सवत्सां च धेनुं संपूज्य भक्तितः ।

सरत्नपूर्णा पृथिवी तेन दत्ता न संशयइति

इति स्वरूपतोगोदानं

इति दशधेनुदानानि

---

## दहा गाईंचीं दानें.

हे राजा ! पापाचा नाश करणाऱ्या अशा दहा गाई सांगितल्या त्यांचें स्वरूप आणि त्यांचीं नांवें सांगतों. पहिली गुळाची गाय, दुसरी तुपाची गाय, तिसरी तिळाची गाय. चवथी उदकाची धेनु, पांचवी दुधाची धेनु, सहावी मधाची धेनु, सातवी साखरेची धेनु, आठवी दह्याची धेनु, नववी रसाची धेनु आणि दहावी प्रत्यक्ष गाय होय. तूप इत्यादिकांच्या गाईचे घडे असावे, आणि इतरांच्या राशि ( ढिगले ) असाव्या. कित्येक लोक ह्यांतच ( ह्या दहा गाईंतच ) सो-

दहा गाईंचीं नांवें, त्यांचें स्वरूप व गुडधेनूच्या दानाचा विधि.

न्याची गाय मानतात. तसेंच दुसरे मोठे ऋषि तिळांच्या तेलाची नववी गाय असें मानतात. रसाच्या धेनुच्या ठिकाणीं सोन्याच्या धेनुची उत्फाचे धेनुप्रमाणें पूजा करावी. ह्यांचें विधानही " मत्स्य पुराणांत " आहे तें असे—चार हात लांबीचें हरणाचें चामडें चहूंकडे दर्भ पसरले आहेत अशा शेणानें सारवलेल्या भूमिवर पूर्वेकडे तोंड करून पसरावें. तसेंच लहान हरणाचें चामडें पसरावें. त्यास वासराची कल्पना करावी. पूर्वेकडे डोकें केलेली, उत्तरेकडे असलेल्या वासरानें युक्त अशा गाईची कल्पना करावी. चार माराएवढ्या गुळाची गाय श्रेष्ठ होय. एक मार गुळाचें तिचें वासरूं कल्पावें, दोन मारांची गाय मध्यम होय, अर्ध्या माराएवढें तिचें वासरूं असावें. एक माराची गाय कनिष्ठ होय. तिचें एकचतुर्थांशाचें वासरूं करावें. ह्याप्रमाणें घरांत जसें द्रव्य असेल त्या मानानें गाय आणि वासरूं ह्यांचीं प्रमाणें समजावीं. शंभर पळांची एक तुळा, वीस तुळांचा एक मार होतो, हजार पळांचा एक मार होतो असें परिभाषेंत सांगितलें. तुपाची गाय आणि वासडा हें पांढऱ्या बारीक वस्त्रानें आच्छादलेले, शिंपाचें ( मोत्यांचें ) ज्यांचे कान आहेत, उसांचे ज्यांचे पाय आहेत, स्वच्छ पांढऱ्या मोत्यांचे ज्यांचे डोळे आहेत, पांढऱ्या सुतांच्या ज्यांच्या शिरा आहेत, पांढऱ्या कांबळ्यानें वेढलेले, कोळ्यावर आणि पाठीवर तांबें आहे, पांढऱ्या चामराचे ज्यांस केश आहेत, पोंवळ्यांच्या ज्यांच्या भ्रुकुटी ( भिवया ) आहेत, लोण्याचें ज्यांचे स्तन ( चार ) आहेत, रेशमी वस्त्रांचीं ज्यांचीं शेंपटें आहेत ज्यांचे

शिंगांचें अलंकार सोन्याचें आहेत, चांदीचे ज्यांचे खूर आहेत, नाना प्रकारच्या फळांचे ज्यांचे दांत आहेत, आणि कापूर वगैरे सुवासिक द्रव्यांचीं ज्यांचीं नाकें आहेत, ह्याप्रमाणें ह्यांची रचना करून त्यांचें धूप, दीप वगैरेंनीं पूजन करावें. येथें वस्त्र, मोतीं वगैरेंचें द्रव्यानें आणि मानानें आधिक्य असतां फळ अधिक होतें.

---

## दानाचा संकल्प.

दानाचा संकल्प.

यजमानानें नित्याचे स्नानसंध्यादि कर्म आटपून पुण्यकारक संक्रांति वगैरे अशा काळीं शुद्ध होत्साता " अद्येत्यादि० मम समस्त पापक्षयद्वारा श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थं गुडधेन्वादि दानं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून ब्राम्हणाची वस्त्र इत्यादिकानें पूजा करून नंतर धेनुची पूजा करून प्रदक्षिणा करून " सर्व पापक्षयकाम इमाम मुकधेनुं गोत्राय शर्मणे ब्राम्हणाय सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददं न मम " असें म्हणून त्याचे हातावर दर्भ तीळ ह्यांनीं युक्त असें उदक द्यावें. ब्राह्मणानें गाईचें पुच्छ धरून " स्वस्ति " असें म्हणून " देवस्यत्वा " इत्यादि जशी शाखा असेल तिचे प्रमाणें कामस्तुतिकारक मंत्र म्हणावा. नंतर दात्यानें सोनें दक्षिणा द्यावी. प्रार्थनेचे ( गाईचे ) मंत्र—

या लक्ष्मीः सर्व भूतानां याच देवेष्ववस्थिता ।
धेनुरूपेण सादेवी वांछितं मे प्रयच्छतु ।
देहस्था याच रुद्राणी शंकरस्य सदाप्रिया ।
धेनुरूपेण सादेवी मम पापंच मोहतु ।

विष्णोर्वक्षसि या लक्ष्मीः स्वाहायाच विभावसोः ।
चंद्रार्कशक्रशक्तिर्या धेनुरूपास्तु साश्रिये ।
चतुर्मुखस्यया लक्ष्मीर्या लक्ष्मीर्धनदस्यच ।
या लक्ष्मीर्लोकपालानां साधेनुर्वरदास्तुमे ।

स्वधात्वं पितृमुख्यानां स्वाहा यज्ञभुजां तथा सर्व पापहरा धेनुस्तस्माच्छांतिं प्रयच्छमे " ह्या प्रमाणें प्रार्थना करून ब्राम्हणास ती धेनु अर्पण करावी. प्रत्यक्ष गाईंवाचून सर्व गाईंच्या दानाचा हाच प्रकार होय कारण, सांगितलेल्या रचनेचा प्रत्यक्ष धेनूंत उपयोग होत नाहीं. नंतर ब्राम्हणांस भूयसी दक्षिणा देऊन त्यांस जेऊं घालावें. अयन ( मकर, आणि कर्क संक्रांत ), मेष आणि तुला संक्रांत, तसेंच व्यतीपात, ग्रहण वगैरे पर्वांच्या दिवशीं वर सर्व सांगितलेल्या गुळांच्या धेनु वगैरे ह्यांचे आपले शक्तिप्रमाणें दान करावें. त्यांचा हाच प्रकार आणि हेच सांगितलेले उपचार होत. त्यांचे दानापासून भोग आणि मोक्ष हीं फळें प्राप्त होतात.

---

### तिळांच्या धेनुचें दान.

" कल्पतरूंत " द्रोणा एवढ्या प्रमाणाची तिळांची धेनु सांगितली, तिचा प्रकार " विष्णुधर्मोत्तरांत " शेणानें सारविलेल्या, वस्त्र, हरणाचें चामडें आणि दर्भ ह्यांनीं आच्छादित अशा भूमीवर

तिळांच्या धेनूचें दान.

सर्व रत्नांनीं सुशोभित अशी द्रोणा एवढ्या तिळांची धेनु, आणि आटका एवढ्या तिळांचें वासरूं करावें. ती सोन्याची जिला शिंगें आहेत, रुप्यांचे जिस खुर आहेत, सुगंध द्रव्य जिचें नाक आहे, साखरेची जिची जीभ आहे, गुळाचें जिचें मुख आहे, मेंढ्याचें जिला कांबळें आहे, ऊंसांचे जिला पाय आहेत, तांब्याची जिची पाठ आहे, पांढऱ्या ( पाणीदार ) मोत्यांचें जिचे डोळे आहेत, प्रशस्तपात्र जिचे कान आहेत, फळांचे जिचे दांत आहेत, स्रग्दाम ( फुलांची माळ ) जिचें पुच्छ आहे, लोण्याचें जिला स्तन आहेत, पांढऱ्या दोन वस्त्रांनीं आच्छादन केलेली, घंटा अलंकार ह्यांनीं भूषित, आणि कांशाचें पात्र जिचें उपदोहन[3] आहे ह्या प्रमाणें उपचारांनीं युक्त अशी करून विष्णुची प्रीति व्हावी ह्या करितां यजमानानें श्रद्धेनें ती ब्राम्हणास द्यावी. ह्या प्रमाणें इतिकर्तव्यता होय. मंत्र गुळाचे धेनूविषयीं सांगितले तेच. प्रार्थनेचा मंत्र "वन्हिपुराणांत" तिलाश्च पितृदैवत्या निर्मिताश्चेह गोसवे । ब्राम्हणातन्मयो धेनुर्दत्ता प्रीणातु केशवः ॥ या प्रमाणें मंत्रांतर सांगितलें.

प्रतिमा वगैरे विकण्याविषयीं.

प्रतिमा आणि तीळधेनु वगैरेंचे विकण्याविषयीं "हेमाद्रींत" "ब्रम्हावैवर्तांतून" सांगितलें तें असें- दानाच्या वेळींच प्रतिमांचे ठिकाणीं दैवत असतें असें सांगितलें आहे. तसेंच दानाच्या संबंधानें धे-

---

१ २५६ पळें = ८५३$\frac{1}{3}$ तोळे चालू मानानें.

२ ६४ पळें = २१३$\frac{1}{3}$ तोळे चालू मानानें.

३ दूध काढण्याचें भांडें.

नुच्या ठिकाणींही धेनुत्व असतें असें वेदांत सांगितलें आहे. दानाचे वेळीं दात्यास त्या धेनु सांगितल्या आहेत. ब्राम्हणास खर्चाच्या प्रसंगीं तें द्रव्य आहे असा निश्चय समजावा. हे विभो! दान घेऊन घरीं येणाऱ्या ज्ञात्या ब्राम्हणानें दान संबंधी सर्व द्रव्य ( सामान ) अपल्या इच्छेनें विकावें, आणि त्या योगानें आपल्या सर्व कुटुंबाचें पोषण आणि धर्मकृत्य करावें; [1]असें जर न केलें तर तो नरकाला पावेल असें ब्रम्हदेव म्हणतो.

ह्याप्रमाणें तिळांच्या धेनुचें दान सांगितलें.

---

## तुपाच्या धेनुचें दान.

तुपाचें धेनुचें दान.

"विष्णु धर्मोत्तरांत" मनुष्यांनीं तिळांचा अभाव असतां प्रयत्नानें तुपाची धेनु द्यावी. जगताचा स्वामी अशा विष्णुचें तूप, दूध ह्यांचे योगानें अभिषेक करून पूर्वीप्रमाणें फुलें, धूप, दीप वगैरे ह्यांनीं पूजन करावें. त्यांतच विधि सांगितला आहे तो असा--गाईच्या तुपाचा घडा ज्याचेवर कांशाचें झांकण आहे, फुलांच्या माळा वगैरेंनीं भूषित केलेला पांढऱ्या वस्त्रांनीं युक्त असून सोनें तसेंच मणि, पोंवळीं आणि मोतीं ह्यांनींयुक्त असा करावा. ज्यांत हजार पळें वजनाएवढें द्रव्य राहील एवढा कुंभ (घडा) असावा, किंवा पांचशें बारा पळाएवढा असावा त्या तुपाचे धेनुचे उसांचे पाय,

---

१ कुटुंब पोषण आणि धर्मकृत्य ह्यांस लागणाऱ्या द्रव्याची अडचण असतां मिळालेल्या दानाचें सामान जर विकलें तर नरकाला जाईल.

रुप्याचे खूर, सोन्याचे दोन डोळे, अगरुच्या लाकडाचीं शिंगें, सात धान्यांचे दोन्ही पार्श्वभाग ( कुशी ) पांढऱ्या रेशमाचें कांबळें ( पांघरण्याचें वस्त्र ), कापराचें नाक, फळांचें स्तन, साखरेची जीभ, गूळ, तूप ह्यांचें मुख, रेशमाचें पुच्छ, पांढऱ्या शिरसांचे केश, तांब्याची पाठ ह्याप्रमाणें करून विधीनें तिचें पुजन करून नंतर तसेंच ब्राम्हणाचेंहि आपल्या सामर्थ्याप्रमाणें वस्त्र, अलंकार ह्यांनीं पूजन करून त्यास तिचें दान करावें. दानाचा प्रकार पूर्वीप्रमाणेंच जाणावा. मंत्र " स्कंद पुराणांत "

घृतंगावः प्रसूयंते घृतं भूम्यां प्रतिष्ठितं ।
घृतमग्निश्च देवाश्च घृतं मे संप्रदीयतां ॥

दानाचें फळ देखील त्यांतच सांगितलें तें असे:—
ज्या लोकांत तूप, दूध ह्यांनीं भरून वाहणाऱ्या नद्या आहेत, आणि जेथें पायसाचा चिखल आहे अशासर्व पुण्यकारक लोकांत तो दान देणारा उत्पन्न होतो. हे राजश्रेष्ठा! ज्यांस कामाची वासना आहे त्यांस हें फळ सांगितलें, आणि ज्यांस कामाची इच्छा नाहीं असे लोक धेनुच्या दानापासून विष्णु लोकीं जातात. दक्षिणा तर सोनेंच द्यावें असें " हेमाद्रींत " सांगितलें आहे अथवा शक्तिप्रमाणें सोनें वगैरे द्यावें असें " मदनरत्नांत " आहे.

ह्याप्रमाणें तुपाच्या धेनुचें दान सांगितलें.

---

## जलधेनुचें दान.

जळधेनूचें दान.

" स्कंद पुराणांत " हे नरव्याघ्रा! सोनें आणि रुपें ह्यांनीं युक्त असा पाण्याचा घडा, सोन्याचीं शिंगें आणि रुप्याचे खुर ह्यांनीं युक्त असून त्याचे आंत रत्नें टाकावीं, असेंच ग्राम्य अशीं धान्यें

ह्यांनींयुक्त पांढऱ्या दोन वस्त्रांनीं आच्छादन केलेला, दूर्वा आणि पानें ( आंबा वगैरेचीं ) ह्यांनीं शोभणारा असून कोष्टकोळींजन जटामांसी, मोरमांसी, वाळा, वालुक आणि आवळे ह्यांनीं युक्त वाघांटीच्या पानांनीं युक्त असावा. आणि पांढरें वस्त्र ज्यास उपवीत आहे, छत्र, उपासू ( जोडे ) ह्यांनीं युक्त दर्भांच्या विष्टरानें शोभलेला ज्याच्या चार दिशेस चार तिळांच्या पात्रांनीं वेढलेला, ज्यांच्यावर दह्याचें पात्रानें आच्छादन केलेला, तोंडावर ज्याच्या तूप आणि दूध आहे असा असावा. तिळाचीं पात्रें तांब्याचीं असावीं. दह्याचें पात्र कांशाचें असावें. ह्याप्रमाणें व्यवस्था करून यजमानानें उपोषित राहून वासुदेव ( विष्णु ) आणि वरूण ह्यांचें पूजन करून नंतर पूर्वीं सांगितल्या प्रमाणें संकल्प करून जलधेनु आणि ब्राम्हण त्यांचें वस्त्रादिकांच्या योगानें पूजन करून वत्सासह जलधेनुचें गुडधेनुप्रमाणें दान द्यावें नंतर “ या लक्ष्मी० ” इत्यादि पूर्वीं सांगितलेल्या मंत्रांनीं प्रार्थना करावी.

ह्याप्रमाणें जलधेनूचें दान सांगितलें.

---

## क्षीरं धेनूचें दान.

क्षीर धेनूचें दान.

“ स्कंद पुराणांत ” हे राजा ! क्षीर धेनविषयीं मी सांगतों तें ऐक. हे राजा शेणानें भुई सारऊन तिच्या गोचर्माच्या प्रमाणा एवढ्या भागावर चहूंकडे दर्भ पसरून त्याचेवर काळ्या हरणाचें

---

१ दुधाची गाय.

चामडें ठेवावें. व त्यावर शेणाचें कुंडाळें करून त्यावर दुधानें भरलेला घडा ठेवावा, आणि त्याचेजवळ त्याचे चतुर्थांशाएवढा दुसरा घडा वासरूं मानून ठेवावा, नंतर तिला गाय मानून चंदन व अगरु ह्यांचीं शिंगें, प्रशस्त पानाचे कान, तिळांचें पात्रावर ठेवलेली, गुळाचें मुख ( तोंड ), साखरेची जीभ, फळांचे दांत, मोत्यांचे डोळे उसांचे पाय, दर्भांचे केस, पांढऱ्या कांबळ्याचें आच्छादन ह्याप्रमाणें करून वत्सासह तिचे पूजन करून ब्राम्हणाचेंही वस्त्र, अलंकार वगैरेंनीं पूजन करावें. नंतर अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय इमां क्षीरधेनुं पूर्वोक्तोपस्करयुतां समस्तपापक्षयकामस्तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून दान घेणारानें " देवस्यत्वा " मंत्र म्हणून " स्वस्ति असें म्हणून जशी शाखा असेल तिचे प्रमाणें " कामस्तुति " म्हणावी नंतर " यालक्ष्मीः " इत्यादि मंत्रांनीं तिची प्रार्थना करावी.

ह्याप्रमाणें क्षीरधेनु सांगितली.

---

## मधू धेनुचें दान.

मधू धेनूचें दान.

" स्कंद पुराणांत " सर्व पापांचा क्षय करणारी अशा मधू धेनुविषयीं सांगतों. शेणानें भुई सारवून तिचेवर दर्भ पसरून त्यांवर काळ्या हरणाचें चामडें पसरून पूर्वीप्रमाणें धेनूची कल्पना करून तिचें आणि ब्राम्हणाचें पूर्वी प्रमाणें पूजन करून यजमानानें अद्येत्यादि

गोत्राय शर्मणे सालंकृताय, सौवर्णमुखीं, आगरुचंदनशृंगीं, ताम्रपृष्ठीं, सूत्रपुच्छां, इक्षुपादां, सितकंबलकंबलां, गुडमुखीं, शर्करा-जिव्हां मौक्तिकनेत्रां, फलदंतां, दर्भरोमां, प्रशस्तपत्रश्रवणां, नवनीत स्तनीं, सप्तधान्योपेतां, घंटाभरणभूषितां, कांस्यदोहां, सुपूजितां येथपावेतों म्हणून तिच्या शेपटीकडल्या भागावर बसलेल्या ब्राम्हणास "मधुवाता ऋतायतु" हा मंत्र म्हणून पुढें "इमां मधुधेनुं सर्वपापक्षयकामस्तुभ्यमहं संप्रददेन मम" असा संकल्प करून दान द्यावें. नंतर सोनें दक्षिणा देऊन "यालक्ष्मीः" इत्यादि पूर्वी सांगितलेल्या मंत्रांनीं प्रार्थना करावी.

ह्या प्रमाणें मधुधेनूचें दान सांगितलें.

---

## शर्करा धेनूचें दान.

"स्कंदपुराणांत" हे राजा ! त्याचप्रमाणें यथार्थ साखरेच्या धेनुविषयीं सांगतों ऐक. शेणानें भुई सारवून तिचेवर दर्भ पसरून त्यावर काळ्या हरणाचें चामडें पसरून त्यावर चार भार वजनाची साखरेची धेनु कल्पून तिच्या चतुर्थांशाएवढ्या साखरेचा वत्स कल्पावा. दोन भारांची गाय कल्पिली तर तिच्या अष्टमांशा एवढा तिचा वत्स असावा, अथवा आपले शक्तिप्रमाणें गाय आणि वत्स करावा. नंतर त्यांच्या चार दिशेस सर्व धान्यें ठेऊन नंतर यजमानानें "अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय इमां शर्करा धेनुं सुवर्ण शृंगीं, मौक्तिकनयनां, गुडमुखीं, पिष्टमयजिव्हां, कंबलपट्ट सूत्र वेष्टितां, कंठाभरण भूषितां, इक्षुपादां, रौप्यखुरां,

साखरेच्या धेनूचें दान.

नवनीतस्तनीं, प्रशस्तपत्रश्रवणां, सितचामरभूषितां, पंचरत्नसमायुक्तां, दर्भरोमां, कांस्यदोहनां, गंधपुष्पाद्यर्चितां समस्तपापक्षयकाम स्तुभ्य महं संप्रददे न मम " असा संकल्प करून दान देऊन सोनें दक्षिणा द्यावी. नंतर " या लक्ष्मी: " इत्यादि मंत्रांनीं प्रार्थना करून ब्राम्हणांस भूयसी ( दक्षिणा ) द्यावी. नंतर ब्राम्हणाचें मुख पाहूं नये. " पांच रत्नें " अपराकींत " सोनें, हिरा, नीलमणी, पद्मराग आणि मोतीं हीं प्राचीन ऋषींनीं पांच रत्नें सांगितलीं.

ह्या प्रमाणें साखरेच्या धेनूचें दान सांगितलें.

---

## दह्याच्या धेनूचें दान.

दह्याचे धेनूचें दान.

" स्कंदपुराणांत " प्रथम भूमि सारवून त्यावर दर्भ आणि कृष्णाजिन पसरून त्यावर सात धान्यें ठेऊन त्यांचेवर दह्याचा घडा ठेऊन त्याचे चतुर्थांशाएवढा त्याचा वत्स करून " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय सुवर्णमुखीं प्रशस्त पत्रश्रवणां मुक्ताफले क्षणां चंदनागरुशृंगीं मुखे विशेष गंध द्रव्यैर्युक्तां शर्करयाकृतजिव्हां श्रीखंडेनकृतघ्राणां फलमयदंतां सितकंबलच्छनां दर्भरोमां सूत्रमयपूच्छां रौप्यमुखीं वा नवनीत स्तनीं इक्षुपादां सर्वाभरणभूषितां वस्त्रयुग्मेनाच्छादितां गंधपुष्पाद्यर्चितां इमां दधिधेनुं सर्व पापक्षयकाम । येथपर्यंत संकल्प करून पुढें " दधिक्राव्ण: " हा मंत्र म्हणून पुढें तुभ्यमहं संप्रददे न मम ॥ असें

म्हणून दान करावें; अथवा गुडधेनुचे सांगितलेल्या मंत्रानें दान द्यावें. नंतर सुवर्ण दक्षिणा देऊन " या लक्ष्मी: " इत्यादि मंत्रांनीं प्रार्थना करावी.

ह्या प्रमाणें दह्याचे धेनूचें दान सांगितलें.

---

## रसधेनूचें दान.

रसधेनूचें दान.

" स्कंद पुराणांत " हे महाराजा ! तुला संक्षेपानें रसधेनु-विषयीं सांगतों. शेणानें भुई सारवून त्यावर दर्भ आणि कृष्णाजिन पसरून त्यावर ऊंसाच्या रसाचा घडा ठेवावा. आणि त्याचे चतुर्थांशाएवढा वत्स करून " अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सालंकृताय इमां रसधेनुं सुवर्णशृंगाभरणयुतां रौप्यखुरां वस्त्रपुच्छां इक्षुपादां पुष्पकंबलां ताम्रपृष्ठीं पुष्परोमां व्रीहियुतां चतुर्दिक्षु दीपसमायुक्तां सर्वगंधविभूषितां पूर्वादिदिक्षु तिलपात्रचतुष्टयावृतां सुपूजिताय सर्व पापक्षय पूर्वकैकविंशति कुलोद्धरण कामस्तुभ्यमहं संप्रददे न मम। ह्या प्रमाणें संकल्प करून द्यावी. नंतर सोनें दक्षिणा द्यावी. "मंत्रतर" गुडधेनुचे दानाविषयीं सांगितलेलेच घ्यावे आणि शेष उपस्कर ही तसेंच जाणावें. या प्रमाणें उच्चार करून जर रसधेनु ब्राम्हणास दिली तर त्याचे पूर्वींचे दहा, पुढचे दहा आणि स्वतः मिळून एकवीस पुरुषांचा ऊद्धार होतो.

ह्या प्रमाणें रसधेनूचें दान सांगितलें.

## प्रत्यक्ष धेनूचें ( गाईचें ) दान.

" अंगिरस् "—विशेषेंकरून वेदाध्ययन करणाऱ्या अशा ब्राम्हणास एक गाय द्यावी म्हणजे ती पूर्वींचीं सात आणि पुढचीं सात अशा चौदा कुलांचा उद्धार करिते " देवल " जातवान् चांगल्या लक्षणाची, तरुण, वासरानें युक्त, पुष्कळ दूध देणारी, मायाळू अशी गाय विद्वान् ब्राम्हणास द्यावी.

प्रत्यक्ष धेनूचें दान.

## दानाचा प्रयोग.

दान करणारानें पुण्यकारक अशा दिवशीं आपलें नित्यकर्म आटपून " अद्येत्यादि० यथाशक्ति यथाज्ञानं गोदान महं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून वासरासह गाईची आणि ब्राम्हणाची आपले सामर्थ्याप्रमाणें वस्त्र, अलंकार वगैरेंनीं पूजा करून गाईच्या शिंगाच्या मूळापासून स्तना पावेतोंच्या स्थानां-ठिकाणीं देवतांची पूजा करावी. ती अशी—शृंगमूले ( शिंगांच्या मूळांत ) ब्रम्हाविष्णुभ्यां नमः ब्रम्हविष्णू पूजयामि, शिंगांच्या टोंकावर–सर्व तीर्थेभ्यो नमः सर्व तीर्थानि पूजयामि, ह्या प्रमाणें सर्व ठिकाणीं म्हणावें. डोक्याच्या मध्यभागीं–शिवाय० कपाळावर–देव्येनमः दे० नाकावर " षण्मुखाय० " दोन्ही नाकपुड्यांवर " कंबलाश्वतरनागाभ्यां० " दोन्ही कानांवर " अश्विभ्यां " दोन्हीं डोळ्यावर " शशिभास्कराभ्यां नमः शशि० " दांतावर " वायवे० " जिभेवर वरुणाय० हुंकारावर सरस्वत्यै०

दानाचा प्रयोग.

दोन्ही गालांवर " पक्षमासाभ्यां० " दोन्ही ओठांवर " संध्या-
द्वयाय० " मानेवर इंद्राय० कुशीवर " रक्षोभ्यो नमः र० "
" उरावर " साध्येभ्योन० " पायांवर " धर्माय० " जांघांवर
" अधर्माय " खुरांच्या मध्यभागीं " गंधर्वेभ्योन० " खुरांच्या
टोंकावर " पन्नगेभ्योन० " खुरांच्या पाठीमागल्या टोंकावर
" अप्सरेभ्योन० " पाठीवर " एकादशरुद्रेभ्योन० " सर्व सांध्या-
वर वसुभ्योन० " कमरेच्या भागावर ( ढुंगणावर ) " पितृभ्योन०
शेंपटावर " सोमाय " गुह्यावर " आदित्यरश्मिभ्योन० " गोमू-
त्रावर " गंगायै " शेणावर " यमुनायै " दुधावर " सरस्वयै "
दह्यावर " नर्मदायै० " तुपावर " अग्नयै० " केसांवर " अष्ट-
विंशाति देवकोटिभ्योन० " पोटावर " पृथिव्यै० " चार स्तनांवर
" चतुःसमुद्रेभ्योनमः चतुरःसमुद्रान् पूजयामि " ह्याप्रमाणें देव-
तांचें अवयवांचे ठिकाणीं पूजन करून " अद्येत्यादि गोत्राय श-
र्मणे सुपूजिताम पृथ्वीदानसमकामः सर्वपापक्षयकाम " किंवा
" विष्णुप्रीतिकामः इमां प्रत्यक्षधेनुं सुवर्णशृंगीं रौप्यखुरां ताम्रपृष्ठीं
घंटाग्रैवेयां मुक्तालांगूलां कांस्योपदोहनीं सितवस्त्रद्वयोपेतां सर्वा-
भरणभूषितां सोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्या-
प्रमाणें यजमानानें संकल्प करून तिळांच्या पात्रांत ( भांड्यांत )
गाईचें पुच्छ तुपानें भिजवून ब्राम्हणाच्या हातावर दर्भ व तीळ
ह्यांनींयुक्त असें उदक द्यावें. दानाचा मंत्र--

" यज्ञसाधन भूताया विश्वस्याघौघनाशिनी ।
विश्वरूपधरोदेवः प्रीयता मनयागवा " ।

नंतर दात्यानें दानाची सिद्धि व्हावी म्हणून सोनें दक्षिणा देऊन प्रार्थना करावी--

नमो गोभ्यः श्रीमतीभ्यः सौरभेयोम्यएवच ।
नमो ब्रम्हसुताभ्यश्च पवित्राभ्यो नमोनमः ।
पूजितासि वशिष्ठेन विश्वामित्रेण धीमता ।
सुरभे हर मे पापं यन्मया दुष्कृतं कृतं ।
गावो मे अग्रतःसन्तु गावो मे संतु पृष्ठतः ।
गावो मे हृदयेसन्तु गवांमध्ये वसाम्यहं " ॥

ह्याप्रमाणें प्रार्थना करून गाय आणि ब्राम्हण ह्यांस प्रदक्षिणा करून त्यांस पोंचविण्याकरितां त्यांचें मागें किंचित् चालत जावें.

ह्याप्रमाणें गोप्रदानाचा प्रयोग सांगितला.

---

## पांढऱ्या वगैरे वर्णाच्या गाईंच्या दानाचें फळ.

पांढऱ्या इत्यादि गाईंचे दानाचें फळ.

" पद्म पुराणांत " पांढरी गाय पुत्र देणारी असून चंद्र लोकाची प्राप्ति देणारी आहे असें सांगितलें. काळी स्वर्ग देणारी समजावी. गौरवर्णाची गाय कुळाची वृद्धि करते. कपिला सर्व पापाचा नाश करते आणि नाना प्रकारच्या रंगाची गाय मोक्षाला देते.

सारख्या रंगाच्या गाईच्या आणि वासराच्या दानाचें फळ.

"महाभारतात" दुध देणारी सारख्या रंगाची वस्त्रानें अच्छादलेली (जिचे पाठीवर वस्त्र घातलें आहे) अशा वत्सासह गाईचें दान केलें असतां तो सूर्यलोकीं प्रतिष्ठेला पावतो. व जिचें वासरूं काळें असून जी स्वतः काळी आहे अशा वस्त्रानें वेष्टिलेल्या चांगल्या स्वभावाच्या (गरीब) अशा गाईचें दान केलें असतां पापाचा नाश होऊन ह्या लोकीं (मृत्युलोकीं) प्रतिष्ठेला पावतो. वायुनें उडणाऱ्या रेणु[1] प्रमाणें वर्ण असणाऱ्या अशा गाईचें वासरासह जो दान करतो तो वरुण लोकाला पावतो.

सारख्या रंगाच्या गाईच्या आणि वासराच्या दानाचें फळ.

जिचा सोन्याप्रमाणें वर्ण आणि डोळे पिंगट वर्णाचे आहेत, वस्त्रानें पांघरलेली, जिचें दूध काढण्याचें भांडें काशाचें आहे अशा गाईचें वत्सासह दक्षिणेनें युक्त असें दान केलें असतां कुबेराच्या लोकाची प्राप्ति होईल. कडब अथवा धूर ह्या प्रमाणें जिचा वर्ण आहे अशा गाईचें जो दान करील तो पितृलोकांत प्रतिष्ठेला पावतो. शरीरानें पुष्ट असून जिला अलंकार घातले आहेत अशा गाईचें वत्सासह जो शंकरास दान करील, तो ज्याहून दुसरें कोणतें श्रेष्ठ नाहीं अश स्थानाला पावेल. जिच्या वासराचा रंग पांढरा आहे व स्वतःचाही रंग पांढरा आहे अशा सर्व पापांचा नाश करणाऱ्या गाईचें वासरासह दुध काढण्याकरितां कांशाचें भांड्या-

१ धुळीच्या कणाप्रमाणें.

सह दान केल्यानें अष्ट वसूंच्या लोकाची प्राप्ति होईल. निळ्या रंगाच्या गाईचे वत्सासह सर्व रत्नासहित दान केलें असतां मनुष्य गंधर्व आणि अप्सरा ह्यांच्या लोकांस प्राप्त होतो. ह्या गाईंच्या दानाच्या संकल्पांत तें तें फळ म्हणून ( लाऊन ) त्यांचे दान करावें. ह्या प्रमाणें सारख्या रंगाच्या वासराच्या आणि गाईच्या दानाचें फळ सांगितलें.

---

## काळ्या गाईचें दान.

काळ्या गाईचें दान.

" मत्स्य पुराणांत " " अद्येत्यादि० संकल्प पूर्वींप्रमाणें करावा. मंत्रतर—

कृष्णधेनो नमस्तुभ्यं ब्रम्हविष्णुशिवात्मके ।
त्रिजन्मार्जित पापानि ध्रुवंदानात्प्रणाशय ॥

---

## हेमशृंगीचें दान.

हेमशृंगीचें दानाचा विधि आणि फळ.

" मत्स्य पुराणांत " दहा पळाच्या[२] वजनाएवढीं दोन सोन्याचीं शिंगें, पांच पळाएवढे खुर, पन्नास पळें कांसें आणि तांबेंही तेवढेंच असावें. वस्त्र गाईच्या तिप्पट असावें आणि दक्षिणा चौपट असावी. अशा विधी प्रमाणें दान

---

२ पळाचे व्यावहारिक ३$\frac{१}{३}$ इतके तोळे होतात.

देणाऱ्याचें फळ सांगितलें " नंदि पुराणांत " पात्राचे ठिकाणीं विधिप्रमाणें दक्षिणेसह गाय दिली असतां दाता दहा लक्ष कुळांतील प्राण्यांचा उद्धार करितो. " महाभारतांतही--ज्या ठिकाणीं सोन्याचे प्रासाद ( वाडे ) आहेत, तसेंच रत्नखचित शय्या ( पलंग ) आहेत, आणि जेथें श्रेष्ठ अशा अप्सराही आहेत अशा ठिकाणीं गाईचें दान करणारे जातात. " तसेंच गाईच्या आंगावर जितके केंस असतात तितक्या वर्षें पावेतों तो स्वर्गांत मान्यतेला पावतो. पुढें तो स्वर्गापासून च्युत जरी झाला तरी ह्या लोकीं गाई ज्यांच्या घरीं असतात अशांच्या कुळांत उत्पन्न होईल. जो अलंकारांनींयुक्त अशा गाईचें आणि वासराचे मोठ्या भक्तीनें पूजन करून दान करील त्यानें रत्नानें परिपूर्ण अशा पृथ्वीचें दान केल्याप्रमाणें होतें ह्यांत संशय नाहीं.

ह्याप्रमाणें प्रत्यक्ष गाईचें दान सांगितलें.

ह्याप्रमाणें दहा गाईचीं दानें होत.

---

## अथ कार्पास धेनुदानं

" मात्स्ये× "

अतःपरं प्रवक्ष्यामि धेनुं कार्पास कीं शुभां ।
कार्पासमूलं तत्रापि तेनासावुत्तमा स्मृता ।
सर्वविश्वस्य गुप्त्यर्थं ब्रम्हणा चांशुकं कृतं ।

× दानमयुखांत " वाराहे " असा पाठ आहे.

सा च कार्पासभारेण श्रेष्ठा धेनुः प्रकीर्तिता
मध्यमा च नदर्धेन तदर्धेन कनीयसी ।
पूर्ववस्त्रं च धान्यं च हिरण्यं च तथैवच ।
वत्सकं तु चतुर्थांशान्मानमत्राभिधीयते ।

कुर्वीत पुर्ववद्धस्तवस्त्रधान्या द्युपस्कृतमिति ततो वाराहोक्ततिलधेनुदानवत् क्रियाकल्पादिसंकल्पादारभ्य दानं कृत्वा प्रार्थयेत्

मंत्रास्तु

हेमकुंदेंदुसदृशो क्षीरार्णवसमुद्भवे ।
सोमप्रिये सुधन्वाख्ये सौरभेयि नमोस्तुते ।
दत्तेयमिंदुनाथाय शशांकायामृताय च ।
अत्रिनेत्रप्रजाताय सोमराजाय वै नमः ।
यस्त्वेवं परया भक्त्या ब्राम्हणाय प्रयच्छति ।
स याति चंद्रलोकं तु सोमेन सह मोदत इति ।

इति कार्पास धेनुदानं.

---

## कापसाच्या धेनुचें दान.

कापसाच्या धेनुचें दान.

"मात्स्य पुराणांत" आतां ह्यानंतर कापसाच्या धेनुविषयीं सांगतों. ब्रम्हदेवानें सर्व लोकांचें रक्षण व्हावें ह्यासाठीं कापसाचें वस्त्र निर्माण केलें, म्हणून तें वस्त्र आणि ती धेनु श्रेष्ठ मानण्यांत आली. ती कापसाची धेनु एक भाराएवढीं श्रेष्ठ, त्याच्या अर्ध्याएवढीं मध्यम

आणि त्याच्याही अर्ध्याएवढीं कनिष्ठ सांगितली आहे. वस्त्र, धान्य आणि सोनें हें पूर्वींप्रमाणेंच असावें. धेनूच्या चतुर्थांशाएवढा तिचा वत्स करावा; वस्त्र, धान्य वगैरे उपस्कार पूर्वींपमाणेंच करावा. नंतर " वराह पुराणांत " सांगितल्याप्रमाणें तिळाच्या धेनूच्या दानाप्रमाणें क्रियाकल्प वगैरे संकल्पापासून करून दान करून पुढील मंत्रांनीं प्रार्थना करावी.
मंत्र ( प्रार्थनेचा )--

हेमकुंदेंदुसदृशे क्षीरार्णव समुद्भवे ।
सोमप्रिये सुधन्वाख्ये सौरभेयिनमोऽस्तुते ।
दत्तेयमिंदुनाथाय शशांकायामृतायच ।
अत्रिनेत्रप्रजाताय सोमराजाय वैनमः ।
यस्त्वेवं परया भक्त्या ब्राम्हणाय प्रयच्छति ।
स याति चंद्रलोकंतु सोमेन सहमोदते ।

ह्याप्रमाणें कापसाच्या धेनूचें फल सांगितलें.

---

## अथ लवणधेनुदानं.

" भविष्ये "

तत्रयुधिष्ठिरं प्रति कृष्णः–
शृणु राजन् प्रवक्षामि लवणस्येह कल्पितां ।
गोमयेनानुलिप्ते तु दर्भसंस्तरसंस्थितं ।
आविकं चर्म विन्यस्य पूर्वाशाभिमुखास्थितं ।

वस्त्रेणाच्छादितां कृत्वा धेनुं कुर्वीत बुद्धिमान् ।
आटकेनैव कुर्वीत बहुवित्तोपकल्पितां ।

गां विप्रं च यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां लवणधेनुं फलस्तनीं सिंधुशुक्तिकर्णां सक्तुपिंडकपोलां यवास्यां कंबलपट्टसूत्रग्रैवेयकां ताम्रपृष्ठां गुडापानां कंबललांगुलां मधुयोनिकां सर्वाभरणभूषितां सर्वपापक्षयकामो विष्णुप्रीतिकामोवा तुभ्यमहं संप्रददे न ममेति पुत्रभार्यादियुतः प्रदक्षिणीकृत्य दद्यात् शेषं मधुधेनुवत् मंत्रस्तु लवणे वै रसाः सर्वे सर्वास्तिष्ठंति देवताः सर्वदेवमये देवि लवणाख्ये नमोस्तुते इति पुराणांतरेषु षोडशप्रस्थमिता चतुर्थांशेन वत्स इत्युक्तं

इति लवणधेनुदानं.

---

## मिठाच्या धेनूचें दान.

मिठाच्या धेनुचें दान.

" भविष्य पुराणांत " धर्मराजाला कृष्ण म्हणतात हे राजा मिठाची केलेली धेनु सांगतों. शेणानें भुई सारवून तिचवर दर्भ पसरून त्यावर पूर्वेकडे तोंड केलेलें असें मेंढ्याचें चामडें पसरावें. पुष्कळ द्रव्यानें कल्पिलेली ( तयार केलेली ) अशी एक आढका* एवढी मिठाची धेनु करून तिला वस्त्रानें आच्छादन करून

---

* एक आढकाचे २१३⅓ एवढें तोळे होतात.

नंतर गाय आणि ब्राम्हण ह्यांचें आपल्या सामर्थ्याप्रमाणें वस्त्र, आलंकार वगैरेंनीं पूजन करून " अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां लवणधेनुं फलस्तनीं सिंधुशुक्ति कमणीसक्तु पिंड-कपोलां यवास्यां कंबलपट्टसूत्रग्रैवेयकां तामपृष्ठीं गुडापानां कंबल-लांगूलां मधुयोनिकां सर्वाभरणभूषितां सर्वपापक्षयकामः किंवा " वि-ष्णुप्रीतिकामः " तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्याप्रमाणें संकल्प करून नंतर पुत्र, स्त्री वगैरे ह्यांसह धेनूस प्रदक्षिणा करून दान करावें. शेष ( बाकी राहिलेलें ) कृत्य मधुधेनुप्रमाणें समजावें. मंत्र ( दानाचा )--

लवणे वै रसाः सर्वे सर्वा स्तिष्ठंति देवताः ।
सर्वदेव मये देवि लवणाख्ये नमोस्तुते ।

दुसऱ्या पुराणांत तर सोळा प्रस्था+ एवढीं मिठाची धेनु आणि त्यांच्या चतुर्थांशाएवढा तिचा वत्स असें सांगितलें आहे.

ह्याप्रमाणें मिठाच्या धेनूचें दान सांगितलें आहे.

---

## अथ सुवर्णधेनुदानं.

" वन्हि पुराणे "
सुवर्णधेनुश्चाप्यत्र सुवर्णाश्च चतुर्दश ।
सुनिर्णिक्त सुवर्णैश्च सप्तभिर्मध्यमा मता ।
चतुर्भिश्च कनिष्ठा स्याच्चतुर्थांशेन वत्सकः ।
गुडधेनुविधानेन दत्ता सर्वफलप्रदा ।

---

+ एका प्रस्थाचे ५३$\frac{1}{3}$ एवढे तोळे होतात.

अत्र विशेषोरौप्येण वत्स इति केचित् तथा अद्येत्यादि प्रवालशृंगीं घृतपात्रस्तनवतीं पञ्चरोमां कर्पूरागरुनासिका मिष्टान्नरसवासितां शंखशृंगांतरां शुक्तिललाटस्थां नारीकेलश्रवणां गुडजानुकां पंचगव्यापानवतीं कांस्यपृष्ठां पट्टसूत्रलांगूलां सप्तधान्य समायुक्तां फलपुष्पोपेतां छत्रोपानसमन्वितां सुवर्णधेनुं रुद्रदैवत्यां सहस्राश्वमेध फलावाप्तिकामः कुलसहस्रस्य स्वर्गे निवासकामश्च गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न ममेति "मंत्रास्तु"

सुवर्णधेनुं विप्राय प्रतिपद्येदृशीं नरः।

हिरण्यरेताः पुरुषः पुराणः कृष्णपिंगलः।

तप्तहेमच्छविः स्रष्टा विश्वात्मा प्रीयतां ममेति अनेनैव तु मंत्रेण धेनुदानं प्रकीर्तितं अश्वमेधसहस्रस्य फलमाप्नोत्यसंशयं कुलानां च सहस्रस्य स्वर्गं नयति गोप्रद इति.

इति सुवर्णधेनुदानं.

---

## सोन्याच्या धेनूचें दान.

"वन्हि पुराणांत" सोन्याच्या धेनुविषयीं येथें सांगतों. चवदा+सुवर्णा एवढी निर्मळ अशा सोन्याची धेनु उत्तम होय. साताएवढी मध्यम आणि चाराएवढी कनिष्ठ होय; तिच्या चतुर्थांशाएवढा तिचा वत्स

सोन्याचे धेनुचें दान.

---

+ एका सुवर्णाच्या ८० गुंजा होतात.

असावा. गुळाचे धेनुप्रमाणें तिचें दान केलें असतां ती सर्व फळांस देते. ह्या विषयीं विशेष रुप्याचा वत्स करावा असें कित्येक म्हणतात. " अद्येत्यादि० प्रवालशृंगीं घृतपात्ररतनवतीं पद्मरोमां कर्पूरागरुनासिका मिष्टान्न रस वासि तां शंखशृंगातरां शुक्ति ललाटस्थां नारीकेळ श्रवणां गुडजानुकां पंचगव्यापानवतीं कांस्यपृष्ठां पट्टसूत्रलांगूलां सप्तधान्यसमायुक्तां फलपुष्पोपेतां छत्रोपानसमन्वितां सुवर्णधेनुं रुद्रदैवत्यां सहस्राश्वमेध फलवाप्तिकामः कुल सहस्रस्य स्वर्गनिवासकामश्च गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्य मयं संप्रददे न मम । ह्या प्रमाणें संकल्प करावा. दानाचा मंत्रतर:-

" सुवर्णधेनुं विप्राय प्रतिपद्येद्दर्शी नरः ।

हिरण्यरेताः पुरुषः पुराणः कृष्णपिंगलः ।

तप्त हेमच्छविः स्रष्टाविश्वात्मा प्रीयतां मम ॥ ह्या मंत्रानें गाईचें दान करावें असें सांगितलें आहे, गाय देणाऱ्यास हजार अश्वमेधांचें फळ मिळतें, आणि तो सहस्र ( हजार ) कुलांस स्वर्गी घेऊन जातो.

ह्या प्रमाणें सोन्याच्या धेनूचें दान सांगितलें.

---

## अथ वंध्यात्वहरं सुवर्णधेनुदानं.

" वायुपुराणे "

चतुर्विधा च या वंध्या भवेद्वत्सवियोजनात् ।

वक्ष्ये तस्याः प्रतीकारं तत्सरूपं निबोध मे ।

वंध्या चतुर्विधा प्रोक्ता काकवंध्या स्त्रीप्रसूः मृतप्रजाइति काकवंध्यातु काकवदेकापत्या शेषाः स्पष्टाएव धनुरूपविशेष माह

" हेमाद्रौ कर्मविपाके "

हिरण्येन यथाशक्त्या सवत्सां कारयेद्दढां ।
धेनुं पलेन वत्सं च पादेन गुरुरब्रवीत् ।

यथाशक्तेति पलेन वा तदर्धेन तदर्धार्धेन वा पुनरिति कर्मविपाकोक्तपरिभाषाप्रकारेण धेनुं रौप्यखुरां रत्नं पुच्छे नियोज्य घंटामुभयोरपि गले बध्वा रत्नमयतिलकं ललाटे बध्नीयात् एतादृशीं समभ्यर्च्यपायसनैवेद्यं दत्वा मोदकान् पूपान् गुडलवणजीरकं सुवर्णदक्षिणां कंचुकं च नववेणुमयशूर्पेनिधाय एकं वायनकं धेनवे अन्याभ्यः पतिपुत्रवतीभ्यो ब्राम्हणीभ्यः षडष्टौ वा दद्यात् ततो वेदपारग मलोलुपं ब्राम्हणं ऋणग्रस्तं दरिद्रं कुटुंबिनमाहूय कृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य तस्मोधेनुं सोमोधेनुमिति मंत्रेण सवत्सां च संपूज्य अग्निमुपसमाधाय समिदाज्यचरुद्रव्यैः सोमोधेनुमिति मंत्रेण प्रत्येकमष्टोत्तरशतसंख्यया हुत्वा स्वय मुदङ्मुखः प्राङ्मुखायोपविष्टाय गोपुच्छं तद्धस्ते निधाय दद्यात् ।

अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां सालंकृतां सुवर्णधेनुं सवत्सां रौप्यखुरां रत्नपुच्छां घंटायुतकंठां रत्नतिलकां वायनोपेतां वस्त्रयुगच्छन्नां मुक्तालांगूलां मम जीवपुत्रसंतानप्रतिबंधकीभूतसकलदुरितनिरासनपूर्वकं आयुष्मत्सुपुत्रावाप्तिकामो वंध्यात्वहरामिमां सुवर्णधेनुं

यथाशक्तिसोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति सकुशतिलोदकं दद्यात् मंत्रस्तु वायवीये

धेनुरंगिरसः सत्रे वासिष्ठे सुरभिस्तथा ।
दुहिता च सुता भानो रग्नेश्च वरुणस्य च ।
याश्च गावः प्रवर्तंते वनेषूपवनेषु च ।
प्रणिंतु ता मम सदापुत्रपौत्रप्रवर्धनाः ।
प्रयच्छंतु दिवारात्र मविच्छेदं च संततेः ।

ततःस्वस्तीत्युक्त्वा देवस्य त्वेति यथाशास्त्रं कामस्तुतिं पठेत् ततः सुवर्णदक्षिणां दत्वा प्रार्थयेत् मंत्रस्तु

वंध्या त्वं काकवंध्या त्वं कन्याप्रसव एवच ।
तथैव मृतवंध्यात्वं दोषं मम चतुर्विधं ।
दानेनानेन हरतु या सा कामदुधा ममेति इति

गां प्रार्थयित्वा प्रदक्षिणीकृत्य विसृज्य भूयसीं दक्षिणां दत्वा यथाशक्ति ब्राम्हणान् भोजयित्वा जीवत्संतानावाप्तिरस्तु इति तान् संप्रार्थ्य जीवतुंसंतानावाप्तिरस्त्विति ते ब्रूयुः ततः सुहृद्युतो भुंजीतेति ।

इति वंध्यात्वहरं सुवर्णधेनुदानं ।

---

## वंध्यत्व नाहींसें करणारें सुवर्णधेनूचें दान.

वंध्यत्व नाहींसें करणारें सुवर्णधेनूचें दान.

" वायु पुराणांत " संततिजात पुत्राचा वियोग होत असल्यामुळें चार प्रकारची वंध्या सांगितली आहे. जिला बिलकूल संतति होत नाहीं ती वंध्या, जिला एकच

अपत्य असतें ती काकवंध्या, जिला केवळ मुलीच होतात ती स्त्रीप्रसू आणि जिला संतति होऊन मरते ती मृतप्रजा ह्या प्रमाणें वंध्येचे चार प्रकार होत. ह्या वंध्यत्वाचा प्रतिकार करणारें सुवर्ण धेनूचें दान हें माझें स्वरूप असें समज. धेनूच्या रूपाचा विशेष प्रकार सांगतों " हेमाद्रींत कर्मविपाकांत " एक पळाएवढ्या सोन्याची गाय आणि त्याच्या चतुर्थांशा एवढा तिचा वत्स करावा किंवा जशी शक्ति असेल त्या प्रमाणें वत्सासह अशी मजबूत सोन्याची गाय करावी असें गुरुनें सांगितलें. यथाशक्ति म्हणजे " पळाची किंवा अर्ध पळाची किंवा एक चतुर्थांश पळाची धेनु करावी " ह्या प्रमाणें कर्मविपाकांत सांगितलेल्या परिभाषेच्या प्रकाराप्रमाणें रुप्याचे खुर, पुच्छाचे ठिकाणीं रत्न योजून, गळ्यांत घंटा बांधून, कपाळावर रत्नाचा तिलक ह्या प्रमाणें गाय करून नंतर तिचें पुजन करून तिला पायसाचा नैवेद्य दाखवून, मोदक, अपूप ( अनारसे घारगे ) गूळ, मीठ, जिरें, सुवर्ण दक्षिणा, कंचुक ( खण ) हीं नव्या बासाच्या सुपांत ठेऊन हें एक वायन गाईस द्यावें. दुसऱ्या पुत्रवान् अशा सौभाग्यवती (सुवासिनी) अशा ब्राम्हणांच्या बायकांस सहा किंवा आठ अशीं वायनें द्यावीं. नंतर संपूर्ण वेद शिकलेला, निर्लोभी, ऋणानें ग्रासलेला, दरिद्री, कुटुंबी अशा ब्राम्हणास बोलावून त्यास वरण देऊन आपले शक्ति प्रमाणें वस्त्र, अलंकार वगैरेंनीं त्याचें पूजन करून नंतर " सोमोधेनुं " ह्या मंत्रानें वत्सासह गाईचें पूजन करून नंतर अग्निची स्थापना करून समिधा, तूप, आणि भात अशा तीन द्रव्यांनीं " सोमोधेनुं० " ह्या मंत्रानें प्रत्येकीं

अष्टोतरशत ( एकशें आठ ) होम करून दात्यानें स्वतः उत्तरे-कडे तोंड करून बसून पूर्वेकडे तोंड करून बसलेल्या ब्राम्हणास गाईचें शेंपूट त्याचे हातांत देऊन तिचें दान करावें.

" यजमानानें आचमन प्राणायाम करून अद्येत्यादि० ............ गोत्राय शर्मणे सुपूजीताय इमां सालंकृतां

दानाचा संकल्प. ............ सुवर्णधेनुं सवत्सां रौप्यखुरां रत्न पुच्छां घंटायुतकंठां रत्न तिलकां वायनोपेतां वस्त्रयुगच्छन्नां मुक्ता-लांगूलां ममजीवत्पुत्रसंतानप्रतिबंधकी भूतसकलदुरितनिवासनपूर्वकं आयुष्मत्सुपुत्रावाप्तिकामो वंध्यात्वहरामिमां सुवर्णधेनुं यथाशक्ति सोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न मम ॥ ह्या प्रमाणें संकल्प करून ब्राम्हणाचे हातांत दर्भ आणि तीळ ह्यांनीं मिश्र असें उदक द्यावें. दानाचा मंत्र " वायु पुराणांत "

धेनु रंगिरसः सत्रे वासिष्ठे सुरभि स्तथा ।
दुहिता च सुता मानो रग्नेश्च वरुणस्य च ।
याश्च गावः प्रवर्तंते वनेषु पवनेषू च ।
प्रीणंतुता मम सदा पुत्रपौत्र प्रवर्धताः ।
प्रयच्छंतु दिवारात्र मविच्छेदंच संततेः ॥

ह्या प्रमाणें मंत्र म्हटल्यानंतर ब्राम्हणानें (दान घेणाऱ्यानें) " स्वस्ति " असें म्हणून " देवस्यत्वा " इत्यादि जशी शाखा असेल त्या प्रमाणें " कामस्तुति " म्हणावी नंतर सुवर्ण दक्षिणा देऊन प्रार्थना करावी. तो मंत्र—

" वंध्यात्वं काक वंध्यात्वं कन्या प्रसव एवच ।
तथैव मृतवंध्यात्वं दोषं मम चतुर्विधं ।
दानेनानेन हरतु यासा कामदुधा मम "

ह्याप्रमाणें प्रार्थना करून प्रदक्षिणा करून कर्माचें विसर्जन करून ब्राम्हणांस भूयसी दक्षिणा द्यावी;नंतर आपले शक्तीप्रमाणें ब्राम्हणांस भोजन घालून " जीवत्संतानावाप्तिरस्तु " ह्याप्रमाणें त्यांची प्रार्थना केल्यावर त्यांनीं " जीवापुंसंतानावाप्तिरस्तु " ह्याप्रमाणें म्हणावें. नंतर इष्टमित्रांसह आपण ( यजमानानें ) भोजन करावें.

ह्याप्रमाणें वंध्यत्व नाहींसें करणाऱ्या सुवर्णधेनूचे दानाविषयीं सांगितलें.

---

## अथो भयतोमुखीदानम् ।

" मात्स्ये "

रुक्मशृंगीं रौप्यखुरां मुक्तालांगूलभूषितां ।
कांस्योपदोहनां राजन् सवस्त्रां द्विजपुंगवे ।
प्रसूयमानां योदद्याद्धेनुं द्रविणसंयुतां ।
यावद्वत्सो योनिगतो यावद्गर्भं न मुंचति ।
तावद्गौः पृथिवी ज्ञेया सशैलवनकानना ।

" देवलः "

अलकृत्योक्तविधिना सुवर्णात्रिपलान्विता ।
देया च द्विपला मध्या पलैका दक्षिणाधमा ।

" वाराहे "

तु सुवर्णसाहस्रं तदर्धार्धं मुख्यमुक्तं सुवर्णस्य सहस्रेण तदर्धेनापि वा पुनः ।

तस्याप्यर्धं शतं वापि पंचाशच्च ततोर्धकं ।

यथाशक्त्यापि दातव्या वित्तशाठ्यविवर्जितेति ।

" हेमाद्रौ "

उभयतोमुखीं स्वर्णनिष्केण दत्वा सद्यः शुध्येत्पातकेभ्यश्च मर्त्य इति सुवर्णनिष्कदक्षिणायुतेनापि अत्र निष्कचत्वारिंशन्माषक एव ग्राह्यः अत्यशक्तौ विंशतिमाषकं वा दद्यादित्यर्थः दरिद्रेण ।

अथ दान प्रयोगः

अद्येत्यादि० उभयतोमुखीदानं कर्तुं गोत्राम्हणपूजां च करिष्ये इति संकल्प्य द्विजं कुटुंबिनं दरिद्रं वेदपारगं सुशीलं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः तथा गामपि संपूज्य ॐ त्वं महीमवनिं विश्वधेनां० रिंद्रसिंधून् इति गांमनुमंत्र्य प्रदक्षिणीकृत्य अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे अमुकशाखाध्यायिने इमां धेनुं सोपस्करां उभयतोमुखीं समुद्रशैलवनोपेतपृथ्वीदानसमफलावाप्तये धेनुवत्सरोमसंख्यायुगदेवलोकमाहिमत्वपितृपितामहप्रपितामहकुलशतनरकोत्तारणपूर्वकघृतक्षीरवहबहुकुल्याकदधिपायसकर्दमदेशाधिकरणकोत्तारकेप्सितकामो ब्रम्हलोकावाप्तिकामो रुद्रदैवत्यां इमां तुभ्यमहं संप्रददे न मम " इति

सघृततिलकांस्ये पात्रयुतगोपुच्छं तद्धस्ते सकुशजलं दत्वा प्रार्थयेत् मंत्रस्तु इमां गृहाणोभयमुखीं भवान्त्राता ममास्तुवै ।

मम वंशविशुद्धेश्च सदा स्वस्तिकरो भवेति विप्रो देवस्यत्वेति प्रतिगृह्य स्वस्तीत्युक्त्वा यथाशाखं कामस्तुतिं पठेत् ततः सुवर्णसहस्रमारभ्य पंचविंशतिचतुर्द्विसुवर्णमितां दक्षिणां दद्यात् ततोनन्यूनामिति ततो विप्रस्तु ॐ इरावती धेनुमती हि भूतं सूकस्या ।व्यस्तभ्ना रोदसी विष्णवे ते दाधर्थ० खै: ॥ १ ॥ ॐ स्योना पृथिवी भवा० नी । यच्छानः शर्म० थः । २ । इति मंत्रद्वयं पठित्वा वदेत् प्रति गृण्हामि त्वां धेनुं कुटुंबार्थे विशेषतः स्वस्तिर्भवतु मे नित्यं रुद्रमातर्नमोस्तुते इति नत्वा गृहीतायाः दक्षिणेन पाणिना वत्समाकृष्य पठेत् ॐ गर्भे नु समन्वेषामवेदमहं देवा० विश्वा ।

शतं मा पुर आयसीररक्षं निरदोयमिति मंत्रेण वत्समाकृष्येत् निष्कासिते सति कृत्यांतरमाह

ततो यजमानः प्राणानायम्य अद्येत्यादि० कृतस्योभयतोमुखीदानकर्मणः सांगतासिध्यर्थं देवादिमंत्रै स्तर्पणं होमं च करिष्ये इति संकल्प्य स्थंडिलेऽग्निं प्रतिष्ठाप्यान्वादध्यात् अस्मिन्नन्वाहितेग्नाविसादि चक्षुषी आज्येनेत्यंतं उक्त्वाऽत्र प्रधानं पृथिवीं त्रिगौरीं सकृदाज्येन प्रजापतिं चतुरशीत्या आज्येन शेषेण स्विष्ठकृतमिसादि

सधो यक्ष्ये इत्यंतं उक्त्वा समिन्द्वयमग्नावाधाय इध्मा बर्हिषी परिसन्नह्य परिसमूहनादि चक्षुष्यंतं कृत्वा कुशास्तृतभूयौ अग्नेः पश्चादेव साक्षताभि रद्भि र्वक्ष्यमाणमंत्रै र्देवादींस्तर्पयेत् ते च मंत्राः ॐ ये देवासो दिव्ये-कादशस्थपृथिव्या मध्येकादशस्थअप्सुक्षितो महिनैका-दशस्थ० जुषध्वं देवांस्तर्पयामि ॐ उशंतस्त्वानिधीम-ह्युशंतःसमिधीमहि उशन्नुशन आवह पितॄ० अत्तवे पितॄंस्तर्पयामि ॐ इमं मे गंगे यमुने सरस्वति० असि-क्न्या मरुद्वृधे० मया सरितस्तर्पयामि ॐ अद्रिभिः सुतो मतिभिश्च नोहितः० रोमाण्यव्यासमयावि० दिवे दिवे पर्वतां स्तर्पयामि ॐ वनस्पते शतवल्शोविरोह सहस्रवल्शाविवयं रुहेम ये त्वामयं स्वधिति स्तेजमानः प्रणिताय महते सौभगाय वनस्पतीं स्तर्पयामि ॐ समुद्रज्येष्ठाः सलिलस्य मध्यात्पुनानायंत्यनिविशमानाः इंद्रोया वज्री वृषभोररादताआपो०वंतु समुद्रां स्तर्पयामि ॐ अहिरिवभोगैः पर्येति बाहुं० मानः।

हस्तघ्नोविश्वावयुनानि विद्वान्पुमांसं० विश्वतः नागां-स्तर्पयामि ॐ मधुवाता ऋतायते मधुक्षरंति सिंधवः।

माध्वीर्नः संत्वोषधीः ओषधीस्तर्पयामि इत्यष्टाभि स्तर्पयित्वा चतस्र आज्याहुतिर्जुहुयात् ॐ इळे द्यावापृथिवी पूर्वचित्तये ग्निं धर्मं सुरुचं यामिन्नष्टये।

याभिर्भरेकारमंशाय जिन्वथस्ताभिरूषुऊतिरभिराश्वि-नागतं स्वाहा पृथिव्या इदं नमम ॐ महीद्यौः पृथिवी च न इमं यज्ञं मिमिक्षतां ।

पिपृतां नो भरीमाभिः स्वाहा पृथिव्या इदं न मम ॐ उर्वी पृथ्वी बहुले दूरे अंते उपब्रुवे मनसा यज्ञे अस्मिन् दधाते ये सुभगे सुप्रतूर्ती द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वा त्स्वाहा पृथिव्या इदं न मम ॐ गौरीर्मिमाय सलिलानि तक्षत्येकपदी द्विपदी सा चतुष्पदी ।

अष्टापदी नवपदी बभूवुषी सहस्राक्षरा परमे व्योमन्त्स्वाहा गौर्या इदं न मम ४ इति चतस्र आज्याहुती हुत्वा ततः समस्तव्याहृतिभि श्चतुरशीत्याज्याहुती हुत्वा प्रजापतय इदं न मम इति त्यजेत् ततः स्विष्टकृदादि-होमशेषं समाप्य भूयसीं दक्षिणां दत्वा गामनुव्रज्य गोमतीं जयेत्

" महाभारते "

गावो मा मुपतिष्ठंतु हेमशृंग्यः पयोमुचः ।
सुरभ्यः सौरभेय्यश्च सरितः सागरं यथा ।
गावः पश्याम्यहं नित्यं गावः पश्यंतु मां सदा ।
गावो ऽस्माकं वयं तासां यतो गावस्ततो वयं ।
घृतक्षीरप्रदा गावो घृतयोन्यो घृतावहाः ।
घृतनद्यो घृतावर्ता स्ता मेसंतु सदा गृहे ।
घृतं मे हृदये नित्यं घृतं नाभ्यां प्रतिष्ठितं ।

घृतं मे सर्वत श्चैव घृतमध्ये वसाम्यहं ।
गावो मे अग्रतः संतु गावो मे संतु पृष्ठतः ।
गावो मे हृदये संतु गवां मध्ये वसाम्यहं ।
गावः सुरभयो नित्यं गावो गुग्गुळस्तांनिभाः ।
गावः प्रतिष्ठा भूतानी गावः स्वस्त्ययनं महत् ।
अन्नमेव परं गावो देवानां हविरुत्तमं ।
पावनं सर्वभूतानां रक्षंति च वहंति च ।
हविषा मंत्रपूतेन तर्पयंत्यभरान्दिवि ।
ऋषीणामपि होतॄणां गावो होमे प्रतिष्ठिताः ।
सर्वेषामेव भूतानां गावः शरणमुत्तमं ।
गावः पवित्रं परमं गावोमंगलमुत्तमं ।
गावः सर्वस्य लोकस्य गावोधन्याः सनातनाः ।
नमो गोभ्यः श्रीमतीभ्यः सौरभेयीभ्य एवच ।
नमो ब्रम्हसुताभ्यश्च पवित्राभ्यो नमोनमः ।

+पुनः प्रदक्षिणां कृत्वा धेनुं द्विजवरं च तमिति जपित्वा नमस्कृत्य विसृज्य+ = पायसादिना सम्यक् द्वादश ब्राम्हणान् भोजयित्वा तेभ्यो दक्षिणां दत्वा स्वस्त्ययनं वाचयित्वा सुहृद्युतोभुंजीतेति

इत्युभयतोमुखी दान प्रयोगः

---

+ ह्या टिकाणीं " इति जपित्वा धेनुं द्विजवरंचपुनः प्रदक्षिणां कृत्वा नमस्कृत्य विसृज्य = असा पाठ केला आहे.

अथ प्रसंगादुभयतोमुखीप्रतिग्रहप्रायश्चित्तं

ममोभयतोमुखीप्रतिग्रहदोषपरिहारार्थं कृच्छ्रत्रयप्रायश्चित्तं यथा प्रत्याम्नायेन करिष्ये इति संकल्प्य कृच्छ्रत्रयं प्रायश्चित्तं कुर्यादित्युक्तं दानोद्योते ऽरुणस्मृतौ रहस्यप्रायश्चितेष्वशक्तस्य

इत्युभयतोमुखीप्रतिग्रहप्रायश्चितं

इत्युभयतोमुखीगोदाननिरूपणं

उभयतोमुखीचें दान

उभयतोमुखीचें दान, व दानाचें फळ.

" मत्स्यपुराणांत " हे राजा ! सोन्याचीं जिचीं शिंगें आहेत, रुप्याचे जिला खुर आहेत, मोत्याच्या पुच्छानें शोभणारी, काशाचे भांडें जिचें उपदोहन आहे, वस्त्रानें आणि द्रव्यानें युक्त अशी प्रसूत होणारी गाय श्रेष्ठ ब्राम्हणाला द्यावी. जोंपर्यंत वासरूं योनींत असेल व जोंपर्यंत गर्भ बाहेर (सगळा) आला नसेल तोंपर्यंत ती गाय पर्वत, नाले आणि अरण्यें ह्यांनीं युक्त अशी पृथ्वी समजावी. " देवल "--सांगितलेल्या विधीप्रमाणें गाईस अलंकृत करून तीन× पळें सुवर्णाच्या दक्षिणेसह दान करावी. दोन पळें दक्षिणा मध्यम आणि एक पळ दक्षिणा कनिष्ठ होय. "वराहपुराणांत" तर हजार कर्ष सोनें, अगर त्याच्या निम्पटीच्या निम्पटीएवढें मुख्य होय असें सांगितलें आहे. हजार कर्ष सोनें, अगर त्याच्या निम्मे अथवा त्याच्याही निम्पटीएवढें किंवा शंभर अथवा पन्नास अथवा पंचवीस एवढी तरी आपल्या शक्तीप्रमाणें द्रव्याच्या ठिकाणीं कृपणपणा न करितां दक्षिणा द्यावी.

"हेमाद्रींत" मनुष्यानें उभयतोमुखी गाईचें निष्काएवढ्या सोन्याच्या दक्षिणेसह दान केलें असतां तो तत्काळ पातकांपासून मुक्त होईल. येथें चाळीस माशांचाच निष्क द्यावा. शक्ति नसल्यास दरिद्र्यानें वीस माशाएवढें सोनें द्यावें.

## दानाचा प्रयोग.

यजमानानें पवित्र होऊन "अद्येत्यादि० उभयतोमुखी दानं कर्तुं गोब्राम्हणपूजनंच करिष्ये" ह्याप्रमाणें संकल्प करून कुटुंबी, दरिद्री, वेद पढलेला, सुशील अशा ब्राम्हणास बोलावून आपल्या शक्तीप्रमाणें त्याचें आणि गाईचें वस्त्रें अलंकार वगैरेंनीं पूजन करून "ॐ त्वं मही भवतिं विश्वधेनां० रिद्रं सिंधून्" ह्या मंत्रानें गाईस निमंत्रण करून (बोलावून) तिला प्रदक्षिणा करून "अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे अमुकशाख्याध्यायिने इमां धेनुं सोपस्करां उभयतोमुखीं समुद्रशैलवनोपेत पृथ्वीदानसम फलावाप्तये धेनुवासरोमसंख्ययुग देवलोकमहित्व पितृपितामह प्रपितामह कुलशतानरकोत्तारणपूर्वक घृत क्षीर वहबहुकुल्याकदधिपायस कर्दमदेशाधिकरणकोत्तारकेप्सितकामो ब्रम्हलोकवाप्तिकामो रुद्रदैवत्यां इमां तुभ्यमहं संप्रददेन मम" ह्याप्रमाणें संकल्प करून तूप, तीळ ह्यांनीं युक्त अशा काशाचे भांड्यांत गाईचें पुच्छ बुडवून त्या ब्राम्हणाचे हातांत देऊन आणि दर्भांनीं युक्त असें पाणी देऊन (सोडून) प्रार्थना करावी. मंत्र—

दानाचा प्रयोग.

× एका पळाचे तोळे ३⅓ एवढे होतात आणि तीन पळाचे १० तोळे एवढें सोनें.

इमां गृहाणोभयमुखीं भवान्त्राता ममास्तु वै ।
मम वंश विशुद्धेश्च सदा स्वस्ति करोमव ॥

ह्याप्रमाणें प्रार्थना केल्यावर ब्राम्हणानें " देवस्यत्वा " ह्या मंत्रानें प्रतिग्रह घेऊन " स्वस्ति " असें म्हणून जशी शाखा असेल तिचेप्रमाणें " कामस्तुति " म्हणावी. नंतर हजारापासून पंचवीस, चार किंवा दोन सुवर्ण ह्यांनीं तुल्य अशी दक्षिणा द्यावी याहून कमी नसावी. नंतर ब्राम्हणानें "ॐ इरावती धेनुमतीहि भूतं सुवस्या । व्यस्त भारोदसी विष्णवेतेदाधर्म० खै " " ॐ स्योना- पृथिवी भवा० नी । यच्छानः शर्म० थः " ह्याप्रमाणें दोन मंत्र म्हणून म्हणावें कीं

प्रतिगृण्हामि त्वां धेनुं कुटुंबार्थे विशेषतः ।
स्वस्तिर्भवतुमे नित्यं रुद्रमातर्नमोस्तुते ॥

ह्याप्रमाणें म्हणून नमस्कार करून दान घेतलेल्या गाईच्या उजव्या हातानें वासराचें आकर्षण करून पुढील मंत्र म्हणावा. " ॐ गर्भेनुसमन्वेषामवेदमहंदेवा० विश्वा । शतं मा पुर आयसीर रक्षं निरदीयं " ह्या मंत्रानें वासरूं बाहेर ओढून काढावें. तें बाहेर आल्यानंतरचें दुसरें कृत्य सांगतों.

वासरूं बाहेर निघाल्यानंतरचें कृत्य.

नंतर यजमानानें आचमन करून प्राणायाम करून " आद्येत्यादि० कृतस्योभयतोमुखी दानकर्मणः सांगतासिध्यर्थं देवादि मंत्रैस्तर्पणं होमंच करिष्ये " ह्याप्रमाणें संकल्प करून स्थंडिलावर अग्निची प्रतिष्ठापना करून अन्वाधान

करावें तें असे-- अस्मिन्नन्वाहितेग्नौ॰ पासून "चक्षुषी आज्येन" येथपावेतों म्हणून पुढें " अत्रप्रधानं पृथिवीं त्रिर्गौरीं सकृदाज्येन प्रजापतिं चतुरशीत्या आज्येन शेषेण स्विष्टकृतं॰ सद्योयक्ष्ये " येथपावेतों म्हणून दोन्ही समिधा अग्नींत टाकून इध्माबर्हिषी ह्या जवळ ठेवून परिसमुहनम् पासून चक्षुषी पावेतों कर्म करून दर्भ पसरलेल्या जमिनीवर अग्नीच्या पश्चिमेकडेसच अक्षतांनीं मिश्र अशा उदकानें पुढील सांगितलेल्या मंत्रांनीं देवादिकांचें तर्पण करावें ते मंत्र—" ॐ येदेवासो दिव्येकादशस्थ पृथिव्यामध्येकादशस्थ अप्सुक्षितो महिनैकादशस्थ॰ जुषध्वं देवां स्तर्पयामि " असें म्हणून देवांचें तर्पण करावें. ॐ उशंतस्त्वानिधी मह्युशंतः समिधीमहि। उशन्नुशत आवह पितृ॰ अत्तावे " पितॄं समर्पयामि " ॐ इमंमे गंगे यमुने सरस्वति॰ असिक्न्या मरुद्वृधे॰ मया " सरितस्तर्पयामि " ॐ अद्रिभिःसुतो मतिभिश्चनोहितः॰ रोमाण्यव्यासमयावि॰ दिवे दिवे "पर्वतां स्तर्पयामि" ॐ वनस्पते शतवल्शोविरोहसहस्रवल्शा विवयं रुहेम। यंत्वामयं स्वधितिस्तेजमानः प्रणिनाय महते सौभगाय " " वनस्पतिं स्तर्पयामि " " ॐ समुद्रज्येष्ठाः सलिलस्यमध्या त्पुनानायंत्यनिविशमानाः इंद्रोया वज्रीवृषभोररादता आपो॰ वंतु " " समुद्रांस्तर्पयामि " " ॐ अहिरिवभोगैः पर्येति बाहुं॰ मानः। हस्तघ्नो विश्वावयुनानि विद्वान्पुमान्पुमांसं॰ विश्वतः " नागां स्तर्पयामि " " ॐ मधुवाताऋतायते मधुक्षरंति सिंधवः। माध्वीर्नः संत्वोषधीः " " ओषधी स्तर्पयामि " ह्याप्रमाणें आठ मंत्रांनीं तर्पण करून चार तुपाच्या आहुति अग्नींत द्याव्या.

ॐ इळे द्यावा पृथिवी पूर्वचित्तयोग्नें घर्मं सुरुचं यामिन्नष्टये याभिर्भरेका रमंशाय जिन्वथस्ताभि रूपुऊतिभिरश्विनागतं स्वाहा पृथिव्या इदं नमम "

ॐ महीद्योः पृथिवीचन इमं यज्ञं मिमिक्षतां ।
पिष्टतांनो भरिमभिः स्वाहापृथिव्या इदंनमम "

ॐ उर्वीपृथ्वि बहुले दुरे अंते उपब्रुवे मनसा यज्ञे अस्मिन्द घातेये सुभगे सुप्रतूर्ती द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वा स्स्वाहा " पृथिव्या इदं नमम " ॐ गौरीर्मित्राय सलिलानि तक्षत्येक पदी द्विपदी साचतुष्पदी । अष्टापदी नवपदी बभूवुषी सहस्त्राक्ष- रा परमेव्यो मन्स्वाहा " गौर्या इदं नमम " ह्या प्रमाणें चार आहुति देऊन नंतर " सर्व व्याहृतींनीं चवऱ्यायशी तुपाच्या आहुति " प्रजापतय इदं नमम " ह्या प्रमाणें द्याव्या नंतर " स्विष्ट कृदादि " शेष होम समाप्त करून ब्राम्हणास भूयसी दक्षिणा देऊन गाईच्या मागे जात असतां ( तिला पोचवितांना) गोमतीचा जप करावा " महाभारतांत ":—

गावो मा मुपतिष्टंतु हेमशृंग्यः पयो मुचः ।
सुरभ्यः सौरभेय्यश्च सरितः सागरान्यथा ।
गावः पश्याम्यहं नित्यं गावः पश्यंतु मां सदा ।
गावो स्माकं वयं तासां यतो गावस्ततो वयं ।
घृतक्षीरप्रदागावो घृतयोन्यो घृतावहाः ।
घृतनद्यो घृतावर्ता स्तामे संतु सदागहे ।

घृतं मे हृदये नित्यं घृतंनाभ्यां प्रतिष्ठितं ।
घृतंमे सर्वतश्चैव घृतमध्ये वसाम्यहं ।
गावो मे अग्रतः संतु गावोमे संतु पृष्ठतः ।
गावो मे हृदये संतु गवां मध्ये वसाम्यहं ।
गावः सुरभयो नित्यं गावो गुग्गुलसंनिमाः ।
गावः प्रतिष्ठा भुतानां गावः स्वस्त्ययनं महत् ।
अन्नमेव परंगावो देवानां हविरुत्तमं ।
पावनं सर्वभूतानां रक्षंतिच वहंतिच ।
हविषा मंत्र पूतेन तर्पयत्य मरान्दिवि ।
ऋषीणां मपि होतृणां गावो होमे प्रतिष्ठिताः ।
सर्वेषामेव भूतानां गावः शरण मुत्तमं ।
गावः पवित्रं परमं गावो मंगल मुत्तमं ।
गावः सर्वस्य लोकस्य गावोधन्याः सनातनाः
नमो गोभ्य श्रीमतीभ्यः सौरभेयीभ्य एवचः
नमो ब्रम्हसुताभ्यश्च पवित्राभ्यो नमोनमः ”

ह्या प्रमाणें जप करून गाय आणि ब्राम्हण ह्यांस पुन्हा प्रदक्षिणा करून नमस्कार करून त्यास रवाना करून पायसादिकाच्या योगानें चांगल्या बारा ब्राम्हणांस भोजन घालुन त्यांस दक्षिणां देऊन त्यांजकडून आशीर्वाद घेऊन मित्र मंडळासह भोजन करावें. ’

ह्या प्रमाणें उभयतोमुखीच्या दानाचा प्रयोग आहे.

**प्रसंगा वशानें उभयतोमुखीच्या दानाचें प्रायश्चित.**

" ममोभयतोमुखी प्रतिग्रहदोष परिहारार्थं कृछत्रयं प्रायश्चितं यथा प्रत्याम्नायेन करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून कृच्छ्रत्रय प्रायश्चित करावें असें " दानोद्योतांत " अरुणस्मृतींत रहस्य प्रायश्चिता विषयीं असक्त असलेल्यांस सांगितलें आहे.

उभयतो मुखीच्या दानाचें प्रायश्चित.

ह्या प्रमाणें उभयतोमुखीच्या दानाचें प्रायश्चित होय.

ह्या प्रमाणें उभयतोमुखी गाईच्या दानाचें
निरूपण सांगितलें.

---

अथ दशदानानि

" मदनरत्ने जातुकर्ण्यः "

उत्क्रांत्यादीनि दानानि दश दद्यान्मृतस्य तु ।
गोभूतिलहिरण्याज्यवासोधान्यगुडानि च ।
रौप्यं लवणमित्याहु र्दशदानान्यनु क्रमात् इति
एतानि दशदानानि नराणां मृत्यजन्मनोः ।

कुर्यादभ्युदयार्थं च प्रेते पिहि परत्र चेति
" हेमाद्रिः "
" तत्रादौ गोदानं "

दानविधिस्तु पूर्वोक्त एव मम सर्वपापक्षयार्थं इमां गां धेनूपस्करं रुद्रदैवत्यां सुवर्णादिदक्षिणायुतां गोत्राय

शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु यज्ञसाधनभूता या विश्वस्यान्नप्रदायिनी।

विश्वरूपधरो देवः प्रीयतामनया गवा गवामंगेष्विति प्रार्थयेदपि

इति गोदानं

---

## दहा दानें.

दहा दानें आणि त्यांचा हेतु.

" मदनरत्नांत " " जातूकर्ण्य " मेलेल्या मनुष्यांच्या उद्देशानें उत्क्रांति धेनु इत्यादि दहा दानें द्यावीं. तीं अशीं— गाय, भूमि तीळ, सोनें, तूप, वस्त्र, धान्य, गूळ, रूपें आणि मीठ ह्या प्रमाणें अनुक्रमानें दहा दानें सांगितलीं. देवलोकीं आणि परलोकीं अभ्युदय होण्याकरितां ह्या प्रमाणें दहा दानें मनुष्यांच्या मरण काळीं आणि जन्माचे वेळीं करावीं. असें " हेमाद्रि " म्हणतो. त्यांत पूर्वी गाईचें दानाविषयीं सांगितलें आहे तें असें—दानाचा विधि तर पूर्वी प्रमाणेंच समजावा. मम सर्वपापक्षयार्थं इमां गां धेनुपस्करां रुद्रदैवत्यां सुवर्णादिदक्षिणायुतां गोत्रायशर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे नमम " ह्या प्रमाणें संकल्प करावा. " मंत्र " यज्ञ साधन भूताया विश्वस्यान्नप्रदायिनी। विश्वरूप धरो देवः प्रीयता मनयागवा " " गवांमंगेंपुष्ट " ह्या प्रमाणें प्रार्थनाही करावी.

ह्या प्रमाणें गाईचें दान सांगितलें.

---

## अथ भूमिदानं.

" मात्स्ये "

निवर्तनमिता भूमिर्देया "दशहस्तेन दंडेन त्रिंशद्दंडा निवर्तनमिति स्मरणात् दानान्यन्यानि सर्वाणि कनकादीनि यानि च ।

तानि भूमिप्रदानस्य कलां नार्हंति षोडशीमिति " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सुपूजिताय षष्ठिसहस्रपरिमितवर्षस्वर्ग शिवपुरनिवासकामः सर्वपापक्षयकाम इमां भूमिं बहुसस्यप्रदां विष्णुदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात् ।

मंत्रस्तुसर्वेषामाश्रया भूमि र्वाराहेण समुद्धता ।
अनंतसस्यफलदा अतः शांतिं प्रयच्छ मे ।
यस्यां रोहंति बीजानि काले चैव महीतले ।
त्वत्प्रसादाच्च सकला ममसंतु मनोरथा इति ।

इति भूमिदानं

---

## भूमीचें दान.

भूमिचें दान आणि त्याचें फळ.

" मत्स्यपुराणांत " निर्वतनाएवढी भूमि द्यावी. दहा हातांचा एक दंड, तीस दंडांचें एक निर्वतन असें म्हटलें आहे. दुसरीं सर्व प्रकारचीं सुवर्णादि दानें भूमिदानाच्या सोळाव्या हिश्शाचीही बराबरी करीत नाहींत. " अद्ये-

त्यादि० गोत्राय शर्मणे सुपूजिताय षष्ठिसहस्त्रवर्षपरिमित स्वर्ग-शिवपुरनिवासकामः सर्वपापक्षयकाम इमांभूमिं बहुसस्यप्रदां विष्णु-दैवत्यां तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून द्यावी. दानाचा मंत्र--

" सर्वेषामाश्रयाभूमि र्वाराहेण समुद्धृता ।
अनंतसस्य फलदा अतःशांतिं प्रयच्छमे ।
यस्यां रोहंति बीजानि कालेचैव महीतले ।
त्वत्प्रसादाच्च सकला ममसंतु मनोरथाः " ।

ह्या प्रमाणें भूमीचें दान सांगितलें.

---

## अथ तिलदानं

तिलास्तु द्रोणत्रयमिता देयाः पंचमणपरिमिता भवंति ।

अद्येत्यादि गोत्रायशर्मणे इमे तिलाःसोमदैवता विष्णु-दैवता वा सर्वपापक्षयकामस्तुभ्य महं संप्रददे न ममेति मंत्रस्तु महर्षेर्गोत्रसंभूताः कश्यपस्य तिलाः स्मृताः ।

तस्मादेषां प्रदानेन मम पापं व्यपोहतु

इति तिलदानं.

## तिळांचें दान.

"तीळ" तर तीन द्रोणाएवढे द्यावें, म्हणजे पाच मणी एवढे द्यावे. "अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इमे तिलाः सोमदैवताः किंवा विष्णुदैवताः सर्वपापक्षयकामस्तुभ्यमहं संप्रददे न मम" ह्याप्रमाणें संकल्प करून द्यावें. मंत्रतर–

तिळांचें दान.

"महर्षेर्गोत्रसंभूताः कश्यपस्य तिलाः स्मृताः।
तस्मादेषां प्रदानेन ममसंतु मनोरथाः"।

ह्याप्रमाणें तिळांचें दान सांगितलें.

---

## अथ हिरण्यदानं.

तच्च निष्कत्रयमितं कनिष्ठं द्वादशमाषको निष्कः। अद्येत्यादि गोत्राय शर्मणे इदं हिरण्यं अग्निदैवतं मम समस्तपापक्षयकामस्तुभ्य महं संप्रददे न ममेति मंत्रस्तु हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः।
अनंतपुण्यफलद मतः शांतिं प्रयच्छमे

इति हिरण्यदानं

---

## सोन्याचें दान.

तें तीन निष्काएवढें कनिष्ठ होय. बारा माशांचा एक निष्क होतो. अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इदं हिरण्यं अग्निदैवतं मम स-

सोन्याचें दान.

मस्तपापक्षय काम स्तुभ्यमहं संप्रददे नमम " ह्या प्रमाणें संकल्प करून द्यावें. मंत्र तर—" हिरण्यगर्भ गर्भस्थं हेमबीजां विभावसोः। अनंतपुण्यफलद मतः शांतिं प्रयच्छमे " हा मंत्र म्हणून दान द्यावें.

ह्या प्रमाणें सोन्याचें दान सांगितलें.

---

अथाज्यदानं

घृतं तु प्रस्थमितं दद्यात् विंशतिशेरकमितं भवति अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इदमाज्यं विष्णुदैवतं समस्तपापक्षयकामस्तुभ्य महं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

कामधेनोः समद्भूतं सर्वक्रतुषु संस्थितं।
देवानांमाज्यमाहार अतः शांतिं प्रयच्छ मे

इत्याज्यदानं

---

तुपाचें दान.

तुपाचें दान.

" तुप तर एका प्रस्था एवढें द्यावें. तें वीस शेरा इतकें होतें. अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इत्यमाज्यं विष्णुदैवतं समस्तपापक्षय काम स्तुभ्यमहं संप्रददे न मम " असा संकल्प करून द्यावें. दानाचा " मंत्र तर " कामधेनोः समद्भुतं सर्वक्रतुषु संस्थितं। देवानामाज्यमाहार अतःशांतिं प्रयच्छमे " असा होय.

### अथ वस्त्रदानं

सूक्ष्मवस्त्रद्वयं बहुमूल्यमष्टहस्तमितं दद्यात् ।
अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे समस्तपापक्षयकाम इमे बार्हस्पत्ये वाससी तुभ्यमहं संप्रददे न ममेति
" मंत्रस्तु "

शीतवातोष्णसंत्राणं लज्जाया रक्षणं परं ।
देहालंकरणं वस्त्रं अतः शांतिं प्रयच्छ मे

इति वस्त्रदानं

---

### वस्त्राचें दान.

वस्त्राचें दान.

आठ हात लांबीचीं पुष्कळ किंमतीचीं अशीं दोन बारीक वस्त्रें द्यावीं. अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे समस्तपापक्षय काम इमे बार्हस्पत्ये वाससी तुभ्यमहं संप्रददे न मम " असा संकल्प करून दान द्यावें. दानाचा मंत्र- शीतवा तोष्ण संत्राणं लज्जाया रक्षणं परं । देहालं करणं वस्त्रं अतःशांतिं प्रयच्छमे "

ह्या प्रमाणें वस्त्राचें दान सांगितलें.

---

### अथ धान्यदानं

सार्धखारीद्वयं व्रीहेर्योदद्याः ।

तच्च सार्धशतद्वयमणपरिमितं मणषट्कं चेति ।
अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इदममुकसंख्यं प्रजापतिदैवत्यं समस्तपापक्षयपूर्वकैहिकामुष्मिकशिवफलावाप्तिकामस्तुभ्यमहं संप्रददे न ममेति

मंत्रस्तु—

सर्वदेवमयं धान्यं सर्वोत्पत्तिकरं महत् ।
प्राणिनां जीवनोपायमतः शांतिं प्रयच्छ मे

इति धान्यदानं

---

धान्याचें दान.

धान्याचें दान.

अडीच खारीएवढें भात द्यावें. तें अडीचशें मणाएवढें होतें; तें श्रेष्ठ होय. सहा मणाएवढें कनिष्ठ होय. " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इदममुकसंख्यं प्रजापतिदैवत्यं समस्तपापक्षयपूर्वकैहि कामुष्मिक शिवफलावाप्ति कामस्तुभ्यमहं संप्रददेन मम " असा संकल्प करून द्यावें. मंत्र--

" सर्वदेव मयं धान्यं सर्वोत्पत्तिकरं महत् ।
प्राणिनां जीवनोपाय मतः शांतिं प्रयच्छमे " ।

ह्याप्रमाणें धान्याचें दान सांगितलें.

### अथ गुडदानं

गुडं पलषष्ठिमितं दद्यात् ।

अद्येत्यादि० मम समस्तपापक्षयपूर्वकं गृहे लक्ष्म्याः स्थैर्यसिद्धिकामो गोत्राय शर्मणे सुपूजितायेमं गुडं रसवर्यं सोमदैवतं सदक्षिणं तुभ्य महं संप्रददे न ममेति "मंत्रस्तु"

गुड, इक्षुरसोद्भूतोमंत्राणां प्रणवोयथा ।
दानेनानेन मे तस्य परा लक्ष्मीः स्थिरो गृहे ॥

इति गुडदानं

---

### गुळाचें दान.

गुळाचें दान.

गूळ साठ* पळांएवढा द्यावा. "अद्येत्यादि० मम समस्तपापक्षयपूर्वकं गृहे लक्ष्म्याः स्थैर्यसिद्धिकामो गोत्राय शर्मणे सुपूजितायेमं गुडं रसवर्णं सोमदैवतं सदक्षिणं तुभ्यमहं संप्रददेन मम" असा संकल्प करून दान करावा. मंत्रतर--

गुडइक्षु रसोद्भुतो मंत्राणां प्रणवो यथा ।
दानेनानेन मे तस्य परालक्ष्मीः स्थिरा गृहे" ।

ह्याप्रमाणें गुळाचें दान सांगितलें.

---

* पांच शेर.

५९५
प ६८६८



अथ रजतदानं

पलत्रयमितं रौप्यं दद्यात्।

" अद्येत्यादि० मम समस्तपापक्षयपूर्वकशिवविष्णुपितृप्रीतिकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं रजतं विष्णुदैवतं सदक्षिणं तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु

प्रीतिर्यतः पितॄणां च विष्णुशंकरयोः सदा।
शिवनेत्रोद्भवं रूप्यमतः शांतिं प्रयच्छमे "

इति रजतदानं

---

रुप्याचें दान.

रुप्याचें दान.

तीन+ पळांएवढें रुपें द्यावें. " अद्येत्यादि० मम समस्तपापक्षयपूर्वक शिव विष्णु पितृप्रीतिकामो गोत्रायशर्मणे सुपूजिताय इदं रजतं विष्णुदैवतं सदक्षिणं तुभ्यमहं संप्रददेन मम " असा संकल्प करून दान करावें. दानाचा मंत्रतर--

" प्रीतिर्यतः पितॄणांच विष्णुशंकरयोःसदा।
शिवनेत्रोद्भवं रूप्य मतःशांतिं प्रयच्छमे "।

ह्याप्रमाणें रुप्याचें दान सांगितलें.

---

+ दहा तोळे.

## अथ लवणदानं

लवणं सार्धखारिकं दद्यात्

" अद्येत्यादि० समस्तपापक्षयपूर्वकशिवप्रीतिकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं लवणं सर्वरसोत्कृष्टं सोमदैवत्यं सदक्षिणं तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु

यस्मादन्नरसाः सर्वे नोत्कृष्टालवणं विना ।
शंभोः प्रीतिकरं यस्मादतः शांतिं प्रयच्छ मे

इति लवणदानं

इति दशदानानि

---

## मिठाचें दान.

मिठाचें दान.

मीठ दीड *खारी एवढें द्यावें. " अद्येत्यादि० मम समस्त पापक्षयपूर्वक शिवप्रीतिकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं लवणं सर्व रसोत्कृष्टं सोमदैवत्यं सदक्षिणं तुभ्यमहं संप्रददे न मम ॥असा संकल्प करून दान करावें. मंत्रतर—

यस्मादन्नरसाः सर्वेनोत्कृष्टा लवणं विना ।
शंभोप्रीतिकरं यस्मादतः शांतिं प्रयच्छमे ॥

ह्या प्रमाणें मिठाचें दान सांगितलें.

ह्या प्रमाणें दहा दानें सांगितलीं.

---

* बारामण आणि बत्तीस शेर.

## अथ पंचधेनुदानानि

तत्रादौ पापापनोदधेनुदानं

" ब्राम्हे "

दानोपस्करास्तु गोदानोक्ता एव अद्येत्यादि० ममात्मनो मनोवाक्कायकर्मभिराजन्मोपार्जितपापापनोदकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां कृष्णां पापापनोदधेनुं यथाशक्तिसोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रास्तु—

आजन्मोपार्जितं पापं मनोवाक्कायकर्मभिः ।
तत्सर्वंनाशमायातु पापधेनुप्रदानतः ॥
ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात्

इति पापापनोदधेनुदानं

---

## पांच धेनूचीं दानें.

त्यांत पूर्वी पाप नाशकरणाऱ्या धेनूचें दान "ब्रम्हपुराणांतील"

पापनाश करणाऱ्या धेनुचें दान.

दानाचें उपस्कार तर गोदानांत सांगितलेलेच घ्यावें. " अद्येत्यादि० ममात्मनो मनोवाक्कायकर्मभिराजन्मोपार्जितपापापनोदकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां कृष्णां पापापनोद धेनुं यथाशक्ति सोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून दान द्यावें. दानाचा मंत्रतर--

आजन्मोपार्जितं पापं मनोवाक्कायकर्मभिः ।
तत्सर्वं नाशमायातु पापधेनुप्रदानतः ॥

नंतर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें पापापनोद धेनूचें दान सांगितलें.

---

अथ ऋणापनोदधेनुदानं

" ब्राम्हे "

अद्येत्यादि० मम आजन्मोपार्जितैहिकामुष्मिकसमस्तऋणपातकछेदकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां समस्तऋणापनोदधेनुं यथाशक्तिसोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात् ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात्

इति ऋणापनोदधेनुदानं

---

ऋणांतून मुक्त करणाऱ्या धेनुचें दान.

ऋणांतून मुक्त करणाऱ्या धेनुचें दान

" ब्रम्हपुराणांत " अद्येत्यादि० मम आजन्मो पार्जितैहिकामुष्मिक समस्त पातक छेदकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां समस्त ऋणापनोदधेनुं यथाशक्ति सोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून तिचें दान द्यावें. नंतर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें ऋणांतून मुक्त करणारे धेनुचें दान सांगितलें.

### अथ प्रायश्चित्तधेनुदानं

" ब्राम्हे "

अद्येत्या० मया जन्मप्रभृति अद्ययावदाचरितसमस्तपातकस्याकृतप्राथश्चितस्यामरणांतं पापापनोदकामोगोत्राय शर्मणे सुपूजिताय प्रायश्चित्तत्वेन इमां कपिलां धेनुं यथाशक्ति सोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु—

प्रायश्चित्ते समुत्पन्ने निष्कृतिर्न कृता क्वचित् ।
तस्य पापस्य शुध्यर्थं धेनुमेतां ददामि ते ॥

ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात्

इति प्रायश्चित्तधेनुदानं

---

### प्रायश्चित धेनुचें दान.

प्रायश्चित धेनुचें दान.

" ब्रम्हपुराणांत " अद्येत्यादि० मया जन्म प्रभृति अद्ययावदाचरित समस्त पातक स्याकृत प्रायश्चित्तस्या मरणांतं पापापनोदकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय प्रायश्चित्तत्वेन इमां कपिलां यथाशक्ति सोपस्करां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न मम " असा संकल्प करून दान करावें. मंत्र तर—

प्रायश्चित्ते समुत्पन्ने निष्कृतिर्न कृता क्वचित् ।

तस्य पापस्य शुध्यर्थं धेनुमेतां ददामिते "

नंतर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें प्रायश्चित्त धेनुचें दान सांगितलें.

---

अथ वैतरणी धेनुदानं

" ब्रम्हवैवर्ते "

या सा वैतरणी नाम यमद्वारे महानदी ।

शतयोजनविस्तीर्णा पृथुत्वे सा महासरित् ।

अगाधा नतरूपा च दृष्टमात्रभयप्रदा ।

पतंति तत्र वै मर्त्याः क्रंदमानाः सदारुणं ।

उष्णे वर्षासु शीते च मारुते वाति वा भृशं ।

दातारं तारयेद्यस्मात्तस्माद्वैतरणी स्मृतेति दानकालोपि तत्रैव

" मदनरत्ने "

अयने विषुवे पुण्ये व्यतीपाते दिनक्षये ।

अन्येषु पुण्यकालेषु दीयते दानमादरात् ।

पाटलामथवा कृष्णां दद्याद्वैतरणीं तु गां ।

स्वर्णशृंगीं रौप्यखुरां कांस्यपात्रोपदोहनां ।

कृष्णवस्त्रयुगछन्नां सप्तधान्यसमन्वितां ।

कार्पासद्रोणशिखरे आसीनां हैमीं यमप्रतिमां लोह-

दंडयुतां महिषारूढां पाशहस्तां कृत्वा इक्षुदंडमयमुडुपं पट्टसूत्रेण बध्वा उडुपे धेनुं कृत्वा छत्रोपानत्समायुक्तां वैतरणीं मृत्युकाले वा दद्यात् तद्यथा मम यमद्वारस्थितवैतरण्याख्यनद्युत्तरणार्थं गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां कृष्णां गां सवत्सां यमप्रतिमायुक्तां कृष्णवस्त्रयुगच्छन्नां सप्तधान्ययुतां रक्तमाल्याद्यलंकृतां स्वर्णशृंगाद्युपस्करोपेतां कार्पासद्रोणशिखरां सछत्रोपानत्कां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति इति तिलजलयुतं गोपुच्छं द्विजहस्ते दद्यात् मंत्रस्तु—

यमद्वारपथे घोरे घोरावैतरणी नदी ।

तां तर्तुकामोयच्छामि कृष्णां वै तरणीं तु गामिति ततः सुवर्णं दक्षिणां दत्वा प्रार्थयेत् विष्णुरूप द्विजश्रेष्ठ भूदेवगतिपावन । तर्तूं वै तरणी मेनां कृष्णां गां प्रददाम्यहं ततः पुच्छं स्वकरे धृत्वा नुव्रजेत्सप्तपदानि धेनुप्रार्थनामंत्रस्तु–

धेनुके त्वं प्रतीक्षस्व यमद्वारे महापथे ।
उत्तितीर्षु रहं देवि वैतरण्यै नमोस्तुते ।

इति प्रणम्य भूयसीं दक्षिणां दद्यात् कृष्णवर्णाया अभावे अन्यवर्णापि देया गोरभावे द्रव्यं देयं ।

पित्रादेरशक्तौ पुत्रादिर्दद्यात् तत्रांत्यमंत्रे उत्तितीर्षु

रयमिति पठेत् मध्यमे ततुँ वैतरणीमस्येति प्रथमे तां तर्तुमस्येति

इति वैतरणीदानं

---

## वैतरणी धेनुचें दान.

वैतरणी धेनुचें दान.

" ब्रम्हवैवर्तांत " शंभर योजनें रुंद, लांबीनें मोठ्या नदी एवढी, फारखोल, पहातांक्षणीं भय देणारी अशी यमाच्या +दारांत वैतरणी नांवाची मोठी नदी आहे. तिच्यांत उन्हाळयांत, पावसाळ्यांत आणि हिवाळ्यांत मोठा वारा वहात असतां अत्यंत अक्रोश करीत मनुष्यें पडलेली असतात ती दान करणाराचें रक्षण करते म्हणून तिला " वैतरणी " असें म्हटलें आहे. दानाचा काकालही त्यांतील त्यांतच " मदरत्नांत " सांगितला आहे तो असा— *अयन पुण्ककारक =विषुव, व्यतीपात, क्षय दिवस आणि दुसरे पुण्यकारक दिवस ह्या दिवशीं अवश्य दान द्यावें. सोन्याची जिचीं शिंगें आहेत, रुप्याचे जिला खूर आहेत, कांशाचें मांडें जिचें ×उपदोहन आहे, दोन काळ्या वस्त्रांनीं आच्छादलेली,

---

+ दाराजवळ.

* सूर्य मकर आणि कर्क ह्या राशींवर असतां त्यास अयन म्हणतात.

= मेष व तुला ह्या राशीस सूर्य असतां त्यास विषुव म्हणतात.

× दूध काढण्याचें मांडें.

सात धान्यांनीं युक्त अशा रक्तगौरवर्णाची अथवा काळ्या वर्णाची वैतरणी नावाची धेनु द्यावी. द्रोण वजना एवढ्या कापसाच्या शिखरावर बसलेली, लोह दंडानेंयुक्त, जिच्या हातांत पाश आहे, व महिषावर बसलेली अशी सोन्याची यमाची प्रतिमा करावी. उसांच्या दांड्याची नांव करून तिला रेशमाच्या सूत्रांनें वेष्टून त्यांत त्या धेनूला ठेऊन छत्री, जोडा ह्यांनीं युक्त अशा वैतरणीचें दान करावें अथवा मरणकाळीं दान करावें.

दानाचा प्रयोग.

तें असें—अद्येत्यादि० मम यमद्वारस्थितवैतरण्याख्यनद्युत्तरणार्थं गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां कृष्णां गां सवत्सां यमप्रतिमायुक्तां कृष्णवस्त्रयुगच्छनां सप्तधान्ययुतां रक्तमाल्याद्यलंकृतां स्वर्णशृंगाद्युपस्करोपेतां कार्पास द्रोणशिखरां सछत्रोपानत्कां रुद्रदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न मम । ह्या प्रमाणें संकल्प करून तिळ आणि उदक ह्यांनीं युक्त असे गाईचें शेंपूट ब्राम्हणाचे हातांत द्यावें. मंत्रतर—

यम द्वारपथे घोरे घोरावैतरणी नदी ।
तां तर्तुकामो यच्छामि कृष्णां वैतरणीं तुगां ॥

नंतर सोनें दक्षिणा देऊन पुढील मंत्रानें प्रार्थना करावी

" विष्णुकाम द्विजश्रेष्ठ भूदेव गतिपावन ।
तर्तुं वैतरणीमेनां कृष्णां गां प्रददाम्यहं ॥

नंतर गाईचें शेंपूट आपले हातांत धरून सात पावलें तिच्या मागें जावें. धेनूच्या प्रार्थनेचा मंत्र—

धेनुकेत्वं प्रतीक्षस्व यमद्वारे महापथे ।
उत्तितीर्षु रहं देवि वैतरण्यै नमोस्तुते ॥

ह्या प्रमाणें प्रार्थना करून तिला नमस्कार करून ब्राम्हणांस दक्षिणा द्यावी. काळी गाय नसल्यास दुसऱ्या वर्णाचीही गाय द्यावी. गाईचा अभाव असल्यास द्रव्य द्यावें. पिता इत्यादिकास दान करण्यास शक्ति नसल्यास पुत्रादिकानें करावें. त्या वेळीं शेवटल्या मंत्रांत उत्तितीर्षुरहं । असें म्हणावें. मधल्या ( दुसऱ्या ) मंत्रांत " ततुं वैतरणीमस्य " असें आणि पहिल्यांत " तांततुंमस्य " असें म्हणावें.

ह्या प्रमाणें वैतरणीचें दान सांगितलें.

---

## अथ उत्क्रांतिधेनुदानं

" ब्राम्हे "

उत्क्रांतिवैतरण्यै च दश दानानि चैव हि ।
प्रेतेऽपि कृत्वा ते प्रेतं शवधर्मेण दाहयेदिति तद्यथा

योमुमूर्षुः पुरुषः स्वयं चेतनवेलायां श्रोत्रियं वेदपारगं ब्राम्हणमाहूय अद्येत्यादि० मम सुखेन प्राणोत्क्रमणप्रतिबंधकोक्त निष्कृत्यनुक्तनिष्कृतिजनितसकलपापक्षयद्वारा सुखेन प्राणोत्क्रमणसिध्यर्थमिमामुत्क्रांतिसंज्ञिकां धेनुं यथाशक्तिसोपस्करां रुद्रदैवत्यां गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु

असूत्क्रांतौ प्रवृत्तस्य सुखोत्क्रमणसिध्यये ।

तुभ्यमेनां संप्रददे धेनु मुत्क्रांतिसंज्ञिकामिति ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात् गोरभावे तु तत्स्वरूपभूतं गोमूल्यं वा दद्यात् पित्रादेरशक्तौ तु पुत्रादिर्दद्यात् तत्र ममेति पदस्थाने पित्रादेरिति वदेत्

इत्युत्क्रांतिधेनुदानं

इयमेव मोक्षधेनुरिति केचित् तद्यथा मोक्षदो वासुदेवस्तु वेदशास्त्रेषु गीयते ।

तत्प्रीतये द्विजाग्र्यास्य मोक्षधेनुं ददाम्यहं इत्युक्त्वा अद्येत्यादि मम समस्तपापक्षयपूर्वक संसार मोक्षावाप्तिकामः श्रीपापापहमहाविष्णुप्रितिकामश्च इमां मोक्षधेनुं यथाशक्तिसोपस्करां रुद्रदैवत्यां गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु

मोक्षं देहि हृषीकेश मोक्षं देहि जनार्दन ।

मोक्षधेनुप्रदानेन मम मोक्षोस्तु वेगत इति ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात् गोरभावे तु पूर्वोक्तमनुसंधेयं

इति मोक्षधेनुदानं

---

### उत्क्रांति धेनूचें दान.

उत्क्रांति धेनुचें दान.

" ब्रम्हपुराणांत " उत्क्रांति, वैतरणी आणि दहा दानें हीं प्रेताचे ठिकाणीं ही करून नंतर त्या प्रेताला त्याच्या धर्मा प्रमाणें दहन

करावें. तें दान असें—मोक्ष होण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें स्वतः सावधपणाच्या वेळेंत वेद पारंगत अशा श्रोत्रिय ब्राम्हणांस बोलावून "अद्येत्यादि. मम सुखेन प्राणोत्क्रमण प्रतिबंदकोक्त निष्कृत्यनुक्तनिष्कृति जनित पाप क्षयद्वारा सुखेन प्राणोत्क्रमण सिध्यर्थ मिमा मुत्क्रांति संज्ञिकां धेनुं यथा शक्ति सोपस्करां रुद्रदैवत्यां गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्य महं संप्रददे न मम" ह्या प्रमाणें संकल्प करून त्या उत्क्रांति धेनुचें दान करावें. दानाचा मंत्र—

असूत्क्रांतौ प्रवृतस्य सुखोत्क्रमणसिध्यये ।
तुभ्यमेनां संप्रददे धेनु मुत्क्रांति संज्ञिकां "

नंतर सोनें दक्षिणा द्यावी. गाईचा अभाव असतां गाईचें मूल्य द्यावें. पित्रादिकांस शक्ति नसल्यास पुत्रादिकानें दान करावें. त्या ठिकाणीं "मम" ह्या पदाचें ठिकाणीं "पित्रादेः" असें म्हणावें.

ह्या प्रमाणें उत्क्रांति धेनुचें दान सांगितलें.

हीच "मोक्षधेनु" होय असें कित्येक म्हणतात तें असें--

मोक्ष धेनुचें दान.

मोक्षदो वासुदेवस्तु वेद शास्त्रेषु गीयते ।
तत्प्रीयते द्विजाग्राय मोक्षधेनुं ददाम्यहं ।

ह्या प्रमाणें म्हणून "अद्येत्यादि०" मम समस्त पापक्षयपूर्वक संसारमोक्षावाप्तिकामः श्रीपापापह महाविष्णुप्रीतिकामश्च इमां

मोक्षधेनुं यथाशक्ति सोपस्करां रुद्रदैवत्यां गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून तिचें दान करावें. दानाचा मंत्र–

मोक्षं देहि हृषीकेश मोक्षं देहि जनार्दन ।
मोक्षधेनु प्रदानेन मम मोक्षोस्तु वेगतः ॥

नंतर सोनें दक्षिणा द्यावी. गाईचा अभाव असतां पूर्वी सांगितलेलें योजावें.

ह्या प्रमाणें मोक्षधेनुचें दान सांगितलें.

---

अथ महिषीदानं

" हेमाद्रौ भविष्ये "

महिषीदानमाहात्म्यं कथयामि युधिष्ठिर ।
पुण्यं पवित्रमायुष्यं सर्वकामप्रदं तथा ।

" दानकालोऽपि तत्रैव "

चंद्रसूर्यग्रहे कार्तिक्यां अयने सितचतुर्दश्यां संक्रांतौ सर्वारिष्टनाशाय चित्तप्राशस्त्याय प्रथमप्रसूतां दोषवर्जितां दद्यात् तत्रादौ यमस्वरूपायै महिष्यै नम इति नत्वा प्रार्थयेत्

" महिषी ब्रम्हपुत्री च लक्ष्मीरूपेण संस्थिता ।
प्रार्थितासि मया देवि यममार्गं निवारयेति

" तथा "

महिषी यमरूपा त्वं विश्वामित्रविनिर्मिते ।
पूजित्वा हर मे पापं सर्वदानफलप्रदे ।
यथा शक्रस्याप्सरसोरूपेण महिषी तथा ।

सर्वभाग्यप्रदे देवि दीर्घशृंगि नमोस्तुते इति अद्ये-त्यादि० मम दीर्घायुष्यैहिकामुष्मिकयज्ञयाज्ञित्वपितृ तारणात्येतशुभविंशतिधेनुदानसमफलात्वाप्तिसर्वदोत्तम-फलपुत्रपौत्रबहुत्वसूर्यलोकनिवासमहाराज्यावाप्तिकामश्च मम सर्वारिष्टनिवारणार्थं शनैश्चरजनितपीडाशांत्यर्थं गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां महिषीं सालंकृतां रक्त-माल्यवस्त्रावृतां स्वर्णशृंगीं रौप्यखुरां ताम्रदोहां हैमति-लकां सप्तधान्ययुतां घंटाभरणां धेनूपस्करयुतां यमदै-वत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति सकुशतिलजलं तद्धस्ते दद्यात्

" विप्रो देवस्यत्वेति;"

पठन् पृष्ठदेशं स्पृष्ट्वा स्वस्तीति प्रतिगृह्य यथाशाखं कामस्तुतिं पठेत्

दाता तु इंद्रादिलोकपालानां या राज्यमहिषी शुभा ।
महिषीदानमाहात्म्यात्सास्तु मे सर्व कामदा ।
धर्मराजस्य साहाय्ये यस्याः पुत्रः प्रतिष्ठितः ।
महिषासुरस्य जननी या सा स्तु वरदा ममेति

दत्वा प्रदक्षिणीकृत्य ब्रम्हणे तां पयस्विनीमिति दक्षिणा तु दश पंच त्रयः सुवर्णाएकोवा सुवर्णोऽतिनिकृष्टोज्ञेयः ततोभूयसीं दक्षिणां दत्वा कर्मेश्वरार्पणं कुर्यात्

" हेमाद्रौ भविष्यपुराणे "

अनेन विधिना दत्वा महिषीं द्विजपुंगवे ।

सर्वान्कामानवाप्नोति इह लोके परत्रचेति ब्राम्हणः
सर्वकामांस्तु क्षत्रियो जयकामनां ।

धनकामं तु वैश्योवै शूद्रोभिलषितांमियात् महिषदानमप्येवमेव ज्ञेयं

इति माहिषीदानं

---

## म्हैशीचें दान.

म्हैशीच्या दानाचें फळ, दानाचा काळ, व प्रयोग.

" हेमाद्रिंत भविष्य पुराणांत " हे युधिष्ठिरा ! मी तुला म्हैशीच्या दानाचें महात्म्य सांगतों. तें दान पुण्यकारक, पवित्र, आयुष्य देणारें तसेंच सर्व मनोरथ पूर्ण करणारें आहे. " दानाचा काळही त्यांतच " चंद्र आणि सूर्य ह्यांचीं ग्रहणें, कार्तिकी पौर्णिमा, अयन, शुक्ल चतुर्दशी आणि संक्रांत ह्या दिवशीं सर्व अरिष्टांचा नाश होण्याकरितां आणि चित्ताची शुद्धि होण्याकरितां पहिल्यानेंच व्यायलेली असून दोषांनीं रहित अशी म्हैस द्यावी. त्याचे पूर्वीं ( दानाच्या पूर्वीं ) " यमस्वरूपायै माहिष्यायै नमः " ह्या प्रमाणें म्हणून तिला नमस्कार करून पुढील मंत्रांनीं तिची प्रार्थना करावी ते मंत्र—

महिषी ब्रम्हपुत्री च लक्ष्मीरूपेण संस्थिता ।
प्रार्थितासि मयादेवि यममार्गं निवारय ॥

" तसेंच "

महिषी यमरूपात्वं विश्वामित्र विनिर्मिते ।
पूजिता हरमे पापं सर्वे दान फलप्रदे ।

यथा शक्रस्याप्सरसोरूपेण महिषी तथा ।
सर्व भाग्यप्रदे देविदीर्घशृंगि नमोस्तुते ॥

नंतर अद्येत्यादि० मम दीर्घायुष्यैहि कामुष्मिकयज्ञयाजित्व पितृतारणार्थेत शुभविंशति धेनुदानसम फलावाप्ति कामः सर्वदोत्तमफल पुत्रपौत्रबहुत्व सूर्यलोकनिवास महाराज्यावाप्ति कामश्च मम सर्वारिष्ट निवारणार्थं शनैश्चरजनितपीडा शांत्यर्थं गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां महिषीं सालंकृतां रक्तमाल्य वस्त्रावृतां स्वर्णशृंगीं रौप्यखुरां ताम्रदोहां हैमतिलकां सप्तधान्ययुतां घंटाभरणयुतां धेनूपस्करयुतां यमदैवत्यां तुभ्यमहं संप्रददेन मम" ह्याप्रमाणें संकल्प करून कुश आणि तीळ ह्यांनीं युक्त असें उदक त्या ब्राम्हणाचें हातांत द्यावें. ब्राम्हणानें "देवस्यत्वा" हा मंत्र म्हणून म्हैशीच्या पाठीस हात लाऊन स्वस्ति असें म्हणून तिचा प्रतिग्रह करून आपले शाखेप्रमाणें कामस्तुतिकारक मंत्र म्हणावे. दात्यानें--

" इंद्रादि लोकपालानां या राज्य महिषी शुभा ।
महिषी दान माहात्म्या त्सास्तु मे सर्वकामदा ।
धर्मराजस्य साहाय्ये यस्याः पुत्रः प्रतिष्ठितः ।
महिषासुरस्य जननीया सास्तु वरदामम । "

ह्याप्रमाणें मंत्र म्हणून दान देऊन तिला प्रदक्षिणा करावी. दक्षिणा तर दहा, पांच किंवा तीन सुवर्ण× द्यावें, अथवा एक सुवर्ण दक्षिणा अति कनिष्ट जाणावी. नंतर ब्राम्हणांस दक्षिणा देऊन कर्म ईश्वरास अर्पण करावें. "हेमाद्रींत भविष्य पुराणांत"

× एक कर्षभार सोन्यास सोनें अशी संज्ञा आहे.

जो ह्या विधीनें श्रेष्ठ अशा ब्राम्हणास म्हैस दान करील त्याचे ह्या लोकीं आणि परलोकीं सर्व मनोरथ पूर्ण होतील. ब्राम्हण सर्व मनोरथांस, क्षत्रिय जयकामनेस, वैश्य द्रव्याच्या कामनेस आणि शूद्र इच्छित मनोरथास पावेल. महिषीचें दानही ह्याचप्रमाणें जाणावें.

ह्याप्रमाणें म्हैशीचें दान सांगितलें.

---

अथ मेषीदानं.

" भविष्ये "

शृणु पार्थ परं दानं सर्वकल्मषनाशनं ।
यद्दत्वा विविधं पापं सद्योविलयमृच्छति ।

अयने विषुवे ग्रहणद्वये दुःखप्रदर्शने चित्तवित्तानुसारे काले तीर्थे गृहे वा कार्यं शंकरं ब्राम्हणं विष्णुं गौरीं गायत्रीं श्रीसहितां यथाशक्ति सुवर्णप्रतिमां कृत्वा शच्या सहेंद्रं ग्रहान् लोकपालांश्च कृत्वा संपूज्य तत्पश्चिमतः स्वगृह्येणाग्निं प्रतिष्ठाप्य स्थापितदेवतामंत्रै स्तिलाज्यैरष्टोत्तरशत अष्टाविंशत्यष्टसंख्याकाहुतीर्हुत्वा ततोमेषीं द्विजं च वस्त्रालंकारादिभि र्यथाविभवं संपूज्य ॐ.अद्येत्यादि० सर्वपापक्षयदुःस्वप्नसूचितारिष्टविनाशपुत्रपौत्रधनकीर्तियशःकाम इमां मेषीं सुवर्णतिलकाद्यंकितां कौशेयपरिधानां सप्तधान्यसमायुक्तां पुष्पोपहारां सन्मुखस्थापितलवणां ब्रम्हविष्णुशिवादिप्रतिमायुक्तां उक्तोपस्करां गो-

त्राय शर्मणे सुपूजिताय इमां तुभ्यमहं संप्रददे न म-
मेति दत्वा सुवर्णं दक्षिणां दद्यात्
मंत्रस्तु–

वाङ्मनःकायजनितं यत्किंचिन्मम दुष्कृतं ।
तत्सर्वं विलयं यातु त्वद्दानेनोपसंचित मिति

प्रतिमास्थापनं तिलकुंभे मेषीं प्रत्यक्षां सुवर्णनिर्मितां वा विप्रोदेवस्यत्वेति शृंगे प्रतिगृह्य यथाशाखे काभस्तुतिं पठेत् प्रतिगृहीतृविप्रसंभाषणं मुखावलोकनं च वर्जयेत्
" भविष्ये "

शतेन कारयेत्तां तु सुवर्णस्य प्रयत्नतः ।
यथाशक्त्याथवा कुर्याद्वित्तशाठ्यं न कारयेत् ।

इति मेषीदानं

---

## मेंढीचें दान.

मेंढीचें दान.

"भविष्य पुराणांत" हे पार्था! जें दान दिल्यानें नाना प्रकारचीं पापें तत्काळ नाश पावतात असें सर्व पापाचें नाश करणारें श्रेष्ठ दान सांगतों. अयन, विषुवसंक्रांत, दोन्हीं ग्रहणें, दुःस्वप्नाचें दर्शन, चित्त आणि द्रव्य ह्यांस अनुकूल असा काल अशा वेळीं तिर्थाचें ठिकाणीं किंवा घरीं मेंढीचें दान करावें. शंकर, ब्रम्हा, विष्णु, गौरी, गायत्री, लक्ष्मी, शची, इंद्र, नवग्रह आणि लोकपाळ ह्यांच्या सोन्याच्या प्रतिमा करून त्यांची पूजा करून

त्यांच्या पश्चिमेकडे आपल्या गृह्यसूत्रांत सांगितलेल्या विधीनें अग्निची स्थापना केलेल्या देवतांच्या मंत्रानीं तीळ आणि तूप ह्यांच्या योगानें एकशेंआठ, अठ्ठावीस किंवा आठ आहुति देऊन नंतर मेंढी आणि ब्राम्हण ह्यांचें आपल्या सामर्थ्याप्रमाणें वस्त्र, अलंकार वगैरेनीं पूजन करून " अद्येत्यादि० सर्व पापक्षय दुःस्वप्नसूचितारिष्टविनाश पुत्रपौत्र धन कीर्ति यशः काम इमां मेषीं सुवर्णतिलकाद्यंकितां कौशेयपरिधानां सप्तधान्य समायुक्तां पुष्पोपहारां सन्मुख स्थापित लवणां ब्रम्हविष्णुशिवादि प्रतिमायुक्तां उक्तोपस्करां गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून तिचें दान करून सुवर्ण दक्षिणा द्यावी. मंत्र--

" वाङ्मनः कायजनितं यत्किंचिन्मम दुष्कृतं ।
तत्सर्वं विलयं यातु त्वद्दानेनोपसंचितं " ।

प्रतिमांचें स्थापन तिळांच्या राशीवर कुंभ ठेऊन त्यावर करावें. ब्राम्हणानें " देवस्यत्वा " हा मंत्र म्हणून प्रत्यक्ष किंवा सोन्याच्या मेंढीच्या शिंगास धरून प्रतिग्रह करून आपल्या शाखेप्रमाणें कामस्तुतिकारक मंत्र म्हणावे. दात्यानें प्रतिग्रह ( दान ) घेणाऱ्या ब्राम्हणाशीं भाषण व त्याचें मुखावलोकन करूं नये. " भविष्यपुराणांत " शंभर कर्षभार सोन्याची मेंढी करावी, अथवा आपले शक्तिप्रमाणें करावी; परंतु द्रव्याविषयीं कृपणता ठेऊं नये.

ह्याप्रमाणें मेंढीचें दान सांगितलें.

अथ अजादानं

" सुमंतुः "

अजापालो महीपालो ह्यजादाने र्दिवंगतः ।

अयने विषुवे चैव युगादौ ग्रहणेषु च ।

अमावास्यामजादानं पौर्णमास्यां च शस्यते ।

विधिं तस्य प्रवक्ष्यामि विश्वामित्रेण निर्मितं अजां विप्रं च यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य अद्ये-त्यादि० गोत्राय शर्मणे इमां अजां सप्तधान्योपरिस्थितां वस्त्रमाल्योपरिशोभितां वज्रनेत्रां हेमशृंगीं ताम्रपृष्ठीं रौप्यपादां सदोहनपात्रां सपुत्रां त्वाष्ट्रदैवतां तुभ्यमहं संप्रददे न ममेति कुक्षौ तिलोदकं दत्वा दद्यात्

" मंत्रस्तु "

मंत्रवासे अजे श्लक्ष्णे यज्ञसंपत्करे शुभे ।

सदात्वं दह मे पापं जन्मांतरशतैः कृतमिति तथा त्वं पूर्वं ब्रम्हणा सृष्टा पवित्रा कामदा परा ।

त्वत्प्रसूतौ स्थिता यज्ञास्तस्माच्छांतिं प्रयच्छ मे " देवस्य त्वेति शृंगे प्रतिग्रहः ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात्

इत्यजादानं

---

शेळीचें दान.

शेळीचें दान व त्याचा विधि.

" सुमन्तु "--अजापाल ह्या नांवाचा राजा शेळींच्या दानांनीं स्वर्गाला गेला. अयन, विषुव, युगादि, ग्रहणें, अमावास्या आणि

द९५
प ६८६८



पौर्णिमा ह्या दिवशीं शेळीचें दान प्रशस्त होय. म्हणून विश्वामित्रानें सांगितलेला त्याचा ( शेळीच्या दानाचा ) विधि सांगतों. शेळी आणि ब्राम्हण ह्यांचें आपलें सामर्थ्याप्रमाणें वस्त्र, अलंकार वगैरेंनीं पूजन करून नंतर " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इमां अजां सप्तधान्योपरिस्थितां वस्त्रमाल्योपरिशोभितां वज्रनेत्रां हेमशृंगीं ताम्रपृष्ठीं रौप्यपादां सदोहनपात्रां सपुत्रांत्वाष्ट्रदैवतां तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून तिच्या कुशीवर तिळोदक देऊन दान करावें. दानाचा मंत्र—

मंत्रवासे अजेश्लक्ष्णे यज्ञसंपत्करे शुभे।
सदात्वं दहमे पापं जन्मांतर शतैः कृतं।

" तसेंच "

त्वं पूर्वं ब्रम्हणासृष्टा पवित्रा कामदा परा।
वत्प्रसूतौस्थिता यज्ञा स्तस्माच्छांतिं प्रयच्छमे।

ह्याप्रमाणें मंत्र म्हणावे. दान घेणारानें " देवस्यत्वा " ह्या मंत्रानें शिंगाचें ठिकाणीं प्रतिग्रह करावा. नंतर दात्यानें सुवर्ण दक्षिणा द्यावी.

ह्याप्रमाणें शेळीचें दान सांगितलें.

---

अथ वृषदानं

अयने विषुवे चैव युगादौ ग्रहणेषु च।
अमायां च प्रदातव्यं वृषदानं जगुर्बुधाः अद्येत्यादि

पूर्ववत दानमंत्रस्तु धर्मस्त्वं वृषरूपेण जगदानंदकारक।
अष्टमूर्तेरधिष्ठानमतः शांतिं प्रयच्छ मे

इति वृषदानं

---

## बैलाचें दान.

बैलाचें दान.

अयन, विषुव. युगादि, ग्रहणें आणि अमावास्या ह्या दिवशीं बैलाचें दान करावें असें ज्ञाते म्हणतात. “ अद्येत्यादि० ” संकल्प पूर्वीप्रमाणें करावा. दानाचा मंत्र--

धर्मस्त्वं वृषरुपेण जगदानंदकारक।
अष्टमूर्ते रधिष्ठान मतःशांतिं प्रयच्छमे ”

ह्या प्रमाणें बैलाचें दान सांगितलें.

---

## अथ मंदाग्निहरं मेषदानं

“ बौधायनः ”

अग्नेर्मांद्यं भवेद्यस्य यस्त्रेताग्नेर्विनाशकः।
वक्ष्यामि तत्प्रतीकारं यथोक्तं ब्रम्हणा पुरा।
पलार्धेन तदर्धेन तदर्धार्धेन वा पुनः।
राजतं कारयेत्सौम्यं अग्नेर्वाहनमुत्तमं।
सौवर्णाश्च खुराः कार्याः श्वेतवस्त्रेण वेष्टयेत्।
तत्र श्वेतपुष्पं श्वेतगंधं मधूत्करं धूपं दद्यात् द्रोणद्वय-

तंदुलराशौ स्थितं पूजयेत् मेषादाग्नेय्यां दिशि समिदा-
ज्यतिलैर्होमः कार्यः अथास्य प्रयोगः पुण्यकाले अद्ये-
त्यादि० मम पूर्वकर्मविपाकोत्थत्रेताग्निनाशजनिताग्नि-
मांद्यनिरासाक्षिप्रजाठराग्निप्रबलत्वसिध्यायुरारोग्यता-
सिध्यर्थं मेषदानं करिष्ये इति संकल्प्य मेषप्रतिमां मेषंवा
प्रत्यक्षं संस्थाप्य आग्नेय्यां स्वगृह्योक्तविधिनाग्निं प्रति-
ष्ठाप्यान्वाधाय त्रिरग्निं क्रमेण समिदाज्यतिलैरष्टोत्तर-
शताष्टाविंशत्यष्टाष्टसंख्यया वा जुहुयात् एतैर्मंत्रैः समि-
दाज्यघृताक्ततिलाहुतिभिः ॐअग्निर्मूर्धादि० तिस्वाहा
अग्नय इ० ॐ अग्नेनयसुपथारा० स्वाहा अग्नय इ.२
ॐ अग्निनाग्निः स्यः स्वाहा अग्नय इ० ३ इति
त्रिभिर्मंत्रैर्विवक्षितसंख्यया समिदाज्यतिलैर्हुत्वा स्विष्ट-
कृतादिप्रणीताविमोकांतं कृत्वा कुंभोदकैं यजमान-
भिषिंचेदेतैर्मंत्रैः

"बौधायनः"

आपोहिष्ठेत्यृचेन हिरण्येतिऋृचेन च।
पवमानानुवाकेन मार्जयेदोमिणं ततः।
शन्नोवातानुवाकेन शांतिं चापि प्रकल्पयेत्।
तस्मै हुतवते रोगी प्राङ्मुखाय ह्युदङ्मुखः।

सदक्षिणं पूजिताय दत्वा वाहनमुत्तम मिति गोत्राय शर्मणे इमं सोपस्करमेषं प्रत्यक्षं राजतं वा वरुणदैवतं संकल्पोक्तफलकाम स्तुभ्यमहं संप्रददे न ममेति दत्वा प्रार्थयेत्।

"बौधायनः"

देवानां योमुखं हव्यवाहनः सर्वपूजितः ।
तस्य त्वं वाहनं पूज्यं देवेशेंद्रैर्महर्षिभिः ।
अग्निमांद्यं पूर्वकर्मविपाकोत्थं तु यन्मम ।
तत्सर्वं नाशाय क्षिप्रं जाठराग्नि प्रवर्धयेति विप्रस्तु शृंगे देवस्यत्वेति प्रतिगृह्य यथाशाखं कामस्तुतिं पठेत् ततः सुवर्णं दक्षिणां दत्वा यथाशक्ति भूयसीं दक्षिणां दत्वा ब्राम्हणांश्च भोजयित्वा सुहृद्युक्तो भुंजीतेति

इति मंदाग्निहरं मेषदानं.

---

## अग्निमांद्य नाहींसें करणारें मेंढ्याचें दान.

अग्नीमांद्यं नाहींसें करणारें मेंढ्याचें दान.

"बौधायन"—ज्यानें मागल्या जन्मीं +तीन अग्नींचा नाश केला असेल त्याला =अग्निमांद्य नांवाचा रोग होतो. मी त्याचा ब्रम्हदेवानें पूर्वी सांगितल्या प्रमाणें यथायोग्य प्रतिकार सांगेन. दोन कर्ष, किंवा एक कर्ष किंवा एक चतुर्थांश कर्ष एवढ्या +रतनाच्या सोन्याचें सुंदर असें अग्निचें वाहन ( मेंढा ) करवावें.त्याचे खूर सोन्याचें करावें. त्याला पां-

---

+ दक्षिणाग्नि, गार्हपत्य व आहवनीय असें तीन अग्नि होत.

= ज्या रोगानें अन्नाचें पचन होत नाहीं आणि क्षुधाही लागत नाहीं त्या रोगाला अग्निमांद्य म्हणतात.

+ चांदीचें किंवा सोन्याचें.

ढऱ्या वस्त्रानें वेष्टन करावें. त्याचे पूजना साठीं पांढरें फुल, पांढरें गंध आणि मधानें मिश्र अशा दालचिनीचा धूप असावा. दोन द्रोणा एवढ्या तांदुळांच्या राशीवर त्यास ठेवून पूजा करावी. मेंढ्याच्या अग्नेय दिशेकडे समिधा तूप आणि तीळ ह्यांच्या योगानें होम करावा.

दानाचा प्रयोग.

" ह्याचा प्रयोग " पुण्यकारक अशा वेळीं ": अद्ये-त्यादि० मम पूर्वकर्म विपाकोत्थ त्रेताग्निनाश जनिताग्निमांद्य निरासक्षिप्र जाठराग्नि प्रबलत्व सिध्या युरारोग्यता सिध्यर्थं मेषदानं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून मेंढ्याची प्रतिमा किंवा प्रत्यक्ष मेंढा ह्याची स्थापना करून त्याच्या अग्नेयीकडे आपल्या गृह्यसूत्रांत सांगितलेल्या विधि प्रमाणें अग्नीची स्थापना करून अन्वाधान करून पुढील सांगितलेल्या मंत्रांनीं तीन अग्नींचें समिधा, तूप आणि घृतानें मिश्र असें तीळ ह्यांच्या योगानें एकशेंआठ, अठावीस किंवा आठ वेळां हवन करावें. ते तीन मंत्र—ॐ अग्निर्मूर्धादि० ति स्वाहा अग्नय इदंनमम ॐ अग्नेनय सुपथास्वा० स्वाहा अग्नय इ० २ ॐ अग्निनाग्निःस्वः स्वहा अग्नय इ० ३ ह्या प्रमाणें तीन मंत्रांनीं विवक्षित संख्येच्या समिधा तूप आणि तीळ ह्यांच्या योगानें हवन करून स्विष्टकृतापासून प्रणीता विमोका पावेतों कृत्य करून कलशांतील उदकानें पुढील सांगितलेल्या मंत्रांनीं यजमानास अभिषेक करावा. " बौधायन "—आपोहिष्ठा० ह्या तीन ऋचांनीं हिरण्य. ह्या तीन ऋचांनीं आणि " पवमानाचे अनुवाकानें रोग्यावर अभिषेक करावा. नंतर "शा-

स्तोवात " ह्या अनुवाकानें शांतिपाठ म्हणावा. नंतर रोग्यानें उत्तरेकडे तोंड करून बसून पूर्वेकडे तोंड करून बसलेल्या आचार्याचें पूजन करून त्यास उत्तम वाहन द्यावें. नंतर " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इमं सोपस्कर मेषं प्रत्यक्षराजतंवा वरुणदैवतं संकल्पोक्तफळ काम स्तुभ्य महं संप्रददे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून दान देऊन पुढील मंत्रांनीं प्रार्थना करावी " बौधायन " देवानां यो मुखं हव्यवाहनः सर्वपूजितः। तस्यत्वं वाहनं पूज्यं देवेंशेंद्रैर्महर्षिभिः। अग्निमांद्य पूर्वकर्म विपाकोत्थंतु यन्मम। तत्सर्वं नाशयक्षिप्रं जाठराग्निं प्रवर्धय " ह्या प्रमाणें प्रार्थना करून ब्राम्हणानें त्याच्या शिंगास " देवस्यत्वा " ह्या मंत्रानें धरून आपले शाखे प्रमाणें कामस्तुति म्हणावी. नंतर सोनें दक्षिणा देऊन शक्ति प्रमाणें ब्रम्हणांस भूयसी दक्षिणा देऊन आणि ब्राम्हणास भोजन देऊन इष्ट आप्तांसह आपण भोजन करावें.

ह्या प्रमाणें अग्निमांद्य नाहीसें करणारें
मेंढ्याचें दान सांगितलें.

---

## अथ दशाचलदानानी.

" मात्स्ये "

प्रथमोधान्यशैलः स्याद्दितीयो लवणाचलः।
गुडाचलस्तृतीयः स्याच्चतुर्थो हेमपर्वतः।
तिलशैलः पंचमः स्यात्षष्ठः कार्पासपर्वतः।

सप्तमोघृतशैलः स्यादष्टमो रत्नपर्वतः ।
नवमो राजतःशैलोदशमः शर्कराचल इति
" कालमाह मात्स्ये "
अयने विषुवे चैव व्यतीपाते दिनक्षये ।
शुक्लपक्षे तृतीयायामुपरागे शशिक्षये ।
विवाहोत्सवयज्ञेषु द्वादश्यामथवा पुनः ।
शुक्लायां पंचदश्यां वा पुण्यर्क्षे वा विधानतः ।
धान्यशैलादयोदेया यथाश्रद्धं विधानतः ।

तीर्थे वायतने वापि गोष्ठे वाय गवां गणे तत्र चतुरस्रं द्वादशहस्तं मंडपमुदङ्मुखं प्राङ्मुखं वा प्राच्यामुदीच्यां वा एकमेव द्वारं न चत्वारि तोरणमप्येकमेव मंडलं गोमयेनोपलिप्य कुशानास्तीर्य तन्मध्ये पर्वतं कुर्यात विष्कंभैः पर्वतैर्युतं ।

धान्यद्रोणसहस्रेण भवेद्गिरिरिहोत्तमः ।
मध्यमः पंचशतिकः कनिष्ठः स्यात्त्रिभिः शतैः ।

मेरुर्व्रीहिमयोमहान् मध्ये तदुपरि मंदारपारिजातकल्पवृक्षादयोहेममयास्त्रयः मध्ये कल्पतरुर्मंदारः पारिजातो दक्षिणोत्तरयोः पूर्वपश्चिमयोर्हरिचंदनसंतानौ मुक्ताफलवज्रगोमेदकपुष्परागगारुत्मनीलरत्नवैडूर्यसरोजरागरत्नानि द्वंद्वशःपूर्वादिदिगवस्थितरजतश्रृंगेषुचतुर्षु निवेश्यानि मंदारः श्रीखंडखंडैरभितः प्रवाललतान्वितः शुक्तिशिलातलः स्यात् शर्कराचले तु हरिचंदनसंतानौ आवश्यकौ तत्र पूर्वादिदिक्षु ब्रम्हविष्णुरुद्रसूर्यप्रतिमाः पक्षिसंघान्मुनिसंघांश्च हैमान्

प्रागादिदिक् चतुष्टये क्रमेण पूर्वोक्तमुक्ताफलहीरकै र्गोमेदपुष्परागै र्मरकतनीलै र्वैडूर्यपद्मरागैः समसंख्याकै-र्भूषितं रौप्यशृंगचतुष्कं तद्बहिर्दिगष्टके रौप्यमिंद्रादिलो-कपालप्रतिमाष्टकं समेताच्छ्रीखंडै र्लतानां स्थानेप्रवाला-तिशिलानां शुक्तीः प्रागादिषु मेघानां श्वेतपीतकर्बुररक्त-वस्त्राणि वंशानामिक्षून जलस्य घृतं गंधपुष्पनानाफलानि च परितः संस्थाप्य पंचवर्णवितानकं चोपरि बध्नीयात् ततो यवै र्मेरोः षोडशांशेन प्राच्यां मंदारं तदुपरि नर-रूपं गणत्रयं कदंबं च सौवर्णं कदंबमूले हैमः कामदेवः अरुणोदसरः स्थाने दुग्धपूर्णरौप्यपात्रं रौप्यं चैत्ररथा-ख्यं वनं गंधपुष्पफलवस्त्राणि च स्थापयेत् याम्ये मेरु-षोडशांशेन गोधूममयं गंधमादनं तदुपरि सौवर्णं जंबू-वृक्षं तन्मूले सौवर्णमुदङ्मुखं धनदं मानससरःस्थाने सघृतं रौप्यपात्रं रौप्यं गंधर्वाख्यवनं नानाफलवस्त्रमा-ल्यानि च स्थापयेत् पाश्चिमे मेरुषोडशांशतिलमयं विपुलाख्यं पर्वतं तदुपरि सौवर्णं पिप्पलं तन्मूले प्राङ्मु-खीं सौवर्णहंसप्रतिमां सितोदसरःस्थाने दधिपूर्णं रौप्यपात्रं रौप्यं वैभ्राजं वनं वस्त्रफलमाल्यानि च स्था-पयेत् उत्तरे मेरुषोडशांशमितमाषैः सुपार्श्वपर्वतं तदुपरि सौवर्णं वटं तन्मूले दक्षिणाभिमुखीं सवत्सां सुवर्णधेनुं भद्रसरःस्थाने मधूपूर्णं रौप्यपात्रं रौप्यं सावित्रं वनं वस्त्रफलमाल्यानि च स्थापयेत् एवं वक्ष्यमाणपर्वतेष्वपि मेरुद्रव्यचतुर्थांशेन लवणादिद्रव्येण प्रागादिषु विष्कंभ-

पर्वता ज्ञेयाः तत्राचार्यस्त्वेकः ऋत्विजश्चत्वारः प्राच्या-
मेकमेव कुंडमिति तत्रैव जुहुयुः ।

अथ यजमानः कृतनित्यक्रियः पुण्यकाले अद्येत्या-
दि०अप्सरागंधर्वयुतविमानकरणकस्वर्गलोकगमनसाग्र-
मन्वंतरकालदेवलोकनिवासोत्तरभूलोकराजराजत्वकाम-
ईश्वरप्रीतिकामो वाऽश्वोधान्यपर्वतदानं करिष्ये इति
संकल्प्य तदंगत्वेन गणेशपूजनं नांदीश्राद्धेति च कृत्वा
आचार्यमृत्विजश्च वृत्वा मधुपर्कादिना संपूज्य मंडपपू-
जनाद्याचार्यनियोगांतं कुर्यात् तत आचार्योनवग्रहस्था-
पनादि कुंडसमीपस्थितकलशस्थापनांतं कुर्यात् अथ
ऋत्विजः प्राक्कुंडे गृहादिद्वात्रिंशद्देवताभ्य स्तत्तन्मंत्रैः
र्घृताक्ततिलैः पृथक् यवघृताभ्यां कुशैश्चेति त्रिभिः साधनैः
प्रत्येकमष्टवारं हुत्वा दशलोकपालेभ्योष्टवसुभ्यएकाद-
शरुद्रेभ्योद्वादशादित्येभ्यश्च प्रत्येकमष्टाष्टसंख्ययासमि-
च्चर्वाज्याहुतिभि र्जुहुयुः ततः पुरुषसूक्तेन ब्रम्हविष्णुरु-
द्रेभ्यः समित्तिलै र्वा सूर्यकामदेवधनदहंसकामधेनुभ्य-
स्तिलै र्घृतेन वा अष्टोत्तरशतं जुहुयुः ततश्चतुःपंचाशद्दे-
वताभ्य स्तिलै र्घृतेन च ततो यजमानो मेरुमवरुह्य
पूजयेत् तत्र मंत्रः त्वं सर्वदेवगणधामनिधि र्विरुद्धम-
स्मद्गृहेष्वमरपर्वतनाशयाशु ।

क्षेमं विधत्स्व कुरु शांतिमनुत्तमां नः संपूजितः परम
पाहि सनातनस्त्वं ।

त्वमेव भगवानीशो ब्रम्हा विष्णु र्दिवाकरः ।
मूर्तामूर्तं परं बीजमतः शांतिं कुरु प्रभो ।
यस्मात्त्वं लोकपालानां विश्वमूर्तेश्च मंदिरं ।
रुद्रादित्यवसूनां च ततः शांतिं प्रयच्छ मे ।
यस्मादशून्यममरै र्नारीभिश्च शिर स्तवा ।
तस्मान्मामुद्धराशेषदुःखसंसारसागरात् ।

" मंदरस्य तु "
यस्माच्चैत्ररथेन त्वं भद्राश्वप्रमुखेन च ।
शोभसे मंदर क्षिप्र मलं पुष्टिकरोभव ।

" गंधमादनस्य तु "
यस्माच्चूडामणि र्जंबुद्वीपे त्वं गंधमादन ।
गंधर्ववनशोभारानतः कीर्ति र्दृढास्तु मे

" विपुलस्य तु "
यस्मात्त्वं केतुमालेन वै भ्राजेन वनेन च ।
हिरण्मयाश्वत्थशिरा स्तथापुष्टि र्दृढा स्तुमे ।

" सुपार्श्वस्य तु "
उत्तरैः कुरुभिः र्यस्मात्सावित्रेण वनेन च ।
सुपार्श्वशोभसे नित्यमतः श्रीरक्षयास्तु मे ।

ततः सर्वैर्जागरणे कृते प्रातः स्नात्वा कृतनित्यक्रिया कुंडसमीपस्थकलशजलेन सपरिवारं यजमानमभिषिचेयुः ततो यजमानो गृहीतकुसुमोमेरुं प्रदक्षिणीकृत्योप्रातिष्ठेत् अत्रं ब्रम्हरसः प्रोक्तमत्रेप्राणाः प्रतिष्ठिताः ।

अन्नाद्भवंति भूतानि जगदन्नेन वर्धते ।
अन्नमेव यतो लक्ष्मीरन्नमेव जनार्दनः ।

धान्यपर्वतरूपेणपाहि तस्मान्नमोनम इत्यूपस्थाय पुष्पांजलिं प्रक्षिप्य नमस्कृत्य प्राङ्मुख उपविश्योदङ्मुखेभ्योगुर्वादिभ्यः क्रमेणागिरीन्दद्यात्—

अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय गुरवे अप्सरोगंधर्वयुतविमानकरणकस्वर्गलोकगमनानंतरंसाग्रमन्वंतरशतावधिसमयदेवलोकनिवासोत्तरभूलोकराजराजत्व प्राप्तिकाम इमं धान्यमयमेरुं सौवर्णमंदरादिवृक्षपंचक सौवर्णब्रम्हविष्णुरुद्रार्कादिप्रतिमाद्युक्तं मुक्ताहीरकादिभूषितं रौप्यमयश्रृंगचतुष्कोपाशोभितं रूप्यमयेंद्रादिदश लोकपालप्रतिमायुतं रौप्यमयनितंबान्वितं इक्षुवंशमित कंदरादिक्चतुष्टयस्थापितरौप्यपात्रास्थितं घृतोदकप्रस्रवणं दिक्चतुष्टयस्थापितकर्पूरक्तवस्त्रांबुदधरं नानाफलमाल्यवितानाद्युपकरणसहितं तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात् चतुर्विंशतिधेनुपक्षे गावोष्टौ गुरवे चतस्र श्चतुर्ऋत्विग्भ्यः दशपक्षे तु गुरवे षट् ऋत्विग्भ्यः एकैका एक धेनुपक्षे गुरवे एकामेव कापिलां ऋत्विग्भ्यः सुवर्णदक्षिणां दद्यादिति

“ मदनरत्नादयः ”

एवं पूर्वास्थितमंदराख्यं विष्कंभं सप्रतिमंसोपस्करं गोत्राय शर्मणे ऋत्विजे तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात् एवमेव दक्षिणस्थं गोधूममयं गंधमादनपर्वतं

तथापश्चिमस्थं तिलमयं विपुलाख्यं पर्वतं तत उत्तरदि-
क्स्थं माषमयं सुपार्श्वाख्यं पर्वतं ऋत्विग्भ्यो दद्यात्
लवणाचलादिदानप्रयोगेषु धान्यपदस्थाने लवणादिपदं
प्रक्षेप्यं तत्तत्फलानि तु तत्र तत्र वक्ष्यामः ततो ग्रहवेधां
यजमानो देवताः संपुज्यावाहितदेवताश्च संपूज्यनम-
स्कुर्यात् गुरुस्तासां देवतानां विसर्जनं कुर्यात् ततो यज-
मानो मंडपग्रहपीठं प्रतिमोपस्करादिसर्वं गुरवे प्रतिपाद्य
भूयसीं दक्षिणां दत्वा प्रमादा. यस्य स्मृत्येति च विष्णुं
स्मृत्वाकर्मेश्वरार्पणं कृत्वा ब्राम्हणान् भोजयित्वा शिषो
गृहीत्वा स्वयंसुहृद्युतो भुंजीतेति

इति धान्यमेरुपर्वतसाधारणदानप्रयोगः

---

## धान्यादिकांच्या दहा पर्वतांचीं दानें.

धान्य वगैरेंच्या दहा पर्वतांचीं दानें. धान्य पर्वताच्या दानाचा काल व विधि.

" मत्स्यपुराणांत " पहिला धान्याचा पर्वत, दुसरा लवणाचा ( मिठाचा ) पर्वत, तिसरा गुळाचा पर्वत, चवथा सोन्याचा पर्वत पांचवा तिळांचा पर्वत, सहावा कापसाचा पर्वत, सातवा तुपाचा पर्वत, आठवा रत्नांचा पर्वत, नववा रुप्याचा पर्वत आणि दहावा साखरेचा पर्वत या प्रमाणें प्रकार सांगितले आहेत. हीं दानें केव्हां करावयाचीं त्याचा काळ सांगतों. " मत्स्यपुराणांत " अयन, विषुव, व्यतीपात, क्षयदिवस, शुक्ल पक्षांतील तृतिया, ग्रहण, अमावास्या, विवाह, उत्सव, यज्ञ,

शुक्ल पक्षांतील द्वादशी, पौर्णिमा व पुण्यकारक नक्षत्र ह्या दिवशीं तीर्थ किंवा घर, किंवा गाईचा गोठा किंवा गाईंचा समुदाय अशा स्थळीं विधींत सांगितल्याप्रमाणें श्रद्धेनें धान्य वगैरेंच्या पर्वतांचें दान द्यावें. त्यांत समचौरस बारा हातांचा उत्तरेकडल्या द्वाराचा किंवा पूर्वेकडल्या द्वाराचा असा मंडप करावा. त्याला पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे एकच दार करावें, चार दारें करूं नयेत. तोरणही एकच असावें. मंडळास शेणानें सारवून त्यावर दर्भ पसरून त्यांच्यामध्यें चार विष्कंभ पर्वतांनीं युक्त असा पर्वत करावा. एक हजार द्रोणाएवढ्या धान्याचा पर्वत उत्तम होय, पांचशे द्रोणाएवढा मध्यम आणि तिनशे द्रोणाएवढा कनिष्ठ होय. मध्यभागीं धान्यांचा मोठा मेरु करावा, त्यावर मंदार, पारिजातक, कल्पवृक्ष असे तीन वृक्ष सोन्याचे करावे. मध्यभागीं कल्पतरु, दक्षिण आणि उत्तरेकडे मंदार आणि पारिजातक पूर्व आणि पश्चिम ह्यांकडे हरिचंदन आणि संतान हे आवश्यक आहेत. पूर्वादि दिशांकडे असलेल्या चार अशा चांदीच्या शिखरांवर मोतीं, हिरा, गोमेदक, पुष्पराग, गारुत्मत, नीलरत्न, वैडूर्य आणि पद्मराग अशीं दोन दोन रत्नें ठेवावीं. जसें पूर्वेकडे मोती आणि हिरा हीं दोन तशींच दक्षिणेकडे गोमेद आणि पुष्पराग. त्याच्या बाहेर आठ दिशेस इंद्रादि आठ लोकपालांच्या प्रतिमा असाव्या. त्यांच्या आसपास वेलींच्या ठिकाणीं पोंवळीं व शिळांच्या ठिकाणीं शिंपले असावे. पूर्वादि चार दिशांस मेघ ह्या ठिकाणीं पांढरें, पिंवळें, चित्रविचित्र रंगाचें आणि तांबडें अशीं वस्त्रें ठेवावीं. बासांच्या ( वेळुच्या ) ठिकाणीं ऊंस, पाण्याच्या

ठिकाणीं तूप, गंध फुलें आणि नानाप्रकारचीं फळें ठेवावीं. ह्या पर्वताचे वर पांच रंगांचें छत बांधावें. नंतर पूर्वेस मेरुच्या सोळाव्या भागाएवढ्या जवांनीं मंदार नांवाचा विष्कंभ पर्वत करावा. त्याचेवर मनुष्याचें स्वरूपासारखे तीन गण आणि कदंब वृक्ष हे सोन्याचे करावे. कदंबाच्या मुळाशीं ( बुंधाशीं ) सोन्याचा कामदेव असावा. अरुणोद सरोवराच्या ठिकाणीं दुधानें भरलेलें रुप्याचें भांडें, रुप्याचें चैत्ररथ नांवाचें वन आणि गंध, फुलें व वस्त्रें हीं स्थापन करावीं. दक्षिणेस मेरुच्या षोडशांशाएवढा गव्हांचा गंधमादन नांवाचा विष्कंभ पर्वत करावा. त्याचेवर सोन्याचा जंबुवृक्ष असून त्याच्या मुळाशीं सोन्याचा उत्तरेकडे ज्याचे तोंड आहे असा कुबेर असावा. मानस सरोवराच्या ठिकाणीं तुपानें भरलेलें रुप्याचें भांडें, रुप्याचें गंधर्व या नांवाचें वन आणि नानाप्रकारचीं फळें, वस्त्रें व फुलें हीं स्थापन करावीं. पश्चिमेकडे मेरुच्या सोळाव्या भागाएवढा तिळांचा विपुलाख्य पर्वत करून त्याचेवर सोन्याचा पिंपळ करून त्याच्या मुळाशीं पूर्वेकडे तोंड केलेली अशी सोन्याची हंसाची प्रतिमा करावी. सितोद सरोवराच्या ठिकाणीं दह्यानें भरलेलें रुप्याचें पात्र ठेऊन रुप्याचें वैभ्राज नांवाचें वन आणि वस्त्रें, फळें व फुलें हीं ठेवावीं. उत्तरेस मेरुच्या सोळाव्या भागाएवढ्या उडदांनीं सुपार्श्व पर्वत करून त्याचेवर सोन्याचा वडाचा वृक्ष करून त्याचे बुंधाशीं दक्षिणेकडे तोंड केलेली अशी वत्सानेंयुक्त ( वत्सासह ) सोन्याची गाय करावी. भद्र सरोवराच्या ठिकाणीं मधानें भरलेलें रुप्याचें भांडें, रुप्याचें सावित्र नांवाचें अरण्य, वस्त्रें, फळें आणि

फुलें स्थापन करावीं. ह्याप्रमाणें पुढें सांगण्यांत येणाऱ्या पर्वतांवरही मेरुच्या द्रव्याच्या चतुर्थांशाएवढ्या मीठ इत्यादि द्रव्यानें पूर्वादि चार दिशांस विष्कंभ पर्वत जाणावे. त्यांत ( पर्वतांच्या दानांच्या ) एक आचार्य, चार ऋत्विज ( ब्रम्हादिक ) आणि पूर्वेकडे एकच कूंड असावें. आचार्यादिकांनीं त्यांतच हवन करावें.

दानाचा प्रयोग.

नंतर यजमानानें स्नानसंध्यादि नित्य कर्म आटोपून पूर्वी सांगितल्याप्रमाणें पुण्यकारक अशा वेळीं अद्येत्यादि० अप्सरोगंधर्वयुक्त विमानकरणक स्वर्गलोकगमन साग्र मन्वंतरकाळ देवलोकनिवासोत्तर भूलोक राजराजत्वकाम ईश्वरप्रीति कामोवाऽश्वोधान्यपर्वत दानं करिष्ये " ह्याप्रमाणें संकल्प करून त्याच्या अंगभूत असलेलीं गणपतीचें पूजन आणि नांदिश्राद्ध हीं करून आचार्य आणि ऋत्विजांस वरण देऊन त्यांची मधूपर्क वगैरेंनीं पूजा करून मंडप पूजनापासून आचार्यांची योजना होईतोंपावेतों तें कर्म करावें. नंतर आचार्यानें नवग्रहाचें स्थापनापासून कुंडाचे जवळ असलेल्या कलशाच्या स्थापनेपावेतों कर्म करावें.

नंतर ऋत्विजांनीं पूर्वेकडल्या कुंडांत नऊ ग्रह मिळून बत्तीस देवतांस त्या त्या मंत्रांनीं घृतानें मिश्र अशा तिळांनीं, वेगळे जव आणि तूप व दर्भ अशा तीन साधनांनीं प्रत्येकीं आठ वेळां हवन करून दहा लोकपाल, आठ वसु, अकरा रुद्र आणि बारा आदित्य ह्यांचें प्रत्येकीं आठ आठ संख्येनें समिधा, भात आणि तूप ह्यांच्या योगानें हवन करावें. नंतर पुरुषसूक्तानें ब्रम्हा,

विष्णु व रुद्र ह्यांचें समिधा व तीळ ह्यांनीं व सूर्य, कामदेव, कुबेर, हंस व कामधेनु ह्यांचें तिळांनीं किंवा तुपानें एकशेंआठ वेळां हवन करावें. नंतर दुसऱ्या चोपन देवतांचें तिळांनीं आणि तुपानें हवन करावें.

नंतर यजमानानें मेरुवर चढून त्याचें पूजन करावें. त्याविषयीं मंत्र—

त्वं सर्व देवगणधाम निधिर्विरुद्ध
मस्मद्गृहे ष्वमरपर्वत नाशयाशु ।
क्षेमं विधत्स्वकुरु शांति मनुत्तमांनः
संपूजितः परम पाहि सनातनत्वं ।

त्वमेव भगवानीशो ब्रम्हा विष्णु र्दिवाकरः ।
मूर्तामूर्त परंबीज मतःशांतिं कुरुप्रभो ।
यस्मात्वं लोपकालानां विश्वमूर्तेश्च मंदिरं ।
रुद्रादित्य वसूनांच ततःशांतिं प्रयच्छमे ।
यस्मादशून्य ममरैर्नारीभिश्च शिरस्तव ।
तस्मान्मामुद्धराशेष दुःख संसार सागरात् । "

" मंदराचा " मंत्र—

यस्माचैत्र रथेनत्वं भद्राश्वथ मुखेनच ।
शोभसे मंदरक्षिप्र मलंपुष्टि करोभव ।

" गंधमादनाचा "—

यस्माच्चूडामणिर्जंबुद्वीपेत्वं गंधमादन गंधर्व वनशोभा-
वानतः कीर्तिर्दृढास्तुमे "

" विपुलाचा "—

यस्मात्त्वं केतुमालेन वैभ्राजेन वनेनच ।
हिरण्मयाश्वत्थशिरा स्तथा पुष्टिर्द्दढास्तुमे "

" सुपार्श्वाचा "–

उत्तरैः कुरुभिर्यस्मा त्सावित्रेण वनेनच।
सुपार्श्व शोभसे नित्यमतः श्रीरक्षयास्तुमे "

नंतर सर्वांनीं रात्रीं जागरण केल्यावर प्रातःकाळीं स्नान करून नित्य कर्म आटोपून कुंडाच्या जवळ असलेल्या कलशांतील उदकानें परिवारासह यजमानावर अभिषेक करावा. नंतर यजमानानें हातांत फुलें घेऊन मेरुस प्रदक्षिणा करून त्याची प्रार्थना करावी ती अशी—

अन्नंब्रम्हरसः प्रोक्तमन्ने प्राणाःप्रतिष्ठिताः।
अन्नाद्भवंतिभूतानि जगदन्नेनवर्धते ।
अन्नमेव यतोलक्ष्मी रन्नमेव जनार्दनः ।
धान्यपर्वत रूपेण पाहितस्मान्नमोनम "

ह्या प्रमाणें प्रार्थना करून पुष्पांजलि टाकून नमस्कार करून आपण ( यजमानानें ) पूर्वेकडे तोंड करून बसून उत्तरेकडे तोंड करून बसलेल्या आचार्यादिकांस क्रमानें पर्वतांचें दान करावें. तें असें– " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सालंकृताय गुरवे अप्सरोगंधर्वयुत विमानकरणक स्वर्गलोकगमनानंतरं साग्रमन्वंतर शतावधिसमय देवलोकनिवासोत्तर भूलोकराजराजत्व प्राप्तिकाम इम धान्यमयमेरुं सौवर्णमंदरादिवृक्षपंचक सौवर्ण ब्रम्हाविष्णुरुद्रार्कादि

प्रतिमायुक्तं मुक्ताहीरकादि भूषितंरौप्यमयशृंगचतुष्कोण शोभितं रौप्यमयेंद्रादि दशलोकपालप्रतिमायुक्तं रौप्यमयनितंबान्वितं इक्षुवं शमितकंदरादिक्‌चतुष्टयस्थापित रौप्यपात्रस्थितं घृतोदकप्रस्त्रवणांदिक् चतुष्टय स्थापित कर्पूररक्तवस्त्रांबुदधरं नानाफलमाल्यवितानाद्युपकरणसहितं तुभ्यमहं संप्रददे न मम" ह्याप्रमाणें संकल्प करून दान करावें. चोवीस गाई देण्या विषयींचा पक्ष असल्यास आठ गाई आचार्यास आणि चौघा ऋत्विजांस चार चार द्याव्या. दहा देण्याचा पक्ष असल्यास आचार्यास सहा आणि ऋत्विजांस एक एक. एकच गाय देण्याचा पक्ष असल्यास आचार्यास एकच कपिला गाय द्यावी आणि ऋत्विजांस सोनें दक्षिणा द्यावी असें "मदन रत्नादिक" सांगतात. ह्या प्रमाणें (मेरुचे दाना प्रमाणें) पुर्वेकडे असलेल्या मंदराचें "पूर्वस्थित मंदराख्यं विष्कंभं सप्रतिमं सोपस्करं गोत्राय शर्मणे ऋत्विजे तुभ्यमहं संप्रददे न मम" ह्या प्रमाणें संकल्प करून दान करावें. असेंच दक्षिणे कडील गव्हाच्या गंधमादन नांवाच्या पर्वताचें तसेंच पश्चिमेकडील तिळांचे विपुल नांवाच्या पर्वताचें त्या नंतर उत्तरे कडल्या उडदांच्या सुपार्श्वनावाच्या पर्वताचें क्रमानें चार ऋत्विजांस दान करावें. लवणाचलादिकांच्या दानाच्या प्रयोगांत धान्याचें पदाचे ठिकाणीं लवणादि असें पद योजावें. त्यांचीं त्यांचीं फळें तर त्या त्या ठिकाणीं सांगण्यांत येतील नंतर यजमानानें ग्रहांच्या वेदीवर देवतांचें आणि आवाहित देवतांचें पूजन करून त्यांस नमस्कार करावा. आचार्यानें त्या देवतांचें विसर्जन करावें. नंतर यजमानानें मंडपांतील ग्रहांचें पीठ,प्रतिमा उपस्कर वगैरे सर्व आचार्यास देऊन ब्राम्ह-

णांस भूयसी दक्षिणा देऊन " प्रमदा० " आणि "यस्यस्मृत्या" ह्या मंत्रांनीं विष्णुचें स्मरण करून कर्म ईश्वरास अर्पण करून ब्राम्हणास भोजन देऊन त्यांजकडून आशीर्वाद घेऊन नंतर स्वतः इष्टआप्तासह भोजन करावें.

ह्या प्रमाणें धान्यमेरुपर्वताच्या साधारण
दानाचा प्रयोग सांगितला.

---

अथ लवणाचलदानं

" पाद्मे "

उत्तमः षोडशद्रोणः कर्तव्यो लवणाचलः ।
मध्यमः स्यात्तदर्धेन चतुर्भि रधमः स्मृतः ।
वित्तहीनो यथाशक्त्याद्रोणादूर्ध्वं तु कारयेत् ।
चतुर्थांशेन विष्कंभपर्वतान् कारयेत्पृथक् अयं न्यायः सर्वविष्कंभपर्वतेषु ज्ञेय इति

" मदनः "

विधानं तु पूर्ववत् हेमतरूंल्लोकपालान्कामदेवादीन् पूर्ववत् तथैव संपूज्य प्रार्थयेत्

" मंत्रास्तु "

सौभाग्यरससंभूतो यतोयं लवणोरसः ।
तदात्मकत्वेनचमांपाहिपापान्नमो नमः ।
यस्मादन्नरसाः सर्वे नोत्कृष्टा लवणं विना ।
प्रियं च शिवयोर्नित्यं तस्माच्छांतिं प्रयच्छमे ।

विद्युद्देहसमुद्भूतं यस्मादारोग्यवर्धनं ।
तस्मात्पर्वतरूपेण पाहि संसारसागरात् "अद्येत्यादि कल्पपर्यंतं उमालोकप्राप्त्यनंतरं परमगतिकाम ईश्वर-प्राप्तिकामो वा लवणाचलदानं करिष्ये इति संकल्पः अयमेव विशेषोन्यत्सर्वं पूर्ववत्

इति लवणाचलदानं

---

## *लवणाचलाचें दान.

लवणाचलाचें दान व त्याचा प्रयोग,

" पद्मपुराणांत " सोळा द्रोणांचा लवणाचल उत्तम होय. त्याहून अर्ध्याएवढा मध्यम आणि चार द्रोणांचा कनिष्ट होय. द्रव्यहीन असेल त्यानें आपल्या शक्तीप्रमाणें एक द्रोणापेक्षां अधिक मिठाचा करावा. त्याच्या चतुर्थांशाएवढे विष्कंभ पर्वत निराळे करावे.हा न्याय सर्व विष्कंभ पर्वताच्या ठिकाणीं जाणावा असें " मदन " म्हणतो. ह्याचा विधितर पूर्वींप्रमाणेंच ( धान्याचळाप्रमाणें ) जाणावा. सोन्याचे वृक्ष, लोकपाळ, कामदेव वगैरेंची पूर्वींप्रमाणें पूजा करून प्रार्थना करावी. लवणाचळाच्या प्रार्थनेचे मंत्रः–

सौभाग्यरस संभूतो यतोयं लवणो रसः ।
तदात्मकत्वेनचमांपाहि पापान्नमोनमः ।
यस्मादन्नरसाःसर्वे नोत्कृष्टालवणंविना ।
प्रियंच शिवयोर्नित्यं तस्माच्छांतिं प्रयच्छमे ।

---

* मीठांच्या पर्वताचें दान.

विद्युद्देह समुद्भूतं यस्मादारोग्यवर्धनं ।
तस्मात्पर्वतरुपेण पाहि संसारसागरात्

अद्येत्यादि० कल्पपर्यंतं उमालोकप्राप्त्यनंतरं परमगतिकामः ( अथवा ) शिवप्राप्तिकामः लवणाचलदानं करिष्ये " ह्याप्रमाणें संकल्प करावा. हाच विशेष समजावा; दुसरे सर्व पूर्वीप्रमाणें समजावे.

ह्याप्रमाणें लवणाचलाचें दान सांगितलें.

---

## अथ गुडाचलदानं

" पाद्मे "

अथातः संप्रवक्ष्यामि गुडपर्वतमुत्तमं ।
यत्प्रदाना त्ततः स्वर्गं प्राप्नोति सुरपूजितः।
उत्तमो दशभिर्भारै मध्यमः पंचभिर्यतः ।
त्रिभिर्भारः कनिष्ठः स्यात्तदर्धेनाल्पवित्तवान् तुला स्त्रियां पलशतं भारः स्याद्विंशातिस्तुला इत्यमरः विधिस्तु पूर्ववत्

" प्रार्थनामंत्रास्तु "

यथादेवेषु विश्वात्मा प्रवरश्च जनार्दनः ।
सामवेदस्तु वेदानां महादेव स्तु योगिनां ।
प्रणवः सर्वमंत्राणां नारीणां पार्वती यथा ।
तथा रसानां प्रवरः सदैवेक्षुरसो मतः ।

मम तस्मात्परां लक्ष्मीं ददस्व गुड सर्वदा ॥
यस्मात्सौभाग्यदायिन्या भ्राता त्वं गुडपर्वत ।
निवासश्चापि पार्वत्यास्तस्मान्मां पाहि सर्वदा ।

" दानवाक्यं तु "

अद्येत्यादि० सकलपापक्षयोत्तरगंधर्वपूज्यमानत्वपूर्वकल्पशतावधिगौरीलोकप्राप्त्यनंतरं सपत्नापराजितायुरारोग्यपूर्वकसप्तद्वीपाधिपतित्वकामईश्वरप्रीतिकामोवेति संकल्प्ये दाने च विशेषोऽन्यत्सर्वं पूर्ववदिति

इति गुडाचलदानं

---

## गुळाच्या पर्वताचें दान.

गुळाच्या पर्वताचें दान.

" पद्मपुराणांत "आतां ह्यापुढें मी उत्तम अशा गुळाचा पर्वताचें दानाचा प्रकार सांगतो. ह्या दानापासून मनुष्य देवांस पूज्य असा होऊन स्वर्ग लोकाला पावतो. गुळाचा पर्वत दहा भारांचा उत्तम, पांच भारांचा मध्यम व तीन भारांचा कनिष्ठ होय. ज्यापाशीं अल्प द्रव्य असेल अशा पुरुषानें त्याहून अर्ध्याएवढा ( दीड भाराएवढा ) गुळाचा पर्वत करावा. शंभर पळांची एक तुळा होते, वीस तुळांचा एक भार होतो असें " अमरकोशांत " आहे. ह्याचा विधि पूर्वींप्रमाणेंच जाणावा. व प्रार्थनेचे मंत्र "--

यथादेवेषु विश्वात्मा प्रवरश्च जनार्दनः ।
सामवेद स्तुवेदानां महादेवस्तु योगिनां ।
प्रणवः सर्वमंत्राणां नारीणां पार्वती यथा ।
तथानां रसानां प्रवरः सदैवे क्षुरसो मतः ।
मम तस्मा त्परां लक्ष्मीं ददस्व गुड सर्वदा ।
यस्मा त्सौभाग्य दायिन्या भ्रातात्वं गुडपर्वत ।
निवासश्चापि पार्वत्या स्तस्मांन्मां पाहिसर्वदा । ”

दानाचा संकल्प.

दानाचा संकल्प—अद्येत्यादि० सकलपापक्षयोत्तरंगधर्व-पुज्यमानत्वपूर्वकल्पशतावधिगौरीलोक प्राप्त्यनंतरं सपत्नापरायायुरारोग्यपूर्व-कसप्तद्वीपाधिपतित्वकामः ( किंवा ) ईश्वर प्रीतिकामः ” ह्या प्रमाणें संकल्पांत आणि दानांत विशेष प्रकार आहे. बाकी सगळें पूर्वी प्रमाणें समजावें.

ह्या प्रमाणें गुळाच्या पर्वताचें दान सांगितलें.

---

## अथ सुवर्णाचलदानं

“ पाद्मे ”

उत्तमः पलसाहस्रो मध्यमः पंचभिः शतैः ।

तदर्धे नाधमस्तद्वदल्पवित्तो पि शक्तितः अल्पवित्तः पलादूर्धं कुर्यादिति धान्यपर्वतवद्विधानं पर्वतं संपूज्य प्रार्थयेत् मंत्रास्तु

नमस्ते ब्रम्हगर्भाय ब्रम्हबीजाय वै नमः ।
यस्मादनंतफलद स्तस्मात्पाहि शिलोच्चय ।
यस्मादग्नेरपत्यं त्वं यस्मात्तेजो जगत्पतेः ।
हेमपर्वतरूपेण तस्मात्पाहि सदा ममेति

" दानवाक्यं "

अद्येत्यादि० सकलपापक्षयकल्पोत्तरशतकल्पावधि-आनंदकारकब्रम्हलोकभोगानंतरपरमपदप्राप्तिकाम इति संकल्पे दानवाक्ये च विशेषः अत्रसर्वं गुर्वादिभ्य एव-देयं तदल्पद्रव्यविषयं बहुद्रव्येणु तुलापुरुषदानवदर्धं चतुर्थांशं वा गुरवे दत्वाऽन्यद्विप्रेभ्यो देयमिति हेमाद्रिः"

इति सुवर्णाचलदानं.

---

## सोन्याच्या पर्वताचें दान.

" पद्मपुराणांत " हजार पळांचा सोन्याचा पर्वत उत्तम, पांचशें पळांचा मध्यम आणि अडी-चशें पळांचा कनिष्ट होय. कमी द्रव्य असेल त्यानें ही शक्ती प्रमाणें करावा. परंतु तो एका पळा पेक्षां अधिक असावा. ह्याचा विधि धान्याच्या पर्वताच्या विधि प्रमाणें जाणावा. पर्वताची पूजा करून पुढील मंत्रांनीं प्रार्थना करावी. ते मंत्र—

सोन्याच्या पर्वताचें दान.

नमस्ते ब्रम्हगर्भाय ब्रम्हबीजाय वैनमः ।
यस्मादनंत फलद स्तस्मा त्पाहिशिलोच्चय ।

यस्मादग्रे स्पत्यंत्वं यस्मात्तेजो जगत्पतेः ।
हेमपर्वत रूपेण तस्मात्पाहि सदामम ।

" दानाचा संकल्प " अद्येत्यादि० सकलपापक्षयकल्पोत्तर-शतकल्पावधिआनंदकारकब्रम्हलोक-भोगानंतरपरमपदप्राप्तिकामः ह्या प्र-

दानाचा संकल्प.

माणें संकल्पांत आणि दानांत विशेष प्रकार समजावा. ह्यांत ल सगळें द्रव्य आचार्य इत्यादिकांसच द्यावें. हें कमी द्रव्या विषयीं जाणावें. पुष्कळ द्रव्य असल्यास तुला पुरुषाच्या दाना प्रमाणें अर्धें किंवा चौथा भाग आचार्यास देऊन बाकीचें दुसऱ्या ब्राम्हणांस द्यावें असें " हेमाद्रि " म्हणतो.

ह्या प्रमाणें सोन्याच्या पर्वताचें दान सांगितलें.

---

## अथ तिलाचलदानं

" पाद्मे "

उत्तमोदशभिर्द्रोणैः पंचभि र्मध्यमोमतः ।
त्रिभिःकनिष्ठो राजेंद्र तिलशैलः प्रकीर्तित इति वृक्ष-विष्कंभादि तु सर्वं पूर्ववत्

" मंत्रास्तु "

यस्मान्मधुवधे विष्णोर्देहस्वेदसमुद्भवाः ।
तिलाः कुशाश्च माषाश्च तस्माच्छन्नो भवत्विह ।
हव्यकव्येषु यस्माच्च तिलै रेवाभिरक्षणं ।
भवानुद्धर शैलेंद्र तिलाचल नमोस्तु ते

" दानवाक्यं तु "

अद्येत्यादि० सकलपापक्षयदीर्घायुष्यपुत्रपौत्रसमन्वित भोगानंतरपितृदेवगंधर्वलोकपूज्यमानत्वपूर्वकद्युलोकगमनानंतरमक्षय्यवैष्णवपदप्राप्तिकाम इति संकल्पे दानवाक्ये च विशेषोन्यत्सर्वं पूर्ववत्

इति तिलाचलदानं

---

## तिळांच्या पर्वताचें दान.

तिळांच्या पर्वताचें दान.

" पद्मपुराणांत " हे राजश्रेष्ठा ! दहा द्रोणा एवढ्या तिळांचा पर्वत उत्तम होय, पांच द्रोणांचा मध्यम आणि तीन द्रोणांचा कनिष्ठ सांगितला आहे. पारिजातादिवृक्ष आणि विष्कंभ पर्वत वगैरे सर्व पूर्वी प्रमाणें समजावें. " मंत्र "

यस्मान्मधुवधेविष्णो र्देहस्वेदसमुद्भवाः ।
तिलाःकुशाश्च माषाश्च तस्माच्छन्नो भवत्विह ।
हव्यकव्येषु यस्माच्च तिलैरेवाभिरक्षणं ।
भवानुद्धर शैलेंद्र तिलाचल नमोऽस्तुते ।

" दानवाक्य "—अद्येत्यादि० सकलपापक्षयदीर्घायुष्यपुत्रपौत्रसमान्वितभोगानंतरपितृदेवगंधर्वलोकपूज्यमानत्वपूर्वकद्युलोकगमनानंतरमक्षय्यवैष्णवपदप्राप्तिकाम " ह्या प्रमाणें संकल्पांत आणि

दान वाक्यांत विशेष फरक समजावा. बाकी सगळें पूर्वी प्रमाणें समजावें.

ह्या प्रमाणें तिळांच्या पर्वताचें दान सांगितलें.

---

अथार्धोदयव्रते तिलपर्वतदानं

" स्कांदे "

पूर्वाण्हे संगमे स्नात्वा शुचिर्भूत्वा समाहितः ।
सर्वपापविशुध्यर्थं नियमस्थो भवेन्नरः ।
नियममंत्रस्तु त्रिदैवत्यं व्रतं देवाः करिष्ये भुक्तिमुक्तिदं ।
भवंतु सन्निधौ मेघ त्रयोदेवास्त्रयोग्नय इति तथा
ब्रम्हविष्णुमहेशानां सौवर्णीः पलसंख्यया ।
प्रतिमास्तु प्रकर्तव्या स्तदर्धेन द्विजोत्तम ।
सार्ग्रं शतत्रयं शंभो द्रोणानां तिलपर्वतः ।
कर्तव्यः पर्वतोविष्णोर्ब्रम्हणः पूर्वसंख्यया ।
शय्यात्रयं ततः कुर्यादुपस्करसमन्वितं ।
संपूज्य विप्रवर्येभ्यो दत्वोप्सितमवाप्नुयादिति

" अथास्य दानप्रयोगः "

यजमानः कृतनित्यक्रियः पुण्यकाले तीर्थादौ स्नात्वा चम्य " अद्येत्यादि० ममेप्सितफलवाप्रये मेरुदानसमफलवाप्तये वार्धोदयेतिलपर्वतदानं करिष्ये इति संकल्प्य वेदपारगान्ब्राम्हणान् वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य ततास्तिलपर्वते ब्रम्हादीनां प्रतिमा स्वर्ण-

मयाः संस्थाप्य षोडशोपचारैः संपूज्य ब्रम्हादीनामंग-पूजां कूर्यात् तद्यथा नमो विश्वसृजे तुभ्यं सत्याय पर-मात्मने।

देवाय देवपतये यज्ञानां पतये नमः।

ॐ ब्रम्हणे नमः पादौ पूजयामि इत्यक्षतगंधपुष्पाणि च प्रक्षिपेत् ॐ हिरण्यगर्भाय० उरू० ॐ परमात्मने० जानुनी० ॐवेधसे न० जंघे पू०ॐ पद्मोद्भवाय० गुह्यं पूज० ॐहंसवाहनाय० कटी० ॐ शतानंदाय० वक्षः पू० ॐसावित्रीपतये नमः बाहू पू० ॐऋग्वेदाय० पूर्व-वक्त्रं पू० ॐयजुर्वेदाय० दक्षिणवक्त्रं पू० ॐसामवेदाय० पश्चिमवक्त्रं पू० ॐअथर्वणवेदाय० उत्तरवक्त्रं पू० ॐ चतुर्वक्त्राय० वक्त्राणि पू० ॐहंसाय० नेत्राणि पू० ॐ कमलासनाय० शिरांसि पू० ॐलोकेशाय० सर्वांगं पू० ततोलोकपालान्परितस्तत्तन्मंत्रैः पूजयेत् ततो

" विष्णवंगपूजा "

हिरण्यरूप पुरुष प्रधानाव्यक्तरूपधृक्।

प्रसीद सुमुखानंत पूजां स्वीकुरु प्राकृतां इति प्रार्थ्य पूजयेत

ॐअनंताय० पादौ पूज० ॐविश्वरूपवते० उरू प० ॐमुकुंदाय० जानुनीपू० ॐ गोविंदाय० जंघेपू० ॐ प्रद्युम्नाय० गुह्यं पू० ॐपद्मनाभाय० नाभिंपू० ॐलंबो-दराय० उदरं पूज० ॐकौस्तुभवक्षसे न० वक्षः पू०

ॐचतुर्भुजाय० बाहू पू० ॐविश्वमुखाय० मुखं पू० ॐ सहस्रशिरसे० शिरांसि पू० ॐसर्वेश्वराय० सर्वांगं पू० ततः

" शिवांगपूजा "

आदित्यचंद्रनयन दिग्वासोदैत्यसूदन ।
पूजां दत्तां मया भक्त्या गृहाण करुणाकरेति

" तथा "

महेश्वर महेशान नमस्ते त्रिपुरांतक ।
जीमूतकेशाय नमो नमस्ते वृषभध्वजेति आद्यमंत्रेण संप्रार्थ्य द्वितीयेन नत्वा पुजयेत् ॐईशानायः पादौ पू० ॐ शंकराय० उरू पू० ॐ उमाकांताय० गुह्यंपू० ॐ नीललोहिताय न० नाभिं पू० ॐकृत्तिवाससे० उदरं पू० ॐनागयज्ञोपवीतिने० बाहू पू० ॐ पंचवक्त्राय० वक्त्राणि पू० ॐत्रिलोचनाय० नेत्राणि पू० ॐ रुद्राय० शिरः पू० ॐविश्वेश्वराय न० सर्वांगं पूज० इत्यंगपूजा ततः पंचामृताद्युपचाराः पीठं छत्रं कमंडलुश्वेतवस्त्रयुगं ब्रम्हणे पीतांबरद्वयं विष्णवे लोहितवस्त्रयुगं शंकराय कमलैस्तुलसीपत्रै बिल्वपत्रैश्च क्रमेण संपूज्य ततो ब्रम्हविष्णुशिवानां नाममंत्रेण क्रमेणाष्टोत्तरशतं तिलैर्घृताक्तैर्हुत्वा गामेकां दद्यात् ततस्तिलपर्वतं प्रतिमा त्रयं शय्यात्रय च दद्यात् संकल्पोक्तफलं संकीर्त्य गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे नममेति

" मंत्रो तु "

यस्मा न्मधुवधे विष्णो र्देहस्वेदसमुद्भवाः ।

तिलाः कुशाश्च माषाश्च तस्माच्छन्नो भवत्विह ।

हव्यकव्येषु यस्माच्च तिलैरेवाभिरक्षणं ।

भवानुद्धर शैलेंद्र तिलाचल नमोस्तुते अन्यत्सर्वं तिलाचलदानवत्कुर्यात् यत्किंचिद्दीयते दानं मेरुतुल्यं तु तद्भवेदिति तथाचात्र दानावशेषोनिर्णयामृते

" स्कादे "

चतुःषष्टिपलं मुख्यममत्रं तत्र कारयेत् तत्रः अर्धोदये चत्वारिंशत्पलं वापि पंचविंशति मेव तत्तु कांस्यमयमुक्तं " तत्रैव "

एवं सुघटितं कार्यं कांस्यभाजनमुत्तमामिति

" स्कांदे "

निधाय पायसं तत्र पद्ममष्टदलं लिखेत् ।

पद्मस्य कर्णिकायां तु कर्षमात्रं सुवर्णकं ।

तदभावे तदर्धं वा तदर्धं वापि कारयेत् ।

कृत्वा तु तंदुलैः शुक्लैः पद्ममष्टदलं भुवि ।

अमत्रं स्थापयेत्तत्र ब्रम्हविष्णुशिवात्मकं ।

तेषां पूजा ततः कार्या श्वेतमाल्यैस्तुशोभनैः ।

वस्त्रादिभिरलंकृत्य ब्राम्हणाय निवेदयेदिति अद्येत्यादि० ससमुद्रसमग्रसम्यक्पृथ्वीदानसमफलावाप्तिकामोगोत्राय शर्मणे सालंकृताय इदं पायसपूरितं कांस्यपात्रं अष्टदलपद्मस्थितं ससुवर्णं वस्त्रादिभिरलं कृतं ब्रम्हाविष्णुशिवात्मकं विष्णुदैवत्यं तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

सुवर्णपायसामत्रं यस्मादेतत्त्रयीमयं ।
आवयोस्तारकं यस्मात्तद्गृहाणद्विजोत्तमेति
" कांस्यपात्रदानफलमुक्तं स्कांदे "

समुद्रमेखलां पृथ्वीं सम्यक्दातुश्च यत्फलं तत्फलं
लभते मर्त्यः कृत्वा दानमपत्रकमिति अमत्रं पात्रं
इत्यर्धोदये तिलाचलदानं कांस्यपात्रदानंच

---

## *अर्धोदयव्रताचें दिवशीं तिळांच्या पर्वताचें दान.

अर्धोदयाचे दिवशीं तिळांच्या पर्वताचें दान करणें.

" स्कंदपुराणांत " मनुष्यानें +पूर्वाण्हांत ×नदी वगैरेच्या सं-गमांत स्नान करून शुद्ध होऊन स्वस्थ मन ठेवून सर्व पापांपासून शुद्धि हो-ण्या करितां +व्रतस्थ रहावें. त्याविषयींचा मंत्र—

---

* पौष किंवा माघ ह्या महिन्याची अमावास्या, रविवार, श्रवण नक्षत्र आणि व्यतीपात ह्यांनीं युक्त असली तर ह्या योगाला अर्धोदय पर्व म्हणतात, सूर्याच्या कोटी ग्रहणां एवढें त्याचें फळ आहे.

+ दिवसाचे तीन भाग करावे. पहिल्या भागास पुर्वाण्ह दुसऱ्यास माध्यान्ह व तिसऱ्यास अपराण्ह म्हणतात.

× दोन नद्या ज्या ठिकाणीं एकत्र मिळतात अथवा नदी समुद्रास ज्या ठिकाणीं मिळते त्या भागास " संगम " म्हणतात.

+ व्रता संबंधी जे मौनादि नियम सांगितले आहेत ते पाळावे.

त्रिदैवत्यं व्रतंदेवाःकरिष्ये भुक्तिमुक्तिदं ।
भवंतु सन्निधौमेद्य त्रयोदेवास्त्रयोऽग्रयः "

" तसेंच " हे ब्राम्हणश्रेष्ठा ! ब्रम्हा, विष्णु आणि शंकर ह्यांच्या पळा पळा एवढ्या प्रतिमा कराव्या. इतरांच्या अर्ध्या पळा एवढ्या प्रतिमा कराव्या. शंकराचा तीनशेंएक द्रोणा एवढा तिळांचा पर्वत करवा. तेवढेच विष्णु आणि ब्रम्हदेव ह्यांचें पर्वत करावे. नंतर शय्येच्या सर्व सामग्रीनें युक्त अशा तीन शय्या कराव्या. नंतर श्रेष्ट ब्राम्हणांचें पूजन करून त्यांस त्याचें दान केल्यानें दान करणाऱ्याला इच्छिलेल्या फळाची प्राप्ती होईल.

तिळ पर्वताच्या दानाचा प्रयोग.

" ह्याच्या दानाचा प्रयोग "—यजमानानें नित्यकर्म आटोपून पुण्यकारक अशा काळीं तिर्थादिकांत स्नान करून धौत वस्त्रें परिधान करून आचमन करून "अद्येत्यादि०" ममेप्सितफळावाप्तये (किंवा) मेरुदानसमफलावाप्तये अर्धोदये तिलपर्वतदानं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून पूर्णवेद शिकलेल्या ब्राम्हणांस बोलावून त्यांचें आपल्या सामर्थ्या प्रमाणें वस्त्रें अलंकार वगैरेंनीं पूजन करून नंतर तिळांच्या पर्वतावर ब्रम्हादिकांच्या सोन्याच्या प्रतिमा स्थापन करून आवाहन, आसनादि सोळा उपचारांनीं त्यांचें पूजन करून ब्रम्हादिकांची अंगपूजा करावी. ती अशी--

" नमो विश्वसृजे तुभ्यं सत्याय परमात्मने ।
देवाय देवपतये यज्ञानां पतयेनमः "

ह्या प्रमाणें प्रार्थना करून नंतर " ॐ ब्रम्हणेनमः पादौ पूजयामि " असें म्हणून गंध, अक्षता व फूल हीं वाहावीं. ह्या प्रमाणें ॐ हिरण्यगर्भाय० उरू० ॐ परमात्मने० जानुनीपू० ॐ वेधसेन० जंघेपू० ॐ पद्मोद्भवाय० गुह्यं पू० ॐ हंसवाहनाय० कटी पू० ॐ शतानंदाय० वक्षः पू० ॐ सावित्रीपतयेनमः बाहू पू० ॐ ऋग्वेदाय० पूर्ववक्त्रं पू० ॐ यजुर्वेदाय० दक्षिणवक्त्रं पू० ॐ सामवेदाय० पश्चिमवक्त्रं पू० ॐ अथर्वणवेदाय० उत्तरवक्त्रं पू० ॐ चतुर्वक्त्राय० वक्त्राणि पू० ॐ हंसाय० नेत्राणीपू० ॐ कमलासनाय० शिरांशी पू० ॐ लोकेशायनमः सर्वांगं पूजयामि" या प्रमाणें अंग पूजा करून नंतर ह्याच्या भोंवतीं भासपास असलेल्या लोकपालांचें त्या त्या मंत्रानीं पूजन करावें. नंतर विष्णुची अंगपूजा करावी. ती अशी—

हिरण्यरूप पुरुष प्रधानाव्यक्तकामधृक्
प्रसीद सुमुखानंत पूजांस्वीकुरु मत्कृतां "

ह्या प्रमाणें प्रार्थना करून पूजन करावें—ॐ अनंतायनमः पादौ पूजयामि ॐ विश्वरूपवतेन० उरु पूज० ॐ मुकुंदायनमः जानुनी पू० ॐ गोविंदाय० जंघे० पु० ॐ प्रद्युम्नाय० गुह्यं० पू० ॐ पद्मनाभाय० नाभिं पू० ॐ लंबोदरायन० उदरं पूज० ॐ कौस्तुभवक्षसेन० वक्षः पू० ॐ चतुर्भूजाय० बाहू पू० ॐ विश्वमुखाय० मुखं पू० ॐ सहस्त्राशिरसे० शिरांशी० पू० ॐ सर्वेश्वराय० सर्वांगं पूजयामि " ह्या प्रमाणें विष्णुची अंगपूजा करून नंतर शंकराची अंग पूजा करावी ती अशी—

आदित्य चंद्रनयन दिग्वासो दैत्यसूदन ।
पूजां दत्तां मयाभक्त्या गृहाण करुणाकर

" तसेंच "

महेश्वर महेशान नमस्ते त्रिपुरांतक ।
जीमूतकेशाय नमोनमस्ते वृषभध्वज "

ह्या दोन मंत्रांपैकीं पहिल्या मंत्रानें प्रार्थना करून दुसऱ्यानें नमस्कार करून पूजन करावें तें असें—ॐ ईशानाय० पादौ पू० ॐ शंकरायन० उरूपू० ॐ उमाकांताय० गुह्यं पू० ॐ नीललोहिताय० नाभिं पू० ॐ कृत्तिवाससेन० उदरं पू० ॐ नागयज्ञोपवीतिने० बाहू पू० ॐ पंचवक्त्राय० वक्त्राणि पू० ॐ त्रिलोचनाय० नेत्राणि पू० ॐ रुद्राय० शिरः पूजयामि ॐ विश्वेश्वरायनमः सर्वांगं पूजयामि " ह्याप्रमाणें अंगपूजा करून सर्वांस पंचामृतादि उपचार द्यावे. आसन, छत्री, कमंडलु, दोन पांढरीं वस्त्रें हीं ब्रम्हदेवास, दोन पिंवळीं वस्त्रें विष्णुस, व दोन तांबडीं वस्त्रें शंकरास अर्पण करून कमळें, तुळशीचीं पानें आणि बेलाचीं पानें ह्यांनीं क्रमानें त्यांचें पूजन करून नंतर ब्रम्हा, विष्णु व शिव ह्यांच्या नाममंत्रानें क्रमानें एकशेंआठ वेळ तुपानें युक्त अशा तिळांनीं हवन करावें. होमाच्या शेंवटीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें एक गाय द्यावी, नंतर तिळांचा पर्वत, तीन प्रतिमा आणि तीन शय्या ह्यांचें दान करावें तें असें—संकल्पांत सांगितलेल्या फळाचा उच्चार करून "गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून दान करावें.

" मंत्र "--

यस्मान्मधुवधेविष्णो देहस्वेद समुद्भवाः ।
तिलाः कुशाश्च माषाश्च तस्मात्च्छन्नो भवात्विह ।
हव्यकव्येषु यस्माश्च तिलैरेवाभि रक्षणं ।
भवानुद्धर शैलेंद्र तिलाचल नमोस्तुते ।

दुसरें सगळें तिळांच्या पर्वताच्या दानाप्रमाणें करावें. ह्या अर्धोदय योगाचे दिवशीं जें थोडकेंही दान करण्यांत येतें तें मेरूचें दानासारखें होतें.

तसेंच ह्या अर्धोदययोगावर दानाचा विशेष प्रकार "निर्णयामृतांत" आहे तो:- स्कंदपुराणांतील प्रकार ह्या अर्धोदयावर चौसष्ट पळां एवढ्या वजनाचें पात्र करावें हें मुख्य होयकिंवा चाळीस पळांचें अथवा पंचवीस पळांचें करावें.तें पात्र कांशाचे करावें असें त्यांतच सांगितलें आहे ह्या प्रमाणें कांशाचे पात्र उत्तम घडलेलें असें करावें. " स्कंदपुराणांत " त्यांत पायस ( खीर ) ठेवावें. त्याच्या खालीं आठ पाकळ्यांचें कमळ काढावें कमळाच्या कर्णिकेंत एक कर्षा ऐवढें सोनें ठेवावें. इतकें ठेवण्यास अशक्य असल्यास त्याहून अर्धें अथवा त्याचेही अर्ध्या एवढें असावें. तें आठ पाकळ्यांचें कमळ पांढऱ्या तांदुळांचें करावें नंतर त्याच्या कर्णिकेंत सोनें ठेऊन त्यावर ब्रम्हा, विष्णु व शंकर हे ज्याचा आत्मा ( शरीर ) आहे असें तें कांशाचें पात्र ठेऊन नंतर पांढऱ्या फुलांनीं त्यांचीं पूजा करून सुशोभित अश

अर्धोदयावर पायसानें भरलेल कांशाचें पात्र दान करणें.

वस्त्रादिकांनीं त्यांस भूषित करून ब्राम्हणास त्याचें दान करावें. तें असें-- " अद्येत्यादि० ससमुद्रसमग्रसम्यकूपृथ्वीदानसमफला-वाप्तिकामोगोत्राय शर्मणे सालंकृताय इदं पायसपूरितं कांस्यपात्रं अष्टदळपद्मास्थितं ससुवर्णं वस्त्रादिभिरलं कृतं ब्रम्हाविष्णुशिवात्मकं विष्णुदैवत्यं तुभ्यमहं संप्रददे नमम " ह्या प्रमाणें संकल्प करून दान करावें. " दानाचा मंत्र "

सुवर्णपाय सामत्रं यस्मादेत त्त्रयीमयं ।
आवयोस्तारकं यस्मात्तद्गृहाण द्विजोत्तम "

कांशाच्या पात्राच्या दानाचें फळ " स्कंदपुराणांत " सांगितलें तें असें– समुद्र जिची मेखला ( मर्यादा ) आहे अशा पृथ्वीचे उत्तम प्रकारानें दान केल्यानें त्यास जे फळ मिळेल तें फळ मनुष्याला कांशांचे पात्राचें दान केल्या पासून मिळतें.

ह्या प्रमाणें अर्धोदयावर तिळांच्या पर्वताचें दान
आणि कांशाच्या पात्राचें दान सांगितलें.

---

## अथ कार्पासाचलदानं

" पाद्मे "

कार्पास पर्वतस्तद्वद्विंशद्भारैरिहोदितः ।

दशभिर्मध्यमः प्रोक्तः कनिष्ठः पंचभिः स्मृतः अल्पधनोभारैकेन वा कुर्यात् विधिस्तु धान्यपर्वतवत् दानं तु प्रभातायां शर्वर्यां अरुणोदये सूर्योदयात् प्राक् नाडीच-

तुष्टयमध्यइत्यर्थः अद्येत्यादि० सकलपापक्षयोत्तराकल्परुद्रलोकनिवासानंतरं भूलोकराज्यकामइति संकल्पे दानवाक्ये च वदेत्

" मंत्रस्तु "

त्वमेवावरणं यस्माल्लोकानामिह सर्वदा ।

कार्पासाचल तस्मात्त्वमघौघध्वंसनो भवेति

इति कार्पासाचलदानं

---

## कापसाच्या पर्वताचें दान.

कापसाच्या पर्वताचें दान.

" पद्मपुराणांत " वीस भाराएवढ्या कापसाचा पर्वत श्रेष्ठ होय. दहा भारांचा मध्यम, व पांच भारांचा कनिष्ठ होय. ज्याचेजवळ द्रव्य कमी असेल त्यानें एक भाराचा पर्वत करावा. विधितर धान्याचे पर्वताप्रमाणेंच जाणावा. दान करणें तें सूर्योदयाचे पूर्वी चार घटिकांच्या आंत करावें. " अद्येत्यादि० सकलपापक्षयोत्तराकल्परुद्रलोकनिवासानंतरं भूलोकराज्यकाम " ह्याप्रमाणें संकल्पांत आणि दानवाक्यांत म्हणावें. " दानाचा मंत्र "--

" त्वमेवावरणं यस्माल्लोकानामिह सर्वदा ।

कार्पासाचल तस्मा त्त्वमघौघध्वंसनोभव "

ह्याप्रमाणें कापसाच्या पर्वताचें दान सांगितलें.

अथ घृताचलदानं

" पाद्मे "

विंशत्या घृतकुंभानामुत्तमः स्याद्घृताचलः ।

मध्यमस्तु तदर्धेन तदर्धेनाधमः स्मृतःइति अल्पवित्त स्तु द्वाभ्यां वापि कुर्वीतेति विष्कंभादिपर्वतश्चतुर्थांशेन कार्याः " कुंभः पलसहस्रात्मक इत्युक्तं

" दानविवेके "

घृतकुंभः पात्र एव शालितंदुलपूर्णपात्राणि कुंभाना मुपरि निवेशयेत् अहतशुक्लवस्त्रैरावेष्टयेत् इक्षुदंडफलान्वितः अन्यत्सर्वं धान्यपर्वतवद्बोध्यं उदयात् प्राक्घटिकाचतुष्टयमध्ये दद्यात्

" अद्येत्यादि० " सकलपापक्षयपूर्वकहंससारसयुक्तकिंकिणीजालमाल्यर्कवर्णविमानकरणकशंकरलोकगमनपूर्वकसिद्धचारणविद्याधरार्चितत्वविशिष्टपितृसहितभूतसंप्लवविचरणकाम इति संकल्पे दानवाक्ये च वक्तव्यं

" मंत्रौतु "

संयोगाद्घृतमुत्पन्नं यस्मादमृततेजसः ।
तस्माद्घृताच्च विश्वात्मा प्रीयतां मम शंकरः ।
यच्च तेजोमयं ब्रम्ह घृते नित्यं प्रतिष्ठितं ।
घृतपर्वतरूपेण तस्मान्नः पाहि भूधरेति

इति घृताचलदानं

"पद्मपुराणांत" वीस तुपाच्या कुंभांचा पर्वत श्रेष्ठ होय. त्याच्या अर्ध्यायेवढा (दहांचा) मध्यम आणि त्याच्या अर्ध्याएवढा (पांचांचा) कनिष्ठ होय. ज्याचेजवळ द्रव्य कमी असेल त्यानें दोन कुंभांचा पर्वत करावा. विष्कंभादिक पर्वत मुख्य पर्वताच्या चतुर्थांशाएवढे करावे. हजार पळांचा कुंभ असावा असें "दानविवेकांत" आहे. तुपाचा कुंभ हा पात्ररूपच असावा. तांदुळांनीं भरलेलीं पात्रें कुंभांवर ठेवावीं आणि नंतर त्यांस कोऱ्या अशा पांढऱ्या वस्त्रांचें वेष्टन करावें. तसेंच ऊंस, फळें वगैरे ह्यांनीं युक्त असावें. दुसरें सगळें धान्याचे पर्वताप्रमाणें जाणावें. त्याचें दान सूर्योदयाचे पूर्वीं चार घटिकांचे आंत करावें.

तुपाच्या पर्वताचें दान.

"आद्येत्यादि० सकलपापक्षयपूर्वक हंससारसयुक्त किंकिणीजालमाल्यर्कवर्णविमानकरणक शंकरलोकगमनपूर्वक सिद्धचारणविद्याधरावैतत्वविशिष्ट पितृसहित भूतसंप्लवाविचरणकाम:" असें संकल्पांत आणि दानवाक्यांत म्हणावें. "दानाचे मंत्र"

दानाचा संकल्प.

संयोगाद्घृत मुत्पन्नं यस्मादमृततेजस: ।
तस्माद्घृताच्चविश्वात्मा प्रीयतां मम शंकर: ।
यच्चतेजोमयंब्रम्ह घृते नित्यं प्रतिष्ठितं ।
घृतपर्वतरूपेण तस्मान्न: पाहिभूधरे"

ह्या प्रमाणें तुपाच्या पर्वताचें दान सांगितलें.

अथ रत्नाचलदानं

" पाद्मे "

अथातः संप्रवक्ष्यामी रत्नाचलमनुत्तमं ।

मुक्ताफलसहस्रेण पर्वतः स्यादिहोत्तमः ।

मध्यमः पंचशतिकस्त्रिशतश्चाधमः स्मृतः ।

चतुर्थांशेन विष्कंभादयः वज्रगोमेदैः पूर्वे मंदरः ।

इंद्रनीलैः पद्मरागयुतैर्दक्षिणे गंधमादनः ।

वैडूर्यविद्रुमैः पश्चाद्विपुलाचलः ।

ससुवर्णैः पद्मरागैः सुपार्श्वउत्तरे इति दानवाक्यं तु अद्येत्यादि० अनेकजन्मकृतब्रम्हहत्यादिपापक्षयोत्तराम-रेश्वरपूजितत्वपूर्वकसाग्रकल्पशतावधिविष्णुलोकनिवासानंतरं आयुरारोग्यरूपगुणोपेतसप्तद्वीपाधिपत्यकाम इति संकल्पे दानवाक्ये च वक्तव्यं

" मंत्रौ तु "

यथा देवगणाः सर्वे रत्नेष्वेव व्यवास्थिताः ।

त्वं च रत्नमयोनित्यमतः पाहि सदाचल ।

यस्माद्रत्नप्रसादेन वृष्टिं प्रकुरुते हरिः ।

रत्नाचलप्रसादेन तस्मान्नः पाहि पर्वतेति अन्यत्सर्वं धान्यपर्वतवत्

इति रत्नाचलदानं

## रत्नांच्या पर्वताचें दान.

"पद्मपुराणांत" आतां ह्या नंतर ज्याचे पेक्षां दुसरा उत्तम नाहीं अशा रत्नांच्या पर्वताचे दाना॰ विषयीं मी सांगतों. तें असें:-हजार मोत्यांचा पर्वत उत्तम, पांचशांचा मध्यम आणि तीनशांचा कनिष्ट होय. मुख्य पर्वताच्या चतुर्थांशा एवढे मंदरादि विष्कंभ पर्वत करावे. हिरे आणि गोमेद ह्यांच्या योगानें पूर्वेस "मंदर" करावा. पद्मराग आणि इंद्रनील ह्यांनीं दक्षिणेस गंधमादन करावा. पश्चिमेस वैडूर्य आणि पोंवळीं ह्यांच्यां योगानें विपुलाचल करावा.सोन्यानें युक्त अशा पद्मरागानीं उत्तरेस सुपार्श्व करावा.

रत्नांच्या पर्वताचें दान.

"दानाचा संकल्प" अद्येत्यादि० अनेकजन्मकृतब्रम्ह॰ हत्यादि पापक्षयोत्तराप्रदेश्वर पूजितत्व पूर्वक साग्रकल्पशतावधि विष्णुलोक निवासानंतरं आयुरारोग्य रूपगुणोपेत सप्तद्वीपाधित्य कामः असें संकल्पांत आणि दान वाक्यांत म्हणावें.

"मंत्र"—

यथा देवगणाः सर्वे रत्नेष्वेव व्यवस्थिताः ।
त्वं च रत्नमयोनित्यमतः पाहि सदाचल ।
यस्माद्रत्नप्रसादेन वृष्टिं प्रकुरुते हरिः ।
रत्नाचलप्रसादेन तस्मान्नः पाहि पर्वत "

दुसरें सगळें धान्याचे पर्वता प्रमाणें समजावें.

ह्या प्रमाणें रत्नांच्या पर्वताचें दान सांगितलें.

अथ रौप्याचलदानं

" पाद्मे "

दशभिः पलसाहस्रैरुत्तमोरजताचलः ।
पंचभिर्मध्यमः प्रोक्तस्तदर्धेनाधमः स्मृतः ।

अत्यशक्तौ विंशतिपलादूर्ध्वं कुर्यात् विष्कंभादयस्तु तुरीयांशेनेति अन्यत्सर्वं धान्यपर्वतवत् ।

" दानवाक्यं तु "

अद्येत्यादि० सकलपापक्षयपूर्वकदशसहस्रगोदानसमफलावाप्तिपूर्वकगंधर्वाप्सरोगणपूज्यमानत्वाविशिष्टवैभवेन यावदाभूतसंप्लवसोमलोकनिवासकाम इति संकल्पे दानवाक्ये च वक्तव्यं

" मंत्रस्तु "

पितॄणां वल्लभं यस्माद्धर्मेंद्रोः शंकरस्य तु ।
रजतं पातु तस्मान्नः शोकसंसारसागरादित

इति रौप्याचलदानं

---

रुप्याच्या पर्वताचें दान.

रुप्याच्या पर्वताचें दान.

" पद्मपुराणांत " दहा हजार पळां एवढ्या रुप्याचा पर्वत उत्तम होय. पांच हजार पळांचा मध्यम आणि अडीच हजार पळांचा कनिष्ट होय. द्रव्य खर्च करण्या विषयीं अगदींच सामर्थ्य नस-

त्यास वीस पळापेक्षां अधिक पळांचा पर्वत करावा. विष्कंभ पर्वत चतुर्थांशानें करावा. दुसरें सर्व धान्याचे पर्वता प्रमाणे जाणावें. " +दान वाक्यांत " अद्येत्यादि० सकलपापक्षय पूर्वक दशसहस्र गोदान समफलावाप्तिपूर्वक गंधर्वाप्सरोगणपूज्यमानत्व विशिष्ट वैभवेनयावदाभूतसंप्लव सोमलोकनिवासकामः " असें संकल्पांत आणि दान वाक्यांत म्हणावें. " दानाचा मंत्र "

पितॄणांवल्लभं यस्माद्धर्मेंद्रोः शंकरस्यतु ।
रजतंपातु तस्मान्नः शोकसंसारसागरात् ।

ह्या प्रमाणें रुप्याच्या पर्वताचें दान सांगितलें"

---

## अथ शर्कराचलदानं

" पाद्मे "

अष्टभिः शर्कराभारैरुत्तमः स्यान्महाचलः ।
चतुर्भिर्मध्यमः प्रोक्तस्तदर्धेनाधमः स्मृतः ।

भारेण ह्यल्पवित्तोऽपि भारार्धेनापि वा पुनः चतुर्थांशेन विष्कंभादयः मंदारपारिजातकल्पवृक्षादयोहैमा एव पूर्ववत् पूर्वपश्चिमे हरिचंदनसंतानौ प्रसङ्मुखः कामदेवो मंदरे धनद उदङ्मुखोगंथमादने प्राङ्मुखा वेदमूर्ति र्विपुलाचले ।

---

+ दान देतांना जो उच्चार करण्यांत येतो त्यास " दानवाक्य " म्हणतात.

हैमि सुपार्श्वे दक्षिणामुखी सुरभी अन्यत्सर्वं धान्य-पर्वतवत्

" अद्येत्यादि० सकलपापक्षयानंतरं कल्पशतावधि विष्णुलोकनिवासानंतरं सप्तद्वीपाधिपत्योत्तरं जन्मायुतं यावदविच्छिन्नायुरारोग्यकाम इति संकल्पे दानवाक्ये च वक्तव्यं मंत्रास्तु आरोग्यामृतसारोयं परमः शर्कराचलः ।

तन्ममानंदकारीत्वं भव शैलेंद्र सर्वदा ।
अमृतं पिबतां ये तु निपेतु र्भुवि सीकराः ।
देवानां तत्समुत्थोयं पाहिनः शर्कराचल ।
मनोभव धनुर्मध्यादुद्भूता शर्करा यत ः।

तन्मदोऽसि महाशैल पाहि संसारसागरादिति सर्वत्र ब्राम्हणभोजनं शक्त्या कार्यमेव तदा पूर्वेद्युः कृतोपवासः परेद्यु र्दानानंतरमक्षारलवणं भुंजीत एवं प्रसन्नचित्तो-दानं दद्यादिति

इति शर्कराचलदानं

इति दशाचलदानानि

---

## साखरेच्या पर्वताचें दान.

साखरेच्या पर्वताचें दान.

" पद्मपुराणांत " आठ भाराएवढ्या साखरेचा पर्वत उत्तम, चार भारांचा मध्यम आणि दोन भारांचा कनिष्ठ होय. ज्याचेजवळ द्रव्य

कमी असेल त्यानें एक भाराचा किंवा अर्ध्या भाराचा पर्वत करावा. मुख्य पर्वताच्या चतुर्थांशाएवढें विष्कंभादि पर्वत करावे. मंदार, पारिजात, कल्पवृक्ष वगैरे हे पूर्वीप्रमाणें सोन्याचेच करावे. पूर्वेकडेस हरिचंदन आणि पश्चिमेकडे सेतान असावा. मंदर पर्वतावर पूर्वेकडे तोंड केलेला कामदेव असावा. गंधमादनावर उत्तरेकडे तोंड केलेला असा कुबेर करावा. विपुल पर्वतावर पूर्वेकडे तोंड केलेली वेदाची मूर्ति करावी. सुपार्श्वावर दक्षिणेकडे तोंड केलेली सोन्याची सुरभी ( कामधेनु ) करावी. दुसरें सगळें धान्याचें पर्वताप्रमाणें जाणावें.

दानाचा संकल्प.

अद्येत्यादि० सकलपापक्षयानंतरं कल्पशतावधि विष्णुलोकनिवासानंतरं सप्तद्वीपाधिपत्योत्तरं जन्मायुतं यावदविच्छिन्नायुरारोग्यकामः"

असें संकल्पांत आणि दानवाक्यांत म्हणावें.

"दानाचे मंत्र"

आरोग्यामृत सारोयं परमः शर्कराचलः ।
तन्ममानन्दकारीत्वं भवशैलेन्द्र सर्वदा ।
अमृतं पिबतांयेतु निपेतु र्भुविसीकराः ।
देवानां तत्समुत्थोयं पाहिनः शर्कराचल ।
मनोभव धनुर्मध्या दुद्भूता शर्करायतः ।
तन्मयोपि महाशैल पाहि संसार सागरात् ।

सर्व धान्यादि पर्वतांच्या दानांत ब्राम्हणभोजन आपले शक्तीप्रमाणें अवश्य करावें. आणि पूर्वदिवशीं यजमानानें उपवास क-

रून दुसरे दिवशीं दान केल्यानंतर खार आणि मीठ ह्यावांचून भोजन करावें. प्रसन्न आहे अंतःकरण ज्याचें अशा यजमानानें ह्या प्रमाणें दान करावें.

ह्या प्रमाणें साखरेच्या पर्वताचें दान सांगितलें.

### ह्या प्रमाणें धान्य इत्यादि दहा पदार्थांच्या पर्वतांचीं दानें सांगितलीं

---

### अथ शिखरदानानि

" विष्णुधर्मे "

गुडेक्षुवस्त्रलवणधान्यकाजाजिशर्करा ।
खजूरतंडुलाद्राक्षाक्षौद्रं मलयजेन च ।

फलैर्मनोहरैश्चैव शिखराणि प्रदापयेत् माघे मार्गशीर्षे वैशाखे रोहिणीयुतायां तृतीयायां प्रोष्ठपदशुक्लतृतीयायां च दद्यात् शिखरप्रमाणं तु आत्मसमप्रमाणं प्रादेशाभ्यधिकं शरीरार्धप्रमाणं सप्रादेशं शरीरप्रमाणं वा

" अथास्य दानप्रयोगः "

उक्तकाले यजमानः कृतनित्यक्रियः पूर्वाण्हे अद्येत्यादि० दुःखदौर्भाग्याभावपूर्वककल्पकोटिशतत्रयावच्छिन्नगौरीभवननिवासानंतरं पृथ्वीपतित्व कामः श्वोगुडशिखरदानमहं करिष्ये इति संकल्प्य गणेश-

पूजनादिनांदीश्राद्धांतं कृत्वा आचार्यवरणादि यथा विभवं वस्त्रालंकारादिभिर्मधुपर्कपूजांतं कृत्वा गोमयेनोपलिप्तायां भुवि इक्षुपत्राण्यास्तीर्य मूले द्विहस्तविस्तारं उपरि हस्तमात्रविस्तारं इक्षुदलमय कुसूलं कृत्वा तदभ्यंतरे रक्तवस्त्रेणावेष्टय गुडादिदेयद्रव्येणापूर्व उपरि इक्षुपत्रकरकमास्तीर्य तत्र क्षौमादिवस्त्रोपरि शरदिंदुवर्णाभां चंद्रमौलिं पद्मासनाक्षसूत्रकमंडलु परदाभयकरां हैमीं गौरीं सशिखरां सूत्रेणावेष्टय कुंकुमादिना पूजयेत् अथांगपूजा ॐ भवान्यै न० पादौ पू० ॐ कामिन्यै न० जानुनीपू० ॐ कामदेव्यैन० उरूपू० ॐ जगच्छ्रियै न० नाभिंपू० ॐ आनंदायैन० हृदयं पू० ॐ नंदायै न० स्तनौपू० ॐ शस्त्रास्त्रधारिण्यै न० बाहु पू० ॐ शितिकंठायै कंठं पू० ॐ सुमुखायै न० मुखं पू० ॐ त्रिलोचनायै० नेत्राणि पू० ॐ चंद्रशेखरायै न० भालं पू० ॐललितायै० शिरः पू० ॐसर्वात्मिकायैनमः सर्वांगं पूजयामि इत्यं गपूजा " ततोऽजलिना पुष्पाण्यादाय प्रदक्षिणीकृत्य पठेत् "

यस्मान्निवासः पार्वत्याः शिखरत्वं सुरैर्वृतं ।

तस्मान्मां पाहि भगवद्गौरी तिष्ठति सर्वदेति पुष्पांजलिं समर्प्य नमस्कृत्य गीतवाद्यनिर्घोषै र्जागरणं कुर्यात् ततः प्रभाते स्नानादि कृतनित्यक्रियः शिखरपश्चिमभागे प्राङ्मुख उपाविश्य अद्येत्यादि० संकल्पोक्त

फलं संकीर्त्य गोत्राय शर्मणे इदं गुडशिखरं गौरीप्रतिमासहितं सोपस्करं तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात् ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात् भूयसिं च दत्वा ब्राम्हणान्संभोज्य तद्दिने क्षीरं घृतं वा वाग्मतोमुक्तकेशस्तूष्णीं प्राश्नीयात् इक्षुवस्त्रादिशिखरपदस्थाने संकल्पादौ तत्तत्पदं तत्र तत्रवक्तव्यमिति विशेषः अन्यत्सर्वं पूर्ववदिति

इति गुडशिखरदानं

इति नानाशिखरदानानि

---

## शिखरांचीं दानें

शिखरांचीं दानें.

" विष्णुधर्म पुराणांत " गूळ, ऊंस, वस्त्रें, मीठ, धनें, जिरें, साखर, खजूर, तांदूळ, द्राक्षें, मध, मळयागिरी चंदन आणि नानाप्रकारचीं मनोहर फळें ह्यांच्या योगानें शिखरांचीं दानें करावीं. माघ आणि भाद्रपद शुक्ल तृतिया ह्या दिवशीं शिखरांचीं दानें करावीं. शिखराचें प्रमाण—दात्याच्या शरीराचे उंची एवढें, किंवा प्रादेशापेक्षां अधिक अथवा शरीराच्या निमपटीएवढें किंवा प्रादेशानेंयुक्त अशा शरीराच्या उंचीएवढें असावें.

चिखरांच्या दानाचा प्रयोग.

ह्याच्या दानाचा प्रयोग—यजमानानें वर सांगितलेल्या दिवशीं पूर्वाण्ह्यांत* नित्य कर्म आटोपून आचमन करून " अद्येत्यादि० दुःख

---

* दिवसाच्या तीन भागांपैकीं, जो पहिला भाग तो पूर्वाण्ह होय.

दौर्भाग्याभावपूर्वक कल्पकोटिशतत्रयावच्छिन्न गौरीभवन निवासानंतरं पृथ्वीपतित्व कामःश्वोगुडशिखर दानमहं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून गणपतीचे पूजेपासून नांदी श्राद्धा पावेतों कर्म करून आचार्याचें वर्णन व त्याचें आपले शक्तीप्रमाणें वस्त्रें, अलंकार वगैरेनीं मधुपर्क पावेतों पूजन करून शेणानें सारविलेल्या भुईवर उंसांचीं पानें पसरून मूळांत ( बुंधाशीं ) दोन हात विस्ताराचे व्यासाचे आणि वर एक हात विस्ताराचें असें उंसांच्या पानांचें कुंसूल+ करून त्याचे आंतील भाग तांबड्या वस्त्रानें वेष्टून त्यांत गूळ, इत्यादि जें द्रव्य द्यावयाचें तें त्यांत भरून वर उंसांच्या पानांचा तट्टया पसरून त्यावर रेशिम इत्यादि वस्त्रांवर शरदृतूंतील चंद्राप्रमाणें शोभणारी, चंद्र जिच्या मुगुटावर आहे, पद्माचें आहे आसन जिला अशी अक्षसूत्र ( माळा ) कमंडलु, वरद आणि अभय हीं जिच्या हातांत आहेत अशी सोन्याची गौरीची प्रतिमा बसवून तिला शिखरासह सुतानें गुंडाळून तिची कुंकुमादिकांनीं पूजा करावी, नंतर अंगपूजा करावी ती अशी—ॐ भवान्यै नमः पादौ पूजयामि ॐ कामिन्यै० जानुनी पू० ॐ कामदेव्यैन० उरू पूज० ॐ जगच्छ्रियै० नाभिंपू० ॐ आनंदायै० हृदयं पू० ॐ नंदायै० स्तनौ पू० ॐ शस्त्रास्त्रधारिण्यै० बाहू पू० ॐ शितिकंठायै० कंठं पू० ॐ सुमुखायै० मुखं पू० ॐ त्रिलोचनायै० नेत्राणि पू० ॐ चंद्रशेखरायैन० भालं पू० ॐ ललितायै० शिरः पूज० ॐ सर्वात्मिकायै नमः सर्वांगं पूजयामि " ह्या प्रमाणें अंग पूजा करून नंतर अंजलींत फुलें घेऊन प्रदक्षिणा करून

---

+ कणगी.

" यस्मान्निवासः पार्वत्याः शिखरत्वं सुरैर्वृतं !

तस्मान्मां पाहि भगवद्गौरी तिष्ठति सर्वदा "

हा मंत्र म्हणून देवीस पुष्पांजलि समर्पण करून नमस्कार करून गीत वाद्य ह्यांच्या घोषांच्या योगानें जागरण करावें. नंतर दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं यजमानानें स्नानादि नित्य कर्म करून शिखराच्या पश्चिमेकडे पूर्वेकडेस तोंड करून बसून " अद्येत्यादि॰ संकल्पोक्तफलं संकीर्त्य गोत्राय शर्मणे इदं गुडशिखरं गौरीप्रतिमासहितं सोपस्करं तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्या प्रमाणें संकल्प करून दान करावें. नंतर सोनें दक्षिणा द्यावी. नंतर ब्राम्हणांस दक्षिणा देऊन त्यांस जेवण घालून त्या दिवशीं स्वतः वाणीविषयीं नियम करून केश मोकळे सोडून दूध किंवा तूप कोणाशीं न बोलतां प्यावें. ऊस, वस्त्रें इत्यादिकांच्या " शिखर " ह्या पदाच्या ठिकाणीं संकल्पाच्या पूर्वी तें तें पद त्या त्या ठिकाणीं योजावें हा विशेष प्रकार होय, दुसरें सर्व पूर्वीप्रमाणेंच समजावें.

ह्या प्रमाणें गुळाच्या शिखराचें दान सांगितलें.

ह्याप्रमाणें नाना प्रकारच्या शिखरांचीं दानें सांगितलीं.

---

अथ समस्तपापक्षयकरं त्रिशूलदानं

" कर्मविपाकसारे "

श्रुताध्ययनसंपन्नं पावितारमकिंचनं ।
ब्राम्हणं दानमाहूय दानार्थं न ददाति यः ।
मनुष्याणां हिंसकश्च जठरे शूलवान्भवेत् ।

" वायुपुराणे "

कृष्णपक्षे चतुर्दश्या मष्टम्यां वा सितेतरे ।
कुर्याद्द्वादशनिष्केण त्रिशूलं लक्षणान्वितं ।
निष्कः चतुष्कसौवर्णिकः सौवर्णमात्रः ।
षट्पंचाशदधिकशतद्वयपलमूल्यो वा ।
नाभौ निधाय संपूर्णं तिलानां ताम्रनिर्मितं ।
पात्रमाढकमानं स्यात्तत्र शूलं न्यसेत्पुनः ।

ततः शैवपंचाक्षरेण रुद्रप्रकाशकवैदिकमंत्रेण त्रिशूलाय नमः इति नाममंत्रेण वा त्रिशूलं संपूज्य हैमं विरूपाक्षं कमलोपरि संपूज्य अघोरेभ्यो० इति मंत्रेण पूजांते प्रणिपत्य ततो विप्रं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य अद्येत्यादि० मम बुद्ध्यबुद्धिपूर्वककायवाङ्मनः कृतकर्माद्याजन्मार्जितान्यजन्मोपार्जित मनुष्यहिंसनदानार्थाहूतब्राम्हणनिराकरणजन्योदरशूलजनितपीडापनोदकाम इदं स्वर्णमयत्रिशूलं विरूपाक्षप्रतिमायुतं सोपस्करं गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रास्तु "

भगवन्भगनेत्रघ्नदक्षयज्ञप्रमर्दन ।
तवायुधप्रदानेन पापं नश्यतु शंकर ।
युगांते येन लोकानां त्वमंतक विनाशनः ।
विदग्धस्तत्सापापेन पापौघं च व्यपोहय ।

येन दग्धं क्षणार्धेन त्रिपुरं सुरदुर्जयं ।
तेन पाशुपतेनाशु मम शूलं विनाशय ।
मंदबुद्धिकृतं पापं मनोवा कायचाक्षुषं ।
तत्सर्वं क्षयमभ्येतु शूलदानप्रभावतइति ततः सुवर्ण परिमितां दक्षिणां दत्वा द्विजभोजनसंकल्पं विधायभूयसीं दत्वा कर्मेश्वरार्पणं कुर्यात्

इति त्रिशूलदानं

---

## सर्व पापाचा नाश करणारें त्रिशूलाचें दान.

सर्व पापाचा नाश करणारें त्रिशूलाचें दान.

" कर्मविपाकसारांत " जो शास्त्राच्या अध्ययनानेंयुक्त, पवित्र दरिद्री, व इंद्रियांचें दमन करणारा अशा ब्राम्हणास दानाकरितां बोलावून त्यास दान देत नाहीं आणि जो मनुष्यांची हिंसा* करितो त्याचे पोटांत शूल§ रोग होईल. " वायु पुराणांत " कृष्णपक्षांतील चतुर्दशीस किंवा अष्टमीस बारा निष्कांचा लक्षणांनींयुक्त असा त्रिशूल करावा. निष्क चार सुवर्णांचा− किंवा एक सुवर्णाचा अथवा दोनशेंछपन्न पणांचा‡ समजावा. सोळा आसांचें एक चक्र काढून त्या च-

---

* मनुष्यांच्या वृत्तीचा नाश करतो किंवा द्रव्य चोरतो अथवा वध करतो.

§ पोटदुखी.

− एक कर्षाएवढ्या सोन्यास " सुवर्ण " म्हणतात. ऐंशी गुंजांचा एक कर्ष होतो.

‡ पैसा.

ऋाच्या नाभीवर ( मध्य केंद्रावर ) दोनशें छपन्न कर्षांएवढ्या वजनाचें तांब्याचें पात्र तिळांनीं पूर्ण भरलेलें ठेऊन त्यावर सोन्याचा त्रिशूळ ठेवावा. नंतर त्याचें शिवाच्या पंचाक्षरी+ मंत्रानें अथवा वेदांतील शंकराच्या मंत्रानें किंवा "त्रिशूलायनमः" ह्या नाममंत्रानें त्रिशूळाची पूजा करून नंतर कमळावर असलेल्या सोन्याच्या शंकराच्या प्रतिमेची पूजा करून " अघोरेभ्यः " ह्या मंत्रानें पूजेच्या शेवटीं नमस्कार करून नंतर ब्राम्हणास वरण देऊन त्याची आपले सामर्थ्याप्रमाणें वस्त्रें व अलंकार ह्यांच्या योगानें पूजा करून " अद्येत्यादि० मम बुद्धिपूर्वक कायवाङ्मनःकृतकर्मव्याजन्मार्जितान्यजन्मजन्मोपार्जितमनुष्यहिंसनदानार्थाहूत-ब्राम्हणनिराकरणजन्मोदरशूलजनितपीडापनोदकाम इदं स्वर्णमय त्रिशूलं विरुपाक्ष प्रतिमायुतं सोपस्करं गोत्रायशर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून दान द्यावें.

" दानाचा मंत्र "

भगवन्भगनेत्रघ्न दक्षयज्ञ प्रमर्दन ।
तवायुध प्रदानेन पापं नश्यतु शंकर ।
युगांते येन लोकांनां त्वमंतक विनाशनः ।
विदग्धस्तत्स्वपापेन पापौघंच व्यपोहय ।
येनदग्धं क्षणार्धेन त्रिपुरं सुरदुर्जयं ।
तेन पाशुपतेनाशु मम शूलं विनाशय ।
मंदबुद्धि कृतं पापं मनोवाक्काय चाक्षुषं ।
तत्सर्वं क्षयमभ्येतु शूलदान प्रभावतः "

---

+ नमः शिवाय हा पंचाक्षरी मंत्र.

नंतर सुवर्णाएवढी दक्षिणा देऊन ब्राम्हणभोजनाचा संकल्प करून ब्राम्हणांस भूयसी देऊन सर्व कर्म ईश्वरास अर्पण करावें.

ह्याप्रमाणें त्रिशूळाचें दान सांगितलें.

---

अथ दारिद्र्यहरं कुबेरमूर्तिदानं

" वायवीये "

दरिद्रोजायते मर्त्योदाने विघ्नं करोति यः ।
ऐश्वर्यं जायते येन कर्मणा तच्छृणुष्व मे ।
पलार्धेन तदर्धेन चतुर्थांशेन वा पुनः ।

अत्र सार्धमाषद्वयादारभ्य पंचाशन्माषावधि वा वित्तशाठ्यराहित्येन पुष्पकविमानस्थां कुबेरमूर्तिं पार्श्वयोः पद्मशंखाकारयुतां कृत्वा शुभेन्हि अद्येत्यादि० ममेह जन्मनि पूर्वजन्मनि वा दानविघ्नजनितदारिद्र्यविनाशपूर्वकयथेप्सितधनप्राप्त्यर्थं कुबेरमूर्तिदानं करिष्ये इति संकल्प्य गोमयोपलिप्ते द्विचतुरेकद्रोणतंदुलराशौ कुबेरप्रतिमां राजाधिराजेति संपूज्य तत आग्नेय्यां स्वगृह्यविधिनाग्निं प्रतिष्ठाप्य समिदाज्यचरुभिः प्रत्येकमष्टोत्तरशतं राजाधिराजायेति मंत्रेण हुत्वा तत्संख्यया घृताक्ततिलैर्व्याहृतिभिश्च हुत्वा कुबेरमूर्तिं दद्यात्

" अद्येत्यादि० ममेह जन्मनि जन्मांतरे वा कृतदानविघ्नजनिततीव्रदारिद्र्यविनाशपूर्वकं; यथेप्सितधन-

प्राप्त्यर्थं च इमां कुबेरमूर्तिं पुष्पकविमानस्थां पार्श्वमो पद्मशंखकारयुतां सोपस्करां गोत्राय शर्मणे सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रास्तु "

उत्तराशापते देव कुबेर नरवाहन ।
पद्मशंखनिधीनां त्वं पतिः श्रीकंठवल्लभः ।
दानविघ्नान्मया प्राप्तं दारिद्र्यं मम दुःखदं ।
तत्सर्वं तव दानेन पापमाशु विनाशयेति देयद्रव्य-

तृतीयांशं चतुर्थांशं वा सुवर्ण दक्षिणां दद्यादिति विशेषः ततो ब्राम्हणभोजनं संकल्प्य भूयसीं दक्षिणां दद्यात्

इति दारिद्र्यहरं कुबेरमूर्तिदानं

---

## दारिद्र्याचा नाश करणारें कुबेराच्या मुर्तीचें दान

दारिद्र्याचा नाश करणारें कुबेराच्या मुर्तीचे दान.

" वायुपुराणांत " ज्या कर्माच्या योगानें मनुष्याचें ऐश्वर्य नाहींसें होतें तें सांगतों ऐक. जो मनुष्य दानांत विघ्न करतो तो दरिद्री होतो. अर्ध्या पळाची किंवा एक कर्षाची किंवा चार माशांची प्रतिमा करावी. म्हणजे अडीच माशां पासून पन्नास मासे पावेतों सोन्याची द्रव्याचें ठिकाणीं कृपणता न ठेवतां पुष्पक नांवाच्या विमानांत बसलेली दोन्ही बाजूस कमळ आणि शंख ह्यांनीं युक्त अशी कुबेराची मूर्ति करून

शुभ दिवशीं " अद्येत्यादि० ममेह जन्मनि पूर्वजन्मनि वा दान-विघ्नजनितदारिद्र्यविनाशपूर्वकयथेप्सितधनप्राप्त्यर्थं कुबेरमूर्ती दानं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून शेणानें सारविलेल्या भूमि-वर चार, दोन किंवा एक द्रोणा एवढ्या तांदुळांच्या ढिगल्यांवर कुबेराच्या प्रतिमेची " राजाधिराज " ह्या मंत्रानें पूजा करून नंतर त्याच्या अग्नेयी दिशेस आपल्या गृह्यसूत्रांत सांगितल्या प्रमाणें अग्नीची स्थापना करून समिधा, चरु (भात) व तूप ह्या तीन द्रव्यांनीं प्रत्येकीं राजाधिराजाय " ह्या मंत्रानें एकशें-आठ वेळ हवन करून तितक्याच संख्ये एवढें घृतानें युक्त अ-शा तिळांनीं व्याहृतींच्या योगानें हवन करून नंतर कूबेरमूर्ति द्यावी.

दानाचा संकल्प.

अद्येत्यादि० ममेह जन्मनि जन्मांतरे वा कृतदानविघ्न-जनिततीव्रदारिद्र्यविनाशपूर्वकंयथेप्सितधनप्राप्त्यर्थं च इमां कुबेरमूर्ति पु-ष्पकविमानस्थांपार्श्वयोः पद्मशंखाकारयुतां सोपस्करां गोत्राय शर्मणे तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्या प्रमाणें दानाचा संकल्प करावा. " दानाचे मंत्र "

उत्तराशापतेदेव कुबेरनरवाहन ।<br>
पद्मशंख निधीनात्वं पतिःश्री कंठवल्लभः ।<br>
दानविघ्नान्मयाप्राप्तं दारिद्र्यं मम दुःखदं ।<br>
तत्सर्वं तव दानेन पापमाशु विनाशय ॥

दानांत देण्यांत येणाऱ्या द्रव्याच्या तृतीयांश किंवा चतुर्थांशाए-

वडी सोनें दक्षिणा द्यावी. इतका प्रकार विशेष होय. नंतर ब्राम्हण भोजनाचा संकल्प करून ब्राम्हणांस भूयसी दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें दारिद्र्याचा नाश करणारें कूबेरमूर्तिचें
दान सांगितलें.

---

### अथ उमामहेश्वरमूर्तिदानं

" भविष्ये "

अद्येο सशैलवतकाननसप्तसागरांतपृथ्वीदानसमफलावाप्तये इमामुमामहेश्वरमूर्तिं सालंकृतां सोपस्करां सोपकरणां गोत्राय शर्मणे तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

शिवशक्त्यात्मकं यस्माज्जगदेतच्चराचरं ।
तव दानेन मे वश्या पृथिवी स्यात्सुनिश्चला ॥
ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात्

इति उमामहेश्वरमूर्तिदानं

---

### उमामहेश्वराच्या मूर्तिचें दान.

उमामहेश्वराच्या मूर्तिचें दान

" भविष्यपुराणांतील " " अद्येत्यादिο " सशैलवनकाननसप्तसागरांतपृथ्वीदानसमफलावाप्तये इमामुमामहेश्वरमूर्तिं सालंकृतां सोपस्करां सोपकरणां गोत्राय शर्मणे तुभ्यमहं संप्रददे न मम"

ह्या प्रमाणें संकल्प करून उमामहेश्वराच्या मूर्तिचें दान करावें.

" दानाचा मंत्र "

शिवशक्त्यात्मकंयस्मा ज्जगदेतच्चराचरं ।
तवदानेन मे वश्या पृथिवीस्या त्सुनिश्चला ॥

नंतर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्याप्रमाणें उमामहेश्वराच्या मूर्तीचें दान होय.

---

## अथ लक्ष्मीनारायणमूर्तिदानं

" स्कांदे "

संकल्पादि पूर्ववत्

" मंत्रस्तु "

लक्ष्मीनिवासदेवेश शंखचक्रगदाधर ।
तव दानात्स्थिरा लक्ष्मीर्मद्गृहे स्यात्सदा ध्रुवं ॥

सुवर्णदक्षिणां दद्यात्

इति लक्ष्मीनारायणमूर्तिदानं

---

## लक्ष्मीनारायणाच्या मूर्तिचें दान.

लक्ष्मीनारायणाच्या मूर्तीचें दान.

" स्कंद पुराणांत " संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणेंच करावें. " दानाचा मंत्र " लक्ष्मीनिवास देवेश शंखचक्र गदाधर। तव दानात्स्थिरा-लक्ष्मी मद्गृहे स्यात्सदा ध्रुवं "

नंतर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्याप्रमाणें लक्ष्मीनारायणाच्या मूर्तिचें दान होय.

## अथ हरीहरमूर्तिदानं

संकल्पादि पूर्ववत्

" मंत्रस्तु "

शिवोनाम शिवः साक्षात्तथा नारायणोऽपि च ।
अस्य दानाद्धरिहरौ प्रसन्नौ स्तां सदा मम

---

## हरिहराच्या मूर्तिचें दान.

संकल्प वगैरे पूर्वींप्रमाणें करावें. " दानाचा मंत्र "—

हरिहराच्या मूर्तिचें दान.

" शिवोनाम शिवःसाक्षा त्तथा नारायणोऽपिच । अस्य दाना द्धरि हरौ प्रसन्नौ स्तां सदा मम "

ह्या प्रमाणें हरिहराच्या मूर्तिचें दान सांगितलें.

---

## अथ सूर्यमूर्तिदानं

" सूर्यारुणसंवादे "

संकल्पादि पूर्ववत्

" मंत्रस्तु "

ग्रहाणामाधिपः सूर्यः पद्महस्तः प्रभाकरः ।
अस्य दानेन सविता आयुःश्रीशांतिदोऽस्तु मे सुवर्णादि दक्षिणां दद्यात्

इति सूर्यमूर्तिदानं

## सूर्याचें मूर्तिचें दान.

" सूर्यारुण संवादांतील " संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करावें.

सूर्याच्या मूर्तिचें दान.

" दानाचा मंत्र "—ग्रहाणा मधिपः सूर्यः पद्महस्तः प्रभाकरः । अस्य दानेन सविता आयुःश्री शांतिदोऽस्तुमे " नंतर सोनें इत्यादि दक्षिणा द्यावी.

ह्याप्रमाणें सूर्याच्या मूर्तिचें दान सांगितलें.

---

## अथ गणपतिमूर्तिदानम्

" स्कांदे "

यमामनंति ईशाद्या विश्वनाथमुमासुतं ।
विघ्नेशरक्षप्रचुरं तुभ्यं दास्याम्यभीष्टदं ।
इति संप्रार्थ्य संकल्पादि कृत्वा दद्यात्

" मंत्रस्तु "

गणनाथो विघ्नहरो गौरीसूनु रभिष्टदः ।
अस्य दानेन मे शांतिः प्रसन्नोऽस्तु विनायक इति

इति गणेशमूर्तिदानं

---

## गणपतीच्या मूर्तिचें दान.

गणपतीच्या मूर्तिचें दान.

" स्कंद पुराणांत " " यमा मनंति ईशाद्या विश्वनाथ मुमासुतं । विघ्नेश रक्ष प्रचुरं तुभ्यं दास्याम्यभीष्टदं " ह्या मंत्रानें गणपतिची प्रार्थना करून संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करून दान द्यावें.

"दानाचा मंत्र"—

गणनाथो विघ्नहरो गौरीसूनुरभीष्टदः ।
अस्यदानेन मे शांतिः प्रसन्नोस्तु विनायक"

ह्याप्रमाणें गणपतीच्या मूर्तिचें दान सांगितलें.

---

अथ जगदंबिकामूर्तिदानं

"देवी पुराणे"

संकल्पादि पूर्ववत्

"मंत्रस्तु"

आदिमाया महाशक्ति र्विश्वमाता जगन्मयी ।
दानेनास्याः प्रसन्नास्तु सर्वदा मम शांभवी

इति जगदंबिकामूर्तिदानं

---

जगदंबिकेच्या मूर्तिचें दान.

"देवी पुराणांतील" संकल्प वगैरे पूर्वींप्रमाणें करावें.

जगदंबिकेच्या मूर्तिचें दान.

"दानाचा मंत्र"—आदिमाया महाशक्ति र्विश्वमाता जगन्मयी । दानेनास्याः प्रसन्नास्तु सर्वदामम शांभवी"

ह्याप्रमाणें जगदंबिकेच्या मूर्तीचें दान सांगितलें.

अथ सरस्वतीमूर्तिदानं

" वायवीये "

संकल्पादि पूर्ववत्

" मंत्रस्तु "

वीणापुस्तकसंयुक्ता वाङ्मूर्तिः समलंकृता ।
गृहाण त्वं द्विजश्रेष्ट वाक्सिद्धिरस्तु कुले ममेति

इति सरस्वतीमूर्तिदानं

---

सरस्वतीच्या मूर्तिचें दान.

" वायु पुराणांतील " संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करावें.

सरस्वतीच्या मूर्तिचें दान.

" दानाचा मंत्र "—वीणा पुस्तक संयुक्ता वाङ्मूर्तिः समलंकृता । गृहाणत्वं द्विजश्रेष्ठ वाक्सिद्धिरस्तु कुलेमम "

ह्याप्रमाणें सरस्वतीच्या मूर्तिचें दान सांगितलें.

---

अथ शालग्रामदानं

" हेमाद्रौ पाद्मे "

शालिग्रामाशिलाचक्रं योदद्याद्दानमुत्तमं ।
भूचक्रं तेन दत्तं स्यात्सशैलवनकाननं इति अद्येत्यादि० सशैलवनकाननभूचक्रदानसमफलकाम इमं

शालिग्रामं घंटाशंखादिसोपस्करणं तुलसीपत्राद्यर्चितं सवस्त्रफलं ताम्रादिपात्रे स्थितं यथाशक्ति सोपस्करं सालंकृतं गोत्राय शर्मणे सालंकृताय तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

महाकोशनिवासेन चक्राद्यैरुपशोभितः ।

शालग्रामप्रदानेन मम संतु मनोरथा इति सुवर्णं दक्षिणा सर्वत्र न राजतं ।

एवं संकल्पादि सर्वदेवमूर्तिशिलादानेष्वपि योजनीयं मणिः शालग्राम इति हेमाद्रिणा व्याख्यातं घोरप्रतिग्रहेषु च गणितमिति

इति शालग्रामदानं

---

## शालग्रामाचें दान.

शालग्रामाचें दान.

" हेमाद्रिंत पद्मपुराणांतील " जो मनुष्य शालग्रामाच्या शिळेचें दान करील, त्यानें पर्वत, वृक्षसमूदाय, अरण्यें ह्यांनीं युक्त असें भूमंडळ दिल्या सारखें होतें. " दानाचा संकल्प " " अद्येत्यादि" सशैलवनकाननभूचक्रदानसमफलकाम इदं शालिग्रामं घंटाशंखादिसोपकरणं तुलसीपत्राद्यर्चितं सवस्त्र फलं ताम्रादिपात्रे स्थितं थयाशक्ति सोपस्करं सालंकृतं गोत्राय शर्मणे सालंकृताय तुभ्यमहं

संप्रददेन मम " ह्या प्रमाणें संकल्प करून शालिग्रामाचें दान करावें. " दानाचा मंत्र "--

महाकोश निवासेन चक्राद्यै रुपशोभितः ।
शालग्राम प्रदानेन मम संतु मनोरथाः "

सर्व ठिकाणीं सोनें दक्षिणा द्यावी, रुपें देऊं नये. ह्याप्रमाणें संकल्प वगैरे सर्व देवांच्या शिळारूप मूर्तिंच्या दानाविषयीं योजावें. मणि म्हणजे शाळिग्राम अशी " हेमाद्रिनें " व्याख्या केली आहे आणि त्याच्या प्रतिग्रहाला भयंकर प्रतिग्रहांत गणलेलें आहे.

ह्याप्रमाणें शालिग्रामाचें दान सांगितलें.

---

## अथ शिवनाभिदानं

" लैंगे "

संकल्पादि पूर्ववत

" मंत्रस्तु "

शालग्रामशिला पुण्या भुक्तिमुक्तिप्रदायिनी ।
शिवनाभेः प्रदानेन पूर्णाः संतु मनोरथा इति

" तथा "

महाकोशनिवास त्वं शालग्राम महेश्वर ।
प्रीयतां तव दानेन ब्रम्हविष्णुमहेश्वराः

इति शिवनाभिदानं

## शिवनाभिचें दान.

" लिंगपुराणांत " संकल्प वगैरे पूर्वी प्रमाणें करावें.

शिवनामीचें दान.

" दानाचा मंत्र"—शालग्राम शि-लापुण्या भुक्तिमुक्ति प्रदायिनी । शिवनामे: प्रदानेन पूर्णा:संतुमनोरथा: । " तसेंच "

महाकोश निवासत्वं शालग्राम महेश्वर।
प्रीयतां तवदानेन ब्रम्हविष्णुमहेश्वरा: "

ह्या प्रमाणें शिवनामीचें दान सांगितलें.

---

### अथ लिंगदानं

" लैंगे "

संकल्पादि पूर्ववत्

" मंत्रस्तु "

सालंकारमहालिंगानिवासत्वं वृषभध्वज ।
प्रीयतां तव दानेन शिवो गौर्या युतस्तु मे इति

" तथा "

कैलासवासो गौरीशो भगवान् भगनेत्रभित् ।
चराचरात्मको लिंगरूपी दिशतु वांछितमिति रुद्राक्षमालासहितं लिंगं दद्यात् कोटिगुणं पुण्यं भवति

" अथ मारकतलिंगदानं "

" मंत्रस्तु "

इदं मारकतं लिंगंरौप्यपीठसमन्वितं ।
धान्यैर्द्वादशभिर्युक्तमेकादशफलान्वितं ।

संप्रदद्याद्विधानेन पृथ्वीदानफलं लभेत् इति रुद्राक्ष-मालायुक्तं संकल्पाद्युक्तमेव ।

काश्मीरलिंगदाने तु मारकतपदस्थाने काश्मीरपदं वदेत्

" मंत्रस्तु "

मृत्युंजयेश गौरीश सूनुभ्यां वृषवाहन ।
संप्रदानेन मे शंभो मम संतु मनोरथा इति

इति लिंगदानं

---

## लिंगाचें दान.

"लिंग पुराणांत" संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करावें.

लिंगाचें दान.

"दानाचा मंत्र"—सालंकार महा लिंग निवासत्वं वृषभध्वज । प्रीयतां तव दानेन शिवो गौर्या युतस्तुमे " तसेंच

कैलासवासो गौरीशो भगवन् भगनेत्रभित् ।
चराचरात्मको लिंगरूपी दिशतु वांछितं "

रुद्राक्षाच्या माळेसकट लिंगाचें दान केल्यानें कोटिगुणित पुण्य होतें.

"मरकताच्या* लिंगाचें दान" संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें समजावें. "मंत्रतर"–इदं मारकतं लिंगं रौप्यपीठ समन्वितं। धान्यैर्द्वादशभिर्युक्त मेकादश फलान्वितं। संप्रदद्या द्विधानेन पृथ्वीदान फलं लभेत्" रुद्राक्षाच्या माळेसकट मरकताचें लिंगाचे दानाचा संकल्प वगैरे सांगितलाच आहे. काश्मिराच्या लिंगाच्या दानाविषयीं तर "मारकत" ह्या पदाच्या ठिकाणीं काश्मीर असें पद लावावें. "दानाचा मंत्र"--

मरकताच्या लिंगाचें दान.

मृत्युंजयेश गौरीश सूनुभ्यां वृषवाहन।
संप्रदानेन मे शंभो ममसंतु मनोरथाः"

ह्याप्रमाणें लिंगाचें दान सांगितलें.

---

## अथ घंटादानं

"पाद्मे"

अद्येत्यादि० ममाकल्पघंटानादश्रवणलोकनिवासावाप्तिकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां घंटां विष्णुदैवत्यां तुभ्यमहं संप्रददे न ममेति

"मंत्रस्तु"

घंटादेवप्रिया नित्यं दैत्यत्रासकरी सदा।
संप्रदानेन चैतस्या विजयोऽस्तु सदा ममेति सुवर्णदक्षिणां दद्यात्

इति घंटादानं

---

* पांचेच्या लिंगाचें.

## घंटेचें दान.

" पद्मपुराणांत " " अद्येत्यादि० " ममाकल्प घंटानाद श्रवण लोकनिवासावाप्तिकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां घंटां विष्णु-

घंटेचें दान.

दैवत्यां तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करावा.

" दानाचा मंत्र "--

घंटा देवप्रिया नित्यं दैत्य त्रास करी सदा ।
संप्रदानेन चैतस्या विजयोऽस्तु सदा मम "

नंतर सोनें दक्षिणा द्यावी.

ह्याप्रमाणें घंटेचें दान सांगितलें.

---

### अथ शंखदानं

" पाद्मे "

अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इमं शंखं सुपूजिताय विष्णुदैवतं तुभ्य महं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

शंखः शुभकरो नित्यं सर्वमंगलदायकः ।
तस्मादस्य प्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति सुवर्णं दक्षिणां दद्यात्

इति शंखदानं

## शंखाचें दान.

शंखाचें दान.

" पद्मपुराणांत " " अद्येत्यादि० " गोत्राय शर्मणे इमं शंखं सुपूजिताय विष्णुदैवतं तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून दान करावें. " दानाचा मंत्र "–

शंखः शुभकरो नित्यं सर्व मंगलदायक ।

तस्मादस्य प्रदानेन शांतिरस्यु सदा मम "

नंतर दानाची सांगता होण्याकारितां सोनें दक्षिणा द्यावी.

ह्याप्रमाणें शंखाचें दान सांगितलें.

---

## अथ कालचक्रदानं

" मृत्युंजयकल्पे "

महामृत्युनिवारणार्थंकालचक्रदानमुक्तं संकल्पस्तु " अद्येत्यादि० शक्तितोरौप्यकृतं चंद्राकारमनेकमुक्तामालात्मकरश्मियुक्तं कालचक्रं विप्रायगंधालंकारादिभिः संपूजिताय महामृत्युनिवारणकाम स्तुभ्यमह संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

इदं मे राजतं चक्र मिंदुरश्मिसमाकुलं ।

अपमृत्युविनाशाय दत्तमायुर्विवृद्धये इति ततः सुवर्णं दाक्षिणां दत्वा अग्निं प्रतिष्ठाप्य ॐकालचक्रायनमः स्वाहे त्यनेन मंत्रेणाष्टोत्तरशतवारं घृताक्ततिलैर्हुत्वा पायसादिना द्वादश ब्राम्हणान् भोजयित्वा स्वयमक्षारलवणं सकृद्भुंजीतेति

## काळाच्या चक्राचें दान.

" मृत्युंजयकल्पांत " मोठ्या मृत्युपासून निवारण होण्याकरितां आपले शक्तीप्रमाणें रुप्याचें चंद्राच्या आकृतिप्रमाणें (वाटोळें)

काळाच्या चक्राचें दान.

असून मोत्यांच्या माळांच्या किरणांनीं युक्त अशा काळाचे चक्राचें दान सांगितलें आहे. " दानाचा संकल्प " अद्येत्यादि० शक्तितो रौप्यकृतं चंद्राकारमनेकमुक्तामालात्मकरश्मियुक्तं कालचक्रं विप्राय गंधालंकारादिभिः संपूजिताय महामृत्युनिवारणकामः तुभ्यमहं संप्रददे न मम " " दानाचा मंत्र "—

इदंमे राजतं चक्र मिंदुरश्मि समाकुलं ।
अपमृत्यु विनाशाय दत्तमायुर्विवृद्धये "

नंतर सोनें दक्षिणा देऊन गृह्यसूत्रांत; सांगितल्याप्रमाणें अग्निची प्रतिष्ठापना करून " ॐ कालचक्राय नमः स्वाहा " ह्या मंत्रानें एकशेंआठ वेळां घृतानें युक्त अशा तिळांनीं होम करून पायसादिकाच्या+ योगानें बारा ब्राम्हणांस भोजन घालून स्वतः त्या दिवशीं क्षार आणि मीठ ह्यांनीं रहित असें एक वेळां भोजन करावें.

ह्याप्रमाणें काळाच्या चक्राचें दान सांगितलें.

---

## अथापरं अपमृत्युहरं यममूर्तिदानं

" मृत्युंजयकल्पे "

---

+ क्षीर, दूधपाक इत्यादि दुधाच्या पदार्थांनीं.

लोहपात्रे स्थितं कांस्यं तत्र पद्मं तु राजतं ।
तस्मिन्काले श्वरः स्वर्णैः पुरुषाकारजां गतः ।

" तद्रूपं तु "—

ईषत्पीतो दंडहस्तो रक्तदृक् पाशहस्तकः ।
वस्त्रालंकारसंयुक्तोभयदास्त्राणि सर्वतः ।
त्रिलोहाकारपुरुषैः कालदूतैश्च पार्श्वतः ।
कृत्वा च माहिषे पृष्ठे तं दद्याद्यममालपन् ।
अष्टम्यां च चतुर्दश्यां करोति विधिवत्तु वः ।
समुच्यते ध्रुवं नाशात् दत्वा घृतघटोत्तरं

" इति दानमयूखे "

क्रुद्धोवस्त्रालंकृतः स्याद्रोगिणामभयप्रदः अलंकृतः स्वर्णालंकारैः त्रिलोहाकारैर्दूतै र्वृतः त्रिलोहं कांस्यताम्रपित्तलाख्यं पुरुषाकारैर्दूतै र्दंडहस्तैः कृत्वा यमं महिषपृष्ठे अष्टम्यां चतुर्दश्यां वा दद्यात् दक्षिणा तु घृतपूर्णोघटः सुवर्णं वा एवं कृत्वा दानेन नाशान्मुच्यते नाशोऽपमृत्युः

इत्यपमृत्युहरं यममूर्तिदानम्

---

## अपमृत्यु नाहींसें करणारें यमाच्या मूर्तिचें दान.

अपमृत्यु नाहींसें करणारे यमाच्या मूर्तिचें दान.

" मृत्युंजय कल्पांत " लोखंडाच्या पात्रांत कांशाचें पात्र ठेऊन त्यांत रुप्याचें कमळ ठेवून त्यावर पुरुषाच्या आकृति सारखा सोन्याचा यमाचा पुतळा करावा. त्याचें

स्वरूप असें:—वर्णानें किंचित् पिंवळा, हातांत दंड असलेला तांबडे ज्याचे नेत्र आहेत, ज्याच्या हातांत पाश (फास) आहे, वस्त्रें व सोन्याचें अलंकार ह्यांनीं युक्त, रागावलेला, रोग्यास अभय देणारा, ज्याच्या आजूबाजूस कांसें, तांबें व पितळ अशा तीन धातूंचे हातांत दंड असलेल्या पुरुषाच्या आकृतिच्या दूतांनीं युक्त असून रेड्याच्या पाठीवर बसलेला आहे असें यमाचें स्वरूप असावें, अशा यमाचें अष्टमीस किंवा चतुर्दशीस दान केल्यानें दान देणारा अपमृत्युपासून मुक्त होईल. ह्या दानांत तुपानें भरलेली घागर दक्षिणा द्यावी किंवा सोनें द्यावें.

ह्याप्रमाणें अपमृत्यु नाहींसें करणारें यमाच्या मूर्तिचें दान होय.

---

## अथ कालपुरुषदानं

" भविष्ये "

ज्ञेयोनिष्कशतं पार्थ दानेयं विधिरुत्तमः ।

मध्यमस्तु तदर्धेन तदर्धेनाधमः स्मृत इति अशक्तौ पंचसौवर्णिको वा ततोऽल्पेन ग्रहीता दुःखशोकावहःस्यात् चतुर्थ्यां चतुर्दश्यां भद्राकरणे वा दानं कुर्यात् कालपुरुषस्वरूपमाह रौप्यदशनं सौवर्णनेत्रं खड्गोद्यतकरं मांसपिंडयुतवामकरं जपाकुसुमकुंडलं रक्तवस्त्रस्रग्विणं शंखमालाधरं छुरिकायुतकटिदेशमतिदीर्घं कृष्णाजिनयुतं निर्माय अघोरयादि० अपमृत्युव्याधिसर्व बाधावि-

वारणाव्याहतैश्वर्यप्राप्तिधर्मश्रीपुत्रपौत्रादिकर्तृकराज्यांते परमपदावाप्तिकामः कालपुरुष दानमहं करिष्ये इति संकल्प्य कालपुरुषं संपूज्य विभूष्य द्विजं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य पुष्पांजलिं गृहीत्वा पठेत्

" सर्वं कलयसे यस्मा त्कालस्त्वं तेन चोच्यसे ।
ब्रम्हविष्णुशिवादीनां त्वमसाध्योऽसि सुव्रत ।
पूजितस्त्वं यथाभक्त्या प्रार्थितश्च यथासुखं ।

यद्बुध्यते तव विभो तत्कुरुष्व नमोस्तुते इति संप्रार्थ्य अद्येत्यादि० अपमृत्युव्याधी इत्यादि राज्यपरमपदावाप्तिकामांतं संकल्पोक्तवत्फलं संकीर्त्य गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमं कालपुरुषं सालंकृतं उक्तोपस्करं विष्णुदैवतं तुभ्यमहं संप्रददे न ममेति दत्वा पंचसुवर्णादूर्ध्वंमानिष्कशतं दक्षिणां दत्वा तं विसृज्य तन्मुखं नेक्षेन्न स्पृशेच्च ततः शांतापृथिवी शिवमंतरिक्षं इति जपित्वा हस्तौ पादौ प्रक्षाल्य आचम्य भूयसीं दक्षिणां दत्वा विप्रान्संभोज्य सुहृद्युतो भुंजीतेति अनेन विधिना वस्तु दानमेतत्प्रयच्छति । नापमृत्युभयं तस्यनचव्याधिकृतं भयं भवत्यव्याहतैश्वर्यः सर्वबाधाविवर्जित इति

इति हेमाद्रौ कालपुरुषदानं.

## कालपुरुषाचें दान.

काळपुरुषाचें दान.

" भविष्य पुराणांत " हे पार्था ! शंभर निष्क* हा दानाविषयीं उत्तम विधि होय. त्याच्या अर्ध्यानें ( पन्नासानें ) आणि त्याच्या अर्ध्यानें (पंचवीस निष्कांनीं) कनिष्ठ होय. फारच अशक्त असल्यास पांच कर्षाएवढ्या सोन्याचा काळपुरुष असावा. ह्याही-पेक्षां अल्प केल्यास त्या योगानें दान घेणाऱ्यास दुःख व शोक होतो. चतुर्थीस, चतुर्दशीस किंवा भद्रा करणावर ह्याचें दान करावें. काळ पुरुषाचें स्वरूप सांगतो:--ज्याचे रुप्याचे दांत आहेत, सोन्याचे ज्याचे डोळे आहेत, ज्यानें तरवार घेतलेला हात वर केला आहे, ज्याच्या डाव्या हातांत मांसाचा पिंड आहे, जास्वंदीच्या फुलांचीं ज्यास कुंडलें आहेत, ज्याचें तांबडें वस्त्र आहे, ज्यानें फुलांची व शंखाची माळा धारण केली आहे, ज्याचे कमरेस सुरी आहे, व जो फार उंच आहे अशा काळ-पुरुषास निर्माण करून त्यास हरणाच्या चामड्यावर बसवून नंतर यजमानानें आचमन करून " अद्येत्यादि० अपमृत्युव्याधि सर्वबाधानिवारणाव्याहतैश्वर्यप्राप्ति धर्म श्री पुत्रपौत्रादिकर्तृकरा-ज्यांते परमपदावाप्ति कामः कालपुरुषदानमहं करिष्ये " असा संकल्प करून काळपुरुषाची पूजा करून त्यास भूषणें ( अलं-

---

* निष्क शब्दाचा पळ असा अर्थ होतो, आणि चार कर्षांचें एक पळ होतें. म्हणून शंभर निष्कांचे चारशे कर्ष होतात. एका कर्षाच्या ऐंशीं गुंजा होतात. ( इतक्या सोन्याचा काळपुरुष करावा ).

कार ) घालून ब्राम्हणाचें वर्णन करून त्याचीं वस्त्रं, अलंकार वगैरेंनीं पूजा करून यजमानानें आपलें हातांत पुष्पें घेऊन म्हणावें—

सर्वं कलयसे यस्मा त्कालस्त्वं तेन चोच्यसे ।
ब्रम्हविष्णुशिवादीनां त्वमसाध्योऽसिसुव्रत ।
पूजितस्त्वं यथाभक्त्या प्रार्थितश्च यथासुखं ।
यद्बुध्यते तवविभो तत्कुरुष्व नमोस्तुते ”

ह्याप्रमाणें प्रार्थना करून पुष्पांजलि अर्पण करून आचमन करून “ अद्येत्यादि० ” “ अपमृत्यु व्याधि ” ह्यापासून तों “ राज्यांते परमपदावाप्ति काम ” पावेतों संकल्पांत सांगितल्याप्रमाणें फळाचा उच्चार करून “ गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमं कालपुरुषं सालंकृतं उक्तोपस्करं विष्णुदैवतं तुभ्यमहं संप्रददेन मम ” ह्याप्रमाणें उच्चार करून त्याचें दान करावें. नंतर दानाची सांगता होण्याकरितां पांच कर्षाएवढ्या सोन्यापासून तों शंभर कर्ष एवढ्या सोन्यापावेतों दक्षिणा त्या दान वेणाऱ्या ब्राम्हणास देऊन त्यास रजा द्यावी ( जाण्यास परवानगी द्यावी ). रजा देतांना त्याचें तोंड पाहूं नये आणि त्यास स्पर्शही करूं नये. नंतरा यजमानानें ( दात्यानें ) “ शांतापृथिवी शिवमंतरिक्ष ” हा मंत्र म्हणून हात आणि पाय धुऊन ब्राम्हणांस भूयासि दक्षिणा देऊन त्यांस भोजन घालून नंतर आपण इष्टमित्रांसह भोजन करावें. ह्या विधिप्रमाणें जो ब्राम्हणास काळपुरुषाचें दान करील त्याला अपमृत्युपासून आणि रोगापासून भय होणार नाहीं, आणि तो

ज्याचें ऐश्वर्य अकुंठित आहे असा होत्साता सर्व प्रकारच्या बाधांनीं रहित असा होतो.

ह्याप्रमाणें हेमाद्रितील काळपुरुषाचें दान सांगितलें.

---

### अथ सर्वसंपत्करदानं

" ब्रम्हपुराणे "

सूर्योपरागादिपुण्यकाले देवालयादिपुण्यदेशे गृहे वा कार्यं प्रातस्तिलकुशमिश्रोदकेन स्नात्वा कृतनित्याक्रियः आचम्य प्राणानायम्याद्येत्यादि० सर्वसंपदायुरारोग्यसमस्तपापनाशपुत्रपौत्रादिकुलवृद्धिस्वर्गनिवासमोक्षेष्टसिद्धिकामो मित्रादिप्रतिमादानमहं करिष्ये गुरूं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः पूजयेत् ततोविंशद्धस्तां चतुरस्त्रां भुवं गोमयेनोपलिप्य तत्र प्रागायताश्चतश्च उदगायताश्चतस्त्रोलेखा लिखित्वा तेषु नवकोष्टेषु द्रोणमिततंडुलान्निक्षिप्य तेषु नवकुंभान् संस्थाप्य वस्त्रैरावेष्टय तेषु सुवर्णत्रयादूर्ध्वं पलावधिसुवर्णनिर्मिता नव प्रतिमासंस्थाप्य पूजयेत् तत्र पश्चिमपंक्तौ उदक्संस्थं मित्रं वरुणं सोमं मध्यपंक्तौ ब्रम्हाणं चतुर्भुजं विष्णु उमापतिं चांत्यपंक्तौ दिवाकरं वृत्रहणं वन्हिं च ततोनव विप्रा न्संपूज्यैकस्मै अद्येत्यादि० संपदादिकामांतं संकल्पोक्तफलमुल्लिख्य गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां

मित्रप्रतिमां सुपूजितां तुभ्यमहं संप्रददे न ममेति दत्वा ततो वरुणसोमब्रम्हविष्णुशिवदिवाकरवृत्रहवन्हिप्रतिमाश्च ब्राम्हणेभ्यो दत्वा सुवर्णं दक्षिणां च तेभ्योदत्वा गुरवे देयद्रव्यसमं सुवर्णं वस्त्रयुगं च दद्यात् ब्राम्हणांश्च भोजयित्वा भूयसीं चदत्वा सुहृद्युतोभुंजीतेति

इति सर्वसंपत्करदानं

---

## सर्व संपत्ति देणारें दान.

सर्व प्रकारचीं संपत्ति देणारें दान.

"ब्रम्हांडपुराणांत" हें दान सूर्याचें ग्रहण इत्यादि पुण्यकारक अशा काळीं मंदीर वगैरे अशा पुण्यकारक स्थळांत किंवा घरीं करावें. दान करणारानें ज्या दिवशीं दान करावयाचें असेल त्या दिवशीं प्रातःकाळीं तीळ आणि दर्भ ह्यांनीं मिश्र अशा उदकानें स्नान करून नंतर संध्यादि नित्य कर्म करून आचमन व प्राणायाम करून " अद्येत्यादि० सर्वसंपदायुरारोग्य समस्तपापनाश पुत्रपौत्रादि कुलवृद्धि स्वर्गनिवास मोक्षेष्टसिद्धिकामो मित्रादि प्रतिमादान महं करिष्ये " ह्याप्रमाणें संकल्प करून आचार्यास वर्णन देऊन त्याचें आपल्या सामर्थ्याप्रमाणें वस्त्रें, अलंकार इत्यादिकांनीं पूजन करावें. नंतर वीस हात समचौरस अशा भूमीस शेणानें सारवून तिच्यावर पूर्व पश्चिम अशा चार आणि उत्तर दक्षिण चार अशा रेघा काढल्यानें नऊ कोष्टकें होतील. त्या नऊ कोष्टकांवर द्रोणपरिमित तांदूळ घालून ( पसरून ) त्यांवर नऊ कुंभ ( कलश ) स्थापन करून त्यांस

वस्त्रांनीं वेष्टन करून त्यांच्यावर तीन कर्षांपासून तों चार कर्ष पावेतों सोन्याच्या नऊ प्रतिमा स्थापन करून पूजा करावी ती अशी—पश्चिमेकडील तिन्ही पंक्तींतील तिन्ही कोष्टकांत दक्षिणेकडून उत्तरेकडे मित्र, वरुण आणि सोम; मधल्या पंक्तींत ब्रम्हा, चतुर्भूज असा विष्णु आणि शंकर; शेवटल्या पंक्तींत दिवाकर, वृत्रहा व अग्नि ह्याप्रमाणें नऊ देवतांचें प्रतिमांच्या ठिकाणीं पूजन करावें. नंतर आठ ब्राम्हणांची वस्त्रादिकांच्या योगानें पूजा करून त्यांपैकीं एकेकाला अद्येत्यादि पासून सर्व संपद् पासून तों सिद्धिकाम पावेतों पूर्वीं संकल्पांत केलेल्या फळाचा उल्लख करून " गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां मित्रप्रतिमां सुपूजितां तुभ्यमहं संप्रददेन मम " ह्याप्रमाणें मित्राच्या प्रतिमेचें दान करून नंतर प्रतिमा असतील त्यांच्याएवढें सोनें व त्याचप्रमाणें वरुण, सोम, ब्रम्हा, विष्णु, शंकर, सूर्य, वृत्रहा व अग्नि ह्यांच्या प्रतिमांचें दान ब्राम्हणांस करून त्यांस सोनें दक्षिणा देऊन नंतर आचार्यास देण्यांत येणाऱ्या द्रव्याएवढें सोनें आणि दोन वस्त्रें द्यावीं. नंतर ब्राम्हणांस भोजन घालून त्यांस भूयसी दक्षिणा देऊन नंतर इष्टमित्रांसह आपण जेवावें.

ह्याप्रमाणें सर्व प्रकारची संपत्ति देणारें दान सांगितलें.

---

### अथ कृष्णाजिनदानं

" सौरपुराणे "

कृष्णाजिनं च महिषी मेषी च दशधेनवः ।
ब्रम्हलोकप्रदायीन्यः तुलापुरुष एवचेति

" मात्स्ये "

वैशाखी पौर्णमासी च ग्रहणे शशि सूर्ययोः

पौर्णमासी तु यामाघे आषाढी कार्तिकी तथा ।

उत्तरायणं द्वादशी वा तस्यां दत्तं महाफलमिति

" अथास्य दानप्रयोगः "

पूर्वोक्तकाले गोमयेनोपलिप्ते देशे आविकं कबलं तदुपरि सशृंगं सखुरं प्राग्ग्रीवं कृष्णाजिन मास्तीर्य सुवर्णशृंगं रौप्यदंतं मौक्तिकपुच्छं सुवर्णनाभिं कृत्वा तदुपर्यररत्निप्रमाणां स्तिला न्संस्थाप्य वाससाच्छाद्य सगंधरत्नानि चत्वारि पात्राणि कांस्यानि घृतदुग्धदधिमधुयुतानि चत्वारि मृदश्च प्रागादि दिक्षु दानदेशाद्बहिश्चंपकशाखामव्रणं कुंभं च संस्थाप्य देशकालौ संकीर्त्य मम सप्तजन्मोपात्तपापनाशकामात्मपितृपुत्रापमृत्युपरिहारभार्याधनदेशाद्यवियोगकामः सकलेष्टफलावाप्तिब्रम्ह लोकावाप्तिकामश्च कृष्णाजिनप्रदानमहं करिष्ये इति संकल्प्य जीर्णपीतवाससा स्वांगानि प्रमृज्य

यानि कानि च पापानि मया लोभात्कृतानि च।

लोहपात्रप्रदानेन प्रणश्यं तु ममाशुवै इति मंत्रेण सति ललोहपात्रं कृष्णाजिनस्य वामपादे निवेशयेत् ।

" यानि कानि च पापानि कर्णोत्थानि कृतानि च ।

कांस्यपात्रप्रदानेन तानि नश्यंतु मे सदा "

इति मंत्रेण मधुमयं कांस्यपात्रं कृष्णाजिनस्य दक्षिणपादे निवेश्य

" परापवादपैशून्या दभक्ष्यस्य च भक्षणात् ।
यदुत्थितं तु मे पापं ताम्रपात्रा त्प्रणश्य तु इति मंत्रेण सतिलं ताम्रपात्रं वामहस्ते निवेश्य

" कन्यानृतं गवां चैव परदारप्रमर्शनं रौप्यपात्रप्रदानेन क्षिप्रं नाशं प्रयातु मे "

इति मंत्रेण मधुमयं रौप्यपात्रं दक्षिणहस्ते निवेश्य

" मया जन्मसहस्रेषु कृतं पापं प्रबुद्धिना ।
सुवर्णपात्रदानात्तन्नाशयाशु जनार्दन "

इति मंत्रेण साक्षतं हैमपात्रं मध्ये तथा हेममुक्ताविद्रुमदाडिममातुलिंगानि निधाय प्रशस्तपात्रे कर्णयोः संस्थाप्य द्विजं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य पुनर्देशकालौ संकीर्त्यामुकगोत्रोमुकशर्मा अहं मम समस्तजन्मोपात्तादि ब्रम्हलोकावाप्त्यंतमुक्त्वा गोत्राय शर्मणे सुपूजिताय तृप्ताय इदं कृष्णाजिनं यथाशक्ति सोपस्करं वृषभध्वजप्रीतये तुभ्यमहं संप्रददे न ममेति एतद्दक्षिणापरिमाणं

" गारुडे "

सुवर्णनिष्कशतं तदर्धं वा ततोन्यूनत्वेनाधिकफलं
" अस्पृश्यः सद्विजोराजन् चितिरूपस मोहिसः ।

दाने च श्राद्धकृत्ये च दूरतः परिवर्जयेत् इति गारुडे उक्त स्वगृहा त्प्रेष्यतं विप्रं मंगलं स्नानमाचरेदिति तद्वस्त्रं कुंभसहितं नीत्वा क्षेपं चतुष्पथे इति ततो भूयसीं

दक्षिणां दत्वाशिषो गृण्हीयात् दानेनानेन सकलारिष्टपापनाशो भूमिदानफलं चेति

" हेमाद्रिः "

होमादिविशेषस्तु ग्रंथांतरादवगंतव्यः

इति कृष्णाजिनदानं

---

## *कृष्णाजिनाचें दान.

काळ्या हरणाच्या चामड्याचें दान, त्याचें फळ आणि विधि.

"सौरपुराणांत" काळ्या हरणाचें चामडें, म्हैस, मेंढी, दहा प्रकारच्या +गाई आणि तुळा पुरुष ह्यांचीं दानें ब्रम्हलोकाची प्राप्ति करतात. " मत्स्य पुराणांत " वैशाख महिन्याची पौर्णिमा, चंद्र आणि सूर्य यांचीं ग्रहणें, माघ, आषाढ व कार्तिक ह्या महिन्यांच्या पौर्णिमा, उत्तरायण ( मकर आणि कर्क ह्या दोन संक्रांति ) व द्वादशी ह्या दिवशीं कृष्णाजिनाचें दान केलें असतां मोठें फळ मिळतें. " ह्याच्या दानाचा प्रयोग " पूर्वीं सांगितलेल्या दिवशीं शेणानें सारविलेल्या जमिनीवर मेंढ्याच्या लोकरीचा कांबळा पसरून त्यावर शिंगें व खुर ह्यांनीं युक्त असें काळ्या हरणाचें चामडें पूर्वेकडे तोंड केलेलें असें पसरून तें सोन्याचीं ज्याचीं शिंगें ( दोन ) आहेत, रुप्याचे ज्यास दांत आहेत, मोत्याचें ज्याचें पुच्छ ( शेंपूट )

---

* काळ्या हरणाच्या चामड्यास कृष्णाजिन म्हणतात.

\+ गूळ, तीळ वगैरे दहा पदार्थांच्या गाई पृ.     पहा.

आहे आणि सोन्याची ज्याची नाभि ( बेंबी ) आहे असें करून त्यावर =अरत्नि एवढें तीळ पसरून त्यांस वस्त्रानें आच्छादन करून त्याच्या पूर्वादि चार दिशांस काशांची चार पात्रें ज्यांत ×सुगंधी द्रव्य आणि रत्नें ठेवेलीं आहेत अशीं ठेवावीं आणि ज्यांत क्रमानें तूप, दूध, दहिं आणि मध हीं ठेवलेलीं आहेत अशीं चार मातीचीं भांडीं ठेवावीं. नंतर दानाच्या जागेच्या बाहेर चांफ्याच्या झाडाची फांदी आणि व्रणानेंरहित असा कुंभ ठेऊन नंतर यजमानानें आचमन करून देश व काल ह्यांचा उच्चार करून " मम सप्तजन्मोपात्त पापनाशकामात्म पितृपुत्रापमृत्युपरिहारभार्या धन दान देशाद्य वियोगकाम: सकलेष्टफलावाप्ति ब्रम्हलोकावाप्ति कामश्च कृष्णाजिन प्रदानमहं करिष्ये " ह्याप्रमाणें संकल्प करून जुन्या पिंवळ्या वस्त्रानें आपलीं अंगें पुसून नंतर

" यानिकानिच पापानि मयालोभा त्कृतानिच ।
लोहपात्र प्रदानेन प्रणश्यंतु ममाशुवै "

ह्या मंत्रानें तिळांनीं युक्त असें लोखंडाचें पात्र कृष्णाजिनाच्या डाव्या पायावर ठेवावें.

यानिकानिच पापानि कर्णोत्थानि कृतानि च ।
कांस्यपात्र प्रदानेन तानि नश्यंतु मे सदा "

ह्या मंत्रानें मधानें भरलेलें कांशाचें भांडें कृष्णाजिनाच्या उजव्या पायावर ठेवावें.

---

= करंगळी शिवाय बाकींचीं बोटें मिळून जें हाताचें मान होतें त्यास " अरत्नि " असें म्हणतात.

× कस्तुरी इत्यादि.

" परापवाद पैशून्याद भक्ष्यस्य च भक्षणात् ।

यदुत्थितंतुमे पापं ताम्रपात्रा त्प्रणश्यतु "

ह्या मंत्रानें तिळांनीं भरलेलें तांब्याचें भांडें कृष्णाजिनाच्या डाव्या हातावर ( पुढल्या डाव्या पायावर ) ठेवावें.

" कन्यानृतं गवांचैव परदार प्रमर्शन ।

रौप्यपात्र प्रदानेन क्षिप्रं नाशं प्रयातुमे "

ह्या मंत्रानें मधानें भरलेलें रुप्याचें भांडें कृष्णाजिनाच्या उजव्या हातावर ( पुढल्या उजव्या पायावर ) ठेऊन

" मयाजन्म सहस्त्रेषु कृतं पापं प्रबुद्धिना ।

सुवर्णपात्रदाना त्तन्नाशयाशु जनार्दन "

ह्या मंत्रानें अक्षतांनीं भरलेलें सोन्याचें भांडें मध्यभागीं ( कृष्णाजिनाच्या ) ठेवावें; तसेंच सोनें, मोतीं, पोंवळीं, डाळिंबें, व महाळुंगें ठेऊन दोन्ही कानांच्या ठिकाणीं प्रशस्त ( मोठीं ) भांडीं ठेऊन ब्राम्हणास वर्णन देऊन त्याची आपले सामर्थ्याप्रमाणें वस्त्रें व अलंकार इत्यादिकांनीं पूजा करून पुन्हा देश व काल ह्याचा उच्चार करून " अमुकगोत्रोऽमुक शर्मा अहं मम समस्त जन्मोपातक " ह्यापासून तों ब्रम्हलोकावाप्ति पावेतों उच्चार करून पुढें " गोत्राय शर्मणे सुपूजिताय तृप्ताय इदं कृष्णाजिनं यथाशक्ति सोपस्करं वृषभध्वजपितये तुभ्यमहं संप्रददे नमम " ह्याप्रमाणें दानाचा संकल्प, करून त्याचें दान करावें. ह्याच्या दक्षिणेचें प्रमाण " गरूड पुराणांत " शंभर निष्काएवढें सोनें ह्याची सांगता होण्याकरितां दक्षिणा द्यावी. ह्याच्यापेक्षां कमी दक्षिणा दिल्यानें अधिक फळ मिळत नाहीं. हें

राजा ! ज्यानें कृष्णाजिनाचें दान घेतलें असेल तो ब्राम्हण स्पर्श करण्यास अयोग्य होतो; कारण तो चितेच्या स्वरूपाचा असतो, म्हणून दान व श्राद्ध ह्याकामीं त्याला वर्ज्य करावा. त्या ब्राम्हणास आपले घरांतून बाहेर काढून त्याच्या मागें यजमानानें चालत जाऊन *चवाठ्यावर तें पूर्वीचें पिंवळें वस्त्र आणि घडा ठेवून आपण घरांत परत येऊन मंगलकारक स्नान करावें. नंतर ब्राम्हणास भूयसि दक्षिणा देऊन त्यांजपासून आशिर्वाद घ्यावे. ह्या कृष्णाजिनाच्या दानाच्या योगानें सर्व अरिष्टांचा नाश होतो आणि भूमिदान केल्याचें फळ मिळतें असें ' हेमाद्रि ' म्हणतो. होम इत्यादिकांचा विशेष प्रकार दुसऱ्या ग्रंथांतून पहावा.

ह्याप्रमाणें कृष्णाजिनाचें दान सांगितलें.

---

## अथ शय्यादानं

" महाभारते "

यजमानः पुण्यकाले अष्टदले तिलप्रस्थं निक्षिप्य तस्मिन्शय्यामास्तीर्य तस्याः समंतादीशानादिकोणचतुष्टयेशिरोभागे च पंचकुंभान्क्रमात् घृतकुंकुमगोधुमजलपूर्णकुंभमुच्छीर्षे घृतपूर्णकलशं सप्तधान्यानि च संस्थाप्य अद्येत्यादि० मम समस्तपापक्षयपूर्वकाप्सरोगणसेवायुतविमानकरणकेंद्रपुरगमनोत्तरषष्ठिसहस्रवर्षाधिकरणकक्रीडनस्त्रीसंघसमावृतसर्वलोकमहित्वतदुत्तरषष्ठियोजनमं-

---

* चार रस्ते एकत्र जेथें होतात तें स्थळ.

डलराज्यभोगानंतरशिवसायुज्यावाप्तिकामः शय्यादानमहं करिष्ये इति संकल्प्य द्विजं सपत्नीकं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः संपूज्य शय्यायां लक्ष्मीनारायणप्रतिमां स्वर्णमयीं संस्थाप्य संपूज्य सपत्नीकविप्रेण सह शय्यां प्रदक्षिणीकृत्य नमः प्रमाण्यै देव्यै इति चतुर्दिक्षु क्रमेण प्रणम्य तिथ्यादि संकीर्त्य मम सर्वपापक्षयेत्यादिशिवसायुज्यावाप्तिकामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इमां शय्यां ईशानादिकोणचतुष्टयस्थापनक्रमेण घृतकुंकुमगोधूमजलघृतपूर्णकुंभसमेतां हंसतूलीप्रच्छन्नां शुभ्रगंडोपधानिकां प्रच्छादनपटास्तृतां सप्तधान्ययुतां तांबूलायतनादर्शैलालवंगकर्पूरयुतां सुगंधपरिमलभोग्यवस्तुचंदनागरुदीपिकोपानच्छत्रचामरासनयुतां भोजनभाजनजलपात्रपंचवर्णवितानां केशप्रसाधिन्यंजनशलाकापुष्पमालादियुतां लक्ष्मीनारायणप्रतिमासहितां युक्तोपस्करामांगिरोदैवतां गोत्राय शर्मणे सुपूजिताय सालंकृताय सपत्नीकाय तुभ्यमहं संप्रददे न ममेति शय्योपवेशितविप्रहस्ते साक्षतकुशोदकं क्षिपेत्

" मंत्रस्तु "

यथा न कृष्णशयनं शून्यं सागरजातया।

तथा शय्या ममाप्यस्त्वशून्या जन्मनि जन्मनि इति

ततः सुवर्णमेवदक्षिणां दद्यात् ततो भूयसीं दत्वा ब्राम्हणांश्च भोजयेदिति

इति शय्यादानम्

## ×शय्येचें दान.

शय्येचें दान करणें ह्याचा विधि आणि ह्याचें फळ.

" महा भारतांत " यजमानानें ( संक्रांति इत्यादि ) पुण्यकारक काळीं भूमिवर अष्टदळ काढून त्यावर एक प्रस्थाएवढे तीळ पसरून त्यावर शय्या पसरून तिच्या आसपास ईशान्यादि चार कोणांत आणि उशाकडे क्रमानें तूप, कुंकुम ( केशर ), गहू आणि उदक ह्यांनीं भरलेले चार कलश ( घडे ) आणि उशाकडे तुपानें भरलेला एक कलश आणि +सात धान्यें ठेऊन आचमन करून " अद्येत्यादि० " मम समस्तपापक्षयपूर्वकाप्सरोगणसेवायुत विमानकरणकेंद्रपुरगमनोत्तरषष्ठिसहस्रवर्षाधिकरणक क्रीडनस्त्रीसंत्रसमावृत सर्व लोकमहित्वदुत्तर षष्ठियोजनमंडलराज्यभोगानंतरं शिवसायुज्यावाप्तिकामः शय्यादानमहं करिष्ये " ह्या प्रमाणें संकल्प करून सपत्नीक अशा =ब्राम्हणास वरण देऊन त्याची आपले सामर्थ्या प्रमाणें वस्त्रें अलंकार इत्यादिकांनीं पूजा करून नंतर शय्येवर लक्ष्मीनारायणाची सोन्याची प्रतिमा स्थापन करून तिचें

---

× पलंगासह बिछान्याचें दान करणें.

+ जव, गहू, भात, तीळ, कांग, सावा आणि चीनक हीं सात धान्यें होत.

= प्रधान संकल्प केल्या नंतर " अस्मिन् अमुक कर्मणि आचार्यत्वामहं वृणे " असें यजमानानें म्हणून ज्याला जप वगैरे कर्माची सुपारी द्यावयाची आहे अशा ब्राम्हणानें " व्रतोअस्मि कर्म करिष्यामि " असें म्हटल्यानंतर आस यजमानानें सुपारी द्यावी नंतर त्याची पूजा करावी. ह्या कर्मास " वर्णन " असें म्हणतात.

आवाहनादि सोळा उपचारांनीं पूजन करून नंतर त्या शय्ये-
वर ब्राम्हणास पत्नी सहवर्तमान बसवून शय्येस प्रदक्षिणा करून
" नमः प्रमाण्यै देव्यै " ह्या मंत्रानें चार दिशांस क्रमानें नम-
स्कार करून तिथ्यादिकांचा उच्चार करून " मम समस्तपापक्षय
पूर्वकाप्सरोगणसेवायुत विमानकरणकेंद्रपुरगमनोत्तर षष्ठिसहस्र-
वर्षाधिकरणकक्रीडन स्त्रीसंघ समावृत सर्वलोकमहिमत्व तदुत्तर ष-
ष्टियोजन मंडल राज्यभोगानंतरं शिवसायुज्यावाप्तिकामो गोत्राय
शर्मणे सुपूजिताय इमां शय्यां ईशानादि कोण चतुष्टय स्थापन
क्रमेण घृत कुंकुम गोधूम जल घृत पूर्णकुंभ समेतां हंसतूल
प्रच्छनां शुभ्रगंडोपधानिकां प्रच्छादनपटास्तृतां सप्तधान्ययुक्तां
तांबुलायतनादर्शैलालवंग कर्पुरयुतां सुगंधपरिमलभोग्यवस्तु चंद-
नागरुदीपिकोपानच्छत्रचामरासनयुतां भोजनभाजनजलपात्रपंचव-
र्णवितानयुतां केशप्रसाधिन्यंजनशलाकापुष्पमालादियुतां लक्ष्मीना-
रायणप्रतिमा सहितां युक्तोपस्करामंगिरो दैवतां गोत्राय शर्मणे
सुपूजिताय सालंकृताय सपत्नीकाय तुभ्यमहं संप्रददे नमम" ह्या-
प्रमाणें दानाचा संकल्प करून शय्येवर बसविलेल्या ब्राम्हणाच्या
हातावर अक्षतांनीं युक्त असें कुशोदक ( दर्भांनीं मिश्र असें
उदक ) द्यावें

" दानाचा मंत्र "

यथा न कृष्णशयनं शून्यं सागर जातया ।

तथा शय्याममाप्यस्त्व शून्याजन्मनि जन्मनि "

नंतर दानाची सांगता होण्याकरितां दक्षिणा सोनेंच द्यावें. नंतर
ब्राम्हणांस भूयसी देऊन त्यांस भोजन घालावें.

ह्या प्रमाणें शय्येचें दान सांगितलें.

अथ शयनदानं

" भविष्ये "

अथेत्यादि० गोत्राय शर्मणे इदं शयनं सुखस्पर्शं श्रीविष्णुप्रीतिकामस्तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

शयनं सुखदं कांतं केशवस्य प्रियं सदा ।

दानेनानेन सौभाग्यं सर्वदास्तु गृहे ममेति ततः सुवर्णदक्षिणां दद्यात्

इति शयनदानं

---

शय्या दान.

" भविष्य पुराणांत " यजमानानें शुभ दिवशीं आचमन करून " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणेइदं शयनं सुखस्पर्शं श्रीविष्णु प्रीतिकामस्तुभ्यमहं संप्रददेनमम " ह्याप्रमाणें दानाचा संकल्प करावा. " दानाचा मंत्र " शयनं सुखदं कांतं केशवश्य प्रियं सदा । दानेनानेन सौभाग्यं सर्वदास्तु गृहेमम ॥ नंतर दानाचीसांगता होण्याकरितां सोनें दक्षिणा द्यावी.

शय्या दानाचा संकल्प.

ह्या प्रमाणें शय्येचें दान सांगितलें.

अथ कशिपुदानं

" भविष्ये "

अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे कशिपु यावज्जीवं शीत-वातोष्णनिवारणकामस्तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

मृदुह्यबीजकार्पासपूरितं सुखदं नृणां ।
तस्मादस्य प्रदानेन सुखं स्यात्सर्वदा ममेति

इति कशिपुदानं

---

+काशिपूचें दान.

" भविष्य पुराणांत " यजमानानें शुभदिवशीं आचमन करून " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणेइदं कशिपु यावज्जीवं शीतवातोष्ण निवारण कामस्तुभ्यमहं संप्रददेनमम"

लेपड्याचें दान करण्याचा विधि.

असा संकल्प करून लेपड्याचें दान करावें. " दानाचा मंत्र " मृदुह्यबीजकार्पासपूरितं सुखदं नृणां । तस्मादस्य प्रदानेन सु खं-स्यात्सर्वदामम ।। नंतर दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें लेपड्याचें दान सांगितलें.

---

+ लेपडें.

## अथ वस्त्रदानानि

" नंदिपुराणे "

वस्त्रं यथार्थिने दद्याच्छुभं वापि यदृच्छया।
स भवेद्धनवान् श्रीमान् बृहस्पतिपुरे वसेदिति

" विष्णुधर्मोत्तरे "

वासोहि सर्वदैवत्यं सर्वं प्राधान्यमुच्यते ।
वस्त्रदानात्सुवेषः स्याद्रूपद्रविणसंयुतः ।
युक्तोलावण्यसौभाग्यैर्विरोगी च तथा द्विजः ।
दत्वा कार्पासिकं वस्त्रं स्वर्गलोके महीयते ।
दत्वोर्णजं च तत्रापि फलं दशगुणं भवेदिति

अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इदं श्वेतवस्त्रं सूक्ष्मं शिवप्रियं देहालंकरणं बृहस्पति दैवतं तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रस्तु "

सितं सूक्ष्मं सुखस्पर्शमीशानादेः प्रियं सदा ।
देहालंकरणं यस्मादतः शांतिं प्रयच्छ मे इति

इति श्वेतवस्त्रदानं

---

## अथ पीतवस्त्रदानं

" अथ पीतस्य "

संकल्पादि समस्तपापक्षयकामः इ०

द१५
प ६८६८



" मंत्रस्तु "

पीतवासः सुमंगल्यं देवानां प्रीतिवर्धनं ।
दानेनानेन मे पापं हरत्वाशु जनार्दनः

इति पीतवस्त्र दानं.

---

अथ रक्तवस्त्र दानं.

" भविष्ये "

संकल्पादि० आदित्यप्रीतिकामः

" मंत्रस्तु "

रक्तवस्त्रं सदारम्य मादित्यस्य प्रियं सदा ।
श्रीकरं रूपदं नित्यमतः शांतिं प्रयच्छ मे ।

इति रक्तवस्त्र दानं.

---

अथ नीलवस्त्र दानं.

" भविष्ये "

संकल्पलपादि० बलायुःश्रीवृद्धिकामः ।

" मंत्रस्तु "

मनोहरं नीलवस्त्रं बलरामप्रियं सदा ।
आयुर्विवर्धनं श्रीदमतः शांतिं प्रयच्छ मे "

इति नीलवस्त्र दानं.

अथ चित्रवस्त्र दानं.

" भविष्ये "

संकल्पादि० षण्मुखप्रीतिकामः ।

" मंत्रस्तु "

षण्मुखस्य प्रियं रम्यं चित्रवस्त्रं मनोरमं ।
तस्मादस्य प्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति

इति चित्रवस्त्र दानं.

---

अथ कृष्णवस्त्र दानं.

" भविष्ये "

संकल्पादि० सर्वारिष्टभयपीडापमृत्यु परिहाराय मृत्योः प्रीतिकामश्च

" मंत्रस्तु "

कृष्णं वासः प्रियं मृत्योः सर्वारिष्ठ विनाशनं ।
भयपीडामृतिहरमतः शांतिं प्रयच्छमे

इति कृष्णवस्त्र दानं.

---

अथ पट्टकूल दानं.

" भविष्ये "

संकल्पादि० कीर्तिकांतिसर्वदेवप्रीतिकामश्च

" मंत्रस्तु "

पट्टकुलं सदा रम्यं पवित्रं कामदं नृणां ।
विष्णवादीनां प्रीतिकरमतः शांतिं प्रयच्छ मे ।

इति पट्टकूल दानं.

---

अथ मृतकर्पटदानं

" भविष्ये "

संकल्पादि० पितृतृप्तिकामः

" मंत्रस्तु "

कीटजंटसुरं पुण्यं मृतकर्पटसंज्ञकं ।
पितॄणां तृप्तिदं यस्मादतः शांतिं प्रयच्छ मे

इति मृतकर्पटदानं

---

अथ ऊर्णावस्त्रदानं

" भविष्ये "

संकल्पादि० सर्वदेवप्रीतिकामः

" मंत्रस्तु "

ऊर्णावस्त्रं चारु चित्रं देवानां प्रीतिवर्धनं ।
सुखस्पर्शकरं यस्मादतः शांतिं प्रयच्छ मे

इत्यूर्णावस्त्रदानं.

अथ कंबलदानं

" स्कांदे "

कंबलः पट्टगर्भश्चेन्महाशीतविनाशकः ।
सएव विपरीतश्चेन्महावृष्टिविनाशकः ।
संकल्पादि० विष्णुप्रीतिकामः
शीतवर्षांहरः पुण्योदृष्टिबलविवर्धनः ।

" मंत्रस्तु "

कंबलस्य प्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति

इति कंबलदानं

---

अथ चित्रकंबलदानं

" भविष्ये "

संकल्पादि० लक्ष्मीनारायणप्रीतिकामः ।

" मंत्रस्तु "

ऊर्णापट्टश्चाविकादिः सर्वदेवप्रीयः शुचिः ।
चित्रकंबलदानेन मम संतु मनोरथः

इति चित्रकंबलदानं.

---

वस्त्रांचीं दानें

वस्त्रांचीं दानें करणें, त्यांचीं फळें आणि दानाचा विधि

" नंदि पुराणांत " जो याचकास इच्छेस वाटेल त्या प्रमाणें चांगलें वस्त्र दान करील तो द्रव्यवान् व ऐश्वर्यवान् असा होऊन बृहस्पतिच्या नगरांत वास करील. " विष्णुधर्मोत्तरांत "

वस्त्र हें सर्व दैवत्य आहे म्हणून हें "सर्वांस दान देण्यास योग्य आहे." जो द्विज वस्त्र दान करील तो चांगला वेश, स्वरूप, सौंदर्य, सौभाग्य आणि आरोग्य ह्यांनीं युक्त होतो. जो कापसाचें वस्त्र दान करील तो स्वर्ग लोकांत मान्य होतो, आणि जो घोंकरीचें वस्त्र देईल त्याला कापसाच्या वस्त्रापेक्षां दसपट फळ मिळेल.

यजमानानें आचमन करून " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे इदं श्वेत वस्त्रं सूक्ष्मं शिवप्रियं देहालंकरणं बृहस्पति दैवतं तुभ्यमहं संप्रददेनमम " ह्याप्रमाणें दानाचा संकल्प करून वस्त्राचें दान करावें. " दानाचा मंत्र " सितं सूक्ष्मं सुखस्पर्शमीशानादेः प्रियं सदा । देहालंकरणं यस्मादतःशांतिं प्रयच्छमे इति ॥ ह्याप्रमाणें पांढऱ्या वस्त्राचें दान सांगितलें.

" पिंवळ्या वस्त्राचें दान ":—संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करावा परंतु त्यांत " समस्त पापक्षय कामः " असा फळाचा उच्चार करावा; " दानाचा मंत्र " पीतवासःसुमंगल्यं देवानां प्रीतिवर्धनं । दानेनानेनमेपापं हरत्वाशुजनार्दनः " ह्याप्रमाणें पिंवळ्या वस्त्राचें दान सांगितलें.

" तांबड्या वस्त्राचें दान " संकल्पांत " आदित्य प्रीतिकामः " असा उल्लेख करावा " दानाचा मंत्र " रक्तवस्त्रं सदा रम्यमादित्यस्य प्रियंसदा । श्रीकरं रूपदं नित्यमतः शांति प्रयच्छमे " ह्याप्रमाणें तांबड्या वस्त्राचें दान सांगितलें.

" जांभळ्या वस्त्राचें दान " संकल्पांत " बलायु श्रीवृद्धिकामः " असा फळाचा उल्लेख करावा. " दानाचा मंत्र " मनोहरं नीलवस्त्रं बलराम प्रियं सदा । आयुर्विवर्धनं श्रीदमतः शांतिं प्रयच्छमे " ह्याप्रमाणें जांभळ्या वस्त्राचें दान सांगितलें.

" छिटाचें दान करणें " संकल्पांत षण्मुख प्रीतिकामः " असा फळाचा उल्लेख करावा. " दानाचा मंत्र " षण्मुखस्य प्रियं रम्यं चित्रवस्त्रं मनोरमं । तस्माद्स्यप्रदानेन शांतिरस्तु सदामम ॥ ह्याप्रमाणें छिटाचें दान सांगितलें.

" काळ्या वस्त्राचें दान " संकल्पांत " सर्वारिष्ट भयपिडापमृत्युपरिहाराय मृत्यो प्रितिकामश्च " असा फळाचा उच्चार करून दान करावें. " दानाचा मंत्र " कृष्णंवासः प्रियंमृत्योः सर्वारिष्ट विनाशनं । भयपीडामृतिहरमतः शांतिं प्रयच्छमे ।। ह्याप्रमाणें काळ्या वस्त्राचें दान होय.

'पट्टकूलाचें (पाडग्याचें) दान' 'भविष्य पुराणांतील' संकल्पांत " कीर्ति कांति सर्वदेव प्रीतिकामः " असा उल्लेख करावा. " दानाचा मंत्र " पट्टकूलं सदारम्यं पवित्रंकामदंनृणां । विष्णवादीनां प्रीतिकरमतः शांतिं प्रयच्छमे ॥ ह्याप्रमाणें पट्टकूलाचें दान सांगितलें.

" मृतकर्पटाचें दान " " भविष्य पुराणांतील " संकल्पांत " पितृतृप्तिकामः " असा उच्चार करावा. " दानाचा मंत्र " कीटजंटसुरं पुण्यं मृतकर्पटसंज्ञकं । पितॄणां तृप्तिदंयस्मादतः शांति प्रयच्छमे " ह्याप्रमाणें मृतकर्पटाचें दान सांगितलें.

" लोंकरीच्या वस्त्राचें दान " " भविष्य पुराणांतील " " संकल्पांत " सर्वदेवप्रीतिकामः असा उच्चार करावा. दानाचा मंत्र "

ऊर्णा वस्त्रं चारुचित्रं देवानां प्रीतिवर्धनं ।

सुखस्पर्शकरं यस्मादतः शांतिं प्रयच्छमे "

सर्व लोंकरीच्या वस्त्रांच्या दानाविषयीं हाच मंत्र योजावा. ह्याप्रमाणें लोंकरीच्या वस्त्राचें दान सांगितलें.

" कांबळीचें दान करणें " " स्कंद पुराणांत " कांबळीच्या आंत वस्त्र घेऊन ती पांघरावयास घेतली असतां ती मोठ्या थंडीचें निवारण करते, आणि तीच विपरीत घेतली असतां ( उलटी पांघरली असतां वस्त्राच्या आंत कांबळी घेऊन पांघरली असतां ) ती मोठ्या पावसाचें निवारण करते. दानाच्या संकल्पांत श्रीविष्णुप्रीतिकामः असा उच्चार करावा. " दानाचा मंत्र "

शीतवर्षाहरःपुण्यो दृष्टिबलविवर्धनः ।

कंबलस्यप्रदानेन शांतिरस्तु सदामम् ॥

ह्याप्रमाणें कांबळीचें दान सांगितलें.

" चित्र कंबळाचें दान " " भविष्य पुराणांत " संकल्पांत " लक्ष्मीनारायण प्रीतिकामः " असा फळाचा उल्लेख करावा. " दानाचा मंत्र "

ऊर्णापट्टश्चाविकादिः सर्व देव प्रियःशुचिः ।
चित्र कंबल दानेन ममसंतु मनोरथाः ॥

ह्याप्रमाणें चित्र कंबळाचें दान सांगितलें.

ह्याप्रमाणें वस्त्रांचीं दानें सांगितलीं.

---

अथ ताम्रपात्र दानं.

" वराह पुराणे "

अथातः संप्रवक्ष्यामि पात्रदान मनुत्तमं ।
कृत्वा ताम्रमयं पात्रं यथाविभवविस्तरं ।

तत्पात्रे हैमीं लक्ष्मीनारायणप्रतीमां उमामहेश्वरप्रतिमां च संपूज्य द्विजमपि पूजयित्वा परापवादपैशून्याभक्ष्याभक्षणादि शरीरोत्थसकलपापनाशकामोगोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं ताम्रपात्रं उमामहेश्वर लक्ष्मीनारायण प्रतिमासहितं च तुभ्यमहं संप्रददे न ममेति.

" मंत्रस्तु "

परापवादपैशून्यादभक्ष्यस्य च भक्षणात् ।
पापं गात्रोत्थितं ताम्रपात्रदानात्प्रणश्यत्विति ।

एवं संकल्पवाक्यं प्रतिमादि सर्वपात्रदानेषु बोध्यम्

इति ताम्रपात्र दानं.

## तांब्याच्या पात्राचें दान.

तांब्याच्या पात्राचे दानाचें फळ आणि त्याचा विधि.

" वराह पुराणांत " आतां ह्यानंतर उत्तम असें पात्राचें दान सांगता. आपले शास्त्रप्रमाणें तांब्याचें पात्रकरून लक्ष्मी, नारायण, उमा आणि शंकर ह्यांच्या सोन्याच्या प्रतिमा ठेऊन त्यांचें षोडशोपचारें पूजन करून आणि ब्राम्हणाचेंही पूजन करून यजमानानें आचमन करून " अद्येत्यादि० " परापवाद पैशून्याभक्ष्यभक्षणादि शरीरोत्थसकल पापनाश कामो गोत्रायशर्मणेसुपूजिताय इदं ताम्रपात्रं उमा महेश्वर लक्ष्मीनारायण प्रतिमासहितं च तुभ्य महं संप्रददेनमम " ह्याप्रमाणें संकल्पकरून दान करावें. " दानाचा मंत्र "

" परापवाद पैशून्याद भक्ष्यस्य च भक्षणात् ।
पापं गात्रोत्थितं ताम्रपात्र दाना त्प्रणश्यतु ॥

वर सांगितलेलें संकल्पांतील वाक्य व प्रतिमा २५ हें सर्व पात्रांच्या दानाविषयीं जाणावें.

ह्याप्रमाणें तांब्याचें पात्राचे दान सांगितलें.

---

### अथ प्रसंगात्ताम्रदानमपि

" भविष्ये "

संकल्पादि० आरोग्यबलवृद्धि सूर्यप्रीती कामः

" मंत्रस्तु "

सूर्यप्रीती करंताम्र मारोग्य बलवर्धनं ।

तस्मादस्य प्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति

इति ताम्र दानं

---

प्रसंगानें तांब्याचेंही दान सागतों " भविष्य पुराणांत "

तांब्याचे दानाचा विधि.

यजमानानें आचमन करून संकल्प करावा त्यांत आरोग्य बलवृद्धि सूर्य प्रीति कामः " असा फळाचा उच्चार करून दान करावें.

" दानाचा मंत्र "

सूर्यप्रीतिकरं ताम्रमारोग्य बलवर्धनं ।

तस्मादस्य प्रदानेन शांतिरस्तु सदामम ॥

ह्याप्रमाणें तांब्याचें दान सांगितलें.

---

अथ कांस्यपात्र दानं.

" वाराहे "

संकल्पादि कामकृतपापनाशकामः

" मंत्रस्तु "

यानि पापान्यनेकानि कामाकाम कृतानि च ।

कांस्यपात्रप्रदानेन तानि नश्यंतु मे सदेति

इति कांस्यपात्र दानं.

## कांशाच्या पात्राचें दान.

" वराह पुराणांत " संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करावा परंतु त्यांत " कामकृत पापनाश काम " असा फळाचा उल्लेख करावा " दानाचा मंत्र "

कांशाच्या पात्राचा, दानाचा विधि.

यानिपापान्यनेकानि कामाकाम कृतानिच ।
कांस्यपात्र प्रदानेन तानि नश्यंतु मे सदेति ॥

ह्याप्रमाणें कांशाच्या पात्राच्या दानाचा विधि सांगितला.

---

## अथ प्रसंगात्कांस्यदानमपि

" भविष्ये "

संकल्पादि ब्रह्मविष्णुशिवप्रीतिकामः

" मंत्रस्तु "

कांस्ये ब्रम्हाशिवौ साक्षात्कांस्यमेताह्विभावसु ।
कांस्यं विष्णुमयं यस्मादतः शांतिं प्रयच्छ मे

इति कांस्य दानं.

---

प्रसंगानें कांशाचेंही दान सांगतों " भविष्य पुराणांत " संकल्प वगैर पूर्वीप्रमाणेंच करावा. परंतु त्यांत " ब्रम्हविष्णु शिव प्रीति कामः " असा फळाचा उल्लेख करावा.

कांशाच्या दानाचा विधि.

" दानाचा मंत्र "

कांस्ये ब्रम्ह शिवौ साक्षात्कांस्यमेत द्विभावसु: ।
कांस्यं विष्णुमयं यस्मादत: शांतिंप्रयच्छमे ।।

ह्याप्रमाणें कांशाच्या दानाचा विधि सांगितला.

---

अथ लोहपात्र दानं.

" भाविष्ये "

संकल्पादि लोभाज्ञानाज्ञानकृतपापक्षयकाम:

" मंत्रस्तु "

ज्ञानाज्ञानकृतं पापं मया लोभात्कृतं चिरात् ।
लोहपात्रप्रदानेन मम शिघ्रं व्यपोहतु

इति लोहपात्र दानं

---

लोखंडाच्या पात्राचें दान.

" भविष्य पुराणांत " संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करावा.

लोखंडाच्या पात्राचे दानाचा विधि

त्यांत " लोभाज्ज्ञानाज्ञानकृत पापक्षय काम: " असा फळाचा उल्लेख करावा. " दानाचा मंत्र "

ज्ञानाज्ञान कृतं पापं मया लोभा त्कृतं चिरात् ।
लोहपात्र प्रदानेन ममशीघ्रंव्यपोहतु ।।

ह्याप्रमाणें लोखंडाच्या पात्राचें दान सांगितलें.

अथ रौप्यपात्रदानं

" विष्णुधर्मे "

संकल्पादि० कन्यादुषणपरदाराभिमर्शनादिपापक्षय-काम:

" मंत्रस्तु "

कन्यादूषणत: पापं परदाराभिमर्शनात् ।
रौप्यपात्रप्रदानेन तानि नश्यंतु मे सदेति ।

इति रौप्यपात्रदानं

---

रुप्याच्या पात्राचें दान.

रुप्याचे पात्राच्या दानाचा विधि.

" विष्णुधर्मोत्तर पुराणांत " संकल्प वगैरे पूर्वीप्रमाणें करावा. त्यांत " कन्या दूषण परदाराभिमर्शनादि पापक्षय काम: " असा फळाचा उल्लेख करावा. " दानाचा मंत्र "

" कन्यादूषणत: पापं परदाराभिमर्शनात् ।
रौप्यपात्र प्रदानेन तानि नश्यंतुमेसदा ।।

ह्याप्रमाणें रुप्याच्या पात्राचें दान सांगितलें.

---

अथ सुवर्णपात्रदानं

" वाराहे "

संकल्पादि० जन्मांतरसहस्रोत्थदुष्कृतनाशकाम:

" मंत्रस्तु "

जन्मांतरसहस्रेषु यत्कृतं दुष्कृतं मया ।
तत्सर्वं नाशमायातु स्वर्णपात्रप्रदानत इति ।

इति सुवर्णपात्रदानं

---

## सोन्याच्या पात्राचें दान

सोन्याच्या पात्राच्या दानाचा विधि.

" वराह पुराणांत " संकल्प वगैरे पूर्वींप्रमाणें करावा. त्यांत " जन्मान्तर सहस्रोत्थदुष्कृत नाश कामः " असा फळाचा उच्चार करावा. " दानाचा मंत्र "

जन्मांतर सहस्रेषु यत्कृतं दुष्कृतं मया ।
तत्सर्वंनाशमायातु स्वर्णपात्र प्रदानत इति ॥

ह्याप्रमाणें सोन्याच्या पात्राचें दान सांगितलें.

---

## अथ स्थालीदानं

" भविष्ये "

कृत्वा ताम्रमयीं स्थालीं पलानां पंचभिःशतैः । अशक्तस्तु तधर्धेन तदार्धार्धेन वा पुनः अत्यशक्तौ मृन्मयीं पायसेन पूर्णां घृतशर्कराशाकजलपात्रयुतां च सवस्त्रां मंडले संस्थाप्य गंधमाल्यादिनालंकृत्य आदित्ये ऽहनि संक्रांतौ चतुर्दश्यष्टमीषु च एकादश्यां तृतीयायां

विप्राय प्रतिपादयेत् अद्येत्यादि० यावज्जीवं सकुटुंबस्य यथेष्टमन्नमक्षय्यभोज्यादिलाभकामः इमां स्थालीं पायसपूर्णां घृतशर्कराशाकजलपात्रवस्त्रावृतां मंडलस्थां सालंकृतां गोत्राय शर्मणे तुभ्यमहं संप्रददे न ममेति मंत्रस्तु इमां पायसपूर्णां यः स्थालीं घृतजलादिभिः। तद्यात्संपत्तिपात्रं स्यादतः पाहि महेश्वरेति सुवर्णदाक्षिणां दद्यात्

इति स्थालीदानं

---

## *स्थालीचें दान.

स्थालीच्या दानाचा विधि.

" भविष्य पुराणांत " +पांचशें पळाएवढ्या वजनाच्या तांब्याची परात करावी. इतकी करण्यास सामर्थ्य नसल्यास त्याच्या अर्ध्याएवढी ( २५० ) पळांची ) किंवा त्याच्याही अर्ध्याएवढी ( १२५ पळांची ) करावी. फारच अशक्त असल्यास मातीची परात करावी. नंतर तिच्यांत खीर, तूप, साखर, भाज्या व पाण्याचें भांडें हीं ठेवून वस्त्रानें आच्छादन करून जमिनीवर मंडळ करून त्यावर ती ठेऊन गंध, फुलें इत्यादिकांनीं तिची पूजा करून रविवार, संक्रांत, चतुर्दशी, अष्टमी, एकादशी व तृतिया ह्यांपैकीं एकादे दिवशीं ब्राम्हणास तिचें दान करावें.

---

* थाळी = पितळी=ताट=परात.

+ २००० कर्ष होतात. चालू व्यवहारांत त्यांचे १६६६ इतके तोळे होतात.

दानाचा संकल्प—अद्येत्यादि यावज्जीवं सकुटुंबस्य यथेष्टमन्नमक्षय्य भोज्यादिलाभ कामः इमां स्थालीं पायसपूर्णां घृतशर्करा शाकजलपात्रवस्त्रावृतां मंडलस्थां सालंकृतां गोत्रायशर्मणे तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्याप्रमाणें संकल्प करून दान करावें. दानाचा मंत्र—

इमां पायसपूर्णां यः स्थालीं घृतजलादिभिः ।
दद्यात्संपत्तिपात्रं स्याद्तः पाहि महेश्वर "

नंतर दानाची सांगता होण्याकरितां सोनें दक्षिणा द्यावी.

ह्याप्रमाणें स्थालीचें दान सांगितलें.

---

## अथ वेदपुस्तकादिदानानि

" वायवीये "

अष्टादशपुराणानि सहिरण्यानि पर्वणि ।
लिखित्वा यः प्रयच्छेत्तु स विद्यापारगो भवेत् ।
रामायणं भारतं च दत्वा स्वर्गे महीयते ।
धर्मशास्त्रं नरोदत्वा स्वर्गलोके महीयते इति

" भविष्ये "

धेनुदानसहस्रेण सम्यक्दत्तेन यत्फलं तत्फलं समवाप्नोति पुस्तकैकप्रदानतइति अथ प्रसंगाच्चतुर्दशाविद्या-उक्ता मदनरत्ने

" नंदिपुराणे "

विद्याचतुर्दश प्रोक्ताः क्रमेण च यथास्थिताः
षडंगाश्चतुरोवेदा धर्मशास्त्रं पुरातनं ।
मीमांसा तर्कशास्त्रं च एता विद्याश्चतुर्दश ।

आसामवांतरोत्पन्नाः परा विद्याः सहस्रश इति पुरातनं पुराणं तत्रैव कालमाह चंद्रसूर्योपरागे वा संक्रात्ययनवासरे ।

शुभेन्हि शुभनक्षत्रे कृत्वा मंडलमुत्तमं चतुरस्रं वितानं च बध्वा पुष्पोपशोभितं ।

तत्र न्यस्यासनं दिव्यं दिव्यगंधाधिवासितं तत्र संस्थापयेद्यत्रं नागदंतमयं शुभं ।

संस्थाप्य पुस्तकं तत्र नैगमं भारतादिकं ।
नैगमं वेदपुस्तकं ।

पुण्यं पवित्रं संपूज्य वस्त्रालंकारभूषणैः ।
पूजयेच्च दिशां पालान् लोकपालान्यथाक्रमं ।
कन्या स्त्रियश्च संपूज्या मातरः कल्पयेच्च ताः ।
शास्त्रतद्भावविदुषि दद्यात्पुस्तकमुत्तममिति

" अथास्य दानप्रयोगः ।

यजमानः कृतनित्यक्रियः शुचिः पुण्यकाले देशकालौ संकीर्त्य गोसहस्रदानसमफलावाप्तिस्वर्गलोकमहिमत्वचतुर्दशविद्यावेदवेदांगपारगत्वसिद्धिद्वारा श्रीपरमेश्व-

रप्रीत्यर्थं अमुकपुस्तकदानमहं करिष्ये इति संकल्प्य पूर्वोक्तमंडपादि यथाशक्त्या कल्पयित्वा नागमययंत्रे वस्त्रद्वयबद्धं ऊर्णापट्टसूत्रवेष्टितं पुस्तकं संस्थाप्य हैमीं सरस्वती प्रतिमां राप्यमयसिंहं विष्णुं च तत्रावाह्य परितोलोकपालांश्चावाह्य तत्र सुवासिनीः कुमारीश्चावाह्य " यागुंगूर्यासिनीवाली या राका या सरस्वती " इंद्राणी मव्हउतये वरुणानी स्वस्तये " इति मंत्रेण यद्वा " देवीं वाचमजनयंत देवा स्तां विश्वरूपाः पशवोवदंति ।

सानोमंद्रेषमूर्जं दूहाना धेनु र्वागस्मानुपसुष्टतैतु इति मंत्रेणावाहिदेवता षोडषोपचारैरभ्यचर्य द्विजं वृत्वा यथाविभवं वस्त्रालंकारादिभिः पूजयेत् " अद्येत्यादि गोत्राय शर्मणे सुपूजिताय संकल्पोक्तफलं संकीर्त्य इदं पुस्तकं प्रतिमायुतं ससिंहं ऊर्णापट्टबद्धं दृढसूत्रवेष्ठितं नागमययंत्रे स्थितं यथाशक्तिसोपस्करं सरस्वतीदैवतं तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रौ स्तु "

सर्वविद्याश्रया यज्ञाः करणं लिखिताक्षरं पुस्तकस्य प्रदानेन प्रीणातु मम भारती ।

सरस्वती जगन्मातः शब्दब्रम्हाधिदैवते ।

अस्याः प्रदानाद्वागीशा प्रसन्ना जन्मजन्मनि "

ततः सुवर्णं दक्षिणां दद्यात्

इति पुस्तकदानं

## वेद इत्यादि पुस्तकांचीं दानें.

वेद वगैरे पुस्तकांचीं दानें, त्यांचीं फळें आणि विधि.

" वायु पुराणांत " जो अठरा पुराणें लिहून तीं संक्रांति इत्यादि पर्वणीचे दिवशीं सोन्याचे दक्षिणेसह ब्राम्हणास दान करील तो सर्व विद्या पारंगत होईल. जो रामायण आणि भारत ह्यांचें दान करील तो स्वर्गलोकांत मान्य होईल तसेंच जो मनुष्य धर्मशास्त्राचें दान करील तो स्वर्गलोकांत पूज्य होईल. " भविष्य पुराणांत ' गाद्यांचीं उत्तम प्रकारानें हजार दानें केल्यानें मनुष्यास जें फळ मिळेल तें फळ एका पुस्तकाच्या दानानें मिळतें. नंदि पुराणांतील चौदा विद्या मदनरत्नांत सांगितल्या आहेत त्या प्रसंगानें येथें सांगतों. चौदा विद्या जशा क्रमानें सांगितल्या आहेत त्या अशा—शिक्षा, छंद, निघंट, ज्योतिष, अष्टाध्यायी व निरुक्त अशीं सहा ज्यांचीं अंगें आहेत असे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वणवेद असे चार वेद, धर्मशास्त्र, पुराण, मीमांसा व तर्कशास्त्र, ( न्यायशास्त्र ) ह्याप्रमाणें चौदा विद्या होत. ह्यांच्यापासून उत्पन्न झालेल्या दुसऱ्या हजारो विद्या आहेत. दानाचा काल सांगतों तो असा—चंद्र व सूर्य ह्यांचीं ग्रहणें, संक्रांत, ×अयन दिवस, शुभ दिवस व शुभ नक्षत्र ह्यापैकीं कोणत्याही दिवशीं जमिनीवर चौकोनी मंडळ करून त्यावर फुलांनीं शोभणारें असें छत बांधून त्या मंडळावर दिव्य अशा सुगंधी पदार्थांनीं सुवासिक केलेलें चकाकीत असें आसन मांडून त्यावर

× उत्तरायण व दक्षिणायन.

हस्तीदंताचें सुशोभित असें यंत्र ( तिवई इ. ) मांडून त्यावर पुण्यकारक पवित्र असें वेदाचें पुस्तक भारतादिक ठेवून त्याचें वस्त्र, अलंकार, भूषण ह्यांच्या योगानें पूजन करून अनुक्रमानें आठ दिशांचे पालन करणारे आठ लोकपाल ह्यांचें पूजन करावें. कुमारिका व स्त्रिया ( सुवासिनी ) ह्यांचें वस्त्रादिकांच्या योगानें पूजन करावें आणि त्यांस मातृकांची कल्पना करावी. नंतर शास्त्र व त्याचा भाव जाणणाऱ्या अशा विद्वानास तें पुस्तक द्यावें.

पुस्तकाच्या दानाचा प्रयोग.

ह्याच्या दानाचा प्रयोग—यजमानानें नित्यकर्म ( स्नान संध्यादि ) आटपून शुचिर्भूत होऊन पुण्यकारक अशा काळीं देश व काल ह्याचा विचार करून "गोसहस्रदानसमफलावाप्ति स्वर्गलोक महिमत्व चतुर्दशविद्या वेदवेदांगपारगत्वसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थं अमुक पुस्तक दानमहं करिष्ये" ह्याप्रमाणें संकल्प करून पूर्वी सांगितलेलें मंडप वगैरे आपल्या शक्तिप्रमाणें करून हस्तीदंताच्या यंत्रावर ( तिवईवर ) दोन वस्त्रांनीं बांधिलेलें आणि वरून लोकरीच्या नाडीनें गुंडाळलेलें असें पुस्तक ठेऊन त्या ठिकाणीं सोन्याची सरस्वतीची प्रतिमा, चांदीची सिंहाची प्रतिमा आणि विष्णुची प्रतिमा स्थापन करून त्यांचें आवाहन करून त्यांच्या सभोंवतीं लोकपालांचें आवाहन करावें, नंतर सुवासिनी व कुमारी ह्यांचेंही आवाहन करून

"यागुंगूर्यासिनीवाली याराका या सरस्वती ।
इंद्राणी मव्हऊतये वरुणानीं स्वस्तये"

ह्या मंत्रानें किंवा

" देवीं वाचमजनयंतदेवास्तां विश्वरूपाः पशवोवदंति ।
सानोमंद्रेषमूर्जं दुहाना धेनुर्वागस्मानुपसुष्टुतैतु "

ह्या मंत्रानें आवाहित देवतांचें आवाहनादि सोळा उपचारांनीं पूजन करून ब्राम्हणाचें वर्णन करून त्याचें आपल्या सामर्थ्याप्रमाणें वस्त्रें अलंकार इत्यादिकांनीं पूजन करावें. नंतर " अद्येत्यादि० गोत्राय शर्मणे सुपूजिताय—पुढें पूर्वीं सांगितलेल्या संकल्पांतील फळाचा उच्चार करून—इदं पुस्तकं प्रतिमायुतं ससिंहं ऊर्णापट्टबद्धं दृढसूत्रवेष्टितं नागमययंत्रेस्थितं यथाशक्ति सोपस्करं सरस्वती दैवतं तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्या प्रमाणें दानाचा संकल्प करून पुस्तकाचें दान करावें.

" दानाचे मंत्र "

सर्व विद्याश्रयायज्ञाः करणं लिखिताक्षरं ।
पुस्तकस्य प्रदानेन प्रीणातु मम भारती ॥
सरस्वती जगन्मातः शब्दब्रम्हाधिदैवते ।
अस्याः प्रदानाद्वागीशाप्रसन्ना जन्मजन्मनि ॥

नंतर दान सांगता होण्याकरितां सोनें दक्षिणा द्यावी.

ह्या प्रमाणें पुस्तकाचें दान सांगितलें.

---

## नाना द्रव्य दान मंत्राः

" भविष्ये "

माणिक्यमिंद्रनीलं च वैडूर्यंवज्रमेव च ।
मारकतं च गोमेदं पुष्परागं च मौक्तिकं ।

विद्रुमं च नवैतानि रत्नान्युक्तानि सूरिभिः ।
रत्नदानाद्धरिर्लक्ष्मीः स्वपदं च प्रयच्छतीति
अद्येत्यादि ऽ लक्ष्मीनारायणपदावाप्तिकामः

" मंत्रस्तु "

यस्माद्रत्नेषु सर्वेषु सर्वे देवा व्यवस्थितः ।
तस्माद्रत्नप्रदानेन वांछितं फलमाश्नुते इति नवर त्नदानानि

" मौक्तिकमंत्रस्तु "

मौक्तिकं भूषणं विष्णोः श्रियो गौर्या शिवस्य च ।
दानेनास्य महत्सौख्यं शांतिं रस्तु सदा ममेति ॥

" अथ प्रवालदान मंत्रस्तु "

प्रवालं पुष्टिदं श्रीदं कांतिदं शुभदं तथा ।
दानेनास्य महत्सौख्यं शांतिरस्तु सदा ममेति ॥

" अथ कर्णभूषणदानमंत्रस्तु "

भूषणं कर्णयोः स्त्रीणां स्वर्णरत्नादिसंयुतं ।
ताडंकस्य प्रदानेन सौभाग्यं वर्धतां ममेति ॥

" अथ मांगल्यमणिदानमंत्रस्तु "

मांगल्यमणयोलक्ष्म्या गौर्याः प्रीतिकराः सदा ।
तस्मादेषां प्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति ॥

" हरिद्रामंत्रस्तु "

गौर्याः प्रीतिकरानित्यं हरिद्रा सर्वकामदा ।
तस्मादस्याः प्रदानेन सौभाग्यं जन्मजन्मनीति ॥

" कुंकुमदानमंत्रस्तु "

कुंकुमं शोभनं रम्यं सर्वदा मंगलप्रदं ।
दानेनास्य महत्सौख्यं सौभाग्यं स्यात्सदा ममेति ॥

" सिंदूरदानमंत्रस्तु "

सिंदूरं शोभनं रम्यं गणेशस्य प्रियं परं ।
दानेनास्याः सुखं भोगः शांतिरस्तु सदा ममेति ॥

" कर्पूरदानमंत्रस्तु "

कर्पूरं शीतलं चारु देवर्षिगुरुसेवितं ।
तस्मादस्य प्रदानेन लक्ष्मीस्तिष्ठतु मद्गृहे ।

" तथा "

कर्पूरं रुचिरं विप्र गृहाणेदं सुपूजितं ।
पुण्यगंधस्थिता सा मे कमला प्रीयता मिति

" नानासुगंधद्रव्यदानमंत्रस्तु "

गंधो मनोहरो दिव्यः शांतिदः सुखदस्तथा ।
तस्मादस्य प्रदानेन सुगंधः स्यात्सदा ममेति ।

इति भविष्यपुराणोक्तनानाद्रव्यदानमंत्राः

---

## नाना प्रकारच्या द्रव्यांच्या दानांचे मंत्र.

रत्नाचें दान, त्याचा संकल्प व फळ आणि मोतीं वगैरेच्या दानांना मंत्र.

" रत्नाचें दान "—भविष्य पुराणांत " माणीक, वैडूर्य, हिरा, पाच, गोमेद, पुष्पराग, मोतीं व पोंवळें हीं पंडितांनीं ( ज्ञात्यांनीं ) नऊ रत्नें सांगितलीं. रत्नांच्या दाना-

पासून विष्णु आणि लक्ष्मी हीं दान करणारास आपल्या स्थानाची प्राप्ति करून देतात. दानाचा संकल्प—अद्येत्यादि० " लक्ष्मीनारायणपदावाप्तिः " असा फळाचा उच्चार करावा.

" दानाचा मंत्र "

यस्माद्रत्नेषु सर्वेषु सर्वे देवाव्यवस्थिताः ।
तस्माद्रत्न प्रदानेन वांछितं फलमश्नु ते ॥

ह्या प्रमाणें नऊ रत्नांचीं दानें करावीं.

" मोत्याच्या दानाचा मंत्र "

मौक्तिकं भूषणं विष्णोः श्रियोः गौर्या शिवस्य च ।
दानेनास्य सुखंचास्तु ऐहिकामुष्मिकं मम ॥

" प्रवाळाच्या दानाचा मंत्र "

प्रवालं पुष्टिदं श्रीदं कांतिदं शुभदं तथा ।
दानेनास्य महत्सौख्यं शांतिरस्तु सदा मम ॥

" कर्णफुलाच्या दानाचा मंत्र "

भूषणं कर्णयोः स्त्रीणां स्वर्ण रत्नादि संयुतं ।
ताटंकस्य प्रदानेन सौभाग्यं वर्धताम् मम ॥

" मांगल्य मण्याच्या दानाचा मंत्र "

मांगल्यमणयो लक्ष्म्यागौर्याः प्रीतिकराः सदा ।
तस्मादेषां प्रदानेन शांतिरस्तु सदा मम ॥

" हळदीच्या दानाचा मंत्र "

गौर्याः प्रीतिकरा नित्यं हरिद्रा सर्वकामदा ।
तस्मादस्याः प्रदानेन सौभाग्यं जन्मजन्मनि ॥

" कुंकवाच्या दानाचा मंत्र "

कुंकुमं शोभनं रम्यं सर्वदा मंगलप्रदं ।
दानेनास्य महत्सौख्यं सौभाग्यं स्यात्सदा मम ॥

" शेंदराच्या दानाचा मंत्र "

सिंदूरं शोभनं रम्यं गणेशस्य प्रियं परं ।
दानेनास्य परंलक्ष्मीः स्थिरामे वास्तु संततिः ॥

" कस्तुरीच्या दानाचा मंत्र "

कस्तूरी भाग्यदा भव्या देवमर्त्य जनप्रिया ।
दानेनास्याः सुखं भोगः शांतिरस्तु सदामम ॥

" कापराच्या दानाचा मंत्र "

कर्पूरं शितलं चारु देवर्षि गुरुसेवितं ।
तस्मादस्य प्रदानेन लक्ष्मी स्तिष्ठतु मद्गृहे ॥

" तसेंच "

" कर्पूरं रुचिरं विप्र गृहाणेदं सुपूजितं ।
पुण्यगंध स्थितासामे कमला प्रीयता मिती ॥

" नाना प्रकारच्या सुगंधि पदार्थांच्या दानाचा मंत्र "

गंधो मनोहरो दिव्यः शांतिदः सुखदस्तथा ।
तस्मादस्य प्रदानेन सुगंधः स्यात्सदा मम ॥

ह्याप्रमाणें भविष्य पुराणांत सांगितलेल्या नाना प्रकारच्या द्रव्यांच्या दानांचे मंत्र सांगितले.

अथ देवे गलंतिकादानं

" भविष्यपुराणे "

वसंतसमयं ज्ञात्वा गत्वा देवालयं शुभं ।
शिवस्य विष्णोरर्कस्य इष्टदेवस्य वा पुनः ।
स्रवंतं कारयेत् कुंभं सच्छिद्रं देवमस्तके ।
दिवारात्रौ स्रवेद्देवं जलं मासचतुष्टयं ।
स्रवत्तद्बिंदुसंख्याकान् स्वर्गलोके महीयते ।

" अत्र प्रयोगस्तु "

वसंते शुभदिने स्थिरलग्नादौ कृतनित्यक्रियः आचम्य प्राणानायम्य अद्येत्यादि० देवशिरसि स्रवज्जलबिंदुसमसंख्याकाब्दशिवपुरादिनिवासकामोमासचतुष्टयं दिवारात्रौ च देवे गलंतिकादानं करिष्ये इति संकल्प्य प्रासादं सम्यक् प्रक्षाल्य देवं पंचामृताद्युपचारैरभ्यर्च्य देवेगलंतिकां बध्नीयात्

" मंत्रस्तु स्कांदे "

ॐ नमः शंकरः शंभुर्भवोधाता शिवोहरः ।
प्रीयतां मे महारुद्रो जलसेकप्रदानतइति एवं मासचतुष्टयं देवे गलंतिकादानं कृत्वा अंत्येप्येवमेव पंचामृतादिपूजां कृत्वा यथाशक्ति ब्राम्हणान् भोजयित्वा तेभ्यो दक्षिणां दद्यादिति त्रयाणामपि जीवानामुदकं जीवने स्मृतं ।
पवित्रममृतं यस्मात्तद्देयं पुण्यमिच्छतेति ।

इति स्कांदोक्तंदेवेगलंतिकादानं.

## देवावर गळती बांधणें.

देवावर गळती बांधणें, त्याचा प्रयोग व फळ.

" भविष्य पुराणांत " वसंतऋतु आला म्हणजे शंकर, विष्णु, सूर्य किंवा इष्ट देवता ह्यां पैकीं एकाच्या शुभ कारक अशा मंदिरास जाऊन देवाच्या मस्तकावर ज्याला बारीक भोंक पाडलें आहे असा झरणारा एक घडा ( कळशी ) बांधावा. ह्या प्रमाणें दिवसा व रात्रीं चार महिने पावेतों गळती ठेवावी. त्या झरणाऱ्या वड्याच्या बिंदुंची जितकी संख्या होईल तितक्या वर्षां पर्यंत गळती बांधणारा मनुष्य स्वर्ग लोकांत वास करील व मान्यतेला पावेल; ह्या विषयीं प्रयोग— यजमानानें वसंतऋतूंत शुभ दिवशीं स्थिर अशा लग्नादिकावर आपलें नित्य कर्म आटोपून आचमन व प्राणायाम करून " अद्येत्यादि० " देवशिरसी स्रवज्जलबिंदुसमसंख्याकाब्द शिवपुरादिनिवासकामो मासचतुष्टयं दिवारात्रौच देवेगलंतिका दानं करिष्ये ह्या प्रमाणें संकल्प करून देवाचा आंतील गाभारा स्वच्छ धुवून काढून देवाचें पंचामृत वगैरे उपचारांनीं पूजन करून देवावर गळती बांधावी. " मंत्र स्कंदपुराणांतील "

ॐ नमः शंकरःशंभुर्भ वोधाता शिवो हरः ।
प्रीयतांमे महारुद्रो जलसेकप्रक्षानतः ॥

ह्या प्रमाणें चार महिने पावेतों देवावर गळती बांधून शेवटीं ( चातुर्मास्याच्या ) ही त्याच प्रमाणें देवाची पंचामृत वगैरे उपचारांनीं पूजा करून आपले शक्ति प्रमाणें ब्राम्हणांस भोजन

घालून त्यांस दक्षिणा द्यावी. पाणी हें तिन्ही जीवांचें (प्राण्यांचें) जीवन आहे असें सांगितलें, म्हणून पुण्याची इच्छा करणारानें पवित्र व जीवन देणारें अमृता सारखें असून पुण्यकारक अशा त्या उदकाचें दान करावें.

ह्या प्रमाणें स्कंदपुराणांत सांगितलेलें देवावर
=गळतीचें दान सांगितलें.

---

## अथ प्रपादानं

" भविष्ये "

अतीते फाल्गुने मासे प्राप्ते चैत्रमहोत्सवे ।
पुण्येन्हि विप्रकथिते मंडपं कारयेत्तत इति
पुरमध्ये चतुष्पथे जलरहितमार्गवृक्षमूलेप्रपामंडप कारयित्वा तन्मध्ये सुगंधकान् जलकुंभा न्संस्थाप्य प्रपापालकं बहुपुत्रं संस्थाप्य प्रार्थयेत्

" प्रपेयं सर्वसामान्यभूतेभ्यः प्रतिपादिता ।
अस्याः* प्रदानात्सकला मम संतु मनोरथाइति
ततो निवारितं देयं तोयं मासचतुष्टयं त्रिपथं वा महाराज जीवानां जीवनं परं ।

---

= मातीचा किंवा तांबें इत्यादि धातुंच्या घड्यास बारीक भोंक पाडून त्यांत पाणी भरून तो देवावर टांगावा. त्यास गळती म्हणतात.

* " अस्याः प्रदानात्पितरस्तृप्यंतु प्रपितामहाः " असा दान मयूखांत पाठ आहे.

प्रत्यहं कारयेत्तस्यां भोजयेच्छक्तितोद्विजान् ।
अनेन विधिना यस्तु ग्रीष्मे तापप्रणाशनं ।
पानीयमुत्तमं दद्यात्तस्य पुण्यफलं शृणु ।
कपिलाशतदानस्य सम्यग्दत्तस्य यत्फलं ।
तत्फलं समवाप्नोति सर्वदेवैः सुपूजितइति

इति प्रपादानं

---

## प्रपेचें दान ( पाणपोई घालणें ).

पाणपोई घालणें, त्याचा काल आणि फळ.

" भविष्य पुराणांत " फाल्गुन महिना झाल्या नंतर ज्यांत मोठा आनंद होत आहे असा चैत्र महिना प्राप्त झाला असतां ब्राम्हणानें सांगितलेल्या शुभ पुण्य कारक अशा दिवशीं पाणपोई करितां मंडप घालावा. तो मंडप नगरांत चौखंडीत+ ( चौकांत ) किंवा जेथें पाणी मिळत नसेल अशा मार्गांतील झाडा खालीं करून त्या मंडपांत सुगंधानें युक्त ( ज्यांत वाळा कापूर इत्यादि पदार्थ टाकले आहेत ) असे पाण्यानें भरलेले घडे ठेऊन चांगलें आचरण करणारा पुत्र वगैरे परिवारानें युक्त अशा ब्राम्हणास योग्य वेतन देऊन त्या ठिकाणीं त्यास ठेवून प्रार्थना करावी, तो मंत्र—

---

× जेथें चार रस्ते एकत्र होतात त्यांस चौखंडी, चौक असें म्हणतात. संस्कृतांत यांस " चतुष्पथ " म्हणतात.

प्रपेयं सर्वसामान्य भूतेभ्य: प्रतिपादिता ।
अस्य: प्रदानात्सकला ममसंतु मनोरथाः ॥

नंतर महाराज ! त्या दिवसा पासून प्राण्यांचें परम जीवन असें उदक चार महिने पावेतों किंवा दीड महिना पावेतों निरंतर द्यावें. दररोज त्या ठिकाणीं शक्ति प्रमाणें ब्राम्हणांस भोजनही द्यावें. ह्या विधि प्रमाणें जो ग्रीष्मऋतूंत तापाचा नाश करणारें उत्तम असें उदक देईल त्याच्या पुण्याचें फल सांगतों ऐक. शंभर कपिला गाईंच्या दानाचें जें फल मिळेल तें फळ देवांनीं पूजा केलेल्या अशा उदक दान करणाऱ्या पुरुषास मिळेल.

ह्या प्रमाणें प्रपेचें दानाचा प्रकार आहे. (पाणपोई घालणें होय.)

---

## अथ हैमंतिकेऽग्निदानं

" भविष्ये "

अग्निं हेमंतशिशिरऋतौ तीर्थे द्विजालये सुरालये ।
मठे देवालये चैव अग्निं प्रज्वालयेत्तु यः ।
षष्ठिवर्षसहस्राणि स्वर्गलोके महीयतेइति ।
तथा प्रज्वालये द्वन्हिं सेवनार्थं द्विजन्मनां ।

दातव्यो दीपकोऽखंडोदेवमुद्दिश्य माधवमिति माधवोक्तेश्च

इति हेमंतशिशिरऋतावग्निदानं

## हेमंत ऋतूंत अग्नि ठेवणें.

हेमंत व शिशिर ऋतूंत तीर्थ इत्यादि ठिकाणीं थंडीचें निवारण होण्याकरितां अग्नि ठेविणें.

" भविष्य पुराणांत " हेमंत व शिशिर ह्या दोन ऋतूंत तीर्थ, ब्राम्हणाचें घर, मठ व देवालय ह्या ठिकाणीं जो अग्नि पेटवून ठेवील तो स्वर्ग लोकांत साठ हजार वर्षें पावेतों श्रेष्ठ मानला जातो. तसेंच ब्राम्हणांच्या शुश्रुषेकरितां अग्नि पेटवून ठेवावा. विष्णु देवास उद्देशून अखंड असा दीप लावावा " असें माधवाचें मत आहे.

ह्याप्रमाणें हेमंत व शिशिर ह्या ऋतूंतील अग्निचें दान सांगितलें.

---

### अथ दीपदानं

" संवर्तः "

देवागारे द्विजागारे दीपं दत्वा चतुष्पथे ।

मेधावी ज्ञानसंपन्नश्चक्षुष्मां श्च सदा भवेदिति तथोत्तरायणे दीपदानमतिप्रशस्तं

" मंत्री तु "

दीपोदानप्रदो नित्यं देवतानां प्रियः सदा ।

दानेनास्य भवेत्सौख्यं शांतिर्मे वांछितं फलं ।

सज्योतिस्तैलपात्रं च दीपं वाहुसमुन्नतं ।

सुखं स्यादस्य दानेन शांतिरस्तु सदा ममेति

इति दीपदानं

## दिवा लावणें.

" संवर्त "—देवळांत, ब्राम्हणाचें घरीं व चव्हाट्यावर जो दीप लावील तो बुद्धिमान् ज्ञान संपन्न व डोळस असा होईल. तसेंच उत्तरायणांत दिवा लावणें हें अति प्रशस्त होय. " दिवा लावण्याचा मंत्र "—

देऊळ वगैरे ठिकाणीं दिवा लावणें व त्याचें फळ.

दीपोदान प्रदोनित्यं देवतानां प्रियःसदा ।
दानेनास्य भवेत्सौख्यं शांति मे वांछितं फलं ॥
सज्योति स्तैल पात्रंच दीपं वाहु समुन्नतं ।
सुखंस्यादस्य दानेन शांतिरस्तु सदा मम ॥

ह्याप्रमाणें दीप दानाचा विधि ( दिवा लावणें ) सांगितला.

---

## अथ पांथपरिचर्या

" भविष्ये "

पांथं परिचरेद्यस्तु शयनासनभोजनैः ।
स स्वल्पेन प्रयासेन जयतिक्तुयाजिनमिति

" तथा "

अप्रणोद्योतिथिः सत्यमपि वा भूतृणोदकैरिति ॥

" याज्ञवल्क्यः "

" प्रचेता अपि "

यतः प्रातर्वैश्वदेवांते सायं वा गृहमागतः ।
देववत्पूजनीयोऽसौ सूर्योढः सोतिथिः स्मृतइति

" तथा "

दिवातिथौ तु विमुखे गते यत्पातकं नृणां ।
तदेवाष्टगुणं पुंसां सूर्योढे विमुखे गते ।
तस्मात्स्वशक्त्या राजेंद्र सूर्योढमतिथिं नरः
पूजयेत्पूजिते तस्मिन् पूजिताः सर्वदेवता इति

इति पांथपरिचर्या

---

## प्रवाशाची परिचर्या ( सेवा ) करणें.

पांथस्थाची सेवा करणें व त्याचें फळ इ.

" भविष्य पुराणांत " जो मनुष्य शयन, आसन व भोजन ह्यांच्या योगानें पांथस्थाची सेवा करील, तो थोड्या प्रयासानें यज्ञ करणारास जिंकील. " तसेंच संध्याकाळीं जरी अतिथि आला तरी त्याला परत लावूं नये, त्याचा भूमि तृण व उदक ह्यांच्या योगानें सत्कार करावा. " असें याज्ञवल्क्य म्हणतो. " प्रचेताही " सकाळीं किंवा वैश्वदेवाच्या शेवटीं किंवा संध्याकाळीं जो अतिथि घरीं येईल, त्याचें देवा प्रमाणें पूजन करावें; त्याला " सूर्योढ " असें म्हटलें आहे. " तसेंच " दिवसा अतिथि विमुख गेला असतां मनुष्यांस जें पातक होईल, तेंच पातक " सूर्योढ " असा अतिथि विमुख गेला असतां आठपट होतें, म्हणून हे राजश्रेष्ठा ! मनुष्यानें

आपल्या शक्तिप्रमाणें अतिथिचें पूजन करावें. त्याची पूजा केली असतां सगळ्या देवता पूजन केल्यासारख्या होतात.

ह्या प्रमाणें प्रवाशाची परिचर्या सांगितली.

---

## अथ गोपरिचर्या

" विष्णु "

गवां कंडूयनं चैव सर्वकल्मषनाशनं ।
गवां ग्रासप्रदानेन स्वर्गलोके महीयत इति

" ग्रासप्रदानमंत्रस्त्वपरार्के "

सुरभित्वं जगन्मातर्नित्यं विष्णुपदे स्थिता ।
सर्वदेवमये ग्रासं मया दत्तमिमं ग्रसा ।

" प्रार्थनामंत्रस्तु "

ततः सर्वदेवमये देवि सर्वदेवै रलंकृते ।
मातर्ममाभिलषितं सफलं कुरु नंदिनीति प्रार्थयेत्

इति गोपरिचर्या

---

## गाईची सेवा करणें.

गाईची सेवा करणें व तीस ग्रास देणें व त्यांची फळें.

" विष्णु "–गाईस खाजविलें असतां तें सर्व पातकांचा नाश करतें. गाईस ग्रास ( घास, गवत ) दिल्यानें स्वर्ग लोकांत श्रेष्ठता पावेल. घास देण्याचा मंत्र " अपरार्कांत "

सुरभित्वं जगन्मान नित्यं विष्णुपदेस्थिता ।
सर्वदेव मये ग्रासं मयादत्त मिमंग्रस ॥

ह्याप्रमाणें ह्या मंत्रानें घास दिल्यानंतर तिची प्रार्थना करावी तो

" सर्वदेव मये देवि सर्वदेवैरलंकृते ।
मातर्ममाभिलषितं सफलं कुरुनंदिनि ॥

ह्याप्रमाणें गाईची सेवा सांगितली.

---

अथ घर्मघटदानं

" विष्णु "

शीतलेन सुगंधेन वारिणा पूरितं घटं ।
शुक्लचंदनलिप्तांगं पुष्पदामोपशोभितं ।
दध्योदनभृतं कुर्याच्छरावं तस्य चोपरि ।
उपानच्छत्रसंयुक्तं धर्माख्यं कल्पयेद्धटं ।

पुष्पाक्षतान् गृहीत्वा तु इमं मंत्रमुदीरयेत् ।
नमोस्तु विष्णुरूपाय नमः सागरसंभव ।
अपां पूर्णोद्धरास्मात्वं दुःखसंसारसागरात् ।

" प्रार्थनामंत्रस्तु "

उदकुंभोमया दत्तोग्रीष्मकाले दिने दिने ।
*शीतोदकप्रदानेन प्रीयतां मधुसूदनइति ।

---

* " उदकुंभप्रदानेन " असा दानमयूखांत पाठ आहे.

" भविष्योत्तरे "

प्रत्यहं धर्मघटकोवस्त्रसंवेष्टितोनवः ।
ब्राम्हणस्य गृहे देयः शीतामलजलः शुचिः ।
वसंतग्रीष्मयोर्मध्ये पानीयं यः प्रयच्छति ।
पले पले सुवर्णस्य फलमाप्नोति मानवः ।
मार्गशीर्षात्समारभ्य उदकुंभं तु यः क्षिपेत् ।
दिने दिने सहस्रस्य गवां दानफलं लभेत् ।
तस्यैवोद्यापनं कार्यं मासि मासि नरोत्तम ।
मंडकावेष्टिकाभिश्च पक्वान्नैः सर्वकामिकैः ।
उद्दिश्य शंकरं विष्णुं ब्रम्हाणमथवा पितॄन् ।
सतिलं प्रोक्षयित्वा तु मंत्रेणानेन मानवः ।
" एष धर्मघटोदत्तोब्रम्हाविष्णुशिवात्मकः ।
अस्य प्रदानासत्कला मम संतु मनोरथाः ।
अनेन विधिनायस्तु धर्मकुंभं प्रयच्छति ।
वसंतग्रीष्मसमये गोप्रदानफलं लभेदिति ।
" इति धर्मघटदानं ॥

" कलशदानमंत्रस्तु "

कलशः शुभदोभव्योजलेन परिपूरितः ।
दानेनास्य महत्सौख्यं शांतिरस्तु सदा ममेति ।

" जलपात्रदानमंत्रोऽपि "

वारिणा पूरितं पात्रं तापत्रयहरं शुभं ।
देवर्षिपितृतृप्त्यर्थं गृहाण सुरसत्तमेति ।

## धर्म घटाचें दान.

पाण्यानें भरलेल्या घड्याचें दान करणें, त्याचा विधि, फळ आणि उद्यापन इ.

" विष्णु "—थंड सुगंधानें युक्त अशा घड्यास पांढरें चंदन लावून, फुलांच्या माळेनें सुशोभित करावें; नंतर त्याचे तोंडावर दहीं व भात ह्यानें भरलेला परळ ठेवून मांडे, वडे आणि सर्व प्रकारचीं पक्वान्नें ह्यांच्या योगानें त्याचें उद्यापन करावें. त्या घड्यास ' धर्मघट ' अशी कल्पना करावी, नंतर हातांत फुलें व अक्षता घेऊन पुढील मंत्र म्हणून

" नमोस्तु विष्णुरूपाय नमः सागर संभव ।
अपां पूर्णोद्धरा स्मात्वं दुःख संसार सागरात् ॥

त्या घड्यास वहाव्यात. " प्रार्थनेचा मंत्र "

उदकुंभो मयादत्तो ग्रीष्मकाले दिने दिने ।
शीतोदक प्रदानेन प्रीयतां मधूसुदन ॥

हा मंत्र म्हणून प्रार्थना करावी.

" भविष्योत्तर पुराणांत " थंड व निर्मळ अशा उदकानें युक्त असा स्वच्छ नवा धर्मघट [ घडा ] वस्त्रानें वेष्टन करून प्रति दिवशीं [ दररोज ] ब्राम्हणास द्यावा. जो मनुष्य वसंत आणि ग्रीष्म ह्या दोन ऋतूंत ब्राम्हणास उदक देईल, त्याला पळोपळीं ( पळापळांत ) सोन्याच्या दानाचें फळ मिळतें. जो मार्गशीर्ष महिन्यापासून दररोज ब्राम्हणास उदककुंभाचें दान करील, त्याला दररोज हजार गाईंच्या दानाचें फळ मिळेल, हे नरश्रेष्ठा! दरेक महिन्यांत शंकर किंवा

विष्णु किंवा ब्राम्हण अथवा पितर ह्यांस उद्देशून तिलासहवर्तमान त्या उदकुंभाचें प्रोक्षण करून पुढील मंत्रानें त्याचें दान करावें. तो मंत्र असाः—

" एषधर्मघटोदत्तो ब्रम्हाविष्णुशिवात्मकः ।
अस्य प्रदानात्सकला ममसंतु मनोरथाः ॥

ह्या विधिप्रमाणें जो मनुष्य वसंत व ग्रीष्म ह्या दोन ऋतूंत धर्म घटाचें दान करील, त्याला गाईचें दान केल्याचें फळ मिळेल.

ह्याप्रमाणें धर्मघटाचें दान सांगितलें.

---

" कलशाच्या दानाचा मंत्र "

कलशः शुभदो मव्यो जलेन परिपूरितः ।
दानेनास्य महत्सौख्यं शांतिरस्तु सदामम ॥

" उदक पात्राच्या* दानाचा मंत्र "

वारिणा पूरितं पात्रं तापत्रय हरं शुभं ।
देवर्षिं पितृतृप्त्यर्थं गृहाण सुरसत्तम ॥

---

अथ यज्ञोपवीतदानं

" बौधायनः "

यज्ञोपवीतदानेन जायते ब्रम्हवर्चसं ।
तस्मात्तानि प्रदेयानि ब्राम्हणेभ्यो विपश्चितेति "

इत्युपवीतदानं

---

* पाणी प्यावयाचें भांडें.

## यज्ञोपवितार्चे दान.

"बौधायन"—यज्ञोपविताचें दान केल्यानें "ब्राम्हवर्चस×" प्राप्त होतें, म्हणून ज्ञात्यानें तीं यज्ञोपवितें ब्राम्हणांस द्यावीत.

यज्ञोपवितार्चे दान करणें.

ह्याप्रमाणें यज्ञोपवितार्चे दान होय.

---

## अथ मासपक्षदानानि

" हेमाद्रौ "

माघे तिलदानात्पापनाशः याम्यलोकजयकामश्च ।
फाल्गुने प्रियंगुदानाल्लक्ष्मीवान् भवति ।
चैत्रे चित्रवस्त्रदानात्सौभाग्यवान् ।
वैशाखे अपूपदानात्स्वर्गलोकावाप्तिः ।
ज्येष्ठे छत्रदानात्सर्वान्कामानवाप्नोति ।
आषाढे चंदनकर्पूरदानात्फलातिशयः ।
श्रावणे वस्त्रदानान्महाफलं ।
भाद्रपदे फाणितदानात्फलातिशयः ।
फाणितं लोके काकवीति प्रसिद्धा ।
आश्विने घृतदानेन रूपवान् ।
कार्तिके दीपान्नदानाच्चानर्घं फलं ।
मार्गशीर्षे लवणदानाद्रूपवान् ।

---

× चांगलें आचरण करणें आणि वेदाचा अभ्यास ह्यांच्या समृद्धिला "ब्राम्हवर्चस" म्हणतात.

पौषे स्वर्णदानात्तुष्टिमान् ।
सर्वमासशुक्लपक्षेषु पुष्पदानान्महालक्ष्मीमवाप्नुयात् ।
कृष्णपक्षेषु फलदानात्फलातिशयः ।
इति मासपक्षदानानि

---

## महिने आणि पक्ष ह्यांतील दानें.

बारा महिने आणि दोन पक्ष ह्यांत तिळादिकांचें दान करणें व त्याचीं फळें.

" हेमाद्रींत " माघ महिन्यांत तिळांचें दान केल्यानें पापाचा नाश आणि यम लोकापासून जयाची प्राप्ति हीं फळें मिळतात. फाल्गून महिन्यांत गाळ्यांचें दान केल्यानें लक्ष्मीवान् होतो, चैत्र महिन्यांत चित्रविचित्र रंगांच्या वस्त्रांच्या दानापासून +सौभाग्याची प्राप्ति होते. वैशाख महिन्यांत *अपूपांचें दान केल्या पासून स्वर्ग लोकाची प्राप्ति होते. ज्येष्ठ महिन्यांत छत्रीचें दान केल्या पासून सर्व इच्छा ( मनोरथ ) पूर्ण होतात. आषाढ महिन्यांत चंदन व कापूर ह्यांच्या दाना पासून अतिशय फळ मिळतें. श्रावण महिन्यांत वस्त्राचें दान केल्या पासून मोठें फळ मिळतें. भाद्रपद महिन्यांत काकवीचें दान केल्यानें अतिशय फळ मिळतें. आश्विन महिन्यांत तुपाचें दान केल्यानें रूपवान होतो. कार्तिक महिन्यांत दीप आणि अन्न ह्यांच्या दाना पासून अमुल्य असें फळ मिळतें. मार्गशीर्ष महि-

+ सौंदर्य.

* घारगे वडे अनसें व वत्तासे ह्यांस अपूप म्हणतात.

न्यांत मिठाचें दान केल्यानें रूपवान होतो. पौष महिन्यांत सोन्याचें दान केल्या पासून संतोष होतो. सर्व महिन्यांच्या शुक्ल पक्षांत फुलांचें दान केल्या पासून मोठ्या लक्ष्मीची प्राप्ति होते. कृष्ण पक्षांत फळांचे दान केल्या पासून अतिशय फळ मिळतें.

ह्या प्रमाणें मास व पक्ष ह्यांतील दानें सांगितलीं.

---

अथाधिमासे दानं.

" हेमाद्रौ पाद्मे "

अधिमासे तु संप्राप्ते गुडसर्पिर्युतानि च ।
व्यतीपातचंद्रवद्वर्तुलान्यं व्रीहिपिष्टकृतानि च ।
साज्यानि दधिमिश्राणि अधिमासे नृपोत्तम ।
त्रयस्त्रिंशदपूपानि दातव्यानि दिने दिने ।
व्यतीपातदिने यद्वा द्वादश्यामथवा नृप ।
पौर्णमास्याममायां वा नवम्यां वा नृपोत्तम ।
अष्टम्यामथ पंचम्यां कुर्याद्भवमनुत्तमं ।
अधिमासे तु संप्राप्ते त्रयस्त्रिंशत्तु देवताः ।
उद्दिश्यापूपदानेन पृथ्वीदानफलं लभेत् ।
देवतानामानि तु भविष्ये "

१ विष्णुं २ जिष्णुं ३ महाविष्णुं ४ हरिं ५-६ कृष्णमधोक्षजं । ७ केशवं ८ माधवं ९ १० राममच्युतं ११ पुरुषोत्तमं । १२ गोविंदं १३ वामनं १४ श्रीशं १५ श्रीकंठं १६ विश्वसाक्षिणं । १७ नारायणं १८ मधुरिपु

१९ मनिरुद्धं २० त्रिविक्रमं । २१ वासुदेवं २२ जगद्योनिं २३ मनंतं २४ शेषशायिनं । २५ संकर्षणं च २६ प्रद्युम्नं २७ दैत्यारिं २८ विश्वतोमुखं । २९ जनार्दनं ३० धरावाप्तं ३१ दामोदर ३२ मघार्दनं । ३३ श्रीपतिं च त्रयस्त्रिंशदुद्दिश्य प्रतिनामभिः ।

त्रयस्त्रिंशदपूपानि कांस्यपात्रे निधाय च ।
सघृतं सहिरण्यं च ब्राम्हणाय निवेदयेत् ।

" अद्येत्यादि० मम फलावाप्तिविष्ण्वादिश्रीपत्यंतेभ्यः त्रयस्त्रिंशद्देवता उद्दिश्य श्रीपुरुषोत्तमभास्करप्रीतिकामश्च गोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं वायनकं त्रयस्त्रिंशदपूपोपेतकांस्यपात्रं सुवर्णघृततांबूलदक्षिणादिसोपस्करं श्रीविष्णुरूपाय ब्राह्मणाय तुभ्यमहं संप्रददे न ममेति दद्यात्

" दानमंत्रास्तु "

विष्णुरूपी सहस्रांशुः सर्वपापप्रणाशनः ।
अपुपान्नप्रदानेन मम पापं व्यपोहतु ।
नारायण जगद्बीज भास्कर प्रतिरूपक ।
दानेनानेन पुत्रांश्च संपदं चाभिवर्धय ।
यस्य हस्ते गदाचक्रे गरुडो यस्य वाहनं ।
शंखः करतले यस्य समे विष्णुः प्रसीदतु ।
कलाकाष्ठादिरूपेण निमेषघाटकादिना ।
योवंचयति भूतानि तस्मै कालात्मने नमः ।

कुरुक्षेत्रमयं देशः सूर्यपर्वद्विजोहरिः ।
पृथ्वीसममिदं दानं गृहाण पुरुषोत्तम ।
मलानां च विशुध्यर्थं पापप्रशमनाय च ।
पुत्रपौत्राभिवृध्यर्थं प्रदत्तं तव भास्कर ।
मंत्रैरेतैश्च योदद्यात्रयस्त्रिंशदपूपकान् ।
प्राप्नोति विपुलां लक्ष्मीं पुत्रपौत्रादिसंपदामित्युक्तं ॥

" महाभारते "

एतन्मलमासव्रतं तु दानरूपं सर्वेषां नित्यं
" मलमासं यदा प्राप्य संध्योपासनतर्पणं ।
श्राद्धादि नियमं जाप्यं निष्फलं तद्व्रतं विनेति "
भविष्येऽकरणे प्रत्यवायोक्तेश्च.

इत्यधिमासे दानरूपव्रतम्.

---

अधिक महिन्यांत तेहतीस अपूपांचें ( अनारशांचें ) दान करणें, त्याचा विधी आणि फळ.

" हेमाद्रींत " " पद्मपुराणांतील " हे नृप श्रेष्ठा ! अधिक महिना प्राप्त झाला असतां गुळ आणि तूप ह्यांनीं युक्त केलेले असे तांदुळांच्या पिठाचे चंद्राप्रमाणें वाटोळे असे अपूप ( अनारसे ) करून त्यांपैकीं तेहतीस अपूप तूप आणि दहीं ह्यांनीं युक्त असे करून ( अधिक महिन्यांत ) दररोज द्यावे. रोज देण्यास शक्य नसल्यास व्यतीपात, द्वादशी, पौर्णिमा, अमावास्या, नवमी, अष्टमी व पंचमी ह्यांपैकीं एकादे

दिवशीं अपूपांचें दान करावें. जो अधिक महिन्यांत तेहतीस देवतांस उद्देशून अपूपांचें दान करील त्याला पृथ्वीच्या दानाचें फळ मिळेल. तेहतीस देवतांचीं नांवे "भविष्य पुराणांत" १ विष्णु, २ जिष्णु, ३ महाविष्णु, ४ हरी, ५ कृष्ण, ६ अधोक्षज, ७ केशव, ८ माधव, ९ राम, १० अच्युत, ११ पुरुषोत्तम, १२ गोविंद, १३ वामन, १४ श्रीश, १५ श्रीकंठ, १६ विश्वसाक्षी, १७ नारायण, १८ मधुरिपु, १९ अनिरुद्ध, २० त्रिविक्रम, २१ वासुदेव, २२ जगद्योनि, २३ अनंत, २४ शेषशायी, २५ संकर्षण, २६ प्रद्युम्न, २७ दैत्यारि, २८ विश्वतोमुख, २९ जनार्दन, ३० धरावास, ३१ दामोदर, ३२ अघार्दन, व श्रीपति ह्या तेहतीस देवता होत. कांशाच्या पात्रांत तेहतीस अपूप ठेऊन ते तूप व सोनें ह्यांसह तेहतीस देवतांस उद्देशून प्रत्येक देवतेच्या नांवानें ब्राम्हणास दान करावें.

दानाचा संकल्प.

यजमानानें आचमन करून प्राणायाम करून "अद्येत्यादि० " ममफलावाप्ति विष्ण्वादि श्रीपत्यंतास्त्रय स्त्रिंशद्देवता उद्दिश्य श्री पुरुषोत्तम भास्कर प्रीतिकामश्च गोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं वायनकं त्रयस्त्रिंशदपूपोपेत कांस्यपात्रं सुवर्ण घृत तांबूल दक्षिणादि सोपस्करं श्रीविष्णुरुद्राय ब्राम्हणाय तुभ्यमहं संप्रददे नमम" ह्याप्रमाणे संकल्प करून अपूपांचें दान करावें.

"दानाचा मंत्र"—

विष्णुरूपी सहस्रांशुः सर्वपाप प्रणाशनः ।
अपूपान्न प्रदानेन ममपापं व्ययोहतु ।

नारायण जगद्बीज भास्कर प्रतिरूपक ।
दानेनानेन पुत्रांश्च संपदं चाभिवर्धय ।
यस्यहस्ते गदाचक्रे गरुडो यस्य वाहनं ।
शंखः करतले यस्य समेविष्णुः प्रसीदतु ।
कलाकाष्ठादि रूपेण निमेष घटिका दिना ।
योवंचयति भूतानि तस्मैकालात्मनेनमः ।

कुरुक्षेयमयंदेशः सूर्यपर्वद्विजोहरिः ।
पृथ्वीसममिदंदानं गृहाण पुरुषोत्तम ।

मलानांच विशुध्यर्थं पापप्रशमनायच ।
पुत्रपौत्राभिवृध्यर्थं प्रदत्तं तव भास्कर ॥

ह्या मंत्रांनीं जो ब्राम्हणास तेहेतीस अपूपांचें दान करील त्याला विपुल संपत्ति आणि पुत्रपौत्र यांची समृद्धि प्राप्त होईल. असें भारतांत सांगितलें आहे. मल (अधिक) मास प्राप्त झाला असतां त्यांत सांगितलेलें *व्रत केलें नसतां, संध्या ( संध्याकर्म ), तर्पण ( पितरादिकांचें ) श्राद्ध वगैरे नियम ( उपवासादि ) आणि जप हीं निष्फळ होतात. " ह्या प्रमाणें " भविष्य पुराणांत " तें व्रत केलें असतां प्रत्यवाय ( दोष ) सांगितला आहे; त्यावरून हें दानात्मक दानरूप असें अधिक महिन्यांतील व्रत सर्वांस नित्य ( अवश्यक ) आहे.

ह्या प्रमाणें अधिक मासांतील दानात्मक असें व्रत सांगितलें.

---

* तेहेतीस अपूपांचें दान.

अथ प्रातर्नित्यं घृतपात्रछायादानं

" भविष्ये "

कांस्यपात्रे स्थिताज्यं च आत्मरूपं निरीक्ष्य तु ।
ससुवर्णे तु यो दद्यात् सर्व विघ्नोपशांतये

" अद्येत्यादि० " ममैतच्छरीरावछिन्नसमस्तपापक्षयसर्वग्रहपीडाशांतिशरीरोत्थार्तिनाशकामः प्रसादवांछायु रारोग्यादिसर्व सौभाग्यकामः सौख्यकामोवा गोत्राय शर्मणे इदं स्वदेहछायावीक्षिताज्यपूरितकांस्यपात्रं ससुवर्णं विष्णुदैवतं तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" मंत्रौतु "

या लक्ष्मीर्यच्च मे दौस्थ्यं सर्वांगसमुपस्थितं ।
तत्सर्वं नाशयाज्य त्वं श्रियमायुश्च वर्धय ।
आज्यं तेजः समुद्दिष्टमाज्यं पापहरं परं ।
आज्यं सुराणामाहारः सर्वमाज्ये प्रतिष्टितं ।
आज्यपात्रप्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति ।

इति नित्यछायादानं

---

**नित्य सकाळीं तुपाच्या पात्रांचें छाया पाहून दान करणें.**

सकाळीं नित्य कांशाच्या भांड्यात तूप घालून त्यांत आपलें स्वरूप पाहून त्याचें दान करावें. त्याचा विधि.

" भविष्य पुराणांत " सर्व विघ्नांची शांति होण्याकरितां कांशाच्या भांड्यांत तूप घालून त्यांत आपलें स्वरूप पाहून तें सोन्याच्या दक्षिणेसह ब्राम्हणास दान करावें.

" दानाचा संकल्प " अद्येत्यादि०

ममैतच्छरीरावच्छिन्न समस्तपापक्षय सर्वग्रहपीडा शांति शरीरोत्थार्ति कामः अथवा प्रसादवांछायुरारोग्यादि सर्वसौभाग्यकामः अथवा " सौख्यकामः " गोत्रायशर्मणे इदं स्वदेहच्छायावीक्षिताज्यपूरितकांस्यपात्रं ससुवर्णं विष्णुदैवतं तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्याप्रमाणें संकल्प करून दान करावें. " दानाचा मंत्र "

यालक्ष्मीर्यश्च मे दौस्थ्यं सर्वांगसमुपस्थितं ।
तत्सर्वं नाशयाज्यत्वं श्रियमायुश्चवर्धय ।
आज्यं तेजः समुद्दिष्ट माज्यं पापहरं परं ।
आज्यं सुराणा माहारः सर्वमाज्ये प्रतिष्ठितं ।
आज्यपात्र प्रदानेन शांतिरस्तु सदामम ॥

ह्याप्रमाणें नित्यछाये ( पात्रा ) चें दान सांगितलें.

---

## अथ संक्रांति दानानि

" विश्वामित्रः "

मेषसंक्रमणे भावो मेषदानं महाफलं ।
वृषसंक्रमणे दानं गवां प्रोक्तं तथैवच ।
वस्त्रान्नदानपानानि मिथुने विहितानि तु ।
घृतधेनुप्रदानं तु कर्कटे च विशिष्यते ।
सिंहे च विहितं पात्रं दद्याद्वै ससुवर्णकं ।
कन्याप्रवेशे वस्त्राणां सुरभीणां तथैव च ।
तुलाप्रवेशे धान्यानां बहुबीज फलान्यपि ।
कीटप्रवेशे वस्त्राणां वेश्मनां दानमेवच ।

कीटो वृश्चिकः ।

धनुःप्रवेशे वस्त्राणां यानानां दानमुच्यते ।

झषप्रवेशे दारूणां दानमग्ने स्तथैवच ।

झषोमकरः ।

कुंभप्रवेशे दानं तु गवामंबु तृणस्यच ।

मीनप्रवेशे ह्यम्लान मालानामपि चोत्तमं ।

दानान्यथैतानि मया द्विजेंद्र

प्रोक्तानि काले तु नरश्च दत्वा ।

प्राप्नोति कामं मनसि स्वभीष्टं

तस्मात्प्रशंसंति हि कालदानमिति

अत्र कालः समयः

इति संक्रांति दानानि.

---

संक्रांतीवरील दानें.

मेष इत्यादि राशींत सूर्य गेला असतां मेषादिकांचीं दानें करावीं, त्यांचीं फळें.

" विश्वामित्र ":—सूर्य मेष राशींत गेला असतां मेंढ्याचें दान करणें तें ×महाफळ होतें. तसेंच वृषभ संक्रांतींत गाईचें दान सांगितलें आहे. मिथुन संक्रांतींत वस्त्रें, अन्नें ह्यांचीं दानें आणि +पानें विहित ( योग्य ) आहेत. कर्क

× मोठें ज्याचें फळ असें.

+ पाण्यांत साखर घालून तें पाजणें तसेंच पन्हें पाजणें इ.

संक्रांतींत = घृत धेनुचें दान हें विशेष मानलें आहे. कन्या राशींत सूर्याचा प्रवेश झाला असतां वस्त्रें, आणि गाई यांचीं दानें करावीं. तुला संक्रांतींत धान्यें आणि ज्यांत पुष्कळ बीं असतें अशीं फळें ह्यांचें दान करावें. वृश्चिक संक्रांतींत वस्त्रें आणि घरें ह्यांचीं दानें करावीं. धन संक्रांतींत वस्त्रें आणि यानें ( वाहनें ) ह्यांचें दान सांगितलें आहे. मकर संक्रांतीचा प्रवेश झाला असतां लांकडें आणि अग्नि ह्यांचें दान करावें. कुंभ संक्रांतींत गाई, उदक आणि घास ह्यांचें दान करावें. मीन संक्रांतीचा प्रवेश झाला असतां ताज्या फूलांच्या माळांचें दान श्रेष्ठ होय. हे द्विज श्रेष्ठा ? म्यां जीं हीं संक्रांतीवर दानें सांगितलीं तीं त्या काळीं मनुष्यानें दिलीं असतां त्याला मनांत इच्छिलेल्या मनोरथाची प्राप्ति होते म्हणून ज्ञाते समय काल दानाची फार प्रशंसा करतात.

ह्याप्रमाणें संक्रांतींत करावयाचीं दानें सांगितलीं.

---

## अथ नाना धान्य दान मंत्राः

" हेमाद्रौ दानकांडे "

देयं तद्योजयेत्पूर्वं ततो विप्रं प्रपूजयेत् ।

तत्तन्मंत्रैः प्रदद्याद्दै सर्वदानेष्वयं विधिरिति तत्रादौ

" तंदुलदानमंत्रः पावनाः "

---

= दश धेनु पृ. १८७ पहा.

सर्वयज्ञेषु प्रशस्ता होमकर्माणि।
तंदुलानां प्रदानेन प्रीयतामग्नीदेवता।

" तथा "

व्रीहिजास्तंडुलाः शुद्धाः पितृदेवद्विजप्रियाः।
तस्मादेषां प्रदानेन सर्वकामाश्च मे सदा

" व्रीहिदानमंत्रस्तु "

ब्रम्हणा निर्मिताः पूर्वं व्रीहयोयज्ञसाधनाः।
अनेन व्रीहिदानेन मम संतु मनोरथाइति

" यवदानमंत्रस्तु "

धान्यराजाश्च मांगल्ये द्विजप्रीतिकरा यवाः।
तस्मादेषां प्रदानेन ममास्त्वभिमतं फलं

" तथा "

पूर्वमेव हि यज्ञार्थं निर्मिता ब्रम्हणा यवाः।
अनेन यवदानेन शांतिरस्तु सदा ममेति

" गोधूमदानमंत्रस्तु "

धान्यचूडामणेर्जंबुद्वीपे गोधूमसंभवः।
गंधर्वसौख्यतृप्तिः स्यादतः शांतिं प्रयच्छमे।

" मुद्गदानमंत्रस्तु "

मुद्गधान्यं प्रियं चैव मनुष्याणां च नित्यशः।
तस्मादेषां प्रदानेन शांतिः स्वस्त्ययनं ममेति

" माषदानमंत्रस्तु "

यस्मान्मधुवधे काले विष्णुदेहसमुद्भवाः।
पितृणां तृप्तिदा माषा अतः शांतिं प्रयच्छमे

" चणकदानमंत्रस्तु "

पुरा गोवर्धनोद्धारसमये कृष्णभक्षिताः ।
चणकाः सर्वपापघ्ना अतः शांतिं प्रयच्छमे

" कुलित्थदानमंत्रस्तु "

अग्निगर्भोद्भवाः सौम्या बलारोग्यंयशःप्रदाः ।
कुलित्थानां प्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति

" तिलदानमंत्रस्तु "

तिलाः पापहरा नित्यं विष्णुदेहसमुद्भवाः ।
तस्मादेषां प्रदानेन पापनाशनमुच्यते इति ।

" स्वर्णतिलदानमंत्रस्तु "

तिलाः स्वर्णमया देवदुरितक्षयकारकाः ।
विष्णुप्रीतिकरा नित्यमतः शांतिं प्रयच्छमे ।

" ससुवर्णतिलपात्रदानमंत्रस्तु "

तिलाः पुण्याः पवित्राश्च सर्वपापहराः शुभाः ।
शुक्लाश्चैव तथा कृष्णा विष्णु गोत्रसमुद्भवाः ।
यानि कानि च पापानि ब्रम्हहत्यासमानि च ।
तिलपात्रप्रदानेन तानि नश्यंतु मे सदेति

" निष्पात्रदानमंत्रस्तु "

निष्पावानिर्मिताः पूर्वं लोकानां हितकाम्यया ।
तस्मादेषां प्रदानेन मम पापं व्यपोहत्विति

" प्रियंगुदानमंत्रस्तु "

प्रियंगवः प्रिया यस्मादग्नेश्च हव्यसाधनाः ।
तस्मादेषां प्रदानेन प्रीणाति पुरुषोत्तम इति

" श्यामाकदानमंत्रस्तु "

श्यामाकास्तु सदा पुण्याः पवित्रा यज्ञसाधनाः ।
अस्तस्तेषां प्रदानेन पावको वरदः सदेति

" कोद्रवदानमंत्रस्तु "

कोद्रवा निर्मिता देवैः प्राणिनां जीवनाय वै ।
तस्मादेषां प्रदानेन प्रीणातु पुरुषोत्तमेति ।

" लंकदानमंत्रस्तु "

वातप्रवर्धका लंका बलदाः पुष्टिकारकाः ।
प्राणिप्रीतिकरा नित्य मतः शांतिं प्रयच्छमे ॥

" यावनालदानमंत्रस्तु "

यावनालाः प्रीतिकराः कांतिपुष्टिबलप्रदाः ।
तस्मादेषां प्रदानेन सस्यपूर्णगृहं ममेति

" अथ मसूरिकादानमंत्रस्तु "

सवल्कला मसूरास्तु दुरितक्षयकारकाः ।
तस्मादेषां प्रदानेन विष्णुः प्रीतिकरो ममेति

" अथ सामान्यतः सर्वधान्यमंत्रस्तु "

धान्यं करोति दातारमिह लोके परत्र च ।
तस्मादस्य प्रदानेन मम संतु मनोरथा इति

इति हेमाद्रौ नानाधान्यमंत्राः

---

## नाना प्रकारच्या धान्यांच्या दानांचे मंत्र.

नाना प्रकारच्या धान्यांच्या दानांचें मंत्र व विधि.

" हेमाद्रिंत " " दान खंडांत " पूर्वी ज्याचें दान करावयाचें तें पर्वी योजावें, नंतर ब्राम्हणाची पूजा करावी आणि मग त्या द्रव्याच्या मंत्रांनीं दान करावें. सर्व वस्तुंच्या दानाविषयीं हा विधि समजावा. सर्वांच्या पूर्वी तांदुळांच्या दानाचा मंत्रः—

" पावना: सर्व यज्ञेषु प्रशस्ता होम कर्मणि।
तंदुलानां प्रदानेन प्रियता मग्नि देवता।

" तसेंच "

व्रीहीजा स्तंडुला: शुद्धा: पितृ देव द्विजप्रिया:।
तस्मा देषां प्रदानेन सर्व कामाश्च मे सदा।

" भाताच्या दानाचा मंत्र "

ब्राम्हणा निर्मिता: पूर्वं व्रीहयो यज्ञ साधना:।
अनेन व्रीहि दानेन मम संतु मनोरथ:।

" जवांच्या दानाचा मंत्र. "

धान्य राजाश्च मांगल्ये द्विज प्रीतिकरा यवा:
तस्मादेषां प्रदानेन ममास्त्वाभिमतं फलं।

" तसेंच "

पूर्वमेव हियज्ञार्थं निर्मिता ब्रम्हणा यवा:।
अनेन यव दानेन शांतिरस्तु सदा मम।

" गव्हांच्या दानाचा मंत्र "

धान्य चुडामणे जंबुद्वीपे गोधूम संभव:।
गंधर्व सौख्य तृप्ति:स्या दत: शांतिं प्रयच्छमे।

" मुगांच्या दानाचा मंत्र "

मुद्ग धान्यं प्रियं चैव मनुष्याणां च नित्यश:।
तस्मादेषां प्रदानेन शांति: स्वस्त्थयनं मम।

" उडदांच्या दानाचा मंत्र "

यस्मा न्मधुवधे काले विष्णु देह समुद्भवाः ।
पितृणां तृप्तिदा माषा अतःशांतिं प्रयच्छमे ।

" चण्यांच्या दानाचा मंत्र "

पुरा गोवर्धनोद्धार समये कृष्ण भक्षिताः ।
चणकाः सर्व पापघ्ना अतः शांतिं प्रयच्छमे ।

" कुळीथांच्या दानाचा मंत्र "

अग्निगर्भोद्भवाः सौम्या बला रोग्य यशः प्रदाः ।
कुलित्थानां प्रदानेन शांति रस्तु सदामम ।

" तिळांच्या दानाचा मंत्र "

तिलाः पाप हरा नित्यं विष्णु देह समुद्भवाः ।
तस्मा देषां प्रदानेन पाप नाशन मुच्यते ।

" सोन्यानें युक्त अशा तिळांचे दानाचा मंत्र "

तिलाः स्वर्ण मयादेवे दुरित क्षयकारकाः ।
विष्णु प्रीति करा नित्य मतः शांतिं प्रयच्छमे ।

" सोन्यानें युक्त अशा तिळ पात्राच्या दानाचा मंत्र "

तिलाः पुण्याः पवित्राश्च सर्व पाप हराः शुभाः
शुक्ला श्चैव तथा कृष्णा विष्णु मात्र समुद्भवाः ।
यानि कानिच पापानि ब्रम्हहत्या समानिच ।
तिलपात्र प्रदानेन तानि नश्यंतु मे सदा ।

" पावट्यांच्या दानाचा मंत्र "

निष्पावा निर्मिताः पूर्वं लोकानां हितकाम्यया ।
तस्मा देषां प्रदानेन मम पापं व्यपो हतु ।

" राळ्यांचा दानाचा मंत्र "

प्रियंगवः प्रियायस्मा दग्नेश्च हव्यसाधनाः ।
तस्मादेषां प्रदानेन प्रीणाति पुरुषोत्तम ।

" साव्याच्या दानाचा मंत्र "

श्यामाकास्तु सदा पुण्याः पवित्रा यज्ञसाधनाः ।
अतस्तेषां प्रदानेन पावको वरदः सदा ।

" कोद्र्यांच्या दानाचा मंत्र "

कोद्रवा निर्मिता देवैः प्राणिनां जीवनायवै ।
तस्मादेषां प्रदानेन प्रीणातु पुरुषोत्तम ।

" लांकाच्या दानाचा मंत्र "

वातप्रवर्धका लंका बलदाः पुष्टिकारकाः ।
प्राणिश्वेतिकरा नित्य मतः शांतिं प्रयच्छमे "

" जोंधळ्याच्या दानाचा मंत्र "

यावनालाः प्रीतिकराः कांति पुष्टि बलप्रदाः ।
तस्मादेषां प्रदानेन सस्यपूर्णं गृहं मम ।

" मसूरांच्या दानाचा मंत्र "

सवल्कला मसूरास्तु दुरित क्षयकारकाः ।
तस्मादेषां प्रदानेन विष्णुः प्रीतिकरो मम ।

" साधारणतः सर्व धान्यांच्या दानाचा मंत्र "

धान्यं करोति दातार इहलोके परत्रच ।
तस्मादस्य प्रदानेन ममसंतु मनोरथाः ।

ह्याप्रमाणें हेमाद्रींत नाना प्रकारच्या धान्यांच्या दानांचे मंत्र सांगितले.

अथान्नदानमंत्रा अपि

" तत्रैव "

" आदौ पायसमंत्रस्तु "

पायसं शर्करायुक्तं सघृतं कांस्य भाजने ।
प्रदानाम्ने फलं चास्तु ऐहिकामुष्मिकं च यदिती

" कमंडलु +मंडक दान "

" मंत्रस्तु "

सूर्यमंडलसंभूता गव्यदुग्धयुताः प्रियाः ।
जनार्दनादि देवाना मतः पाहि सनातनेति

" ओदनमंत्रस्तु "

अन्नं ब्रह्ममयं साक्षान्नराणां जीवरक्षणं ।
ओदनस्य प्रदानेन मम संतु मनोरथा ।

इति " दध्यन्नदान मंत्रस्तु "

चंद्रमंडल मध्यस्थं चंद्रांबुज समप्रभं ।
दध्यन्नं स्यास्य दानेन प्रियतां वामनो ममेति ।

" कृसरान्न दानं "

कृसरान्नं स्वादुवर्यं देवानां प्रीतिवर्धनं ।
घृतव्यंजनसंयुक्तं दत्वा रोगै र्विमुच्यत इति ।

---

+ आदित्यतेजसोत्पन्नाः सर्वमंगल कारकाः ।
मंडकाः सर्व पापघ्ना अतः शांतिं प्रयच्छ मे ।

असा " दानमयूखांत " पाठ आहे.

" नानाभक्ष्यदान मंत्रस्तु "

केशवस्य प्रिया भक्ष्याः शंभुब्रम्हादि तुष्टिदाः ।

पृथग्विधाः पूपकाद्या यच्छंतु बलमौरस मिति ।

" सर्वान्नदान मंत्रस्तु "

अन्नमेव यतोलक्ष्मी रन्नमेव जनार्दनः ।

अन्नं ब्रम्हाखिलत्राणमस्तु मे सर्वजन्मनीति ।

इति हेमाद्रावुक्ता अन्नदानमंत्राः

---

## अन्नाच्या दानाचे मंत्र.

खीर वगैरे पदार्थांच्या दानांचे मंत्र.

त्यांतच ( हिमाद्रिंत ) पूर्वी पायसाच्या ( खिरीच्या ) दानाचा मंत्रः—

पायसं शर्करायुक्तं सघृतं कांस्यभाजने ।
प्रदानाम्नेफलंचास्तु ऐहिकामुष्मिकंचयत

" मांड्यांच्या दानाचा मंत्र "

सूर्यमंडल संभूता गव्यदुग्धयुताः प्रियाः ।

जनार्दनादि देवाना मतः पाहि सनातन ।

" भाताचा मंत्र "

अन्नं ब्रम्हमयं साक्षान्नराणां जीवरक्षणं ।

ओदनस्य प्रदानेन ममसंतु मनोरथाः ।

दहिंभाताच्या दानाचा मंत्र "

चंद्रमंडल मध्यस्थं चंद्रांबुज समप्रभं ।

दध्यन्नं चास्य दानेन प्रीयतां वामनो ममः ।

" खिचडीच्या दानाचा मंत्र "

कृसरान्न स्वादुवर्धं देवानां प्रीतिवर्धनं ।
घृतव्यंजन संयुक्तं दत्वारोगै विमुच्यते ।

" नाना प्रकारच्या भक्ष्याच्या दानाचा मंत्र "

केशवस्य प्रिया भक्ष्याः शंभुब्रम्हादि तुष्टिदाः ।
पृथग्विधाः पूपकाद्या यच्छंतु बहुमौरसं ।

" सर्व अन्नांच्या दानाचा मंत्र "

अन्नमेव यतोलक्ष्मी रन्नमेव जनार्दनः ।
अन्नं ब्रम्हाखिलत्राण मस्तु मे सर्वजन्मनि ।

ह्याप्रमाणें हेमाद्रिंत अन्नाच्या दानाचे मंत्र सांगितले.

---

## अन्येऽपि केचन मंत्राः

" तत्रत्याएव "

" सक्तुदानमंत्रस्तु "

प्राजापत्या यतः प्रोक्ताः सक्तवो यज्ञकर्मणि ।
तस्मादेषां प्रदानेन प्रीयतां मे प्रजापतिरिति

" शर्करादानमंत्रस्तु "

अमृतस्य कुलोत्पन्ना इक्षवोप्यथ शर्करा ।
सूर्यप्रीतिकरा नित्यमतः शांतिं प्रयच्छमे

" तथा "

शर्करेक्षुरसोद्भूता सदा स्वादुकरा प्रिया ।
दानेनास्यास्तु मे नित्यं तुष्टाः स्यु र्द्विजदेवता इति

" गुडदानमंत्रस्तु "

प्रणवः सर्वमंत्राणां नारीणां पार्वती यथा।
तथा रसानां प्रवरः सदैवेक्षुरसोमतः।
मम तस्मात्परां शांतिं ददस्व गुड सर्वदेति

" इक्षुदंडदानमंत्रस्तु "

इक्षुदंडं गुरुतरं रसालं सर्वकामदां।
दानेनानेन तस्याशु प्रीयतां परमेश्वर इति

" मधुदानमंत्रस्तु "

यस्मात्पितॄणां श्राद्धेषु पीतं मध्वमृतोद्भवं।
सदा तस्य प्रदानेन मोक्षः स्याद्दुःखसागरादिति

" घृतदानमंत्रः "

कामधेनोः समद्भूतं देवानामुत्तमं हविः।
आयुर्विवर्धनं दातुराज्यं पातु सदैव मामिति

" तैलदानमंत्रः "

तैलं पुष्टिकरं नित्यमायुर्वर्ध्यघनाशनं।
अमांगल्यहरं श्रीमदतः शांतिं प्रयच्छ मे इति

" नवनीतदानमंत्रस्तु "

कामधेनोः समद्भूतं विष्णोः प्रीतिकरं परं।
नवनीतप्रदानेन बलं पुष्टिं च मेऽच्युतेति

" तथा "

क्षीरार्णवसमद्भूतं विष्णोस्तुष्टिकरं सदा।
नवनीतप्रदानेन वांछितं चास्तु मे सदेति

" क्षीरदानमंत्रः "

अलक्ष्मीहरणं नित्यं सौभाग्यबलवर्धनं ।
क्षीरं मंगलमायुष्यमतः शांतिं प्रयच्छ मे

" तथा "

शिशूनां जीवनं क्षीरं पितृदेवप्रियं सदा ।
कांतिदं पुष्टिदं नित्यमतः शांतिं प्रयच्छ मे इति

" दधिदानमंत्रः "

क्षीरेणाम्लसमद्भूतं देवर्षिपितृतृप्तिदं ।
दधि स्यान्मेऽमृतं नित्यमतः शांतिं प्रयच्छ मे इति

" तक्रदानमंत्रः "

तक्रं दधिसमुद्भूतं प्राणिनां तृप्तिदं परं ।
अतस्तस्य प्रदानेन शांतिरस्तु सदा ममेति

" पुष्पदानमंत्रः "

मनोहराणि पुष्पाणि सदा देवप्रियाणि च ।
अतस्तेषां प्रदानेन मम संतु सुराः प्रिया इति

" फलदानमंत्रः "

मनोहराणि रम्याणिनित्यं स्वादुकराणि च ।
फलानां संप्रदानेन संतति स्त्वमला ममेति

" तथा "

फलानि मधुराणीह मुनिदेवप्रियाणि च ।
तस्मादेषां प्रदानेन सफला मे मनोरथा इति

" तांबुलदानमंत्रः "

सोपस्करं च तांबुलं सर्वदा मंगलं प्रियं ।
प्रियं चैव तु देवानां सौगंध्यं वदनेऽस्तु मे इति

" पादुकादानमंत्रः "

कंटकोच्छिष्टपाषाणवृश्चिकादिनिवारणे ।
पादुके संप्रदत्ते मे द्विजप्रीत्या प्रगृह्यतामिति

" उपानद्दानमंत्रः "

उपानहौ प्रदत्ते मे कंटकादिनिवारणे ।
सर्वमार्गेषु सुखदे अतः शांतिं प्रयच्छ मे

" छत्रदानमंत्रः "

इहामुत्रातपत्राणं कुरु मे केशव प्रभो ।
छत्रं त्वत्प्रीतये दत्तं ममास्तु च सप्त शुभमिति

" चामर दान मंत्रः "

शशांककरसंकाश हिमडिंडीरपांडुर ।
प्रोत्सारयाशु दुरितं चामरामरवल्लभेति ।

" पत्रिका दानमंत्रः "

पत्रिका सर्वजंतूनां शैत्यानंदकरी शुभा ।
*देवेंद्र प्रीतये दत्ता अतः शांतिं प्रयच्छमे इति ।

" व्यजनदान मंत्रः "

व्यजनं वायुदैवत्यं ग्रीष्मकाले सुखप्रदं ।
अस्य प्रदानात्सकला मम संतु मनोरथा इति ।

---

ह्या ठिकाणीं * पितृणां तृप्तिदा नित्यमतः शांतिं प्रयच्छ मे ।
असा " दानमयूखांत " पाठ आहे.

" दर्पणदान मत्रंः "

दर्शनेन त्वमादर्श नृणां मंगलदायकः ।
सर्वसौभाग्य सत्कीर्ति निर्मलं ज्ञानमस्तु मे ।

---

## दुसरेही कित्येक दानांचे मंत्र.

" त्यांतच " ( हेमाद्रिंत ) " सातुच्या दानाचा मंत्र "

दुसरेही सातु वगैरेंच्या दानांचे मंत्र.

प्राजापत्यायत: प्रोक्त: सक्तवोयज्ञकर्मपि । तस्मादेषां प्रदानेन प्रीयतां मे प्रजापति: "

सा़खरेच्या दानाचा मंत्र

अमृतस्य कुलोत्पन्ना इक्षवोप्यथ शर्करा ।
सूर्यप्रीतिकरा नित्यमतः शांतिं प्रयच्छमे ।

" तसेंच "

शर्करेक्षुरसोद्भूता सदा शङ्करप्रिया ।
दानेनस्यास्तुमे नित्यं तुष्टाः स्यु र्द्विजदेवताः ।

" गुळाच्या दानाचा मंत्र "

प्रणवः सर्वे मंत्राणां नारीणां पार्वती यथा ।
तथा रसानां प्रवर: सदैवेक्षुरसोमतः ।
मम तस्मात्परांशांतिं ददस्वगुडसर्वदा ।

" उसाच्या दानाचा मंत्र "

इक्षुदंडं गुरुतरं रसालं सर्व कामदं ।
दानेनानेन तस्याश्रुप्रीयतां परमेश्वराः ।

" मधाच्या दानाचा मंत्र "

यस्मा त्पितॄणां श्राद्धेषु पीतं मध्वमृतोद्भवं ।
सदा तस्य प्रदानेन मोक्षः स्यादुःखसागरात् ।

" तुपाच्या दानाचा मंत्र "

कामधेनोः समभ्दूतं देवानामुत्तमं हविः ।
आयुर्वि वर्धनं दातुराज्यं पातुसदैवमां ।

" तेलाच्या दानाचा मंत्र "

तैलं पुष्टिकरं नित्यमायुर्वर्ध्यघनाशनं ।
अमांगल्यहरं श्रीमदतः शांतिंप्रयच्छमे ।

" लोण्याच्या दानाचा मंत्र "

कामधेनोः समभ्दूतं विष्णोःप्रीतिकरंपरं ।
नवनीत प्रदानेन बळंपुष्टिंचमेऽच्युत ।

तसेंच क्षीरार्णव समद्भूतं विष्णोस्तुष्टिकरं सदा ।
नवनीत प्रदानेन वांछितं चास्तुमेसदा ।

" दुधाच्या दानाचा मंत्र "

अलक्ष्मीहरणं नित्यं सौभाग्यबलवर्धनं ।
क्षीरं मंगळ मायुष्यमतः शांतिं प्रयच्छमे ।
तसेंच शिशुनां जीवनं क्षीरं पितृदेवप्रियं सदा ।
कांतिदं पुष्टिदं नित्यमतः शांतिं प्रयच्छमे ।

" दह्याच्या दानाचा मंत्र "

क्षीरेणाम्लं समद्भूतं देवर्षि पितृतृप्तिदं ।
दधिस्यात्मेऽमृतं नित्यमतः शांतिं प्रयच्छमे ।

" ताकाच्या दानाचा मंत्र "

तक्रं दधि समभ्दूतं प्राणिनां तृप्तिदं परं

अतस्तस्य प्रदानेन शांतिरस्तु सदामम ।

" फुलांच्या दानाचा मंत्र "

मनो हराणि पुष्पाणि सदादेव प्रियाणिच ।

अतस्तेषां प्रदानेन ममसंतु सुराः प्रियाः ।

" फळांच्या दानाचा मंत्र "

मनोहराणि रम्याणि नित्यं स्वादुकराणिच ।

फलानां संप्रदानेन संतति स्त्वमला मम ।

" तसेंच "

फलानि मधुराणीह मुनिदेव प्रियाणिच ।

तस्मा देषां प्रदानेन सफला मे मनोरथाः ।

" तांबुलाच्या दानाचा मंत्र "

सोपस्करंच तांबूलं सर्वदा मंगलं प्रियं ।

प्रियंचैवतु देवानां सौगंध्यं वदनेऽस्तुमे ।

" पादुकांच्या दानाचा मंत्र "

कंटकोच्छिष्ट पाषाण वृश्चिकादि निवारणे ।

पादुके संप्रदत्ते मे द्विज प्रीत्या प्रगृह्यतां ।

" चर्मी जोड्याच्या दानाचा मंत्र "

उपानहौ प्रदत्ते मे कंटकादि निवारणे ।

सर्व मार्गेषु सुखदे अतः शांतिं प्रयच्छमे ।

" छत्रीच्या दानाचा मंत्र "

इहामूत्रा तपत्राणं कुरुमे केशव प्रभो ।
छत्रं त्वत्प्रीतये दत्तं ममास्तुच सदा शुभं ।

" चवरीच्या दानाचा मंत्र "

शशांककर संकाश हिम डिंडिर पांडुर ।
प्रोत्सारयाशु दुरितं चामरामरवल्लभ ।

" *पत्रिकेच्या दानाचा मंत्र "

पत्रिका सर्व जंतूनां शैत्यानंद करी शुभा ।
देवेंद्र प्रीतये दत्ता अतः शांतिं प्रयच्छमे ।

" पंख्याच्या दानाचा मंत्र "

व्यजनं वायुदैवत्यं ग्रीष्मकाले सुखप्रदं ।
अस्य प्रदानात्सकला ममसंतु मनोरथाः "

" आरशाच्या दानाचा मंत्र "

दर्शनेन स्वमादर्शं नृणां मंगलदायकः ।
सर्व सौभाग्य तत्कीर्तिं विमलं ज्ञानमस्तु मे ।

---

## अथ कूष्मांडदानं

" भविष्ये "

ब्रम्हहत्यादिपापघ्नं कूष्मांडं सुखसौख्यदं ।
कार्तिके रथसप्तम्यां दद्यात्पुण्यदिने ष्वपीति

---

* टीका=" पंखा " असा अर्थ दानमयूखांत उल्लेख केला आहे.

" अद्येत्यादि० मम ब्रम्हहननादिसमस्तपापक्षयपूर्वकबहुपुत्रपौत्रसौभाग्यादिसकलमनोरथावाप्तिकूष्मांडबीजसमसहस्रसंख्याकाब्दब्रम्हलोकनिवासकामोगोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं कूष्मांडफलं बहुबीजाढ्यं घृतप्लुतं मुक्ताप्रवालरत्नहेमफलतांबूलवस्त्रादियुतं गोधूमराशिस्थितं वनस्पतिदैवतं सुवर्णदक्षिणायुतं तुभ्य महं संप्रददे न ममेति द्विजहस्ते फलं दद्यात्

" दानमंत्रस्तु तत्रैव "

ब्रम्हहत्यादिपापघ्नं ब्राम्हणानिर्मितं पुरा ।
कूष्मांडं बहुबीजाढ्यं पुत्रपौत्रादिवृद्धिदं ।
मुक्ताप्रवालहेमादियुक्तं दत्तं तव द्विज ।
अनंतपुण्यफलदमतः शांतिं प्रयच्छ मे "

इति कूष्मांडदानं

---

## कोहळ्याचें दान

कोहळ्याचे दानाचें फळ आणि त्याचा विधि.

" भविष्य पुराणांत " कोहळा (भुरा) हा ब्रम्हहत्त्या वगैरे पापांचा नाश करून अत्यंत सुख देणारा आहे असें सांगितलें आहे म्हणून, कार्तिक महिन्यांत, रथसप्तमी आणि पुण्यकारक दिवशींही त्याचें दान करावें.

" दानाचा संकल्प "

कर्त्यानें नित्य कर्म आटोपून आचमन करून " अद्येत्यादि " मम ब्रम्हहननादि समस्त पापक्षयपूर्वक बहु पुत्रपौत्र सौभाग्यादि सकल

मनोरथावाप्ति कूष्मांडबीजसम सहस्रसंख्याकाद्ब ब्रम्हलोक निवास-कामो गोत्राय शर्मणे सुपूजिताय इदं कूष्मांड फलं बहुबीजाढ्यं घृतप्लुतं मुक्ताप्रवालरत्न हेमफल तांबूल वस्त्रादियुतं तुभ्यमहं संप्र-ददेन मम " ह्याप्रमाणें संकल्प करून ब्राम्हणाच्या हातांत तें फळ ( कोहळा ) द्यावें. " दानाचा मंत्र "

ब्रम्हहत्यादि पापघ्नं ब्रम्हणां निर्मितं पुरा ।
कूष्मांडं बहुबीजाढ्यं पुत्रपौत्रादि वृद्धिदं ।
मुक्ताप्रवाल हेमादियुक्तं दत्तं तव द्विज ।
अनंत पुण्य फलद मतः शांतिं प्रयच्छ मे ।

ह्याप्रमाणें कूष्मांडाचें दान सांगितलें.

---

## अथ देशविशेषेण मकरसंक्रांतौ सौभाग्यवतीनां दानविशेष

" उक्तोहेमाद्रौ व्यासेन "

सौभाग्यद्रव्यदानं च स्त्रीभिः कार्यं प्रयत्नतः ।
सभर्तृकाभिः संक्रांतौ फलादीनां मृगे रवौ ।
दानं षोडशसंख्याकमेकैकस्य फलस्य च ।
हैमराजतकांस्यानां भाजनानि यथा भवेत् ।

" वर्धितफलदानमंत्रः "

सतिलं गुडसंयुक्तं रसप्रीतिकरं नृणां ।
वर्धितं संगृहाणेद मतः शांतिं प्रयच्छ मेति

" सतिलगुडग्रासदानमंत्रः "

मकरेर्के तु संप्राप्ते ग्रासास्तिलगुडोद्विजे ।
दानेन पुत्रसौभाग्यं धनधान्यं सदास्तु मे

" भांडदानमंत्रः "

हिरण्यादिनि भांडानि पात्राणि मृन्मयानि च ।
गृहाणेमानि वै यस्माद्भास्करः प्रीयतां मम

" गोधूमपिष्टदानमंत्रः "

गोधूमजानितं पिष्टं शर्कराघृतसंयुतं ।
द्विजवर्य गृहाण त्वमतः शांतिं प्रयच्छ मे "

" शूर्पस्थार्द्रतंदुलदानमंत्राः "

तंदुलाः शालिजाः शुक्लाः सार्द्राः शूर्पे व्यवस्थिताः ।
संप्रदानेन वै तेषां शांतिरस्तु सदा मम

" पायसपूरितकांस्यपात्रदानमंत्रः "

सौभाग्यभाजनं कांस्यं पायसान्नेन पूरितं ।
दानेनानेन सौभाग्यं शांतिरस्तु सदा ममेति

" फलपुष्पसहितकदलीस्तंभदानमंत्रः "

कदली सर्वदोषघ्नी हेमवर्णांबरावृता ।
दानेनास्या पुत्रपौत्रसौभाग्यं चास्तु मे सदेति

" सौभाग्यद्रव्ययुतशूर्पदानमंत्रः "

सकंचुकं वस्त्रयुग्मैस्तथा कर्णावतंसकैः ।
कंठसूत्रादि शूर्पस्य दानात्पातु शिवा मम ।

" जानकीप्रीतये शूर्पपंचकदानमंत्रः "

रामपत्नि महाभागे सौभाग्यद्रव्यसंस्थिते ।
गृहाणेमानि शूर्पाणि सोपस्काराणि जानकि
सौभाग्यं भाग्यमारोग्यं सुतसौख्यं सदाऽस्तु मे इति
अथ षोडशविप्रेभ्यः सांगषोडश षोडश फलदानानि

" भविष्यपुराणे "

दानं षोडशसंख्याकमेकैकस्य फलस्यच ।
एवं षोडशविप्रेभ्यो दत्वेप्सितमवाप्नुयादिति

अद्येत्यादि० मम समस्तपापक्षयपूर्वकसकलसौभाग्यस्त्रीपुत्रपौत्रादिप्सितानंतफलावाप्तये दीयमानफलसमसंख्यवर्षसहस्रावच्छिन्नदेवांगनाभिः सह भोगोत्तरानेकसुखावाप्तिकामश्च नानानामगोत्रेभ्यः षोडशसंख्याकेभ्यः सुपूजितेभ्य इमानि षोडशसंख्याकान्यमुकफलान्येकैकस्मै सगोधूमतांबूलफलदक्षिणायुतानि वनस्पतिदैवतानि दातुमहमुत्सृजे न ममेति दत्वा प्रणमेदिति

" दानमंत्रः "

फलषोडशसंयुक्तं स्वर्णधान्यादिसंयुतं ।
द्विजवर्य गृहाण त्वं मम संतु मनोरथा इति

इति षोडशिकाफलदानं.

## देश विशेषानें मकरसंक्रातीचे दिवशीं सुवाशिनीनीं करावयाचीं विशेष दानें.

मकरसंक्रांतीचे दिवशीं सुवासिनीनीं करावयाचीं दानें, त्यांचीं फळें आणि प्रयोग.

" हेमाद्रित " " व्यास "–सुवासिनी स्त्रियांनीं मकरसंक्रांतीचे दिवशीं सौभाग्यकारक अशा द्रव्यांचें दान अवश्य करावें. तें असें– सूर्य मकर राशीत गेला असतां फळें वगैरेंचें दान, एकेक ब्राम्हणास सोळा सोळा फळांचें दान आणि सोनें, रुपें व कांसें ह्यांचीं मांडीं ह्यांचें दान जसें अनुकूळ असेल त्याप्रमाणें द्यावें. " वर्धित फळाच्या दानाचा मंत्र "

सतिलं गुडसंयुक्तं रसप्रीतिकरं नृणां ।
वर्धितं संगृहाणेदं मतः शांतिं प्रयच्छमे ।

" तीळगुळाच्याग्रासाच्या ( लाडवाच्या ) दानाचा मंत्र "

मकरेंतु संप्राप्ते ग्रास स्तिळगुडो द्विजे ।
दानेन पुत्र सौभाग्यं धनधान्यं सदास्तुमे ।

" मांड्यांच्या दानाचा मंत्र "

हिरण्यादीनि भांडानि पात्राणि मृन्मयानिच ।
गृहाणे मानिवैयस्मा द्भास्करः प्रीयतां मम ।

" गव्हाच्या पिठाच्या दानाचा मंत्र "

गोधूमजनितं पिष्टं शर्कराघृतसंयुतं ।
द्विजवर्य गृहाणत्व मतः शांतिं प्रयच्छमे ॥

" सुपांतून ओलें तांदूळ देण्याच्या दानाचा मंत्र "

तंदुलाः शालिनाः शुक्लाः सार्द्राः शूर्पे व्यवस्थिताः ।
संप्रदानेन वैतेषां शांतिरस्तु सदा मम ॥

" खिरीनें भरलेल्या कांश्याच्या भांड्याच्या दानाचा मंत्र "

सौभाग्य भाजनं कांस्यं पायसान्नेन पूरितं ।
दानेनानेन सौभाग्यं शांतिरस्तु सदा मम ।

" फळें व फुलें ह्यांसहित केळीच्या खांबाच्या दानाचा मंत्र "

कदली सर्वदोषघ्नी हेमवर्णांबरावृता ।
दानेनास्याः पुत्रपौत्रसौभाग्यं चास्तु मे सदा ।

" सौभाग्यकारक द्रव्यांनीं युक्त अशा सुपाच्या दानाचा मंत्र"

सकंचुकं वस्त्रयुग्मैस्तथाकर्णावतंसकैः ।
कंठसूत्रादि शूर्पस्य दानात्पातु शिवा मम ।

" सीतेची प्रीति होण्याकरितां पांच सुपांच्या दानाचा मंत्र "

रामपत्नि महाभागे सौभाग्यद्रव्य संस्थिते ।
गृहाणेमानि शूर्पाणि सोपस्कारााणि जानकि ।
सौभाग्यं भाग्यमारोग्यं सुतसौख्यं सदास्तुमे ।

" सोळा ब्राम्हणांस सांग+ अशा सोळा सोळा फळांचीं दानें " " भविष्यपुराणात " एकेका जातीचीं सोळा सोळा फळें सोळा ब्राम्हाणांस दिल्या पासून इच्छिलेलें फळ मिळेल. "दानाचा संकल्प " दान करणारानें आचमन करून " अद्येत्यादि० मम-

---

+ गहूं, तांबूल वगैरे द्रव्यानें सहित.

समस्तपापक्षयपूर्वक सकलसौभाग्यस्त्रीपुत्रपौत्रादीप्सितानंतफलप्राप्तये दीयमानफलसमसंख्यवर्षसहस्रावच्छिन्नदेवांगनाभिःसहभोगोत्तरानेकसुखावाप्तिकामाय नानानामगोत्रेभ्यः षोडशसंख्याकेभ्यः-सुपूजितेभ्य इमानि षोडशसंख्याकान्यमुकफलान्येकैकस्मै सगोधूम तांबूल फलदक्षिणायुतानि वनस्पतिदैवतानि दातुमह मुत्सृजे नमम ”

ह्या प्रमाणें संकल्प करून दान करून ब्राम्हणांस नमस्कार करावा.

“ दानाचा मंत्र ”

फलषोडशसंयुक्तं स्वर्णधान्यादिसंयुतं ।
द्विजवर्यगृहाणत्वं मम संतु मनोरथाः ॥
ह्या प्रमाणें सोळा फळांचें दान सांगितलें.

---

अथ व्यतीपाते सुवर्णदानं

“ आह हेमाद्रौ ”

शंकुकर्ण प्रलंबोष्ठ लंबभ्रूदीर्घनासिक ।
अष्टनेत्र चतुर्वक्त्र विस्तीर्णशतयोजनां ।
व्यतीपात नमस्तेस्तु सोमसूर्यसुत प्रभो ।
यत्किंचि द्दीयते स्वर्णं मेरुतुल्यं तु तद्भवेदिति

“ अद्येत्यादि०मम समस्तपापक्षयपूर्वकहेममयाहेमाचलदानसमफलावाप्त्यक्षय्यसुखश्रीसूर्यजनार्दनप्रीति कामश्च गोत्राय शर्म्रणे सुपूजितायेदं सुवर्णं अग्निदैवतं सदक्षिणं तुभ्यमहं संप्रददे न ममेति

" दानमंत्रः "

गुंजामात्रमिदं स्वल्पं हेम विप्रकरेर्पितं ।
हिमाचलमितं भूत्वा प्रीयतां मे जनार्दनइति ।
हिरण्यगर्भगर्भस्थमिति वा

इति व्यतीपाते सुवर्णदानं.

---

व्यतीपातावर सोन्याचें दान देण्याविषयीं.

व्यतीपाताचे दिवशीं सोनें दान करणें ह्याचा विधि व फळ.

" हेमाद्रिंत " शंकु प्रमाणें ज्याचे कान आहेत, लांब ज्याचे ओंठ आहेत, लांब ज्याच्या मिवया आहेत, लांब ज्याचें नाक आहे, आठ ज्याला डोळे आहेत, चार ज्याला तोंडें आहेत, शंभर योजनें जो विस्तीर्ण आहे अशा चंद्र आणि सर्य याच्या पुत्रा, प्रभो व्यतीपाता, तुला नमस्कार असो. अशा ( वर्णन केलेल्या, व्यतीपातावर , किंचित् जरी सोनें दिलें तरी त्याचें महात्म्य मेरुएवढ्या दिलेल्या सोन्याप्रमाणें आहे. " दानाचा संकल्प "—अद्येत्यादि० ममसमस्तपापक्षयपूर्वकहेममयाहिमाचलदानसमफलावाप्त्यक्षय्यसुखश्रीसूर्यजनार्दन प्रीतिकामश्च गोत्रायशर्मणे सुपूजितायेदं सुवर्णं अग्निदैवतं सदक्षिणं तुभ्यमह संप्रददे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून सोन्याचें दान करावें. " दानाचा मंत्र "

गुंजामात्रमिदंस्वल्पंहेमविप्रकरेर्पितं ।
हिमाचलमितं भूत्वा प्रीयतां मे जनार्दनः ॥

हा मंत्र म्हणून दान द्यावें अथवा " हिरण्यगर्भगर्भस्थं " ह्या मंत्रानें दान द्यावें.

ह्या प्रमाणें व्यतीपातावर सोन्याचें दान सांगितलें.

---

अथाश्वत्थसेचनं

" भविष्य पुराणे "

उदकुंभप्रदाने तु अशक्तोयः पुमान् भवेत् ।
तेनाश्वत्थतरो मूलंसेव्यं नित्यंजितात्मना ।
सर्वपापप्रशमनं सर्वदुःखविनाशनं ।
सर्वरोगापहं नित्यं ध्रुवं संततिवर्धनं ।

" सेचनमंत्रः "

सिंचामितेऽश्वत्थमूलं मम संततिवृद्धये ।
अश्वत्थरूपी भगवान्प्रीयतां मे जनार्दनः ।
अनेन मंत्रवर्येण सिंचेदश्वत्थमूलकं ।
नमस्कुर्यां ततः सम्यक् प्रार्थयेच्चपुनःपुनरिति

" सेचनफलमपितत्रैव "

यःकरोतितरोर्मूले सेकंमासचतुष्टये ।
मनोरथास्तु सिध्यंतिश्रुतिरेषासनातनी मासचतुष्टये चैत्रादौ

" वैशाखधर्मेऽपि "

अश्वत्थमूलमासिंचेत्तोयेन बहुनासदा ।
कुलानामयुतं तेन तारितं स्यान्नसंशयइति

इत्यश्वत्थसेचनं.

अथाथर्वणीये अश्वत्थाभिमंत्रणं आरात्रेइत्यस्याग्नि-
कांडांतो योनित्वनग्निर्ऋषिःवनस्पतिर्देवता अनुष्टुपछंदः
अश्वत्थाभिमंत्रणेविनियोगः ॐआरात्तेअग्निरस्त्वारा-
त्परशुरस्तुते निर्वातेत्वाभिवर्षंतु स्वस्तितेऽस्तु वनस्पते।
ते कारस्थाने मेकारः स्वयंवक्तव्यः

" पौराणमंत्रस्तु "

अक्षिस्पंदं भूजस्पंदं दुःस्वप्नं दुर्विचिंतितं ।
शत्रुतश्चसमुत्पन्नमश्वत्थशमयस्वमे

" पुराणांतरे मंत्रांतरमुक्तं "

मूलतो ब्रह्मरूपाय मध्यतो विष्णुरूपिणे ।
अग्रतः शिवरूपाय अश्वत्थायनमोनम इति
अश्वत्थस्पर्शंतु मंदवासरएव कुर्यात्
अन्यवासरे ष्वर्चनं सेचनं सेवनंच दूरतएव कुर्यादि
त्युक्तं " पाद्मे "

इत्यश्वत्थसेचनं

---

## पिंपळास पाणी घालणें.

पिंपळास पाणी शिंपण्याचा विधि व त्याचें फळ.

" भविष्य पुराणांत " जो मनुष्य उदकुंभ देण्याविषयीं अशक्त असेल त्यानें आपलें मन स्वाधीन ठेऊन नित्य पिंपळाच्या मुळास पाणी घालावें. हें सर्व पापाचें शमन करणारें, सर्व दुःखाचा व रोगांचा नाश करणारें, आणि संततीची वृद्धि करणारें आहे.

पाणी घालण्याचा मंत्र "

सिंचानमितेऽश्वत्थ मूलं मम संतति वृद्धये ।

अश्वत्थरूपी भगवान् प्रीयतांमे जनार्दनः ।

ह्या श्रेष्ठ मंत्रानें पिंपळाच्या मूळाचें सिंचन करावें. ( पाणी घालणें. ) नंतर नमस्कार करून वारंवार उत्तम रीतीनें प्रार्थना करावी. " *सेचनाचें फळही त्यांतच " सांगितलें आहे जो नित्य चैत्रादि चार महिन्यांत पिंपळाच्या मुळांस पाणी घालील त्याचे सर्व मनोरथ पूर्ण होतील, अशी सनातनी श्रुति आहे. " वैशाख घर्मांतही " जो निरंतर पुष्कळ उदकानें पिंपळाच्या मूळाचें सेचन करील तो दहा हजार कुळांचें तारण करील, ह्यांत संशय नाहीं.

अथर्वण वेदांतील पिंपळाचें अभिमंत्रण ( मंत्र )—आरात्ते

अथर्वण वेदांतील मंत्र व पौराणिक मंत्र.

इत्यस्याग्निकांडांतोयोनिस्वनाग्निऋषिः वनस्पतिर्देवता अनुष्टुप्छंदः अश्वस्थामंत्रणे विनियोगः ॐ आरात्ते अग्निरस्त्वारात्परशुरस्तुतेनिर्वातेत्वाभिवर्षतु स्वस्तितेऽस्तुवनस्पते " ह्या मंत्रांतील " तेकाराच्या " ठिकाणीं " मेकार " +स्वत् म्हणावा.

" पुराणांतील मंत्र "

" आक्षिस्पंदं भुजस्पंदं दुःस्वप्नं दुर्विचिंतितं ।

शत्रुतश्च समुत्पन्न मश्वत्थ शमयस्वमे ॥

---

* ( पाणी शिंपण्याचें. )

+ मंत्र म्हणणारानें स्वतः 'ते' च्या जागीं 'मे' लावून उच्चार करावा. असें:—आरात्मे अग्निरस्त्वारात्परशुरस्तुमे इ०

दुसऱ्या पुराणांतील दुसरा मंत्र.

मूलतो ब्रह्मरूपाय मध्यतो विष्णुरूपिणे ।
अग्रतः शिवरूपाय अश्वत्थाय नमोनमः ॥

पिंपळास स्पर्श करणें तो शनिवारींच करावा; दुसऱ्या वारीं पूजा, सिंचन ( शिंपणें, पाणी घालणें ) व सेवा करणें हीं दुरूनच करावीं असें "पद्मपुराणांत" सांगितलें आहे.

ह्याप्रमाणें पिंपळास पाणी घालण्याचा विधि सांगितला.

---

## अथ सूर्यादीनां वैषम्ये दानान्युक्तानि

"ज्योतिःसारे"

कौसुंभवस्त्रं गुडहेमताम्र माणिक्यगोधूमसुवर्णपद्मं ।
सवत्सगोदानमिति प्रणीतं दुष्टाय सूर्याय मसूरिकाश्चेति॥१।

घृतकलशं सितवस्त्रं दधि शंखं मौक्तिकं सुवर्णं च ।
रजतं च प्रदद्याच्चंद्रारिष्टोपशांतये त्वरितं ॥ २ ॥

प्रवालगोधूममसूरिकाश्च वृषं सताम्रं करवीरपुष्पं ।
आरक्तवस्त्रं गुडहेमताम्रं दुष्टाय भौमाय च रक्तचंदनं। ॥३॥

नीलं वस्त्रं मुद्गहेमं बुधाय रत्नं पाचीं दासिकां हेम सर्पिः ॥
कांस्यं दंतं कुंजरस्याथ मेषोरौप्यं सस्यं पुष्पं जात्यादिकं च ।४।

अश्वः सुवर्णं मधु पीतवस्त्रं सपीतधान्यं लवणं सपुष्पं ।
सशर्करं तद्रजनीप्रयुक्तं दुष्टाय शांत्यै गुरवे प्रणीतं ॥ ५ ॥

चित्रवस्त्रमपि दानवार्चिते दुष्टगे मुनिवरैः प्रणोदितं ।
तंदुलं घृतसुवर्णरौप्यकं वज्रकं परिमलोधवला गौः ॥ ६ ॥
नीलकं माहिषं वस्त्रं कृष्णं लोहं सदक्षिणं ।
विश्वामित्र्या युतं दद्याच्छनिदौष्टयप्रशांतये । ७ ॥
राहौ दानं कृष्णमेषोगोमेदोलोहकंबलौ ।
सुवर्णनागरूपं च सतिलं ताम्रभाजनं ॥ ८ ॥
केतोर्वैडूर्यममलं तैलं मृगमदस्तथा ।
ऊर्णा तिलै स्तु संयुक्तं दद्यात्क्लेशापनुत्तये ॥ ९ ॥

इति नवग्रहाणां दाने द्रव्याण्युक्तानि

---

## सूर्यादिग्रह अनिष्ट असतां त्यांचीं दानें.

जन्मराशीपासून सूर्यादि नऊ ग्रह गोचर प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें निंद्य स्थानीं असतां त्यांच्या शांतीकरितां वस्त्रादि दानें करावीं.

" ज्योतिःसारांत " सूर्य *अनिष्ट असतां कुसुंबी रंगाचें वस्त्र, गूळ, तांबें, माणिक, तांबड्या रंगाचें कमळ, वासरासह गाय व मसूरा ह्यांचें दान करावें. तुपाचा घडा, पांढरें वस्त्र, दहिं, शंख, मोतीं, सोनें व रुपें हीं चंद्रापासून होणाऱ्या अरिष्टाच्या शांतीकारितां त्वरित द्यावीं. मंगळ अनिष्ट असतां पोंवळें, गहुं, मसुरा, तांबडा बैल, कण्हेरीचें फूल, तांबडें वस्त्र, गूळ, सोनें, तांबें व रक्तचंदन ह्यांचें दान करावें. बुध अनिष्ट असतां–

---

* जन्मराशीपासून ग्रहाच्या राशी पावेतों मोजावें, जर तें स्थान गोचर प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें निंद्य असेल तर तो ग्रह वाईट फळ देणारा समजावा.

निळें ( काळें ) वस्त्र, मूग, सोनें, पाचू ( रत्न ), दासी, सोनें तूप, कांसें, हस्तिदंत, मेंढा, रुपें, धान्य व जाई इत्यादि फुलें ह्यांचें दान करावें. गुरु अनिष्ट असतां—घोडा, सोनें, मध, पिंवळें वस्त्र, पिंवळें धान्य ( हरभऱ्याची डाळ ) मीठ, पिंवळें फूल, साखर व हळकुंडें ह्यांचें दान करावें० शुक्र दुष्ट स्थानीं असतां मुनीवरांनीं—चित्रविचित्र रंगाचें वस्त्र, तांदूळ, तूप, सोनें, रुपें, हिरा, परिमळ ( सुगंधी द्रव्य कस्तुरी इ. )व पांढरी गाय ह्यांचें दान सांगितलें आहे. शनीच्या दुष्ट फळाची शांति होण्या करितां निळें व काळें वस्त्र, रेडा, दक्षिणेनें युक्त असें लोखंड व म्हैस ह्यांचें दान करावें. राहु अनिष्ट असतां— काळा मेंढा गोमेद ( नीळ ) लोखंड, कांबळें, सोन्याचा नाग व तिळांनीं भरलेलें तांब्याचें मांडें ह्यांचें दान करावें. केतु अनिष्ट असतां क्लेश न होण्या कारितां निर्मळ +वैडूर्य, तेल, कस्तुरी, लोंकरीचें वस्त्र ( कांबळें ) इ० व तीळ ह्यांचें दान करावें.

ह्या प्रमाणें नऊ ग्रहांच्या दानांचीं द्रव्यें सांगितलीं.

---

अथ ग्रहाणां दानानि

" ब्राम्हे "

ग्रहदानक्रमं वक्ष्ये सर्वसिद्धिकरं परं ।
सर्वशांतिकरं नृणां सर्वपापप्रणाशनमिति ॥

---

+ एक जातीचें रत्न.

" दानकालमपि तत्रैव "

अयने विषुवे चंद्रसूर्योपरागे जन्मर्क्षे भानुवासरे। पंचदश्यां प्रातिकूल्ये पुण्यकाले पुण्यदेशे विवाहादौ च दानं कार्यं॥

" तत्रायं प्रकारः "

हस्तमात्रां द्विहस्तां वा वेदीं कृत्वा गोमयेनोपलिप्य तत्र सर्वतोभद्रं पंचरंगैर्विलिख्य वस्त्रं तत्र प्रसार्य तंदुलैस्तत्र नवकोष्ठात्मकं पद्मं कृत्वा कोष्ठेषु तंदुलैः पद्मानि कृत्वा तेषु निष्कत्रयेण यथाशक्त्या वा सुवर्णप्रतिमा आदित्यादिनवग्रहाणां कृत्वाऽदौ आदित्यं मध्यमे कोष्ठे आग्नेये चंद्रं दक्षिणे भौममैशान्यां बुधमुत्तरे गुरूं पूर्वे शुक्रं पश्चिमे शनैश्चरं नैऋत्ये राहुं वायव्ये केतुं तत्तन्मंत्रैस्तत्तत्पुष्पैस्तत्तद्गंधधूपदीपनैवेद्यादिभिः संपूज्य प्रार्थयेत्

" प्रार्थनामंत्राः "

पद्मासनः पद्मकरोद्विबाहुः पद्मद्युतिः सप्ततुरंगवाहः।
दिवाकरोलोकगुरुः किरीटी मयि प्रसादं विदधातु देवः॥१॥
श्वेतांबरः श्वेतविभूषणश्च श्वेतद्युतिर्दंडकरो द्विबाहुः।
चंद्रोमृतात्मा वरदः किरीटी श्रेयांसि मह्यं विदधातु देवः॥२॥
रक्तांबरो रक्तवपुः किरीटी चतुर्भुजो मेषगतो गदाभृत्।
धारासुतः शक्तिधरश्च शूली सदा मम स्याद्वरदः प्रशांतः॥३॥
पीतांबरः पीतवपुः किरीटी चतुर्भुजोदंडधरश्च हारी।
चर्मासिधृक् सोमसुतः सदा मे सिंहाधिरूढोवरदोबुधश्च॥४॥

पीतांबरः पीतवपुः किरीटी चतुर्भुजो देवगुरुः प्रशांतः।
दधाति दंडं च कमंडलुं च तथाक्षसूत्रं वरदोस्तु मह्यं ॥ ५ ॥

श्वेतांबरः श्वेतवपुः किरीटी चतुर्भुजोदैत्यगुरुः प्रशांतः।
तथाक्षसूत्रं च कमंडलुं च दंडं च बिभ्रद्वरदोस्तु मह्यं ॥६॥

नीलद्युतिः शूलधरः किरीटी गृध्रस्थितस्त्रासकरोधनुष्मान्।
चतुर्भुजः सूर्यसूतः प्रशांतः सदास्तु मह्यं वर मंदगामी ॥७॥

नीलांबरोनीलवपुः किरीटी करालवक्त्रः करवालशूली।
चतुर्भुजश्चर्मधरश्च राहुः सिंहासनस्थो वरदोस्तु मह्यं ॥८॥

धूम्रो द्विबाहुर्वरदोगदाभृत् गृध्रासनस्थोविकृताननश्च।
किरीटकेयूरविभूषितांबरः सदास्तु मे केतुगणः प्रशांतः॥९॥
इति संप्रार्थ्य दद्यात्

इति प्रार्थनामंत्रादान मंत्राश्च.

---

ग्रहांचीं दानें.

ग्रह प्रतिकूळ असतां त्यांच्या सोन्यांच्या प्रतिमा करून त्यांचें पूजन करून अयन इत्यादि पुण्यकाळीं दान करावें.

" ब्रम्हपुराणांत " मनुष्यांच्या सर्व प्रकारच्या सिद्धीस करणारें, सर्व प्रकारची शांति करणारें व सर्व पापांचा नाश करणारें असें ग्रहांचें दान क्रमानें सांगतों. दानाचा काळही त्यांतच सांगितला तो असा '–मकर व कर्क ह्या दोन संक्रांति, मेष व तुळा ह्या दोन संक्रांति, चंद्र व सूर्य ह्यांचीं ग्रहणें, जन्म नक्षत्र, रविवार

पौर्णिमा, +प्रतिकूलता, पुण्यकाळ, पुण्यदेश (तिर्थादि) व विवाह वगैरे ह्यांवर ग्रहांचें दान करावें. 'त्याविषयींचा असा प्रकार— हातायेवढी अथवा दोन हातायेवढी वेदी ( समचौरस ओटा ) करून, तीस शेणानें सारवून तिच्यावर पांच रंगांचें सर्वतोभद्र मंडळ लिहून त्यावर वस्त्र पसरून त्यावर तांदुळांनीं नऊ कोष्टकांचें कमळ काढून त्या कोष्टकांवर तांदुळांचीं कमळें करावीं; नंतर सूर्यादि नऊ ग्रहांच्या तीन *निष्काएवढ्या वजनाच्या सोन्याच्या अगर आपले शक्तीप्रमाणें प्रतिमा करून त्यांतील प्रथम मधल्या कोष्टकावर सूर्य ( त्याची प्रतिमा ), आग्नेयीस चंद्र, दक्षिणेस मंगळ; ईशान्येस बुध, उत्तरेस गुरु, पूर्वेस शुक्र, पश्चिमेस शनि, नैर्ऋत्येस राहु व वायव्येस केतु ह्याप्रमाणें ग्रहांचें स्थापन करून त्या त्या ग्रहांच्या त्या त्या मंत्रांनीं ग्रहांस युक्त सांगितलेलीं फुलें, गंध, धूप, दीप, नैवेद्य इत्यादिकांनीं त्यांची पूजा करून पुढील मंत्रांनीं त्यांची प्रार्थना करावी.

" पद्मासनः पद्मकरोद्विबाहुः पद्मद्युतिः सप्ततुरंगवाहः।
दिवाकरोलोकगुरुः किरिटी मयि प्रसादं विदधातु देवः ॥१॥
श्वेतांबरः श्वेतभूषणश्च श्वेतद्युतिर्दंडकरो द्विबाहुः।
चंद्रोऽमृतात्मा वरदःकिरिटी श्रेयांसि मह्यं विदधातु देवः ॥२॥
रक्तांबरो रक्तवपुः किरिटी चतुर्भुजो मेषगतो गदाभृत्।
धारासुतः शक्तिधरश्च शूली सदा मम स्याद्वरदः प्रशांतः ॥३॥

---

\+ ज्यावेळीं आपल्या जन्मराशीपासून गोचर ग्रह वाईट असतात तेव्हां.

* ८ गुंजांचा एक कर्ष आणि ४ कर्षांचा एक निष्क होतो.

पितांबरः पीतवपुः किरीटी चतुर्भुजोदंडधरश्च हारी ।
चर्मासितृक् सोमसुतः सदा मे सिंहाधिरूढो वरदोबुधश्च ॥४॥
पीतांबरः पीतवपुः किरीटी चतुर्भुजो देवगुरुः प्रशांतः ।
दधाति दंडंच कमंडलुं च तथाक्षसूत्रं वरदोस्तु मह्यं ॥५॥
श्वेतांबरः श्वेतवपुः किरीटी चतुर्भुजो दैत्यगुरुः प्रशांतः
तथाक्षसूत्रं च कमंडलुं च दंडंच बिभ्रद्वरदोस्तु मह्यं ॥ ६ ॥
नीलद्युतिः शूलधरः किरीटी गृध्रास्थित स्त्रासकरो धनुष्मान् ।
चतुर्भुजः सूर्यसुतः प्रशांतः सदास्तु मह्यं वरं मंदगामि ॥७॥
नीलांबरोनीलवपुः किरीटी करालवक्त्राः करवालशूली ।
चतुर्भुजश्चर्मधरश्च राहुः सिंहासनस्थो वरदोस्तु मह्यं ॥८॥
धूम्रो द्विबाहुर्वरदो गदाभृत् गृध्रासनस्थो विकृताननश्च ।
किरीटकेयुर विभूषितांबरः सदास्तु मे केतुगणः प्रशांतः ॥९॥

ह्या प्रमाणें नऊ ग्रहांची प्रार्थना करून त्यांचें
दान करावें.

ह्या प्रमाणें ग्रहांचीं दानें सांगितलीं.

---

### अथ वासरदोषापनोदनानि दानादि.

" संहिताप्रदीपे "

भानुस्तांबूलदानादपरति नृणां वै कृतं चासरोत्थं सोमः श्रीखंडदानादवनितनुजोरक्तपुष्पप्रदानात् । सौम्यः शक्रस्य मंत्री हरिहरनमनाद्भार्गवः शुभ्रवस्त्रात्तैलस्नाना त्प्रभाते दिनकरतनयो ब्रम्हनत्वा परे चेति

वारांचा दोष घालविणारीं दानें.

" संहिताप्रदीपांत " तांबुलांचें दान केल्यापासून सूर्य मनुष्यांचें संकटांचा नाश करतो. चंदनाच्या दानापासून चंद्र व तांबड्या फुलांच्या दाना पासून भौम दुष्टकाळाचा नाश करतो. बुध आणि गुरु हे विष्णु आणि शंकर ह्यांच्या स्तवनापासून वाईट फळांचा नाश करतात. पांढऱ्या वस्त्राच्या दानापासून शुक्र व सकाळीं तेलाच्या स्नानानें शनि हे दुष्ट फळाचा नाश करतात. दुसरे ग्रह ब्राम्हणांस नमस्कार केल्या पासून दुष्ट फळांचा नाश करतात.

वारांचा दोष घालविणारीं तांबुलादिकांचीं दानें.

ह्या प्रमाणें वारांचा दोष घालविणारीं दानें सांगितलीं

---

अथ सहस्रभोजन विधिः

" भविष्यपुराणे "

सहस्रभोजनस्येह विधि नारायणोमुनिः ।
सर्वेषां चैव पुण्यानामब्रवीत्पुण्यमुत्तमं ।
यदा चित्तं च वित्तं च भक्तिरात्माने जायते ।
तदानीमेव कर्तव्यं प्रीयते परमात्मनः ।
आषाढं चैव पौषं च मलमासं तथैव च ।
गुरुभार्गवयोरस्तं हित्वा न्यस्मिन्शुभे दिने ।
कृत्वादौ मंगलस्नानं शुद्धः सन् भार्यया सह ।
कृत्वादौ द्रव्यशुध्यर्थं प्रायश्चितं यथाविधि ।

दशांशद्रव्यमादाय विप्रेभ्योविनिवेदयेत्।
द्रव्यं संप्रोक्षयेत्पश्चात्संपादितं तदाज्ञया।
गणेशं पूजयेत्पूर्वं मातृणां पूजनं ततः।
कृत्वाभ्युदयिकं श्राद्धं स्वस्तिवाचनपूर्वकं।
आचार्यं पजयेत्पश्चाद्वस्त्रालंकारभूषणैः।
ऋत्विजोवरये दक्षो वस्त्रगंधैश्च पूजयेत्।
पुष्पमंडपिकां कृत्वा चतुरस्त्रां सुशोभनां।
कृत्वेशस्य सुवर्णेन प्रतिमां कर्षनिर्मितां।
सशक्तिकस्य देवस्य भवानीशंकरस्य च।
तस्याधिदेवता विष्णुर्ब्रह्माप्रत्याधिदेवता।
कृत्वा तु प्रतिमाशुद्धिमग्न्युत्तारणपूर्वकम्।
षोडशैरुपचारैश्च तत्तन्मंत्रैः प्रपूजयेत्।
ऋग्भिश्च पावमानीभिरभिषिच्य यथाविधि।
पुष्पमंडपिकामध्ये स्थापनं तंडुलोपरि।
प्रतिमां तत्र संस्थाप्य कलशे चांबरावृते।
समंताद्देवदेवस्य क्रमेणैव तु पूर्वतः।
तत्तन्मंत्रेण नाम्ना वा पूजयेदंगदेवताः।
कर्णिकायां भवानीशो ह्याधिप्रत्याधिसंयुतः।
तद्बहिश्चैवचत्वारस्तद्बहिः षोडश क्रमात्।
एक त्रिंशद्बहिश्चाष्टचत्वारिं शत्तथा क्रमात्।
पद्मस्य दलवच्छस्ताः कर्णिकाशतसंग्रहाः।
दिग्देवा १० ऋषयः ७ सप्तसागरा ४ भुवनत्रयं ३।
नद्यः सप्त ७ गुणाश्चैव ३ वेदा ४ श्चारमेत्यनुक्रमात्।

" अत्र पीठयंत्रदेवतास्थापनक्रमप्रयोगं चाह "

आदौ पद्मकर्णिकायां मध्ये अधिदेवताविष्णुब्रह्मप्रत्यधिदेवतासहितं भवानीशंकरं स्थापयेत् ।

तद्बहिश्चतुर्दलपद्मे प्रादक्षिण्येन गणेश १ दुर्गा २ क्षेत्रपाला ३ भयंकराः ४ स्थाप्याः ।

तद्बहिस्तृतीये षोडशदले षोडश मातरः ।

गौरी १ पद्मा २ शची ३ मेधा ४ सावित्री ५ विजया ६ जया ७ ।

देवसेना ८ स्वधा ९ स्वाहा १० मातरो ११ लोकमातरः १२ ।

धृतिः १३ पुष्टि १४ स्तथा तुष्टि १५ रात्मनः कुलदेवताः १६ ।

तद्बहिरेकात्रिंशद्दले वसुरुद्रादिसाः

अष्टौ वसवस्तु ध्रुवोऽ १ ध्वरुश्च २ सोमश्च ३ आपश्चैवानिलो ५ नलः ६ ।

प्रत्यूषश्च प्रभासश्च ८ वसवोऽष्टौ प्रकीर्तिताइति

" एकादश रुद्रास्तु "

वीरभद्रश्च १ शंभुश्च २ योगीशो ३ जेकपात्तथा ४ ।
अहिर्बुन्घ्यः ५ पिनाकी च ६ शोभनाधीश्वर ७ स्तथा।
कपाली ८ विट्पतिः ९ स्थाणु १० र्भगाख्यो ११
रुद्रसंज्ञका इतिः

" द्वादशादित्यास्तु "

धाता १ र्यमा च २ मित्रश्च ३ वरुणेशौ ५ भग ६स्तथा।

इंद्रो ७ विवस्वान् ८ पूषा च९ पर्जन्यो १० दशमस्तथा।
त्वष्टा ११ विष्णु १२ रिति प्रोक्ता आदित्या द्वादश क्रमात्

" पंचमे ष्टाचत्वारिंशद्दल आदौ क्रमेण नवग्रहाः"

सूर्यः १ सोमो २ महीपुत्रः ३ सोमपुत्रो ४ बृहस्पतिः५।
शुक्रः ६ शनैश्चरो ७ राहुः ८ केतवश्च ९ नवग्रहा इतिः।

" दश लोकपालास्तु"

इंद्रोग्नि १ र्यमो २ निर्ऋति ४ र्वरुणो ५ वायु ६ रेवच।
कुबेर ७ इशान ८ ब्रह्माणो ९ अनंते दशदिक्पतिरिति

" सप्तर्षयस्तु "

कश्यपो १ त्रि २ र्भरद्वाजो ३ विश्वामित्रो ४ थ गौतमः५
जमदग्नि ६ र्वसिष्ठश्च ७ सप्तैते ऋषयः क्रमात् ॥

" समुद्रास्तु "

पूर्व १ दक्षिण २ पश्चिमो ३ त्तरा ४ श्चत्वारः समुद्रा इति ।

" भुवनत्रयं "

भूर्लोक १ भुवर्लोक २ स्वर्लोकां ३ इति ।

" सप्तसरितश्च "

गंगा च १ यमुना चैव २ गोदावरी ३ सरस्वति ।
तापी ५ पयोष्णी ६ रेवा ७ च सप्त नद्यो यथाक्रमामिति।

" त्रिगुणास्तु "

सत्वं १ रज २ स्तमो गुणा इति ।

" चत्वारोवेदास्तु "

ऋग्वेदोऽथ१ यजुर्वेदः २ सामवेदो ३ ह्यथर्वण ४ इति

" आत्मा च "

इत्येतास्तत्रावाह्य पूजयेदिति इति पीठयंत्रदेवतास्थापनक्रमः ।

गंधपुष्पादिभिश्चैव समभ्यर्च्य यथाविधि ।
यथाशक्तिकृतं सर्वमर्चनं विनिवेदयेत ।
देवदेव जगन्नाथ विश्वसाक्षिन्नमोस्तुते ।
गृहाणेमां कृतां पूजां प्रसीद भगवन् गुरो ।
ग्रहयज्ञविधानेन ग्रहपूजां समाप्यच
ऋत्विग्भिः सह वै होमं ततः कुर्याद्यथाविधि ।
कुंडे वा स्थंडिले वापि सगृह्यविधिना द्विजः
कृत्वाज्यभागपर्यंतमुपलेपादिकं ततः ।
समिदाज्येन चरुणा यवैस्तिलसमन्वितैः ।
सहस्रं चाहुतिस्तत्र व्याहृतीभिस्ततः क्रमात् ।
जुहुयादृत्विगेकैकश्चतुर्विंशोत्तरं शुभं ।
प्रणवेनाहुतिं चैकां मंत्रणैव पृथक् पृथक्
देवतानां च सर्वेषां नामभिर्जुहुयाद्घृतं ।
देवतानां अंगदेवतानां ।
ततः स्विष्टकृतं हुत्वा होमशेषं समापयेत् ।
आचार्यादीन्समभ्यर्च्य गंधपुष्पाक्षतादिभिः।
दद्याद्विभवसारेण दाक्षिणां च यथोचितां ।

लेह्यं पेयं तथा चोष्यं खाद्यं चैव च षड्रसं ।
देवाद्यादौ निवेद्यं तु द्विजवर्यान्समर्चयेत् ।
भक्ष्यभोज्यादिकं दद्यात्तृप्तिर्यस्य यथा भवेत् ।
दक्षिणां च यथाशक्त्या सर्वेषां च समांशतः •
ततश्च भोजयेद्विप्रान् सहस्रं सम्यगेव हि ।
एकस्मिन्नेव काले वा भवेद्वापि दिने दिने ।
भवेद्यावत्सहस्रं तु तावदेव हि भोजयेत् ।
तेभ्योऽपि दक्षिणां दद्याद्ब्राह्मणेभ्यः स्वशक्तितः ।
दीनांधकृपणादींश्च भोजयित्वा स्वयं ततः ।
समाहितमनाः कर्ता भुंजीयात्सहबंधुभि :
एवं यः कुरुते सम्यक् सहस्रद्विजभोजनं ।
समाप्ते तु पुनर्होमः कर्तव्योमुनिरब्रवीत् ।
ब्रम्हहा च सुरापी च परद्रव्यापहारकः ।
मातृगामी च गोघ्नश्च परदाररतः सदा ।
ज्ञानतोऽज्ञानतोवापि पापकारी यथेच्छया ।
सदाचारविहीनस्तु दमदानविवर्जितः ।
ईदृशोऽपि द्विजो यः स्यात्सहस्रद्विजभोजनं ।
कुरुते सद्यएवेह स पुनाति न संशयः ।
ब्रह्मानंदपदं गच्छेत्तेन पुण्येन चैवहि ।
सहस्रभोजनाश्चैव नानाविधमनोरथान् ।
भुंक्ते स कामान्सकलान्भोगानपि च पुष्कलानिति

" तत्र संकल्पमाह "

मम पंचमहापातकनिवृत्तिगोवधपरदारपरद्रव्यापहार-

कायिकवाचिकमानसिकैतच्छरीरावच्छिन्नसमस्तपापक्षयपूर्वकनानाविधमनोरथसिध्यंते षष्ठिसहस्रवर्षाविष्णुलोकनिवासांते ब्रम्हानंदावाप्तिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं सहस्रब्राम्हणान्यथाशक्त्या यथोपपन्नेनान्नेन यथाकालं यथोदेशं सदक्षिणं भोजयिष्ये इति संकल्प्य तदादौ गणेशपुजनं स्वास्तिवाचनं मातृकापूजनं नांदीश्राद्धं आचार्यऋत्विग्वरणहोमादि च करिष्ये इति संकल्प्य गणेशपूजनादि यथोक्तक्रमेण कुर्यादिति

इति सहस्रभोजनविधिः

---

## सहस्रभोजनाचा विधि.

हजार ब्राम्हणांस भोजन घालणें, त्याचा विधि आणि फळ.

" भविष्य पुराणांत "—नारायण मुनीनें सर्व पुण्यामध्यें उत्तम पुण्यकारक असा सहस्रभोजनाचा विधि सांगितला. जेव्हां मन, द्रव्य व भक्ति हीं तिन्हीं अनुकूल असतील, तेव्हांच ईश्वराची प्रीति होण्याकरितां सहस्रभोजन करावें. आषाढ महिना, पौष महिना, अधिकमास व गुरुशुक्रांचा अस्त ह्यांवांचून दुसऱ्या शुभ दिवशीं पूर्वी स्त्रीसह यजमानानें मंगलस्नान करून शुद्ध होऊन द्रव्याच्या शुद्धिकरितां यथोक्त प्रायश्चित्त करून एकंदर द्रव्याच्या दहाव्या भागाएवढें द्रव्य ब्राम्हणांस वाटावें. नंतर संपादित केलेल्या द्रव्याचें प्रोक्षण करून त्यांच्या ( ब्राम्हणांच्या ) आज्ञेनेंपूर्वी गणपति मातृका यांचें पूजन, व पुण्याहवाचन व नांदी श्राद्ध करून वस्त्रें, अलंकार व भूषणें

ह्यांच्या योगानें आचार्याचें पूजन करून आठ ब्रम्हादि ऋत्वि-जांस वर्णन देऊन त्यांचें वस्त्रें, गंध वगैरेंनीं पूजन करावें. नंतर समचौरस आसनासह अत्यंत शोभणारा असा फुलांचा मंडप करावा. आणि शक्तीसहवर्तमान शंकराची एक कर्ष एवढ्या सोन्याची प्रतिमा करावी. तसेंच त्याची अधिदेवता विष्णु व प्रत्यधिदेवता ब्रम्हा होय. नंतर अग्न्युत्तारणपूर्वक प्रतिमांची शुद्धि करून त्यांचें त्यांच्या मंत्रांनीं आवाहनादि सोळा उपचारांनीं पूजन करून "पावमानी" ह्या ऋचांनीं विधिप्रमाणें अभिषेक करून त्यांचें फुलांच्या मंडपामध्यें तांदुळाच्या राशीवर वस्त्रानें वेष्टन केलेला असा *कळश स्थापन करून त्यावर प्रतिमा (शंकराची) स्थापन करून तिच्या भोंवतीं पूर्वेपासून प्रदक्षिणा क्रमानें अंग देवतांचें स्थापन करून त्या त्या देवतेच्या मंत्रानें अगर नाममंत्रानें त्यांचें पूजन करावें. कमळाच्या कर्णिकेवर अधिदेवता व प्रत्यधिदेवता ह्यांसहवर्तमान शंकराची स्थापना करावी. नंतर त्याच्या बाहेरच्या चार पत्रांवर चार देवता स्थापन कराव्या. नंतर त्याचे बाहेर क्रमानें सोळा, एकतीस, व अठ्ठेचाळीस अशा देवता स्थापन कराव्या, ह्या क्रमानें कमळाची कर्णिका व नव्याण्णव पत्रें मिळून शंभर होतात. दहा दिग्पाळ, सात ऋषि, सात सागर, तीन भुवनें, सात नद्या, तीन गुण, चार वेद व आत्मा, ह्या क्रमानें स्थापना करावी.

---

* कळशावर पात्र (ताम्हन) ठेवून त्यावर रंगीत धान्याचें कमळ काढलेलें असा.

पीठ यंत्रावरील देवतांच्या स्थापनेचा क्रम—पूर्वीं कमळाच्या कर्णिकेवर मधल्या भागीं अधि देवता विष्णु व प्रत्याधि देवता ब्रम्हा ह्यांसह भवानी शंकराचें स्थापन करावें. कर्णिकेच्या बाहेरील चार पत्रांवर प्रदक्षिण क्रमानें गणेश, दुर्गा, क्षेत्रपाल व भयंकर ह्यांचें स्थापन करावें. नंतर त्यांच्या बाहेरील सोळा पत्रांवर ' गौरी, पद्मा, शची, मेघा, सावित्री, विजया, जया, देवसेना, स्वधा, स्वाहा, मातरः, लोकमातर, धृति, पुष्टि, तुष्टि व आपल्या कुलदेवता ' ह्या प्रमाणें सोळा मातरांची स्थापना करावी. नंतर त्यांच्या बाहेरील एकतीस पत्रांवर क्रमानें ' ध्रुव, अध्वरु, सोम, अप, अनिल, अनल, प्रत्यूष व प्रभास ' ' हे आठ वसु ' नंतर ' वीरभद्र, शंभु, योगीश, जैकपात्, अहिर्बुध्न्य, पिनाकी, शोभनाधीश्वर, कपाली, विट्पति, स्थाणु, भगवरुद्र ' हे अकरा रुद्र आणि ' धाता, अर्यमा, मित्र, वरुण, ईश, भग, इंद्र, विवस्वान्, पूषा, पर्जन्य, त्वष्टा व विष्णु ' हे क्रमानें बारा आदित्य मिळून एकंदर एकतीस देवतांची स्थापना करावी. नंतर अठ्ठेचाळीस पत्रांवर पूर्वी क्रमानें ' सूर्य, सोम, मंगळ, बुध, बृहस्पति, शुक्र, शनैश्वर, राहु व केतु हे नऊ ग्रह ' नंतर ' इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरुण, वायु, कुबेर, ईशान, ब्रम्ह, व अनंत ' हे दहा ' दिक्पाल, नंतर ' कश्यप, आत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि व वसिष्ट हे क्रमानें सात ऋषि ' नंतर ' पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर हे चार समुद्र ' पुढें ' भुर्लोक, भुवर्लोक व स्व-

रंगविलेल्या धान्याच्या कमळावर देवता स्थापन करण्याचा प्रकार, त्यांचें पूजनाचा विधि व होमाचा विधि.

लोक हे तीन लोक ' नंतर ' गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, तापी, पयोष्णी, व रेवा ह्या सात नद्या ' त्या नंतर ' सत्व, रज व तम हे तीन गुण ' त्या नंतर ' ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्वण वेद हे चार वेद ' व ' आत्मा ' एकूण अठ्ठेचाळीस देवतांचें स्थापन करावें. ह्या प्रमाणें देवतांचें स्थापन करून त्यांचें पूजन करावें. गंध फुलें वगैरेंनीं वरील देवतांचें यथाविधि पूजन करून, नंतर यथाशक्ति केलेलें पूजन पुढील मंत्रानें देवास निवेदन करावें. तो मंत्र—

देवदेव जगन्नाथ विश्वसाक्षिन्नमोस्तुते ।
गृहाणेमां कृतां पूजां प्रसीद भगवन् गुरो ।

नंतर ग्रहयज्ञाच्या विधि प्रमाणें ग्रहांची पूजा करून ऋत्विजां सहवर्तमान आपल्या गृह्य सूत्रांत सांगितलेल्या विधि प्रमाणें कुंडांत अथवा स्थंडिलावर होम करावा. पूर्वी स्थंडिलास * उपलेप करून आज्य भागा पावेतों विधि करून नंतर समिधा, तूप, चरू ( भात ) व तिळांनीं मिश्र केलेलें जव ह्या द्रव्यांच्या योगानें प्रत्येक ऋत्विजानें × व्याहृतींनीं एक हजार चोवीस आहुति द्यावी. नंतर प्रणवानें एक आहुति द्यावी. मंत्रानें ( देवतेच्या ) आहुति द्याव्या, तसेंच सर्व अंग देवतांच्या नांवांनीं पृथक् पृथक् तुपानें होम करावा. नंतर स्विष्टकृत् होम देऊन शेष होमाची समाप्ति करावी. मग आचार्य वगैरेंची गंध, फुलें अक्षता वगैरेंनीं

* स्थंडिलास शेणानें प्रदक्षिणेच्या क्रमानें सारविणें ह्यास उपलेप म्हणतात.

× ' भूः भुवः स्वः ' ह्या तीन व्याहृति होत.

पूजा करून त्यांस आपल्या सामर्थ्या प्रमाणें दक्षिणा द्यावी. पूर्वी +लेह्य, §पेय, †चोष्य व +खाद्य असें सहा रसांनीं युक्त अन्न देवास अर्पण करून नंतर तें ब्राम्हणांस अर्पण करावें. ज्याची ज्या योगानें तृप्ति होईल असें, त्यास भक्ष्य भोज्यादिक द्यावें. यथा शक्तिनें सर्वांस सारखी दक्षिणा द्यावी. नंतर हजार ब्राम्हणांस चांगल्या रीतीनें भोजन द्यावें. एकेच वेळीं अथवा दररोज जों पावेंतों हजार संख्या पुरी होईल तों पावेंतों ब्राम्हणांस भोजन द्यावें, त्यांसही आपल्या शक्ति प्रमाणें दक्षिणा द्यावी. गरीब, आंधळे, कृपण वगैरेंस भोजन घालून नंतर यजमानानें आप्त स्वकीयांसह स्वस्थ चित्तानें भोजन करावें. या प्रमाणें जो हजार ब्राम्हणांस भोजन देईल, त्यानें त्याची समाप्ति झाल्या नंतरही पुन्हा होम करावा असें ' मुनि ' म्हणाला. ब्रम्हहत्या करणारा, मद्यपान करणारा, दुसऱ्यांचें द्रव्य चोरणारा, मातेशीं गमन करणारा, गाय मारणारा, दुसऱ्याच्या स्त्रीशीं रत असणारा, जाणून अथवा न जाणतां पाप करणारा, चांगल्या आचारानें रहित असलेला, दम व दान ह्यांनीं रहित असा जो कोणी द्विज असेल, त्यानें हजार ब्राम्हणांस भोजन द्यावें, म्हणजे तो लागलीच पवित्र होईल ह्यांत संशय नाहीं, आणखी ह्या पुण्याच्या योगानें तो मोक्षाला पावेल. सहस्र भोजना पासून तो नाना प्रकारचे मनोरथ आणि पुष्कळ असे सर्व भोग ह्यांचा उपभोग घेईल.

---

\+ जिभेनें चाटून खाण्याचे पदार्थ ते लेह्य होत जसें–श्रीखंड इ०

§ पिण्याचे पदार्थ ते पेय होत, जसें–दूध, क्षीर इ०

† चोखून खाण्याचे पदार्थ चोष्य होत जसें–आंबा इ०

\+ चाऊन खाण्याचे पदार्थ खाद्य होत–जसें लाडू भाकर इ०

'त्या विषयीं संकल्प'–कर्त्यानें आचमन करून देश काला-
सहस्र भोजनाचा संकल्प. दिकाचा उच्चार करून ' मम पंचम-
हापातकनिवृत्तिगोवधपरदारपरद्रव्यापहारकायिकवाचिकमानसिकै-
तच्छरीरावच्छिन्नसमस्तपापक्षयपूर्वकनानाविधमनोरथसिध्यंते षष्ठि-
सहस्रवर्षविष्णुलोकनिवासांते ब्रम्हानंदावाप्तिद्वारा श्रीपरमेश्वरप्री-
त्यर्थं सहस्रब्राह्मणान्यथाशक्त्या यथोपपन्नेनान्नेन यथाकालं यथादेशं
सदक्षिणं भोजयिष्ये ' ह्या प्रमाणें संकल्प करून ' पुढें ' तदादौ
गणेशपूजनं स्वस्तिपूजनं मातृकापूजनं नांदीश्राद्धं आचार्यऋत्वि-
ग्वरणहोमादि च करिष्ये ' असा संकल्प करून गणपति पूजन
वगैरे जसें सांगितलें असेल त्या क्रमानें करावें.

ह्या प्रमाणें सहस्र भोजनाचा विधि सांगितला.

---

## अथ सर्वस्वदानसंकल्पवाक्यं.

" मात्स्ये "

अद्येत्यादि० ममैतच्छरीरावच्छिन्नसमस्तपापक्षय-
पूर्वकसकलमनोरथसिद्धियज्ञयाजित्वसर्वद्रव्यदानजन्य-
सर्वतीर्थस्नानजन्यसर्वदेवपूजाजन्यसमफलयमलोकाद-
र्शनदारिद्र्यानुत्पत्तिसर्वकालस्त्रीपुत्रपौत्रधनधान्यसौख्या-
द्यावज्जीवमवियोगैहिकामुष्मिकैश्वर्यत्वबहुगंधर्वोपजेगी-
यमानादिव्याप्सरोगणसेवितदिव्यांगनासमाकीर्णहंससा-
रसविहगादिपरिवृतहेमकिंकिणीजालमालिकामंडिततरु

णादित्यसकाशविमानारोहणशक्रादिसुरगणब्रम्हाविष्णु रुद्रलोकेंद्रलोकादिस्वेच्छया विचरणं यावदाभूतसंछवा-क्षय्यस्वर्गलोकावाप्त्यर्थंते विष्णुलोकसायुज्यकाम इदं सकलं ममाश्रमीयं सकलवस्तुसर्वस्वं सर्वाविष्णुदैवतं तत्रैव कल्पितसुवर्णबहुदक्षिणं. ' ॐ सर्वस्वायनम ' इति नाममंत्रेण सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न ममेत्येकस्मै दद्यात्

' यद्वा '

नानानामगोत्रेभ्योब्राह्मणेभ्यः सुपूजितेभ्यः सदक्षिणं दातुमहमुत्सृजे न ममेति तेन श्रीपरमेश्वरः प्रियतां। तत्सद्ब्रम्हार्पणमस्तु ॥

' प्रार्थनामंत्रास्तु '

हरिश्चंद्रो यथा राजा सर्वं दत्वा दिवं गतः।
तथाहमाश्रमं दत्वा यास्यामि त्रिदशालयं।
दिवि भुव्यंतरिक्षे च हस्त्यश्वरथसंकुला।
हरिश्चंद्रस्य नृपतेः शोभते नगरी यथा।
तथा ममाश्रमं सर्वं दिवि सर्वत्र गच्छतु।
सर्वस्वं मुनये दत्वा यां गतिं नृपतिर्गतः।
सर्वस्वदानेनानेन तां गतिं प्राप्नुयाम्यहं।
सर्वस्व तव दानेन हरिश्चंद्रो यथाऽभवत्।
दुःखहीनः सुखमयस्तथा मां कुरु सर्वदा।
सर्वस्वदानात्सकला मम संतु मनोरथाः।

इति सर्वस्वदानप्रयोगः

द २५
८ ६८६८



## सर्वस्वाच्या दानाचा संकल्प.

सर्वस्वाच्या दानाचा संकल्प.

' मत्स्यपुराणांत '—यजमानानें नित्य कर्म करून आचमन करून देश कालाचा उच्चार करून " अद्येत्यादि० ममैतच्छरीरावच्छिन्नसमस्तपापक्षयपूर्वकसकलमनोरथसिद्धियज्ञयानित्वसर्वद्रव्यदानजन्यसर्वतीर्थस्नानजन्यसर्वदेवपूजाजन्यसमफलयमलोकादर्शनदारिद्र्यानुत्पत्तिसर्वकालस्त्रीपुत्रपौत्रधनधान्यसौख्याद्यावज्जीवमवियोगैहिकामुष्मिकैश्वर्यत्वबहुगंधर्वोपजेगीयमानदिव्याप्सरोगणसेवितदिव्यांगनासमाकीर्णहंससारसविहगादिपरिवृतहेमकिंकिणीजालमालिकामंडिततरुणादित्यसंकाशविमानारोहणशक्रादिसुरगणब्रम्हविष्णुरुद्रलोकेंद्रलोकादिस्वेच्छया विचरणंयावदाभूतसंप्लवाक्षय्यस्वर्गलोकावाप्त्यंते विष्णुलोकसायुज्यकाम इदं सकलं ममाश्रमीयं सकलवस्तुसर्वस्वं सर्वविष्णुदैवतं तत्रैव कल्पितसुवर्णबहुदक्षिणं सुपूजिताय तुभ्यमहं संप्रददे न मम " ह्या प्रमाणें संकल्प करून ' ॐ सर्वस्वायनमः ' ह्या नाम मंत्रानें तें सर्वस्व सर्व मिळकत ) एकास दान करावें. किंवा ' अद्येत्यादि० पासून ' ' विष्णुदेवतं ' येथ पावेतों संकल्प करून त्या पुढें ' नानानामगोत्रेभ्यो ब्राम्हणेभ्यः सुपूजितेभ्यः सदक्षिणंदातुमहमुत्सृजे न मम तेन श्रीपरमेश्वरः प्रीयतां तत्सद्ब्रम्हार्पणमस्तु ' असा संकल्प करून दान करावें. ' प्रार्थनेचे मंत्र '

हरिश्चंद्रो यथा राजा सर्वं दत्वा दिवं गतः ।
तथाहमाश्रमंदत्वायास्वामि त्रि दशालयं ।
दिवि भुव्यंतरिक्षे च हस्त्यश्वरथसंकुला ।

हरिश्चंद्रस्य नृपतेः शोभते नगरी यथा ।
तथा ममाश्रमं सर्वं दिवि सर्वत्र गच्छतु ।
सर्वं स्वं मुनये दत्वायां गतिं नृपतिर्गतः ।
सर्वस्वदानेनानेन तां गतिं प्राप्न्युयाम्यहं ।
सर्वस्व तव दानेन हरिश्चंद्रो यथाऽभवत् ।
दुःखहीनः सुखमयस्तथा मां कुरु सर्वदा ।
सर्वस्वदानात्सकला मम संतु मनोरथाः "

ह्या प्रमाणें सर्वस्वाच्या दानाचा प्रयोग सांगितला.

---

अथ युगप्राधान्येन व्यासोक्ताधर्मा उच्यंते.

तपः परं कृतयुगे त्रेतायां ज्ञानमुत्तमम् ।
द्वापारे यज्ञमित्याहुर्दानमेव कलौ स्मृतामिति ।

" स्कांदे "

श्रांतस्य यानं तृषितस्य पानमन्नं क्षुधार्तस्य नरोनरेंद्रः
दद्याद्विमानेन सुरांगनाभिः संस्तुयमानास्त्रिदिवं प्रयाति

" यमः "

यतीनां परमोधर्मस्त्वनाहारो वनौकसां ।
दानमेव गृहस्थानां शुश्रूषा ब्रह्मचारिणामिति ।
दानमावश्यकं केषामित्याह

" व्यासः "

मातापित्रोश्च यद्दत्तं भ्रातृस्वसृसुतासु च ।
सोदर्येऽपि च यद्दत्तं सोऽतिथिः स्वर्गसंक्रमः ।

पितुः शतगुणं दानं सहस्रं मातुरुच्यते ।
अनंतं दुहितु र्दानं सोदर्ये दत्तमक्षयं ।

" भविष्योत्तरेऽपि "

न केवलं ब्राम्हणानां दानं सर्वत्र शस्यते ।
भगिनीभागिनेयानां मातुलानां पितृष्वसु :
दरिद्राणां च बंधूनां दानं कोटिगुणं भवेत् ।
मातुर्गोत्रे शतगुणं स्वगोत्रे दत्तमक्षयं ।

' दातुर्लक्षणमपि तत्रैव '

अपाप्मा योहि धर्मात्मा दित्सुरव्यसनः शुचिः ।
अनिंद्याजीवकर्ताच षड्भिर्दाता प्रशस्यते ।

' प्रतिग्रहीतृलक्षणमपि तत्रैव '

त्रिशुक्रः क्षीणवृत्तिश्च घृणालुः सकलेंद्रियः ।
विमुक्तोयोनिदोषेभ्योब्राम्हणः पात्रमुच्यते ।

' तथा '

सौमुख्यमाभिसंप्रीतिरर्थिनां दर्शने सदा ।
सत्कृति श्चानसूया च तदा श्रद्धेति कीर्यते

" देवलः "

यद्ददाति यदश्नाति तदेव धनिनां धनं ।
अन्येमृतवत्क्रीडंते दारैरपि धनैरपि ·

" व्यासः "

आयासशतलब्धस्य प्राणेभ्योऽपि गरीयसः ।
गतीरेकैव वित्तस्य दानमन्ये विपत्तयः ।

ग्रासादर्धमपि ग्रासमर्थिभ्यः किन्न दीयते ।
इच्छानुरूपोविभवः कदा कस्य भविष्यति ।

" मात्स्ये "

न्यायेनार्जनमर्थस्य वर्धनं चाभिरक्षणं ।
सत्पाते प्रतिपत्तिश्च सर्वशास्त्रेषु प्रीयते ।

' पुनस्तत्रैव '

अदाता यत्र यत्रेति तत्र तत्र सुदुःखितः ।
दानात्सुखमवाप्नोति परत्रापि च निर्वृतइति ।

" याज्ञवल्क्यः "

अक्षरद्वय मभ्यस्तं नास्ति नास्तीति यत्पुरा ।
तदिदं देहि देहीति विपरीतमुपास्थितमिति ।

" तथा "

द्वारं द्वारमहंतीह भिक्षुकाः पात्रपाणयः ।
दर्शयंत्येव लोकानामदातुः फलमीदृशां ।

' बृहस्पतिः '

द्वावेवाप्सु प्रवेष्टव्यौ गले बध्वा दृढांशिलां ।
धनवंतमदातारं दरिद्रं चातपस्विनामिति दरिद्रस्यैव दद्यादित्याह

" बृहस्पतिः "

वृष्टिर्यथा समुद्राणां तृप्तानामशनं यथा ।
तथा दानं समृद्धानां दत्तं भवति निष्फलमिति अतः परं षोडशमहादानादीनां बहुत्वादुपरम्यत इति ।

युगांच्या प्राधान्यावरून व्यासांनीं सांगितलेले धर्म.

ते असे—कृतयुगांत तप श्रेष्ठ आहे. त्रेतांत ज्ञान श्रेष्ठ होय. द्वापारांत यज्ञ व कलींत दान श्रेष्ठ असें म्हणतात. "स्कंदपुराणांत" थकलेल्यास वाहन (गाडी इ०) तहानेल्यास पाणी, भुकेल्यास अन्न ह्या प्रमाणें जो मनुष्यांत श्रेष्ठ असा मनुष्य देईल, तो विमानांत बसून स्वर्गाला जाईल. आणि देवांगना त्याची स्तुति करतील. "यम"—कांहीं आहार न करणें हा संन्याशांचा व वानप्रस्थांचा श्रेष्ठ धर्म होय. गृहस्थांचा दान देणें हाच श्रेष्ठ धर्म होय. (आचार्य इत्यादिकांची) शुश्रूषा करणें हा ब्रम्हचाऱ्यांचा धर्म होय. 'दान अवश्य कोणास करावें तें 'व्यास' ज्याने आई व बाप ह्यांस दिलें, तसेंच माऊ, + बहीण, मुली व सहोदर * ह्यांस दिलें, तो स्वर्गांत वास्तव्य करतो. बापास दिलेलें दान शंभरपट होतें, आईस दिलेलें सहस्रपट, मुलीस दिलेलें अगणित व सहोदरास दिलेलें अक्षय्य (कधींही ज्याचा नाश होत नाहीं असें) होतें. 'भविष्योत्तरांत ही' सर्व ठिकाणीं केवळ ब्राम्हणांसच दान देणें प्रशस्त मानिलें असें नाहीं, तर बहीण, माचे, मामा, आते आणि दरिद्री असे बांधव (आप्त) ह्यांसही दान द्यावें तें कोटिपट होतें. मातेच्या कुळांत दिलेलें दान शंभरपट होतें. आपल्या कुळांत दिलेलें अक्षय्य होतें. 'दात्याचें लक्षणही त्यांतच'—पाप कर्म न

कृतादि चार युगांतील मुख्य धर्म, दानाचें महत्व व त्यांचें फळ इ०

---

+ साधारण सावत्र इ. बंधु.

* एकाच आइ पासून झालेले.

करणारा, धर्मात्मा, देण्याची इच्छा करणारा, व्यसनरहित, पवित्र व वाईट प्रकारानें उपजीविका न करणारा अशा सहा लक्षणांनीं जो युक्त असतो तो दाता प्रशस्त होय. ' दान घेणाराचें लक्षणही त्यांतच ' आचरण, विद्या व कुल हीं ज्याचीं शुद्ध आहेत, ज्याची उपजीविका नीट होत नाहीं, दयालु, सर्व ज्यांचीं इंद्रियें कायम आहेत व जो योनिदोषां पासून मुक्त असेल असा ब्राम्हण दानास पात्र म्हटला आहे. ' तसेंच ' याचकांचें दर्शन झालें असतां मुखाची प्रसन्नता, अत्यंत प्रेम, चांगली कृति व असूया ÷ नसणें ह्या इतक्या लक्षणांनीं युक्त ती श्रद्धा म्हटली जाते. ' देवल '—जें देण्यांत येतें, जें भक्षण करण्यांत येतें ( ज्याचा भोजनांत विनियोग होतो ) तेंच धनिकांचें द्रव्य होय. ह्या वांचून दुसरे बायका व द्रव्य ह्यांच्याशीं केवळ मेलेल्या प्रमाणें क्रीडा करतात ( रममाण होतात ) ' व्यास '—शेंकडो श्रमांनीं मिळविलेलें, प्राणा पेक्षांही श्रेष्ठ अशा द्रव्याचें दान देणें हीच गति होय. ह्या वांचून दुसऱ्या विपत्ति होत. म्हणून ( आपल्या ) घासांतून अर्धा घास याचकांस कां देऊं नये ? कारण इच्छे प्रमाणें ऐश्वर्य कधींही कोणांस प्राप्त होणार नाहीं. ' मत्स्यपुराणांत ' न्यायानें द्रव्य मिळविणें, त्याचें रक्षण करणें, त्याची वृद्धि करणें व सत्पात्रीं दान करणें असें सर्व शास्त्रांत म्हटलें आहे. ' पुन्हां त्यांतच ' दान न करणारा जेथें जेथें जातो तेथें तेथें त्याला दुःख प्राप्त होतें, म्हणून त्यानें दान केलें असतां त्याला ह्या लोकीं सुख मिळेल व परलोकींही सुख प्राप्त होईल. " याज्ञवल्क्य "—पूर्वी

÷ गुणांचे ठिकाणींही दोषारोप करणें ती ' असूया '

नास्ति नास्ति ( नाहीं नाहीं )' ह्या प्रमाणें जीं दोन अक्षरें म्ह-णण्यांत आलीं, तीं दोन अक्षरें देहि देहि ( दे, दे )' ह्या प्रमाणें उलट उपस्थित झालीं. ' तसेंच ' भिक्षेकरी हातांत भिक्षेचें पात्र घेऊन भिक्षे करितां दारोदार फिरतात, त्या वरून ते दान करणास असेंच फळ असतें असें लोकांस दाखवितात. ' ब्रृहस्पति "—द्रव्य असून दान न करणारा व दरिद्री असून तप न करणारा अशा दोघांस त्यांच्या गळ्यांत मोठ्या शिळा बांधून पाण्यांत बुडवावे. ' दान दरिद्र्यासच द्यावें असें ' ब्रृहस्पति ' ह्मणतो. समुद्रांस जशी वृष्टी ( पाऊस ), जेवून तृप्त झालेल्यास भोजन जसें निष्फळ असतें, तसें द्रव्यवानास दान निष्फल होतें.

अतःपरं षोडशमहादानादीनां बहुत्वादुपरम्यत इति
कालोपनामरामेशभट्टसूनोः सुधीमतः ।
महादेवद्विजार्यस्य सूनुना प्रभविष्णुना ।
दिवाकरेण रचिता दानसंक्षेपचंद्रिका ।
गिरिजाजानितुष्ट्यर्थं मुदं वितनुयात्सतामिति

' विद्वत्प्रार्थना '

अदृष्टदोषान्मतिविभ्रमाद्वा यदर्थहीनं लिखितं मयात्र।
तत्सर्वमार्यैः परिशोधनीय कोपं न कुर्यात्खलु तर्णकस्य

' किंच '

शास्त्रकर्ता भवेद्व्यासो लेखको गणनायकः ।
तयोर्वै चलिताबुद्धिर्मनुष्याणां तु काकथा ।

लिखनपरिश्रमवेत्ता भुवने विद्वज्जनोनान्यः
सागरलंघनखेदं ह्यनुमानेकः परं वेत्ति ।
इति काश्यां श्रीमत्कालोपनामक भट्टरामेश्वरा-
त्मज भट्टमहादेवद्विजवर्यसूनुनां बाळं-
भट्टानुज दिवाकरेण विरचिता
दानचंद्रिका समाप्ता.

---

ग्रंथाची समाप्ति, व ग्रंथकर्त्या-च्या वंशाचें वर्णन.

ह्याउपर सोळा महादानें वगैरेंचें आधिक्य असल्यानें मी पुरें करितों. काळे ह्या उपनांवाच्या रामेशभट्टाचा बुद्धिवान् असा ब्राम्हणांत श्रेष्ठ असा महादेवाचा नातू दिवाकर ह्यानें श्री शंकरास संतुष्ट करण्या करिता 'दानसंक्षेप चंद्रिका' नांवाचा रचिलेला ग्रंथ विद्वानांच्या संतोषाची वृद्धि करो.

---

## *विद्वानांची प्रार्थना.

दोष पाहण्यांत न आल्यानें, अगर बुद्धीचा विपर्यास झाल्यानें जें अर्थावांचून म्यां येथें लिहिलें असेल त्याचा श्रेष्ठांनीं शोध करावा, परंतु बाळकावर कोप करूं नये. आणखी शास्त्र करणारा हा व्यास होय, व लिहिणारा गणपति होय. असें असतांही जर त्यांची बुद्धि चळली तर मनुष्यांची कथा काय? ह्या जगतांत लिहिण्याचा परिश्रम जाणणारा विद्वान् मनुष्यच होय,

---

* हे श्लोक पुस्तक लिहिणारानें लिहिले आहेत.

दुसरें कोणी नाहीं. जसें कीं समुद्राचे उल्लंघन करण्याचा परिश्रम एकटा मारुतीच जाणतो, दुसरा कोणी जाणत नाहीं.

दानानि सर्वाण्यभिधाय तेषां प्रतिग्रहे शुद्धिमतोऽभिधास्ये।
यथाधिया भावितया प्रवृत्तिःप्रतिग्रहे साधुजनस्य न स्यात्।

' तत्र मेषीदानप्रकरणे '

दुष्टप्रतिग्रहहतो विप्रो भवति पातकी।
नाभिभाषेत्ततोदत्वा तन्मुखं नावलोकयेत्।

' इत्यादि भविष्योत्तरे '

दुष्प्रतिग्रहदग्धस्य विप्रस्य किल भारत।
न पश्येद्वदनं पश्चान्नैचन मभिभाषयेदिति।

' महाभारते च '

पूजको गणको व्यासो घोरग्राही तथैवच।
परास्थिग्राहको वैद्यो ग्रामयाजी तथैव च।
एते चांत्यसमालोके न स्पृष्टव्याः कदाचन।
कदाचिन्मोहतः स्पृष्टः सवासा आप्लुतः शुचिरिति।

' पराशरस्मृतै च '

मंत्रेणानेन दत्वा तं प्रणिपत्य क्षमाप्य च।
आसीमांतमनुव्रज्य तन्मुखं नावलोकयेदिति।

' महार्णवे च'

दुष्टप्रतिग्रहः स्पष्टः प्रतिग्रहदुष्टत्वं चतुर्धा दातृकालदेशप्रतिग्राह्यदोषभेदात् चांडालत्वपतितत्वादयोदातृदोषाः कुरुक्षेत्रत्वादयोदेशदोषाः चंद्रसूर्योपरागादयः का-

लदोषाः उभयतोमुखीत्वमेषीत्वादयोदेयदोषाः तिलधे-नुर्गजोवाजी महिषाजिनमूर्तयः । सूरभिः सूयमाना च घोराः सप्त प्रतिग्रहाइति निषेधात् प्रेतान्नमजिनं मणि-रिति पाठे प्रेतान्नमेकादशाहिकश्राद्धान्नभोजनं मणिः शालिग्राम इति

‘ हेमाद्रिः ’

‘ तत्रैव तन्निषेधोऽरुणस्मृतौ ’

परमापद्गतेनापि अंत्यजातिप्रतिग्रहः ।
न कार्यो ब्राम्हणेनेह आत्मनः श्रेय इच्छता ।
प्रतिग्रहाश्चांत्यजातेः पतितत्वं प्रजायत इति

‘ अंत्यजानाह मनुः ’

रजकश्चर्मकश्चैव नटोबुरुड एवच ।
कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैते अंत्यजाः स्मृताः ।

‘ चांडालानाह व्यासः ’

ब्राम्हण्याः शूद्रजातश्च चांडालस्त्रिविधः स्मृतइति

‘ तथा ’

कुरुक्षेत्रे प्रतिग्राही न भूयः पुरुषोभवेत् ।

गायत्रीमनुजाप्येन सप्तलक्षं भवेच्छुचि रिति काल-दोषभिन्नोऽसत्प्रतिग्रहनिषेधः तत्प्रतिग्रहप्रायश्चित्तकथ-नेन स्पष्ट सर्वऽसत्प्रतिग्रहे प्रायश्चित्तं षट्त्रिंशन्मते दे-व्यालक्षजपेनैव शुध्यतेऽसत्प्रतिग्रहादिति जपित्वा त्री-णि सावित्र्याः सहस्राणि समाहितइति मनूक्तं तु द्वित्रि-प्रकारेण प्रतिग्रहस्यासत्वविषयं तेन पतितादिभ्योदुष्टदे-

शकालयोरदुष्टद्रव्यप्रतिग्रहे षट्त्रिंशन्मतोक्तं दशप्राजापत्यरूपं पतितादिभ्योमहिष्यादिप्रतिग्रहे याज्ञवल्क्योक्तमिति विज्ञानेश्वरः

' स्मृत्यर्थसारे '

सर्वत्रानुक्तौ दातृदेशकालद्रव्येषु दुष्टेऽपिद्वादशनिष्कप्रमाणं द्रव्यप्रतिग्रहे कार्यं एवं सर्वत्र द्रव्यानुसारेण प्रायश्चित्तवृद्धिऱ्हासौ कल्प्यौ दातृदेशकालद्रव्येष्वन्यतरदोषे एकैकगुणवृद्धिः मणिवासोगवादीनामन्यतरप्रतिग्रहे गायत्र्यष्टसहस्त्रजपः भिक्षादिप्रतिग्रहे पुण्यमंत्रोच्चारणं न च प्रतिग्रहस्यानिषिद्धत्वात्कथं प्रायश्चित्तविधिरिति वाच्यं प्रतिग्रहेण विप्राणां ब्राम्ह्यं तेजः प्रणश्यति इत्यरुणस्मृत्या प्रायश्चित्तान्मायेन च तत्कथनात् प्रतिग्रहसमर्थोऽपि प्रसंगं तत्र वर्जयेदिति स्पष्टमेव निषेधसत्वाच्च प्रायश्चित्तं च प्रतिगृहीतसर्वद्रव्यं त्यक्त्वैव कार्यं सति द्रव्ये प्रायश्चित्ताधिकाराभावादिति 'स्मृत्यर्थसारादयः '

' अरुणस्मृतौ तु '

षष्ठांशद्वादशांशपरित्यागोवैकल्पिकावुक्तौ

' तथा '

प्रतिग्रहाच्च षष्ठांशं वाणीज्याच्च तृतीयकं ।<br>
कृषे विंशतिमं भागं त्यजतां नास्ति पातकं ।<br>
प्रतिग्रहः कुत्सितानां त्रिभिः कृच्छ्रैर्विशुध्यति ।<br>
रथोवाजी च महिषी तिलाधेनुर्गजोऽजिनं ।

सूयमानाच सुरभिर्घोरा: सप्तप्रातिग्रहा इति
एतेषां प्रतिग्रहे आहिताग्नेः प्राजापत्येष्टिः स्मार्ताग्निमत
श्चरुस्तद्देवताकः अनग्नेः अन्येषां च कृच्छ्रत्रयं
' अरुणस्मृतौ '

गुडधेन्वादिधेनूनां प्रायाश्चित्तं तथोच्यते ।
प्रतिग्रहे चरेद्विप्रः प्राजापत्यमतंद्रितः ।
जपेच्च पौरुषं सूक्तं मप्सु चैवाघमर्षणं ।
आहोरात्रोपितश्चैव मुच्यते तेन किल्बिषात् ।
अयुतं जपसंख्या ॥

गृहदानं महादानं नास्ति दानं गृहात्परं ।
येन दत्तेन वै तेन सर्वं दत्तं भवेन्नृणां ।
गृहोपकरणं सर्वं गोमहिष्यादिभूषणं ।
कंडणी पेषणी चुल्ली ह्युदकुंभस्तु मार्जनी ।
शय्या विभाजनं छत्रं वितानं रथगोवृषं ।
तत्र कृच्छ्रं चरेद्विप्रो महासांतपनं तथा ।
शतं वा भोजयेद्विप्रान् गायत्रीलक्षमेव च ।
प्रायश्चित्ते कृते विप्रेमुच्यते तत्प्रातिग्रहात् ।
प्रायश्चितस्याकरणे युवैव म्रियते तु सः ।
अश्वप्रातगृहं कृत्वा चरेच्चांद्रायणत्रयं ।
गोशतं गोसहस्रं च कृष्णा वैतरणी तथा ।
चतस्रश्चैव गावश्च वर्जनायाः प्रयत्नतः ।
चतस्र उत्क्रांतिऋणपापमोक्षमोक्षधेनवः ।
गृहीत्वा वैतरणी लोहं यमदंडभयापहं ।

प्राजापत्यत्रयं कुर्यात् भोजयेच्च शत द्विजान् ।
जपेद्वा वामदेव्यं च शिवसंकल्पमेव च ।
रथंतरं वामदेव्यं जपेन्मुच्येत्किल्बिषात् ।
यज्ञकर्माणि या धेनुर्व्रतधेनुस्तथैव च ।
मधुपर्के च या धेनुर्या धेनुः कर्मसिद्धय ।
एतत्प्रतिग्रहे विप्र प्रायश्चित्तं न विद्यते ।
पर्वता ये दश प्रोक्तास्तथैव द्विमुखी च गौः ।
उष्ट्रप्रतिग्रहे विप्रः क्षपेन्मासचतुष्टयं ।
प्राजापत्येन कृच्छ्रेण षष्ठांशं तु परित्यजेत् ।
विप्रेभ्यो दद्यात् ।

जपद्द्वादशलक्षं वा गायत्र्या निश्यभोजनः ।
शतेन मुच्यते पापाद्विप्राणां भोजनेन च ।
प्राणायामशतं कुर्याद्ब्रम्हकूर्चसमान्वितं ।
रथप्रतिग्रहे लक्षगायत्रीजपमाचरेत् ।
अयुतं वाथ गायत्र्याः संगमे स्नानमाचरेत् ।
षष्ठांशं तु परित्यज्य ब्राम्हणान् भोजयेच्छुचिः ।
प्रतिगृह्यान्नदानानि प्रायश्चितं यथोदितं ।
जपेन्निरंतरं देवीं वैष्णवं व्रतमाचरेत् ।
जपसंख्याअयुतादि ।

विद्यादानं गृहीत्वापि यत्किंचित्पुस्तकादिकं ।
ब्राम्हणान्भोजयेद्भक्त्या कृच्छ्रमेकं समाचरेत् ।
पृथिवींप्रतिगृह्याथ सशैलवनकाननां ।

अपि धातुमथागृह्य तप्तकृच्छ्रत्रयं तथा ।
भूत्वा त्रिषवणस्नायी क्षिपेन्मासचतुष्टयं ।
एवं शुद्धिमवाप्नोति द्विजः षष्ठांश मुत्सृजेत् ।
इदं च सदक्षिणप्रतिग्रहे तद्रहितप्रतिग्रहे तु न दोषः
भूमि यः प्रतिगृण्हाति भूमिं यस्तु प्रयच्छति ।
तावुभौ पुण्यकर्माणौ नियतं स्वर्गगामिनावित्युक्तेः

---

## दानांचीं प्रायश्चित्तें.

दुष्ट प्रतिग्रहाच्या योगानें ब्राह्मण पातकी होतो. वर्ज्य ब्राम्हण प्रतिग्रहाचे चार प्रकार व दुष्ट प्रतिग्रहाचें प्रायश्चित्त.

ह्याप्रमाणें सर्व प्रकारचीं दानें सांगून आतां त्यांच्या प्रतिग्रहाविषयीं शुद्धि(प्रायश्चित्त) सांगेन जेणेंकरून संस्कारयुक्त झालेल्या अशा बुद्धिच्या योगानें चांगल्या मनुष्याचो दान घेण्याविषयीं प्रवृत्ति होणार नाहीं. त्याविषयीं 'मैत्रीच्या दानाच्या प्रकरणांत'--दुष्ट प्रतिग्रहानें ( हत—नाशातें पावलेला ) ब्राम्हण पातकी होतो, म्हणून दान दिल्यानंतर त्याच्याशीं भाषण करूं नये, व त्याचें तोंड पाहूं नये इत्यादि. 'भविष्योत्तरांत' हे भारता ! दुष्ट प्रतिग्रहानें दग्ध झालेल्या ( जळालेल्या ) ब्राम्हणाचें नंतर तोंड पाहूं नयें,व त्याशीं भाषणही करूं नये. "महाभारतांत" =पूजा करणारा, ज्योतिषी, व्यास ( पुराणिक ) दुष्ट दान घेणारा, दुसऱ्याच्या (आप्तादि संबंधा वाचून)अस्थी घेऊन जाणारा, वैद्य, तसेंच गां-

= देवाची पूजा करून त्यावर निर्वाह करणारा.

वचा उपाध्या ( ग्रामोपाध्याय ),हे लोकांत अन्त्यजासारखे होत. म्हणून त्यांस केव्हांही शिवूं नये. कदाचित् त्यांचा अज्ञानानें स्पर्श झाला तर वस्त्रासह स्नान केल्यानें शुद्धि होईल. ' पराशर स्मृतींत '—ह्या मंत्रानें त्यास दान देऊन त्यास नमस्कार करून त्याची प्रार्थना करून गांवच्या सिमेपावेतों त्याचे मागें जावें, त्याचें तोंड पाहूं नये. ' महार्णवांत ' दुष्ट प्रतिग्रह स्पष्ट सांगितला आहे तो असा—प्रतिग्रहाचें ( दानाचें ) दुष्टत्व दाता, काळ, देश, व प्रतिग्राह्य ( दान देण्याची वस्तु) ह्यांच्या दोषाचे भेदावरून चार प्रकारचें होतें. चांडाळत्व व पतित्व इत्यादि दात्याचे दोष कुरुक्षेत्र इत्यादि देशांचे ( स्थळांचे ) दोष, चंद्र व सूर्य ह्यांची ग्रहणें वगैरे हे काळाचे दोष, उभयतोमुखीत्व मेषीत्व इत्यादि देयाचे ( दान करणाऱ्याचे ) दोष होत. तिळांची धेनु, हत्ती, घोडा, म्हैस, कृष्णाजिन, मूर्ति ( देवाची प्रतिमा ) व प्रसवणारी गाय ( उभयतोमुखी ) हे सात भयंकर प्रतिग्रह होत ' ह्या प्रमाणें निषेध सांगितला त्यावरून ' §प्रेतान्न माजिनंमणिः ' असा पाठ घेतला असतां ' प्रेतान्न ' म्हणजे अकराव्या दिवसाच्या श्राद्धाचे अन्नाचें भोजन ' मणि म्हणजे शालिग्राम ' असें ' हेमाद्रि ' म्हणतो. ' त्यांतच त्याचा निषेध आहे ' अरुणस्मृतींतील '—आपल्या कल्याणाची इच्छा करणाऱ्या ब्राम्हणानें जरी अत्यंत आपत्ति आली तरी अंत्यजापासून प्रति-

---

§ तिळधेनुर्गजोवाजी ह्या चरणा पुढें ' महिषा जिन मूर्तयः हा चरण न घेतां ' प्रेतान्न मजिनं मणिः ' हा चरण घेतला.

ग्रह घेऊं नये. कारण, अंत्यजापासून प्रतिग्रह घेतला असतां पातित्य येतें. 'मनु अंत्यजांचे प्रकार सांगतो'—धोबी, चांभार, नट, बुरुड, कोळी, *मेंद व भिल हे सात अंत्यज सांगितले आहेत 'व्यास चांडाळांचे प्रकार सांगतात' ब्राम्हणाच्या स्त्रीचे ठिकाणीं शुद्रापासून उत्पन्न झालेला चांडाल तो तीन प्रकारचा सांगितला आहे 'तसेंच' कुरुक्षेत्रांत प्रतिग्रह घेणारा मनुष्य पुन्हा मनुष्य होत नाहीं, म्हणून त्यानें गायत्री मंत्राचा सातलक्ष जप केल्यानें तो शुद्ध होईल. कालदोषाहून निराळा असा दुष्ट प्रतिग्रहाचा निषेध हा त्याच्या प्रतिग्रहास प्रायश्चित्त सांगितलें त्यावरून स्पष्ट आहे.

अशुभ प्रतिग्रहां विषयीं प्रायश्चित.

सर्व अशुभ प्रतिग्रहां विषयीं प्रायश्चित—'षट्त्रिंशन्मतांत' गायत्री मंत्राचा लक्ष जप केल्यानें अशुभ प्रतिग्रहां पासून शुद्धि होते. 'स्वस्थ मनानें गायत्री मंत्राचा तीन हजार जप केल्यानें अशुभ प्रतिग्रहापासून शुद्धि होते.' हें 'मनूनें' सांगितलें (प्रायश्चित) दोन तीन प्रकारानें प्रतिग्रहांच्या दुष्टत्वा विषयींचें आहे, त्यावरून पतित वगैरें पासून दुष्ट देश (कुरुक्षेत्रादि भूमि) व दुष्ट काल (ग्रहणादि) ह्यांच्या ठिकाणीं चांगल्या द्रव्याच्या प्रतिग्रहा विषयीं 'षट् त्रिंशन्मतांत सांगितलेलें दहा प्राजापत्यरूप प्रायश्चित करावें. पतितादिकां पासून म्हैस वगैरेंच्या प्रतिग्रहां विषयीं 'याज्ञवल्क्यानें' सांगितलेलें प्रायचित्त करावें

* मेद=रामोशी.

असें ' विज्ञानेश्वर ' म्हणतो. ' स्मृत्यर्थ सारांत'ज्या विषयीं कोठें कांहीं सांगितलें नसेल त्या सर्व ठिकाणीं दात्यानें देश,काळ आणि द्रव्य ह्यांच्या मध्यें चांगल्या अशाही बारा निष्का एवढ्या द्रव्याच्या प्रतिग्रहा विषयीं प्रायश्चित करावें. ह्या प्रमाणें सर्व ठिकाणीं जसें द्रव्य असेल त्या प्रमाणें प्रायश्चित्तांची वृद्धि व ऱ्हास ह्यांची कल्पना करावी. दाता, देश, काळ व द्रव्य ह्यां पैकीं एखादे दोष युक्त असेल तर एकेक पट वृद्धि समजावी. मणी, वस्त्र, गाई इत्यादिकां पैकीं एखाद्याचा प्रतिग्रह झाला असतां त्याविषयीं गायत्री मंत्राचा आठ हजार जप करावा. भिक्षा इत्यादिकांच्या प्रतिग्रहांत पुण्यकारक मंत्राचा उच्चार करावा. प्रतिग्रह घेण्याविषयीं निषेध नसल्यानें प्रायश्चितविधि कसला असें म्हणू नये, ' कारण, प्रतिग्रह घेतल्यानें ब्राम्हणांचें ब्राह्मतेज नाहीसें होतें ' ह्या प्रमाणें ' अरुणस्मृति ' आहे त्यावरून व प्रायश्चिताचा संप्रदाय आहे त्यावरून व प्रायश्चित्त सांगितलें, त्यावरून आणि शिवाय ' प्रतिग्रह घेण्याविषयीं समर्थ जरी असेल तरी त्याविषयीं ( प्रतिग्रहा विषयीं ) प्रसंग टाळावा ' ३ ह्या प्रमाणें स्पष्ट निषेध असल्यावरून द्रव्य असतां ( प्रतिग्रहांत घेतलेलें ) प्रायश्चित्तास अधिकार नाहीं, म्हणून प्रतिगृहीत (दान घेतलेल्या) द्रव्याचा त्याग करुनच प्रायश्चित्त करावें ' असें स्मृत्यर्थ सारादिकांत ' आहे

प्रतिग्रहाचें प्रायश्चित्त व भयंकर प्रतिग्रहाचें प्रायश्चित्त.

' अरुण स्मृतींत ' तर प्रतिग्रहांच्या द्रव्याचा षष्ठांश व द्वादशांश त्याचा त्याग करणें हे × वैकल्पिक असें सांगितलें आहे. ' त-

× दानद्रव्याचा षष्ठांश अथवा द्वादशांश इतकें प्रायश्चित्त करावें.

सेंच ' प्रतिग्रहांचा षष्ठांश, वाणिज्याचा तृतियांश, व कृषिचा विसावा भाग, या प्रमाणें त्याग करणाऱ्यांस पातक नसतें. वाईट द्रव्यांच्या प्रतिग्रहां पासून तीन कृच्छ्र प्रायश्चित केल्यानें शुद्धि होते. रथ, घोडा, हैस, तिळांची धेनु, हत्ती, अजिन ( कृष्णाजिन ) व प्रसवणारी गाय ह्या सातांचे प्रतिग्रह घोर ( दुष्ट ) होत. ×आहिताग्निनें ह्यांचा प्रतिग्रह केला असतां ' प्राजापत्येष्टि ' प्रायश्चित होय. *स्मार्ताग्निनानें चरु ( शिजलेला भात ) घेणें तोतद्देदवताक ( दानदेवताक ) ध्यावा. अग्नि रहितास्त्व दुसऱ्यांस ' तीन कृच्छ्र ' प्रायाश्चित्त ' अरुण स्मृतींत ' गुड धेनु वगैरे धेनूंचें प्रायश्चित सांगण्यांत येतें—ह्यांचा प्रतिग्रह केला असतां ब्राम्हणानें आळस न करितां प्राजापत्य प्रायश्चित करावें. तसेंच पुरुष सूक्ताचा व पाण्यांत अघमर्षण सूक्ताचा लक्ष जप करावा आणि अहोरात्र ( एकदिवस ) उपोषण करावें म्हणजे तो त्या पातका पासून मुक्त होईल.

घराचें दान घेतलें असतां प्रायश्चित्त व दुसरीं घोडे गाई इत्यादिकांचीं प्रायश्चित्तें.

घराचें दान हें मोठें दान होय व ह्या पेक्षां दुसरें दान नाहीं. ज्यानें तें दिलें त्यानें मनुष्यांस सर्व दिल्या प्रमाणें होईल. घरांतील सर्व साहित्य, गाई, ह्मशी, वगैरेचें, भूषण, मुसळ, जातें, चूल, पाण्याचा घडा, केरसुणी, बिछाना,

× अग्निहोत्र्यानें.

* गृह्यसूत्रांत सांगितल्या प्रमाणें जो अग्निहोत्र घेतो त्यास स्मार्ताग्नि म्हणतात.

विभाजन, छत्री, वितान ( छत ), रथ, गाय, बैल ह्यां विषयीं ब्राम्हणानें महासांतपन कृच्छ्र प्रायश्चित्त केलें असतां तो त्यांच्या प्रतिग्रहांच्या दोषा पासून मुक्त होईल. त्यानें जर प्रायश्चित्त न केलें तर तो तरुण असाच मरण पावेल. घोड्याचा प्रतिग्रह केला असतां तीन चांद्रायणें प्रायश्चित्त करावें. गोशत, गोसहस्र, काळी गाय, वैतरणी, तसेंच उत्क्रांति धेनु, ऋणमोक्ष, पापमोक्ष व मोक्षधेनु ह्या चार धेनु ह्या सर्व प्रयत्नें करून वर्ज्य कराव्या. वैतरणीचें दान तसेंच यमा पासून होणाऱ्या भयास दूर करणारें लोखंड ह्यांचें दान घेतलें असतां तीन प्राजापत्य प्रायश्चित्त करावें. व शंभर ब्राम्हणांस भोजन घालावें. किंवा वामदेव ह्याच्या किंवा शिव संकल्पाचा जप करावा. रथंतर व ' वामदेव ह्यांचा जप केल्यानें तो पापापासून मुक्त होईल. यज्ञ कर्मांत दिलेली धेनु, व्रतांतील धेनु, मधु पर्कांत दिलेली धेनु, व कर्मांची सिद्धि होण्या करितां दिलेली धेनु ह्यांच्या प्रतिग्रहा विषयीं प्रायश्चित्त नाहीं. दहा प्रकारचे पर्वत, उभयतो मुखी गाय, व उंट ह्यांचा प्रतिग्रह केला असतां ब्राम्हणानें प्रजापति कृच्छ्रानें चार महिने घालवावे ( चार महिने पर्यंत प्रजापति कृच्छ्र प्रायश्चित्त करावें ). व घेतलेल्या द्रव्याचा षष्ठांश ब्राम्हणांस द्यावा. किंवा दिवसा एकदांच भोजन करून गायत्री मंत्राचा बारा लक्ष जप करावा व शंभर ब्राम्हणांस भोजन घालावें आणि ब्रम्हकूर्च प्रायश्चितानें युक्त असे शंभर प्राणायाम केल्यानें पापा पासन मुक्त होईल. रथाचा प्रतिग्रह केला असतां गायत्री मंत्राचा लक्ष जप

करावा, अथवा गायत्री मंत्राचा दहाहजार जप करावा व ×संगमांत स्नान करावें. शुद्धि झाल्या नंतर घेतलेल्या द्रव्याचा षष्ठांश ब्राम्हणांस देऊन त्यांस भोजन घालावें. अन्नाच्या दानांचा प्रतिग्रह केला असतां जसें सांगितलें असेल तसें प्रायश्चित करावें. गायत्री मंत्राचा दहाहजार इत्यादि जप करावा व विष्णु व्रताचें ( एकादशी इत्यादिकाचें ) आचरण करावें. साधारण पुस्तक इत्यादि विद्येचें दान घेतलें असतां ब्राम्हणांस भक्तीनें भोजन घालून एक छच्छ्र प्रायश्चित करावें. पर्वत, अरण्य, उदक ह्यांसह भूमीचा प्रतिग्रह केला असतां तसेंच धातूचा प्रतिग्रह केला असतां तीन तत्वकृच्छ्र प्रायश्चित्त करावें, व चार महिने पावेतों +त्रिकाळ स्नान करावें. आणि घेतलेल्या द्रव्याचा त्याग ( दान ) करावा. ह्या प्रमाणें प्रायश्चित्त केलें असतां ब्राम्हण शुद्ध होईल. हें दक्षिणेनें युक्त अशा प्रतिग्रहा विषयीं समजावें. दक्षिणेनें रहित अशा प्रतिग्रहा विषयीं तर दोष नाहीं. कारण, जो भूमीचा प्रतिग्रह करतो, व भूमीचें दान करतो, ते दोघे पुण्यवान असे होऊन स्वर्गाला जातात ' अशी उक्ति आहे.

---

## अथ षोडशमहादानेषु.

' तत्र चारुण स्मृतौ '

तुलापुरुषभागं च गृहीत्वा चांद्रकंचरेत् ।
हिरण्यगर्भं च तथा ब्रम्हांडंकल्पयादयं ।

---

× दोन नद्या एकत्र ज्या ठिकाणीं होतात त्यास संगम म्हणतात.

+ सकाळीं, मध्यान्हीं व संध्याकाळीं.

जले त्रिषवणस्नायी चरेत्सांतपनद्वयं ।
गोसहस्रप्रतिग्राही यदा विप्रोह्यकामतः ।
गोमूत्रयावकाहारोमासेनैकेन शुध्यति ।
हिरण्यकामधेन्वादिदानमत्र यथोदितं ।
महाभूतघटांतेषु प्रायश्चितमथोच्यते ।
गायत्र्यादशलक्षैश्च प्राणायामसहस्रकैः ।
नश्यंति पापसंघाश्च काकथा दुष्प्रतिग्रहे ।
पावमानं च सूक्तं वै सर्वपातकनाशनं ।

' अत्रायमभिसंधिः '

आयुष्यमितिसूक्तेन मणिं कंठे प्रतिमुच्येत्यादिसूत्रेषु अखिलानामपि विनियोगदर्शनात् तेषामपि प्रामाण्यबलात् पावमानीजयस्याखिलेषु विधानात्तत्फलापेक्षायां गोघ्नान्मातृपितृवधादिमंत्रवर्णेननतत्तत्पातकनाशस्य फलत्वावगत्त्या तत्तत्पापेषु पावमानीजपस्य प्रायश्चित्तत्वं पापानुरोधेन च जपसंख्याकल्पनीयेति दिक्

---

## सोळा महा दानांविषयीं प्रायश्चित्त.

' अरुण स्मृतींत ' तुला पुरुषाचा भाग घेणाऱ्यानें चांद्रायण प्रायश्चित्त करावें. हिरण्यगर्भ, ब्रह्मांड व कल्पवृक्ष ह्यांचें दान घेतलें असतां तीन वेळां नित्य उदकांत स्नान करून ' दोन सांतपन ' प्रायश्चित्त करावें. जो ब्राम्हण कोणतीही

तुळापुरुष, हिरण्यगर्भ इत्यादिकांचें प्रायश्चित.

कामना न धरितां हजार गाईंचा प्रतिग्रह करील त्यानें एक महिना पावेतों गोमूत्रांत शिजलेल्या जवांचा आहार केला असतां तो शुद्ध होईल.

महाभूतांपासून घटापावेतों हिरण्य धेनु, कामधेनु इत्यादिकांचें जसें दान सांगितलें आहे त्याविषयीं प्रायश्चित्त सांगण्यांत येत आहे. दहा लक्ष गायत्रीच्या जपानें तसेंच हजारो प्राणायामांनीं पापांचे समुदाय नाहींसे होतात तर दुष्ट प्रतिग्रहाची कथा काय ? तसेंच पवमानसूक्त हें सर्व पातकांचा नाश करणारें आहे; त्याविषयीं हा अभिसंधि ( योजना )–' आयुष्यं० ' ह्या सूक्तानें मणि कंठांत ( गळ्यांत ) घालण्यांत येऊन त्यावरून दोन्यांत सगळ्यांचाही जसा विनियोग पहाण्यांत येतो व त्यांसही प्रमाणाचें बल असतें त्यावरून ' पावमानी जपाला ' सर्वांचे ठिकाणीं विधान असल्यानें त्या त्या फळाची अपेक्षा असतां ' गोघ्नात्मातृपितृवधादि ' इत्यादि जें मंत्रांत वर्णन करण्यांत आलें आहे त्यावरून त्या त्या पातकाच्या नाशाच्या फलाची अवगति झाल्यानें त्या त्या पातकांचे ठिकाणीं ' पावमानी जपाचें ' प्रायश्चित्तत्व व पापांच्या अनुरोधानें जपाची संख्या करावी. ह्याप्रमाणें दिशा आहे.

---

## अथ राजप्रतिग्रहप्रायश्चित्तं.

अनापदि राजप्रतिग्रहं निंदति " याज्ञवल्क्यः "

न राज्ञः प्रतिगृण्हीयाल्लुब्धस्योच्छास्त्रवर्तिनः

प्रतिग्रहे सनी चक्रीध्वजी वेश्या नराधिपाः ।
अष्टादशगुणं पुर्वपुर्वादेते यथोत्तरमिति ।

' संवर्तः '

राजप्रतिग्रहो घोरो मध्वास्वादो विषोपमः ।
पुत्रमांसं वरं भोक्तुं नतुराजप्रतिग्रह इति

' स्कांदे '

मरुदेशे निरुदके ब्रम्हरक्षस्त्वमागतः ।
राजप्रतिग्रहात्पुष्टः पुनर्जन्म न विंदति ।
ब्राम्हण्यं यः परित्यज्य द्रव्यलोभेन मोहितः ।
विषयामिषलुब्धस्तु कुर्याद्राजप्रतिग्रहं ।
नरके रौरवे घोरे तस्यैव पतनं ध्रुवं ।
वृक्षादावाग्निना दग्धाः प्ररोहंति धनागमे ।
राजप्रतिग्रहाद्दग्धान प्ररोहंति केनचिदिति

' विष्णुधर्मोत्तरे '

दशसूनासमश्चक्री दशचक्री समो ध्वजी ।
दशध्वजिसमा वैश्या दशवैश्यासमो नृपः ।
दशसूनासहस्त्राणि योवाहयति सौनिकः ।
तेन तुल्यः स्मृतोराजा तस्माद्धोरः प्रतिग्रह इति
इत्यधार्मिकराजाविषये निंदा ।
तथाच तत्रैव लिखितं ।
येषां न विषये प्रीतिर्यज्ञे यज्ञपतेर्हरेः ।

यत्र ये भूभुजंसोपमेतत्सुनोदितं फलं ।
येषां पाखंडिसंकीर्णं राष्टं न ब्राम्हणोत्करं ।
एते सूनासहस्राणां दशानां भागिनोनृपाः
येषां न यज्ञपुरुषः कारणं पुरुषोत्तमः ।
ते तु पापसमाचाराः सूनापापौघभागिन इति ।
अदुष्टात्तु राज्ञः प्रतिग्रहो न निंदितः ।

'अतएवोक्तं छंदोयशाखायां'

प्राचीनशालादीमहामुनयोराजप्रतिग्रहेऽप्रवर्ततइति
अश्वपतिनामकेन राज्ञा दोषाभाव उपन्यस्तः ।
न मेस्तेनोजनपदेन कदर्योन च मद्यपः ।
नानाहिताग्निर्नाविद्वान् न स्वैरी स्वैरिणी कुतइति

'याज्ञवल्क्यवचनेऽपि'

राजप्रतिग्रहनिंदायां लुब्धस्योच्छास्त्रवर्तिनइति
राजविशेषणाददुष्टराजप्रतिग्रहोन निंदित इति गम्यते
तथा

'नारदोऽपि'

श्रेयान्प्रतिग्रहो राज्ञां नान्येषां ब्राम्हणादृते ।
ब्राम्हणश्चैव राजा च द्वावप्येतौ धृतव्रतौ ।
नैतयोरंतरं किंचित्प्रजाधर्माभिरक्षणे ।
शुचीनामशुचीनां च सन्निवेशोयथांभसां ।
समुद्रे समतां याति तद्वद्राज्ञां धनागमः ।

यथाग्नौ संस्थितं चैव शुद्धिमायाति कांचनं ।
एवं धनागमः सर्वः शुद्धिमायाति राजनीति ' राज-
प्रतिग्रहे प्रायश्चित्तमाह

' वृद्धहारितः '

राज्ञः प्रतिग्रहं कृत्वा मासमप्सु सदा वसेत् ।
षष्ठे काले पयोभक्षः पूर्णे मासे प्रमुच्यते ।
तर्पयित्वा द्विजान्कामैः सततं नियतव्रतइति तदसत्प्र-
तिग्रहविषयमिति

' माधवः '

---

## राजाच्या प्रतिग्रहा विषयीं प्रायश्चित.

राजाच्या प्रतिग्रहाचे दोष व त्याचें प्रायश्चित्त.

संकट नसतां याज्ञवल्क्य ' राजाच्या प्रतिग्रहाची निंदा करतो—लोभी असून शास्त्र मर्यादा सोडून वागणाऱ्या राजा पासून प्रतिग्रह घेऊं नये, प्रतिग्रहा विषयीं ÷सूनी, तेली, †शौंडिक, वेश्या व राजा हे उत्तरोत्तर एकाहून एक अठरापट समजावें. ' संवर्त '—राजाचा प्रतिग्रह मधा प्रमाणें ज्याचा स्वाद आहे, विषाची ज्याला उपमा आहे असा असून मयंकर आहे, म्हणून पुत्राचें मांस खाणें हें कांहींसें बरें पण राजाचा प्रतिग्रह बरा नव्हे. स्कंदपुराणांत ' राजाच्या प्रतिग्रहा पासून पुष्ट

---

÷ सुना घातस्थान ( वधाची जागा ) त्याच्या योगानें उपजीवन करणारा

† भंडारी दारु विकणारा

झालेला ( वाढलेला ) मनुष्य जेथें पाणी नाहीं अशा मरुदेशांत ( रेताडप्रदेशांत—मारवाडांत ) ब्रम्हराक्षसपणाला पावून पुन्हां जन्माला जात नाहीं ( राक्षसाचे योनींतच रहातो ). जो विषय-रूपि आमिषास ( मांसास ) लुब्ध होऊन द्रव्याच्या लोभानें मोहित होऊन ब्राम्हण्याचा त्याग करून राजाचा प्रतिग्रह घेईल, तो भयंकर अशा रौरवनांवाच्या नरकांत खरोखर पडेल. वण-व्याच्या योगानें जळालेले वृक्ष पावसाळ्यांत पुन्हां वाढतात, परंतु राजाच्या प्रतिग्रहाच्या योगानें दग्ध झालेले ( लोक ) कोण-त्याही उपायानें पुन्हां वाढत नाहींत ( शुद्ध होत नाहींत ). धर्मोत्तरांत ' ' दहा सूना बराबर एक तेली, दहा तेल्या बरा-बर एक शौंडिक, दहा शौंडिकां बराबर एक वेश्या, आणि दहा वेश्या बराबर एक राजा. दहाहजार सूनांचे वहन करणारा जो तो सौनिक होय, त्याच्या प्रमाणें राजा सांगितला आहे, म्हणून राजाचा प्रतिग्रह भयंकर होय ' ही धार्मिक नसणाऱ्या राजा वि-षयीं निंदा होय. तसेंच त्यांतच लिहिलें आहे तें असें—ज्यांची यज्ञा विषयीं व यज्ञाचा स्वामी जो हरि त्या विषयीं प्रीति नसते असे जेथें राजे असतात त्यांचेविषयीं हें +सूनोदित फळ समजावें. ज्यांचें राज्य पाखंडी लोकांनीं व्याप्त असून जेथें ब्राम्हणांचा उ-त्कर्ष नाहीं, असे हे राजे दहा हजार सूनांचा उपभोग करणारे होत. ज्यांस यज्ञपुरुष असा विष्णु कारण नाहीं, ते पापरूप ज्याचा आचार आहे असे सूनांच्या पापाच्या समुदायाचे उप-भोग करणारे होत. ( चांगल्या ( धार्मिक ) राजापासून प्रति-

---

+ सूना ( वधस्थाना ) संबधी सांगितलेलें

ग्रह निंद्य मानिला नाहीं म्हणूनच छंदोग शाखेंत म्हटलें आहे--प्राचीन शालादि मोठे ऋषि राजाच्या प्रतिग्रहाविषयीं प्रवृत्त होत नव्हते. म्हणून अश्वपति नांवाच्या राजानें निर्दोषीपणा स्थापित केला कीं, माझ्या राज्यांत चोर नाहींत, कृपण नाहींत, माझ्या राज्यांत मद्यपि नाहींत, माझ्या राज्यांत अग्नि न ठेवणारा असा कोणी नाहीं, अविद्वान नाहीं, व स्वछंदी नाहीं तर स्वैरिणी (जारिणी) कोठून असणार? 'याज्ञवल्क्याचे वचनांतही' राजाच्या प्रतिग्रहाच्या निंदेंत '.लुब्धस्योच्छास्त्रवर्तिन' असें राजाचें विशेषण असल्यावरून चांगल्या (धार्मिक) राजाचा प्रतिग्रह निंद्य नव्हे असें वाटतें. तसेंच 'नारदाचेंही म्हणणें आहे कीं राजांचा प्रतिग्रह श्रेयस्कर होय. ब्राम्हणांवांचून दुसऱ्यांचा प्रतिग्रह श्रेयस्कर नव्हे. व्रतस्थ रहाणारे ब्राम्हण व राजा ह्या दोहोंमध्यें प्रज्ञा व धर्म ह्यांच्या रक्षणांत किंचित् देखील अंतर नाहीं. चांगल्या व वाईट अशा उदकांचा समुदाय समुद्रांत जसा समानतेला पावतो, त्याप्रमाणें राजांचा ×धनागम होय. जसें अग्नींत ठेविलेलें सोनें शुद्ध होतें, त्याप्रमाणें चोहोंकडून आलेलें द्रव्य राजाचे ठिकाणीं शुद्धीला पावतें. राजाच्या प्रतिग्रहाविषयीं 'वृद्धहारित' प्रायश्चित्त सांगतो. 'राजाचा प्रतिग्रह घेतला असतां एक महिना पावेतों पाण्यांत निरंतर रहावें, *सहाव्या काळीं दूध प्यावें. ह्या प्रमाणें निरंतर व्रताचे ठिकाणीं तत्पर राहिला असतां तो एक महिना पूर्ण झाल्यावर शुद्ध होईल, नंतर त्यानें ब्राम्हणांस इच्छेप्रमाणें तृप्त करावें, हें दुष्ट प्रतिग्रहाविषयीं आहे असें 'माधव' म्हणतो.

---

× द्रव्य येणें

* दिवसाच्या सहाव्या भागांत

अथ स्मृत्यर्थसारोक्तरहस्यप्रायश्चित्तानि

'याज्ञवल्क्य'

अनभिख्यातदोषस्तु रहस्यव्रतमाचरेदिति कर्तव्य तिरिक्तै र्यदीयोदोषोन ज्ञायतइत्यर्थः अतश्च पारदार्या-देरपीस्त्रीपुंसाभ्यामितरेणाज्ञातस्य रहस्यतास्त्येव तस्य प्रायश्चित्तमपि रहस्यमेव कर्तव्यं

'तथाच हारितः'

रहस्ये रहस्यं प्रकाशे प्रकाशमिति तत्र; रहस्यानां साधारणप्रायाश्चित्तं

'मनुराह'

वेदाभ्यासोन्वहं शक्त्या महायज्ञक्रियाक्षमा ।
नाशयंत्याशु पापानि महापातकजान्यपि ।
यथैधस्तेजसा वन्हिः प्राप्तं निर्दहति क्षणात् ।
तथाज्ञानकृतं पापं कृत्स्नं दहति वेदवित् ।
सव्याहृतिकप्रणवाः प्राणायामास्तु षोडश ।
अपि भ्रूणहनं मासं पुनत्यहरहः कृता इति

'वसिष्ठः'

यच्चाकार्यं कृतं साग्रशतं वेदैश्च नित्विनं ।
तत्सर्वं तस्य वेदाग्नि र्दहत्याग्निरिवें धनं ।

'यम'

सहस्रपरमां देवीं शतमध्यां दशावरां ।

गायत्रीं स जपेन्नित्यं महापातकनाशिनीमिति॥

'मूले शौनकः'

ऋग्वेदमभ्यसेद्यस्तु यजुः सामाथवापि वा।
सूक्तानि सरहस्यानि अथर्वांगिरसस्तथा।
ब्राम्हणानि च कल्पांश्च षडंगानि तथैव च।
इतिहासपुराणानि देवतास्तवनानि च।
जप्त्वा पापैः प्रमुच्येत धर्मस्थाने तथा परैरिति।

'कौर्मे'

जपस्तपस्तीर्थसेवा देवब्राम्हणपूजनं।
ग्रहणादिषु कालेषु महापातकशोधनं।
पुण्यक्षेत्राभिगमनं सर्वपापप्रणाशनं।
देवताभ्यर्चनं नृणां सर्वपापप्रणाशनं।
अमावास्यातिथिं प्राप्य यः समाराधयेध्द्रुवं।
ब्राम्हणान् भोजयित्वा तु सर्वपापैः प्रमुच्यते।
कृष्णाष्टम्यां महादेवं तथा कृष्णचतुर्दशीं।
संपूज्य ब्राम्हणमुखे सर्वपापैः प्रमुच्यते।
त्रयोदश्यां तथा रात्रौ स्तेपहारं त्रिलोचनं।
दृष्ट्वेशं प्रथमे यामे मुच्यते सर्वपातकैः।
एकादश्यां निराहारः समभ्यर्च्य जनार्दनं
द्वादश्यां शुक्लपक्षस्य सर्वपापैः प्रमुच्यते।
उपोषितश्चतुर्दश्यां कृष्णपक्षे समाहितः।
यमाय धर्मराजाय मृत्यवे चांतकायच।

वैवस्वताय कालाय सर्वभूतक्षयाय च ।
औंदुबराय दध्नाय नीलाय परमेष्ठिने ।
वृकोदराय चित्राय चित्रगुप्ताय वै क्रमात् ।
चतुर्दशैते मंत्रास्यु श्चतुर्थ्यंता नमोन्विताः ।
प्रत्येकं तिलसंमिश्रान्दद्या रसप्तोदकांजलीन् ।
स्नात्वानद्यां तु पूर्वाण्हे मुच्यते सर्वपातकै रिति ।

‘ तथा तत्रैवाध्यायांतरे ’

अस्मिन्कलियुगे घोरे लोकाः पापानुवर्तिनः ।
भविष्यंति महाबाहो वर्णाश्रमाविवर्जिताः ।
नान्यत्पश्यामि जंतूनां मुक्त्वा वाराणशीं पुरीं ।
सर्व पापप्रशमनं प्रायश्चित्तं कलौ युग इति

इति रहस्येषु साधारण प्रायश्चितानि

---

### स्मृत्यर्थसारांत सांगितलेलीं ×रहस्य प्रायश्चित्तें.

एकांतांत करावयाचीं प्रायश्चितें.

‘ याज्ञवल्क्य ’—कर्त्या वांचून दुसऱ्यांस ज्याचा दोष कळत नाहीं त्यानें रहस्य व्रत करावें. आणि म्हणूनच स्त्री व पुरुष ह्यांवाचून दुसऱ्यानें न जाणलेल्यास =पारदार्यादिकास रहस्या रहस्यता आहेच, त्याचें प्रायश्चित देखील एकांतींच करावें. ‘ तसेंच ‘ हारीत ’—रहस्याविषयीं

× एकांतांत करावयाचीं.

= व्यभिचार इत्यादिकांस.

रहस्य व प्रसिद्धाविषयीं प्रसिद्ध प्रायश्चित करावें. त्यांत रहस्य पातकांचें साधारण प्रायश्चित ‘ मनु ’ सांगतो ’–शक्तिप्रमाणें दररोज वेद पढणें, मोठा यज्ञ करणें व क्षमा हीं मोठ्या पातकांपासून उत्पन्न होणाऱ्याही पातकांचा नाश करतात. जसें अग्निवर पडलेलें वाळलेलें लांकूड अग्नि आपल्या तेजानें जाळतो, त्याप्रमाणें ज्ञानानें केलेल्या सर्व पातकांला वेद जाणणारा जाळून टाकतो. दररोज महिनापावेतों व्याहृति व ओंकार ह्यांसह सोळा प्राणायाम केले असतां ते बाळहत्या करणाऱ्याचेंही पावन करतात. वेदांनीं ज्यास निंद्य मानिलें असे जो साग्रशत असें अकार्य ज्यानें केलें असेल, त्याचें तें सर्व अग्नि जसा लांकडास जाळतो त्याप्रमाणें वेदरूपी अग्नि, जाळील. ‘ यम ’—हजार, शंभर व दहा अशा उत्तम, मध्यम कनिष्ट अशा जपाच्या संख्येनें मोठ्या पातकांचा नाश करणाऱ्या अशा गायत्रीचा जप करावा. ‘ मुळांत ’ शौनक ’–ऋग्वेद, किंवा यजुर्वेद अथवा सामवेद ह्यांचें जो अध्यायन करील, अथवा रहस्यांनीं युक्त अशीं सूक्तें, तसेंच अथर्ववेद, ब्राह्मण, कल्प, वेदांचीं +सहा अंगें, भारतादि इतिहास, पुराणें, व देवतांचीं स्तोत्रें त्यांचे पाठ केलें असतां पापांपासून मुक्त होईल. तसेंच पुण्यकारक अशा स्थळीं अन्य कर्मांनीं पापांपासूत मुक्त होईल. ‘ कूर्म पुराणांत ’ ग्रहणादिकाळीं जप करणें, तप करणें, तिर्थांच्याठिकाणीं जाणें, व देव व ब्राम्हण ह्यांची पूजा करणें हें मोठ्या पातकांची शुद्धि

---

\+ शिक्षा छंद ज्योतिष अष्टाध्यायी निघंट व निरुक्त हीं सहा अंगें होत.

करणारें आहे. पुण्यकारक अशा क्षेत्रांत जाणें तें सर्व पातकांचा नाश करणारें आहे. देवतांचें पूजन करणें हें मनुष्याच्या सर्व पातकांचा नाश करणारें आहे.अमावास्या तिथि प्राप्त झाली असतां जो त्यादिवशीं ब्राह्मणांची पूजा करून त्यांस भोजन देईल तो सर्व पापांपासून मुक्त होईल. ह्या पक्षांतील अष्टमी तसेंच चतुर्दशी ह्यादिवशीं ब्राम्हणांच्या समक्ष शंकराची पूजा केली असतां सर्व पापांपासून मुक्त होईल.' कृष्णपक्षांतील त्रयोदशीस रात्रीच्या पहिल्या प्रहरांत गंध पुष्प इत्यादिक उप· चारांनीं युक्त ज्याला तीन डोळे आहेत अशा शंकराचें दर्शन केलें असतां सर्व पातकांपासून मुक्त होईल. जो शुक्लपक्षांतील एकादशीचे दिवशीं भोजन न करतां विष्णुचें पूजन करून द्वा- दशीचे दिवशीं पारणा करील, तो सर्व पातकांपासून मुक्त होईल. जो कृष्ण पक्षांतील चतुर्दशीस उपोषित राहून स्वस्थ मनानें दिवसाच्या पहिल्या भागांत नदींत स्नान करून ' चतुर्थी विभ- क्तीनें व ' नमः ' ह्या पदानें युक्त अशा ' यमायनमः, धर्मरा- जायनमः, मृत्यवेनमः, अंतकायनमः, वैवस्वतायनमः, कालायनमः, सर्वभूतक्षयायनमः, औदुंबरायनमः, दध्नायनमः, नीलायनमः, परमेष्ठिनेनमः वृकोदरायनमः, चित्रायनमः, व चित्रगुप्तायनमः, ह्या प्रमाणें क्रमानें ह्या चौदा मंत्रांनीं प्रत्येकीं तिळांनीं मिश्र असे सात सात उदकाचे अंजलि देईल तो सर्व पातकां पासून मुक्त होईल. ' तसें त्यांत ( स्कंदपुराणांत ) च दुसऱ्या अध्यायांत ' हे महाबाहो ! भयंकर अशा ह्या कलियुगांत पापकर्मानें लोक

†वर्ण व *आश्रम ह्यांनीं रहित असे होतील. म्हणून कलियुगांत प्राण्यांच्या सर्व पातकांचें नाश करणारें असें काशी नगरी वांचून दुसरें प्रायश्चित मी पहात नाहीं. ( मला दिसत नाहीं ).

ह्या प्रमाणें रहस्य पातकां विषयीं साधारण
प्रायाश्चित्तें सांगितलीं.

---

अथ प्रतिपदोक्तप्रायश्चित्तानि.

' याज्ञवल्क्यः '

त्रिरात्रोपोषितोजप्त्वा ब्रम्हहा त्वघमर्षणं ।
अंतर्जले विशुध्येत्स गांचदत्वा पयस्विनीमिति ।

' मनुः '

हविष्यांतीयमभ्यस्य नतमंहइतीति च ।
जप्त्वा च पौरुषं सूक्तं मुच्यते गुरुतल्पगइति
हविष्यांतमजरंस्वर्विदीत्येकोनविंशर्चं ।
नतमंहोनदुरितं सप्तर्चं ।
इति वा इति मे मन स्त्रयोदशर्चं ।

सहस्रशीर्षेति षोडशर्चं एतेषां चतुर्णां सूक्तानां अन्यतमं प्रत्यहं षोडशकृत्वो मासंजपित्वा अकामतो-गुरुतल्पगः शुध्यतीति विज्ञानेश्वरादिसंमतोर्थः

' मूले शौनकः '

---

† ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण.

* ब्रम्हचर्य गृहस्थ वानप्रस्थ व सन्यास हे चार आश्रम होत.

अतोदेवाजपेत्सूक्त मग्नआयूंषि वा तृचा ।
अघमर्षं च वा जप्त्वा मुच्यते ब्रम्हहत्ययेति

+प्रतिपदोक्त प्रायश्चितें.

ब्रम्हहत्या व गुरु स्त्रीशीं गमन घडलें असतां त्या विषयीं प्रायश्चित.

'याज्ञवल्क्य'—ब्रम्हहत्या करणारानें तिन दिवस पावेतों उपोषित राहून पाण्यांत अघमर्षणाचा जप करावा व उत्तम दूध देणारी गाय द्यावी म्हणजे तो शुद्ध होईल. 'मनु'—'हविष्यांतीय,' 'नतमहं.' व पुरुष सूक्त ह्या तीन सूक्तांचा गुरुच्या स्त्रीशीं गमन करणाऱ्यानें जप केला असतां तो त्या दोषा पासून मुक्त होईल. 'हविष्यांत मजरस्वर्विदि' हे एकोणीस ऋचांचें सूक्त, 'नतमंहोन दुरितं' हे सात ऋचांचें, 'इतिवा इतिमे मनः' हें तेरा ऋचांचें, 'सहस्र शीर्षा' हें सोळा ऋचांचें ह्या चार सूक्तां पैकीं एकादें सूक्ताचा दररोज एक महिना पावेतों सोळा वेळ जप केला असतां इच्छे वांचून गुरूच्या स्त्रीशीं गमन करणारा शुद्ध होतो. ह्या प्रमाणें 'विज्ञानेश्वरादिकांनीं मानलेला अर्थ आहे. 'मूळांत शौनक'—'अतोदेवा' हें सूक्त, किंवां 'अग्निआयूंषि' ही तृचा किंवा अघमर्षण सूक्त ह्यांचा जप केला असतां ब्रम्हहत्त्येपासून मुक्त होईल.

---

+ वाचानिक जो दोष घडला असेल त्याच संबंधानें प्रायश्चित सांगण्यांत येतें तें

अथ स्मृत्यर्थसारोक्त रहस्य प्रायश्चित्तानि.

कर्तृव्यतिरिक्तेतराज्ञातदोषे रहस्यं प्रायश्चित्तं चरेत । अविद्वांस्तु मुखांतरेण रहस्यप्रायश्चित्तं ज्ञात्वा रहसि चरेत् । स्त्रीशूद्राश्चैयं जपहोमवर्ज्यं तत्राहारविशेषानुक्तौ पयः भृतयः कालविशेषानुक्तौ वासरादयोमासांताः देशविशेषानुक्तौसिलोच्चयादयो गौतमोक्ताः जपे तु ऋषिदैवतछंदोविनियोगाविज्ञेयाः । अमत्या ब्राम्हणवधे त्रिरात्रमंतर्जले निमज्य ऋतं च सत्यंचेत्यघमर्षणसूक्तमावर्त्य त्रिरातांते पयास्विनीं गां दत्वा शुध्येत् । दानाशक्तौ सव्याहृतिकाः षोडश प्राणायामाः प्रतिदिनं मासमावर्त्य कार्याः इति स्मृत्यर्थसारोक्तरहस्यप्रायश्चित्तानि निरूपितानि

इति श्रीमत्कालोपनामकभट्टरामेश्वरात्मजभट्टमहादेवद्विजवर्यसूनुभट्टदिवाकरविरचित-
दानसंक्षेपचंद्रिकायां सदसत्प्रति-
ग्रहप्रायश्चित्तानि काश्यां
निरूपितानि.

---

स्मृत्यर्थ सारांत सांगितलेलीं रहस्य प्रायश्चित्तें.

रहस्य प्रायश्चित्तें.

कर्त्यां वांचून इतरांस दोष समजला नसल्यास रहस्य प्रायश्चित्त करावें. अविद्वानानें दुसऱ्यांच्या मुखानें रहस्य प्रायश्चित्त केल्या प्रमाणें एकांतीं करावें. स्त्री व शूद्र ह्यांनीं ह्या प्रमाणें होमावांचून रहस्य प्रायश्चित्त करावें, त्यांत अमुकच आहार करावा

असें सांगितलें नसेल तर दूध वगैरे घ्यावें; अमुकच काल असें सांगितलें नसेल तर त्या ठिकाणीं दिवसा पासून महिन्या पावेतों घ्यावें. अमुकच देश घ्यावे असें सांगितलें नसेल तर पर्वत इत्यादि गौतमांनीं सांगितलेले घ्यावें. जपा विषयीं ऋषि, दैवत, छंद व विनियोग हे जाणावे. अजाणपणानें ब्राम्हणाचा वध घडला असतां पाण्यांत तीन रात्र पावेतों बुडून ' ऋतंचसत्यंच ' ह्या अघमर्षण सूक्तांचा जप करून तीन रात्रींच्या शेवटीं दुध देणारी गाय द्यावी म्हणजे तो शुद्ध होईल. दान ( गाईचें ) देण्यास शक्ति नसल्यास दररोज व्याहृतींसह सोळा प्राणायाम महिना पावेतों करावें.

ह्या प्रमाणें स्मृत्यर्थ सारांत सांगितलेलीं रहस्य
प्रायश्चित्तें सांगितलीं.

ह्या प्रमाणें काळे उपनांवाच्या भट्ट रामेश्वराचा पुत्र
द्विजांत श्रेष्ठ असा भट्ट महादेव त्याचा पुत्र
दिवाकर ह्यानें रचिलेल्या दान संक्षेप
चंद्रिकेंत चांगल्या व वाईट
प्रतिग्रहांचीं प्रायश्चित्तें
काशींत सांगितलीं.

समाप्त.